# अण्वस्त्राविरुध्द

# पैशाशिवाय जगाची पायी यात्रा

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



REFBK-0015842

सतीशकुमार

परंधाम प्रकाशन, पवनार

अण्वस्त्राविरुद्ध

# पैशाशिवाय जगाची पायीं यात्रा

ठाण.
८४०७२ वि: भू-प्रवास
४४८ ५।३।८७.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. १५८४२

लेखक

सतीशकुमार

अनुवादक

बाबाजी मोघे

REFBK-0015842

REFBK-0015842

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

परंधाम प्रकाशन, पवनार (वर्धा)

प्रकाशक :
रामभाऊ म्हसकर
ग्राम सेवा मंडळ, परंधाम प्रकाशन
पवनार (वर्धा) महाराष्ट्र

प्रथम संस्करण
जून १९६६
प्रति : २०००
किंमत : चार रुपये

मुद्रक :
रामभाऊ म्हसकर,
परंधाम मुद्रणालय,
पवनार (जि. वर्धा)

# प्रकाशकीय

सैर कर दुनिया की गाफिल, जिन्दगानी फिर कहाँ,
जिन्दगी गर कुछ रही, तो नौजवानी फिर कहाँ ?

दोन तरुण–सतीशकुमार व प्रभाकर मेनन एके दिवशीं दिल्लीहून निघाले जगाच्या प्रवासासाठी ! पण हा प्रवास भटकण्याची हौस पुरी करण्यासाठी नव्हता, तर युद्धाच्या भीषणतेने त्रस्त झालेल्या जनतेला अहिंसेचा व प्रेमाचा संदेश ऐकविण्यासाठी; आणि मास्को, पॅरिस, लंडन, वॉशिंगटन इत्यादि ठिकाणीं विराजमान असलेल्या राज्यनेत्यांना निःशस्त्रीकरणार्थ 'अपील' करण्यासाठी.

एवढेच नव्हे, या यात्रेचीं दोन आणखी वैशिष्ठ्यें होतीं. ही यात्रा होती विनपैशाची आणि वाहनाशिवायची. पायीं, पायीं, पायीं !

कुठे दिल्ली, कुठे वॉशिंगटन ! पू. बापूंच्या समाधीपासून सुरु झाली ही यात्रा, आणि समाप्त झाली श्री. केनेडींच्या समाधीपाशी !

भारताच्या या दोन शान्ति-यात्रिकांची पैशाशिवायची साऱ्या जगाची ही पायीं-यात्रा साहसांनी तर भरलेली आहेच, पण अपरिग्रह आणि शाकाहार या नियमांच्या बंधनामुळे अडचणींची आणखी त्यात भर पडली आहे. हे यात्री खैबर खिंडीतून पसार झाले आहेत, रेताड वाळवंटें ओलांडून गेले आहेत, बर्फाळ मैदानें तुडवून गेले आहेत, आणि घनदाट जंगलातूनहि. पॅरीसमधे यांना जेलची हवाहि खावी लागली आहे आणि अमेरिकेत यांना पिस्तुलाशीहि सामना करावा लागला आहे.

पण, या साऱ्या अनुभवांच्या पार्श्वभूमीत सर्वत्र एका गोष्टीचें दर्शन होतें, तें हें की मानव हा प्रत्येक ठिकाणीं मानवच आहे. त्याच्या हृदयात प्रत्येक मनुष्याबद्दल प्रेम आहे, सहानुभूति आहे, कळवळा आहे. तो सर्वांशी प्रेमाने मिळून मिसळून राहू इच्छितो. त्याला युद्ध नको आहे. बिलकुल नको.

दोन सव्वादोन वर्षांच्या या साहसी पायीं यात्रेचीं मनोरंजक संस्मरणें व कडू-गोड अनुभव जो कोणी वाचील तो मुग्ध झाल्याशिवाय राहणार नाही.

•

# दोन शब्द

'प्रकाशकीय' वाचल्यानंतर जास्त काही सांगायचें उरत नाही. तरी श्री. सतीश कुमार यांचें हिंदी भाषेतील पुस्तक वाचतांना मनात काही विचार आल्याशिवाय राहत नाहीत.

हे दोन तरुण – ज्यांनी नुकतीच विशी ओलांडली आहे – विनपैशाने जगाचा पायीं प्रवास करायला निघतात हेंच केवढें धाडस !

दुसरा मुद्दा भाषेचा. येथून आमची जी मंडळी युरोप-अमेरिकेचा प्रवास करायला निघतात त्यांच्यासमोर भाषेचा प्रश्न फारसा अवघड नसतो. कारण प्रवासाची व्यवस्था करणाऱ्या येथील कंपन्यांचा व्यवहार सामान्यतः इंग्रजीत चालतो. प्रवासीहि बहुधा इंग्रजी भाषा बोलत असणाऱ्या देशांत जात असतो. म्हणून प्रवाशाला थोडेंबहुत इंग्रजी येत असलें म्हणजे त्याचें काम निभून जातें. त्यामुळे आमचा एक सर्वसाधारण असा समज झाला आहे की भारताबाहेर कोठें प्रवास करावयाचा असल्यास प्रवास करणाराला इंग्रजी भाषा येणें एक आवश्यक बाब आहे. हा भ्रम श्री. सतीश कुमारांनी फारच चांगल्या प्रकारें दूर केला आहे. प्रथम श्री. सतीश कुमारांनाहि आपल्याला इंग्रजी भाषा येत नाही त्यामुळे प्रवासात आपलें कसें होईल याची भीति वाटली होती. पण यांचा प्रवास पायीं असल्यामुळे ती भीति कशी निरर्थक होती हें त्यांना स्वानुभवानेच क लें. पायीं प्रवास करतांना त्यांना अनेक देशांतून जावें लागलें. तेथील लोकांना स्वदेशातील भाषा येत असे पण इंग्रजीचा गंधहि नसे. एवढेंच नव्हें तर अगदी इंग्लंड-जवळ असलेल्या फ्रान्स, जर्मनी, हॉलंड सारख्या देशांतहि इंग्रजीत गप्पा-गोष्टी करायला त्यांना कोणी मिळाला नाही. फक्त इंग्लंड व अमेरिकेतच इंग्रजी भाषेचें त्यांना काम पडलें ही गोष्ट आमच्या येथील व्यर्थ इंग्रजी भाषा-भिमानी लोकांना विचार करायला लावणारी आहे. वास्तविक आपल्याला युरोपातील व आशियातील अनेक प्रमुख भाषा शिकल्या पाहिजेत. पण आपण सध्या इंग्रजीवर इतका जोर देत आहोत की इंग्रजीशिवाय इतर

भाषांकडे लक्ष द्यायला आपल्याला वेळ होत नाही. इतकेंच नव्हें तर मातृ-भाषेकडेहि दुर्लक्ष होत आहे. हे तरुण ज्या ज्या देशांत गेले तेथील भाषा थोडी शिकून ते लोकसंपर्क साधत असत व आपलें 'मिशन' पुरें करीत असत.

तिसरा मुद्दा आहाराचा. ही मंडळी शाकाहारी होती, व प्रवासात शाकाहारी राहण्याचा त्यांनी निश्चय केला होता. हे लोक जगाच्या अशाहि भागांत गेले होते जेथील लोकांना कल्पना सुद्धा नव्हती की मांसाशनाशिवाय मनुष्य जगू शकतो. अशा लोकांत महिना-महिना राहूनहि त्यांनी मद्य-मांसाला स्पर्श केला नाही, व आपलें व्रत बरोबर पाळलें. केवढा निर्धार हा ! अलीकडे तर प्रकृति-स्वास्थ्यासाठी शाकाहाराचा प्रसार पश्चिम युरोपामधे व अमेरिकेत खूप जोर पकडीत आहे.

चौथा मुद्दा प्रवासात स्वत:जवळ पैसा न ठेवतां पायीं प्रवास करण्याचा. निव्वळ लोकाधारानेच राहण्याचा. लोकांना जेव्हा कळे की हे लोक स्वत:-जवळ एकहि पैसा न ठेवतां पायीं प्रवास करीत आहेत तेव्हा अनेक लोक आपुलकीने त्यांना पैशाची मदत करायला पुढे येत व द्रव्य स्वीकारण्याचा आग्रह करीत. त्यांचा द्रव्य न घेण्याचा निर्धार पाहून आश्चर्यचकित होत. इतकेंच नव्हें तर जास्त आपलेपणाने त्यांची काळजी घेत. हें पाहून 'जनीं जनार्दन' कसा भरून राहिला आहे याचें दर्शन होतें.

पांचवा मुद्दा त्यांच्या प्रवासाच्या ध्येयाचा. वास्तविक पाहतां ही अगदी सामान्य मुलें. कुणा बड्या समजल्या जाणाऱ्या लोकांचा आधार नाही. पण हिंमत केवढी ? आपल्या ध्येयावर निष्ठा केवढी ? रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांच्या राष्ट्रनायकांना भेटून एकतर्फी अण्वस्त्र-प्रयोगांवर बंदी घालण्याची ह्यांनी त्यांना विनंति केली ! सर्वच अद्‌भुत !

त्यांच्यावर कसोटीचे प्रसंगहि कमी नाही आले. सुरुवातच पासपोर्ट मिळण्यापासून झाली. रशियाचा 'व्हिसा' मिळवायला त्यांना किती कष्ट पडले ! इराणच्या शहांची भेट घेण्याच्या वेळीं काळा पोषाख करूनच भेटायला जायला हवें हा प्रसंग; रशियात त्यांच्या 'व्हिसा'ची मुदत ४५ दिवस कमी करून त्यांना विमानाने अगोदरच पोलंडमधे वॉरसाला पाठ-

विण्याचा रशियन स्वागत कमेटीतील काही लोकांचा बेत त्यांनी धुडकावून स्वावलंबनाने रशियात भर थंडीत पुढे प्रवास चालू ठेवण्याचा प्रसंग, पश्चिम जर्मनी व फ्रान्स यांच्यासारख्या सुधारलेल्या देशांच्या राजप्रमुखांनी भेटीसंबंधीं सामान्य शिष्टाचारहि न पाळल्यामुळे उद्‌भवलेले प्रसंग, इत्यादि प्रसंगांच्या वेळीं या लोकांनी भारताचा सत्याग्रही अशा प्रसंगीं बाणेदारपणाने पण नम्रता न सोडता कसा वागतो याची चुणूक दाखवून भारताची मान उंचावली आहे.

ग्रंथ लेखकाने प्रवासाचें वर्णन विशेष केलेलें नाही. पण ज्या ज्या देशांतून प्रवास केला तेथील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक वगैरे परिस्थितींची चांगली माहिती दिली आहे. ती वाचत असतांना एका गोष्टीकडे विशेषरीतीने लक्ष जाते की रशियासारख्या कम्यु-निस्ट देशात डोळे दिपविणारी श्रीमंती दिसत नसली तरी लोक खाऊन-पिऊन सुखी आहेत व त्या देशात बेकारी व भिकारी नांवालाहि आढळले नाहीत. पण इंग्लंड अमेरिका यासारख्या श्रीमंत, वैभवसंपन्न देशांत बेकारी व भिकार लोक पुष्कळ प्रमाणात आहेत असें दिसतें. विशेषत: अमेरिकेतील तसलें वर्णन वाचतांना आश्चर्याचा धक्काच बसतो. जपानी लोक दुसऱ्याशी वागतांना जी नम्रता व आपलेपणा दाखवितात त्याचें वर्णन वाचतांना आपल्याहि मनात जपानविषयीं आत्मीयभाव उत्पन्न होतो.

थोडक्यांत सांगायचें म्हणजे वाचकाला बसल्या जागीं अनेक देशांतील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक वगैरे व्यवहारांची अनुभवाने मिळविलेली माहिती प्राप्त होते व भारताला त्या त्या विषयांच्या बाबतीत आपल्या येथे काय काय सुधारणा करायला पाहिजेत याबद्दल त्याच्या मनात विचार मंथन सुरु होतें. म्हणून हें पुस्तक प्रत्येक सार्व-जनिक कार्यकर्त्याने वाचण्यासारखें आहे. श्री. सतीश कुमारांनी आपल्या पदयात्रेचें हें पुस्तक लिहून मोठें समाजकार्य केलें आहे.

अनेक ठिकाणीं प्रवास करता करता 'बिना पैसे दुनिया का पैदल सफर' या हिंदी पुस्तकाचें मराठी भाषांतर केलें गेलें. त्यामुळे केलेलें भाषांतर तपासून पाहतांना अनेकांचें साह्य लाभलें आहे. भाषांतर

तपासतांना परंधाम-पवनारला श्री. गौतम बजाज, वांद्र्यास श्रीमति सौ. भारतीताई ठाकूर व श्री. रामभाऊ श्रीधर थत्ते, कोल्हापूरला श्री. गणेश मालुसरे या सर्वांनी आपलेपणाने साह्य केलें. त्यांनी ज्या उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. ही मंडळी निरनिराळ्या व्यवसायांत गुंतलेली असूनहि त्यांचा हिंदीचा व मराठीचा व्यासंग चांगल्या प्रकारें सतत चालू आहे. या सर्वांचें पुन्हा एकदा आभार मानून हे लांबलेले 'दोन शब्द' पुरे करतो.

श्री. प्रभाकर मेनन यांचें ह्या विषयावरचें इंग्रजी पुस्तक तयार होत आहे. सतीशकुमार आणि प्रभाकर ह्या दोघांनी मिळून हा साहसी प्रवास केला असल्याने घटना आणि प्रवासवर्णन ह्यात दोघांच्या पुस्तकांत तसा फरक पडणार नाही. दृष्टिकोणातली भिन्नता ही रहायचीच.

सर्वोदय केंद्र, उरण
जि. कुलाबा
१०-३-६६.

– बाबाजी मोघे

# प्रवास-क्रम


| | |
|---|---|
| भारतातून प्रयाण | १ |
| शेजारीं पाकिस्तानात | २५ |
| द्राक्षांचा देश अफगाणिस्तान | ३५ |
| कला व काव्याची भूमि इराणमधे | ५४ |
| मजुरांच्या क्रांतीचा देश सोव्हियट संघात | ८० |
| पोलंडच्या प्राणवान जनतेमधे | १३५ |
| दुभंगलेल्या जर्मनीत | १४९ |
| बेलजमच्या सुंदर अंकावर | १८१ |
| संगीत, सौंदर्य व शृंगार भूमि : फ्रांस | १८९ |
| विचार-स्वातंत्र्याची भूमि : ब्रिटन | २०४ |
| यांत्रिक विद्येंत अत्यंत श्रेष्ठ अशा अमेरिकेत | २२० |
| पूर्व व पश्चिम यांची समन्वयभूमि जपानमधे | २७६ |
| विशेषनाम-सूचि | २९१ |
| शुद्धिपत्र | ३०१ |

ग्रं. क्र. ९५४२
शाखा (स्थळ प्रत)

# भारतातून प्रस्थान

१ जून १९६२ च्या सायंकाळीं नव्या दिल्लीतील म. गांधींच्यासमाधीचें दर्शन घेऊन जेव्हा आम्ही पायीं रवाना झालो तेव्हा आम्ही ठरविलें होतें की आम्ही पायीं चालत चालत मास्कोला जाऊ, पॅरीसला जाऊ, लंडनला जाऊ, आणि शेवटीं वॉशिंगटनला पोहोचून अमेरिकेच्या तरुण राष्ट्रपतींना भेटून त्यांना निवेदन करू की आपण नवीन उगवत्या पिढीला अणु-युद्धाच्या भट्टीत भाजून भस्म होण्यापासून बचावण्याचा प्रयत्न करावा. पण आठ हजार मैलांची पद-यात्रा करून जेव्हा आम्ही ६ जानेवारी १९६४ रोजीं वॉशिंगटनला पोहोचलो तेव्हा आम्ही पाहिलें की राष्ट्रपति केनेडी एका खुनी इसमाच्या गोळीला बळी पडून गेले होते. ते राष्ट्रपतींच्या 'व्हाइट हाऊस' मधे नव्हते तर स्मशान भूमीत झोप घेत पहुडले होते. इतकी कठिण व लांबची पदयात्रा करून ज्यांना आम्ही भेटण्याची आशा राखून आलो होतो ते जेव्हा राष्ट्रपति-भुवनात भेटले नाहीत तेव्हा आम्ही पुढे निघालो आणि श्री. जॉन केनेडी यांच्या समाधीपर्यंत जाऊन आमची यात्रा समाप्त केली. आम्ही पू. बापूंच्या समाधीपासून निघालो आणि केनेडींच्या समाधीपाशी जाऊन पोहोचलो. बापूंनी हिंदूंना व मुसलमानांना मिळून मिसळून रहायला सांगितलें तर एका हिंदूने त्यांना गोळी घालून

ठार केलें, आणि केनेडींनी काळ्यागोऱ्या चामडीच्या लोकांना मिळून मिसळून रहायला सांगितलें तर एका गोऱ्या चामडीच्या इसमाने त्यांनाहि गोळी घालून ठार केलें ! समाजाला पुढे नेण्यासाठी जेव्हा जेव्हा कोणी व्यक्ति प्रयत्न करतात तेव्हा तेव्हा समाजातील काही प्रतिगामी शक्ति त्यांना मार्गातून दूर करतात. पण म्हणून समाज-परिवर्तनाचा ओघ रोकण्यात त्यांना कधी सफलता प्राप्त झाली आहे काय ?

अफगाणिस्तानच्या पहाडावर, इराणच्या वाळवंटात आणि रशियाच्या बर्फाळ मैदानात २५-२५ मैल चालूनहि जो थकवा वाटला नाही तो केनेडींच्या त्या समाधीपाशी पोहोचल्यावर वाटला ! हिंसेच्या या शक्तीवर अजूनहि आमचा का विश्वास कायम आहे आणि या हिंसेला अजूनहि संघटित रूप देण्याची आम्ही का धडपड करतो हें लक्षात येत नाही.

## यात्रेची तयारी

पण कोणत्या विचाराने आम्ही व्याकुळ झालो आणि दिल्लीहून मास्को-वॉशिंगटनच्या वाटेवर यात्रेला असे पायीं निघालो ?

१९६१ सालची गोष्ट आहे. त्यावेळीं अणु-अस्त्रांच्या विरुद्ध बर्ट्रांड रसेल यांनी मोर्चा काढण्याचा विचार केला. तें भव्य प्रदर्शन रोकण्यासाठी त्यांना पकडून जेल मधे अडकवण्यात आलें. त्यावेळीं रसेल यांनी जगातील नागरिकांना आवाहन केलें. ते म्हणाले — "आज मूठभर पण शक्तिशाली व्यक्तींच्या हातात मानवतेचें भवितव्य अेखाद्या 'खेळण्याप्रमाणें' बनून गेलें आहे. म्हणून अगदी सामान्य माणसाचेंहि हें कर्तव्य होत आहे की त्याने जागे व्हावें, उठावें आणि या बड्या धेंडांच्याकडून होणाऱ्या मानव-घातक कटाचा गौप्य स्फोट करावा." हें ज्या कोणी वाचलें असेल किंवा ऐकलें असेल त्याच्या हृदयाचे तार एक वेळा तरी अवश्य झणकारून उठले असतील. आमचीहि तशी अवस्था झाली. आमच्याहि मनात हा एक प्रश्न उठला की "आम्ही अशा समयीं चुपचाप हात जोडून बसणें योग्य होईल काय ?"

जेव्हा काही अमेरिकन तरुणांनी सानफ्रान्सिस्कोहून मास्कोपर्यंतची यात्रा केली, आपल्या या यात्रेसाठी त्यांनी पन्नास हजार डॉलर खर्च

करून जगातील लोकांना आणविक शस्त्रांच्या स्पर्धेला लगाम घालण्याचा आवाज उठविण्यासाठी तयार होण्यास सांगितलें, तेव्हा जगभरच्या शान्ति-प्रेमी लोकांचें मन उत्साहाने भरून उठणें स्वाभाविक होतें. आमची स्थिति तशीच झाली. मनांत प्रश्न उठला : " आम्हालाहि असाच काही प्रयत्न करायला पाहिजे काय ? "

मी वाराणशीला होतो आणि माझे मित्र प्रभाकर बंगलोरमधे होते मी वाराणशीहून ' विश्वनीडम् ' आश्रमात राहण्यासाठी म्हणून पोहोंचलो तेव्हा माझ्या स्वागतासाठी प्रभाकर मेनन स्टेशनवर आले होते. बंगलोर-मधे आम्ही दोघे याबाबतीत जरा खोल विचार–विनिमय करू लागलो. आमच्या दोघांच्या मनात एक च प्रकारची ठिणगी पेटलेली आहे असें आम्हाला आढळून आलें. तसें तर गेल्या सात वर्षापासून आम्ही दोघे एकमेकांच्या संपर्कात राहिलो होतो; पण इतक्या निकटतेने बरोबर राहून काम करण्याच्या प्रसंगाने आम्हाला आणखी जवळ आणलें. नव्हेंबर '६१ ची गोष्ट. बंगलोरच्या एका हॉटेलात मी आणि प्रभाकर कॉफी घेत बसलो होतो. प्रभाकर केरळचे व मी राजस्थानचा. दुर्दैवाने मला दक्षिणेकडील कोणतीहि भाषा अवगत नव्हती. पण प्रभाकर इतकी चांगली हिंदी बोलतात की कधी कधी माझी हिंदीसुद्धां त्यांच्यासमोर लज्जित होते. कॉफी पिता पिता गोष्ट निघाली – आणविक निःशस्त्रीकरणाची. प्रभाकर म्हणाले : " पण भारताने या आंदोलनात फारच कमी भाग घेतला आहे. "

मी : " याचें अेक कारण हें असू शकेल की भारत कोणत्याहि सैनिकी गटात सामिल नाही. भारत सरकारची नीति अणु-अस्त्रांच्या विरुद्धच आहे. म्हणून जनता व सार्वजनिक कार्यकर्ते यांचें ध्यान या गोष्टीकडे फार कमी आहे.

प्रभाकर पुन्हा म्हणाले: "पण आम्हाला निःशस्त्रीकरणाच्या आंदोलनाचें आंतरराष्ट्रीय बळ वाढविण्यासाठी काही तरी केलेंच पाहिजे. आम्ही दिल्लीहून मास्को, पॅरिस, लंडन, वॉशिंगटनपर्यंतची पदयात्रा का काढू नये ?

प्रभाकरच्या तोंडून अचानक एक साहसाने भरलेली गोष्ट प्रगट झाली. मी तत्क्षणीं प्रभाकरची पाठ थोपटली. म्हणालो : "शाबास ! तुमची गोष्ट माझ्या मनात तीरासारखी घुसली आहे."

माझें म्हणणें ऐकताच प्रभाकरचा जोश कित्येक पटीने वाढला. ते म्हणाले : "पण काय आपण दोघेच या कामासाठी पुरेसे आहोत ?"

मी म्हणालो : "माझ्या मित्रा, संख्येकडे पाहू नको. गुणाकडे पाहा. जर आपण सच्च्या दिलाने काम करू तर एक आणि एक मिळून दोन नाही पण अकरा होऊ."

अशा गोष्टीत आम्ही आणखीन दोन तीन कप कॉफी झोकून दिली. बात पक्की हो गयी !

## भाषेची समस्या

माझ्यासमोर एक प्रश्न होता. मी नऊ वर्षांचा बालक असताना मला जैन-साधूची दीक्षा देण्यात आली होती. त्यामुळें फक्त तिसऱ्या वर्गापर्यंतच माझें शाळेत शिक्षण झालेलें होतें. शाळेत माझें इंग्रजी शिक्षण झालें नव्हतें. साधू बनल्यानंतर मला धर्म-ग्रंथ व संस्कृत या विषयांचें शिक्षण दिलें गेलें. १८ वर्षांचा झाल्यावर जैनसाधूचें जीवन मी सोडलें व सर्वोदय-आंदोलनात विनोबा-जवळ जाऊन पोहोचलो. यामुळें आतापर्यंत इंग्रजीचा मला गंधहि लागला नव्हता. प्रभाकरबरोबर अण्वस्त्रांविरुद्ध जगाची पद-यात्रा करण्याचें ठरलें तेव्हा माझ्यासमोर प्रश्न उभा राहिला भाषेचा. इंग्रजीशिवाय ही पद-यात्रा जमू शकेल ? माझ्या मनातला हा न्यूनगंड मला आतल्या आत खाऊ लागला. आमच्या इंग्रजी-भक्त पुढाऱ्यांनी मानसिक दृष्टचा आम्हाला किती कमजोर व गुलाम बनविलें आहे याची प्रचीति मला येऊ लागली. इंग्रजीला आम्ही अशी देवतातुल्य बनविलें आहे, जणू तीच सर्व कामना पूर्ण करणारी आहे ! ज्यांना इंग्रजीचें ज्ञान नाही ते स्वत:ला कमजोर, हीन, आणि असहाय समजू लागतात.

प्रभाकर म्हणाले : "भाषेची मुळींच चिंता नको करू. आपण केवळ ब्रिटन किंवा अमेरिकेत नाही जाऊन राहिलोत. आपल्याला तर सर्व

प्रथम फारशी व रशियन भाषी लोकांना भेटायचें आहे. चिंता फक्त इंग्रजीचीच नको, सर्व भाषांचीच करायला पाहिजे." याने माझ्या मनाचें समाधान झालें. तरी एक शंका राहिलीच. पण जेव्हा आम्ही सात हजार मैलांची पद-यात्रा करून, बारा निरनिराळ्या राष्ट्रांच्या सीमा ओलांडून अमेरिकेला पोहोचलो तेव्हा इंग्रजीच्याबद्दल माझ्या मनात ज्या भ्रांत कल्पना शिल्लक राहिल्या होत्या त्या सर्व पार निघून गेल्या. मनातला खटका दूर झाला. डोक्यावर बसलेलें इंग्रजीचें भूत गाडलें गेलें.

आम्ही अफगाणिस्तान व इराणमधे पांच महिनेपर्यंत पद-यात्रा केली. या पांच महिन्यांत इंग्रजीने आम्हाला तिळभरहि साथ दिला नाही. आम्ही एकाग्रतेने प्रयत्न करून फारशी शिकलो आणि त्या मोडक्या तोडक्या फारशीनेच आमचें काम पार पाडलें. चार महिने आम्ही सोव्हिएट-संघात राहिलो होतो. तेथेहि आम्ही रशियन भाषा शिकलो. सुरवातीस थोडा त्रास झाला. पण जो अभाव खटकत होता तो इंग्रजी न जाणण्याचा नव्हता पण रशियन न जाणण्याचा होता.

इंग्रजी फक्त १४-१५ कोटी लोकांची मातृभाषा आहे. ब्रिटन व अमेरिकेतसुद्धा सर्व लोकांची मातृभाषा इंग्रजी नाही. हिंदी-भाषी सर्व लोकांची संख्यासुद्धा यापेक्षा कमी नाही. रशियात जसे आम्हाला इंग्रजीचें दुभाषी मिळाले तसे हिंदीचेंहि मिळाले. मास्को विश्वविद्यालयात माझ्या हिंदी भाषणाचा अनुवाद करणाऱ्या भगिनीचें हिंदी इतकें शुद्ध व प्रवाही होतें की मला विश्वास वाटेना की तिची मातृभाषा हिंदी नसावी. तिच्या मुखातून शुद्ध भारतीय स्वरात मीराबाईचीं भजनें ऐकून मी तर चकितच झालो. ल्यूदमीला नांवाची ही दुभाषी भगिनी आम्हाला तेथील विदेशी भाषांच्या महाविद्यालयात घेऊन गेली, तेथे शेकडो विद्यार्थी धडाकून हिंदी बोलत असतात. त्याचप्रमाणें पॅरिसमधे आपल्या भारतीय राजदूतानें सांगितलें की तेथे संस्कृत आणि हिंदी भाषांचीं जशीं विद्यापीठें आहेत तशीं भारतातहि नसतील. जपानमधे सुद्धा टोकियो व ओसाका विश्वविद्यालयात हिंदीच्या अध्ययनाची विशेष व्यवस्था आहे. याचप्रमाणें अन्य देशातहि हिंदीचें ज्ञान वाढून राहिलें आहे, पण आमच्याच या देशात आमचीच

भाषा उपेक्षित व अनाथ होऊन पडली आहे. जर्मनी व फ्रांसमधे आम्ही तेथील भाषा समजत नव्हतो म्हणून कधी कधी दिवसभरात आम्हाला गोष्टी करायला कोणी भेटत नव्हता. इंग्रजीबाबत आम्ही ज्या उंच उंच कल्पना करून घेतल्या आहेत त्या सर्व वास्तविक नाहीत.

अशा परिस्थितीत मी फारशी व रशीयन भाषेप्रमाणे इंग्रजीचाहि अभ्यास सुरू केला. मला व्याकरण वगैरे येत नसलें, व इंग्रजीत लिहिण्याचा मी अभ्यास केला नसला तरी इंग्रजीत मी गप्पागोष्टी करू शकतो व भाषणहि देऊ शकतो. आपण कोणत्याहि भाषेचा द्वेष करू नये. सर्व भाषांचा सन्मान करावा. जास्तीत जास्त जितक्या भाषा शिकता येतील तितक्या शिकाव्यात, जरूर शिकाव्यात. पण आपल्या देशाच्या लोकभाषेची उपेक्षा करून कोण्या एखाद्या भाषेचें गुलाम होऊत बसणें योग्य नाही. ज्या आमच्या बंधूंना इंग्रजी समजत नाही त्यांनी आपल्या मनात मुळीसुद्धा हीनगंड ठेवू नये. हें मी स्वानुभवाने सांगत आहे. मी इंग्रजी शिकलो नाही तरी मी जगाची यात्रा करण्यात सफल झालो आहे.

## मित्राची मदत

प्रथम आम्ही बर्ट्रांड रसेल यांना आणि अमेरिकेतील त्या तरुणांना पत्रें लिहिलीं, ज्यांनी सानफ्रान्सिस्कोहून मास्कोपर्यंतची यात्रा केली होती. दोघांकडून आम्हाला ताबडतोब जबाब मिळाले. श्री. रसेळ यांनी लिहिलें होतें "तुमच्या मनात ही गोष्ट आली हीच आम्हाला मोठी प्रेरणा देणारी गोष्ट आहे. तुम्ही अवश्य योजना तयार करा आणि पुढे व्हा." अमेरिकेतील तरुणांनी लिहिलें — "आपलें स्वागत असो! बस, मन पक्कें करा. वड्या वड्या पुढाऱ्यांच्या कच्छपी न लागता आपली योजना अमलात आणा. सफलता तुमच्या पायांची दासी होईल." त्याबरोबर उभयतांनी असेंहि लिहिलें की "आम्ही आमच्या क्षेत्रात तुमच्या यात्रेची पूर्ण व्यवस्था करू." बस. आमचा विचार पक्का झाला.

आता आपल्या देशांतील नेत्यांच्या आशीर्वादाचाहि प्रश्न समोर आला. कारण परदेशातील यात्रेत अनेक औपचारिक अडचणी येतात. आम्ही पंतप्रधान पं. नेहरूंना पत्र लिहिलें. त्यावेळीं ते सार्वत्रिक निवड-

णुकींच्या गडबडीत व्यग्र होते. तरीसुद्धा त्यांनी आम्हाला ताबडतोब उत्तर लिहिलें "याच्या परिणामाबाबत मला शंका वाटते. पण तुमचा आदर्श उच्च आहे. तुमचें साहस मला आवडतें, अशा कामाची अत्यंत जरूर आहे." याप्रमाणेच डॉ. राधाकृष्णन ( आता राष्ट्रपति ) यांनीहि फार उत्साहवर्धक संदेश पाठविला. शांतिकार्यात असलेल्या अनेक संस्थांना जेव्हा आम्ही आपली योजना दाखविली तेव्हा सर्व संस्थांनी आमचें पुरेपूर समर्थन केलें आणि सहकार्य दिलें.

या सर्व तयारीनंतर प्रश्न आला पैशांचा. सव्वा दोन वर्षांचा दीर्घ काळ, आठहजार मैलांची लांब पदयात्रा, साऱ्या जगाची प्रदक्षिणा, यासाठी किती पैसा लागेल ? यद्यपि युरोपमधे पूर्ण व्यवस्था करण्याची जबाबदारी श्री. रसेल यांनी स्वीकारली होती आणि अमेरिकेतील जबाबदारीचें आश्वासन ' नान् व्हायोलंट ॲक्शन कमिटी ' (अहिंसक-कृतिसमिति) ने दिलें होतें. तरीपण परक्या देशात काय व्यवस्था होईल, प्रारंभिक तयारीचें कसें ?

या कामाकरता एखाद्या संस्थेकडे पैशासाठी हात पसरणें आम्हाला पसंत नव्हतें. आम्ही ठरविलें होतें की या कामासाठी काही झालें तरी न कोण्या संस्थेकडून पैसा घेणें, न सरकारकडून किंवा कोण्या संचित निधीकडून पैशाची मदत मागणें, किंवा न एखादा फंड गोळा करणें. जे मित्र आम्हाला व्यक्तिशः ओळखतात आणि मित्रत्वाच्या नात्याने आम्हाला मदत करू इच्छितात फक्त त्यांच्या मदतीचा आम्ही स्वीकार करू. या निर्णयानुसार बंगलोरच्या मित्रांनी दिल्लीपर्यंत आमच्या रेल्वे प्रवास खर्चाची व्यवस्था करून दिली. दरम्यान, मी कलकत्त्याच्या आपल्या मित्रांसमोर या मोठ्या यात्रेसाठी लागणाऱ्या मोठ्या खर्चाचा प्रश्न ठेवला. तसें पाहिलें तर व्यापाऱ्यांना पैशाचा प्रश्न निघाला की मोठें संकट वाटतें. पण कलकत्त्याच्या माझ्या मित्रांनी, थोडीहि कुरकुर न करता, लागणाऱ्या सर्व प्रकारच्या खर्चाची व्यवस्था करण्याची तयारी ठेवली हें पाहून मला आश्चर्य वाटलें. परकीय चलन मिळविण्याचा प्रश्न कठिण होता. भारताचे त्यावेळचे वित्त-मंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीं परकीय चलन देण्यास

इन्कार केला. पण कलकत्त्याचे मित्र आम्हास म्हणाले की "तुम्ही काही चिंता करू नका. परदेशात तुम्हाला रकम मिळत जाईल आणि ट्रॅव्हलर्स चेक-च्या रूपात तुम्ही ती रकम जवळ ठेवू शकाल अशी व्यवस्था आम्ही करून देऊ. मित्रांकडून इतकें आश्वासन व भरवसा मिळाल्यानंतर मी निश्चित झालो. परंतु माझें मन मला खात राहिलें की इतक्या मोठ्या खर्चाचा बोजा या मंडळींवर कसा लादावा ? पण मित्रांच्या मदतीचा स्वीकार करण्याशिवाय आम्हाला दुसरा उपाय तरी काय होता ?

## पत्नीची हिंमत

माझा विवाह होऊन जेमतेम वर्ष झालें होतें. अशा स्थितीत इतक्या लांबच्या व दीर्घ मुदतीच्या प्रवासाची कल्पना करणें कठिण होतें. प्रभाकरशी आमचे जग-यात्रेचे मनसुबे चालले होते. त्या समयीं माझी पत्नी बाळंतपणासाठी माहेरीं जाऊन राहिली होती. अशा नाजुक वेळीं मी जर आपल्या पत्नीशी या पृथ्वी-प्रदक्षिणेची गोष्ट काढली तर तिच्या मनाची दशा काय होईल हा विचार माझ्या मनात येता च मी गोंधळून जात असे. अशा परिस्थितीत दिवसामागून दिवस, आठवडे, महिनाहि निघून गेला. यात्रेच्या निरनिराळ्या पैलूंवर आमचा विचारविनिमय चालू होता पण या प्रश्नाचा निर्णय माझें मन करू शकत नव्हतें की गरोदर पत्नीला इतक्या दीर्घ काळपर्यंत वियोगात टाकून कसा जाऊ ? मी स्वतःवर थोडा रागावतहि असे की अशा वेळीं मी ही योजना तयारच का केली ? माझा राग होता सर्व पुरुष जातीवर. कधी योगाभ्यासाच्या निमित्ताने, कधी संन्यासाच्या निमित्ताने, कधी काही साधनेच्या व तपस्येच्या मिषाने कधी शिक्षणाच्या निमित्ताने, कधी व्यापाराच्या निमित्ताने, पत्नीला घरात तळमळत टाकून निघून जाण्याची परंपरा नवीन नाही. मी सुद्धा तसलेंच काही करीत आहे. जितकी तळमळ मला या जग-यात्रेची होती तितकीच तळमळ पत्नीबरोबर राहून तिचें प्रेम संपादन करण्याची होती. म्हणून दीर्घ मनो-मंथनानंतर मी आपल्या पत्नीला हिंमत करून एक पत्र लिहिलें :

प्रिय लता,

आजचें पत्र नेहमीच्या पत्रासारखें पत्र नाही. आजच्या पत्रांत प्रेमाची जाणीव करून देण्याची गोष्ट लिहीत नाहीं. तुला आश्चर्यात टाकणारी एक विचित्रशीं योजना या पत्रात लिहीत आहे. मला माहीत आहे की ही योजना तुझ्या मनाला खटकेल. तरी ती लिहिण्याचें मी धारिष्ट करीत आहे. या योजनेवर तुझ्या पसंतीचें शिक्कामोर्तब जोपर्यंत होत नाही तोपर्यंत मी त्याबाबतीत काही निर्णय घेणार नाही.

योजना अशी आहे : प्रभाकर व मी दिल्लीहून मास्को, वॉशिंगटन-पर्यंतची शान्ति-पदयात्रा करू इच्छितो. एक प्रकारची ही जगत्-यात्राच समज. त्यासाठी कमीत कमी दोन वर्षे तरी लागतील. जर तू मन:पूर्वक खुशीने अनुमति देशील तरच मी जाण्याचा पक्का निर्णय घेईन. आज जगात जी शस्त्रास्त्रांची चढाओढ चालू झाली आहे तिच्याकडे चुपचाप हात जोडून पहात बसणें माझ्याच्याने होत नाही. मानव-समाजाचा एक सदस्य म्हणून मलाहि व्यक्तिगत जबाबदारीच्या नात्याने काही तरी केलें पाहिजे. मग माझा तो प्रयत्न भलेहि ‘ नगाऱ्याच्या आवाजापुढे टिमकीचा आवाज ’ होवो ! माझ्या मनाची तळमळ स्पष्ट आहे, पण तुझ्या अधिकाराला प्रथम स्थान देत आहे.

पत्राचें उत्तर उलट टपालीं मिळावें.

तुझा स्नेहमय
**सतीशकुमार**

माझें पत्र पावताच लतेने जें उत्तर लिहिलें तें वाचून मी आश्चर्य-चकित झालो. तिने लिहिलें :

प्रियवर,

आपली योजना साहसाने व निष्ठेने ओतप्रोत आहे. जर मी ‘ आई ’ होऊ घातली नसते तर मीहि या शांति-यात्रेत आपल्याबरोबर निघाली असते.

आता लौकरच आपल्या पहिल्या अपत्याचा जन्म होणार आहे. म्हणून त्याच्या जन्मापूर्वी आपण काही निर्णय घेऊ नये.

मी जास्त लांब पत्र लिहीत नाही. आपल्या पत्राने माझ्या मनावर नानाप्रकारांच्या विचारांचें ओझें लादलें आहे. म्हणून हें पत्र मिळताच एक वेळ आपण माझ्याकडे ताबडतोब यावें. इथे आल्यावर विस्ताराने बोलू.

आपली

लता

या तिच्या पत्राने मला धीर आला. मी स्वत:वर थोडा नाराज होतो. माझे मित्र मला म्हणत होते : " तू लतेची आणि होणाऱ्या अपत्याची जबाबदारी टाळून पळ काढीत आहेस." माझ्या मनातील द्वंद्व मला शान्त बसू देत नव्हतें. मी ताबडतोब लतेला जाऊन भेटलो. दोन दिवस सविस्तर गोष्टी केल्या. मी म्हणालो : "माझी योजना तुझ्यासमोर आहे. जोपर्यंत तू स्वत: तिचा स्वीकार करीत नाहीस तोपर्यंत मी वाट पहायला तयार आहे." त्यावर ती म्हणाली : " तुमच्या मनात उत्साह व आवेश यांची जी तीव्रता आहे ती अशा प्रसंगाने दबली जावी अशी माझी इच्छा नाही. मी आता बाळंतपणासाठी माहेरी राहत नाही. बंगलोरलाच आपल्या सान्निध्यातच तें होईल. तोपर्यंत तुम्ही थांबावें. त्यानंतर तुम्ही यात्रेसाठी बाहेर पडावें." लतेची हिंमत पाहून त्यावेळीं तर मी नतमस्तक झालो, जेव्हा ती शेवटी म्हणाली : "मी तुमच्या पुनरागमनाची वाट पाहात राहीन."

१० मे रोजीं जेव्हा आम्ही घरून दिल्लीला जाण्यास निघालो तेव्हा लतेने आम्हाला कुंकुमतिलक लावला, आरती ओवाळली व आमच्याबद्दल मंगलकामना प्रगट केली. नव-जात-शिशु—– साधना, (जिचें मी नंतर 'यात्रा ' नांव ठेवलें) तिला घेऊन ती बंगलोर स्टेशनवर आली व आमच्या गळयात हार घालून आम्हाला तिने निरोप दिला. पूर्ण अडीच वर्षे तिने माझी वाट पाहिली. १० मे १९६२ ला वेगळे झालेलो आम्ही दोन जीव १६ ऑक्टोबर १९६४ रोजीं पुन्हा भेटलो. 'यात्रा ' हि आता बरीच मोठी झाली आहे. प्रारंभीं प्रारंभीं ती मला थोडी भीत होती, पण आता ती मला सोडतच नाही.

या जगत्-यात्रेचें श्रेय लतेच्या आशीर्वादाला आणि हिंमतीलाच आहे. कारण तिने माझें जाणें सुगम व शक्य केलें.

## विनोबांची भेट

विनोबांना भेटण्यासाठी आम्ही १० मेला बंगलोरहून निघालो, आणि मद्रास व कलकत्ता येथे थांबत थांबत १६ मेला गोहत्तीपासून २७ मैल दूर गोरेश्वर गावात त्यांना भेटलो. विनोबा एका टिनाच्या छपराखालीं बसलेले मैत्रीआश्रमाच्या भगिनींबरोबर गोष्टी करीत होते. आश्रमजीवनाविषयीं अगदी मोकळ्या मनाने आपली कल्पना सांगत होते. आम्ही मध्येच जाऊन त्यांना प्रणाम केला. "आलात ?" म्हणून जेव्हा विनोबा हसले, तेव्हा वाटलें, प्रवासाचा शीण क्षणभरात विरला.

विनोबांनी विचारलें : "कोणत्या मार्गाने मास्कोला पोहोचाल ?"

आम्ही म्हणालो: "दिल्लीहून पंजाब मार्गे पाकिस्तान, अफगाणिस्तान, इराणवरून रशियात जाऊ आणि मास्को करून युरोपच्या बाजूला पुढे प्रयाण करू."

विनोबांनी 'वर्ल्ड ॲटलास' (जगाच्या नकाशांचें पुस्तक) उघडलें व आमच्या मार्गाच्या बाबतीत मोठ्या उत्सुकतेने तो पाहू लागले.

म्हणाले : "इतका लांबचा रस्ता का घेता ? अफगाणिस्तान वरून सरळ ताशकंद मार्गाने मास्कोकडे का नाही जात ?"

उत्तरात आम्ही दोन कारणें सांगितलीं : "एक तर आम्ही जास्तीत जास्त देशांना भेटी देऊ इच्छितो आणि दुसरें कारण असें की तो मार्ग अधिक सोपा आहे व सडकेचा रस्ता आहे."

याप्रमाणे रस्त्याची माहिती, प्रवासाची आतापर्यंत केलेली तयारी, 'मिशन', इत्यादींच्या बाबतीत थोडी चर्चा केल्यावर विनोबांनी विचारलें : "उद्यापर्यंत तर थांबणार आहात ना ?" आमचा 'होकार' ऐकून ते म्हणाले : "अच्छा ! उद्या यात्रेत चालताना गोष्टी करू." त्या दिवशीं प्रार्थना सभेत प्रवचन करताना विनोबांनी आम्हाला खूप प्रेरणादायक भाषण केलें : 'दोन तरुण आपल्यासमोर बसले आहेत' या वाक्याने

त्यांनी प्रारंभ केला आणि त्यानंतर निःशस्त्रीकरण, अणु-शस्त्रांचें उत्पादन व त्यांचे प्रयोग, युद्धाची तयारी इत्यादि विषयांसंबंधाने सुमारें एक तास ते बोलत होते.




आसाम भारताच्या एका कोपऱ्यात आहे. डोंगर, पहाड, नद्या, तसेंच सुंदर नैसर्गिक दृष्यांनी भरलेलें वातावरण, सृष्टीच्या चिरसौंदर्याची अनुभूति करून देत होते. अशा सस्य-श्यामल प्रदेशात विनोबांची पदयात्रा नवीन प्राण-संचार करून राहिली होती. खेड्याखेड्यात फिरत, खेडवळ-जीवन जगत, विनोबा ज्या तऱ्हेने कार्य करून राहिले आहेत तें संपूर्ण

देशासाठी आणि विशेषत : राजनैतिक डावपेचात ग्रस्त राहणाऱ्या तथाकथित पुढाऱ्यांना अद्‌भुत प्रेरणा देणारें आहे. एक व्यक्ति, जिला खरोखर वयोमानाप्रमाणें, शारीरिक दृष्टीने, वगैरे आरामाची जरूर आहे, अशी एक व्यक्ति, नाना प्रकारच्या संकटांना व कष्टांना तोंड देत खरें कार्य करून राहिली आहे. पद-यात्रेत चालत असताना, प्रवचन करीत असताना केव्हाहि पाऊस येऊन ओलें चिंब करून टाकतो. खेड्यातील घरें गळत असतात. पण विनोबा म्हणतात : "ग्राम-स्वराज्य मिळेपर्यंत मी असाच चालत राहीन." साऱ्या देशात केवळ एक विनोबाच आहे जो आज तेरा वर्षांपासून रोज पहाटे तीन वाजता उठत असतो आणि कंदिलाच्या मंद प्रकाशात पुढच्या पडावावर जाण्यासाठी चालू लागतो. हा आहे आम्हाला प्रेरणा देणारा दीपस्तंभ. हा आम्हा तरुणांना सक्रिय प्रेरणा देऊन राहिला आहे ! आज देशातील अधिकांश लोक स्वार्थ निरपेक्ष सार्वजनिक-जीवनाकडे पाठ फिरवून नोकरी, पोरेंबाळें, खान-पान इत्यादींत गुरफटून पडले आहेत. 'पुत्र-भार्या-पोषण' यातच कर्तव्याची 'इतिश्री' मानली जात आहे. या मर्यादित वर्तुळाच्या आसपासच आम्ही सर्व जण फिरत आहोत. अशा वातावरणात आमच्या शांति-यात्रेसाठी विनोबांचा आशीर्वाद व त्यांची सक्रिय प्रेरणा आम्हाला उठण्याची, चालण्याची व काही तरी करण्याची स्फूर्ति देऊन राहिली होती. विनोबांना भेटल्यानंतर आम्हाला वाटलें, जर यांच्यासारखा माणूस इतकीं वर्षे एकसारखा फिरू शकतो तर आमच्या सारख्या तरुणांना दोन वर्षांची पदयात्रा करणें काय मोठी कठीण गोष्ट आहे ? आम्ही विनोबांच्या पदयात्रेत त्यांच्याबरोबर चालत विस्तारपूर्वक गोष्टी केल्या तेव्हा त्यांनी आम्हाला काही महत्वाच्या सूचना केल्या.

"रस्त्यात पाणी तर बरोबर ठेवालच ?" विनोबांनी विचारलें.

"हो, ठेवू."

'पाणी नेहमी गरम पिण्याचा प्रयत्न करा. गरम पाणी स्वास्थ्यासाठी चांगलें, हलकें, सुपाच्य. तसेंच नाना ठिकाणच्या पाण्यामुळें जो त्रास होतो. तो होणार नाही."

"आम्ही प्रयत्न करू" आम्ही म्हणालो.

" आहारा विषयीं काय विचार केला आहे ? " – विनोबांनी विचारलें

" आपल्यास माहीत आहेच की आम्ही दोघेहि शाकाहारी आहोत. आता आपणच सुचवा काय करायचें तें ? " आमचा प्रति-प्रश्न होता.

" हां हें ठीक आहे. शान्तीचें आणि अहिंसेचें तुमचें जें ' मिशन ' आहे त्यांसाठी शाकाहार पूर्णतः सहायक आहे. पण त्यामुळें तुम्हाला काही शारीरिक कष्टांना तोंड द्यावें लागेल. जर तुम्ही ही समस्या जिंकली तर तुमच्या ' मिशन ' ला फार मोठी मदत होईल. " विनोबांच्या या सांगण्यावर आम्ही म्हणालो : " आम्हीहि असाच विचार करीत आहोत. आणि आम्हाला विश्वास आहे की आम्ही या बाबतीत आपल्या सल्ल्या प्रमाणें चालू शकू. "

## पैशाशिवायची यात्रा

" किती पैसे बरोबर घेऊन जात आहात ? " विनोबांनी विचारलें

" आम्ही तर जनता-जनार्दनाच्याच भरवशावर जात आहोत, जनते बरोबरच काम करावयाचें आहे. लोकच आम्हाला उतरवून घेतील, खाऊ घालतील, सर्व प्रकारानें मदत करतील. तरी पण, कपडे, कार्ड वगैरे पोस्ट खर्च, आणि अशाच अनिवार्य जरूरी भागविण्यासाठी थोडासा पैसा आम्ही बरोबर ठेवू. "

" अंऽहं ! नाही. " आमचें बोलणें ऐकून विनोबा म्हणाले :

" एक तर पूर्ण खर्चाची तुम्ही व्यवस्था करा किंवा बिलकुल पैसा जवळ ठेवू नका. " थोडा वेळ थांबून पुन्हा म्हणालें : " जर तुम्ही बरोबर पैसा ठेवला नाही तर जनता स्वतः तुम्हाला मदत करील. "

आकाश काळयाशार मेघांनी भरलें होतें. हिरव्यागार झाडा झुडपांनी आसामची भूमि सजली होती. उंच उंच पर्वतशिखरावर जाणाऱ्या वेडया-वाकडया सडकेवर विनोबा आमचा हात धरून लांब लांब पावलें टाकीत चालले होते. आम्हाला वाटलें, जसें काही विनोबा आमचा हात धरून आम्हाला यात्रा कशी करावी हेच शिकवीत होते. वास्तविक स्थिति तशीच होती. ते आम्हाला शिक्षण (धडा) देत होते. ते स्वतःच प्रश्न

काढीत व स्वतःच त्यांची समाधान कारक उत्तरें देत होते. एकाएकीं त्यांनी आमच्या खांद्यावर हात ठेवला. दोन मिनिटे मौन राहिले. नंतर प्रेमपूर्ण नजरेने आमच्याकडे पाहिलें. आम्हास काही कळेना. इतकें जरूर वाटलें की आमच्या गोष्टी आता जवळ जवळ संपल्या आहेत, आणि काही तरी शेवटची शिकवण आम्हाला विनोबा देऊ पाहात आहेत.

"सारी जनता शांतीची इच्छा करीत आहे आणि तुम्ही लोक शान्तीचें 'मिशन' घेऊन जात आहात; तर जनतेवर विश्वास ठेवून तुम्ही जा. कष्ट पडू देणार नाही तुम्हाला ती. देश-देशांच्या सीमा दुनियेत या पृथ्वीवर भले असोत, माणसाच्या हृदयात कुठे काही सीमा व भेद नाहीत." क्षणभर थांबून विनोबांनी आपला विचार स्पष्ट केला.

"जनतेशी सरळ संपर्क साधायला पैसा बाधक असतो. मी तर संपूर्ण सर्वोदय आन्दोलन जनाधारित ठेवण्याचा विचार केला आहे. तुमच्या पद-यात्रेसाठीहि मी तोच मार्ग सुचवितो. जनतेवर माझा पूर्ण विश्वास आहे. तुम्ही अेक प्रयोग म्हणून याचा अनुभव घ्यावा. जा, तुमच्या यात्रेला माझा पुरा आशीर्वाद आहे. पण नुसत्या आशीर्वादाने काम भागणार नाही. 'शाकाहार' आणि 'पैसा-मुक्ति' गदा आणि चक्राप्रमाणें तुम्हाला यात्रेत सहायक होतील, मदत करतील."

खाणें पिणें तर जमून जाईल; पण चिठ्ठी चपाटी लिहिण्याचें कसें? जोडे फाटले तर काय करायचें? कपडे फाटले म्हणजे काय करायचें? रशीयातील भयंकर थंडीपासून गरम कपड्यांशिवाय बचाव कसा करावयाचा? केस वाढले, आता हजामत कशी करायची? कुठे आजारी पडलो तर औषध पाण्याची काय व्यवस्था? हें सर्व ठीक आहे पण रोज साबू लागणार त्याचें काय? विनोबा आहेत संत. ते आदर्शवादी आहेत पण या व्यावहारिक अडचणींचा परिहार तर आम्हालाच करावा लागणार आहे ना? पैशाशिवाय येवढी लांबची यात्रा करणें कसें शक्य आहे? असें नाना प्रकारचे अनेक संकल्प-विकल्प मनात उत्पन्न होत गेले. मग बुद्धि तर्क चालवू लागली – शेवटीं येथे तरी पैसा कोठून येणार आहे? मित्रांकडूनच ना? तर मग ज्या देशांतून आम्ही भ्रमण करणार आहोत तेथील लोक

काय आमचें मित्र नाहीत? ते काय अमित्र आहेत? हा 'जर' 'तर' जिथे कुठे येतो तिथे तो बोऱ्याच बाजवतो. उद्या 'जर' आकाश फाटलें 'तर' काय होईल ? उद्या 'जर' मृत्यु ओढवला 'तर' काय होईल ? अशा रीतीने विचार करीत राहिलो तर कधीं काम होईल काय ?

बुद्धीचा असा हा तीव्र निषेध हृदयाच्या निर्बलतेवर पसरला. ( बुद्धीच्या तीव्र निषेधाने हृदयाच्या निर्बलतेवर मात केली.) आसामच्या पहाडात थबकलेलें मेघ पुन्हा एकदा दिल्लीत गर्जून उठले. भयंकर उन्हाने तापलेल्या दिल्लीच्या सडकांवर १ जून १९६२ ला पावसाने वर्षाव केला. पूर्वेकडून येणारे हवेचे स्रोत आळसावलेल्या शरीरात चैतन्य भरू लागले. यमुनेच्या तीरावर चिरनिद्रेत पहुडलेल्या बापूंच्या समाधिजवळ आम्ही उभे होतो. विनोबांनी आम्हाला आपला आशीर्वाद देण्यापूर्वी पावसा-मेघांच्या साक्षीत जो उपदेश दिला होता त्याची आठवण करून देण्यासाठीच जणू बापूंच्या समाधीवर सुद्धा पाऊस व मेघ दोघे हजर झाले होते. आम्हाला वाटलें, जणू काही बापू आम्हाला कानात सांगून राहिले आहेत, "जनता मेघराजाप्रमाणें उदार आहे आणि पावसाप्रमाणें सुखद-शीतल !" विनोबा-बापू ! बापू-विनोबा ! दोघांनी मिळून आमच्या हृदय व बुद्धीमधे हिंमत भरून दिली आणि आम्ही निश्चय केला– "आमची यात्रा जनाधाराचा एक प्रयोग होवो ! पैशाचा आधार आम्ही सोडून देत आहोत. संपूर्ण यात्रेत कोठेहि व कधीहि आम्ही पैशाचा स्वीकार करणार नाही."

तो शुक्रवारचा दिवस. याच दिवशीं संध्याकाळीं बापूंनी सत्य व शांतीच्या शोधात जीवन बलिदान केलें होते. १ जून १९६२ रोजीहि शुक्रवार होता. संध्याकाळीं प्रार्थनेसाठी राजघाटावर आम्ही सर्व एकत्र जमलों. प्रार्थनेनंतर आमची कांचन-मुक्त पदयात्रा सुरू झाली.

यात्रेत पैसे स्वीकारण्याचा आग्रह आम्हाला जागोजागीं होत असे. पाकिस्तानात आमचा पहिला पडाव होता लाहोरमधे. तेथे कोणीहि आमच्या परिचयाचें नव्हतें. तेथेहि आम्हाला एक तरुण यजमान भेटले. त्यांनी आमची सर्व व्यवस्था केली, आणि आमच्या प्रयाणाच्या वेळीं

जबरदस्तीने आमच्या खिशात पाकिस्तानी रुपये भरले. त्यांचें नांव आहे श्री. गुलाम यसीन. मोठ्या मुश्किलीने त्यांची कशीतरी समजूत घालून त्यांचे पैसे परत केले. पाकिस्तानानंतर अफगाणिस्तानात पोहोचलो. जलालाबादमधें दैनिक 'निंग्रहार' चे संपादक श्री. ब्रइमान म्हणाले : "शांति-यात्रेसाठी आमची थोडी तरी मदत स्वीकारा." आणि अफगाण रुपये पुढे केले. काबुलमधे भाई अमृतलाल यांच्या दुकानात आम्ही बसलो होतो. ते आमच्या यात्रेच्या योजनेने इतके प्रसन्न झाले की भाव विव्हल होऊन त्यांनी आपल्या दुकानातील कॅश-बॉक्स मधून ओंजळभर अफगाणी रुपये किती आहेत ते पाहिल्याशिवाय व मोजण्याशिवाय आमच्या पुढे ठेवले व म्हणाले :"मला सेवेची संधि द्या." त्यांच्या दुकानातून एक एक फाउंटनपेन घेऊन आम्ही त्यांची क्षमा मागितली. "पैसा नको. आपलें प्रेमच आमची शक्ति आहे"– सांगून आम्ही त्यांची समजूत घातली. काबुलचे आमचे यजमान श्री. रामलाल आनंद आणि भारतीय वकिलातीतील प्रथम सचिव श्री. मुरगेशन यांचें म्हणणें होतें की "पायीं यात्रेचा आग्रह पुरे. पैसा जवळ ठेवण्यात बिघडतें काय ? उगाच खर्च करू नये. पण वेळीं अवेळीं प्रसंग पडल्यास खर्चासाठी काही रकम जवळ असू द्यावी." आम्ही इराणमधे पोहोचलो, तर गोंबदे काबूसचे एक बडे जमिनदार कॅप्टन हुनरवर आणि तेहरानचे व्यापारी श्री. शोभानी म्हणाले : "आम्ही लोक असेच फालतू शेकडों हजारों रुपये खर्च करीत असतो. जर तुमच्या यात्रेच्या निमित्ताने आम्ही काही मदत करू शकलो तर आम्हाला फार समाधान वाटेल." पण आम्ही म्हणालो : "आम्हाला रात्रीं केलेल्या आतिथ्याने आणि आपल्या सहानुभूतीने जी मदत होते तिची तुलना कोणत्याहि धन-राशीशी होऊ शकत नाही." वाराणशीहून श्री. सिद्धराजजींनी तेहरानच्या भारतीय राजदूताला लिहिलें होतें : "यांना पैशाची जरूर लागली तर आपण द्यावे. आम्ही येथून त्याची व्यवस्था करू." तेहरानला आम्ही पोहोचताच त्यांनी आम्हाला पैशाविषयीं विचारलें. पण आम्ही म्हणालो, "दिल्लीहून तेहरानपर्यंत पैशाशिवाय आम्ही येऊन पोहोचलो आहोत. आम्हाला हे इतकें आवडलें आहे की पैशाची जरूरच आम्ही विसरून गेलो.

आम्हाला एखाद्या वस्तूची गरज भासली तर आम्ही आपणाला कळवू. पण पैसा आम्हाला नको."

इराणनंतर आम्ही सोव्हियट संघात पोहोचलो. तर स्टॅलिनची जन्मभूमि गोरी या गावात रात्रींचे बारा वाजले असता एका टॅक्सी हाक्याने आमचा दरवाजा ठोठावला. तो म्हणाला : "वर्तमान पत्रात आपल्याबद्दल मी वाचले आहे. आज दुपारीं मी आपणास सडकेवर पाहिलें होतें : आपण कुठे उतरला आहात याचा पत्ता काढत काढत आता मी येथे येऊन पोहोंचलो. हे वीस रूबल (सुमारें १०० रु.) आपल्यास भेट म्हणून देऊ इच्छितो." ती भेट परत घेऊन जाण्यासाठी त्याचें मन वळवता वळवता आम्हाला पुरे वाट झाली. सोव्हियट शांति-परिषदेचे प्रतिनिधि अलेक्झांडर इवानोविच पलादिन हे सुखूमी गावात भेटले तेव्हा म्हणाले : "आम्हाला आश्चर्य वाटतें की तुम्ही लोक पैशाशिवाय दिल्लीपासून येथपर्यंत येऊन पोहोचलात कसे ? हे घ्या ४० रूबल (सुमारें २०० रु. ). कोठेहि जरूर पडेल तेथे वापरा. संकोच करू नका. तुम्ही आमचे अतिथि आहात आणि अतिथीला त्रास झाला तर आम्हाला फार दुःख होतें." त्यांची कशी तरी समजूत घातली की त्रास पैसे जवळ ठेवण्यामुळे होतो, न ठेवण्यामुळे नाहीं होत. असे किती तरी प्रसंग आले की ज्यावेळी आमच्या या अपरिचित मित्रांनी परिचित मित्रांप्रमाणेच आमच्यावर प्रेमाचा वर्षाव केला, अगदी आपलेपणाने वागले, आणि हर प्रकारची मदत करण्याची उत्सुकता दर्शविली.

## अडीअडचणी

बिन पैशाने यात्रा करण्यात कधी कधी अडचणी येणेंहि स्वाभाविक आहे. एकदा महिना अधिक होऊन गेला तरी आम्ही भारतात एकहि पत्र पाठवू शकलो नव्हतो तेव्हा तेहरानच्या वकिलातीत तारापत्रांचा ढीग येऊन पडला होता– आम्ही कुठे 'गुप्त झालो' याचा तपास करण्यासाठी. इराणमधील भयंकर भूकंपाच्या सपाट्यांत आम्ही सापडलो की काय या भीतीने मित्रांना व आप्तेष्टांना घेरलें होतें. तीन महिने एकदाहि हजामत करू शकलो नव्हतो. तर तेहरान मधील एका मित्राने विचारलें : "काय

तुम्ही अणु-अस्त्रांवर बंदी पडणार नाही तोपर्यंत हजामत न करण्याची शपथ घेतली आहे काय ?" एकदा एक दोन गावात उतरण्याची सोय न जमल्यामुळें समोर दिसत असलेल्या हॉटेलमधेहि उतरू शकलो नाही, कारण खिसा रिकामा होता !

त्याप्रमाणेच लागोपाठ तीस तास भोजन मिळालें नाही तरी चालत च राहिलो, हॉटेलात जाऊ शकलो नाही, कारण हॉटेलचें बिल कसें चुकवायचें ? गरीब किसान-कुटुंबात दूध-साखरेशिवायचा चहा व कोरडी रोटी खाऊन थकल्या भागल्या शरीराला निद्रादेवीच्या मांडीवर एवढ्या-साठी झोकून देत होतो की चांगल्या व पौष्टिक अन्नासाठी पैसेवाल्यांचे पाय धरणें आम्हाला पसंत नव्हतें. परंतु अशा कठिण प्रसंगीं सुद्धा मनाला एक प्रकारचें समाधान वाटे, प्रसन्नता वाटे. त्यामुळे यात्रेविषयीं कधी कंटाळा वाटला नाही. खरें म्हणजे असे रुक्ष प्रसंग आनंददायी प्रसंगांच्या तुलनेत नगण्यच आले.

सगळ्यात मन वेधणारी गोष्ट ही की आम्ही आमच्या गरजा कशा पुऱ्या पाडत होतो ? उदाहरणार्थ कपड्यांची गोष्ट घ्या. काबुलमधे आम्ही असतांना भारतातून श्री. हरिरामजी चोपडा आणि श्री. सोमाभाई यांनी अफगाणिस्थानच्या थंडीसाठी गरम कपडे पाठविले. डोक्यावरची टोपी व पादत्राणें यांची व्यवस्था काबुलचे आमचे यजमान श्री. रामलाल आनंद यानी केली. यामुळे तेहरानला पोहोचेपर्यंत आम्हाला काही अडचण भासली नाही. आता हें खरें की काबुलचे जोडे तेहरानपर्यंत टिकले नाहीत. बेहशहरात श्री. अब्बास खियानी यांनी आमचे फाटके जोडे पाहून त्यांच्या मनात काय आलें कोण जाणे ! ते उठले व आम्हाला काही न सांगता निघून गेले. थोड्या वेळानंतर दोन पादत्राणांचे जोड घेऊन येतांना आम्ही त्यांना पाहिलें. आम्ही आश्चर्यचकित झालो ! तेहराननंतर रशियाच्या बर्फाळ व कडाक्याच्या थंडीत आमचा प्रवेश होणार होता. तेहरान येथील भारतीय व्यापारी श्री. मख्खनसिंहजींनी सुमारे पांचशे रुपये खर्चून 'स्लीपिंग बॅग, स्वेटर, बूट व कोट यांची व्यवस्था केली. ते म्हणाले "आम्ही स्वतः तुमच्या यात्रेत सामिल होऊ

शकत नाही. पण अशी काही मदत करून आम्ही तुमच्या 'मिशन'ला, साथ देऊ शकतो." तेहरानवाले जोडे जुल्फापर्यंत चांगलेच झिजून गेले होते; तर जुल्फा नगरपालिकेच्या अध्यक्षांनी त्या जोडयांची चांगली मरम्मत करून दिली. पुढे सोव्हियट संघात जाऊन पोहोचलो. अर्मिनियन शांति परिषदेच्या स्त्री मंत्र्यांनी आम्हाला अशा टोप्यांची भेट दिली की जी घातली असता कसलीहि थंडी बाधू शकत नव्हती. डोळे, नाक व तोंड वगळून गळयापर्यंत पूर्ण झाकून जाईल अशा या टोप्या होत्या. मास्कोला आम्ही पोहोचलो तो लखनौहून श्री. कपिलभाईंनी आणि बंगलोरहून डॉ. नटराजन् यांनी पाठविलेल्या गरम कपडयांचीं पार्सलें आमची वाट पहात होतीं. सोव्हियट शांति-परिषदेने ओव्हरकोट भेट दिले. वॉर्सामधे श्री. राधाकृष्ण बजाज यांनी वर्ध्याहून पाठविलेले जोडे मिळाले. वॉशिंगटनमधे श्री. सुशीलकुमार यांनी राजपुऱ्याहून पाठविलेल्या कपडयांची अशीच मदत झाली.

इंग्लंडच्या शांतिवादी लोकांनी इंग्लंडहून अमेरिकेपर्यंत आम्हाला जहाजाने रवाना केलें. अमेरिकेहून जपानपर्यंत अमेरिकेच्या पॅसिफिस्ट लोकांनी विमानाने पाठविलें आणि जपानहून भारतापर्यंत जपानी शांतिवादी लोकांनी जहाजाने पाठविलें. अशाप्रकारें विकेन्द्रित पद्धतीने सारी व्यवस्था सहज होत गेली.

पत्रव्यवहाराची अडचण कधी कधी अवश्य त्रासदायक होत होती. बहुधा आम्ही आमच्या यजमान लोकांनाच याबद्दल विचारीत होतो. जर तशी अनुकूलता दिसली नाही तर पत्र लिहून खिशात ठेवीत होतो; आणि रस्त्याने चालत असताना बहुधा कोणी मोटरवाला आम्हाला मोटारीत घेण्यासाठी किंवा आमच्याविषयीं वर्तमानपत्रात काही वाचलें असलें तर कुशल-क्षेम विचारण्यासाठीं आपली 'कार' थांबवीत असे तेव्हा त्यांना आम्ही आमच्या जवळील टपाल तिकिटें लावून रवाना करण्यासाठी देत असू. टॅब्रीज (रशिया) मधे तर आम्ही मुख्य पोष्ट-ऑफीसच्या 'डायरेक्टर' कडे गेलो आणि दहा बारा 'एअरोग्रॅम' मागून घेतले. अशा रीतीने आम्ही काही-न-काही उपाय शोधून काढीत होतो. एखाद्या

शहरात आम्ही एखाद्या गृहस्थाच्या घरीं उतरत होतो तेव्हा त्यांच्याकडून साबू, पोष्टाचीं तिकिटें इत्यादि छोटयामोठया आवश्यक वस्तूंचीं पूर्ति सहज करून घेत असू. एका मुक्कामात दाढी करण्यासाठी आम्ही आमच्या यजमानाजवळ ब्लेड मागितला. त्यांच्या जवळ ब्लेड नव्हता, वस्तरा होता. आम्हाला वस्तरा वापरता येत नव्हता. आमच्या यजमानाने स्वतःच आपल्या हाताने आमची दाढी केली. असा मजेदार प्रसंग घडला एका छोटया रशियन खेडयात !

आम्ही पैसा जवळ ठेवीत नाही हें समजल्यावर तर लोक आमची अधिकच चिंता वाहत होते. आम्हाला बहुधा असा अनुभव होतच नव्हता की आम्ही 'अकिंचन' आहोत.

## बरोबरचें सामान

आमच्या यात्रेच्या पूर्व तयारीचा जास्त संबंध बाह्य प्रश्नाशी नव्हताच. सर्वात मुख्य गोष्ट होती ती या यात्रेबद्दल आमच्या मनात एक प्रकारची व्याकुळता व एक प्रकारचें आकर्षण. ती व्याकुळता इतकी तीव्र होती की त्यासमोर सर्व प्रश्न गौण होत गेले किंवा आपोआप सुटत गेले. आम्हाला सर्व बाजूंनी इतकी शक्ति व स्फूर्ति मिळाली की यात्रेचा 'श्री गणेशा' केव्हा होतो याची प्रतीक्षा करण्यातच आम्ही बेचैन झालो. किती तरी मित्रांनी या दीर्घ पदयात्रेत येणाऱ्या कष्ट, अडचणी व संकटें यांच्याकडे आमचें लक्ष खेचलें. पण आम्ही हाच विचार केला की संकटें वगैरे न आलीं तर ती यात्राच कसली ? म्हणून प्रत्येक अडचणीला, प्रत्येक संकटाला आम्ही तोंड देऊ व त्यावर मात करू– हाच आमचा निश्चय होता. काही वडील मंडळींना आमच्या 'मिशन' च्या सफलतेविषयीं शंका होती. पण आम्ही सांगत होतो की कोणतेंहि काम करण्यापूर्वीच सफलता-असफलतेविषयी जो चिन्ता करीत बसतो तो कधीच काही कार्य करू शकणार नाही. आमचें ध्येय चांगलें आहे व त्यासाठी अवलंबिलेले साधनहि उत्तम आहे तर मग त्यासाठी झटणें हेंच आमचें कर्तव्य आहे.

यात्रेसाठी आम्हाला जें आवश्यक सामान पाहिजे होतें तें आम्हीं बरोबर घेतलें. आमच्या पाठीवर एका थैल्यात सुमारें २५ पौंड वजन असे. ज्यांची आम्हाला नित्य जरूर लागेल त्या सर्व वस्तु त्यामधे होत्या. कोणत्याहि गावात दोन वेळच्या भोजनाशिवाय आम्हाला काही मागण्याची जरूर पडू नये अशा विचाराने आम्ही सामानाची व्यवस्था केली होती. आमच्या जवळच्या सामानाची यादी खाली दिली आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| दोन चादरी | कॅमरा | लोटा व मग | टिंक्चर आयोडिन |
| तीन पायजामे | थर्मास | आरसा, कंगवा, तेल | सॅरीडॉन |
| तीन कुडते | दोन फायली | दंतमंजन, साबू | ग्ल्यूकोज |
| रुमाल | डायरी | वस्तरा, ब्लेड व ब्रश | अतिसारावर औषध |
| दोन बनियन | फाऊन्टन पेन | दोन चमचे | रेडीमेड चहा |
| दोन अंडरवेअर | डॉटपेन | पिनकुशन | घड्याळ |
| टॉवेल | दोन पुस्तकें | पेन इंक | टिनाचा व कापडाचा फलक |
| रेनकोट, टोपी | लेटरपॅड | चाकू, कात्री | |
| बूट, चप्पल | पाठीवरचा थैला | नेलकटर | वर्ल्ड ॲटलास व नकाशे |
| टॉर्च | दोन बगल थैल्या | दोरी | |
| | पाण्याची कुपी | बरनॉल | शब्दकोष |
| | | आयोडेक्स | रशियन-भाषा-शिक्षक |

## पासपोर्ट

पासपोर्टासाठी आम्ही पुष्कळ पूर्वीच मद्रासक्षेत्रातून अर्ज केला होता. पण तेथील पासपोर्ट-अधिकाऱ्यांनी "राजनैतिक मामला" समजून आमचा अर्ज परराष्ट्र मंत्रालय, दिल्लीला पाठवून दिला. सर्वात पहिला प्रश्न आला २० हजार रुपयांच्या गॅरंटीचा. हा आम्ही कसा सोडविणार ? आमची जबाबदारी कोण घेणार ? सुरक्षेची गॅरंटी कोण देईल ? शेवटी कलकत्त्यातील माझे एक ॲडव्होकेट मित्र श्री. मांगीलाल जैन यांनी ती गॅरंटी दिली. याप्रमाणे सर्व औपचारिक कारवाया पुऱ्या झाल्यावर सुद्धा आम्हाला वेळेवर पासपोर्ट मिळू शकला नाही. दिल्लीस मे महिन्याच्या रखरखीत उन्हात व गरम हवेच्या झळीत आम्ही परराष्ट्र-कचेरीत

कित्येक येरझाऱ्या घातल्या. परंतु लालफितीत अडकलेले आमचे कागद-पत्र बाहेर पडू शकले नाहीत. वास्तविक विश्व-नागरिक नात्याने आमचा पासपोर्टावर विश्वास नसला तरी सरकारी तंत्राला मान द्यावा म्हणून पासपोर्ट मागितला होता. आमचा प्रयत्न असफल राहिला व गांधी-समाधि नवीदिल्लीहून आम्ही पदयात्रेला जेव्हा प्रारंभ केला तेव्हा आमच्या जवळ पासपोर्ट नव्हता. दुसऱ्याच दिवशीं एका दैनिकात बातमी छापली गेली की "भारताचे दोन शांतियात्री दिल्लीहून अमेरिकेपर्यंत पायी यात्रा करीत निघाले आहेत पण त्यांच्यापाशी खिशात नाही पैसा आणि हातात नाही पासपोर्ट ! "

या बातमीने थोडी खळबळ माजली. लोकसभेच्या एका सदस्याला प्रश्न विचारण्याची प्रेरणा झाली की ज्या अर्थी आमचे मंत्री-गण, नाना प्रकारच्या लोकांना, व्यापाऱ्यांना, आपल्या सग्यासोयऱ्यांना नवीं नवीं कारणें धुंडून परदेशात प्रवासार्थ पासपोर्ट देऊन पाठवीत असतात, त्या अर्थी या शांति-यात्रिकांना पासपोर्ट देण्यास काय हरकत आहे ? धोरणा-च्या बाबतीत वास्तविक काही अडचणहि नव्हती. कचेऱ्यांतून चालू असलेली शिथिलता आणि खाबूपणाच यामागे कारण असण्याची शक्यता असावी. पण आम्ही ठरविलें होतें की, काही होवो, आम्ही परत फिरणार नाही आणि ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे पुढे चालू लागू. आमच्या ठरलेल्या कार्यक्रमात फेरबदल होऊ नये म्हणून आम्ही राष्ट्रपति श्री. राधाकृष्णन् यांच्या भेटीचा विचार सुद्धा रद्द केला होता. कारण त्यांच्या भेटीचा दिवस आम्हाला ३ जून हा दिला गेला होता, आणि आम्ही १ जूनलाच दिल्ली सोडण्याचा निश्चय करून चुकलो होतो. पासपोर्टासाठी दिल्लीत १ जूननंतर थांबणें आम्हाला उचित वाटलें नाही. व आम्ही आमची यात्रा १ जूनला ठरल्याप्रमाणे सुरू करून दिली. आम्ही जेव्हा पाकिस्तान-च्या सरहद्दीच्या जवळपास पोहोचलो होतो तेव्हा दिल्लीहून एक सद्-गृहस्थ आले आणि म्हणाले : "शांतियात्रिकांनो, हा घ्या तुमचा पासपोर्ट ! "

पाकिस्तानच्या सरहद्दीपर्यंत आम्ही ३२ दिवसांची यात्रा केली.

पंजावचा आमचा कार्यक्रम अत्यंत उत्साहवर्धक राहिला. पानीपत, अम्बाला, राजपुरा, लुधियाना, आदमपूर, जालंधर आणि अमृतसर येथील संपूर्ण कार्यक्रम इतके मस्त आणि स्फूर्तिदायक राहिले की आज सुद्धा ती सारी यात्रा 'चलचित्राप्रमाणे' डोळ्यासमोर उभी राहते. सर्व ठिकाणीं मोठमोठ्या सार्वजनिक विशाल सभा, विद्यार्थ्यांच्या व तरुणांच्या सभा, खास बड्यालोकांच्या सभा झाल्या. दिल्लीहून निघताना आम्हाला कल्पना नव्हती की पंजाबमधे आमचा कार्यक्रम इतका सफल होईल.

आम्हाला दिसून आलें की सर्वत्र जनता अण्वस्त्रांच्या विरुद्ध तयार आहे. पण तिला समजत नाही की कोणत्या उपायांनी याचा विरोध करावा !

८४०८२
४४८
भू-प्रवास
दि: ६/३/०७

# शेजारीं पाकिस्तानात

३ जुलै रोजी आम्ही भारताची सीमा ओलांडली. अमृतसरहून एक खास बस करून सुमारें ३५ बंधु-भगिनी आम्हाला सीमेवर निरोप द्यायला आले होते. पाकच्या सीमेत आम्ही दाखल झाल्यानंतर आमची काय व्यवस्था लागेल याची कल्पना कोणाला नव्हती. आमच्या परिचयाचें किंवा ओळखीचें पाक सीमेवर किंवा पाकिस्थानात कोणीहि नव्हतें. म्हणून सर्वांना पुष्कळ चिंता वाटत होती.

अमृतसरहून आलेल्या मंडळीत पंधरा वीस भगिनी होत्या. पूर्वीच्या जमान्यात माता, भगिनी, पत्नी आपल्या पुत्रांना, बंधूंना व पतीला कुंकुम तिलक लावून रणांगणावर जाताना निरोप देत असत. जवळ-जवळ तसेंच दृष्य आमच्या समोर उभें राहिलें. वृद्ध माता आणि तरुण भगिनी मंगल गाणी गात होत्या. त्यांनी आम्हाला टिळे लावले, पुष्पमालांनी भरून टाकले, आरती केली, खडीसाखर-वेलदोडयांची खिरापत खाऊ घातली पाठ थोपटून आशीर्वाद दिले व म्हणाल्या : "आम्ही तुम्हाला युद्धासाठी नाही पण युद्धबंद करण्यासाठी निरोप देत आहोत. तुम्हाला आशीर्वाद देत आहोत. तुम्ही दुनियेला सांगा की हिंदुस्थानच्या माता अण्वस्त्राच्या विरुद्ध आहेत, युद्धाच्या विरुद्ध आहेत, आणि अण्वस्त्र-प्रयोगा विरुद्ध आहेत. आपल्या मुलाबाळांच्या बाबतीत नेहमीच आमची इच्छा असते की

तीं सुंदर असावींत, बुद्धिमान असावींत, बलवान असावींत आणि देशाच्या उन्नतीला सहायक व्हावींत. पण हे अण्वस्त्रांचे प्रयोग आमचीं स्वप्नें धुळीत मिळवितात! त्यांच्या प्रयोगांनी आमच्या संततीवर प्रतिकूल प्रभाव पडतो. वैज्ञानिक म्हणतात की रेडिओ-धुळीने प्रभावित झालेल्या मातांचीं अपत्यें लुळी-पांगळी, आजारी, वेडसर, आंधळीं व बेकाम झालेलीं जन्माला येतात. वैज्ञानिकांच्या ह्या घोषणेमुळे आमचें हृदय कापून उठतें. जर हे प्रयोग बंद केले गेले नाहीत तर आम्ही माता या अण्वस्त्रांच्या विरुद्ध जबरदस्त आंदोलन उभें करू."

भारताच्या सीमेची जी सफेत लाईन आहे तिच्यापुढे पासपोर्टाशिवाय कोणाला जाता येत नाही. त्या रेषेपर्यंत सर्व लोक आम्हाला पोहोचवायला आले. आम्ही दोघे तर त्या रेषेच्यापुढे गेलो, बाकीचे सर्व तेथेच रुकले. आम्ही दोघे पुढे जात होतो, बाकीचे सर्वलोक अश्रुपूर्ण नेत्रांनी, प्रेमपूर्ण हृदयांनी आणि आशीर्वादपूर्ण शब्दांनी आम्हाला निरोप देत होते – 'शुभास्ते पंथानः' म्हणत होते. जसजसे आम्ही पुढे जात होतो तस तसा 'जय जगत्' चा घोष उच्च होत गेला. सर्वजण हात उंच करून व हालवून आमच्याबद्दल शुभकामना प्रगट करीत होते. आम्ही दृष्टिआड होईपर्यंत ते सर्व तेथेच उभे होते.

पाक-सरकारकडून 'व्हिसा' मिळायला आम्हाला काही अडचण पडली नाही. सीमेवरहि दोन्ही बाजूंच्या अधिकाऱ्यांचा व्यवहार फार चांगला होता. आम्ही पाकिस्तानच्या हद्दीत पाय ठेवला तेव्हा अचानक आमची वाट पहात असलेले एक बंधु आम्हाला भेटले. लुधियानाहून एक गृहस्थाने त्यांना पत्राने कळविलें होतें की आम्ही लोक ३ जुलै रोजीं पायीं पाकिस्तानमधे येऊन राहिलो आहोत. हे गृहस्थ आमच्या स्वागतासाठी आले होते. त्यांनी आम्हाला आलिंगन दिलें आणि म्हणाले : "मी ही 'कार' घेऊन आलों आहे. भयंकर गरमी होत आहे व उन्हहि खूप आहे. माझ्या बरोबर या कार मधून चला आणि माझें आतिथ्य स्वीकारा." आम्ही म्हटलें : "आपल्या स्नेहाचा व आतिथ्याचा आम्ही स्वीकार करतो परंतु आम्ही पायींच चालत येऊ. आपला पत्ता तुम्ही आम्हाला द्या. संध्याकाळीं

आम्ही आपल्या घरीं येऊ" श्री. गुलाम यसीन यांची यामुळे फार निराशा झाली. पायीं चालण्याच्या बाबतीत आम्ही काही तडजोड करू शकत नव्हतो. ते म्हणाले : "अच्छा. आपलें सामान तरी आमच्या कारमधे ठेवा. म्हणजे मला विश्वास वाटेल की या सामानाच्या मागे तुम्ही आमच्या घरीं येऊन जाल. नाहीतर रस्त्यात कोणी दुसरी व्यक्ति तुम्हाला आपल्या घरीं घेऊन जाईल." आम्हाला त्यांच्या या भावनेबद्दल आश्चर्य वाटलें. आम्ही त्यांच्या हा आग्रह मान्य केला. वाटेत बाटाचे जोडे बनविण्याचा एक कारखाना होता. श्री. गुलाम यसीन यांनी आमच्या बाबतीत तेथील कोणा-ला तरी काही माहिती देऊन ते पुढे निघून गेले होते. म्हणून आम्ही जेव्हा त्या कारखान्याजवळ पोहोचलो तेव्हा एक गृहस्थ पुढे आले व चौकशी करू लागले : "आम्हीच भारतातून आलेले शांति-यात्री आहोत काय ?" आमचा 'होकार' ऐकून ते म्हणाले : "ठीक. थोडावेळ येथेच थांबा. आराम करा. लस्सी घ्या. भोजन करा व नंतर जा." त्यांच्या आग्रहामुळे आम्हाला तेथेच थांबावें लागलें. संध्याकाळीं जेव्हा आम्ही लाहोरला पोंहोचलो तेव्हा शालीमार गार्डनमधे श्री. गुलाम यसीन यांनी आमच्या स्वागताची तयारी ठेवली होती.




आम्ही दोन दिवस लाहोरमधे राहिलो. आम्हाला काही त्रास झाला नाही. लाहोरमधे सुमारें ५० /६० लोकांशी आणि वृत्तपत्रांशी आमचा संपर्क आला. येण्यापूर्वी-हि येथील वृत्तपत्रांनी आमची माहिती व फोटो छापले होते. पाकिस्तानात वाटण्यासाठी आम्ही उर्दूत पत्रकें छापून घेतलीं

होतीं – 'आमची यात्रा कशासाठी? –त्यात आम्ही नि:शस्त्री करणा-च्या बाबतीत तावडतोब पावलें टाकण्यासाठी अपील केलें होते. जनतेला अणु-शस्त्रांच्या विरुद्ध उंच आवाज उठविण्यासाठी तयार व्हायला आणि सर्व सैनिक-करार व शस्त्रसंधि तावडतोब रद्द करण्यासाठी आवाहन केलें होतें. पाकिस्तानात आम्ही २६ दिवसांत ३२७ मैलांची पद-यात्रा केली. या २६ दिवसांत आम्ही २४ गावे, शहरें व नगरांतून राहिलो. लाहोर, गुजरानवाला, झेलम, रावलपिंडी, पेशावर आणि लंडीकोटल वगैरे शहरें आहेत जेथून राजनीति, साहित्य, वर्तमानपत्रें व अशाच प्रकारच्या राष्ट्रीयमहत्त्वाच्या कार्यक्रमांचें संचालन होतें. वरील सर्व शहरांतून आम्ही नाना तऱ्हेच्या लोकांच्या भेटी घेतल्या. गावात आमचा संपर्क जास्त शेतकऱ्यांशी येत होता तर शहरात डॉक्टर, विद्यार्थी, वकील, व्यापारी, सरकारी अधिकारी, पत्रकार आणि राजनैतिक लोक यांच्याशी येत असे. टांगेवाले, भाजी विकणारे, हॉटेलात चहा बन-विणारे लोक सुद्धा आमच्या पाठीवर लादलेलें सामान पाहून आणि आमच्या गळ्यातील फलक वाचून आम्हाला प्रश्न विचारीत आणि आपलें मत आम्हाला सांगत. धार्मिक प्रचार करणारे मौलवीहि आम्हाला शांतीचे प्रचारक समजून आपल्या मनातल्या गोष्टी बोलत. पाकिस्तानमधे प्रत्येक ठिकाणीं आमचें एक 'पाहुणे' म्हणून स्वागत झालें आणि आम्हाला कधी वाटलें सुद्धा नाही की आम्ही एखाद्या परक्या देशात किंवा परक्या लोकात वावरत आहोत.

एक दोन प्रश्न आमच्या समोर सर्व ठिकाणीं येत. काश्मीरच्या विषयी व भारतीय मुसलमानांच्या विषयी.

पहिली गोष्ट जी सर्व ठिकाणीं आम्हाला अनुभवाला आली ती ही की भारत-पाक संबंध बिघडवायला जेथे चोहोकडून प्रयत्न चालू आहेत तेथे ते मधुर करायला किंचितहि प्रयत्न होत नाही. दोन्ही प्रदेशांत असे लोक देशभक्त व नेते समजले जातात जे एकमेकांच्याविरुद्ध आम जनतेत दूरीभाव निर्माण करीत असतात. ही गोष्ट जशी काही नेत्यांच्या बाबतीत लागू पडते तशीच ती काही वर्तमानपत्रांच्या बाबतीतहि लागू आहे.

पुन्हा रेडिओसारख्या एजन्सी तर लोकांना उघड उघड युद्धासाठी कमर कसण्याची चिथावणी देत असतात. दोन्ही देशातील आपसातील संबंध चांगले व्हावेत, ज्या समस्या असतील त्या 'एकाच्या दोन करून' प्रचार न करणें यासाठी प्रयत्न करणारा कोणी नाही. म्हणून भारत-पाक संबंधांचें हें चालू वातावरण कोण्या अनपेक्षीत वावटळीने भडकू नये यासाठी प्रयत्न करायला पाहिजे.

पेशावरमधे रोटरी क्लबाच्या सभेत लोकांनी मोठचा कळकळीने आम्हाला विचारलें : "तुमच्यासारखे तरुण या गोष्टीकडे लक्ष का देत नाहीत ? काय आम्ही कायमचेच एकमेकांचे दुश्मन होऊन राहणार आहोत ? आमच्या समस्यांचा काही उकल होईल की नाही ?"

त्या सभेत रोटरी क्लबाचे अध्यक्ष आणि पाकिस्तान-नेशनल असम्बलीचे सदस्य म्हणाले : "जसे तुम्ही अणु-शस्त्रांच्या विरुद्ध बंड उभारण्यासाठी मास्को व वॉशिंगटनला जात आहात तसेंच काही भारतीय तरुण व काही पाकिस्तानी तरुण मिळून दिल्लीहून रावलपिंडीची व रावलपिंडीहून दिल्लीची शांति-यात्रा कराल तर किती छान होईल ?" या विचारात आम्हाला या गोष्टीचा आभास होतो की ते लोक भारत-पाक संबंध सुधरण्यासाठी किती उत्सुक आहेत !

आम्ही आमच्या पदयात्रेच्या काळात हें अनुभवलें की ८० टक्के समस्या भावनात्मक व मनोवैज्ञानिक आहेत. पाकिस्तानचे सामान्य लोक तर जाणतच नाहीत की वस्तुस्थिति काय आहे ! त्यांच्या मनात एक भ्रम व गैरसमज घुसला आहे की भारतीय मुसलमान भयंकर संकटात आहेत. त्यांना काही हक्क नाहीत आणि त्यांचें जीवन असुरक्षित आहे. लोक आम्हाला विचारीत : "हिंदुस्थानमधे शांतता आहेना ?" कोणी विचारीत : "भारतात मुसलमानांची काय स्थिति आहे ?" या प्रश्नामागे त्यांची ही भावना प्रतिबिंबित होत होती की जणू काही हिंदुस्तानात मुसलमान मोठचा संकटातून वाट काढीत आहेत. कुठे काही गडबड झाली तर ती खूप वाढवून चढवून वर्तमानपत्रात छापली जाते. अशा रीतीने भावने-भावनेमधे वैमनस्य व द्वेष वाढत जातात. दोन्ही बाजूंनी जर मनापासून प्रयत्न

केला गेला तर भावनात्मक एकता आणि मनोवैज्ञानिक सान्निध्य पक्के करण्यात अवश्य सफलता मिळू शकेल.

सर्व ठिकाणीं लोक आम्हाला विचारायचे की तुमची ' जात ' काय? तुमचा धर्म कोणता ? तुम्ही हिंदु आहा की मुसलमान ? आम्ही सर्व ठिकाणीं दृढतापूर्वक या प्रश्नांना एकच जवाब दिला : " आमची जात ' माणूस ', आमचा धर्म ' माणुसकी 'चा, माणुसकीशिवाय मोठा धर्म या दुनियेत दुसरा नाही. आम्ही न हिंदु आहोत न मुसलमान. सारें जग आमचें आहे. " आमच्या या उत्तराने पुष्कळ चर्चा होत असे, लोक चकित-हि होत, व विचारांतहि पडत. पण एकंदरीत आमच्या या भूमिकेचा परिणाम चांगला होई.

पाकिस्तानमधे आम्हाला काम करण्याची पुरी अनुकूलता होती. आमच्या सांगण्यामुळें जेव्हा त्या लोकांना समजलें की ' विश्व-शान्ति-सेने ' ची स्थापना झाली आहे व तिचा उद्देश कोणत्याहि हिंसेचा किंवा अन्यायाचा अहिंसात्मक प्रतिकार करणें हा होय तेव्हा त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. ते म्हणाले : " जर तुमच्या देशात शांति-सेना तयार होत आहे तर ती शांति सेना आपल्या जुन्या दोन भावात शांति टिकविण्यात का सफल होणार नाही ? "

" काश्मीरला स्वतंत्र करण्यासाठी आम्हाला आणखी एक लढाई लढायची आहे " असे भावुकतेचे उद्गार कधी कधी पाकिस्तानच्या यात्रेत आम्हाला ऐकायला मिळाले.

आम्ही अहिंसावादी व शांतिवादी लोकांना या प्रश्नाबाबत गंभीरतेने विचार करायला पाहिजे. तसेंच शांतीला काही धोका निर्माण न व्हावा याबद्दल कसून प्रयत्न केला पाहिजे. माणसांच्या भावना अहिंसा व शांतीच्या पक्षात असतील तर कोणत्याहि बाहेरच्या शक्ति त्याला हिंसेला प्रवृत्त करू शकणार नाहीत. सर्वांत प्रथम आणि सर्वांत मोठें काम भावना निर्माण करण्याचेंच आहे. " युद्ध मानवाच्या मनात प्रथम सुरू होतें, म्हणून शांति रक्षणाचे विचार मानवाच्या मनातच निर्माण करायला पाहिजेत. "

## खैबर खिंड

खैबर खिंड ! भारतावर आक्रमण करणाऱ्या लोकांचा येण्याचा ऐतिहासिक स्थलमार्ग ! ज्या मार्गाविषयीं आम्ही पुष्कळ ऐकलें होतें आणि ज्या मार्गाच्या भयंकरतेविषयी पुष्कळशा कथा-कहाण्या प्रचलित आहेत तो मार्ग प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्याचा अवसर मिळाला तेव्हा मनात एक प्रकारची विचित्र उत्सुता वाटली. डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहणें व तेंहि पायी चालत असताना !

१ जून १९६२ च्या सायंकाळ पासूनच आम्ही पदयात्रेसाठी रवाना झालो. आम्ही आमच्या पदयात्रेच्या मार्गाविपयीं बरीच माहिती प्राप्त करून घेत असू. या पद-यात्रेतील सर्वात अवघड, भयंकर आणि दुर्गम पडाव होता. खैबर खिंडीच्या मार्गातील पडाव. पहिल्या दिवसापासूनच ज्या ज्या व्यक्तीने खैबर खिंडीविषयी व तेथील रहिवाशी पठाणलोकांविषयी जें काही सांगितलें तें हृदयात भीती उत्पन्न करणारें होतें.

अखेर ६२२ मैल आणि अेक महिना सत्तावीस दिवस चालून झाल्यावर २८ जुलै १९६२ चा दिवस उजाडला. आम्ही पेशावरहून १० मैल पुढे जमरूदला होतो. पाकिस्तानच्या सीमेवरचा हा अखेरचा पडाव. त्यानंतर खैबर खिंडीच्या २५ मैलांच्या 'आजाद कबायली' इलाख्याची सुरवात होते. या प्रदेशाला 'ट्रायबल अेरिया' (गैर इलाका) म्हणतात. या प्रदेशात पाक सरकारचा कोणताहि कायदा लागू होत नाही. पाक-पोलिसहि तेथे जाऊ शकत नाहीत. इथे कोर्ट, कचेरी इत्यादिहि नाही. ब्रिटिश शासन-कालात सुद्धा हें क्षेत्र असेच स्वतंत्र होतें. जेव्हा आम्ही या प्रदेशाकडे जायला निघालों तेव्हा येथील लोकांनी आम्हाला सर्व प्रकारांनी समजावून सांगण्याचा व पायी जाण्यापासून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला. स्थानिक अधिकारी म्हणाले : "तुम्ही दिल्लीहून येथपर्यंत पैदल आलात हें ठीक आहे पण या क्षेत्रातून पायी जाणें धोक्याचें आहे. तुम्हाला निदान या २५ मैलांसाठी तरी पायीं चालण्याचा आग्रह सोडून दिला पाहिजे. महत्त्वाची गोष्ट ही की पठाण लोक अशिक्षित व जंगली आहेत. प्रत्येका-

जवळ बंदुक असते. प्राणाचा धोका असतो. यांच्यावर आमचा काही कायदा चालत नाही." इत्यादि.

पण आम्ही अधिकाऱ्यांना म्हणालो. "आम्ही विशेष रीतीने अशा क्षेत्राचा अभ्यास करू इच्छितो. आपण बिलकुल भिऊ नका. आमचा प्राण गेला तर त्याची जवाबदारी आमची आहे. तुमच्यावर नाही."

अधिकाऱ्यांना आम्ही कसे तरी मनावलें. त्यांनी आम्हाला खैबर खिंडीच्या रस्त्याने पायीं जाण्याची परवानगी दिली. आम्हा शांतियात्रिकांच्या संरक्षणासाठी चार बंदुकधारी सैनिक बरोबर दिले.

साडे तीन हजार फूट उंचीचीं खैबर-शिखरें आम्हाला बोलवीत होतीं. जणू म्हणत होतीं की भिण्याचें काही कारण नाही. येथील रस्ता वाकडा-तिकडा जरूर आहे पण सडक फार उत्तम आहे. या सडकेवर आज पाक सरकारचा अधिकार आहे. सडकेच्या दोन्हीबाजूस १०-१० यार्डाच्या क्षेत्रावरहि. सकाळीं ५ वाजल्यापासून सायंकाळीं ७ वाजेपर्यंत पूर्ण १४ तास आम्ही या २५ मैलांच्या खैबर क्षेत्रात घालवले. सायंकाळीं जेव्हा आम्ही अफगाण सरहद्दीतील 'तोरखाम' गावाला पोहोचलो तेव्हा आम्हाला वाटलें, ती सर्व भीति जी प्रातःकाळीं जमरूदचे अधिकारी आम्हा लोकांना दाखवीत होते, अगदी काल्पनिक होती. वाटेत मधून मधून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. ठिकठिकाणें 'खैबर-खास-फोर्स' च्या चौक्या बांधल्या आहेत. काबूलहून येणारी एक नदी सडकेला लागूनच वाहते आहे.

कित्येक पठाण लोकांशी आमच्या गोष्टी झाल्या. ते म्हणाले · "आमच्या विरुद्ध आमच्या विषयी जें काही म्हटलें जातें त्यामुळें आमची सारी पठाण जमात उपेक्षित झालेली आहे आणि आमच्यामनांत त्याची प्रतिक्रिया म्हणून बाहेरील लोकांविषयी तिरस्कार निर्माण झाला आहे."

ही गोष्ट खरी की पठाण वीर पुरुष आहे. तो आपल्या खांद्यावर बंदूक बाळगणें केवळ 'शान' नाही समजत तर ती त्याच्या संस्कृतीचें एक अंग बनून गेली आहे. पठाणांचा इतिहास पराक्रमांनी भरलेला आहे. जर एखाद्याशी पठाणाचा झगडा झाला तर त्याचे प्राण

द्यायला तो मुळीसुद्धा मागेपुढे पाहणार नाही. तो इतका स्वाभिमानी असतो की कुणाचेंहि शासन कधी तो सहन करणार नाही. हा स्वाभिमानच आज स्वतंत्र पख्तूनिस्तानच्या आन्दोलनाच्या रूपात प्रगट होत आहे. स्वातंत्र्य-आन्दोलनाचे जुने पुढारी सरहद्द गांधी खान अबदुल गफ्फारखान स्वतंत्र पख्तूनिस्तान-आन्दोलनाचे नेते आहेत आणि म्हणूनच अजूनपर्यंत ते जेलमधे बंद आहेत. 'खुदाई खिदमतगार' नांवाची एक संस्था खान साहेबांनी चालवली होती. त्या संस्थेचे सदस्य अहिंसेवर-पूर्णपणे विश्वास ठेवतात. त्यांच्या कपड्याचा रंग लाल आहे म्हणून त्या संस्थेला 'लाल-कुडती-दल' म्हणूनहि ओळखतात. जसे हे पठाण आपल्या वीरता व साहसाबद्दल प्रसिद्ध आहेत तसे पाहुण्यांचें स्वागत करण्यात, आतिथ्य कारण्यात व अतिथींची सेवा करण्यात सुद्धा काही कमी नाहीत. पठाणाच्या घरी अतिथि होणें म्हणजेच–पूर्ण सुरक्षितता. तुम्ही जर एखाद्या पठाणाचे अतिथि झाला आहात आणि दरम्यान कोणाशी तुमचा जर झगडा झाला अथवा कोणी तुमची वस्तु हिसकावून घेतली तर तुमचा यजमान पठाण स्वत:चें प्राण पणाला लावून सुद्धा ती वस्तु तुम्हाला परत आणून देईल.

सुमारे एक करोड पख्तून आज अत्यंत उपेक्षित स्थितीत आहेत. शिक्षणाचा प्रसार नाही सारखाच आहे. पहाडी क्षेत्रामुळे जमीन फारच कमी आहे. त्यांचें आपलें राज्य नाही. काही सामूहिक प्रयत्नहि नाही. तेथे न काही विशेष उद्योग धंदा आहे, न काही कलाकुसरी. पूर्वी पुष्कळसे पठाण उत्तम कशिदा काढणारे होते. त्यांची कशिदा काढलेली टोपी चारशे पांचशे रुपयापर्यंत विकली जात असे. जोड्यावरहि ते फार सुंदर नकशी काढीत होते. पण आता तशी फॅशन न राहिल्यामुळे त्यांचा धंदा धुळीला मिळाला. एकंदरीत साधारण पठाण फारच गरीब परिस्थितीत आहेत.

भांडण-तंटे करण्याबद्दल व मार-काट करण्याबद्दल पठाण भले बदनाम असोत पण आमच्या तथाकथित सभ्य जातीपेक्षा त्यांच्यात भांडणें कमी होतात: आणि सभ्यतेच्या नांवावर ज्याप्रकारें न्यायालयात आम्ही

वकीलावर पाण्यासारखा पैसा खर्चून रोज शेंकडो झगडयांचा खराखोटा निकाल करवीत असतो तसें येथे होत नाही. गावात जर पंचायतीला कळलें की अमुक व्यक्तीने गावातील अमुक व्यक्तीला उगाच त्रास दिला आहे तर पंचायत तत्क्षणीं निकाल देते, त्या अपराध्याला शिक्षाहि करते आणि तो अपराधी बिनतक्रार पंचांचा फैसला मंजूरहि करतो.

खैबर क्षेत्रातील प्रसिद्ध शहर आहे लंडीकोटल. हें जमरूदहून २० मैल पुढे व अफगाण-सीमा तोरखामच्या ५ मैल अलीकडे आहे. पठाण लोकांचें बाजार-हाट करण्याचें हेंच मोठें केंद्र आहे. येथे आम्ही पठाणांच्या मोठमोठ्या टोळ्या पाहिल्या. अर्धाशेर पिठाची एक भली मोठी रोटी व दुधाशिवायचा चहा यांनी आपलें पोटभरून मस्तीत जगणाऱ्या या पठाणांची आपली एक अलग दुनिया आहे. जेव्हा ते कोणावर प्रेम करतात तेव्हा तेहि उत्कृष्ट व अनुपम असतें. ते जेव्हा कोणाशी गळ्यांत हात टाकून भेटतात तर तेंहि दृश्य दर्शनीय असतें; ते जेव्हा कोणाच्या सेवेत मग्न असतात तेव्हा ते स्वतःला विसरून जातात. हे शासन-मुक्त लोक खूप घेरेदार सलवार नेसतात व ढीला, लांब, झोळदार सदरा घालतात. लांब दाढी, डोक्यावर टोपी व त्यावर पगडी! मोठें आकर्षक व्यक्तिमत्व असतें यांचें! लंबी-चौडी शरीरयष्टि, गोरा रंग, रुंद कपाळ, व उंच आवाज. सर्व काही लोभस!

आम्ही आमच्या या यात्रेत पठाणांना अगदी जवळून पाहिले. खैबर-खिंडीतून पसार होतांना कोणत्याहि प्रकारचें किंचितहि भय नाही.

●

# द्राक्षांचा देश अफगाणिस्तान

भारत-पाकिस्तानातील ५८ दिवसांच्या शांति-पदयात्रेच्या अनुभवानंतर अफगाणिस्तानात प्रवेश करण्याच्या दिवशीं खैबरखिंडीतून पसार होत असताना आमच्या मनात नानाप्रकारचे विचार उठत होते. भारताच्या व पाकिस्तानच्या परिस्थितीहून अफगाणिस्तानची परिस्थिति सर्वथा भिन्न आहे हें खैबरखिंडीच्या वातावरणातच आमच्या लक्षात येऊं लागलें होतें. खैबरखिंडीपासूनच भाषा, वेशभूषा, भोजन इत्यादि गोष्टीत भिन्नतेला प्रारंभ झाला होता. मनात वाटत होतें की आमच्या खऱ्या यात्रेला प्रारंभ अफगाणिस्तानपासूनच होत आहे.

खैबरखिंडीच्या पहाडातून एकाच दिवशीं २५ मैलांचा पुरा प्रवास करून जेव्हा आम्ही अफगाण सीमेला वंदन केलें तेव्हा सूर्यास्त होऊन चुकला होता, विरळ अंधार पडू लागला होता आणि काबुल रेडिओ फारसी गीतांचे मधुर स्वर आलापून राहिला होता. पाठीवर सामान, मंदगति, व चेहऱ्यावर थकान असे आम्ही जेव्हा अफगाण अधिकाऱ्याजवळ पोहोचलो तेव्हा तो उद्गारला ? "या वेळीं ! आता तर पुढे जाण्यासाठी काही वाहनहि मिळू शकणार नाही ! !" अधिकारी हिंदीत बोलत होता. आम्ही म्हणालो: "आम्ही वाहनाचा उपयोग करीत नाही. ५८ दिवसात ६४७ मैलांची

पदयात्रा करीत आम्ही दिल्लीहून येत आहोत. पुढेंहि पायींच जाऊ. " हें ऐकून त्याला आश्चर्य वाटलें. म्हणाला : " आतापर्यंत तुम्ही पायीं आलात तें ठीक झालें. पण या पुढचा रस्ता फारच खराब आहे. वाळवंटाचा आहे. पाणी मिळू शकत नाही. म्हणून 'बस' ने जा. " आम्ही म्हणालो : " या सगळ्या अडचणी येतीलच. अमेरिकेला पोहोचेपर्यंत किती तरी विकट मार्ग पार करावे लागतील ! " बराच वेळ त्याच्याशी गप्पागोष्टी झाल्या. त्याला जेव्हा आमच्या शांति व निःशस्त्रीकरणच्या 'मिशन' ची आणि अर्थ-मुक्तपदयात्रेची सारी कथा कळली तेव्हा त्याने अत्यंत सहानुभूतिपूर्वक आमच्या उद्देशांचें समर्थन केलें व आमचें चांगलें आतिथ्य केलें.

२९ जुलै ११६२ रोजीं प्रातःकाळीं अफगाणिस्तानच्या भूमीत आम्ही प्रथम सूर्यदर्शन केलें. शुष्क वाळवंटातून आम्ही पुढे निघालो. चार दिवसांच्या पदयात्रेनंतर ५० मैल चालून आम्ही अफगाणिस्तानचें पहिलें शहर जलालाबाद येथे पोहोचलो. शुष्क भूमीत वस्ती करणाऱ्या या लोकांच्या हृदयात अत्यंत ओलावा पाहून आम्ही खूप प्रसन्न झालो. जलालाबादेत स्वतंत्र-पख्तुनिस्तान-आन्दोलनाचे नेते श्री. स्यालसाहेब यांचें आम्ही अतिथि झालो. म. गांधींच्या बाबतीत त्यांनी बरेंच ऐकलें होतें. म्हणाले : " आम्ही आमच्या स्वातंत्र्यासाठी लढा देऊन राहिलो आहोत. आमचे पुढारी खान अबदुल गफ्फारखान आम्हाला आमची चळवळ शांतिपूर्ण मार्गाने चालवा असें सांगतात. " स्यालसाहेबांनी आमच्या 'मिशन 'च्या बाबतीत पूर्ण सहानुभूति दाखवली. त्यांच्यामुळे जलालाबादेत आमच्या कार्याला चांगलेंच अनुकूल वातावरण बनलें. येथील दैनिक वृत्तपत्रानेहि आमच्या पदयात्रेचें स्वागत केलें.

अफगाणिस्तानात आम्हाला मुख्य अडचण होती भाषेची. भाषेचे काय महत्त्व आहे व त्याच्या अभावीं मनुष्य किती असहाय होतो याचा आम्हाला पदोपदीं अनुभव येत होता. आम्ही खुणांचा व इशाऱ्यांचा आश्रय घेतला. एकदा तर कोंबडी व मासळी यांचें मासहि आम्ही खात नाही हें चित्र काढून समजवावें लागलें. ! भाषेच्या माध्यमापेक्षाहि मोठें माध्यम डोळ्यांतील स्नेह व सौजन्य आहे. व तें माध्यम मुख्यतः आमच्या

कामाला आलें. आम्ही हळूहळू फारशीचा अभ्यास सुरू केला. पुढे मोडकी-तोडकी फारशी बोलून आमचें काम निभावून घेऊ लागलो.


२ ऑगस्टला जलालाबादेहून आम्ही निघालो व ६ दिवसांचा प्रवास करून अफगाणिस्तानची राजधानी काबुल येथे पोहोचलो. ९२ मैलांचा हा रस्ता नदीच्या काठाकाठाने उंच पर्वतांच्या तराईतून सुमारे ६ हजार फूट उंचीवर वसलेल्या मध्य आशियाचें सुंदर नगर काबुल येथे जातो. केवळ या सुंदर रस्त्यामुळेच नव्हे तर अनेक मनोहर जल-प्रवाहांना उदरात साठवून खळखळ आवाज करीत अखंड वाहणारी काबुल नदीहि काबुल शहराच्या सौंदर्यात वृद्धि करीत होती व आम्हालाहि ताजेतवाने करीत होती.

कुठे तें युग! जेव्हा भारताची राजधानी तक्षशीला होती व काबुल-कंदाहारपर्यंत भारताच्या सीमा पसरल्या होत्या आणि कुठे आजचें युग! दोहोंत फार मोठें अंतर पडलें आहे. तरी आजहि भारत-अफगाण-मैत्रीचें सूत्र अत्यंत दृढ आहे. तो इतिहास, ज्यामध्ये काबुल नदीच्या महिम्याचें गान करीत ऋग्वेदाचीं सूक्तें लिहिलीं गेलीं व काबुलच्या जवळ बामियानच्या बौद्ध-मूर्ति तयार झाल्या. या गोष्टी साक्ष देत आहेत की दोन्ही देशांची सांस्कृतिक एकता चिरंतन राहील.

आमच्यासारखे अकिंचन प्रवासी जेव्हा प्रवास करतात तेव्हा कुठे उतरायचें याचा आम्हाला पत्ताहि नसतो! जेवायचें कुठे? भोजन मिळेल की नाही? पण आम्ही जिथे जिथे गेलो तेथील लोक आमचें अत्यंत प्रेमाने स्वागत करीत आणि म्हणत: "ओहो! तुम्ही भारतातून आलात! तुम्ही बुद्ध व गांधींच्या देशाहून आला आहात! तुम्ही शांतीचे प्रचारक आहात! तुम्ही मानव जातीचे सेवक आहात! तुम्ही आमचे अतिथि आहात!!"

काबुल म्हणजे द्राक्षांचें शहर! गल्ली-गल्लीत सफरचंद व नासपातींचे ढीगच्या ढीग, कंदाहारचीं डाळिंबे व हिरातचे पिस्ते, बदाम व बेदाणा (किसमिस) यांनीं येथील बाजार ठोस भरलेले असतात. काबुल-मध्ये आम्ही १० दिवस राहिलो. भात-भाकरीला ( रोटी ) कोण हात

लावतो ? आमचें पोट फळें खाऊनच भरलेलें असे. येथील रहिवाशांचा स्वभाव व हृदयसुद्धा द्राक्षाप्रमाणेच कोमल व मधुर आहे. तुम्ही कोणालाहि भेटा, दोनतीन वेळा तरी तो तुमचें अभिवादन करील, तुमचें कुशल-मंगल विचारील, मग कुठे दुसरी गोष्ट काढील !




काबुल विश्व-विद्यालयाच्या रेक्टरांशी आमच्या ज्या गोष्टी झाल्या त्या विसरणें आम्हाला अशक्य आहे. जणू काही आमची ते वाटच पहात होते. ते आम्हाला सांगत होते : "तुम्ही जेव्हा दिल्लीहून निघालात तेव्हा वृत्त-पत्रांत तुमचे फोटो पाहिले आणि वाचलें की अणु-शस्त्रांच्या स्पर्धेच्या विरोधात तुम्ही पायीं प्रवास करीत अफगाणिस्तानात येत आहात. त्या वेळेपासून आपल्यासारख्या साहसी शांतिवादी तरुणांना भेटण्यासाठी आणि तुमच्या सुरात आमचा सूर मिळविण्यासाठी आम्ही व आमच्या विश्वविद्यालयाचे विद्यार्थी उत्सुक आहोत. मानव जातीच्या नाशासाठी तयार होणाऱ्या या शस्त्रांचा जोरदार विरोध करण्याची आम्हा सर्वांची जबाव-दारी आहे. देवा शपथ ! तुमच्यासारखा तरुण असतो तर मीसुद्धा तुमच्या बरोबर या पायीं यात्रेत सामिल झालो असतो ! "

काबुलच्या तरुणांनी, विद्यार्थ्यांनी व पत्रकारांनी आमचें जोरदार समर्थन केलें. सर्वांची सहानुभूति व शुभ-कामना यांचें अमूल्य धन मिळवून आमचा उत्साह द्विगुणित झाला. भारतीय वकील श्री. जगन्नाथ धर्मजा यांनी आमच्या कामात व उद्देशात मन घालून अनुकूल भूमिका तयार केली. अफगाणिस्तानात व विशेषत: काबुलमधे भारतीय लोक मोठ्या संख्येने राहतात. अनेक भारतीयांशी आमचा संपर्क झाला आणि सर्व क्षेत्रातून आम्हाला सर्व प्रकारची मदत मिळाली.

काबुलमधे आम्हाला असें वाटलें की जणू आमच्या दीर्घ प्रवासाचा एक लहानसा टप्पा आम्ही गाठला. तसें तर दिल्लीहून काबुलला येईपर्यंत आम्हाला ७८८ मैलच चालावें लागलें, पण हा प्रवास अत्यंत अनुभवदायक, मनाला प्रसन्नता देणारा, व लाभप्रद होता. विशेषेकरून आमची पाकिस्तान-यात्रा. परंतु पाक सरकारने आम्हाला, 'सर्व सैनिक-करार ताबडतोब रद्द केले जावेत' अशा तऱ्हेच्या आमच्या विचाराचा पूर्ण रीतीने प्रचार करण्याची परवानगी दिली' जरी ती गोष्ट पाकिस्तान सरकारच्या परराष्ट्र-नीतीच्या विरोधी होती. खरोखर ही एक महत्त्वाची गोष्ट होती. विशेषेकरून अशा परिस्थितीत की जेथे थोड्या दिवसांपूर्वीपर्यंत 'मार्शल लॉ' लागू होता आणि स्वतः पाकिस्तान सरकार सैनिकीकरारात गुंतलेलें आहे. आमच्या मागे-पुढे रोज 'सी. आय. डी.' असत, पण त्यांनी आम्हाला केव्हाहि आमच्या कामात, शांतीचा प्रचार करण्यात, सैनिकी-कराराचा विरोध प्रदर्शित करण्यात व्यत्यय आणला नाही.

काबुलचा मार्ग काही अंतरापर्यंत वाळवंटासारखाच आहे, व काही दूरपर्यंत तर केवळ पहाडांचीं शिखरेंच शिखरें ! लोकवस्तीहि कमी. मांसाहारा शिवाय कोणी मनुष्य जगत असेल याची हे लोक कल्पनाहि करू शकत नाहीत. यामुळे आम्हाला बरेंच कठिण गेलें व त्रास झाला. खेड्यांतून भाजी शिजवणें तर कोणाला माहीतच नाही. दूध-दहीहि सामान्यतः नाहीच. आम्ही आमची भाकर, दुधाशिवायचा चहा, तिखट व कांद्याबरोबर खात होतो.

१७ ऑगस्टच्या प्रातःकाळीं जेव्हा आम्ही अण्वस्त्र-विरोधी पत्रकें वाटत वाटत काबुलहून निघालो तेव्हा सडकेवर लोकांचे थवेच्या थवे पत्रकें घेण्यासाठी उत्सुकतेनें जमले होते. 'शस्त्रास्त्रांवर आम्ही नियंत्रण इच्छितो' असा आमच्या गळ्यातील फलक वाचण्यासाठी शेकडो डोळे आमच्याकडे लागले होते. तीस दिवसांची काबुलहून हिरातची आमची ५६२ मैलांची पर्वतीय-पदयात्रा या जगाहून काही निराळ्याच जगात चालली होती. या संपूर्ण मार्गावर बर्फाळ शिखरांशिवाय आणखी दुसरें आहे काय? न शहर, न दळणवळणाचीं साधनें, न वृत्तपत्रें, न वीज. अशिक्षित लोक,

गरीब शेतकऱ्यांचीं लहान लहान खेडीं, व वर्षांतून ६ महिने जिकडे तिकडे बर्फच बर्फ!

आम्ही सुमारे २० दिवस तर ८ हजार फुटापेक्षा जास्त उंचीवर होतो. कित्येक वेळा तर १०॥ हजार फुटापेक्षाहि जास्त उंचीवर गेलो होतो. एका शिखरावरून उतरणें, व दुसऱ्या शिखरावर चढणें! कित्येकदा तर २०–२५ मैलांत एकहि गाव नसे! उंटांचे लांबच लांब तांडे! हजारो मेंढ्यांचें कळप! आणि त्यांच्यामधे सीधे, सरळ, निष्कपट ग्रामवासी! हा मार्ग सामान्यपणे वापरात नाही. काबुलहून हिरातला जाण्यासाठी गझनी, कंदाहारकडूनच लोक येतात जातात. पण तो रस्ता या रस्त्यापेक्षा सुमारे दोनशे मैल अधिक दूरचा होता. म्हणून आम्ही हा सरळ मार्ग पत्करला.

या ग्रामवासी भोळ्या निष्कपट लोकांना ही एक मोठी अद्‌भुत गोष्ट वाटे की भाषा न जाणणारे हे दोन परदेशी तरुण इकडे कशासाठी आले आहेत ? उंच पर्वत शिखरावर चढतांना आम्ही जेव्हा थकून जात आहोसें दिसे तेव्हा ते उंटावर किंवा घोड्यावर बसलेले ग्रामवासी आम्हालाहि आपल्या वाहनावर बसवून घेण्यासाठी प्रयत्न करीत. "आम्ही तर पायींच चालू" असें समजावल्यावर बहुधा ते लोक आमच्या पाठी-वरील सामान आपल्या उंटावर किंवा घोड्यावर ठेवून घेत. या एक महिन्यात असे लोक कमीच भेटले, जे युद्ध, अण्वस्त्र, शांति इत्यादि प्रश्न नीट रीतीने समजू शकतील. मधून मधून सरकारी अधिकाऱ्यांकडे आम्ही उतरत होतो. हे लोक आमच्या यात्रेचें ध्येय समजून घेत व आमचे विचार ऐकून घेत.

आमच्या या मार्गावर जीं प्रमुख स्थानें आलीं त्यांत पंजाब, लाल, कासी, ख्वाजा-ए-चेस्त व ओबेह हीं उल्लेखनीय आहेत. या ठिकाणीं सरकारी कचेऱ्याहि आहेत. द्राक्षें, रोटी, दूध-साखरेशिवायचा चहा, अशा अन्नावर संतोष मानत जेव्हा आम्ही दिल्लीहून १३५० मैल अंतर कापून अफगाणिस्तानचें एक मोठें शहर हिरात येथे पोहोचलो तेव्हा मनाला मोठा उत्साह व समाधान मिळालें की आम्ही आमच्या ध्येयाचा एक लांबचा टप्पा गाठला.

हिरातहून आणखी ७५ मैल चालून २१ सप्टेंबरला इराणमध्ये आम्ही जेव्हा पदार्पण केलें तेव्हा आमच्या मनाला असा विश्वास वाटू लागला की एक दिवस असेंच आमचे पाय मास्को व वॉशिंगटनच्या भूमीलाहि लागतील आणि आम्ही तेथील जनतेला दुसऱ्या देशातील जनतेचा हा संदेश पोहोचवू. "आम्हाला शांति हवी आणि युद्धाची शक्यताच नाहीशी व्हावी असें आम्ही इच्छितो."

अफगाणिस्तानची ५५ दिवसांची यात्रा आम्ही केली. हा देश जरी फार गरीब असला तरी येथील लोकांनी नेहमीच धन, सुख आणि वैभव-विलासापेक्षा स्वातंत्र्य अधिक पसंत केलें आहे. अफगाणी पठाण जितके सरळ व प्रेमळ हृदयाचे आहेत तितकेच ते बहादूरहि आहेत. म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्याचा सौदा केला नाही. गरीब राहिले पण गुलाम नाही झाले. फक्त १७० लाख लोकसंख्येचा हा छोटासा देश पाकिस्तानशी चांगले संबंध नसताना सुद्धा रशियाशी किंवा अमेरिकेशी सैनिकी करारात गुंतला नाही. कोणत्याहि दुसऱ्या देशाच्या लष्करी मदतीच्या बळावर आपलें स्वातंत्र्य टिकविण्याची कल्पना त्याने कधी केली नाही. नेहमी तटस्थ परराष्ट्र-नीतीच्या आधारावरच त्याने बाहेरच्या देशांशी आपले संबंध राखले.

तोरखाम सरहद्दीपासून आम्ही अफगाण सरहद्दीत २८ जुलैच्या सायंकाळीं जेव्हा प्रवेश केला तेव्हा मन शंकित होतें व सर्व अपरिचित वाटत होतें. पण २१ सप्टेंबरला ५५ दिवसांत ७७९ मैलांची यात्रा पुरी करून जेव्हा आम्ही मागे वळून कृतज्ञतापूर्वक अफगाणिस्तानला शेवटचा 'रामराम' (खुदा-हाफिज) करीत होतो तेव्हा एक-एक दिवस चल-चित्राप्रमाणे आमच्या डोळ्यांसमोर नाचत होता. तें हार्दिक स्वागत, उदार आतिथ्य, प्रेमळ आशीर्वाद, आणि आमच्या 'मिशन' चें जोरदार समर्थन सारें काही आठवत होतें. जर आम्ही विमानाने इथे आलो असतो तर फार तर काबुलला आलो असतो, किंवा आणखी एखादें दुसरें मोठें शहर पाहिलें असतें. काय त्याने अफगाण जीवनाचें हें खरें दर्शन झालें असतें ? कधी नाही.

अफगाणिस्तान दोन कोटी लोकसंख्येचा एक छोटा परंतु अत्यंत सुंदर देश आहे. ग्रामें व शहरें यांच्या पदयात्रेनंतर वाटलें की या मनोरम देशाला जर कोणी मागासलेला, अविकसित देश म्हणेल तर ती त्याची वर-वर पाहण्याची दृष्टि आहे. हें खरें की या देशात बड्या बड्या कारखान्यांचा अभाव आहे. हेंहि खरें की या देशात भारी मशिनरी आणि विजेचें उत्पादन अत्यल्प आहे; हेंहि खरें की हा देश अजूनपर्यंत तथाकथित भौतिक, वैज्ञानिक, व औद्योगिक प्रगतीच्या धाव-पळीत युरोपीय देशांबरोबर पावलें टाकू शकत नाही. परंतु तरी हीं सगळीं लक्षणें एखाद्या देशाला मागसलेला किंवा अविकसित म्हणायला पुरेशी नाहीत. आज औद्योगिकरणामुळे ज्या रीतीने शहरें सुंदर पोशाक धारण करून खेड्यांच्या शोषणावर ऐट मारतात तें काही प्रगतीचें लक्षण नव्हे. रेल्वे, मोटारी, विमानें, सडका, मशिनरी, कारखानें हीं सर्व प्रगतीचीं चिन्हें मानलीं जातात, पण या सर्वांचा आधार तर गावांचें शोषणच आहे.

व्यक्तिगत स्वामित्व व व्यक्तिगत भांडवलशाही यांच्यामुळे थोड्या शहरांचा नटवेपणा व भडकपणा, प्रगति व आधुनिकता यांच्यामागे हजारो लहानलहान गावांचें करुण क्रंदन लपलेलें आहे. श्रमिकांच्या श्रमांची थट्टा दडलेली आहे..

अफगाणिस्तानात विकेंद्रित अर्थ-व्यवस्थेचें शास्त्र सहज आपली उपयोगिता सिद्ध करूं शकेल. गावात आजहि चरखा जिवंत आहे. पदयात्रेत आम्ही पाहिलें की गावातील स्त्रिया मागावर कपडा व घोंगड्या विणतात. त्यांना आम्ही जेव्हा सांगत होतो की आमच्या शरीरावरचे कपडे हातानेच हातमागावर विणलेले आहेत तेव्हा ते ग्रामीण-लोक फार प्रसन्न होत व विचारीत: "तुमच्या देशात यंत्राच्या कपड्यापेक्षा हा कपडा (खादी) जास्त स्वस्त आहे?" हा प्रश्न बाजाराने निर्माण केला आहे. जरी त्यांच्या जीवनात बाजार पुष्कळच कमी आहे तरीहि जो इसम शहरात जातो तो अमेरिकेतून आलेला 'सेकंड हॅंड' कपडा पुष्कळ स्वस्तात खरेदी करून आणतो. या 'सेकंड हॅंड' कपड्याने लोकांना केवळ श्रमापासूनच परावृत्त केलें नाही तर लोकांची रुचिहि बिघडवायला

सुरुवात केली आहे. आज अफगाणिस्तानात कापडाच्या गिरण्या जास्त नाहीत. सामान्यपणे मेंढया पाळणें हा येथील शेतकऱ्यांचा मुख्य धंदा आहे. अफगाणिस्तानच्या मेंढया फार उंच, लठ्ठ, व दाट लोकरवाल्या असतात. एक-एक इसम हजार-हजार मेंढया पाळतो. अफगाणिस्तान अत्यंत थंड देश असल्यामुळे या मेंढयांकडून मिळणाऱ्या लोकरीचें महत्त्व या किसानलोकांना सर्वात अधिक आहे.

## डॉ. काकार यांची भेट

अफगाणिस्तानच्या यात्रेत डॉ. काकार यांच्याशी झालेली आमची भेट आम्ही कधी विसरू शकत नाही. रुंद कपाळ, उंच बांधा, गंभीर नजर, नम्र व मनमिळाऊ स्वभाव व विश्व-शांतीच्या प्रयत्नात नेहमी गोडी राखणारे श्री. काकार यांचें व्यक्तिमत्त्व जितके साधें सरळ आहे तितकेंच आकर्षकहि. काबुल विश्व-विद्यालयाचे विज्ञान विभागाचे संचालक व अफगाणिस्तानच्या अणु-शक्ति-विभागचेहि संचालक असल्यामुळे मानव जातीच्या वैज्ञानिक प्रगतीमधे त्यांची मदत सहजच होत आहे. पण हा सहकार विज्ञानाच्या शक्तीवर राजनैतिक लोकांचें प्रभुत्व असल्यामुळे आडमार्गाला जाऊ नये याची काळजी त्यांना वाटते. ते अणु-शक्ति-मंडळाचे अध्यक्ष या नात्याने हा प्रयत्न दृढतेने करीत आहेत की अफगाणिस्तान अणुशक्तीचा उपयोग मानव जातीच्या विनाशासाठी नाही तर त्याच्या शांतिपूर्ण प्रगतीसाठी करील.

त्या सुमारासच मास्कोच्या शांति-सम्मेलनात ते अफगाणिस्तानची ही नीति जोरदार शब्दात मांडून आले होते की रशिया व अमेरिका दोघेहि आज अन्न-वस्त्रासाठी वंचित असलेल्या जगाचे अब्जावधि रुपये युद्धाच्या तयारी प्रीत्यर्थ आणि अण्वस्त्रांचा चढाओढीसाठी खर्च करीत आहेत हा मानवतेचा द्रोह आहे.

"शांति-यात्रिकांनो, या देशात तुमचें स्वागत आहे!" असे म्हणून श्री. काकार यांनी आमच्याशी गोष्टी करायला सुरुवात केली. त्यांना आमच्या या पदयात्रेबद्दल फार उत्सुकता व आवड होती. कारण, भारतात

पदयात्रेची गोष्ट आता नवीन राहिली नाही पण बाहेरच्या देशात एखाद्या खास ‘ मिशन ’ किंवा विचार-प्रचारासाठी या प्रकारची पदयात्रा काढणें अगदीच नाविन्यपूर्ण आहे. म्हणून, “ प्रवास कसा करता ? कुठे उतरता ? लोकांचा (तुमच्याशी) व्यवहार कसा होतो ? तुम्हाला काही त्रास तर नाही होत ? लोकांना तुम्ही काय समजावून सांगता ? खेड्यापाड्यातून तुम्हाला भोजन मिळतें की नाही ? ” इत्यादि अनेक प्रश्न श्री. काकार यांनी आम्हाला विचारले.

आम्ही सविस्तर माहिती त्यांना सांगितली आणि म्हटलें : “गांवच्या लोकांना हें ऐकून फार आनंद होतो की भारतासारख्या दूरच्या देशाचे दोन यात्री पायीं चालत चालत आपल्याकडे आले आहेत.” यामुळे आम्हाला सर्व ठिकाणीं खूप आतिथ्य-लाभ होतो. आम्ही जेव्हा लोकांना आमच्या पदयात्रेचे उद्देश समजावून सांगतो तेव्हा प्राय: सर्वत्र आम्हाला एकच उत्तर मिळतें : “ तुम्हाला तुमचें ध्येय प्राप्त होवो. युद्धाची तयारी बंद होवो. आम्हाला बाँब नकोत. आम्हाला तर जीवन व्यतीत करण्याचीं साधनें पाहिजेत. तुम्ही या यात्रेद्वारें जगाची मोठी सेवा करीत आहात. ” याप्रमाणे जनता आम्हाला आपलें पूर्ण समर्थन व हार्दिक सहयोग देत आहे.

हें ऐकून श्री. काकार म्हणाले : “ हें अगदी खरें आहे. लोकांना वास्तविक शांतिच पाहिजे आहे. खरी गोष्ट म्हणजे रशिया-अमेरिकेची जनताच नाही तर तेथील राज्यांचे अधिकारी लोकसुद्धा मनापासून शांति इच्छितात. पण अडचण ही आहे की ते एकमेकांवरचा विश्वास गमावून बसले आहेत. प्रश्न आता हा आहे की पहिलें पाऊल पुढे कोणी टाकायचें ? एक गोष्ट आणखी ही झाली आहे की आता हा नि:शस्त्रीकरणाचा प्रश्न नाही उरला, दोन्ही देशांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होऊन बसला आहे. कोणत्या देशाचा ठराव मान्य केला जावा, कोणाची पद्धत स्वीकारली जावी हा झगडा चालू आहे. मास्कोच्या शांति-संमेलनातहि मला असेंच दिसलें.”

## एका पठाणाच्या तंबूत

अफगाणिस्तानच्या निष्कपट जीवनाने मन प्रभावित झाल्याशिवाय राहत नाही. एके दिवशी आम्ही जाता जाता एका नदीच्या काठी

पोहोचलो. अगदी निर्जन व रुक्ष पहाडातून वाहणारी ही नदी प्रवासी लोकांना फार मोठा आधार आहे. ६-७ वर्षांच्या एका लहान अफगाण बालिकेचें मनोहर रूप पाहून मी तर मुग्धच झालो. तिच्या गोऱ्या मुख-चंद्रावर असें निर्व्याज हास्य विलसत होतें की तेथून मन मागे हटेच ना. जगातील राजनीति, युद्धाच्या तयाऱ्या, अॅटमबाँबचे स्फोट आदि डावपेचांशी या बालिकेचा लेशमात्रहि संबंध नाही. ती शाळेत जाणार नाही, ती परदेशाचे प्रवास करणार नाही, ती जंगल्यातल्या पुष्पाप्रमाणे जिथे निर्माण झाली तिथेच सुकून जाईल. तिच्या डोळयांत भरलेले अनंत गांभीर्य कधीच पारखलें जाणार नाही. तिच्या पाठीवर एक टोपली बांधलेली होती. तिच्यांत ती शेण भरून घेत होती. हाच तिचा जन्मभराचा धंदा. तिने काळया रंगाचें खमीस व सलवार धारण केली होती. डोक्यावर गोलटोपी व त्यावरून लाल ओढणी. १० हजार फूट उंच पहाडावर राहणाऱ्या या रूपवान पर्वत-कुमारीचें श्रम हेच जीवन. श्रमापासूनच जीवनारंभ झाला आणि श्रमातच जीवनाची समाप्ति होणार !

थोडे पुढे जाऊन आम्ही आमची पाण्याची कुपी भरून घेण्यासाठी नदीत उतरलो. तेथे एक अफगाण-फेरीवाला पठाण बसला होता. नुसती ब्लेड हातात घेऊन तो दाढी बनवीत होता. नाही साबू, नाही ब्रश, नाही आरसा, नाही क्रीम. " अहो भैय्या, पुढच्या गावाला पोहोचायला किती वेळ लागेल ? " इकडे अंतर समजून घ्यायला हाच प्रकार आहे. मैलाच्या खुणेचा नाही पत्थर की किलोमीटरचा अंदाज ! त्यांचे एक नांव आहे –' फरसाक '– जो अंदाजे ४॥ मैल असतो. आम्ही आमचें सामान पाठीवर घेऊन ताशी ३ मैल गतीने चालत होतो. सामान नसलें तर ४ मैल ताशी चालू शकत होतो.

" दीडदोन तासांचा रस्ता आहे." पठाणाने सांगितलें. " कुठून आला आहा प्रवाशांनो ? " आमचा रागरंग व गळयातील लटकलेल्या जाहिराती पाहून त्याने विचारलें.

" दिल्लीहून आलो आहो " आम्ही आमच्या प्रवासाच्या उद्देशाची माहिती त्याला दिली.

"भलतीच हिंमत केली बुवा तुम्ही!" पठाण फारच खुप झाला. "थोडया दूर माझा तंबू आहे. चला, तेथे चहा बनवू. मग पुढे जा." आम्ही तंबूकडे वळलो.

"मी दर तीन महिन्यांनी काबूलहून तऱ्हेतऱ्हेचें सामान, कपडा वगैरे उंटावर लादून आणत असतो. या भागात तें विकून पुन्हा जातो. कित्येक वर्षांपासून हाच क्रम चालला आहे. जर त्या सर्वांची बेरीज केली तर हजारो मैलांची सफर मी केली आहे. तुम्ही दिल्लीहून येथपर्यंत आलात हें काहीच नाही. पण माझा प्रवास माझ्या पुरता होता, तुमचा प्रवास आम्हा सर्वांसाठी आहे. माझा प्रवास 'स्वार्थासाठी' आहे तर तुमचा प्रवास 'शांतीसाठी' आहे." एक सरळ हृदयाच्या पठाणाच्या तोंडून अशा तात्त्विक गोष्टी ऐकायला मिळत होत्या. त्याच्या खांदावर बंदूक लटकत होती पण त्याच्या व्यवहारावर बंदूकीचा प्रभाव नव्हता.

थोडया वेळाने तो पठाण एखाद्या तत्त्वज्ञाप्रमाणे बोलू लागला: "माहीत नाही कोणी ही बंदूक बनवली! जर ही बंदूक बनवलीच गेली नसती तर आमच्या मनात भीतिच का निर्माण झाली असती? मनुष्य, मनुष्याचा प्राण घेण्यासाठी का धडपडतो? आज बंदुकीच्या जोरावर मनुष्य मनुष्यावर हक्क चालवतो. बंदूक नसती तर प्रेमशक्तीने हक्क चालता. जसा बापाचा मुलावर चालतो, भावाचा भावावर चालतो, मित्राचा मित्रावर चालतो, पतीचा पत्नीवर चालतो." मी तर आश्चर्याने दंग झालो! पहाडात सामान विकणारा पठाण इतक्या सूक्ष्म गोष्टी करील याची मला कल्पनाहि नव्हती. या एका बंदूकधाऱ्याला प्रेमाच्या हक्काची अशी व्याख्या करताना पाहून मी तर आश्चर्यचकित झालो. आम्हाला काबुलमधे सांगितलें गेलें होतें की कमीत कमी आत्मरक्षणासाठी तरी एखादा चाकू किंवा पिस्तूल बरोबर ठेवा. पण आम्ही तो सल्ला स्वीकारला नाही, हें चांगलेंच केलें. कारण हे पठाण तर आमच्याशी प्रेमाच्या हक्काच्या गोष्टी करतात. आणि आमचें आतिथ्य करतात, हें आम्ही अफगाणिस्तानात पख्तून पठाणांच्याबरोबर राहून पाहिलें. आम्ही जेव्हा या पठाणाच्या तंबूत त्याच्याबरोबर पोहोचलो तेव्हा तर त्याने झोळीभर बदाम, किसमिस व पिस्ते आमच्यासमोर ठेवले.

"गांधी कसे आहेत ?" पठाणाने मधेच विचारलें, जसें काही तो झोपेतून जागा झाला. "फारच मोठा माणूस आहे गांधी !" आवाज लहान करून पठाण म्हणाला: "आपण माझा 'सलाम' गांधींना पोचवाल काय ?" त्याला गांधीजी आता जिवंत नाहीत हेंहि ठाऊक नव्हतें. आम्हाला हें सांगणें कठिण झालें होतें की गांधींनी जन्मभर प्रेम व अहिंसा यांची उपासना केली, पण अखेर स्वत: ढाल बनून, स्वत:चें बलिदान करून कशा रीतीने धर्म व जातीच्या नांवावर पसरलेली हिंसा बंद केली.

"गांधी तर आता जिवंत नाही." मी हलकेंच सांगितलें.

"खरें ?" पठाण दचकला. त्याचा चेहरा उदास झाला. मग बऱ्याच वेळपर्यंत आम्ही गांधीजीविषयींच गोष्टी बोलत राहिलो. गांधींच्या अहिंसेने येथील पर्वतपहाडापर्यंत आपली छाया पसरविलेली होती.

"आमच्यातहि एक गांधी आहेत." पठाण म्हणाला.

"कोण ?" मी उत्सुकतेने विचारलें.

"खान अबदुल गफ्फारखान." पठाणाने ताबडतोब उत्तर दिलें.

"तो आम्हा पख्तून लोकांच्या स्वातंत्र्याचा 'पैगंबर' (दूत) आहे. तोसुद्धा शांति व प्रेम यांचा पुजारी आहे. पण हें तर सांगा, साहेब ! की शांति व प्रेमाची, माणुसकीची व स्वातंत्र्याची गोष्ट सांगणाऱ्याला हे सत्ताधारी लोक जेलमधे का डांबून ठेवतात ?" सरळ हृदयी पठाणाच्या गोष्टी साध्या-भोळ्या होत्या पण त्यांतील तत्त्व खोल होतें. आम्ही त्याला कित्येक कारणें समजावून सांगितलीं.

मग आम्ही पाहिलें पठाणाचें सामान. अनेक अमेरिकी कोट, ब्रिटिश सैनिकांचे कपडे, अमेरिकन स्त्रियांचे 'फ्रॉक' इत्यादि त्याच्याजवळ होते. हे सारे वापरलेले जुने कपडे होते. पुष्कळ स्वस्तात युरोप व अमेरिकेतून हे कपडे काबुलला येतात आणि काबुलहून हा तरूण आपल्या उंटावर लादून ते इकडे आणतो.

"अमेरिकेहून आलेले 'सेकंड हँड' कपडे वापरण्यापेक्षा आपल्या घरचा, आपल्या देशाचा जाडा भरडा कपडा वापरणें काय वाईट आहे ?" मी विचारलें.

"आपण काय म्हणता, साहेब? काबुलचा बडा व्यापारी या धंद्यावर खूप पैसा कमावतो. आमच्या सारख्या काही लोकांचा गुजाराहि यावर चालतो. त्यापुढे फायद्या-नुकसानीचें आम्हाला काय माहीत?"

आम्हाला जास्त वेळ नव्हता. आम्ही पठाणाचा निरोप घेतला, व पुढे चालू लागलो. अफगाणिस्तानच्या या पहाडी रस्त्याचे कष्ट अशा अनुभवापेक्षाहि जास्त मजेदार आहेत. जेव्हा आम्ही काबुलहून गझनी-कंदाहारचा लांब रस्ता सोडून उंच व पहाडी रस्ता घेतला तेव्हा भारत-वकिलातीचे अधिकारी लोक फार चिंता करीत होते. काही महिन्यापूर्वी या रस्त्याने एक अमेरिकी दांपत्य 'हिच हाइक' प्रवासाला गेले होते ते कधी परत आलेच नाहीत. या घटनेमुळे सर्व चिंताग्रस्त होते. अफगाण-सरकारने सगळ्या मार्गावरील सरकारी अधिकाऱ्यांना सूचना पाठविली होती की "शांति-यात्रिकांना सर्व प्रकारची मदत करावी." मधून मधून भारतीय वकिलातीचे प्रथम सचिव टेलिफोन करून माहिती मिळवीत होते. आमच्यापाशीहि सरकारचें एक पत्र होतें की "भारतीय-शांतियात्री अफगाणिस्तानचे अतिथि म्हणून यात्रा करीत आहेत." इतकी सारी व्यवस्था असल्यामुळे कोणालाहि काही शंकेचें कारण नव्हतें.

## गरीब गाव, गरीब लोक

ही अफगाणिस्तानच्या डोंगर पहाडांची कथा आहे. इथे अशा गोष्टी रोज घडतात. त्या दिवशीं आम्ही कोरडी भाकर व दूध-साखरेशिवायचा काळाकाळा चहा यांचा नास्ता करून सकाळीं ६ वाजता पदयात्रेवर निघालो. अफगाणिस्तानची सुपरिचित पर्वतरांग, कोहिबाबाच्यावरून आम्ही चाललो होतो. घाटांचे चढ-उतार पार करीत आम्ही मार्ग आक्रमीत होतो. असा निर्जन रस्ता होता की जेथे बस चालत नाही की कार चालत नाही. विमान किंवा रेल्वेचा प्रश्नच नाही. उंच मजबूत मेंढयांचे कळप शिकारी कुत्र्यांबरोबर डोंगरावर विखुरलेले होते. हे कुत्रे आम्हाला नेहमी त्रासदायक होत असत. जोरजोराने भुंकून तंग करीत असत. आम्हाला कित्येकदा सांगितलें गेलें की बरोबर हातात एक लाठी ठेवून प्रवास करीत जा. पण हा सल्ला आमच्या मनाला पटला नाही.

लोकांचा सल्ला तर असाहि होता की अफगाणिस्तानच्या भयंकर निर्जन मार्गावर प्रवास करताना बरोबर लहान-मोठें काही हत्यार सुद्धा ठेवावें पण अशा सल्ल्याकडे ध्यान देण्याचा प्रश्नच नव्हता. माणसाला भिऊन माणसा विरुद्ध आम्ही हत्यार बाळगावें या कल्पनेला तर मी स्वप्नातहि समजू शकत नव्हतो. पण कुत्र्याच्या करामतीपुढे आमची अनेक वेळा आफत होत असे. कोहिबाबा १० हजार फूट उंचीचा पर्वत आहे. आम्ही तो ओलांडून जात होतो. रस्त्यात एक उंटांचा मोठ्ठा लांबलचक तांडा लागला. तसा तर एखादा तांडा आम्हाला रोजच भेटायचा. पण त्या दिवशीं-चा तांडा फारच मोठा होता. सुमारें ८०-९० उंट-उंटिणी व जवळ-जवळ ४०-५० स्त्री-पुरुष-मुलें होतीं. त्यानंतर आणखी एक छोटा तांडा मिळाला. कारण पर्वतावर खूप थंडी पडायला आरंभ झाला होता. एखाद-दुसऱ्या महिन्यात पूर्ण पहाड बर्फाने झाकला जाणार होता. म्हणून खेड्यांचे गरीब शेतकरी रोजगार धंद्यासाठी काबूल, जलालाबाद, कंदाहार, पेशावर आणि कोणी कोणी तर दिल्लीपर्यंतहि मजल मारतात. हे लोक आपल्याबरोबर आपल्या बागेतील उत्पन्न—बदाम, किसमिस, अक्रोड, वगैरे नेतात. हिवाळा संपल्यावर हे लोक पुन्हा आपल्या जन्मभूमीला परत येतात.

या पठाणांचें स्वतःचें घरदार तर कमीच लोकांजवळ असतें. हे लोक स्वहस्तें तयार केलेल्या घोंगड्यांचे तंबू गाडून उन्हाळ्यात थोडीशी शेती करतात. यांचें जीवन फार कठिण व कष्टमय असतें. पण हे लोक मोठे उदार मनाचे, साहसी व वीर असतात. आमच्या पाठीवरील थैला एका पठाणाने आमच्याकडून घेऊन आपल्या उंटावर ठेवून घेतला व सांगू लागला: "जेथपर्यंत आपला रस्ता एक आहे तेथ पर्यंत तुम्ही कशाला बोजा वाहता ?" नंतर त्याने आपल्या जीवनाची कहाणी सांगायला सुरुवात केली. उंच बांधा, कसलेलें शरीर, रुंद कपाळ, डोक्यावर सफेद पगडी, सैल मळकट कुडतें, त्यावर छोटेसें फाटकें जाकिट, घेरेदार सलवार, हातात लहानशी छडी. मोठा उत्साही तरुण होता तो. दिल्ली-कराचीची सफर उंटावरून त्याने केली होती. धडाकून हिंदीत बोलत होता. सांगू लागला: "माझें घर व माझी जमीन

वर्षातून ६–७ महिने बर्फाच्छादित राहते. आम्हा गरीब लोकांना हिवाळा फारच त्रासदायक असतो. आमचें घर म्हणजे मातीचें एक लहानसें झोपडें. त्यातच मी, पत्नी, बालबच्चे, व म्हातारी आई सगळे राहतो. तेथेच आमच्या मेंढ्या व गायी असतात. सबंध हिवाळ्यासाठी २–३ मोठ्या मोठ्या मेंढया आम्ही राखून ठेवतो. हेंच आमचें जेवण. पुरेसे कपडे आमच्या जवळ नसतात म्हणून लाकूडफाटा जाळून शेकोटीवर हिवाळ्यात गुजारा करतो. या वर्षी काहीच जवळ राहिलें नाही म्हणून मी सर्व परिवारासह बाहेर पडलो आहे. पेशावरला जाऊन काही काम करीन आणि हिवाळा संपल्यावर परत गावीं येईन." आम्ही पाहिलें की त्याने आपल्या उंटावर संपूर्ण घर लादलें होते. वृद्ध आई व दोन मुलें उंटावर होतीं. एक मोठा मुलगा, पत्नी व स्वत: पायीं चालत होते. पुन्हा त्या तरुणाने विचारलें: "ऐकलें आहे की आमचें सरकार व पाकिस्तानचें सरकार यांच्यांत काही झगडा झाला आहे आणि खैबरखिंडीचा रस्ता बंद केला गेला आहे. मग तुम्ही लोक कसे आलात ?" मी म्हणालो : "रस्ता बंद तर जरूर झाला आहे. पण आम्ही तिऱ्हाइत देशाचे लोक, आमच्या जवळ पासपोर्ट आहे. म्हणून आम्हाला यायलाजायला काही अडचण पडत नाही. पण, भाऊसाहेब, तुम्ही कसे जाल ?" पठाण म्हणाला : "हीं सरकारें आम्हा गरीबांच्या गळ्यात नसते फास अडकवीत असतात. नित्य नवे झगडे, नित्य नवे कायदे ! पण पेशावर आमचें आहे. पठाणांचें आहे. आम्ही पिढ्यान् पिढ्या तेथे जात-येत आहोत. राज्य कोणाचेंहि असो, तेथे राहणारे पख्तून आमचे भाईबंद आहेत. तेथे जायला आम्हाला कोणी रोकू शकत नाही. मी तर पहाडातून जाणारे शेकडो रस्ते जाणतो. इतक्यावर जर कोणी आमच्या पख्तून पठाणांना भेटायला मला रोकील तर बंदूक माझ्या खांद्यावर आहेच." हा होता अस्सल पठाणी रंग ! !

पण थोड्याच वेळाने त्याचा दुसरा रंग समोर आला. त्याने पाहिलें की जवळच थंड पाण्याचा एक झरा वाहत आहे. म्हणून तो म्हणाला : "काय तुम्ही लोक थकला नाहीत ? तुम्हाला भूक नाही लागली ? झरा जवळच वाहतो आहे. म्हणाल तर चहा बनवू. माझ्याजवळ रोटी आहेच."

मोठें अनपेक्षित व अगत्याचें आमंत्रण होतें तें. या रुक्ष पहाडात असा प्रेमळ मनाचा पठाण भेटला! नाहीतर, आमच्यापाशी थंड पाणी व व्हिटॅमिनच्या गोळ्यांवरच आधार होता. काबूलहून निघताना आमचे यजमान श्री. रामलाल आनंद यांनी व्हिटॅमिनच्या गोळया आमच्या बरोबर दिल्या होत्या. या गोळ्याच आमचें मुख्य भोजन बनून मदत करीत होत्या. आम्ही या पहाडांच्या शिखरांवर चढून जात होतो आणि प्रत्येक शिखरावर १० — १५ मिनिटें आराम घेत होतो. दिवसभरात खाण्यापिण्याचें नांव नाही. सकाळीं रात्रीं जें जेवण मिळे तेंहि पुरेसें नसे. या तरुणाच्या अनपेक्षित निमंत्रणाचा आम्ही स्वीकार केला. पण त्याची ३ इंच जाडीची वरून जळकी व आतून कच्ची अशी भाकरी आम्ही खाऊ शकलो नाही. या आमच्या प्रिय यजमानाने किटलीत झऱ्याचें पाणी भरलें आणि दोन दगडांच्या चुलीवर आग पेटवून पाणी गरम केलें. किटलीभर पाण्यात चमचा भर हिरव्या चहाची पत्ती टाकली. अफगाणिस्तानात हाच चहा जास्त चालतो. पोटात भूक जरूर होती, पण हा चहा व ती रोटी आवडली नाही. तरी १५–२० मिनिटें आम्ही पठाणाबरोबर घालविली. नंतर तो आपल्या रस्त्याला लागला. आमचें सामान आमच्या पाठीवर पुन्हा येऊन बसलें.

आम्ही चालत राहिलो. घाटांचे अनेक उतार-चढाव होते, रस्त्यात कुठे गाव नाही आलें. तांडा भेटण्याचें बंद झालें. आम्ही दोघे फार थकून गेलो. पण इलाज काय? इतक्यात पुष्कळ दूर अंतरावर एक मोठेंसें घर आम्हाला दिसलें. जरी त्या घरापर्यंत पोहोचायला आम्हाला लांब रस्ता काटायचा होता तरीपण मनात आशेचा संचार झाला की निश्चितपणें आम्ही अेका आश्रय-स्थानीं पोहोचणार आहोत. झऱ्यातून आम्ही आमची किटली पाण्याने भरून घेतली होती. त्या झऱ्यापासून आम्ही १५ मैल चालून चुकलो होतो आणि समोर दिसणारें मकान सुमारें ५ मैलांवर तें. हे ५ मैल आम्ही दोन तासात काटले. सामान घेऊन उंच सखल पर्वतांतून जाताना गति फार कमी होते, आणि थकवा जास्त येतो. पण जेव्हा आम्ही त्या मकानाजवळ पोहोचलो तेव्हा आम्हाला आढळलें की

तें मोठें दिसणारें मकान एक पडके खिंडारच होते. तो २८ ऑगस्टचा दिवस! दिवसा कडक ऊन व रात्रीं कडक थंडी. अशा उन्हात निरंतर चालत राहिल्यामुळें शरीर घामाने निथळून निघत होतें. तहानहि जास्त लागत होती. आमच्या छोटचाशा किटलीतील पाणी आम्ही फस्त केलें. या शुष्क उघडचा बोडक्या पहाडावर पाणीहि सर्वत्र मिळत नाही. थोडा वेळ आराम करून आम्ही पुढे निघालो.

दोन तीन मैल आणखी चालून गेल्यावर एक नदी लागली. जरी ह्या लहान नदीचें पाणी फार स्वच्छ व पिण्यालायक नव्हतें तरी खूप तहानेलेले असल्यामुळें आम्ही पिऊन घेतलें. थोडें आणखी पुढे गेल्यावर डाव्या हाताच्या बाजूला सुमारें एक मैल अंतरावर एक लहानशी वस्ती असलेली दिसली. जरी आमच्या रस्त्याच्या पलीकडे बाजूला आम्हाला जावें लागणार होतें तरी तिकडे गेल्या शिवाय दुसरा इलाजच नव्हता. या गावात जायला नदीच्या पलीकडे जायला हवें होतें. नदीत पाणी गुडघाभर होतें हें भाग्यच. शेवटीं २५ मैल चालून थकले भागलेले, उपाशी असे आम्ही त्या लहान गावात पोहोचलो. गावाचें नांव स्पिट्टेवार किरमान! गाव लहानसें, एक पडकी मशीद. मशिदीजवळच एक मुल्लासाहेब बसले होते. ते एक धार्मिक पुस्तक वाचीत होते. सगळ्या गावात हेच एकटे गृहस्थ होते जे पुस्तक वाचू शकत होते. आमचे चेहरे थकून गेले होते. पाय व खांदे दुखून राहिले होते. संध्याकाळीं ७ वाजता आम्ही मुल्लासाहेबां-जवळ पोहोचलो. सामान खालीं ठेवलें. मुल्लासाहेबांनी बसण्यासाठी इशारा केला. आम्ही बसलो. आमच्या मोडक्या तुटक्या फारशीत आम्ही बातचीत सुरू केली. दोन परदेशी पाहुण्यांना पाहून गावभरच्या स्त्रिया, मुलें आणि पुरुष तेथें गोळा झाले.

मुल्ला साहेब व अन्य ग्रामवासीयांच्या पुढे खरोखर अेक समस्या निर्माण झाली की पाहुण्यांना कोठे उतरवावें! एक एक परिवारासाठी एक एक मातीचें झोपडें होतें. त्या झोपडचात, स्त्रिया, पुरुष, पोरेंबाळें, मेंढचा, गायी, कोंबडचा सर्व आश्रय घेत असत. अशा स्थितीत आमच्या सारख्या परदेशातून आलेल्या अतिथींना कुठे उतारा द्यायचा? आणखी लोक

इतके गरीब की आम्हा दोघांसाठी कोणा एकाच्या घरीं भोजनाची व्यवस्था जमविणेंहि कठिण होतें. शेवटीं तीन चार घरून थोडें थोडें अन्न एकत्र केलें गेलें. मुल्लासाहेब म्हणाले : " आम्ही गरीब लोक आहोत, कदाचित आम्ही तुमचा पाहूणचार चांगल्या तऱ्हेने करू शकणार नाही. पण आमच्यापाशी जें आहे तें तुम्हाला अर्पण करतो आहो. " रात्री आम्ही मशिदीत झोपलो. ५–७ घरून अेक अेक घोंगडी आणली. त्या घोंगड्या फार घाणेरड्या, धुळीने भरलेल्या व वास मारीत होत्या. पण रात्रीं थंडी वाढत होती म्हणून त्या घोंगड्यांची आम्हाला जरूर होती. आम्हाला वाटलें की हे लोक गरीब भले असोत पण मनाने अमीर आहेत. वारंवार ते आमच्यापाशी येत होते, आमचा समाचार घेत होते आणि चांगल्या प्रकारें आतिथ्य न करू शकल्याबद्दल क्षमा मागत होते. त्यांच्या दृष्टीने ही एक नवी व आश्चर्य कारक घटना घडली होती की दोन शान्तियात्रिक आपल्या गावीं आले ! कशाला कोणी परदेशी प्रवासी येथे येता ? कसा कष्टाचा, परीक्षेचा दिवस होता तो ! !

# कला व काव्याची भूमि इराणमध्ये

तायाबात ! इराणचा पहिला पडाव ! अनोळखी देश. अनोळखी भाषा. चोहोकडे रेताड वाळवंट आणि सूं-सूं करणारे भयंकर वादळ. आम्ही शोधत होतो कोणी यजमान. इतक्यात एका तरुणाने विचारलें: "तुम्हाला काय पाहिजे ?" आम्ही म्हणालो : "आम्हाला रात्रभर उतरण्यासाठी जागा पाहिजे." मोठें विचित्र उत्तर होतें. समोर अनेक हॉटेलें आहेत आणि हे म्हणतात 'उतरण्यासाठी जागा पाहिजे !' तो म्हणाला: "मी काही समजलो नाही. माझ्याबरोबर चला. आपण चहा घेऊ आणि तुमचें म्हणणें ऐकू." चहाच्या टेबलावर त्याला कळून आलें की आम्ही नुसते प्रवासी नाही, शांतीचे प्रचारक आहोत, पायीं चालत आलो आहोत इत्यादि. त्याने शहराच्या एका प्रतिष्ठित व्यक्तीच्या बगीच्यात आम्हाला उतरविलें.

## काय हिंदु मुसलमानाच्या घरीं खाईल ?

इराण कला, काव्य व संस्कृतीचा देश आहे, हे पहिल्याच दिवशीं लोकांचें जीवन व राहणी-करणीवरून लक्षात आलें. आम्ही मुक्काम केला. सायंकाळ झाली. हलके-हलके रात्र झाली. दुकानें बंद झालीं. आम्ही सकाळ पासून उपाशी होतो. उतरण्याचें ठिकाण फार सुंदर होतें. सुंदर

गालिचे. अंथरुणासाठी उत्तम बिछाना. पांघरायला रेशमी रजई. पण खायला हवा! कोणी काही विचारपूस केली नाही. आम्ही मोठे त्रस्त झालो. बरीच रात्र झाल्यावर मी बाहेर निघालो. बागेचे मालक दुकान बंद करीत होते. भेटल्याबरोबर म्हणाले: "तुम्हाला काही त्रास तर नाही ना? मी सर्व प्रकारच्या सेवेसाठी हजर आहे."

मी विचार करून राहिलो होतो की त्यानंतर भोजनाविषयीं पण विचारतील. पण तो प्रश्न त्यांच्या चित्तात नव्हताच. मग मीच संकोच सोडला. मी विचारलें : "आम्हाला भोजनासाठी आपल्या घरीं यावयाचें आहे की इथेच . . . ?"

त्यांचा चेहरा उतरून गेला. "काय आपण लोकांनी भोजन नाही केलें ?" या एका प्रश्नाने त्यांनी आपल्या मनातला सर्व गोंधळ प्रगट केला. फार लाजले. वारंवार क्षमा मागू लागले. खरें म्हणजे ते असे समजत होते की आम्ही हिंदु-धर्माचें, कदाचित् त्यांच्या हातचें व त्यांच्या घरचें भोजन करणार नाही.

त्यांना ही कल्पनाहि कशी येणार की भारतापासून इतक्या दूर कोणी पैशाशिवाय प्रवास करीत आहे? त्यांनी असे मानूनच घेतलें होतें की आम्ही उतरू त्यांच्या घरीं, खाऊ हॉटेलमधे. पण आम्ही म्हटलें: "आम्ही व आपण, दोघेहि मनुष्य आहो. बरोबरीचे बंधु आहो. तसेंच आमचा कोणता विशिष्ट धर्म नाही, कोणती विशिष्ट जात नाही. सेवा आणि प्रेम हाच आमचा धर्म आहे, माणसाची आमची जात आहे. आम्ही न हिंदु आहोत, न ख्रिस्ती आहोत, न मुस्लीम आहोत, न पारसी आहोत." हें सर्व समजल्यावर मोठ्या नम्रतेने त्यांनी आमची क्षमा मागितली आणि आमच्यासाठी शाकाहारी भोजनाची व्यवस्था केली.

## जेव्हा आश्रय मिळाला नाही

खुरमाबाद! 'देह' चा अर्थ आहे 'गाव'. 'देहदार' म्हणजे गाव-प्रमुख. आम्ही लहान गावात जात होतो तेथे देहदाराच्या घरीं अतिथि बनत होतो. प्राय: सर्व ठिकाणीं हे लोक आम्हाला परदेशस्थ पाहुणे मानून मोठ्या प्रेमाने वागवीत.

फिरता फिरता आम्ही खुरमाबादेला पोहोचलो. हें गाव मोठें होतें. विचारीत विचारीत आम्ही देहदाराच्या घरीं गेलो. देहदार दुकानात होते. आम्ही त्यांना तेथे भेटलो. आपल्या मोडक्यातोडक्या फारशीत विनंति केली की " रात्रभर राहण्यासाठी आम्हाला आश्रयस्थान पाहिजे. " त्यांनी सर्व गोष्टी विचारून घेतल्या. आमच्या पाठीवर लादलेले सामान व नवखे प्रवासी पाहून गावचे ४०–५० लोक एकत्र जमले होते. सर्व ऐकून घेतल्यावर देहदार म्हणाले: " माझें घर लहानसें आहे. आपल्या योग्य जागा आमच्या घरीं नाही. " आम्ही म्हणालो: " आम्ही जमिनीवर झोपू. " पण तेंहि त्याला पटलें नाही व हलकेंच पसार झाले. आम्ही उभे होतो. आमच्या-बरोबर गावचे ते ४०–५० लोकहि उभे होते. आम्ही तसेच उभे होतो. १० मिनिटें, १५ मिनिटें, अर्धा तास. पण कोणीहि आम्हाला उतरायला जागा देण्याचें कबूल केलें नाही. देहदाराने नाही आणि दुसऱ्या कोणीहि नाही. गर्दीतील एकजण म्हणाला: " तरियाबाद गाव जवळच आहे. तेथील देहदार फारच चांगला आहे. तुम्ही तेथे जाऊन रात्रभर राहा. " आमच्या आतापर्यंतच्या प्रवासात हा अनुभव प्रथमच होता. नंतर आम्हाला समजलें की या लोकांना आमच्याबद्दल काही शंका आली. कदाचित् आम्ही हेर असू किंवा दुसरे कोणी अनुचित व्यक्ति असू. आम्ही तिथून निघालो व जवळच्या तरियाबाद गावाला पोहोचलो. पण तेथील देहदार कुठे बाहेरगावीं गेला होता. " आम्हाला कुठे दुसरीकडे उतरायला जागा मिळेल काय ? " पण त्याचें उत्तर नकारात्मकच मिळालें. एकानंतर दुसरें गावसुद्धा आमचा अशा रीतीने अस्वीकार करील याची आम्हाला कल्पना नव्हती. संभव आहे, या गावांना पूर्वी काही वाईट अनुभव आला असावा. कोणी बाहेरच्या माणसाने काही ठगबाजी किंवा असाच अनुचित प्रकार करून गांववाल्याच्या मनात प्रतिक्रिया निर्माण केली असावी. जें असेल तें, आम्हाला भोळ्या-भाबड्या ग्रामवासीयांच्याबद्दल काही राग आला नाही. आम्ही नम्रतेने ' राम राम ' केला व तिसऱ्या गावीं जाऊन आश्रय मिळवला.

## त्रासदायक मार्ग : सुखदायक आतिथ्य

आम्ही एक रात्र सिसाबमधे राहिलो. तेथे रात्रीं एक सरकारी अधिकारी श्री. फरीदून किरमानीहि राहिले होते. ते जीपने आले होते. अचानक परिचय झाला. म्हणाले: “माझी जीप खाली आहे. चला, माझ्या घरचें आतिथ्य स्वीकारा.” “आम्ही तर फक्त पायींच प्रवास करतो. आम्हाला नको बस, नको कार, नको जीप, नको सायकल, नको घोडा.” या वाक्याने आम्ही आपली कथा सुरू केली आणि ‘अण्वस्त्राविरुद्ध आमचा हा सक्रिय विरोध आहे’ या वाक्याने ती संपविली. श्री. फरीदून म्हणाले: “चांगली गोष्ट आहे. मी तुमच्या विचाराशी पूर्ण सहमत आहे. उद्या जेव्हा तुम्ही बोजनूर्दला याल तेव्हा माझे अतिथि बनून मला धन्य करा. आपण माझे प्रिय पाहुणे आहा. मी आपलें अत्यंत प्रेमाने स्वागत करीन.” ते फारच श्रद्धापूर्वक बोलत होते. फारशी भाषा किती गोड, किती कोमल, आणि किती मनोहर आहे याची प्रचीति त्यांच्या एकेका वाक्यावरून होत होती.

दुसऱ्या दिवशीं २५ मैलांचा रस्ता आम्ही पार केला. दिवसभर पाऊस पडत होता. आमच्या जोडचाला शेर-शेर चिखल माखला गेला होता. सारा रस्ता चिखलाचा होता. त्या दिवशीं आम्ही जितके थकलो तितके पूर्वी कधी थकलो नव्हतो. दिवसभर काहीहि खायला मिळालें नाही. रस्त्यातच रात्र पडली. दुरून जेव्हा बोजनूर्द शहराचे चमचम करणारे विजेचे दिवे दिसले तेव्हा वाटलें अजूनहि तासभर चालावें लागेल. थंडगार हवेच्या माऱ्यात व अंधाऱ्या रात्रीत पावसात चालत असलेले प्रवासी पाहून सरसर करीत एक ‘कार’ आमच्या जवळ येऊन रुकली. “कारमधे बसाल ? कोठे जायचें आहे ?” एकाच वेळीं दोन प्रश्न ! अंधार आणि पाऊस ! त्यांतच वाऱ्याचा वेग ! आम्ही म्हटलें: “आम्ही बोजनूर्दला जात आहो.” “गाडीत बसा. शहर अजून दोन तीन मैल आहे.” “आपण पुढे व्हा. आम्ही पायीं चालत येऊ.” आमचें उत्तर ऐकून कारवाला मनातल्या मनात कदाचित् आम्हाला पागल समजून

पुढे निघून गेला. आम्हाला वाटलें, या कठिण समयीं ही 'कार' आमची परीक्षा घ्यायला आली होती !!

खूप थकलेलो आम्ही जेव्हा बोजनूर्दला पोहोचलो तेव्हा आमचे यजमान आमच्या वाटेकडे मोठचा व्याकुळतेने डोळे लावून बसले होते. आम्ही पोहोचताच त्यांनी इराणच्या उत्तम गालिच्यांनी सजविलेल्या खोलीत आमची उतरण्याची व्यवस्था केली. उत्तम मद्य मागविलें. पण आम्ही जेव्हा सांगितलें की आम्ही मद्य पूर्वी कधी प्यालो नाही व पीत नाही, तेव्हा ते आश्चर्यचकित होऊन म्हणाले: "या थंड देशात याची फार जरूर असते. बरं, आपण पिणार नाही. तर मीहि आज पिणार नाही. पण याच्या शिवाय इकडे काम निभू शकणार नाही तुमचें ! खास करून रशियात तर व्होडका फारच जरूरीची असते." असो. दिवसभराचा अत्यंत थकवा व उपास, जेव्हा आम्ही भोजन केलें तेव्हा गेला व गरम लेपामधे झोपल्याबरोबर तर क्षणभरात मस्त झोप लागली.

## अणुबॉंब व विवाह

आम्ही गोंबद-ए-काबुस शहराचे एक रिटायर्ड कप्तान व खूप धनवान सज्जन श्री. हुनरवर यांच्या घरीं पाहुणे होतो. रात्रभर त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा झाली. सकाळीं आम्ही निघालो तेव्हा ते म्हणाले: "तुम्ही मला आपला भाऊ समजा. हें घर आपलेंच आहे. तुम्ही आता गावोगाव पायीं फिराल. कोणी तुमचें 'मिशन' समजेल, कोणी नाहीहि समजणार. म्हणून तुम्ही काही रकम जवळ असू द्या. संकोच नका करू. आपण याचा स्वीकार कराल तर मी स्वतःला धन्य समजेन. मी तर शिकारीच्या आपल्या छंदावर हजारो खर्च करीत असतो. या पुण्य-कार्यात माझी थोडी मदत झाली तर मला फार आनंद वाटेल." पण आम्ही त्यांना आमच्या 'मिशन' ची गोष्ट समजावली की "अण्वस्त्रांच्या व त्यांच्या तयारीच्या विरोधात एक प्रतीक म्हणून आम्ही पैसा जवळ न ठेवण्याचा व पायीं चालण्याचा निश्चय केला आहे. पुन्हा आपल्यासारखे लोक सर्व ठिकाणीं आमच्यावर प्रेम करतील. आपण चिंता करू नका.

आपल्या सारख्या वडील मंडळींचा आशीर्वादच आमचें सर्वांत मोठें धन आहे, आणि शिदोरी सुद्धा. आम्हाला आणखी जास्त काही नको."

त्यांचा निरोप घेऊन आम्ही निघालो होतो तो मोटारीचे 'पार्ट' विकणाऱ्या एका मोठ्या दुकानात बसलेल्या एका तरुणाच्या नजरेशीं आमची नजर भिडली. तो तरुण आपल्या चष्म्या आडून आमच्याकडे पाहात काही विचारात होता. आम्ही आमच्या नेहमीच्या सरावाप्रमाणें झपझप पावलें टाकीत पुढे निघूनहि गेलो. इतक्यात मागून एक माणूस सायकलीवरून आला व त्याने आम्हाला दुकानावर चलण्याचा आग्रह केला. आम्ही त्या तरुणाच्या प्रथम दर्शनानेच इतके प्रभावित झालो होतो की ३०० पावलें मागे जाऊन त्याला भेटण्याचा लोभ आवरू शकलो नाही.

दुकानाच्या दाराजवळ वाट पाहणाऱ्या त्या तरुणाला आम्ही भेटलों तेव्हा आम्हाला वाटलें, जणू आम्ही नेहमीचेच मित्र आहोत. हा तरुण गांधींचा भक्त होता. आणि अण्वस्त्रांचा भयंकर शत्रु. त्याने स्वतःचा विवाह न करण्याचें कारण सांगतांना म्हटलें की या असुरक्षित जगात मी प्रजोत्पादन करू इच्छित नाही. आम्ही श्री. मानुचेर नांवाच्या या तरुणाबरोबर दोन तास घालवले. श्री. मानुचेरने आम्हाला म्हटलें: "तुमच्या बरोबरच मी निघावें असें माझें मन म्हणतें आहे. पण काही विचित्र जबाबदाऱ्या व परिस्थितीमुळे मी अडकून पडलो आहे. तुमची सर्व प्रकाराने मदत करणें आमचें कर्तव्य आहे. तुम्ही जें कार्य करून राहिला आहात तें कोणत्या एका देशाचें, एका वर्गाचें, किंवा जातीचें नाही. सर्वांच्यासाठी आहे. तुम्ही केवळ भारताचे प्रतिनिधि नाही, तर आम्हा सर्वांचे आहात." त्या तरुणाची तीव्रता व जागरूकता यांनी आम्हाला मोहिनी घातली. असे तरुण एखाद्या दिवशीं सर्व काही सोडून कार्यक्षेत्रांत उतरू शकतात.

## शाकाहार की मनोहिंसा

शाहपसन्द मधे आम्ही एका अगदी साधारण मध्यम स्थितीच्या परिवारात अतिथि होतो. आमच्या आगमनामुळे ते इतके प्रसन्न झालें होते की सर्व प्रकाराने आम्हाला आराम मिळावा या दृष्टीने ते आमचें

आतिथ्य करण्याच्या प्रयत्नात होते. आमच्या यजमानांच्या पत्नी तर आम्ही पोहोंचल्या क्षणापासूनच आमच्या सेवेला लागून गेल्या होत्या. त्या माउलीने आपली सारी कला खर्चून आमच्यासाठी एक खास प्रकारचा इराणी पुलावा तयार केला. त्या पुलावात तिने सुवासासाठी व स्वादासाठी मांसाचे काही तुकडेहि टाकले. हार्दिक श्रद्धेने आणि अत्यंत प्रेमाने तिने आम्हाला तो पुलावा वाढला. आम्हाला त्यात मांसाचे तुकडे असलेले दिसले. आम्ही त्यांना म्हटलें : "माफ करा. आम्ही शाकाहारी आहो. म्हणून हा पुलावा आम्ही खाऊ शकणार नाही." बस. आमचें हें म्हणणें ऐकताच यजमानांच्या पत्नीचा चेहरा खाडकन उतरला. बिचारी निराश होऊन गेली. आम्हीहि मोठ्या धर्म-संकटात पडलो. त्या भगिनीचा तो उतरलेला चेहरा पाहून मला स्पष्ट अनुभवाला आलें की आमचा शाकाहार तिच्या हृदयावर खोल आघात करीत आहे. केव्हा केव्हा अहिंसेने कसा असंतोष निर्माण होतो याचा अनुभव मला आला. आम्ही शेवटीं पुलावा खाल्ला नाही. दूध-साखरे बरोबर भाकरी आणि त्यानंतर लाल भडक रंगाचें गोड कलिंगड खाऊन आम्ही त्यांची क्षमा मागितली. राहून राहून तिचा निराश चेहरा समोर येत होता. ती भगिनी तर आमच्याशी अगदी असें वागत होती की जणू काही अनेक वर्षांनी एखादा वियोगी भाऊ पुन्हा भेटला असावा ! ती म्हणाली : "बरें, असो. तुम्ही मांस खात नाही हें ठीक आहे. ते मांसाचे तुकडे काढून टाका. मग पुलावा खायला काय हरकत आहे?" मग पुन्हा म्हणाली : "तुम्हाला इतका लांबचा प्रवास करायचा आहे. दुबळें कृश शरीर. किती किती भयंकर थंडीशी सामना करावा लागेल ! हें कठिण व्रत कशाला घेऊन ठेवलें ?" पण आम्ही विस्तारपूर्वक अहिंसेची गोष्ट समजावून सांगताना शाकाहाराचें कारण समजावलें.

## बिस्किटाचा डबा

आम्ही चालूनच राहिलो होतो. इतक्यात हलकेच एक जर्मन कार आमच्यापाशी येऊन थांबली. आतून एक ३५ वर्षांचा आकर्षक चेहेऱ्याचा तरुण बाहेर आला व विचारू लागला: "तुम्हाला कुठे जायचें आहे?

आपण प्रवास करीत आहा ? " आम्ही सांगितलें: " आम्ही पदयात्री आहो आणि पायीं गोरगानला जात आहो. " " पायीं का ? माझ्या गाडीत बसा. " त्यावर आम्ही म्हटलें: " आम्हाला वाईट वाटतें की आपल्या या निमंत्रणाचा आम्ही स्वीकार करू शकत नाही. दिल्लीपासून येथपर्यंत आपल्या सारख्या सद्‌गृहस्थांकडून मिळणाऱ्या निमंत्रणांचा अस्वीकार करीत आम्ही पायीं चालत आलो आहो आणि असेंच आणखी दूर पायीं चालावयाचें आहे. " त्यांना आमच्या गोष्टीत मोठी गोडी वाटली. म्हणाले: " तुमच्या संगतीत काही काळ घालवावा अशी इच्छा होते. तुम्ही गोरगानला माझे अतिथि व्हाल ? " आम्ही म्हणालो: " कबूल, आम्ही येऊ. " आपल्या घराचा पत्ता देऊन ते निघून गेले.

दुसऱ्या दिवशीं आम्ही गोरगानला पोहोचलो, व वरील तरुण श्री. कतांचीच्या घरीं अतिथि झालो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं निघण्याची आम्ही तयारी केली तो त्यांची पत्नी आग्रह करू लागली. म्हणाली: " तुमच्या येण्याचा लाभ काय जर तुम्ही माझ्या हातचें भोजन न करताच जाल ? दुपारपर्यंत तर तुम्हाला राहावेंच लागेल. " काल रात्रीं उशीर झाल्यामुळे आम्ही हॉटेलमधे भोजन केलें होतें. म्हणून या बाईंचा आग्रह आम्हाला टाळता येईना. सकाळीं निघायचें स्थगित केलें. त्यांनी आपल्या अनेक मित्रांनाहि आमच्या भेटीसाठी म्हणून भोजनाचे वेळीं आमंत्रण दिलें होतें. त्या भगिनी म्हणाल्या: " कुठे भारत, कुठे इराण ! त्यातहि गोरगान एका कोपऱ्यात. तरीपण आम्ही किती भाग्यशाली की आपण लोक इथे आलात ? हा मैत्रीचा आरंभ चिरस्थायी होवो ! तुम्ही आपलें पवित्र ध्येय पूर्ण करून भारताला पोहोचा ! " माहीत नाही, किती तरी वेळ सद्‌गदित होऊन ती आमच्याकडे पाहत राहिली आणि काही-न-काही बोलत राहिली. आम्ही जेव्हा दुपारनंतर निरोप घेऊ लागलो तेव्हा श्री. कतांची हलकेंच आमच्या कानात म्हणाले: " तुम्ही माझ्या बंधूसमान आहात. मुळीच संकोच करू नका. हे थोडे ' तुमन ' ( रुपये ) जवळ असू द्या. " आम्हाला त्यांचें हें हार्दिक प्रेम व भोळी माया मिळाल्यामुळें आम्ही स्वतःला धन्य मानीत होतो. ही त्यांची सहानुभूति सर्व त्या

'मिशन' बद्दल व आन्दोलनाबद्दल होती जें युद्ध व अण्वस्त्रांविरुद्ध चालू होतें व ज्याचें आम्ही अंग होतो. आही त्यांना समजावून सांगितलें की "काय आपल्या या अपार प्रेमापेक्षाहि अधिक मौल्यवान् काही असू शकतें? तुमच्या सहानुभूतीचें धनच आम्हाला प्रगति करायला शक्ति देईल." पण त्यांना मोठी चिंता वाटत होती. कदाचित् आम्हाला रस्त्यात भोजन मिळतें न मिळतें? काही अडचण पडली? त्यांच्या मनाचें समाधान होत नव्हतें. शेवटीं निघताना दोन पौंडाचा बिस्किटाचा एक डबा जबरदस्तीने त्यांनी आम्हाला दिलाच. व आम्ही त्याचा स्वीकार केला. खरेंच! सर्वत्र प्रेम-गंगा कशी वाहून राहिली होती!!

## जोड्यांची भेट आणि मुलीला मागणी

मागच्या पडावावर आम्हाला श्री. अब्बास खियानी व त्यांचे बंधु भेटले होते. ते आपल्या घरीं येण्याचें निमंत्रण देऊन गेले होते. एका बाजूस मध्य आशियाचें सर्वात उंच देमाबंद शिखर १८ हजार फुटांच्या उंचीवरून आकाशाशी गोष्टी करीत आहे, दुसऱ्या बाजूला समुद्रसपाटी-पासून ५० फूट खोल पृथ्वीवरील सर्वात मोठें सरोवर 'कास्पियन-समुद्र' लाटांनी उचंबळून राहिलें आहे. या दोहोंच्या मध्यभागीं रशियन सरहद्दीवर बेहशहर वसलेलें आहे. तेथे सुमारे दोन तासांसाठी आम्ही श्री. अब्बास खियानींचे अतिथि झालो होतो. गप्पा मारीत बसलो असता त्यांची नजर आमच्या जीर्ण जोड्यांकडे गेली. त्यांच्या मनात काय आलें कोण जाणें, ते अचानक उठले व जवळच्याच दुकानातून दोन नवे जोड्यांचे जोड घेऊन आले. आम्ही म्हणालो: "सध्या यांनी काम निभतें आहे. आपण चिंता नका करू." तर म्हणाले: "मलाहि काही सेवा करण्याची तर संधि द्याल. तुम्हीहि कोणातरी मित्राकडून जोडे घ्यालच. म्हणून एवढी सेवा माझीहि घ्या." ते काही ऐकेनात. आम्हीहि त्यांचा आग्रह मान्य केला. आम्हाला या प्रवासात जोडाच सर्वात जास्त जरूरीची, सहायक व उपयुक्त वस्तु होती. पण एक जोडा एक हजार मैलांपेक्षा जास्त टिकत नव्हता. दिल्लीहून घेतलेला जोडा काबुलमधे खलास झाला व काबुल मधे घेतलेला जोडा इथे समाप्त झाला. आम्ही तर पूर्णपणें जनाधारित होतो. आम्हाला

भोजन पाहिजे ,किंवा कपडे, जोडे, साबू, पोस्टेज, कागद, ं
पाहिजे, तें सर्व काही सरळ वस्तूंच्या रूपांतच आम्ही ले
होतो.

श्री. अब्बास खियानींचे एक मित्रहि तेथे होते व ते आमच्याशी गोष्टी करीत होते. गप्पा-गोष्टी चालता चालता आमच्या गोष्टी पोहोचल्या व्यक्तिगत-जीवनापर्यंत, आणि त्यांनी प्रश्न केला: "काय आपण लग्न केलें आहे ? " श्री. प्रभाकर तर अविवाहित होते पण मी म्हणालो: "मी माझ्या मुलीला घरीं सोडून आलों आहे. आता ती सुमारें ६ महिन्यांची झाली असेल. " त्यावर ते गृहस्थ म्हणाले: "माझें प्रथम अपत्य एक पुत्र आहे. त्याचें नांव आहे–हमीद. त्याचें वयहि एक वर्षापेक्षा कमी आहे. आंतर-राष्ट्रीय मित्रता व भारत-इराण मैत्री दृढ करण्यासाठी तुम्ही आपल्या मुलीचा विवाह माझ्या पुत्राबरोबर कराल काय ? " विलक्षण प्रश्न होता ! मी म्हणालो: "माझी मुलगी व आपला मुलगा आप आपल्या विवाहाच्या बाबतीत स्वत:च निर्णय घेतील, माझ्याकडून काही अडथळा उभा होण्याचा प्रश्नच नाही." "नांव काय तुमच्या मुलीचें ?" त्यांनी विचारलें. "साधना" मी सांगितलें. परंतु या गृहस्थांना 'साधना' नांव उच्चारणें कठिण झालें. म्हणून ते म्हणाले: "आपली हरकत नसली तर मी तिच्यासाठी एक नवें नांव सुचवू इच्छितो." आणि त्यांनीं साधनेचें नांव 'पाकीजा' ठेवलें. किती भावनाशील तरुण होता तो, आणि किती स्नेह होता त्याच्या मनात भारता विषयीं ! !

## 'भाईजी' बरोबर

तेहरान मधील १६ दिवसांचा आमचा मुक्काम आम्हाला एक मधुर स्मृतिरूप राहील. भारतात बसून आम्ही ही कल्पनाहि करू शकत नव्हतो की तेहरान सारख्या अति आधुनिक शहरात, आमच्या खिशात एक पैसाहि नसता इतक्या दीर्घ कालपर्यंत आम्ही राहू शकू. पण उच्च विचार-आचारांनी परिपूर्ण असें आदर्श जीवन व्यतीत करणाऱ्या भाई मख्खन-सिंहासारखे यजमान मिळाल्यामुळें ती गोष्ट सहज शक्य झाली.

सफेत पगडी व लांब दाढी, नेहमी हसरा चेहरा आणि गंभीर नजर 'भाईजीं' चें व्यक्तित्व समजायला पुरेशी मदत करतात. हां, ते तेहरानमधे 'भाईजी' नांवानेच ओळखले जातात. तेहरानमधे शेकडो भारतीय व्यापारी आहेत आणि त्यांच्यासाठी, भाईजी, खरेच भाईजी आहेत. कोणताहि भारतीय कशाहि कठिण प्रसंगीं भाईजींची मदत सहज प्राप्त करून घेतो. कोणी आजारी पडला, किंवा कोणाच्या घरचे लोक भारतात गेले असतील, किंवा कोणाला आणखी काहीतरी मदत हवी असली तर भाईजी कडून मिळेल. संध्याकाळीं भाईजी आपल्या कारमधून निघतील आणि अशा घरांवरून एक चक्कर लावून त्यांची चौकशी करतील की "सर्व काही ठीक आहे? काही हवें आहे?" इत्यादि. सेवेचा असा आदर्श-व्यवहार पाहून कोणीहि त्यांच्या पुढे सहज नत-मस्तक होतो.

तेहरानच्या व्यापारी भारतीयांमधे ते बहुधा सर्वांहून अधिक धनवान आहेत. पण धनाचा गर्व त्यांना कधी शिवला नाही. त्यांना पाहून कोणाला वाटणार नाही की ते एक श्रीमंत गृहस्थ आहेत. फार साधें भोजन, अगदी साधा पोषाख, आणि तशीच साधी राहणी. रोज आपल्या हाताने कपडे धुताना पाहून लोक म्हणतात: "परदेशात आपल्यासारखा श्रीमान माणूस आपल्या हाताने कपडे धुतो ही शोभनीय गोष्ट नाही." पण भाईजींनी ठरविलेली जीवन मूल्येंच त्यांची शोभा आहे. "धनाचा उपयोग मी स्व-सुखासाठी व भोग-विलासासाठी करणें हा माझा अधिकार नाही," असें ते म्हणतात. आणि खरोखर समाजाचे एक ट्रस्टी म्हणून काळजीपूर्वक धनाचा उपयोग करतात. सामाजिक कार्यांत ते मुक्त-हस्ताने द्रव्य देतात आणि आजच्या सामाजिक नियमांनी मान्यता दिलेलीं साधनें सोडून अन्य अनैतिक उपायांनी धन-प्राप्तीचा प्रयत्न करीत नाहीत.

क्षणाक्षणाचा पूर्ण उपयोग करणाराच वेळेचें बंधनहि निभवू शकतो. भाईजी सगळा दिवस कार्यमग्न असतात. सर्व कार्यक्रम ठरल्याप्रमाणें चालतो. ते थोडाहि वेळ व्यर्थ घालवीत नाहीत. त्यांचा दिवस पहाटें ४ वाजता सुरू होतो व रात्रीं १० वाजता संपतो. आम्ही त्यांच्या घरीं

ओंपर्यंत होतो, रोज सकाळीं बरोबर ७ वाजता ते आपल्या हातानें नास्ता तयार करून आम्हाला खाऊ घालत होते. आम्हाला मोठा संकोच वाटे की भाईजी आमच्यासाठी इतक्या सकाळीं स्वत: नास्ता तयार करतात. पण ते म्हणायचे : "तुम्ही स्वकर्तव्यासाठी आपलें जीवन झिजवीत आहात, मी तुमची थोडी सेवा केली तर काय मोठी गोष्ट झाली? हें तर माझें कर्तव्यच आहे."

भाईजींच्या देखरेखीखाली एक भारतीय शाळाहि चालते. भाईजी आपल्या व्यापार-धंद्यांतून वेळ काढून रोज १ तास तेथे शिकवतात. तेहरान सारख्या शहरांत त्यांनी भारतीय मुलां-मुलींच्या शिक्षणासाठी फारच उत्तम व्यवस्था केली आहे. ते गुरु नानकांचे खरे भक्त आहेत. आणि स्वत:च्या जीवनात गुरु नानकांचे सिद्धांत उतरविण्यासाठी निरंतर प्रयत्नशील असतात. ते समाजाचे असे सेवक आहेत, जो सेवेच्या ऐवजी समाजाकडून कोणत्याहि प्रकारचा मोबदला चाहत नाही, तसेंच कीर्तीचीहि अपेक्षा ठेवीत नाही. 'सेवेसाठीं सेवा' हें त्यांचें जीवन-सूत्र आहे. त्यांच्या जीवनांत साधेपणा व नम्रता यांचा सुंदर समन्वय साधला आहे.

भाईजींच्या बरोबर आम्हाला राहण्याची संधि मिळाली हें आमचें भाग्यच आम्ही समजतो. ते म्हणत होते : "तुमच्यासारखे तरुण अहिंसा व शान्तीचा मंत्र घेऊन बाहेर पडले आहेत हेंच अहिंसेंत किती मोठी शक्ति भरली आहे याचें प्रमाण आहे. भले, आज जगात युद्ध व शस्त्रास्त्रांची स्पर्धा चालू असो, आणि तुमचें म्हणणें कोणी न ऐको, पण तुमचे प्रयत्न कधी व्यर्थ जाणार नाहीत."

## शिक्षित शेतकऱ्याच्या घरीं

तेहारानपासून ४० मैल दूर एक गांव आहे, कमालाबाद, आणि तेथें ८ लाख चौरस मिटर जमिनीचें एक मोठें 'फार्म' आहे. इराणच्या दृष्टीनें, जिथें लोकसंख्या कमी व जमीन अधिक आहे, हें काही मोठें फार्म म्हणता येणार नाही. तरी याला एक चांगलें व मोठें फार्म म्हणू शकू. हें फार्म चालवणारे श्री. रजा यांच्याबरोबर आम्ही एक दिवस

घालवला. हा दिवस आमच्या इराण-यात्रेतील एक संस्मरणीय दिवस राहील.

आम्ही जेव्हा श्री. रजांना प्रथम भेटलो तेव्हा आम्हाला कोणत्याहि प्रकारें कल्पना आली नाही की ही व्यक्ति एका मोठ्या फार्मची मालक असावी. तेहरानमधे यांचा एक मोठा वाडा आहे व तेथे २ मोटरी आहेत. अशा प्रकारच्या श्रीमान व्यक्तीला सामान्यत: मोठ्या थाटमाटात राहणें आवडतें पण श्री. रजा गुडघ्यापर्यंत एक रबरी बूट घालून मातींत काम करून राहिले होते. त्यांच्या शरीरावर चिखलाचे अनेक डाग पडले होते. श्री. रजा म्हणत होते : "प्रत्येक माणसाला पूर्ण मेहनत केल्यावरच खाण्याचा अधिकार आहे. शेतात काम करा की कचेरीत करा, काम म्हणजे कामच." कृषि-कॉलेजचा डिप्लोमा मिळवून व युरोप-आशियातील अनेक देशांचें भ्रमण करून एक तरुण निश्चयपूर्वक सकाळपासून सायंकाळपर्यंत खूप श्रम करतो अशीं उदाहरणें फार कमीच मिळतील; श्री. रजा म्हणाले : "इराणच्या शिक्षित लोकांत भयंकर बेकारी आहे. कारण त्यांना श्रमाचें काम नको तर ऑफीसांत बसून ते 'बाबू' बनूं इच्छितात." गप्पा-गोष्टींत आम्ही श्री. रजा यांच्या प्रगतिशील विचारांचा सुगंध अनुभवीत होतो. ते एक किसान आहेत, मजूर आहेत; पण गांधी, टॉलस्टॉय व हेमिंग्वे यांच्या ग्रंथांनी त्यांची खोली सजलेली आहे. फारशी गालिच्यांची श्री. रजा यांना जितकी आवड आहे तितकीच या विचारक-त्रयींच्या पुस्तकांचीहि. म्हणून त्यांचें घर या दोहोंच्या सजावटीचा एक नमूना आहे. या ग्रंथांचें नुसतें वाचन ते करीत नाहीत तर आपलें व आपल्या परिवाराचें जीवन त्या पायावर उभें करीत आहेत. श्री. रजा आम्हाला म्हणाले : "तेहरानमधे माझा मोठा वाडा आहे, पण तेथे माझें मन लागत नाही. मोठ्या शहरांत विलासी व चैनीच्या वातावरणांत अनेक दोषांचा व दुर्गुणांचा जन्म होतो, आळस वाढतो, थाट-माट वाढतो. तेहरानमधील जीवन नाच, सिनेमा, कॉफी हाऊस आणि क्लबांच्या आसपास फिरत असतें. हें सर्व मला पसंत नाही. मुलांनाहि तेथे खराब संस्कार लागतात. म्हणून इतक्या दूर येऊन जंगलांत राहतो, श्रम करतो, आणि आपल्या परिवाराबरोबर आनंदपूर्ण

जीवन घालवतो. दिवसभर शेती इत्यादि कामांत मग्न राहिल्यामुळे मला शहराची आठवणहि होत नाही."

धर्माच्या बाबतीतहि त्यांचा दृष्टिकोण पुष्कळ स्पष्ट व संतुलित होता. त्यांच्या दृष्टीनें भूत, भविष्य व वर्तमान गोष्टीसाठी कोणता एकच नियम अपरिवर्तनीय व अंतिम मानला येत नाही. धर्म अपरिवर्तनीय बनला म्हणून तो आजच्या वैज्ञानिक दृष्टिकोणाशी जुळूं शकत नाही. ते म्हणाले: "मी माणूस आहे व माणुसकीशिवाय माझा दुसरा कोणताहि धर्म नाही."

श्री. रजाप्रमाणेच श्रीमती रजासुद्धा फार प्रगतिशील व गोड स्वभावाच्या भगिनी आहेत. त्यांच्या प्रेमपूर्ण व्यवहारामुळे व आतिथ्यामुळे आम्हाला वाटे की जणू काही यांचा पूर्ण परिवारच आमचा फार जुना मित्र आहे. श्री. रजांना एक मुलगा—सईद व दोन मुली आहेत. मुलींचीं नांवें त्यांनी सीमा व शीला ठेवलीं आहेत. संस्कृत नांवें!

श्री. रजा आपल्या मुलां-मुलींचें जीवन अत्यंत मोकळ्या, नैसर्गिक व श्रमपरायण वातावरणात फुलवीत आहेत. मुलांच्या जीवनांत मानवी मूल्यें उतरावीत हाच त्यांचा प्रयत्न आहे. ते आपल्या मुलांवर अत्यंत प्रेम करतात. खऱ्या अर्थाने ते या मुलांचे 'नयी तालीम' चे शिक्षक आहेत.

आपल्या शुभेच्छा प्रगट करतांना श्री. रजा आम्हाला म्हणाले: "या जगांत जर आम्ही सुंदर, बुद्धिमान, व स्वस्थ मानव पाहू इच्छित असलो तर ताबडतोब अणु-प्रयोगांवर प्रतिबंध लावला पाहिजे. जेव्हा मी माझ्या या तीन कोवळ्या मुलांचें भवितव्य अण्वस्त्रांच्या वातावरणात गुरफटलेलें पाहतो तेव्हा माझें हृदय कंपित होतें! अण्वस्त्रांच्या विरुद्ध अशा तीव्र जन-आंदोलनाची जरूर आहे की ज्यामुळे या बड्या धेंडांना (शक्तींना) नाक मुठीत धरून या शस्त्रास्त्रांचें विसर्जन करणें भाग पडेल."

## कारमधें चला की, इथे कोण पाहतोय?

एक अत्यंत थंड प्रभात! मेघांनी भरलेलें आकाश आणि थंडीची लाट पसरलेली! आम्ही दोन प्रवासी नखशिखांत सारें शरीर गरम ऊनी

कपड्यांनी लपेटून सडकेनें चाललो होतो. अशा थंडींत सडकेने चालत जाणार कोण! पण आम्ही जात होतो. सूं-सूं करणारी हवा जर थांबायचें नांव काढीत नव्हती तर आम्हींहि कां थांबावें? इतक्यांत एक छोटया जर्मन कारच्या हॉर्नचा आवाज आमच्या कानावर पडला. एक पुरुष आणि एक स्त्री आम्हाला विचारू लागले: "कुठे जाणार?" "आम्ही गाजविन-ला जात आहो, तेथून पुढें रशियाकडे जाऊ." आमचें हें उत्तर ऐकून त्या महिलेनें अत्यंत मधुर आवाजांत म्हटलें: "आम्ही सुद्धा गाजविनला जात आहो. खूप कडक थंडी पडली आहे, कारमधें या की."

आम्ही म्हटले: "आम्ही भारताहून येथपर्यंत सुमारे अडीच हजार मैल पायीं चालत आलो आहो आणि पुढे मास्को व वॉशिंगटनपर्यंत पायींच जाऊ असा आमचा 'पण' आहे."

"होऽऽ, आम्ही वर्तमानपत्रांत तुमच्याबद्दल वाचलें होतें. तुम्ही अण्वस्त्रांच्या विरुद्ध आहा आणि मास्को-वॉशिंगटनला जात आहा." पुरुष असें म्हणत कारच्या बाहेर आला.

हे गृहस्थ होते श्री. रहीमी रजावी. गाजविन शहराचे प्रतिष्ठित नागरिक.

श्री. रहीमी म्हणाले: "तुमचें म्हणणें बरोबर आहे. पण कारमधून चला की; कोणाला समजणार नाही. इथे कोण पहातोय? भारतांत जावून मी लोकांना सांगणार नाही की तुम्ही लोकांनी पद-यात्रेचा भंग केला आहे म्हणून! अजून गाजविन २५ मैल दूर आहे. तासभरांत पोहोंचून जाऊ, नाहीतर या थंडीत दोन दिवस रखडत रहावें लागेल." त्यांचें हें म्हणणें ऐकून आम्हाला हंसू लोटलें.

"दोन दिवस नाही, आम्हाला तर दोन वर्षें असेंच चालावयाचें आहे. आणखी, कोणाला दाखवण्यासाठी आम्ही पैदल चालत नाही आलो! आम्ही स्वतःच हा निश्चय केला आहे. आम्ही तुमच्या कारमधें बसू तर कोणी आम्हाला रोकणारहि नाही. पण जोपर्यंत जनतेचा शांति-संदेश आम्ही रशिया-अमेरिकेपर्यंत पोहोंचवणार नाही तोपर्यंत शक्यतो पायीं चालण्याचा

आमचा निश्चय आहे. ही पायीं-यात्रा अण्वस्त्रांच्या विरुद्ध एक सत्याग्रह आहे. ''

त्यांच्याशीं बराच वेळपर्यंत गोष्टी झाल्या. त्यांनीं विचारलें : "तुम्ही कोण लोक आहा? भारतात काय उद्योग करतां?" आम्ही सांगितलें : "आम्ही गांधींचे शिपाई आहो आणि भारतांत समाज-सेवेचें काम करतो." श्री. रहीमींनी एकदम आपल्या पत्नीला म्हटलें : "ओहो! हे त्या गांधींचे शिपाई आहेत ज्या गांधींनी भारताच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ कित्येक आठवडे पर्यंत अन्न खाल्लें नाही. हे लोक काही कारमधें बसणार नाहींत." त्यांची पत्नी म्हणाली : "ठीक आहे. उद्या गाजविनला याल तेव्हा तर आमचे अतिथि व्हाल ना?" श्री. रहीमी म्हणाले : "मला तर थंडी वाजून राहिली आहे. उद्या तुम्ही आमच्या घरीं या, तेथेच मुक्काम करा म्हणजे पोटभर बोलू."

आम्ही जेव्हा श्री. रहीमींच्या सदैव प्रसन्न वातावरण असणाऱ्या घरीं पोहोंचलो तेव्हा ते सायंकाळचा नमाज पढत होते. ते खालीं वाकलेले होते. नमाजामधे व्यत्यय येऊ नये म्हणून आम्ही बाहेर व्हरांड्यातच उभे राहिलो. जसें त्यानी डोकें वर उचललें तों आम्ही त्यांच्या दृष्टीस पडलो. समजत नाही, त्यांना कसा भावोद्रेक झाला, नमाज मधेच सोडून ते बाहेर आले आणि त्यांनी आम्हाला आलिंगन दिले. आम्ही त्यांची क्षमा मागितली कीं आमच्यामुळे तुमच्या नमाजांत व्यत्यय आला; तर म्हणाले : "आमच्या पैगंबरानें, सत्यानें वागणाऱ्याला ईश्वराचा सेवक म्हटलें आहे. काल मी जेव्हा तुम्हाला म्हणालो कीं कारमधून आमच्या बरोबर चला, कोणाला पत्ता लागणार नाही, तर आपण लोक कारमधे आला नाहीत. तुम्ही सत्याने वागणारे आहा. म्हणून तुमचें अतिथीच्या रूपांत स्वागत करणें हाच खरा नमाज आहे."

रहीमी अत्यंत विनोद-प्रिय व अतिथि-प्रेमी आहेत. ते आपल्या मुलांबाळांवर जितके प्रेम करतात तितकाच त्यांचा आदरहि करतात. शहनाज व महनाज नांवाच्या दोन कन्या आणि श्रीमति रहीमी आमच्या आतिथ्याच्या कामाला लागल्या. बदाम, अक्रोड, किसमिस, पिस्ते आणि सफरचंद-संत्रीं यांचा आम्ही नास्ता केला. आमच्यासाठी विशिष्ट

प्रकारचें इराणी पद्धतीचें मांस शिजविण्याची योजना बनत होती. पण आम्ही सांगितलें की मांस आम्हाला अगदी वर्ज्य आहे. तें ऐकून सगळ्या घरवाल्यांना मोठें आश्चर्य वाटलें. श्री. रहीमी आपल्या मुलींकडे वळून म्हणाले : " हे लोक गांधींचे शिपाई आहेत. एक पवित्र मिशन घेऊन घरदार सोडून इतक्या दूर किती परिश्रम करीत आहेत ! पायीं चालणें, जवळ पैसा न राखणें, सिगारेट नाही, मद्य नाही, मांस नाही. अशा तरुणांची भावना आणि त्यांचा प्रयत्न अवश्य सफल होईल. " नतर आम्हाला म्हणू लागले : "तुमच्या सारख्या अभिनव प्रकारच्या अतिथीच्या सेवेचा प्रसंग माझ्यासाठी एक ऐतिहासिक महत्वाची घटना आहे. मी अंतःकरणापासून इच्छितो की तुमचा उद्देश सफल होवो. "

घर काय ! स्नेहाचा सागर होता ! दुसऱ्या दिवशीं सकाळीं आमची निरोप घेण्याची वेळ आली तेव्हा श्रीमति रहीमी म्हणाल्या : " काल रात्रीं आला आणि आज सकाळीं निघून जाल ? अशी अगदी काय घाई आहे ? कमींत कमी एक दिवस तर रहा ! " आमच्या पुष्कळ विनंति-विनवण्यानंतर अत्यंत प्रेमाने श्रीमति रहीमीसह पूर्ण परिवाराकडून आम्हाला जाण्याची आज्ञा मिळाली. वाटत होतें जणू आम्ही आमच्या आईचा, व आपल्या घराचा निरोप घेत होतो. आमच्या या माउलीनें आमच्या खिशांत संत्रीं-सफरचंद भरले. " रस्त्यांत भूक-बीक लागली तर ! " आणि आमच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही जेव्हा सुमारे १२ वाजता साऱ्या परिवारासहित श्री. रहीमी आपल्या कारमधून येऊन गाजविनपासून ८ मैल दूर आम्हाला भेटले. म्हणालें : " आजच्या मार्गांत तुम्हाला गांव नाही मिळणार ! दुपारीं तुम्ही भोजन कुठे कराल याची मला चिंता वाटली. विचार केला, तुमच्या बरोबर रस्त्यांतच 'पिकनिक' ची योजना का न करावी ? " आम्ही काय बोलणार ! वाटलें, जणू काही आम्ही आपलेपणा आणि प्रेमगंगेत सहल करीत आहो ! कुठे भारत आणि कुठे इराण ! पण मानवाची प्रेमगंगा सर्वत्र समान वाहत आहे.

## असे बादशहाला भेटलो

" तुम्हाला आमच्या बादशहाला भेटायला येण्याच्या वेळी काळा सूट घालून यावें लागेल. ही शाही दरबारची परंपरा आहे ! " दरबारच्या वजीराने आमच्याकडे ही माहिती भारतीय वकिलातीमार्फत पाठविली. आम्ही यापूर्वी वजीरांना समक्ष भेटलो होतो. त्यावेळी अशी कोणतीहि गोष्ट निघाली नव्हती. आम्ही आपला साधा सदरा-पायजमा घालूनच गेलो होतो. बादशहाला भेटण्यापूर्वी २४ तास अगोदर जेव्हा आम्हाला ही खबर मिळाली तेव्हा आम्ही भारतीय वकिलातीतील प्रथम सचिवांना म्हणालो : " आम्ही भारताहून पायीं चालत या सुंदर तेहरान शहरापर्यंत याच सदरा-पायजम्याने येऊन पोहोंचलो. हजारो इराणी जनतेला आम्ही याच वेशाने भेटलो. इराणच्या बादशहांच्या दरबारांत सुद्धा आम्ही आमच्या याच वेशाने जाऊ. बादशहाला भेटायला ' आम्ही, जात आहो, आमचा 'वेश' नाही. " आमची ही गोष्ट ऐकताच आमच्याजवळ बसलेला एक भारतीय मित्र म्हणाला : " तुम्ही का चिंता करता ? तुमच्यासाठी व तुमच्या सोबत्यासाठी काळचा सुटाची व्यवस्था करून देईन. " मी तत्क्षणीं उत्तर दिले : " नाही ! प्रश्न काळचा सुटाच्या व्यवस्थेचा नाही. प्रश्न तर विचार व सिद्धांताचा आहे. आम्ही एक पैसाहि खिशांत न ठेवता दिल्लीहून येथपर्यंत पोहोंचलो. आमचा हाहि निश्चय आहे की आम्ही आमची संपूर्ण शांति-यात्रा पायीं व बिनपैशाने करूं. मग आम्ही बादशहाला भेटण्यासाठी तुम्हाला काळा सूट खरेदी करायला सांगणें काय योग्य आहे ? " माझे सोबती प्रभाकरहि म्हणाले : " बापू गोलमेज-कॉनफ्रन्समधे भाग घ्यायला लंडनला गेले होते तेव्हा आपल्या पंचा व उपरण्यांतच गेले होते ! " अखेर वकिलातीच्या सचिवांनाहि, जे स्वत: उत्तम सूट घालून बसले होते, आमच्या गोष्टीने प्रभावित केलें. ते म्हणाले : " तुमचें म्हणणें योग्य आहे. तुम्ही जो पोषाख भारतांत घालता तोच घालून बादशहांना भेटावें ही गोष्ट वजीरांना मान्य व्हावी. "

आम्ही आमच्या मनांत ठरवून टाकलें होतें की परंपरेच्या नांवावर आम्हाला पुन्हा काळचा सुटांत येण्याचें सांगितलें गेलें तर आम्ही

शहांना भेटण्याचा विचार सोडून देऊ, पण कोणाजवळ सुटाची भीक मागणार नाही. वकिलातींतील सचिवांनी सारी हकीकत वजीरासमोर ठेवली. अजब मामला होता. असा प्रसंग पूर्वी क्वचितच आला असेल. पुष्कळ विचार-मंथन झाल्यावर आम्हाला सूचना मिळाली की आम्ही आपला सदरा-पायजमा घालून बादशहांना भेटू शकू. आमच्या यजमानांनी त्याच दिवशीं आमचे कपडे 'लांड्री' मधून धुवून आणवले. माझ्या सदरा कमरेजवळ थोडा फाटलाहि होता. पण मजजवळ तोच एक होता. फाटका सदरा घालून भेटायला जाणें बरें वाटत नव्हतें. पण नाइलाज होता.

इराणच्या गरीब लोकांच्या झोंपड्यांतून आम्ही रात्रीं घालवल्या होत्या. आम्ही थोडें थोडें फारशीत बोलायलाहि शिकलो होतो. उमर खैय्याम, शेख सादी, फिरदोसी अशा कवींना जन्म देणाऱ्या इराणच्या भूमीने आम्हाला मोठी प्रेरणा दिली होती. फारशी गालिच्यांच्या कलेने आमच्या मनांत चैतन्याचा संचार केला होता. या काव्य-भूमींत स्वत: इराणच्या शहांनी, आपल्या दरबारी नियमांच्या विरुद्ध, सदरा-पायजमा घालून येणाऱ्या आम्हा दोन भारतीय तरुणांचें आपल्या महालांत स्वागत केलें.

"या काळात सुद्धा आपल्यासारखे तरुण एक उच्च ध्येय घेऊन जगाची पायीं यात्रा करीत आहेत ही फार मोठी गोष्ट आहे. म्हणून अत्यंत गडबडीत असून सुद्धा मी तुम्हा लोकांना भेटण्याची संधि गमावली नाही. तुम्ही अण्वस्त्रांच्या विरुद्ध आणि नि:शस्त्रीकरणासाठी जें कार्य करीत आहांत त्यांत मी आणि माझा सर्व देश नेहमी तुमचा साथ देऊ" शहांनी अत्यंत हळू आवाजात आणि हंसत हंसत आपली शुभ-कामना प्रगट केली. त्यानंतर त्यांनी आमच्या यात्रेतील अनुभव ऐकले. विशेषत: इराणमधे आमच्या यात्रेसाठी कोणत्याहि प्रकारची मदत हवी असल्यास तिची व्यवस्था करून देण्याची तयारी दाखविली. आम्हाला शहांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित केलें. त्यांच्या वागण्यामुळे क्षणभरसुद्धा असें भासलें नाही की ते कोणी बादशाह आहेत. ते म्हणाले : "आम्हाला भूमि-सुधार व अन्य सामाजिक प्रगतीच्या कामांत कितीहि अडचणी असोत पण जमिनीचें वितरण ही या युगाची मागणी आहे. आणि म्हणून मी आमच्या

देशात ही सुधारणा लागू करण्यासाठी कटिबद्ध आहे." त्यांनी भारतात चालू असलेल्या भूदान-ग्रामदान आंदोलनाविषयी जाणण्याची उत्सुकता दाखविली. ते म्हणाले: "विनोबा एक जबरदस्त काम करून राहिले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे आम्हाला मोठी प्रेरणा मिळाली आहे. मी आपल्या स्वत:च्या हजारो एकर जमिनीचें वाटप त्या लोकांना करून टाकलें आहे जे लोक त्या जमिनीवर काम करीत होते."

आमच्या या सर्व गप्पा-गोष्टीत कुडतें-पायजमा कुठे विघ्न उत्पन्न करीत नव्हता. कुडते-पायजमा वापरणारे आमचे पुष्कळसे मित्र परदेशी जातांना नवे सूट शिवविण्यात शेंकडो रुपये खर्च करतात. पण आमच्या अनुभवात आलें की कुडता-पायजमा सुटाप्रमाणें फार 'भाग्यशाली' नसो, पण वाईट नाही. मास्को, बर्लिन, पॅरिस, लंडन, न्यूयॉर्क, टोकियो इत्यादि शहरांच्या सडकांवर कुडतें-पायजमा घालून बेधडक आम्ही फिरत होतो. तेथे ते लोक हा पोषाख फार पसंत करीत. आमचा आपलाच 'हीनगंड' आम्हाला सुटा-बुटाकडे खेंचून नेतो. मे ते आक्टोबरपर्यंत एक ऊनी कुडते व त्यावर जाकिट घालून युरोपात चांगल्या तऱ्हेने निभेल. विशेष थंडी नसते. नव्हेंबर ते एप्रिलपर्यंत ओव्हरकोटाची जरूर लागते. ओव्हरकोटाच्या आत कुडता-पायजमा ( गरम ) काही त्रास देत नाही.

## रशियाचा व्हिसा अशाप्रकारें मिळाला

इराणच्या शहांना भेटल्यानंतर आमचें लक्ष लागलें रशियाच्या यात्रेकडे. पण रशियाचा व्हिसा कुठे मिळाला होता ? परदेशाच्या प्रवासासाठी आपल्या सरकारकडून 'पासपोर्ट' घ्यावा लागतो आणि ज्या ज्या देशांत जायचें असतें, त्या देशांच्या सरकार कडून 'व्हिसा' घ्यावा लागतो. जेव्हापासून आम्ही पदयात्रेला निघालो तेव्हापासून आमच्या समोर हा प्रश्न उभा होता. दिल्लीहून आम्ही फक्त पाकिस्तान, अफगाणिस्तान व इराण यांचे व्हिसे मिळविले होते. पण रशियाचा व्हिसा मिळविणें काही सोपें काम नव्हतें, विशेषत: आम्हाला. कारण आम्ही रशियन जनतेंत रशियन सरकारच्या अण्वस्त्रनीति-विरोधी प्रचार करण्यासाठी व्हिसा मागत होतो. एक कम्युनिस्ट देश, जिथे तथाकथित 'आयर्न कर्टन'

( पोलादी-पडदा ) लागला आहे, आम्हाला गांवोगांव पायीं फिरून अहिंसा व निःशस्त्रीकरणाविषयीं आपल्या विचारांचा प्रचार करण्याची अनुमति देईल ? आम्हाला शंका होती. पण त्या सर्व संशयावर पकड होती दृढ निश्चयाची आणि आत्मविश्वासाची. वाटेल तें करून आम्हाला रशियाची पायीं यात्रा करायची आहे आणि तेथील जनतेसमोर ही मागणी ठेवावयाची आहे की युद्धातून रशियाने आपलें अंग बाहेर काढून घ्यावें.

पूर्वी आमचा विचार काबुलहून हिंदुकुश पर्वत ओलांडून ताशकंदजवळ सोव्हियट-संघांत प्रवेश करण्याचा होता. ताशकंदहून मास्कोची पदयात्रा फार लांबची झाली असती. काबुलमधे सोव्हियट वकिलातीत जेव्हा आम्ही व्हिसासाठी गेलो तेव्हा आम्हाला जरा निराशाजनक उत्तर मिळालें. त्या वेळचे काबुलचे भारतीय वकील श्री. जगन्नाथ धमीजा यांच्याशी आम्ही गोष्टी केल्या. श्री धमीजा यांना आमच्या पदयात्रेच्या कार्यक्रमाबाबत अत्यंत आवड होती. यद्यपि अधिकाराच्या नात्याने ते काही करू शकत नव्हते, तरी त्यांनी रशियन वकिलाशी स्वत: गोष्टी केल्या होत्या. दोघा वकिलांच्या चर्चेतून हा निष्कर्ष निघाला की ताशकंदकडील मार्ग न निवडता इराणमार्गे आम्ही रशियात प्रवेश करावा असा सल्ला आम्हाला दिला गेला. या सल्ल्यामुळे आम्हाला जरी काही शेंकडो मैलांचा रस्ता अधिक चालावा लागला तरी यामुळे आम्हाला इराणमधे दीर्घकाल घालवायची संधि मिळाली. परंतु आमच्या मनांत हा खटका राहिला की आम्हाला असेंच टोलवित तर नाहीत ना ? काबुलमधे व्हिसा न देता तेहरानमधे देण्याचें आश्वासन तर मिळालें; तरी चित्र साफ नव्हतें.

तेहरानची रशियन वकिलात म्हणजे एक मोठा किल्लाच आहे. वकिलातीभोंवती मोठा कोटच बांधला आहे. अफगाणिस्तानचे पहाड व इराणचीं वाळवंटे यांची पायीं यात्रा करणें आम्हाला जास्त सोपी होती पण या कोटाच्या आत राहणाऱ्या रशियन अधिकाऱ्यांकडून व्हिसा प्राप्त करणे बरेंच कठिण वाटत होतें. परंतु आम्ही ज्या रशियन अधिकाऱ्याला भेटलो त्यांनी पहिल्या भेटीतच आम्हाला फारच प्रभावित केलें. "तुम्ही लोकांनी रशियाच्या प्रवासासाठी जो काळ निवडला आहे तो भयंकर थंडी

आणि हिम-वादळाबद्दल प्रसिद्ध आहे. जानेवारी ते एप्रिलपर्यंतचा काळ सर्वांत अधिक धोक्याचा आहे. या ऋतूत पायीं प्रवास करण्याची परवानगी कोणत्याहि परिस्थितीत देतां येत नाही." एका रशियन तरुणाने शुद्ध हिंदीत आपल्या अधिकाऱ्याचें म्हणणें आम्हाला भाषांतर करून सांगितलें. या तरुणाने आम्हाला आश्चर्यांत टाकलें. तेहरानच्या रशियन वकिलातीत असा उत्तम हिंदी जाणणारा दुभाष्या ! !

"आपण थंडीची चिंता करू नका. आमच्याजवळ कपड्यांची पूर्ण व्यवस्था आहे." आम्ही म्हणालो.

"पूर्ण व्यवस्था ?" अधिकाऱ्याने रशियन व्होडकेचा (मद्याचा) प्याला आमच्यासमोर ठेवीत विचारलें. आम्ही व्होडका न पिण्याची गोष्ट त्यांना समजावली तेव्हा तर ते अधिकच आश्चर्याने म्हणाले : " व्होडका प्याल्याशिवाय काय तुम्ही रशियन थंडीशी मुकाबला करू पाहता ? हें अशक्य आहे. ज्या बर्फाने नेपोलियन व हिटलर यांच्या सैन्याला सुद्धा शरण आणलें तेथे तुमचा काय पाड लागणार ? " याप्रमाणे आमचा वाद-विवाद चालत राहिला. आम्ही आमच्या झोळीत निराशा घेऊन परत आलो. समस्या कठिण होती. पण रशियन अधिकाऱ्याच्या गोड व्यवहारामुळे आमचा उत्साह थंड पडला नाही. आम्ही दुसऱ्या दिवशीं पुन्हा रशियन वकिलातीत जाऊन अधिकाऱ्याची मुलाखत घेतली. पुन्हा तोच बर्फ व थंडीचा जुना मुद्दा ऐकवला. परंतु अधिकाऱ्याने दुभाष्या तरुणाला म्हटलें : " कार बोलवा. भारतीय वकिलातीत जाऊ." मी काही समजलो नाही. माझे सोबती प्रभाकर मला म्हणाले : "समजत नाही, भारतीय अधिकाऱ्याला काय विचारणार ?" असो. आम्ही सगळे जण भारतीय वकिलातीत पोहोंचलो, आणि प्रथम सचिव श्री. चंद्रभान यांना भेटलो.

"हे दोन तरुण यांच्याजवळ भारतीय पासपोर्ट आहे, अशा भयंकर थंडीच्या हंगामात रशियाचा प्रवास करू इच्छित आहेत, निःशस्त्री-करणाचा संदेश घेऊन. तुमचा काय सल्ला आहे ?" रशियन अधिकाऱ्याने सरळ प्रश्न टाकला, भारतीय वकिलातीच्या प्रथम सचीवाला.

"आम्हाला एवढे माहीत आहे की हे दोघे दिल्लीहून पायीं चालत येथपर्यंत येऊन पोहोंचले आहेत. यांच्यापाशी केवळ भारतीय पासपोर्टच नाही, तर पं. नेहरू आणि डॉ. राधाकृष्णन् यांचीं पत्रेंहि आहेत. परंतु भारत सरकार यांच्या विचाराबद्दल, यांच्या निःशस्त्रीकरण-आंदोलनाबद्दल व त्यासंबंधी प्रवृत्तीबद्दल मुळीच जबाबदार नाही. ही त्यांची व्यक्तिगत जबाबदारी आहे. व्हिसा द्यायचा न द्यायचा आपल्या मर्जीवर अवलंबून आहे. जर आपण व्हिसा दिला आणि हे लोक रशियाचा प्रवास करतांना काही शारीरिक आपत्तींत सापडले तर आमची मास्कोतील वकिलात यांना अवश्य मदत करील." भारतीय अधिकाऱ्यानें आपली स्थिति स्पष्ट केली.

आम्ही परत रशियन वकिलातीत आलो. "जर तुम्ही या ऋतूत रशियाचा प्रवास करण्याचा आग्रह ठेवतच असाल तर मी २० दिवसांचा व्हिसा तुम्हाला देतो. पण गांवो-गांव पायीं चालण्याची परवानगी मिळणार नाही". रशियन अधिकाऱ्यानें एक नवें प्रकरण उभें केलें. "तुम्ही मास्को, लेनिनग्राड आदि शहरांत जा. काही-न-काही वाहनाचा उपयोग तुम्हाला करावाच लागेल. निःशस्त्रीकरणाची गोष्ट लोकांपर्यंत पोहोंचविण्याचा जो तुमचा विचार आहे त्यासाठी २० दिवस पुरे आहेत. या काळांत तुम्हाला पाहिजे तितकीं व्याख्यानें देतां येतील." आणि शेवटीं म्हणाले : "हा २० दिवसांचा व्हिसा तुम्हाला मिळेल. पण त्यासाठी तुम्हाला आमच्या प्रवास-कंपनी 'इंटूरिस्ट'चे प्रतिनिधि यांच्याजवळ प्रवासाच्या सर्व खर्चाची रक्कम जमा करून त्याची रसीद घ्यावी लागेल."

"कृपा करून आमचें म्हणणें आपण नीट समजून घ्याल तर बरें होईल." आम्ही नम्रतेने पण स्पष्ट शब्दात आमची बाजू मांडली. "पहिली गोष्ट, आम्ही 'टूरिस्ट' नाही. म्हणून 'इंटूरिस्ट'शी आमचा काही मतलब नाही. दुसरी गोष्ट, आम्ही पायीं म्हणजे पायींच प्रवास करू. जोपर्यंत जगात अॅटम-बॉंब कायम आहेत, आम्ही आमच्या या पदयात्रेद्वारा त्या बॉंबच्या विरुद्ध आमचें निदर्शन चालू च ठेवू. हां, जर तुमच्या सरकारने आम्हाला वचन दिलें की यापुढे सोव्हियट संघ सर्व अण्वस्त्रें नष्ट करील

तर आम्ही आमची पदयात्रा बंद करायला तयार आहोत. आणि रशियाची पदयात्रा न करता आम्ही सरळ फ्रान्स, इंगलंड व अमेरिकेचा मार्ग धरू. तिसरी गोष्ट, आम्ही दिल्लींत गांधींच्या समाधीपाशी असा निश्चय करून निघालो आहोत की आमची संपूर्ण यात्रा जनाधारित चालेल. आम्ही येथपर्यंत बिना पैशानेच येऊन पोहोंचलो आहोत. सर्व ठिकाणीं जनतेच्या आतिथ्यावर राहिलो आहो. अफगाणिस्तानच्या दुर्गम पहाडावर राहणाऱ्या गरीब पठाणांच्या झोंपड्यांतहि आम्हाला आतिथ्य लाभलें आहे. आणि तसेंच आतिथ्य रशियन जनतेकडून आम्हाला मिळेल हा आम्हाला विश्वास आहे." शेंवटी आमची गोष्ट पुरी करतांना म्हटलें : "आम्ही संपूर्ण जग एक मानतो. आम्ही जगाचे नागरिक आहो. राष्ट्राच्या सीमा-मर्यादेत आमची श्रद्धा नाही. पासपोर्ट, व्हिसा सुद्धा जगाच्या अखंड एकतेला बाधक आहेत. त्यांवर आमचा विशेष भरंवसा नाही. आम्ही तुमच्याकडून व्हिसा मिळवून तुमच्या नियमांचें पालन मात्र करू इच्छितो. परंतु आमचा रशियन-यात्रेचा निर्णय बदलणार नाही."


आमचें हें लांबलचक भाषण ऐकून रशियन अधिकाऱ्याच्या चेहेऱ्यावर हास्य चमकलें. ते म्हणाले : " तरुणांनो, तुम्ही दोघे गांधींच्या देशांतून आले आहात. भारताच्या तरुणांतच अशी बिनापैशाची जगत्-यात्रा करण्याचे साहस असू शकते. तीहि पायीं चालत आणि निःशस्त्री-करणाचा संदेश घेऊन. रशिया, शांतीसाठी काम करणाऱ्या आपल्यासारख्या साहसी तरुणांचें सदैव स्वागत करतो. पण आम्हाला काही औपचारिक नियमांचें पालन करावें लागतें. माझ्यासमोर असा प्रश्न बहुधा प्रथमच आला आहे. असो, मला थोडावेळ द्याल ? उद्या येण्याची कृपा कराल ? "

आम्ही दुसऱ्या दिवशीं गेलो. व्हीसा-अधिकाऱ्यानें आपल्या सहायकाला म्हटलें : " यांचा मामला अगदी अपवादस्वरूप आहे. यांना व्हिसा देण्याचें आम्ही ठरविलें आहे." सहायक अधिकाऱ्यानें रजिष्टरमधे आमच्या पासपोर्टचा नंबर लिहून घेतला आणि आमच्या पासपोर्टावर व्हिसाचा शिक्का मारला. आम्हाला काही फॉर्म भरावा लागला नाही की फोटोची जरूर पडली नाही. हिंदी बोलणाऱ्या दुभाष्यानें सांगितलें : " तुम्ही लोक

लेनिनच्या देशांत जात आहात. लेनिनच्या चरित्राचा हिंदी अनुवाद मी आपल्यास भेट म्हणून देत आहे. तुमची यात्रा सुखद होवो." याप्रमाणें चार महिन्यांच्या पदयात्रेसाठी व्हिसा घेऊन आम्ही सोव्हियट वकिलातीचा निरोप घेतला.

## १०० दिवसांची यात्रा

या प्रमाणे उमर खैयाम आणि फिरदोसी यांच्या जन्मभूमीत आम्ही १०० दिवसांच्या यात्रेचा आनंद अनुभवला. उमर खैयामच्या समाधीवर श्रद्धापूर्वक फुलें अर्पण करण्यासाठी आम्ही मशेदहून नैशावुरला गेलो होतो. आम्ही भयंकर वाळवंटी इलाखा पार करून इराणचा उत्तर भाग चांगल्या रीतीने पाहू शकलो. परंतु शिराज इस्पहानसारखीं ऐतिहासिक स्थळें




पाहण्यासाठी आम्ही जाऊ शकलों नाही. इराणमधे शहरांच्या सडका पक्क्या आहेत. पण बाकीच्या सडका कच्च्या आहेत. त्यामुळे मोटारींच्या किंवा ट्रकांच्या येण्याजाण्याच्या वेळी पार्यी चालणारे धुळीने न्हाऊन निघतात.

दिल्लीपासून काबूल, तेहरान व मास्कोपर्यंत फार उत्तम सडका आहेत. मास्कोनंतर तर साऱ्या युरोपभर काहीच अडचण नाही. कोणाची इच्छा असेल तर तो भारतापासून बसने व ट्रेनने आशिया व यूरोपचा प्रवास मजेंत करू शकेल. या सडकांनी देशांचें अंतर निश्चितच कमी केलें आहे.

# मजुरांच्या क्रांतीचा देश सोव्हियट संघात

पहिली जानेवारी !

नव्या वर्षाची नवी पहाट ! एरास नदीच्या कांठीं बसलेलें जुल्फा शहर ! ! सात महिन्यांत २७१० मैलांच्या थकवणाऱ्या पदयात्रेनंतरहि आम्ही एक नवी स्फूर्ति, नवा ताजेपणा नवें आकर्षण अनुभवीत होतों. सोव्हियट-जुल्फाच्या रेल्वे स्टेशनवरून इंजनाचा कर्कश आवाज ऐकू आला. वाटलें, सोव्हियट-भूमि शांति-यात्रिकांना आमंत्रण देत आहे. या देशाविषयी जेव्हा कधी पुस्तकांत वाचत होतो तेव्हा स्वप्नासारखें वाटत होतें कीं कधी या देशात जाण्याची संधि तरी मिळेल का ? टॉलस्टॉयने लिहिलेलीं 'युद्ध व शांति' व 'आम्ही करावें काय ?' हीं पुस्तकें वाचतांना मनात उत्कंठा असे की कधी या महान लेखकाला निर्माण करणाऱ्या देशाचा आम्ही प्रवास करू शकू ? गोर्की, चेखव, पुश्कीन, दोस्तोवस्की आदि अनेक लेखकांनीं अप्रत्यक्ष रूपाने या देशाला भेटण्याचें आम्हाला आमंत्रण दिलें होतें, तर मार्क्स, अेंगल्स, व लेनिनच्या क्रांतिकारी विचारांना क्रियान्वित करणाऱ्या सोव्हियट-संघाच्या सीमेवर स्वत:ला पोहोंचल्याचें पाहून जर आमचें मन उत्साहाने भरून गेलें तर त्यांत आश्चर्य तें कसलें ?

हातांत दुर्बिण व पाठीवर बंदूक घेऊन सरहद्दीचे पहारेकरी सैनिक दोन्ही बाजूला मोठ्या दक्षतेने उभे होते. इराणी सीमेकडून सूचना-ध्वज फडकावला गेला. सूचना-ध्वज पाहून सोव्हियट सेनेचे अधिकारी दार बंद असलेल्या जागीं आले. दार खुलें झालें व दुसऱ्याक्षणीं आम्ही एका नव्या देशात पदार्पण केलें. अशा देशात की जो इतर देशांहून सर्वथा भिन्न आहे. जेथील समाज-व्यवस्था, अर्थ-व्यवस्था, आणि राज्य-व्यवस्था, निराळ्या प्रकारची आणि नव्या समाजवादी प्रणालीवर आधारित आहे. आम्हाला त्या भिन्नतेचें दर्शन जागजागीं होत होतें. खासकरून, आमच्या दृष्टीने ह्या देशात एक विशिष्ट प्रकारची भिन्नता होती. आतापर्यंत आम्ही ज्या देशांचा प्रवास केला होता त्यांच्यापाशी अण्वस्त्रें नव्हतीं. ते लहान व अल्प विकसित देश युद्धाच्या तयारीच्या विरुद्ध व अण्वस्त्रांच्या विरुद्ध आमच्याशीं सहमत होत हें स्वाभाविकच होतें. सोव्हियट-संघ अणुशक्ति-संपन्न मोठा देश आहे. म्हणून या देशात आमच्या बाबतीत जनतेचा व सरकारचा काय रोख राहतो ही आम्हाला विशेष महत्वाची गोष्ट होती.

मैत्री-परिषदेच्या व शांति-परिषदेच्या अनेक कार्यकर्त्यांनी आमचें स्वागत केलें. अर्मेनियन मैत्री-परिषदेचे उपाध्यक्ष श्री. मारथीरोश आन्द्रोनिक यांनी स्वागत-भोजनाच्या टेबलावर आमची यात्रा व आमचें शांति-मिशन यांचें चांगलें समर्थन करतांना म्हटलें : "आम्हाला ही आश्चर्यकारक व आनंदाची गोष्ट वाटते कीं अविरत सात महिने पायीं चालत, उन्हाळा-पावसाळा, हिवाळा, भूक, जंगल, पहाड, इत्यादींशीं झगडत तुम्ही शांती-साठी अनुकूल वातावरण तयार करीत आहा आणि तेंच मिशन घेऊन आपण या देशात आला आहात. सोव्हियट-संघ मागच्या महायुद्धात सामिल होता आणि त्याला युद्धाच्या भयंकर परिणामांचा चांगल्या प्रकारें अनुभव आला आहे. युद्धासाठी केल्या जाणाऱ्या प्रचाराविरुद्ध सर्वप्रथम आम्ही आवाज उठविला होता आणि आज आम्ही शांति-स्थापनेसाठी सर्व प्रकारें लढा द्यायला तुमच्याबरोबर आहोत. जो युद्ध इच्छितो, तो एक तर मूर्ख आहे किंवा पागल आहे. भारतांत गांधीसारखे शांतीचे प्रेषित झाले. तुम्ही लोक

त्याच देशातून आला आहात, नव्यावर्षाच्या या शुभ प्रसंगीं आम्ही भारताच्या या दोन शांतिवादी तरुणांचें स्वागत करतो."

## सैनिक आणि शांति

या स्वागत-भोजनाच्या प्रसंगी सरहद्द-संरक्षण-सेनेचे कमांडरहि होते. आमचें स्वागत करतांना ते म्हणाले: "कोणत्या तरी काळीं आमच्या देशाचा एक प्रवासी पायीं भारतात गेला होता. आज भारताचे दोन प्रवासी शांतीचा संदेश घेऊन सोव्हियट देशात आले आहेत. मी एक सैनिक कमांडर असूनहि यांचें स्वागत करीत आहे. वरवर पाहणाराला, एक कमांडर एखाद्या शांति-यात्रिकाचें स्वागत करीत आहे हें पाहून विसंगति वाटेल. कारण हे यात्रिक, बंदुकीच्या, शस्त्रांच्या, बाँबांच्या व सेनेच्या विरोधी आहेत आणि मी इकडे या वस्तूंचाच उपयोग सुरक्षिततेचें साधन म्हणून करतो. पण मला सांगायला संकोच वाटत नाही की मानव जसजशी प्रगति करील, तसतशी शस्त्रांनीं स्व-रक्षण करणें व्यर्थ व पशुतेचें लक्षण समजलें जाईल. देशदेशांच्या सीमा नष्ट होऊन आम्ही जागतिक एकतेकडे ओढले जाऊ. प्रगति करू. सैन्य व बाँब यांची आवश्यकता कमी कमी होत जाईल. त्यावेळी आम्ही सुद्धा हा लष्करी पोषाख टाकून शांतीची उपासना करू. या भावनेने मी या शांति-यात्रिकांचें स्वागत करीत आहे." त्या सैनिक कमांडरचें भाषण ऐकून मी सद्‌गदीत झालो. माझ्या आयुष्यांत मी प्रथमच एका सैनिकाच्या तोंडून अशी गोष्ट ऐकली होती.

आम्ही सोव्हियट-संघात पहिल्या जानेवारीच्या दिवशीं प्रवेश तर केला, परंतु आमची व्यवस्थित पदयात्रा ५ जानेवारीपासून सुरू झाली जुल्फापासून येरवानपर्यंत वर्जित-सीमा-क्षेत्र असल्यामुळे १२५ मैल आम्ही कारमधून आलो व ३ दिवस येरवानमधे राहिलो. येरवान अर्मेनियन-रिपब्लिकची राजधानी आहे व मोठें औद्योगिक शहर आहे. स्वाभाविक रंगाच्या दगडी सुंदर इमारती मोठ्या झपाट्याने येथे बांधल्या जात आहेत. प्राचीन अर्मेनियन साहित्याची अनेक कलापूर्ण हस्तलिखितें पाहण्यासाठी आम्ही येथील प्रसिद्ध संस्था 'मदिनादारान'मधे गेलो. अर्मेनियन लिपीचे संशोधक श्री. मेसरोप मास्टोलिय १६०० वर्षांपूर्वी

होऊन गेले. त्या काळापासून अर्मेनियन साहित्याच्या विकासाची माहिती आम्हाला या संस्थेकडून ऐकायला मिळाली. आम्हाला समजलें की अर्मेनियात प्रकाशनाची व्यवस्था ज्या काळीं नव्हती त्या वेळीं या भाषेच्या साहित्याचें प्रकाशन भारतात होत असे. मद्रासमधे प्रकाशित झालेलें एक पुस्तक आम्ही पाहिलें. त्यावरून अनुमान करता येते की भारताशी या देशाचा किती जुना संबंध आहे ! कलकत्यासारख्या शहरात 'अर्मेनियन स्ट्रीट' असणें या गोष्टीस प्रमाण आहे. येरवानच्या अन्य अनेक संस्था आम्ही पाहिल्या. येथील साहित्यिकांना, तरुणांना, मैत्री-परिषदेच्या व शांति-परिषदेच्या सदस्यांना आम्ही भेटलो.

अर्मेनियन व आझरबैझान रिपब्लिक येथील यात्रा आटोपून जॉर्जिया रिपब्लिकमधे आमची यात्रा सुरू झाली. हें फार सुंदर व संपन्न रिपब्लिक आहे. कॉकेशस पर्वताच्या रांगा व काळया समुद्राच्या उचंबळणाऱ्या लाटांच्यामधे पसरलेल्या या प्रांताने अकराव्या शतकांत शोता रूस्तावेलीसारख्या महान कवीला जन्म दिला आणि अठराव्या शतकात, स्टॅलिन, चोलूकित्ज, आदि अनेक अद्वितीय क्रांतिकारकांना जन्म दिला. त्यांनी भांडवलशाही समाज-व्यवस्थेशी जबरदस्त संघर्ष केला आणि शोषणाच्या आधारावर उभारलेल्या महालांचे पायवे ढीले करून टाकले. कूरा नदीच्या कांठीं वसलेल्या जॉर्जियाची राजधानी त्बीलीसीमधे आम्ही तीन दिवस राहिलो, आणि तेथील अनेक संस्था आम्ही पाहिल्या. शहरांपेक्षा गांवात आम्हाला वास्तविक जीवन-दर्शन करण्याची संधि मिळत होती. लोकांची राहणी-करणी, खाणें-पिणें, रीत-रिवाज इत्यादि पाहणें व समजून घेणें यांचे प्रसंग येत. गांवात आम्ही कधी कलेक्टीव्ह फार्मच्या अध्यक्षांच्या घरीं उतरत होतो, कधी कम्युनिस्ट पार्टीच्या मंत्र्याकडे ,कधी एखाद्या शिक्षकाकडे, कधी एखाद्या किसानाकडे, उतरत होतो आणि सूक्ष्मरीतीने त्यांच्या जीवनाचा व त्यांच्या विचारांचा अभ्यास करीत होतो.

आमची पदयात्रा जेट विमानें आणि स्पुटनिक निर्माण करणाऱ्या देशात चालू असल्यामुळे मनांत नानाप्रकारच्या कल्पना उठत होत्या. एकी-कडे मंतीदगचा उच्चतम बिंदु व दुसरीकडे अत्यंत तीव्र गतीचा उच्चतम

बिंदु! शांतीचा मंत्र घेऊन पायीं चालत जाणाऱ्या आमच्यासारख्या यात्रिकांना मंद गतीच अधिक लाभप्रद सिद्ध होत होती. शांति-परिषदेच्या केंद्रीय कार्यालय, मास्कोहून टेलिफोनने आम्हाला संदेश मिळाला "सोव्हियट रशियाच्या भयंकर व जगत्प्रसिद्ध थंडीत पदयात्रा करणें अत्यंत त्रासदायक होईल. आपण काही चिंता करू नका. सारी व्यवस्था व सारा खर्च शांति-परिषद करील. तुम्ही विमानाने मास्कोला यावें." पण जर आम्ही विमानाने सरळ मास्कोला पोहोचलो असतो तर ज्या हजारों लोकांना आम्ही रोज भेटत होतो आणि त्यांचा शांति-संदेश प्राप्त करीत होतो तो कसा मिळता ? म्हणून रशियाचा हिंवाळा फार भयंकर असतो हें माहित असूनहि आम्ही पायीं चालण्याचा आमचा निश्चय पक्का राखला. शांति-परिषद आमच्या यात्रेची सर्व प्रकारे तयारी करीत होती आणि या पदयात्रेचा शांतीचें वातावरण निर्माण करण्यात जास्तीत जास्त उपयोग व्हावा अशा रीतीने तिने यात्रेचें संयोजन केलें होतें. प्रत्येक जिल्ह्यांत शांति-परिषदेचे प्रतिनिधि आहेत. ते प्रतिनिधि आपआपल्या जिल्ह्यांत आमच्याबरोबर राहत होते, आणि जास्तीत जास्त लोक आमच्या संपर्कात येतील अशी योजना करीत होते. अर्मिनियन, जॉर्जियन, आणि रशियन वृत्तपत्रें व रेडिओ यांच्यामार्फत प्रचार होत असल्यामुळे आम जनतेला आमच्या यात्रेविषयीं पूर्ण माहिती मिळत होती. आम्ही आमच्या पडावावर पोहोंचत होतो तेव्हा कधी शेंकडों, कधी हजारों लोक आम्हाला घेरत होते. लहान-लहान गांवीं तर सर्वच्या सर्व गांव परदेशी पाहुण्यांना पाहण्यासाठी व त्यांचें स्वागत करण्यासाठी धाऊन येत असे. सडकेने आम्ही जेव्हा चालत जात होतो तेव्हा कारवाले, ट्रकवाले, बसवाले लोक मधेच थांबून आमचें अभिनंदन करीत. एखाद्या शाळेजवळून आम्ही जात होतो तर सारे विद्यार्थी क्षणभरात एकत्र येत व आम्हाला १०-१५ मिनिटें थांबवून घेत. कारखान्यासमोरून आम्ही जात होतो तेव्हा मजूरलोक एकत्र येवून आमच्याशी काही वेळ गोष्टी करीत. आम्ही जेंव्हा मोठ्या गांवावरून जात असू तर शेंकडों लोक एकत्र जमून थोडा वेळ आमचें भाषण ऐकत. याप्रमाणें गांवोगांवीं, घराघरांत, रस्त्यावर, चौरस्त्यावर आम्ही

आमच्या गोष्टी सांगत होतो व लोक "मिर! मिर!" म्हणजे "शांति, शांति"चे नारे लावत असत. एका पडावापासून दुसऱ्या पडावापर्यंत कित्येक वेळां काही तरुण किंवा तरुणी आमच्याबरोबर येत असत. ते आम्हाला रशियन भाषा शिकवीत, रशियन गाणीं शिकवीत. आणि आमच्याकडून हिंदी गाणीं ऐकत असत.

आम्हाला आढळून आलें की धर्म-भांडवल-ईश्वर आदि बंधनें तोडून सोव्हियट देशात मानवी श्रमाची प्रतिष्ठा स्थापित झाली आहे आणि तिच्या आधारावर एक जागृत व सुखी समाजाची निर्मिति होत आहे. तसेंच युद्धविरोधी एक जबरदस्त हवा इथे आहे. सगळीकडून शांततेच्या समर्थनार्थ दृढ आवाज ऐकू येतो. एखाद्याच्या हातांतलें घड्याळ पाहिलें तर त्यावर दिसे 'मिर!' (शांति). एखाद्या बस किंवा ट्रकवर आमची नजर पडली तर तेथेहि दिसत असे 'मिर! मिर!' लिहिलेलें. एखाद्या गांवच्या प्रवेशद्वारावरची पाटी वाचली तर तेथेंहि 'मिर! मिर!' लिहिलेलें आढळें. याप्रमाणें तेथील जनमानसांत युद्धाबद्दल घृणा आहे. कोणी आम्हाला म्हणत असे : "माझा भाऊ युद्धात मारला गेला, युद्ध व्हायला नको." कधी एखादी वृद्ध माउली येऊन आम्हाला पोटाशीं धरी आणि आमचा मुका घेऊन सांगे : "माझे दोन मुलगे युद्धात मारले गेले, आता तुम्हीच दोघे माझीं मुलें आहात." लोकांची विचारधारा इतकी युद्धविरोधी आहे की आता एखाद्या जागतिक युद्धाचा सहज-संभव दिसत नाही. तरी पण जोंपर्यंत थोड्या राजकारणी लोकांच्या हातांत अण्वस्त्रें राहतील तोंपर्यंत युद्धाचा धोका कायमच राहील.

काळ्या समुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्याने आमचा प्रवास चालू होता. सोव्हियट संघाच्या सर्व राज्यांत स्वास्थ्य, सौंदर्य आणि मजेच्या स्थळांत काळ्या समुद्राचा हा सुंदर किनारा आपलें विशिष्ट महत्त्व राखून आहे. जेव्हां इंच-इंच रशियन भूमि पांढऱ्या शुभ्र बर्फाने झांकली जाते, झाडें-झुडपें शांत व निर्जीव होऊन वसंताच्या आगमनाची वाट पहात असतात, लोकांना बर्फाशीं खेळण्यांतच उल्हास व आनंद वाटत असतो, शेतीवाडीच्या कामांतून मोकळे होऊन लोक बंद खोल्यांतून शेगडी जवळ दुमडून

बसतात, तेव्हांहि काळ्या समुद्राच्या या किनाऱ्यावर सारा जीवनक्रम तसाच चालू राहतो जणू काही या देशांत न कुठे बर्फ आहे, न कुठे भयंकर थंडी आहे. बस, सर्वत्र वसंताचेंच दर्शन होत असतें. आम्ही हळूहळू या काळ्या समुद्राच्या मनाला आनंद देणाऱ्या वातावरणांत यात्रा करूं लागलो.

सुखुमी, गुदाउता, गागरा व सोची हीं शहरें प्रवासी लोकांना विशिष्ट आकर्षणीय स्थानें आहेत. हीं शहरें काळ्या समुद्राच्या अशा वळणावर वसलेलीं आहेत, जणू या शहरांसाठीच समुद्राने अर्ध चंद्राकारासारखा आकार घेतला आहे. एका बाजूला कॉकेशस पर्वताची गगनचुंबीं शिखरें आणि दुसऱ्या बाजूला काळ्या समुद्राची अथांग खोली. या दोहोंमधें वसलेल्या लहान मोठ्या सुंदर वस्त्या. रात्रीं विजेच्या झगझगीत प्रकाशांत हा लांबलचक प्रदेश व हीं नगरें एखाद्या सजलेल्या राणीपेक्षा कमी आकर्षक वाटत नाहीत. समुद्र किनाऱ्या-किनाऱ्याने घनदाट वृक्षांची छाया, थंड व वाकड्या-तिकड्या चढ-उतारांच्या सडका, आणि संपूर्ण वातावरणांतील शांत छटा यांनी आम्हाला इतकें मोहित केलें की मनांत आलें, या सुंदर निसर्गाच्या मांडीवर पुष्कळ वेळपर्यंत खेळत कां राहू नये ?

हा संपूर्ण सागर-तट अत्यंत सुंदर ' सॅनिटोरियमांनीं ' सजलेला आहे. तुम्हाला जो जो आकर्षक व भव्य बंगला दिसेल, समजून चाला की अवश्य तो सॅनिटोरियमच आहे. तुमचें हें अनुमान ऐंशी टक्के खरें ठरेल. एकट्या सोची शहरात शंभरापेक्षा जास्त सॅनिटोरियम व स्वास्थ्य-सुधार केंद्रें आहेत. अशा प्रत्येक सॅनिटोरियममधे चारशें ते एक हजार लोकांना राहण्याची व्यवस्था असते. त्यांच्यासाठी सर्व प्रकारची चिकित्सा व व्यायाम, मनोरंजन, खेळ, अध्ययन आदींच्या विशिष्ट सोयी केलेल्या असतात.

## चहा पिऊन अणुबाँबचे बटन दाबा

या विभागांत आम्हाला अशीं अनेक गांवें भेटलीं, जिथल्या लोकांनीं पूर्वीं जन्मांत कधी परदेशी माणूस किंवा कोणी भारतीय व्यक्ति पाहिली नव्हती. " परदेशस्थ प्रवासी मास्को, त्बीलीसी, लेनिनग्राड, ताशकंद

इत्यादि मोठ्या मोठ्या शहरांत जात असतात," असे उद्गार कित्येक वेळां कित्येक खेडवळांनी आमच्या जवळ काढले. चहाच्या एका कारखान्यां-तील मजुरांनीं आम्हाला रस्त्याने जातांना पाहिले तेव्हां ते एकत्र जमले, आमचा हात पकडून आग्रहपूर्वक आम्हाला आपल्या कारखान्यात घेऊन गेले. " ओऽहो ! वर्तमानपत्रांत तुमचे फोटो पाहिले, बातमी वाचली, तुम्ही शांतीचे दूत आहा ! घ्या, हे आमच्या कारखान्यातील चहाचे चार पुडे ! ख्रुश्चेव, केनेडी, दि गॉल, आणि मॅकमिलन या चौघांना एक एक पुडा द्या आणि सांगा : 'जेव्हा तुम्हाला अणुबाँबचा उपयोग करण्याची आज्ञा देण्याची वेळ येईल तेव्हा कृपाकरून ह्याचा ताजा चहा प्या. आम्हा मजुरांचें स्मरण करा. तुम्हाला जरूर सुबुद्धि होईल. म्हणजे त्यावेळीं तुम्ही अणुबाँबचा प्रयोग करणार नाही. आम्ही कारखान्यातील मजूरलोक शस्त्र-रहित व युद्धाशिवायच्या जगाचें स्वप्न पाहत आहोत. आम्ही मजूर आहो. जगभरच्या मजुरांचें हित शांतींत, फक्त शांतींतच आहे."

शाळेंतील मुलें व शिक्षक रस्त्याने जाणाऱ्या आम्हाला घेरून घेत. आपल्या शाळेंत नेत. आमच्या प्रवासाची सर्व माहिती ऐकून घेत व म्हणत: "आमचें भविष्य तेव्हाच सुरक्षित व उज्ज्वल होऊ शकेल जेव्हा जगांतून युद्ध व अण्वस्त्रांची कृष्णच्छाया नाहीशी होतील. जनतेचा शंभर टक्के विश्वास शांततेत आहे. हितसंबंधी स्वार्थी थोड्या लोकांचा धंदा चालू ठेवण्यासाठीच आज युद्धाचीं शस्त्रें बनविलीं जात आहेत. म्हणून आता हितसंबंधी स्वार्थाच्या विरुद्ध आम जनतेची शांततेची भावना प्रतिष्ठित करण्याची वेळ आली आहे."

आमच्या सोयीसाठी सोव्हियट शांतता-परिषदेने सुरवातीस आमच्या बरोबर एक दुभाष्या ठेवला होता. त्यामुळे आम्ही सोव्हियट जनतेमधे चांगलेंच मिळू-मिसळू शकलो. त्यांचे विचार, रीत-रिवाज, राज्य-व्यवस्था, अर्थ-व्यवस्था, कृषि-उद्योग-व्यवस्था, शिक्षण-व्यवस्था, कायदे-कानून, पोलीस, धर्म, जाति इत्यादि बाबतींत आम्ही बारकाईने अभ्यास करू शकलो. सोव्हियट संघाच्या ग्रामीण जीवनाविषयी खोल अध्ययन करण्याची आमची उत्सुकता यामुळे पूर्ण झाली. ज्यांच्या घरीं आम्ही उतरत होतो,

सरळ स्वयंपाक घरापर्यंत पोहोंचत होतो. माता आणि घरांतील मुलें आमच्या भोंवतीं गोळा होत असत. हे लोक स्वयंपाक कसा करतात, कसें जीवन जगतात, कौटुंबिक व्यवस्था कशी असते, या सर्वांचें निरीक्षण आम्ही करीत होतो. ज्यांच्या घरीं आम्ही उतरत होतो, त्या दिवसापुरते आम्ही त्यांच्या कुटुंबातील जणू एक सदस्यच आहो इतके त्यांच्यांत मिसळून जात होतो.

शांति-परिषद आमच्या यात्रेविषयीं व प्रवास-मार्गाविषयीं बरोबर माहिती ठेवीत होती. कधी कधी आम्हाला कडक थंडीचा सामना करावा लागला, पण ती इतकी असहनीय नव्हती. वीस दिवसांची आमची यात्रा झाल्यावर ४ फेब्रुवारीला मास्कोहून शांति-परिषदेने आपला एक खास प्रतिनिधि आमच्याकडे पाठविला. त्यांचें नांव– भाई श्री. अलेकझांडर इवानोविच पलादिन. हे आमच्या बरोबर दोन दिवस राहिले. त्यांनीं बातमी आणली की सोचीच्यापुढे कॉकेशस-पर्वतावर खूप दाट बर्फ पडलें आहे, रस्ते बंद होत आहेत तसेंच बर्फाचें सोबत वादळहि झालें आहे. म्हणून आम्ही सरळ येथून मास्कोला चलावें. हेंच सोयीचें होईल. "पण सोची अजून १०० मैल अंतरावर आहे. आम्ही तेथपर्यंत तर जाऊच." आमचें उत्तर होतें.

हे भाई म्हणाले: "मी मुद्दाम त्यासाठीच आलो आहे. तुम्ही याबाबतीत जास्त आग्रह ठेवू नये. आमच्या देशात आम्ही पाहुण्यांना बर्फात व वादळात सोडून निश्चित बसू शकत नाही." पुष्कळ चर्चा झाली. आमचें मन कोणत्याहि प्रकारें तयार होईना. शेंवटीं त्यांना थोडें फार नाराज करूनच आमची पदयात्रा आम्हाला चालू ठेवावी लागली. एका आठवड्याने आम्ही सोचीला पोहोंचलो. हे भाई आम्हाला पुन्हा येथे भेटले. आम्ही स्थानिक लोकांकडूनहि याबाबतीत विस्तृत माहिती मिळविली. आम्हाला समजलें की मास्कोहून सुमारे ४०० मैल अलिकडे वोरोनेज शहर आहे. तेथपर्यंतचा रस्ता जास्त धोक्याचा आहे. सायबेरियाकडून बर्फाचें वादळ येत आहे. सडका बंद झाल्या आहेत. रेल्वे बंद झाल्या आहेत. सर्वत्र दाट बर्फाने जमीन झांकली गेली आहे. दीर्घ चर्चा व विचार-विनिमयानंतर

आम्ही विचार केला की शांति-परिषदेच्या लोकांना व सरकारला जास्त चिंतेंत टाकून आम्ही तसाच पुढे प्रवास चालू ठेवला तर तें ठीक होणार नाही. म्हणून इतकी तडजोड आम्ही करायला पाहिजे. शेंवटीं सोचीहून बोरोनेजपर्यंतचें तिकीट काढून आम्ही विमानाने बोरोनेजला निघालो. बोरोनेज जवळ आमचें विमान पोहोंचतें आहे तोंच अधिकाऱ्याकडून सूचना मिळाली: "अकस्मात् हवामान खराब झाल्यामुळे बोरोनेजला विमान उतरणें अशक्य आहे. म्हणून बोरोनेजच्या प्रवाशांनासुद्धां मास्कोलाच जाणें भाग पडेल." आणि या सूचनेनंतर एका तासाने आम्ही मास्कोच्या विमान तळावर उतरलो. याप्रमाणें ३४०४ मैलांच्या पदयात्रेनंतर निसर्गाच्यापुढे आम्हाला हार खावी लागली. आणि पदयात्रा खंडित करून आम्ही मास्कोला पोहोंचलो. ईश्वरेच्छा! कॉकेशस पर्वताने आम्हाला साथ दिली असती तर किती बरें झालें असतें!! १९४५नंतर या वर्षीं सर्वांत अधिक कडक थंडीने वादळाने, हिमवर्षावाने, रशियन भूमीला त्रस्त केलें होतें. आम्हीहि त्याच्या तडाख्यांत सांपडलो होतो.

## मास्को मधे

१३ फेब्रुवारी!

मास्कोला आम्ही पोहोंचलो! सोव्हियट देशाची राजधानी मास्को! जगातल्या प्रमुख नगरांपैकी एक मास्को! सुंदर आणि वैज्ञानिक साधनांनी सुसज्ज मास्को! उत्तुंग गगनचुंबी भुवनांचा मास्को! मास्कोतील आमचा एक महिना खरोखरच नेहमी स्मरणांत राहील. रुंद व सुंदर सडका किंवा लांब रुंद बगीचे किंवा उत्तमोत्तम हॉटलें इत्यादि कारणामुळे नव्हे, पण तेथील रहिवाशांचा स्नेह, आतिथ्य तसेंच उच्च जीवनामुळे.

एक दिवस आम्ही मास्कोचें जगप्रसिद्ध विश्वविद्यालय पहायला निघालो. मास्कोत आमचा मुक्काम होता तेथपर्यंत श्री. स्लावा नांवाचा एक तरुण दुभाष्या आमच्याबरोबर राहत होता. आम्ही बस स्टँडवर गेलो. मला थोडी तहान लागली. मी आमच्या दुभाष्या मित्राला विचारलें: "इथे कुठे पाणी आहे काय?" तो मला एका ठिकाणीं घेऊन गेला.

एक लहानसें दुकान. दुकानदार कोणी तेथे नव्हता. माझ्या साथीदाराने ५ कोपेकचें नाणें ( रशियन नाणें ) एका छिद्रात टाकलें. फलांच्या रसाने तयार झालेल्या पाण्याचे दोन ग्लास भरून आले. मी मनात म्हटलें : "इथे सर्व काही ऑटोमॅटिक दिसतें." ( यंत्राने आपोआप होतें ). इतक्यात बस आली. बस चालविणारी एक महिला पाहून तर मला आश्चर्यच वाटलें. आम्ही बसमधे विराजमान झालो. बसमधे कोणी कंडक्टर नव्हता. तिकिटांच्या पैशासाठी एक लहानशी पेटी बसमधे होती. आमच्या सोबत्याने त्या पेटीत पैसे टाकले व स्वत: तिकिटें फाडून घेतलीं. माझ्या मनात आलें "कोणी पैसे टाकल्याशिवाय तिकिटें घेतलीं तर?" पण मी लक्षपूर्वक पाहिलें, कोणी तसें केलें नाही.

"मास्कोमधे कित्येक हजार 'बसेस' असतील. प्रत्येक बसमधे एक कंडक्टर धरला तर कित्येक हजार कंडक्टर पाहिजेत. कशासाठी? यासाठी न की आम्ही तिकिटाशिवाय चोरून प्रवास करू नये म्हणून? जर सर्व लोकांनी प्रवासाच्या नियमांचें स्वत: पालन केलें तर या हजारों व्यक्तींचा योग्य उपयोग दुसऱ्या काही आवश्यक कामासाठी होऊ शकतो." असें श्री. स्लावानें सांगितलें. हेंच तर येथे होत आहे. केवळ बसमधेच नाही, मास्को शहराच्या भू-गर्भ रेल्वेत सुद्धा आम्ही कोणी कंडक्टर पाहिला नाही. साऱ्या मास्को शहराच्या खालीं रेल्वेलाईन पसरलेली आहे. ती जगातील सर्वांत सुंदर भू-गर्भ रेल्वे समजली जाते. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत कुठेहि जा. जायच्या वेळीं स्टेशनांच्या दाराजवळ ५ कोपेकचें एक नाणें एका पेटीत टाका व जा. या सर्व कामासाठी, तिकिट विक्री व तपासणीसाठी एका मोठ्या फौजेची जरूर काय?

आम्ही विश्व-विद्यालयात पोहोंचलो, लुमुंबा विश्वविद्यालय! इथले लोक याला मैत्री विद्यालयहि म्हणतात. जगातील ८० देशांचे विद्यार्थी येथे शिकत आहेत. विश्व-मैत्रीचा व विश्व-बंधुत्वाचा पाया मजबूत करण्यात या विश्वविद्यालयाचें स्थान अपूर्व आहे. जगात या प्रकारची कदाचित् ही एकच संस्था असावी! इथे नाना भाषांचे व संस्कृतींचे तरुण गुण्या गोविंदाने एकत्र राहतात व मैत्रीच्या वातावरणात विद्या प्राप्त

करतात. आम्ही पूर्ण एक दिवस या मैत्रीच्या अद्वितीय मंदिरात घालविला.

या भयंकर थंडीत मास्कोतील झाडें-झुडपें, सडका, व घरांचीं छपरें सुंदर, शुभ्र, शोभिवंत व अत्यंत थंडगार बर्फाने आच्छादिलीं गेलीं होतीं. या शुभ्र चादरीत लपेटलेलें मास्को खरोखर, किती मोहक, किती आकर्षक दिसत होतें !

मास्कोत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची पहिली मनीषा, लेनीनच्या समाधीजवळ जाऊन त्याला आपली श्रद्धांजलि अर्पित करण्याची असते. मानव-समाजाच्या इतिहासांत समाजवादी समाज स्थापण्यात लेनिनच प्रथम सफल झाले. त्यांनीं फक्त सिद्धांतच सांगितले नाहीत तर त्या सिद्धांतांच्या आधारावर एक समाज निर्माण करून दाखविला. आज सोव्हियट देशाला अत्यंत आवडती व अत्यंत आदरणीय व्यक्ति लेनिन आहे. प्रत्येक कचेरीत लेनीनचा हंसरा फोटो आम्हाला आढळला. लेनीनने आपल्या समोर ठेवलेल्या आदर्शाप्रमाणे आपल्याला प्रगति करायची आहे हीच कल्पना रशियात आम्हाला सर्वत्र आढळली. सारा देश त्या मार्गावर निश्चयाने व जोराने प्रगति करीत आहे. महात्मा गांधींचें भारतांत जें स्थान आहे तेंच स्थान लेनीनचें इथे आहे.

त्या दिवशीं पहाटेस थोडें बर्फ पडत होतें. कडक थंडीचें वातावरण होतें. आम्ही आमच्या मुक्कामावरून चालत क्रेमलिन समोरच्या विशाल लाल चौकांत (रेड-स्क्वायर) पोहोंचलो. क्रेमलिनचा अर्थ आहे—किल्ला. मास्को नदीत डोकावणारा ८०० वर्षांचा जुना क्रेमलिन प्राचीन रशियन इतिहासाची मोठी स्मृति आहे. १९१८ पासून याच क्रेमलीनमधे सर्वोच्च सोव्हियट व अन्य प्रमुख सरकारी कचेऱ्या आहेत. क्रेमलीनच्या अगदी समोर लाल चौकात एक लांब रांग उभी होती. नाना देशांचे हजारों स्त्री-पुरुष रोज या प्रमाणें इथे रांग करून सोव्हियट क्रांतीच्या जनकाच्या समाधीजवळ जातात. समाधि-स्थान अगदी अवडंबराशिवायचें व साधें आहे, जसे लेनिन स्वतः होते. आम्ही समाधीमधे पोहोंचलो. रासायनिक द्रव्यांनी सुरक्षित ठेवलेलें लेनीनचें शरीर आजसुद्धा आश्चर्यकारक

कांतिमान् दिसतें. चेहेऱ्यावर एक गंभीर हास्य विलसत आहे. ते डोळे मिटून असे निजले आहेत जणू थकले भागलेले ते जरा आराम घेत आहेत आणि थोड्या वेळाने उठून आपल्याशी वार्तालाप करणार आहेत !

आम्ही क्रेमलिनमधे अंतहि गेलो, जिथे लेनिन सोव्हियट राज्याचे सूत्रधार म्हणून राहत होते, जेथे बसून सोव्हियट संघाच्या भवितव्याची योजना तयार करीत होते, जिथे बसून मजूर व शेतकरी यांच्या समस्या सोडवीत होते, जिथे आपली पत्नी क्रूप्सकाया हिच्या बरोबर भोजन करत होते, जिथे बसत होते, झोंपत होते, हीं सर्व स्थानें आम्ही पाहिलीं. जी वस्तु लेनिनच्या वेळी जशी होती, आज सुद्धा ती वस्तु तशीच ठेवली आहे. किती साधें-सुधें जीवन ! किती थोड्याशा सामान्य वस्तूंनीं ते आपलें काम चालवत होते ! त्यांचें राहण्याचें ठिकाण पाहून हें समजणें कठिण होतें की हें स्थान सोव्हियट संघासारख्या विशाल देशाच्या शासकाचें निवास-स्थान असेल ! एका सामान्य मनुष्याचें जीवन जगूनहि आपल्या त्यागामुळे व बलिदानामुळे लेनिन महान पुरुष बनले आणि त्यांनीं जगाच्या इतिहासाला एक नवें वळण दिलें. सोव्हियट संघाचें आज जें स्वरूप आहे त्याचा पाया स्वत: लेनीननें घातला.

आम्ही लेनिन-संग्रहालयहि पाहिलें. रशिया बाहेर, स्वित्झरलंड, जर्मनी इत्यादि देशांत राहून कशा रीतीनें त्यांनी क्रांतीची मशाल पेटविलीं, इस्क्रा, प्रावदा आदि वृत्तपत्रें कशीं चालविलीं, जनतेला त्यांनी केवळ संघर्षासाठीं जागृतच केलें नाही तर शिक्षितहि कसें केलें, आणि कष्ट भोगत असतांना संपूर्ण देशांत त्यांनीं बंडाची लाट कशी उसळविली याचें एक जिवंत दर्शन आम्ही या संग्रहालयांत पाहिलें. मजूर व किसान यांच्या दयनीय अवस्थेमुळे लेनिन यांच्या हृदयात एक तीव्र वेदना निर्माण झाली आणि त्यांनी आपल्या जीवनाचें एकच एक ध्येय, या मजूर-किसानांना जगण्याचा समान अधिकार प्राप्त करून देणें हें ठरविलें. जेव्हा सोव्हियट क्रांति सफल झाली, तेव्हा त्यांनीं मजूर-किसानांसाठी जीवनाच्या सर्व साधनांच्या प्राप्तीचा मार्ग धुंडाळला. सोव्हियट क्रांतीचा प्रथम परिणाम होता—उत्पादनांच्या साधनांवरील व्यक्तिगत स्वामित्वाची समाप्ति

आणि व्यापार-धंद्यांच्या माध्यमांतून होणाऱ्या उत्पादक व उपभोक्त्यांच्या शोषणाचा अंत. जो खातो त्याने अवश्य काम केलें पाहिजे आणि जो काम करतो त्याला पुरेसें भोजन मिळालें पाहिजे, हा लेनिनचा पहिला विचार होता. संग्रहालय पाहतांना आम्हाला हें दिसून आलें की सोव्हियट देशाच्या विकासाची सर्वांत वरची पायरी चढण्यासाठी त्यांच्या डोक्यांत कशा कशा योजना होत्या.

लेनिन एक व्यक्ति नाही, विचार आहे. त्या विचाराला आत्मसात् करण्याचा परिणाम होईल––शांति, श्रम, आणि समता. त्यांच्या समाधीवर जाऊन आम्ही शांति, श्रम व समतेचा धडा घ्यावा. हीच त्यांना वाहिलेली सर्वांत मोठी श्रद्धांजलि !

मास्को शहर आमचा पहिला टप्पा होता. दिल्लीहून निघालों—मास्को व वॉशिंगटनसाठी. पहिला टप्पा गांठल्याची विशेष प्रसन्नता आमच्या हृदयांत उचंबळून येत होती. मास्कोत आमच्या मिशनप्रमाणे कार्यक्रम चालू होता. सोव्हियट शांति-परिषदेचे अध्यक्ष, मंत्री व सदस्य यांच्याशीं दोन दिवस आमची चर्चा झाली. आम्ही आमच्या यात्रेची योजना, संस्मरणें वगैरे सांगितलीं. निशस्त्रीकरण व अण्वस्त्रांच्या प्रयोगांच्या बाबतीत आमच्या दृष्टीची त्यांना कल्पना दिली. "काही झालें तरी, अणु-प्रयोगांवर तावडतोब प्रतिबंध लागू करावा, सोव्हियट सरकारनें त्यासाठी पहिलें पाऊल टाकावें आणि लांब-लचक वाद व चर्चा न करतां लौकरांत लौकर या समस्येचा संतोषकारक निकाल कसा लागेल या दृष्टीनें विचार व्हावा. आम्ही या कार्याप्रीत्यर्थ आमचें शक्ति-सामर्थ्य सर्वस्व लावून शांततेसाठी केल्या जाणाऱ्या संघर्षात आमचें जीवन अर्पिण्यास तयार आहो" या प्रमाणे आम्ही आमची बाजू मांडली.

विश्व-विद्यालयाचे विद्यार्थी असोत किंवा एखाद्या कारखान्याचे मजूर असोत, खेड्यांतील शेतकरी असोत किंवा शहरांतील बुद्धि-जीवी असोत, प्रयोगशाळेंतील वैज्ञानिक असोत किंवा हॉटेल-मधील वाढपी महिला असोत इथें सर्वांच्या मनांत समान रूपेण शांततेची आकांक्षा आहे आणि युद्धांबद्दल घृणा आहे. चार घरांच्या गांवापासून मास्कोसारख्या शहरापर्यंत सर्वत्र

लोक आम्हाला वारंवार एकच प्रश्न विचारीत : "कशासाठी पायीं चालत आहात ?" त्याला आमचें उत्तरहि एकच होतें : "शांततेसाठीं." लोक ताबडतोब म्हणत असत : "आम्हीहि 'शांततेसाठी' आहोत. सर्वजण 'शांततेसाठी' आहेत." तरीपण शांतता होत नाही. जे 'शांततेसाठी आहेत' तेच 'युद्धासाठी' तयारी करीत आहेत. कोणाला माहीत नाहीं की ही तयारी कशासाठी चालू आहे ?

मास्को जगात एक असें स्थान आहे जिथें युद्ध व शांतीच्या प्रश्नावर निरंतर चर्चा चालू असते. मास्को जगातील त्या दोन नगरांपैकी एक आहे जेथे युद्ध व शांतीचे प्रश्न निर्माण होतात आणि जेथे त्या प्रश्नाचें उत्तर शोधलें जातें. आम्ही जेव्हा ३२ मजल्यांच्या भव्य विश्व-विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सभेत युद्ध व शांतीच्या प्रश्नावर भाषण द्यायला गेलो, तेव्हा आम्हाला वाटलें, तेथील कणा-कणात युद्ध व शांतीचा प्रश्न भरलेला आहे. २२ हजार विद्यार्थ्यांना ज्ञान-विज्ञान व कलेचें शिक्षण देणारें हें स्थान एका विचित्र हालचालीने भरलेलें होतें. व्हियेटनाम व इराक सारख्या देशांत घडलेल्या घटनांच्या चित्रांनी भरलेल्या भितींजवळ जोरजोराने युद्ध व शांतीच्या प्रश्नावर वाद-विवाद होत होते. आम्ही विश्व-विद्यालयाच्या तरुणांबरोबर कित्येक तास घालविले तेव्हा असें दिसून आलें की सर्वजण केवळ एकाच प्रश्नाचें उत्तर शोधीत आहेत. त्यांचा प्रश्न आहे "जर सर्वजण शांतीसाठी उत्सुक आहेत तर युद्धासाठी का तयारी चालली आहे ?"

विश्व-विद्यालयात माझ्या हिंदी भाषणाचा अनुवाद करणारी कुमारी लुद्मीला फारच चांगलें व शुद्ध हिंदी बोलत होती व मीराबाईचीं भजनेंहि फार मधुर स्वरात गात होती.

मास्को विश्व-विद्यालय चेतनाशील, प्राणवान, जागृत विद्यार्थ्यांची विद्या-भूमि आहे. ते केवळ आपल्या पुस्तकांतले किडे नाहीत तर जागतिक प्रत्येक समस्येशी परिचित आहेत, आणि त्याचें समाधानकारक उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतात. आणि त्याच्या समाधानाप्रीत्यर्थ ते सर्व प्रकारचा त्याग करायलाहि तयार आहेत. आमच्याशी चर्चा केल्यानंतर

अशा विद्यार्थ्यांची रांग लागली जे आपलें शिक्षण सोडून, घरादाराची चिंता सोडून आमच्या बरोबर पदयात्रेंत यायलाहि तयार झाले. त्यांना जेवण्या-खाण्याची पर्वा नव्हती, जरूर पडल्यास त्यांना सरकारी नीतीच्या विरुद्ध बोलण्याची सुद्धा काही भीति वाटत नव्हती. त्यांच्या मनांत एक आग होती, एक साहस होतें, एक तळमळ होती. आम्ही त्यांच्या तीव्रतेवर मुग्ध झालो. असे चार विद्यार्थी जेव्हा आमच्याबरोबर येऊ इच्छित होते, रात्ररात्र आमच्याशी गोष्टी करीत बसत. सर्व तयारीने ते आमच्याबरोबर यायची इच्छा करीत होते. पण सरकारची परवानगी न मिळाल्यामुळें येऊ शकले नाहीत.

मास्कोचे मुख्य रस्ते, मास्कोचीं भुवनें आणि मास्कोचे लोक आम्हाला चिरपरिचिताप्रमाणें झाले. मास्कोने आम्हाला इतकें आपलेंसें केलें की जेव्हा आम्ही त्यांना 'दास्वीदानिया' (निरोप घेतांनाचा रशियन नमस्कार) म्हणू लागलो तेव्हा आम्हाला भासलें की आम्ही येथलेच रहिवाशी आहोत. मास्कोवाशियांची सरळ, सहज स्वाभाविकता, त्यांचें चरित्र व त्यांच्या वागणुकीने आमच्या चित्तावर न पुसला जाणारा प्रभाव टाकला. तो प्रभाव पुन्हा पुन्हा मास्कोला जाण्यासाठी आम्हाला प्रेरणा देत आहे. दुकानदाराशिवायच्या दुकानांत, किंवा कंडक्टराशिवायच्या बसमधेहि सामान्य मास्कोवासी नागरिकांना तुम्ही तितकेच नैतिक व जवाबदार पहाल जितके जवाबदर ते आपल्या घरीं आपल्या परिवारासाठी असतात. मास्को आपल्या आसपासच्या उपनगरांसह भल्लें लांब-रुंद शहर आहे. तें सारखें वाढून राहिलें आहे. इमारती इतक्या लौकर निर्माण होतात की एका आठवड्यापूर्वी जेथे काही नव्हतें तेथे दुसऱ्या आठवड्यात इमारतींची रांगच रांग पहायला मिळेल. मास्कोतील कारागिरांनी तेथील इमारतींना एक विशिष्ट 'वास्तु' दिला आहे. क्रेमलिन व परराष्ट्र-कचेरीपासून ते युक्रेन हॉटेल व विश्व-विद्यालयाच्या इमारतीपर्यंत एक विशिष्ट कला दृष्टिगोचर होईल. या इमारतींच्या घुमटांच्या आकारांच्या शिखरांवर शांति व मैत्रीचा प्रतीकरूप तारा चमकत असतो.

मास्कोत आमची मुलाखत सर्वोच्च सोव्हियटचे अध्यक्ष श्री. स्पिरिदोनोवशी झाली आणि त्यांच्यासमोर, क्रेमलिनमधे, रशियाने एक-पक्षीय नि:शस्त्रीकरण करावें अशी आम्ही मागणी ठेवली. दीड तासाच्या आमच्या चर्चेत त्यांनी आम्हाला सोव्हियट धोरणाची माहिती दिली.

## टॉलस्टॉयच्या घरीं

१९५५ ची गोष्ट. मी रोज तीन-चार तास शेतात काम सुरू केलें होतें. जुन्या संस्कारामुळे मनांत कधी-कधी विचार येई "अशी शेती करण्यात जी हिंसा होत आहे त्यांत प्रवृत्त होणें मला योग्य आहे काय ?" या अन्तर्द्वंद्वाची चर्चा मी आपल्या मित्रांबरोबर करीत असें. एके दिवशीं माझे प्रिय मित्र श्री द्वारकोजी यांनी टॉलस्टॉयचें एक पुस्तक मला वाचायला दिलें—"आम्ही करावें काय ?" पुस्तकाच्या नांवानेंच माझ्या-वर जादू केली. समाजाविषयीं खोल विचार करणाऱ्या प्रत्येक तरुणाच्या डोक्यांत हा प्रश्न घोळत असतो. माझ्या डोक्यांतहि जगभरचे पेंच ठाण देऊन बसले होते. एका आठवड्यांत मी तें पुस्तक वाचून टाकलें. श्रम-जीवना-कडे आकृष्ट व्हायला हें पुस्तक मला गुरुस्थानीं झालें. मनांत आलें सर्व धंदे सोडून देऊन शेतीच्या कामाला लागून जावें. नंतर जो वेळ वाचेल त्या वेळीं या पुस्तकाचा प्रचार करावा. मी मानतों की प्रत्येक तरुणानें जर ह्या पुस्तकाचा अभ्यास केला तर समाजात आर्थिक क्रांतीचा पाया पुष्कळ मजबूत होईल. हें पुस्तक वाचल्या दिवसापासून माझ्या हृदयांत एक वादळ निर्माण झालें. तेव्हापासून माझ्या डोक्यांत एक खळबळ सुरू झाली आणि जीवनांत एका नव्या प्रेरणेचें दर्शन झालें.

टॉलस्टॉयच्या जीवनाचें सर्वश्रेष्ठ सार "युद्ध आणि शांति" नांवाची कादंबरी मी जेव्हा वाचली तेव्हापासून तर डोक्यांत एक अशी खिडकी खुलली जेथून प्रकाश-किरणांचा लाभ मला झाला. युद्धाविरुद्ध शांति-आन्दोलनात आपलें जीवन समर्पण करण्याची जी माझी तयारी आहे तिच्या पायाचा दगड ही महान कादंबरीच आहे. राजघाटावरून बापूंच्या समाधीपासून जेव्हा आम्ही पायीं यात्रेला निघालो तेव्हा क्षणभरात विचार-तरंग राजघाटापासून यास्नायापोल्यानापर्यंत जाऊन पोहोंचलें. एका



श्री सिद्धराज ढड्ढा निरोप देत आहेत.


मास्को






पोलंडची राजधानी, वारसा, जें युद्धांत ध्वस्त होऊन पुनर्जीवित झाले आहे.

# बर्लिन










पॅरिसच्या मधोमध असलेली रमणीय सुंदर नदी, सेन किनाऱ्यावर जगद्विख्यात अद्भुत कलाकृति : नोट्रदाम चर्च




पॅरिसांत अण्वस्त्र-विरोधी निदर्शनापूर्वी पत्रकाराशी बोलतांना
मध्यभागीं फ्रांसचे निष्ठावान् शांतिवादी, जो पिरोने.

ठिकाणाहून अहिंसा व विश्व-शांतीचा सक्रिय आदर्श मिळाला तर दुसऱ्या ठिकाणाहून वैचारिक पाया मिळाला.

१७ फेब्रुवारी जीवनाचा एक अविस्मरणीय दिवस झाला. १२ फेब्रुवारीला आम्ही बापूंचें पुण्यस्मरण केलें आणि त्या स्मरणानें आम्हाला अण्वस्त्रांविरुद्ध अत्यंत तीव्र संघर्ष करण्याचें बळ दिलें. बरोबर चार दिवसांनीं बापूंचे महान वैचारिक साथी श्री टॉलस्टॉय यांच्या समाधीपाशी आम्ही पोहोंचलो. तेव्हा काही वेळ असें वाटलें, जणू काही, या दोन विभूति एकाकार होऊन जगाला मैत्रीची व सत्याची प्रेरणा देऊन राहिल्या आहेत.

५० वर्षांच्याहि पूर्वीची गोष्ट आहे. एक लांब शुभ्र दाढीवाला विचारक, बर्फानें आच्छादिलेल्या आणि उंच-उंच वृक्षांनीं घेरलेल्या एका छोटयाशा घरांत काही विचार करीत होता व काही लिहीत होता. दुसरीकडे मातीच्या एका लहानशा झोंपडीत गुडघ्यापर्यंतचा पंचा नेसलेला, आपल्या डोक्यात सामाजिक क्रांतीचें एक चित्र चितारित राहिला होता. एकाचा विचार आणि दुसऱ्याचें चित्र ! दोघांनी एकमेकांना कधी पाहिलें नाही, दोघे एकमेकांना कधी भेटले नाहीत, परंतु दोघांनीं जीवनाचें सत्य ओळखलें आणि दोघे अशा एका टोंकाला जाऊन पोहोंचले, जें खरोखर मानवाचें ध्येय आहे.

टॉलस्टॉयच्या घरीं पोहोंचलो तेव्हां आम्ही प्रथम त्यांचें जन्म-स्थान पाहिलें. या विवेकी पुरुषाचा जन्म १८२८मधे झाला होता. पूर्वी या ठिकाणीं एक मोठा वाडा होता. आज तेथे फक्त एक शिलालेख आहे. नंतर आम्ही त्या ऐतिहासिक वृक्षाच्या छायेंत पोहोंचलो जेथें टॉलस्टॉय आसपासच्या हीन-दीन, गरीब शेतकऱ्यांना भेटत होते, त्यांच्या अडीअडचणी ऐकत होते आणि त्यांच्या मागण्या पुऱ्या करीत होते. टॉलस्टॉयचें व्यक्तित्व दर्शविणारें त्यांचें एखादें वैचारिक नांव ठेवावयाचें असल्यास त्यांना ‘करुणा-मूर्ति’ म्हणणें अधिक उपयुक्त होईल. त्या युगात, जेव्हा या देशाचे ग्रामीण किसान उपेक्षित च होते आणि त्यांचीं पोरेंबाळें तर फारच खराब परिस्थितींत होतीं तेव्हा टॉलस्टॉयने आपल्या

शेतावरील एक घर त्या मुलांच्या शिक्षणावगैरेसाठी खुलें केलें आणि आपला स्वतःचा वेळ त्या छोटयांच्या देखरेखीसाठी घालवूं लागले. सन- १८२८ ते १९१० पर्यंतचें त्यांचें संपूर्ण जीवन एक करुणामय हृदयाची आकर्षक कहाणी आहे.

पत्नी व १३ मुलें एवढया मोठया परिवारासह टॉलस्टॉय ज्या सुंदर घरात राहत होते, त्या घरात जेव्हा आम्ही प्रवेश केला आणि एक एक वस्तु ध्यानपूर्वक पाहू लागलो तेव्हा आम्हाला भास झाला की जणू टॉलस्टॉय आत्ता-आत्ताच इथे होते, थोडया वेळापूर्वी कुठे गेले असतील. त्या घरातील प्रत्येक वस्तु, प्रत्येक सामान आणि प्रत्येक सजावट अगदी त्याचप्रमाणे आजसुद्धा सुरक्षित आहे, जशी टॉलस्टॉय जिवंत असताना होती. लाकडी ग्रामोद्योगी चमच्यापासून मोठया पियानोपर्यंत, मोठया मौनभाषेत टॉलस्टॉयची जीवन-कथा सांगून राहिले होते. ज्या खुर्च्यांवर ते बसत होते, ज्या टेबलावर ते लिहीत होते व ज्या शैय्येवर ते झोंपत होते त्या सर्व वस्तु खरोखर आमच्या मनावर असा प्रभाव टाकत होत्या त्याचें वर्णन शब्दाने करणें अशक्य आहे. दोन्ही पियानो जणू सांगत आहेत की टॉलस्टॉय केवळ विचारक, लेखक किंवा क्रांतिकारकच नव्हते तर ते एक महान संगीत-प्रेमीहि होते. त्यांनी आपल्या लेखन-खोलीत हेनरी जॉर्ज आणि चार्लस डिकन्स यांचीं सुंदर चित्रें टांगून ठेवलीं होतीं. याचा अर्थ टॉलस्टॉयना या दोन विभूति अत्यंत प्रिय होत्या.

आर्थिक क्रांतीचें जें सूत्र टॉलस्टॉयने प्रगट केलें त्याचा सर्वांत पहिला परिणाम निघाला—शरीर-परिश्रम. श्रम केल्याशिवाय मनुष्याला जगण्याचा व खाण्याचा हक्क नाही. या क्रांतिकारी विचारानें टॉलस्टॉयनें स्वतःचा जीवन-क्रमहि बदलून टाकला. सुमारें एक हजार एकरांचें (३८४ हेक्टर) फार मोठें स्वतःचें फार्म होतें तरी त्यांनीं जोडे शिवण्याचें काम सुरू केलें. खांद्यावर पावडें टाकून ते स्वतःच्या फार्मवर निघाले ही सर्वांत मोठी क्रांति होती. आपल्या कादंबऱ्यातून केवळ उच्च आदर्शवादी नायक चित्रित करूनच आपली 'इति कर्तव्यता' न मानतां त्यांनीं त्या आदर्शांना आपल्या जीवनात क्रियात्मक रूप दिलें.

अहिंसा व प्राणिमात्रांवर प्रेम या भावनांनीं टॉलस्टॉयला शाकाहारी बनवलें. त्या युगात रशियासारख्या देशात शाकाहाराची कल्पनासुद्धा विचित्र वस्तु होती. परंतु टॉलस्टॉयचा करुणा-स्रोत केवळ मानवापर्यंत च सीमित राहू शकला नाही. त्यांचे प्रियोत्तम मित्र श्री. मैकोवीत्स्की त्यांच्याच घरीं ६ वर्षें राहिले. आपल्या मुला-बाळांना घरात झोंपलेले टाकून आपल्या लाडक्या मुलीसह त्यांनीं शेवटच्या रात्री जेव्हा महाभिनिष्क्रमण केलें तेव्हा डॉ. मैकोवीत्स्की हे सर्वांत अधिक त्यांचे सहायक होते. त्या रात्रीची हृदयद्रावक कथा सर्वांना माहीत आहे. वृद्ध टॉलस्टॉयच्या डोक्यांत त्या रात्रीं जें तुफान उसळलें होतें तें तुफानच एका मोठ्या कादंबरीची भूमिका होती, पण ती कादंबरी लिहिली गेली नाही.

२२ हजार पुस्तकांच्या ज्ञान-विज्ञानमय परिघात टॉलस्टॉयने आपले विचार परिपक्व केले. १५ भाषांच्या या पंडिताने किती कुशलता-पूर्वक या हजारों पुस्तकांचें नुसतें अध्ययनच केलें नाही तर त्या साऱ्या ज्ञानाला आपल्या मनात पचवून त्यांनी विश्व-साहित्याला जें गंभीर नेतृत्व दिलें तें शेंकडों वर्षें जगाला सत्याचा मार्ग दाखवीत राहील.

सोव्हियट-शांति-परिषदेने आमच्या या प्रवासाची व्यवस्था केली. त्यांनी आमच्यासाठी एक स्पेशल कार दिली. आम्ही सकाळीं ८ वाजता निघालों; व तीन तासांत मास्कोहून २०० किलोमिटर वर टॉलस्टॉयच्या चिरस्मरणीय स्थानावर पोहोंचलो. ५ तास तेथे फिरून आम्ही त्या स्थानाची पूर्ण प्रदक्षिणा केली आणि त्याच दिवशीं सायंकाळीं ७ वाजता आम्ही मास्कोच्या विजेने चमकत असलेल्या लांबरुंद सडकांवर परत येऊन पोहोंचलो.

टॉलस्टॉय, तुम्हाला माझे प्रणाम !
टॉलस्टॉय ! अहो, टॉलस्टॉय ! !
तुमचें दुसरें नांव आहे—मानवता
आणि माझ्यासाठी तुमच्या नांवाचा अर्थ आहे—सत्य !
कारण तुम्ही सत्याचा शोध केला,

सत्य-प्राप्तीसाठी लिहिलें
ज्या सत्याचें तुम्हाला दर्शन झालें
त्यासाठी आपलें जीवन तुम्ही समर्पित केलें.
तुम्हाला टॉलस्टॉय म्हणू ?
की मानवतेचें प्रतिबिंब म्हणू ?
की केवळ सत्य म्हणू ?
कारण मला तुम्ही एक व्यक्ति नाही, एक विचार आहात.

## पुन्हा रशियन गांवांत

मास्को नगरांतील गगनचुंबी सौधांच्या चक्रांतून बाहेर पडून जेव्हा आम्ही छोटया-छोटया वस्तीच्या ग्रामीण किसानांत पोहोंचलों तेव्हा आम्हाला एका नव्या दुनियेचें दर्शन झालें. जेथे अनेक युद्धें झालीं असा तो भाग होता. येथील प्रत्येक ग्रामीण युद्ध म्हणजे काय, हें जाणतो. आमच्या बरोबर आता कोणी दुभाष्या किंवा वाटाडया नव्हता. जिथे आम्हाला जायचें असेल, जिथें आम्हाला उतरायचें असेल, ज्याला आम्हाला भेटायचें असेल, कोणत्याहि बाबतीत आम्हाला प्रतिबंध नव्हता. आम्ही प्रत्येक माणसाशीं पूर्ण मोकळेपणाने खुल्या दिलाने गोष्टी केल्या. या ग्रामीण-बंधूंच्या मनामधे युद्धाबद्दल भयंकर तिरस्कार होता असे आम्हाला आढळलें. हिटलरच्या सैन्याने दुसऱ्या महायुद्धांत ज्या क्षेत्राची धूळधाण केली होती तेथील भूमीचें हे किसान व मजूर पुर्ननिर्माण करीत होतें. तेथील सर्व काही मातींत मिसळून गेलें होतें. आता तेथें नवीं-नवीं घरें बांधलीं जात होतीं. गांव वसत होतें. वस्त्या समृद्ध होत होत्या. कारखाने उभे होत होते. सडका, स्कूल व दवाखाने बनून राहिले होते. या भूमीचें निर्माण करणारे शेकतरी, व मजूर आम्हाला म्हणत होते : "तुम्ही अमेरिकेला जात आहात. अमेरिकन मित्रांना आमचा हा निरोप कळवा की आम्ही हें सर्व निर्माण-कार्य यासाठी करीत नाही की एखादा अणु-बॉंब याच्यावर पडावा आणि क्षणांत सर्व काही स्वाहा होऊन जावें. आम्ही अमेरिकनांच्या बरोबर शांतीनें व मैत्रीनें राहू इच्छितो."

ग्रंथ शाखा

एक दिवस एका छोट्या गांवात आमचा मुक्काम होता. एक किसान आमच्याकडे आला. आपल्या निळ्या डोळयांनी त्याने आम्हाला नखशिखांत निरखून पाहिलें. नंतर आमच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला "मी ऐकलें आहे की तुम्ही शांतीचे दूत आहात. भारताहून आले आहात. येथून अमेरिकेला जाणार आहात. हें खरें आहे काय ?" आमच्या होकारा नंतर तो म्हणाला : तुम्ही अमेरिकन मित्रांना माझा एक निरोप पोहोंचवा. त्यांना सांगा की तुमच्या देशांत युद्ध लढलें गेलें नाही. युद्धाचें विष किती भयंकर असतें याची तुम्हाला कल्पना नाही. आम्हाला त्याचा अनुभव आहे. आमच्या अनुभवावरून तुम्ही धडा घ्या. युद्धाच्या नुसत्या कल्पनेनेच आमच्या अंगावर शहारे येतात. म्हणून युद्धाची तयारी बंद करण्याच्या एकच एक मार्गावर आपल्या दोन्ही देशांच्या लोकांनी सहकार्य करण्याची वेळ आली आहे." तो शेतकरी अत्यंत कळकळीने बोलत होता. त्याने आपलें म्हणणें सांगितलें व आम्हाला आलिंगन देऊन आमचें चुंबन घेतलें. अशाप्रकारचे प्रसंग कित्येक वेळां आमच्यावर येत असत.

"युद्धात माझा भाऊ मारला गेला. माझा बाप मारला गेला. मी एकटाच वांचलो." एकजण सांगत होता.

"युद्धात माझा पायच खतम झाला. मी लंगडा झालो." दुसरा सांगत होता.

"युद्धात माझा डोळा गेला; माझा हात गेला ; मला युद्धाने बेकाम बनविलें !" तिसरा सांगत होता.

आणि अशा प्रकारच्या युद्धपीडित लोकांकडून रोजच्या रोज युद्धाच्या गोष्टी ऐकायला मिळत होत्या. एका छोट्याशा गांवात एकदां आम्ही उतरलो होतो. ज्या घरांत आम्ही होतो त्यात फक्त दोन म्हाताऱ्या होत्या. त्यांच्या परिवारांतील सर्व पुरुष युद्धासुराने गट्ट केले होते. दुसऱ्या एका गांवात वृद्ध पति-पत्नी आपल्या तरुण मुलांना युद्धांत समर्पण करून कसेंतरी दु:खी-कष्टी जीवन व्यतीत करीत होते. अशा गांवातून वसलेल्या लोकांबरोबर वेळ घालवणें, गोष्टी करणें, आणि अनुभव मिळवणें इत्यादीमुळे आम्हाला मानव-जीवनाचें खरें दर्शन होत

होतें. रशियन खेड्यांत वसलेल्या मजुरांची एकच इच्छा आहे — वाटेल तें होवो, पुन्हा युद्धाची आग न भडको !

आम्ही कोणत्याहि गांवात गेलों की रशियन ग्रामीण लोक आम्हाला चोहोंबाजूंनी घेरून घेत. आमच्या उतरण्याची, खाण्याची, आरामाची, आणि सर्व प्रकारच्या सोयींची व्यवस्था क्षणात होत होती. आम्ही कोणाच्याहि दारीं गेलो की तें घर आमचेंच घर बनून जाई. भारतावर व भारतीय लोकांवर हे लोक अपार प्रेम करतात.

मास्कोहून आम्ही आमची पद-यात्रा शून्याच्या खाली ३० डिग्री अशा भयंकर थंडींत सुरू केली होती. सोव्हियट शांति-परिषदेचे मित्र या थंडीमुळे फार भीति-ग्रस्त होते. अशा थंडीत आम्हाला बाहेर पडण्याचा सल्ला द्यायला ते मुळीच तयार नव्हते. त्यानी मास्को ते वारसापर्यंत आमच्यासाठी विमानांत जागा रिझर्व्ह करून विमानाचीं तिकिटें आम्हाला काढून दिलीं. आम्ही त्या तिकिटांचा स्वीकार न करता आपली पद-यात्रा सुरू केली. आम्हाला आत्मविश्वास होता की ज्या थंडींत रशियन लोक संपूर्ण जीवन-क्रम चालवितात, सर्व कामें करतात, तेथे आम्हीहि जिवंत राहू शकू. हें खरें की सैबेरियाकडून येणाऱ्या तीव्र बर्फाच्या तुफानानें आमचे हात-पाय आखडूं लागले, तोंड लाल होऊं लागलें, नाकांतून पाणी वाहूं लागलें व तें पाणी दाढीमिशीत अडकून त्याचें बर्फ बनूं लागलें. हा त्रासदायक हिवाळा आम्हाला एक नवा अनुभव देत होता. ज्या थंडीने हिटलरच्या सैन्याला शरण आणलें, त्या जग-प्रसिद्ध रशियन हिवाळ्याचें आम्ही प्रत्यक्ष दर्शन घेतलें. जेव्हा घरांचीं छपरें बर्फाने आच्छादित झालीं आहेत, रस्ते बर्फाने भरलेले आहेत, झाडें-झुडपें बर्फाने झांकलेलीं आहेत आणि संपूर्ण पृथ्वी बर्फाच्या पोशाखांत लपेटली गेली आहे त्यावेळीं निसर्गाची शुभ्र-थंड मोहकता पहात पहात मुक्त संचार करणें किती मधुर असतें याची कधी कल्पनाहि करता येणार नाही. आम्ही आमच्या जीवनांत इतकें आणि अशा बर्फाचें पहिल्या प्रथमच दर्शन केलें.

आम्हा शांति-यात्रिकांच्या बरोबर एखादा चित्रकार असता तर तो या सुंदर गांवांचीं चित्रें काढूं शकला असता ! तरी पण हें चित्र आमच्या

मानस-पटावर चांगल्या तऱ्हेने चित्रित झालें आहे. भारतीय खेड्याप्रमाणेच हीं लहान-लहान रशियन गांवें आहेत. लहान-लहान लाकडी घरें. माती, विटा, दगड, चुना यांचीं नाहीत परंतु लाकडी घरेंच येथील हवामानांत अधिक सोयीची व अनुकूल असतात. या घरांत राहणारे शेतकरीहि भारतीय शेतकऱ्याप्रमाणे सरळ स्वभावाचे असतात. पण भारतांतील गांवांतल्याप्रमाणे बेकारी, निरक्षरता, रोगराई, आणि गरिबी यांचें साम्राज्य येथे नाही. तुम्हाला बाहेरून दिसणारें एक साधारण झोपडें आतून उत्तम रीतीनें सजलेलें दिसेल. आरामशीर पलंग, आणि कोच (सोफा) प्रत्येक घरांत सामान्यपणे एक आवश्यक वस्तु म्हणून दिसेल. एका कोपऱ्यात लेनिनच्या चित्राखाली पुस्तकांनी भरलेलें कपाट, त्याच्या जवळच आधुनिक कपबशा वगैरेंचें दुसरें कपाट व सुंदर फर्निचर सजलेलें दिसेल. शरीराने धडधाकट आणि स्वभावाने मेहनती रशियन शेतकरी जगातील राजनैतिक आणि आर्थिक घडामोडींशी परिचित असतात. प्रत्येक घरांत वृत्तपत्रें मासिकें निश्चितच आढळत होतीं. 'क्रेमलिन' आणि 'व्हाइट-हाऊस' मधील दैनंदिन बातम्या ऐकण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याकडे घरात रेडिओ ठेवलेला असतोच. गांवोगांवी टेलिव्हिजनाचा विस्तार व्यापकरूपाने झाला आहे. सिनेमाहि गांवागांवांत पहायला मिळतात. याप्रमाणे रशियन खेड्यांतील लोक आधुनिक व भौतिक जीवनाच्या दिशेने प्रगति करीत आहेत.

५० फूट रुंद आणि क्षितिजाचा अंत पाहणाऱ्या सरळ व लांबच लांब सडकेवर पावलें टाकीत आम्ही आमचा प्रवास पुढे चालू ठेवला होता. "**चरन् वै मधुविन्दति**" चा प्रत्यक्ष अनुभव आम्हाला रोज होत होता. आमचें एक च प्रेरणा-सूत्र होतें : "**चरैवेति ! चरैवेति !!** "

## रशियांत जेव्हा व्हीसा रद्द झाला

तेहरानमधे व्हिसा मिळाल्यानंतर आम्ही रशियन-भूमीत प्रवास करीत मास्कोला पोहोंचलों. मास्कोत एके दिवशीं समजलें की आमच्या व्हीसाची मुदत रद्द केली गेली. पण व्हिसा रद्द झाल्यावर सुद्धा आम्ही प्रवास करीत राहिलो. हा होता गैर-कायदा प्रवास. होऽय ! सोव्हियट संघात

आम्ही ४५ दिवसपर्यंत गैरकायदा प्रवास करीत होतों. आमचा पासपोर्ट च या गोष्टीचा पुरावा आहे. आम्हाला १ जानेवारी '६३ ते ३० एप्रिल पर्यंतचा व्हिसा तेहरानच्या सोव्हियट वकिलातीतून मिळाला. परंतु मास्को-मधे आमच्या पासपोर्टावर ही नोट लिहिली गेली की आम्हाला १४ मार्चपूर्वी मास्को विमान तळावरून निघून जायला पाहिजे. आमचा पासपोर्ट या गोष्टीची साक्ष देतो की १ मे '६३ रोजीं आम्ही पोलंडमधे प्रवेश केला, आणि त्यापूर्वी आम्ही रशियन भूमींतच प्रवास करीत होतो.

आमचा व्हिसा कां रद्द केला गेला ? हा एक असा प्रश्न आहे ज्याचें स्पष्ट उत्तर आम्ही स्वत:हि देऊं शकत नाही. सोव्हियट सरकारकडून आमच्या यात्रेला पूर्ण समर्थन मिळालें. प्रधानमंत्री क्रुश्चेव यांनीं स्वत: आम्हाला लिहिलें की तुमच्यासारख्या व्यक्तींची ही शांति-यात्रा नि:शस्त्रीकरणासाठी अनुकूल वातावरण बनविण्यास असाधारणपणे सहायक होईल. सर्वोच्च सोव्हियटचे अध्यक्ष श्री. स्पिरिदोनोव्ह यांच्याशी आम्ही जेव्हा गोष्टी केल्या तेव्हा त्यांनी मन:पूर्वक आमच्या कार्याला अनुमोदन दिलें. आमच्याशी मतभेद असण्याचें बाजूलाच राहिलें, उलट आमच्या प्रवासासाठी सरकारची पूर्ण सहानुभूति होती. आम्ही रोजच्या-रोज शेंकडो व कधी-कधी हजारो रशियन शेतकऱ्यांना व मजुरांना भेटत होतो, आणि त्यांचें असाधारण स्वागत व आतिथ्य प्राप्त करीत होतो. कम्युनिस्ट पार्टीचें दैनिक पत्र 'प्रावदा' आणि सरकारी दैनिक 'इझवेस्तिया' यांच्यापासून तों शेंकडो लहान मोठया वृत्तपत्रांनी आमच्या प्रवासाच्या समर्थनार्थ लेख, गोष्टी, आणि फोटो प्रकाशित केले होते. इतकें असूनहि आमचा व्हिसा कां रद्द केला गेला ?

आम्ही तेथे सोव्हियट शांति-परिषदेचे पाहुणे होतों. शांति-परिषदेचे अध्यक्ष श्री. टीखोनोव्ह आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीचे ज्येष्ठ कवि आहेत, आणि त्यांचें व्यक्तित्व अद्‌भुत आहे. सोव्हियट शांति-परिषदेनें आमच्या प्रवासात सर्व प्रकारें मदत केली. जेव्हा आम्ही रशियन भाषा जाणत नव्हतो तेव्हा रोज इंग्रजी शिकविणारा शाळेचा शिक्षक आमच्याकडे पाठवीत होते. लहान-लहान गांवात आमच्यासाठी सभा करणें व आम्हाला उतरविणें

वगैरेची सर्व व्यवस्था सोव्हियट शांति-परिषदेने केली. आम्ही जेव्हा मास्कोला पोहोंचलो तेव्हा तेथील भयंकर थंडीचा सामना करण्यासाठी ओव्हरकोट व गरम कपडे यांची आम्हाला भेट दिली. जरी शांति-परिषदेला आमच्याकडून काही अपेक्षा नव्हती, आणि आम्ही शांति-परिषदेच्या अनेक विचारांशी आणि धोरणाशीहि सहमत नव्हतो तरी सुद्धा त्यांनी आमचें उत्कृष्ट आतिथ्य केलें. परंतु शांति-परिषदेंत काही अधिकारी असेहि होते की जे कोणत्याहि प्रकारें पदयात्रेचें महत्त्व समजूं शकत नव्हते. ते वारंवार आम्हाला सांगत होते "तुमच्या पदयात्रेने काय शांति प्रस्थापित होणार आहे? आणखी सोव्हियट सरकार व सोव्हियट जनता तर शंभर टक्के शांतीसाठी तयारच आहे. आम्हाला काही समजावण्याची जरूर नाही. जर्मनीत जा, अमेरिकेत जा. तेथील युद्धपिपासु भांडवलवाल्यांना समजवा." ही गोष्ट या एकदोन तथाकथित शांति-कार्यकर्त्यांशिवाय आणखी कोणाकडून आम्ही ऐकली नाही. या भल्या गृहस्थांनी आम्हाला असेंहि म्हटलें : "तुम्हाला आमच्या देशात अडीच महिने होऊन गेले आहेत. इतका वेळ पुरे आहे. मास्कोहून वारसापर्यंत आम्ही तुमच्या विमान प्रवासाची व्यवस्था करीत आहोंत. अस्सल मोर्चा तर जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिकेवर लावला पाहिजे. जेथील सरकारें निःशस्त्रीकरणासाठी मनापासून प्रयत्न करीत नाहीत. इथे पायीं चालत उगाच वेळ गमविण्यात काय अर्थ ?"

आम्ही सांगितलें, "आम्ही केवळ एका शर्तीवर आमची पदयात्रा सोडून विमानाने जाऊ शकतो, जर तुमचें सरकार ही घोषणा करील की आता या पुढे एकहि नवा अणुबाँब तयार करणार नाहीं असें वचन जोपर्यंत आम्हाला मिळत नाहीं तोपर्यंत आम्ही कोणत्याहि वाहनाने जाणार नाही. तुम्ही आपल्या कोठारात अणु-बाँब भरत जावेत आणि आणखी वर शांतीच्या गप्पा माराव्यात यानें आमचें समाधान होणार नाही." आमच्या या स्पष्ट कथनामुळे ते थोडे नाराज झाले. तेहरानमधे ज्या व्हिसा अधिकाऱ्याच्या पहिल्या हास्यानें आम्हाला जिंकून घेतलें आणि त्यानंतर हजारो रशियन लोकांनी आपल्या स्नेहाने व आतिथ्याने आम्हाला सद्‌गदित केलें त्याहून सर्वथा भिन्न हे तथाकथित शांति-कार्यकर्ते होते. आमच्या संपूर्ण यात्रेत

असे कपट-नीतीने (डिप्लोमसीनें) वागणारे बहुधा आम्हाला फक्त हे च सज्जन भेटले. अखेर त्यांनी आपल्या मनासारखें केलें. आमचा पासपोर्ट हॉटेलच्या मॅनेजराजवळ होता. तेथून तो घेऊन हे महाशय व्हिसा ऑफीसमधे गेले व त्यात बदल करून आमचा पासपोर्ट आम्हाला आणून दिला. त्याच्या बरोबरच दुसऱ्या दिवसाचीं मास्को-वार्साचीं विमानाचीं दोन तिकिटेंहि दिलीं. आम्ही आश्चर्यांत दंग झालो. आम्ही म्हटलें : "आमच्या संमतिशिवाय असा बदल करणें तुम्हाला उचित नाही. हीं विमानाचीं तिकिटें आम्ही स्वीकारू शकत नाही. आम्ही पायीं आणि पायींच चालत जाऊ." त्यावर आमच्यासमोर एक नवी अडचण ठेवली गेली : "या वेळीं भयंकर थंडी आहे. तुम्हाला तिची संवय नाही. हवामान शून्याच्याहि खाली आहे. ३-४ फूट बर्फाचा थर जमिनीवर पडला आहे. अशा वेळी तुमच्या स्वास्थ्याला धोक्यांत टाकण्याची संमति आम्ही कधीहि देऊ शकत नाही." या उत्तरानंतर आम्ही स्वत: व्हिसा ऑफिसात गेलो. त्यांना भेटलो तेव्हा ते म्हणाले : "आम्हाला शांति-परिषदेचें पत्र आलें की तुम्ही विमानाने वार्साला जात आहात म्हणून आम्ही तुमच्या व्हीसात बदल केला. जर तुम्ही पुन्हा व्हिसा पूर्वींसारखा करून मागत असाल तर शांति-परिषदेमार्फत आम्हाला एक पत्र पाठवा. म्हणजे तो सहज पूर्वींप्रमाणे करून मिळेल." त्यांचें म्हणणें बरोबर होते. पण शांति-परिषदेचे हे महाशय, ज्यांनी आमच्या व्हीसात बदल केला होता, आपल्या निर्णयावर पक्के होते की मास्कोपासून पदयात्रेवर निघणें व्यर्थ आहे. शेंवटीं आम्ही शांति-परिषदेला पत्र लिहिलें : "ज्या अर्थी आम्ही सोव्हियट संघात नि:शस्त्रीकरणाची मागणी घेऊन पदयात्रा करीत आहोत व आमचा उद्देश अजूनपर्यंत सिद्ध झाला नाही म्हणून आम्ही आमची पदयात्रा बंद करू शकत नाही. आमच्या जवळ तेहरानच्या सोव्हियट वकिलातीने दिलेलें चार महिन्यांचें अनुमति-पत्र आहे. मधे जो नवा बदल व्हीसांत केला गेला आहे त्याची पूर्ण जबाबदारी शांति-परिषदेची आहे. आम्ही आमच्या पदयात्रेवर नेहमीप्रमाणे निघत आहोत."

१४ फेब्रुवारी '६३ची संध्याकाळ आम्ही कधी विसरू शकत नाही. आमच्या डोक्यांत एक जबरदस्त संघर्ष चालू होता. आम्ही आमच्या कपड्यांची गठरी पाठीवर घेतली, आणि हॉटेलमधून बाहेर पडलों आपल्या दीर्घ मार्गावर. सर्व मास्को शहरात खाली शुभ्र बर्फाची चादर आंथरलेली होती. वरती अंधाऱ्या रात्रीचा काळा पडदा होता आणि या काळचा-पांढऱ्याच्या मधे चमकणारे विजेचे बल्ब आम्हाला रस्ता दाखवीत होते. बस स्टेशनवर काम करणाऱ्या महिलेच्या मदतीने आम्ही पहिली रात्र युरोपचें सर्वांत मोठें हॉटेल 'हॉटल युक्राइना 'मधे मास्कोतच घालविली. गुडघ्याच्या खालपर्यंत लटकता मोठा काळा फरदार ओव्हरकोट आणि वजनदार टोप घातलेले रशियन शिपायी कुठे कुठे आमच्या प्रवासात दिसत होते, तेव्हा आमच्या मनांत शंका येई की यांच्यापैकी कोणी आमचा पासपोर्ट पाहील व व्हिसा नसल्यामुळे आम्हाला कैद करील. पण ते आम्हाला नमस्ते करीत, काही मदतीची जरूर आहे का म्हणून विचारीत, आम्हाला रस्ता दाखवीत, कधीकधी उतरण्याचीहि व्यवस्था करीत. आम्ही त्यांच्याशी रशियन भाषेंत गप्पा-गोष्टी करीत होतो. एक दिवस गेला, एक आठवडा गेला, एक महिना गेला, आम्हाला काही त्रास पडला नाही. नगर-पालिकांचें अध्यक्ष, सामूहिक-कृषि फार्माचे संचालक, खाणी व कारखान्यांत काम करणारे मजूर हे आमचें आतिथ्य करीत असत. शांति-परिषदेनेंहि समजून घेतले की गांधींच्या देशाचे हे लोक असल्या कायद्यांना मानीत नाहीत, जे कायदे त्यांच्या आत्म्याच्या आवाजाशी विसंगत असतात. आमचा सविनय कायदे-भंग संपूर्ण रीतीने यशस्वी झाला.

४५ दिवसांच्या यात्रेनंतर आम्ही जेव्हा पोलंडच्या सरहद्दीवर पोहोंचलो तेव्हा सीमेवरील रशियन कमांडरने आमचा पासपोर्ट पाहून म्हटलें : "तुमचा व्हिसा तर दीड महिन्यापूर्वीच समाप्त झाला, आतापर्यंत कुठे होता आपण ? इतके दिवस व्हिसाशिवाय कसे राहिलात ?" आम्ही थोडक्यात कथा सांगितली. सैनिक कमांडर म्हणाला : "हा खुलासा पुरेसा नाही." आणि त्याने कुठेतरी टेलिफोनवरून गोष्ट केली. त्यानंतर तो म्हणाला "सर्व काही ठीक आहे. या, थोडा नास्ता करू या, चहा पिऊ या,

तुमच्या यात्रेच्या गोष्टी सांगा. हा तुमचा आमच्या देशातला अखेरचा दिवस आहे.'' आणि त्यानंतर स्वत: कमांडर आमच्या बरोबर सरहद्दी-पर्यंत आले आणि 'गैर-कायदा' प्रवाशांना निरोप दिला. दीड महिन्याची ही पदयात्रा आम्हाला जास्त फलप्रद झाली. आमच्या बरोबर कोणी तिसरा मनुष्य नव्हता. आम्ही जास्त जवळून रशियन जीवनाचे ( राहणीचे ) अनुभव घेऊ शकलो. माहीत नाही, रशियन सरकारने आम्हा 'गैर-कायदा' प्रवाशांना गिरफ्तार का केलें नाही, किंवा आमच्या व्हीसाची मुदत का वाढवून दिली नाही ? ही घटना दिल्ली ते वॉशिंगटन-पर्यंतच्या आमच्या प्रवासांत एकच-एक व अद्‌भुत आहे.

## पतीने आश्रय दिला, पत्नीने हाकलून दिलें

''घरोघर मातीच्या चुली'' अशी म्हण आहे. या म्हणीचा अनुभव आला आम्हाला आतिथ्य-शील सोव्हियट संघाच्या एक छोटयाशा गांवात—स्लावादामधे. हें गांव मिन्स्कपासून १५ मैल पूर्वेला सडकेकाठी आहे. एप्रिलचा महिना फार विचित्र असतो रशियात. जीवघेणा भयानक हिंवाळा रजा घेतो व आकर्षक उन्हाळयाची सुरवात होते. रशियन लोक उन्हाळयाची वाट अशाच उत्सुकतेने पाहतात ज्या उत्सुकतेने आम्ही भारतीय, त्रासदायक उन्हाळयानंतर पावसाच्या सरीची वाट पाहत असतो. रशियांत एप्रिल महिना चिखला-पाण्याचा असतो. अशा एप्रिल महिन्यांत स्लावादासारखें छोटेसें खेडें आम्हाला एक स्मरणीय खेडें झालें.

१४ एप्रिल हा प्राचीन परंपरेनुसार रशियन लोकांना एक सणाचा दिवस आहे. आधीच रशियन माणूस खाण्यापिण्यांत चांगलाच खवैय्या असतो. त्यांत सणाच्या दिवशीं तर विचारूच नका ! प्रसिद्ध रशियन व्होडकाच्या बाटल्या जेव्हा फुटू लागतात तेव्हा त्यांची मोजदाद कसली करता ? आणखी त्यांतल्यात्यांत स्त्रियाहि मदिरा व व्होडका पिण्यांत पुरुषांना साथ देतात. स्लावादाचे लोक सणाच्या क्रीडा-मौजेत गर्क होते नि संध्याकाळीं दोन भारतीय शांति-पदयात्री '' मी जा मिर '' ( आम्ही शांत्यर्थं ) चा झेंडा घेतलेले, पाठीवर ओझें लादलेले, त्यांच्या गांवात येऊन पोहोंचले. गांवात दोन नवे आगंतुक, तेहि फार दूरच्या

देशाचे ! आम्हीं पोहोंचल्याची बातमी गांवभर हवेसारखी पसरली. पाहता पाहता शेंकडों मुलें आमच्या भोंवतीं गोळा झालीं. एक उत्तम मिरवणुक निघाली. आम्ही नारा लावला "मी जा मिर." मुलांचा आवाज आकाशाला भिडला. स्त्रिया घरांच्या दारात येऊन आम्हाला पाहू लागल्या. सर्वांनाच आश्चर्य वाटलें ! या लहानशा गांवांत पहिल्यानदाच कोणी भारतीय पोहोंचलेला ! आम्हाला लोक "ग्राम-क्लब" मधे घेऊन गेले. तेथे एक हिंदी फिल्म चालू होती. काय आश्चर्याची गोष्ट ? जेमतेम १०० घरांच्या वस्तीचा गांव, पण तेथे चालली होती एक हिंदी फिल्म ! हिंदी सिनेमा, रशियन अनुवादासह सोव्हियट संघांत फारच लोकप्रिय आहे. नरगिस आणि राजकपूर यांचीं नांवें गांवोगांव प्रसिद्ध आहेत. आमच्या सोव्हियटच्या प्रवासात ८-१० हिंदी फिल्म आम्ही पाहिल्या. "आवारा" व "श्री. ४२०" च्या गाण्यांच्या रेकॉर्ड तर शेंकडो वेळां आम्हाला ऐकायला मिळाल्या. "नरगिस आपल्या कपाळावर टिकली कशाला लावते ?" हा प्रश्न आम्हाला शेंकडों वेळां विचारला गेला. 'आवारा हूँ' गाण्याचा रशियन अनुवाद ऐकून आम्ही आश्चर्यचकित झालो. 'ब्राजागा या' हें पहिलें त्यांतलें पद. तोच राग, तीच धून, हिंदीचा अगदी बरोबर अनुवाद.

असा कार्यक्रम चालू राहिला की रात्रीचे ९ वाजले. त्यानंतर एका शेतकऱ्याच्या घरीं आम्ही उतरलो. त्याची पत्नी घरीं नव्हती. त्यानें मोठ्या तत्परतेने स्वत: आमच्यासाठी टेबलावर भोजन वाढलें. पलंगावर बिछाना टाकला. "तुम्ही पायीं चालून आला आहा, थकला आहा, भोजन करा व आराम करा." किसान म्हणाला. तो खूपच उत्साहात होता. या गांवात तोच इतका भाग्यशाली कीं दुसऱ्या कोणाच्या घरीं नाहीं, पण त्याच्या घरीं परदेशाचे पाहुणे येऊन उतरले ! "माझ्या घरात २ – ३ महिन्यांचा मुलगा आहे. त्याच्या रडण्याने तुमच्या झोंपेंत बाधा तर नाही होणार ना ?" शेतकऱ्याच्या मनांत आमच्या विश्रांतीची फार चिंता होती. 'मागच्या युद्धांत आमचे फारच नुकसान झालें, आम्हाला आता पुन्हा युद्ध नको. तुमच्या सारख्या शांतीचा संदेश ऐकवणाऱ्या यात्रिकांचे प्रयत्न

सफल होवोत, हीच आमची कामना आहे." याप्रमाणे किसानाने सद्‌गदीत होऊन युद्धाची माहिती सांगितली. युद्ध-कालातील प्रत्यक्ष पाहिलेली परिस्थिति त्याने सांगितली की कशा रीतीनें सारीं गांवें बाँबच्या माऱ्यामुळे उध्वस्त होऊन गेलीं होतीं, आणि लाखों-करोडों मनुष्यांचा संहार झाला होता.

इतक्यांत शेतकऱ्याची पत्नी घरीं आली. परिचय झाला. किसानानें स्वयंपाक-घरांत जाऊन आपल्या पत्नीला सांगितलें की आज रात्रीं दोन भारतीय प्रवासी आपल्या घरीं पाहुणे म्हणून राहतील. ही गोष्ट पत्नीला पसंत पडली नाही. आम्ही त्यांचें बोलणें ऐकत होतों. "कोणाहि, गल्ली-कुचीतून भटकणाऱ्याला पाहुणा बनवितां? हें घर आहे, धर्मशाळा नाही." तिने याप्रमाणे आम्हाला उतरू देण्यास साफ इन्कार केला. पतीने पुष्कळ प्रेमाने व नम्रतेने समजावून सांगितलें की घरीं आलेल्या अतिथींना असें घराबाहेर घालवणें चांगलें नाही. पण पत्नी काहीहि मानायला, ऐकायला तयार नव्हती. आम्हालाहि थोडें आश्चर्य वाटलें. कारण संपूर्ण सोव्हियट संघांत आम्हाला उत्कृष्ट आतिथ्याचें दर्शन झालें होतें. आणखी स्त्रिया तर पुरुषापेक्षा जास्त आतिथ्यशील व कोमल हृदयाच्या असतात. आम्ही पाहिलें की गोष्ट आता झगड्याचें रूप घेऊ लागली आहे. भांडण वाढू लागलें. "पाहुणे येथेच राहतील" पतीनें आव्हान दिलें, आणि गृहस्थ आमच्याजवळ येऊन बसला व गप्पा-गोष्टी करूं लागला. यामुळे तर पत्नीचा क्रोध आणखीनच भडकला. "तुम्ही चिंता करू नका." मी म्हणालो, "आम्ही कुठे दुसऱ्या घरीं जाऊन उतरू." "नाही! नाही!!" पतीने आम्हाला तेथेच थांबण्याचा आग्रह सुरू केला.

पत्नीला कदाचित् वाटलें असेल की हा तिचा अपमान होत आहे. "नारीणां रोदनं बलम्!" केवळ भारतीय स्त्रियांच्या बाबतीत नाही तर रशिअन गृहिणीहि आपला क्रोध, दुःख व असंतोष प्रगट करण्यासाठी रुदनाचा आश्रय घेतात. माझी आई म्हणत असे कीं रडणें तर स्त्रियांच्या पांचवीला पुजलें आहे. मैथिलीशरण गुप्तांनीं "आँचल में है दूध और आँखो में पानी" ( पदराखालीं दूध व डोळयांत पाणी ) म्हणून स्त्री व

अश्रु यांना एकाच धाग्यांत ओंवलें आहे. आम्ही घाबरलो. इतक्यात किसान पत्नी रडत जोराने म्हणाली : "या घरांत एक तर मी राहीन किंवा तुमचे पाहुणे." पत्नीच्या या आव्हानाला पतीने मान तुकविली नाही. तो म्हणाला: "जा, तुला जिथे जायचें असेल तिथे जा." पत्नीने आव्हान स्वीकारलें. पाहता पाहता तिनें छोटया बाळाला आपल्या खांद्यावर घेतलें आणि निघून गेली घरा बाहेर !

"आम्ही शांतीच्या गोष्टी करायला आलो आणि गृह-कलह निर्माण झाला." मी प्रभाकरला म्हणालो. प्रभाकरने शेतकऱ्याला समजावलें : "घरवालीला नाराज करून घरांत राहण्यापेक्षा हेंच चांगलें की आम्ही कोण्या दुसऱ्या घरीं जाऊन उतरावें." पण किसान म्हणाला : "तुम्ही रात्रीं १० वाजता कुठें जाल ? बोळ चिखलाने भरलेलें. रात्र अंधारी. कोणाचें घर ठोठवाल तुम्ही जाऊन ?" थोडा वेळ विचार करून तो म्हणाला : "ठीक, मी माझ्या शेजारी मित्राच्या घरीं जाऊन विचारतो." आणि तो गेला. अर्ध्या तासांत शेतकऱ्यानें आपल्या मित्राच्या घरीं आम्हाला उतरविण्याची व्यवस्था करून दिली. खरोखर, त्या अंधाऱ्या रात्रीं मोठ्या मुष्कीलीने आम्ही बोळांतून पलीकडे जाऊ शकलो. एकमेकांनी हातांत हात धरून अंधारात रस्ता चांचपडत आम्ही गेलो. वरपर्यंत जोडे व कपडे चिखलाने अगदी भरून गेले. शेतकरी वारंवार क्षमा मागत होता आणि आपल्या पत्नीला ठपका देत होता.

त्याच्या मित्राच्या घरीं आम्ही पोहोंचलो. पति, पत्नी व दोन मुलें सगळे झोंपून गेले होते. चार पलंगांवर चौघे निजलें होते. किसान-मित्राने आपल्या दोन मुलांना उठवलें व त्यांना एका पलंगावर झोंपवलें. मी व प्रभाकर एका पलंगावर झोंपलो. १० मिनिटांत सारी समस्या सुटली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठलो. आमच्या या नव्या यजमानाघरी दोन मस्त गाई होत्या. रशियात इतकी भयंकर थंडी असते तरीपण हे लोक दूध थंडच पितात. पण आम्हाला विचारून त्यांनी दूध गरम केलें. रागू ( कित्येक प्रकारच्या भाजांचें तयार केलेलें रशियन व्यंजन ) शिजवून त्याने आपल्या शाकाहारी पाहुण्यांना खास रशियन

नास्ता दिला. आम्हाला इथे अपार प्रेमाने व आपलेपणाने वागविलें. गृहिणी म्हणाली: "आज इथेच रहा. इतक्या लांबचा प्रवास करून आलात, एक दिवस विश्राम केला !" किती स्नेह होता तिच्या वाणीत ? काल रात्रीच्या किसान-पत्नीच्या व्यवहारामुळे रशियन लोकांच्या आतिथ्याची आपण परीक्षा करू शकत नाही. अशा तऱ्हेच्या स्वभावाचे काही लोक प्रत्येक देशात सांपडतील. चार महिन्यांचा दीर्घ काळ आम्ही रशियात घालवला. अशी घटना फक्त एकच दिवस घडली. नाहीतर, प्रत्येक दिवशीं उत्कृष्ट आतिथ्याचें दर्शन आम्हाला होत होतें. एकाच घरात मानव-स्वभावांत किती भिन्नता असू शकते हें आम्हाला पहायला मिळालें. तसेंच हेंहि आपल्याला मानावें लागेल कीं समाजात भलेपणा जास्त आहे, वाईटपणा कमी आहे. चार महिन्यांत ११९ दिवस आम्हाला उत्तमोत्तम व्यवहार करणारे लोक भेटले. केवळ एक दिवसच अशी लहानशी अरुचिकर घटना घडली.

## सोबती कीं पिता

आमच्यापाशीं हलकेच एक जीप येऊन उभी राहिली. चालता चालता आम्ही थांबलो. हवामान थंड होतें. अशा थंडीत आम्हाला भेटायला कोण आला असेल ? त्यात आम्हाला हा अगदी अपरिचित देश ! आमच्या मनात उत्कंठा उद्‌भवली. इतक्यात जीप मधून एक उंच बांध्याचा गृहस्थ बाहेर आला. लांब काळ्या रंगाचा ओव्हरकोट, हातात चामड्याचे मोजे, डोक्यावर टोप. सारें शरीर कपड्यांनी झांकलेलें. आपाद-मस्तक सर्व पोषाख काळ्या रंगाचा. त्या पोषाखात मोठे मोठे डोळे, लांब नाक, रुंद कपाळ, व गौर वर्णी चेहरा त्या गृहस्थाच्या व्यक्तित्वाची चमक दाखवीत होता आमच्या मनात या गृहस्थाबद्दल आकर्षण निर्माण झालें. जीपमधून उतरताच गृहस्थ हंसला.

"तुमचा प्रवास कसा चालला आहे ?" गृहस्थाने मोठ्या आत्मीयतेने विचारलें.

"फारच चांगल्या रीतीने !"

"थकलात तर नाही ?"

"बिलकुल नाही." आम्ही गृहस्थाला निश्चित केलें.

"भूक लागली का ?"

"अंऽह, नाही."

"असें कसें असू शकतें ? तुम्ही सकाळी ८ वाजता थोडासा नास्ता केला. त्यानंतर इतके दूर चालूनहि आलात. भूक जरूर लागली असेल." असें म्हणत त्यांनी ड्रायव्हरकडे पहात इशारा केला. ड्रायव्हरने एक छोटी पेटी बाहेर काढली. जवळच्या एका दगडावर ती उघडली. पेटीत मद्याच्या बाटल्या, मासोळ्या, दूध, लोणी, चक्का (पनीर), रोटी, फळें, किसमिस, बदाम, चाकोलेट इत्यादि सामान भरलेलें होतें. हें सामान आमच्या दुपारच्या भोजनासाठी आणलें होतें.

"तुम्हाला काही खाल्लेंच पाहिजे." गृहस्थ म्हणाला.

"पण आम्ही मासोळी खात नाही, मांस खात नाही, मद्यहि पीत नाही."

"असें का ? काय मांस-मासळीशिवाय कुठे भोजन तरी होऊ शकतें ?"

"पण आजपर्यंत आम्ही कधी खाल्लें नाही. तरी आमचें चांगलें चाललें आहे."

"इतका लांबचा प्रवास, रोजच्या रोज पायीं चालणें ! भोजन तर पौष्टिक केलेंच पाहिजे."

"पण दूध, अन्न व फळें यांनी आम्हाला पुरेशी पुष्टि मिळून जाते." आम्ही समजावलें.

"तरी पण काय कारण आहे ? मांस कां खात नाही ?" गृहस्थानें जिज्ञासेने विचारलें.

"आम्ही अहिंसावादी आहों. अन्य प्राण्यांना मारून त्यांना खाणें आम्ही योग्य मानीत नाही."

"ओ हो ! मी समजलों. आमचे टॉलस्टॉय यांनीहि मांसाहार सोडून दिला होता. ते अहिंसावादी झाले होते. पण मदिरेत तर कोणाची हिंसा होत नाही ?" गृहस्थाचा पुढचा प्रश्न होता.

" मदिरा एक नशा आहे. ती शरीरासाठी आवश्यक वस्तु नाही. खास करून भारताच्या सामाजिक, नैसर्गिक व आर्थिक व्यवस्थेत ती अनावश्यक आहे. "

" पण आमच्याकडे शोधूनहि असा मनुष्य मिळणें कठिण, जो मदिरेचें सेवन करीत नाही. आम्ही लोक अतिथींच्या आगमनाच्या वेळीं मदिरा पिणें व पाजणें आमचें आनंदप्रद कर्तव्य मानत असतो. अशी आमची आतिथ्य परंपरा आहे. " गृहस्थाने आम्हाला मदिरा पिण्याचा आग्रह केला.

" पण आम्हाला माहित आहे की तुम्ही लोक अतिथींच्या भावनांचाहि आदर करता, आणि जर काही सैद्धांतिक कारणामुळे तो जर तुम्हाला साथ देऊ शकला नाही तर आपण त्याला क्षमाहि करीत असता."

" तसें तर आहे. आम्ही उदार आहो. " आणि गृहस्थाने आम्हाला क्षमा केली. नंतर आम्ही दूध प्यालो. व गृहस्थाने भारत-सोव्हियटच्या नांवावर, शांतीच्या नांवावर, व आमच्या स्वास्थ्याची कामना करीत मदिरेचा प्याला रिकामा केला. थंडी बरीच होती. आम्ही उभ्या उभ्याच थोडें खाऊन घेतलें. गृहस्थाने बदाम, किसमिस, आमच्या खिशांत भरता भरता म्हटलें : " हें रस्त्यांत खायला आहे. " नंतर ते पुढे निघून गेले– आमच्या पुढच्या पडावाची व्यवस्था करण्यासाठी.

हे गृहस्थ होते श्री. मामीकोनियान गुरग्यान! सोव्हियट शांति-परिषदेचे एक सदस्य. आमच्या पदयात्रेच्या व्यवस्थेसाठी शांतता-परिषदेने यांना आमचे साथी म्हणून दिले होते. पहिल्याच भेटीत हे आमचे असे मित्र बनले की यांना आम्ही कधीच विसरणार नाही. आमच्या यात्रेचा उद्देश ज़्या लोकांनी अगदी बरोबर समजून घेतला त्यांपैकी एक हे होते, श्री. गुरग्यान. आमची शांति-यात्रा जनसंपर्काच्या दृष्टीने फारच यशस्वी झाली आणि याचें फार मोठें श्रेय श्री. गुरग्यान यांना आहे. आम्ही पडावावर पोहोंचण्यापूर्वीच, फक्त त्या गांवातच नव्हे तर आसपासच्या अनेक गांवात आमच्या आगमनाची सूचना ते पोहोंचवीत असत. आम्ही पडावावर पोहोंचत होतो तेव्हा शेंकडो-हजारो लोकांची गर्दी आमच्या भोंवती गोळा होत होती. आम्ही आमच्या यात्रेचा

उद्देश समजावीत असतांना अण्वस्त्रांविरुद्ध आवाज उठविण्यासाठी जनतेला आवाहन करीत असू. श्री.गुरग्यान लोक-भाषेत आमच्या भाषणाचा अनुवाद करून आमचें मिशन त्यांच्यापर्यंत पोहोंचवीत असत. श्री. गुरग्यान म्हणत होते: "तुमच्या पायीं चालण्याचा उद्देश आहे, जास्तीत जास्त लोकांपर्यंत शांति-संदेश पोहोंचविण्याचा. म्हणून जास्तींत जास्त लोकांपर्यंत तुमच्या यात्रेची सूचना पोहोंचविणें हें आमचें कर्तव्य आहे." तसेंच ते आम्हाला कधी कलेक्टिव्ह फार्म, कधी गोशाळा, कधी शाळा, कधी कारखाना, कधी एखादी सार्वजनिक संस्था दाखवण्यासाठी घेऊन जात.

श्री. गुरग्यान आमच्या प्रवासाच्या सोयीची व आमच्या स्वास्थ्याची नेहमी चिंता करीत. पडावाचें अंतर फार दूर नसावें, पडावावर पोहोंचल्याबरोबरच गरम पाण्याची व्यवस्था असणें, विश्रांतीसाठी आम्हाला पुरेसा वेळ मिळणें, आमच्या शाकाहारी भोजनाची बरोबर व्यवस्था ठेवणें, इत्यादि गोष्टींकडे ते अशा रीतीने ध्यान देत होते जसा एखादा बाप आपल्या मुलासाठी ध्यान देईल. ते म्हणाले सुद्धा "मी जोंपर्यंत तुमच्या सोबत आहे तोंपर्यंत तुम्ही माझे पुत्र आहा व जें मी सांगेन तें खावें लागेल." पुष्कळ वेळा 'नको' म्हटलें असताहि ते आमच्यासाठी दुपारचें भोजन घेऊन येत आणि रस्त्यांत आम्हाला खावें लागे. श्री. गुरग्यान अर्मेनियन रिपब्लिकच्या प्रवासांत आमच्या बरोबर होते.

अर्मेनियाची आमची पदयात्रा अविस्मरणीय आहे. अर्मेनियाच्या एका बाजूला 'अरारोट' पर्वत-शिखर आहे. हा तोच 'अरारोट' आहे ज्याची कथा बायबलमधे आम्ही वाचली होती. दुसऱ्या बाजूला कॉकेशसचीं उंच शिखरें आहेत. त्यामधे पसरलेला हा सुंदर मनोहर प्रदेश, द्राक्षें, सफरचंद, आणि इतर फळांनीं समृद्ध आहे. प्रत्येक शेतकऱ्याच्या घरीं घरचीं द्राक्षें आहेत व घरचीच मदिरा. कित्येक मद्य-घट, अन्न, मांस आदि सामग्रीचा हे शेतकरी अशासाठी संग्रह करून ठेवतात की हिवाळ्यांत जेव्हा जिकडे तिकडे बर्फच बर्फ पसरलेला असतो, काही उत्पादन होत नाही, बाहेरचें जाणें-येणें सुद्धा होऊ शकत नाही तेव्हा घरांत बसून

आरामाने कित्येक महिने खाऊपिऊ शकता यावें. लाकडी बनावटीच्या घराखाली तळघरें असतात आणि तेथेच ही सामग्री सुरक्षित राहते. श्री. गुरग्यान आम्हाला सामान्य जन-जीवनाचा परिचय करून देतां देतां अशा तळघरात घेऊन गेले. आम्ही ज्या काळीं अर्मेनियाची यात्रा करीत होतों तो जानेवारीचा थंडीचा महिना होता. भूमातेने, झाडांनी, घरांनी शुभ्र बर्फाचा शृंगार केला होता. प्रत्येक घर मोठमोठ्या शेगड्यांनीं गरम करून ठेवलें जात होते.

अखेर श्री. गुरग्यान यांचा निरोप घेण्याचा एक दिवस उजाडला. तो दिवस श्री. गुरग्यानसाठी व आमच्यासाठीहि फार कठिण होता. श्री. गुरग्यान यांचे डोळे व हृदय भरून आले होते. ते वारंवार आमचें शिरावघ्राण करीत होते, व आम्हाला उराशीं धरत होते. आमच्यापासून ते काही केल्या अलग होऊ शकत नव्हते, सडकेवर शेंकडो लोक उभे राहून आमच्या वियोगाचें दृश्य पाहू लागले. ते थोडे दूर जात आणि पुन्हा आमचा निरोप घ्यायला जवळ येत. जवळच नदी वाहत होती. वरती सूर्य तळपत होता. श्री. गुरग्यान नदीच्या पुलावरच उभे राहिले आणि आम्ही मागे वळून-वळून आमचा हात हालवीत त्यांचा निरोप घेत पुढे चाललो. खरोखर, श्री. मामीकोनियान गुरग्यान आमचे सोबती होते आणि वडीलहि.

## एक साहसी युवती

उंच-सखल डोंगरी क्षेत्रात वसलेलें शहर दिलीजान. तरुणांच्या एका मोठ्या सभेत आम्ही म्हटलें: “आजपर्यंत तरुणांच्या ताकतीवर युद्धें लढलीं गेलीं. पण आता तरुणांची शक्ति शांति-स्थापना व युद्ध-निवारण यात लागली पाहिजे. आम्ही दोन तरुण भारतातून बाहेर पडलो—युद्धाचा विरोध करण्यासाठी. सोव्हियट संघांतूनहि एक तरुणांचा प्रतिनिधि आमच्या बरोबर अमेरिकेपर्यंत यावा अशी आमची इच्छा आहे. काय कोणी आमच्या युद्ध-विरोधी पद-यात्रेत यायला तयार आहे ? ” सारी सभा चुप ! अशा अचानक प्रश्नाची कोणी अपेक्षा केली नव्हती. इतक्यात सभेचें मौन भंग करीत एक तरुणी उभी होऊन म्हणाली: “मी तयार

आहे." उपस्थित तरुणांचे डोळे या साहसी तरुणीकडे वळले. बॉब केलेले कुरळे केश, काळ्या रंगाचा स्कर्ट व जाकिटाने झांकलेली सडपातळ शरीरयष्टि, काळ्याकाळ्या बारिक डोळ्यांचा हंसरा चेहरा. कोण आहे ही ? पण ती निश्चल उभी होती– आपला हात उंच करून. ती भीत नव्हती. ती बेफिकीर दिसत होती. तिचें नांव होतें– आइरापेत्यान जारजेता. आपल्या वृद्ध आईची २० वर्षांची एकुलती एक मुलगी !

सभा आटोपल्यानंतर जारजेता दोनतीन तास आमच्या बरोबर राहिली. आमच्या बरोबर येण्याचा तिने दृढतेने आग्रह धरला. दुसऱ्या दिवशीं सकाळी तयार होवून ती आमच्याकडे आली. तिच्या दृढ निश्चयाचें आम्हाला कौतुक वाटलें.

"अमेरिकेपर्यंत पायीं येशील ? इतकी पायीं चालू शकशील ?"

"का नाही ? अवश्य चालू शकेन." जारजेताने निर्भिडपणे उत्तर दिलें.

"कधी कधी २०-२५ मैलपर्यंत सुद्धा एकहि गांव लागत नाही" आम्ही भीति दाखविली. "तर काय झालें ? जितकें तुम्ही चालू शकता तितके मीहि चालू शकेन"

"आम्ही जवळ पैसा ठेवत नाही. कधी एक दोन दिवस खायलाहि मिळालें नाही तर ? उपाशी राहशील ?"

"जर चालण्याचें, भुकेचें, कष्टांचें भय वाटलें असतें तर मी तुमच्याकडे आलीच कशाला असते ?"

"आम्हाला कधी एखादें सरकार जेलमधे सुद्धा बंद करूं शकते !"

"कोणतेंहि सरकार शांतिवादी लोकांशी असा व्यवहार का करील ?" जारजेताने विचारलें.

"कारण आम्ही सरकारच्या युद्ध-नीतीच्या विरुद्ध चळवळ व प्रदर्शन करतो म्हणून."

"काही हरकत नाही. चांगलें काम करता करताहि सरकार आम्हाला जेलमधे टाकील तर त्यासाठी मी तयार आहे. जगात चालू असलेल्या शांति-आंदोलनात अल्पसा भाग घेण्यासाठी मी तुमच्या बरोबर

येऊ इच्छिते. तुमच्या बरोबर गांवोगांवीं मी पायीं यात्रा करीन, आणि लोकांना युद्ध विरोधी चळवळ करण्यासाठी प्रेरित करीन." याप्रमाणे जारजेताने बरेंच म्हटलें.

"पण तुझी आई म्हातारी आहे. तिचा संभाळ करायला दुसरें कोणी नाही. काय तिची संमति घेतली आहे ?"

"जारजेताच्या आईची संमति नाही." जारजेता बोलत नाहींसें पाहून तिच्या एका मित्राने म्हटलें.

"अशा स्थितींत तुझी आई काय म्हणेल ? आणि मागून तिची काय दशा होईल ?" आम्ही म्हणालो. त्यावर जारजेता काही बोलली नाही. खरोखर तिच्या उत्साहासमोर हें मोठें विघ्न होतें. ती एका औषधालयात काम करीत होती. कमाई करीत होती. आणि आईची पूर्ण जबाबदारी तिच्यावर होती. परंतु तिची मनःप्रेरणा आमच्या बरोबर यायला धडपडत होती. असा प्रेरणा व जबाबदारी यांच्यात संघर्ष होता. बऱ्याच विचारानंतर आम्हाला वाटलें की जारजेताने आमच्या बरोबर न येणें च जास्त उपयुक्त होईल. आम्ही म्हटलें : "केवळ पदयात्रेंत भाग घेणें म्हणजेच शांति-आंदोलन नाही. तू आणखी अनेक प्रकाराने यांत मदत करू शकतेस. प्रथम इथेच तू शांतिवाद्यांचें संगठन तयार कर. आपल्या आसपासच्या क्षेत्रात काही काम कर. अशा रीतीने आम्ही तिला बरेंच समजावलें, पण तिचें समाधान झालें नाहीं. तिची पुष्कळच निराशा झाली.

त्या दिवशीं ती आमच्या बरोबर पुढच्या पडावापर्यंत पायी आली. आज जगभर जें शांति आंदोलन चालू आहे त्याची माहिती ती घेत होती.

भारत सोडल्यानंतर आइरापेत्यान जारजेता ही पहिली तरुणी होती जिने इतक्या तीव्रतेने आमच्या बरोबर येण्याची उत्कंठा दाखविली आणि जिला शांति आंदोलनात इतकी गोडी होती. आठ मैलांच्या तिच्या पदयात्रेनंतर आम्हाला विश्वास वाटला की ती आमच्या बरोबर पदयात्रेंत टिकू शकेल. तिच्या घरच्या परिस्थितीने साथ दिला असतां तर किती बरें झालें असतें ! !

## एका रशियन गांवात

मार्च महिन्याची एक सायंकाळ ! सैबेरिया कडून येणाऱ्या जोरदार हवेबरोबर बर्फाचें कण आमच्या चेहेऱ्यावर पडत होते व आम्हाला संतोष देत होते. आकाशातून बर्फाचा वर्षाव होत होता. आमच्या टोपीवर बर्फाचा थर जमला होता. पाठीवरील थैला बर्फाने सफेद होत होता. निळ्या ओव्हर-कोटावर शुभ्र बर्फाच्या किनारी फारच सुंदर दिसत होत्या. बर्फापासून रक्षण म्हणून हातावर फरचे चामडयाचे मोजे आम्ही घातले होते. थंडी-पासून रक्षण म्हणून साऱ्या शरीरावर जाडे गरम कपडे लादले होते. परंतु ओठ, गाल व नाक ? यांचा बचाव कसा करणार ? नाकातून पाणी वाहत होतें व थंडीमुळे दाढीत अटकून बर्फ बनून जात होते. तोंड लाल झालें होतें. पण आम्ही चालत जातच होतों. आम्ही असे प्रवासी होतो ज्यांना हें ठाऊक नव्हतें की आज पडाव कुठे होईल ? किती दूर चालावें लागेल ? एका अनिश्चित लक्षाकडे आम्हो वाटचाल करीत होतो.

पश्चिम रशियाकडील एक गांव. आम्ही या गांवाजवळ पोहोंचलो. १३ मैल अशा भयंकर थंडीत सारखे चालून आल्यावर आम्ही किती थकून गेलो होतो हें कसें सांगणार ! पण सर्व गांव शुभ्र बर्फात लपेटून निजला होता. बर्फानें झांकलेल्या झोंपड्या गुपचुप उभ्या होत्या. ३०-३५ घरांचा हा गांव असा दिसत होता जणू येथे कोणी राहतच नाही. काही विचारपूस करायला पाहिजे, पण विचारणार कोणाला ? कोणाला विचारल्याशिवाय कसें कोणाच्या घरात शिरायचें ? आज रात्रीं मुक्काम याच गांवात करायचा. पुढचें गांव किती दूर आहे याचा पत्ता नाही. असा विचार करीत आम्ही सडकेवर उभे होतों तों बऱ्याच अंतरावर एक काळी सावली येत असलेली दिसली. आम्ही जरा हिंमत केली. ती सावली आमच्या बाजूलाच येत होती. ती एक स्त्री होती. बर्फावर जोरदार हवेत चालायला तिला अडथळा वाटत होता, व तिचे पाय केव्हा-केव्हा बर्फात फसत होते, असें आम्हाला स्पष्ट दिसत होतें.

"हें कोणचें गांव ?" स्त्री जवळ आल्यावर आम्ही विचारलें.

"आरत्योभकी, तुम्हाला काय पाहिजे ?" स्त्रीने आम्हाला आपाद मस्तक निरखीत विचारलें.

"आम्ही प्रवासी आहोत आणि आज रात्रीं इथे मुक्काम करूं इच्छितो." आम्ही सरळ-सरळ सांगून टाकलें.

"ठीक, माझ्यावरोबर चला." ज्या रस्त्याने ती आली होती त्याच रस्त्याने ती परत जाऊ लागली. तिच्यामागे येण्याचा तिने आम्हाला इशारा केला. त्या स्त्रीचें आम्हाला आश्चर्य वाटलें. अशा भयंकर थंडीत काही कामासाठी ती घराबाहेर पडून कुठे तरी जात होती, ती तशाच अवश्य जरूरीच्या कामासाठी जात असणार. आणि तें आपलें काम सोडून ती ताबडतोब आमची मार्गदर्शिका बनली. आम्ही कोण, कुठून आलो, इथें कशाला उतरू इच्छितो वगैरेची चौकशी तिने मुळीच केली नाही. ती आम्हाला आपल्या भावाच्या घरीं घेऊन गेली. भाऊ त्यावेळी घरीं नव्हता. तिने आपल्या भावजयीला हलकेंच काही सांगितलें आणि आम्हाला घरांत नेऊन बसविलें.

"आपण परदेशाहून आलात ? तुम्हाला रशियन भाषा समजते ?" आम्हाला सोफावर बसवितांना त्या स्त्रीने विचारलें.

"थोडी थोडी समजते."

"हें चांगलें आहे. कोणत्या देशाहून आलात तुम्ही ?"

"भारतातून."

"ओ हो ! फार दुरून आला आहात. किती दिवसांनी येथें पोहोंचलात ?"

"दहा महिन्यांनी." आम्ही सांगितलें.

"अबब ! दहा महिने !!"

"किती किलोमिटर पायीं चाललात ?" स्त्रीच्या वहिनीने विचारलें.

"सुमारे सहा हजार किलोमिटर."

"पायीं का चालत आहात ?" स्त्रीने विचारलें.

"आमची यात्रा युद्ध-विरोधाची प्रतीक आहे. आम्ही गांवोगांवीं अण्वस्त्र-विरोधी प्रचार करीत असतो. समजा, जर आम्ही विमानांनी आलो

असतो तर काय आज या गांवात पोहोंचलो असतो ? गांवागांवात पोहोंचण्यासाठी पदयात्राच चांगली आहे." याप्रमाणे आमच्या गोष्टी चालल्या होत्या इतक्यात स्त्रीचे बंधुहि येऊन पोहोंचले. आपल्या घरीं परदेशचे पाहुणे आलेले पाहून त्यांना फार आनंद झाला.

"प्रथम आपण काय खाल तें सांगा." स्त्रीचे भाऊ फीमोनोव वसीलोव यांनी विचारलें.

"धन्यवाद! आपण जें काही खाऊ घालाल तें आम्ही खाऊ. फक्त मांस नको."

"का ? मांस का नको ? आपण पाहत आहा की आमच्याकडील भूमि सर्व बर्फाने झांकलेली आहे. इथे फळें नाहींत की भाज्या नाहीत. आम्ही मांस न खाल्लें तर कामच चालणार नाही." वसीलीने म्हटलें.

"आम्ही शाकाहारी आहोत." हें समजल्यावर ते म्हणाले: "बटाटे उकडून तयार आहेत. गाय आपल्या घरीं आहेच म्हणून दूध-लोणी पुरेसें आहे." आणि त्यांनीं उंच कानवालें भलें मोठें मातीचें भांडें कच्च्या दुधाने भरून आमच्यापुढे ठेवलें. रोटीला लोणी लावून बटाटे व दुधा बरोबर आम्ही पोटभर भोजन करून तृप्त झालो. तेवढ्यात श्री. वसीलीच्या बहिणीने आमच्या आगमनाची खबर सर्व गांवभर फैलावली. गांवभरचे स्त्री-पुरुष-मुले जमा होऊ लागले. हा पहिलाच प्रसंग होता की आरत्योमकी गांवात कोणी परदेशी येऊन उतरला होता. "भारतात काय काय उत्पन्न होतें ? भारतातील सर्व मुलें शाळेंत जातात काय ? शाळेंत फी द्यावी लागते काय ? औषधोपचार फुकट होतात की नाही ? वृद्धांना पेनशन मिळतें काय ?" इत्यादि नाना प्रकारचे प्रश्न रात्रीं ११ वाजेपर्यंत वचारले जात होते. लाल व सफेद रंगांच्या रशियन लोकांना आमचा काळा रंग फार आवडला. सर्व लोक आमच्या सौंदर्याची तारीफ करीत होते. कितीतरी तरुण मुली आमचें सौंदर्य निरखण्यासाठीच आल्या होत्या. बाहेर कितीहि थंडी असो, खोलीच्या आत ३-४ फूट रुंद व ६-७ फूट उंच शेगडी पेटलेली होती म्हणून खोली पुरेशी गरम होती. श्री. वसीली एक सामान्य शेतकरी आहे. पण त्यांच्या घरामध्ये ३-४ दैनिकें,

मासिकें वगैरे येतात. एका कोपऱ्यात रेडिओ आहे, टेलिव्हिजन आहे, दुसऱ्या कोपऱ्यात दोन पलंग बिछान्यासह पडले आहेत. तिसऱ्या बाजूला सोफा ठेवला आहे. आणि खोलीच्या मधोमध गोल टेबलाच्या चारी बाजूला खुर्च्या ठेवल्या आहेत. हा मोठासा हॉलच पुरें घर आहे. घराच्या प्रवेशद्वारावर च लहानसें रसोई-घर आहे. पत्नी आहे ती शाळेंत अध्यापिकेचें काम करते. दोन मुलें आहेत तीं शाळेंत शिक्षण घेतात.

रात्रीं जेव्हा सभा समाप्त झाली तेव्हा श्री. वसीली म्हणाले: "युद्धाच्या वेळीं मी एक सैनिक होतो. माझा एक पाय युद्धात गेला. तुम्ही तुमच्या मिशनमधे सफल व्हावें. जगात फौज आणि हत्यारें यांचें नांवनिशाणहि राहू नये."

श्री. वसीलींचा पूर्ण परिवार व संपूर्ण आरत्योमकी गांव यांनी आमच्या मनांत नेहमीसाठी ठाण दिलें आहे.

## जेव्हा पाय धुतले

रशियाने अतिथींशी होणाऱ्या व्यवहारामुळे कधी-कधी चकित सुद्धा केलें आहे. आम्ही एका लहानशा गांवांत श्री. सेमोनियान यांच्या घरीं उतरलो होतो. रात्री निजण्यापूर्वी आम्ही जेव्हा कपडे काढू लागलो तेव्हा श्री. सेमोनियान यांनी आपली मुलगी ल्योषा हिला हांक मारून विचारलें: "काय बेटी, गरम पाणी तयार आहे?" तत्क्षणीं एक उत्सुक डोळ्यांची तरुणी हातांत गरम पाणी व रुमाल घेऊन हंसत खोलींत आली. "ही माझी मुलगी ल्योषा–" श्री. सेमोनियान यांनी परिचय करून दिला. मी उठून उभा झालो, आणि भेट झाल्याबद्दल प्रसन्नता व्यक्त केली. ल्योषाने अभिवादन-स्वरूप आपला हात 'शेक हॅंड' साठी माझ्यापुढे केला. स्त्रियांशी शेक हॅंड करून हात मिळविण्याची मला संवय नव्हती. मी दोन्ही हात जोडून नमस्कार केला. पण ल्योषाचा पुढे केलेला हात मागे काही गेला नाही. आणि मला संकोचानेच का होईना हात मिळवावा लागला.

"बसा अतिथींनो! फार थकले असाल ना? गरम पाणी तुमचा थकवा दूर करील." श्री. सेमोनियान यांनी असें म्हणून ल्योषाला आमचे

पाय धुण्याचा इशारा केला. मी जोडे काढून पाण्याचा जग घेण्यासाठी हात पुढे केला तोच ल्योषाने आपला लहान भाऊ वखतांगी याच्या हातांत पाण्याचा जग देऊन म्हटलें : "तू हलके हलके पाणी टाक नि मी पाय धुतें." हें ऐकल्याबरोबर माझ्या चेहरा संकोच व आश्चर्याने लाल झाला. आपले पाय खुर्चीखाली आखडून घेत मी म्हणालो: "नाही, नाही. मी स्वतः आपल्या हातांनी माझे पाय धुईन." पण ती गोष्ट मंजूर झाली नाही. "तुम्ही तर आमचे अतिथि आहात. आमच्याकडे आतिथ्याची हीच रीत आहे. जर तुम्ही आमच्या आतिथ्याचा स्वीकार करणार नाही तर या घरांतील कोणी झोपणारहि नाही." "पण मला संकोच होतो आहे; मी आपल्या घरींहि आई, बहीण किंवा पत्नीकडून सुद्धा पाय कधी धुऊन घेत नाही.' मला या परंपरेचें आश्चर्य वाटत होतें. भारतांत मान्यता आहे की भगवान, माता-पिता, गुरु, व अतिथि यांचें चरणामृत घ्यालें पाहिजे व त्यांचे पाय धुतले पाहिजेत. परंतु सोव्हियट देशात या परंपरेचें जिवंत-दर्शन होईल अशी मला कल्पनाहि नव्हती. ल्योषा म्हणाली: "पण हा संकोच ही काय बला आहे ? काय तुम्ही भारतातून तो गाठोड्यांत बांधून आणला आहे? मी ऐकलें होतें की भारतातल्या मुली फार लाजाळू असतात. पण मला दिसून राहिलें आहे की तरुण सुद्धा लाजतात." मी अशा प्रहारात्मक उत्तराची अपेक्षा केली नव्हती. अखेर आम्हाला झुकावें लागलें आणि ल्योषाच्या कोमल हातांनी आमचे पाय धुतले. "आपण माझा आग्रह स्वीकारला, मला अतिथिसेवेची संधि दिलीत याबद्दल मी आपली आभारी आहे" असे म्हणत ल्योषाने रुमालाने आमचे पाय पुसले.

## हें खाणें ! हें पिणें !

सोव्हियटचे लोक खाण्यापिण्यांत भलतेंच खवय्ये ! त्यांची भोजनाची पंगत सायंकाळीं ६ वाजता सुरू होईल ती रात्रीं १२-१ वाजेपर्यंत चालत राहील. खाण्याच्या टेबलावर सभा, भाषणें होतील, नाच-गाणीं होतील, आमच्या स्वागताप्रीत्यर्थ एक प्रकारें उत्सवासारखेंच रूप येई. भोजन-टेबलावर १५-२० प्रमुख व्यक्तींना आमंत्रण दिलें जात असे. पुलाव,हाचापुरी, रागू इत्यादि पदार्थ भोजनात असायचेच. भोजन-टेबलावर कोणी कुठे

बसावें हें ठरलेलें असे. सर्व स्त्रिया एका बाजूला व सर्व पुरुष एका बाजूला असें न व्हावें म्हणून एका स्त्रीनंतर एक पुरुष अशा योजनेने मांडणी होई. सर्व बसल्यावर भोजन समारंभाचा एक अध्यक्ष निवडला जाई. हे अध्यक्ष महाशय मदिरेचा प्याला हाती घेऊन 'तोस्त' ची घोषणा करून टेबलावरील इतर सदस्यांच्यासह एक दुसऱ्याच्या स्वास्थाची कामना करीत असत. ५-६ तासांच्या वेळांत हे लोक मदिरेचे ३०-३५ प्याले पिऊन टाकीत असत. हें सर्व पाहून आम्हाला आश्चर्य वाटत असे. आम्हाला हें सर्व नवीन होतें. आम्ही पिण्यासाठी जर पाणी मागितले तर ते म्हणत "पाणी ? काय पाणी कुठें पिण्याची वस्तु आहे? आम्ही पाणी नाही, द्राक्षाची मदिरा पितो. पाणी तर धुण्याबिण्यासाठीच आहे.'

आम्हाला मदिरा पिण्याची संवय नव्हती. चहा-कॉफीने काम चालवून घेत होतो. परंतु एके दिवशीं आम्ही त्यातून वाचू शकलो नाही. घटना अशी घडली. आमचे यजमान म्हणाले : "जरा घरामागे आंगणात चलता ?" आम्ही त्यांच्या मागे तेथे गेलो. यजमानांनी आमच्या हातीं कुदळी दिली आणि म्हणाले "इथें जरा खोदा." आम्ही तसें केलें. थोडेंसें खोदल्यावर एक चांगला मोठा घडा जमीनींतून निघाला. त्याचें तोंड झांकलेलें होते. आमच्या हस्तें तें तोंड खुलें केलें गेलें. आम्हाला एक प्रकारचा तीव्र वास आला. पण आमच्या जवळ उभे असलेले लोक म्हणू लागले : "फार च उत्तम सुगंध येतो आहे." आमच्या यजमानांनी दोन प्याले घड्यातून भरून आमच्या हातांत देत म्हटलें : "आज मदिरेचा मोसम सुरू होत आहे. आम्ही कोणातरी विशिष्ट व्यक्तीच्या हस्तें याचें उद्घाटन करीत असतो. आमच्या परम सौभाग्याने आज आपण आमच्या घरीं आलात म्हणून तुम्हाला च आम्ही उद्घाटनासाठी बोलावलें आहे. हा पहिला प्याला तुम्हालाच प्यावा लागेल."

"पण आम्ही जन्मात कधी मदिरेला शिवलोहि नाही. आम्हाला मदिरा पिण्याची संवय नाही." आम्ही म्हटले. हें ऐकून आमचे सर्व यजमान व मित्र एकदम निराश झाले. त्यांना तो एक मोठा अपशकून व अपमान-कारक प्रसंग वाटला. आम्हाला दिसलें की आम्ही त्यांच्या मनावर मोठा

आघात करीत आहोत. " असें होऊ शकत नाही. " जवळच उभे असलेले सामूहिक कृषि-फार्म, कोलखोजचे अध्यक्ष म्हणाले "आज तुम्हाला प्यावीच लागेल. भारत व रशियाच्या मैत्रीच्या नांवावर प्यावी लागेल. " आम्ही त्यांना कसें समजावणार ? " आम्ही तुमची परंपरा तोडू इच्छीत नाही. पण मदिरेच्या वासामुळेच आमचें डोकें उठलें आहे, हें कसें आम्हाला पिता येईल " आम्ही म्हणालो.

आमचे यजमान त्यावर म्हणाले: " ही द्राक्षाची मदिरा तुमच्या स्वास्थ्याला हानि नाही करणार. तुम्हाला पिण्याची संवय नाहीं तर आज एकदोन घोटच घ्या. जर तुम्ही पिणार नाही तर हा सारा उद्घाटन समारंभच बिघडून जाईल." आम्ही मोठ्या धर्मसंकटात सांपडलो. चारी बाजूंनी आम्ही असे सांपडलो की बाहेर पडण्याचा मार्गच काही दिसेना. " हें पहा, तुम्हाला प्यावीच लागेल, नाही तर आम्ही कोणी पिणार नाही." यजमानाची ज्येष्ठ मुलगी माशा म्हणाली. आणि स्वतः माशाहि हातात मदिरेचा प्याला घेऊन आली. सर्वांनी आपल्या हातातील प्याले उंच केले. आमचा काही इलाज चालेना. शेंवटीं त्यांच्या बरोबर एकाएकीं आमचेहि हात वर उंच गेले. आम्ही काहीहि विचार करण्याच्या व निर्णय घेण्याच्या स्थितींत राहिलो नाही. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. एका जबरदस्त हास्यकल्लोळात आमच्या ओठाजवळ मदिरेचा प्याला गेला. दोन घोट घशाखाली उतरले. " तुमच्या जीवनांतील हा एक नवा अनुभव आहे. " माशा हंसत हंसत म्हणाली.

## तो टॅक्सी ड्रायव्हर

स्टॅलिनची जन्मभूमि गोरी नांवाच्या शहरात आमचा पडाव होता. रात्रीचे १२ वाजून गेले होते. मला पलंगावर झोंप लागली होती, व प्रभाकर काही पत्र लिहीत होते. तों इतक्यात कोणी तरी दरवाजा खट-खटावला. " रात्रीं १२ वाजता कोण दार खटखटावतें आहे ? " सहजच जिज्ञासा वाटली. बाहेर घोर अंधाऱ्या रात्रीचें साम्राज्य होतें. बर्फाळ हवेच्या झोताने आमच्या खोलीची खिडकी केव्हा केव्हा खटखट करीत असे. इतक्यात पुन्हा दारावर थाप पडली. खरेंच, कोणी तरी बाहेर उभा

आहे असें वाटून प्रभाकरने दार उघडलें. एक उतार वयाचा धडधाकट माणूस बाहेर उभा होता.

"काय पाहिजे आपल्याला ? काय आम्ही तुम्हाला काही मदत करू शकतो ?" प्रभाकरने विचारलें. गृहस्थ म्हणाला : "भारतातून आलेले शांति-यात्री आपणच आहा काय ?" आणखी तो पुढे म्हणाला "वर्तमानपत्रावरून व मास्को रेडिओवरून मला आपल्याविषयी माहिती झाली. आज मी तुम्हाला रस्त्याने जात असताना पाहिलें. बर्फ पडत होतें तरी तुम्ही पायीं चालतच होता. तुम्हाला भेटण्याची इच्छा झाली. मी एक टॅक्सी ड्रायव्हर आहे. तुमच्या शांतियात्रेला थोडी मदत करू इच्छितो. आज टॅक्सी चालवून ३० रूबल (सुमारें १०० रु. वर) मी कमावले आहेत. त्यांतून २० रूबल या शांतियात्रेसाठी देऊ इच्छितो. आपण याचा स्वीकार करा" असे म्हणून त्याने नोटा पुढे केल्या. जेव्हा त्याला आम्ही समजावून सांगितलें की आम्ही जवळ पैसा राखत नाही आणि कोणी दिलेला पैसा आम्ही स्वीकारीत नाही तेव्हा तो बिचारा थोडा निराश झाला. म्हणाला : "पैशाशिवाय इतका लांबचा प्रवास करणें कसें शक्य आहे ? कधी वेळीं-अवेळीं हे पैसे कामीं पडतील." आम्ही अगदी नकार दिल्यावर तो म्हणाला "अच्छा, तुम्ही पैसे घेत नाही तर नका घेऊ. माझी एक प्रार्थना तर स्वीकाराल ? पायीं तर तुम्ही रोजच चालता. उद्या माझ्या टॅक्सीत चला. मी तुम्हाला पुढच्या पडावावर पोहोंचवून देईन." आम्ही त्याला समजावलें : "टॅक्सीत जाणें सुद्धा आमच्या यात्रेच्या नियमाचा भंग करणें होईल. म्हणून तुम्ही आम्हाला क्षमा करा." हें ऐकून तर तो फारच दुःखी झाला. रात्रीं १२ वाजता जी व्यक्ति शोध काढीत कशी तरी आमच्यापर्यंत येऊन पोहोंचली आणि त्याची तीव्र इच्छा पुरी होऊ शकली नाही त्यामुळे तो कष्टी होणें स्वाभाविकच होतें. नंतर जाता जाता तो टॅक्सी ड्रायव्हर म्हणाला : "काही हरकत नाही. भलेहि मी या रूपाने तुम्हाला मदत करू शकलो नाही पण मी सुद्धा अण्वास्त्राच्या व युद्धाच्या विरोधी आहे. मी आमच्या देशाच्या सरकारला आणि जनतेला सांगेन की तुमच्या धोरणाचा त्यांनी स्वीकार करावा." कसा शांतिवादी होता तो टॅक्सी ड्रायव्हर !!

## सोव्हियट भूमीतला शेंवटचा महिना

आम्ही १ एप्रिल रोजीं स्मॉलेंस्कला पोहोंचलों. नीपर नदीच्या जोरदार प्रवाहात प्रतिबिंबित या प्राचीन शहराचें रूप पुन्हा नवें होऊन डोकावत होतें. ज्या नीपर नदीच्या प्रवाहाने नेपोलियनच्या सेनेला सुद्धा गडप केले होतें त्या नदीचें सामर्थ्य सुद्धा दुसऱ्या महायुद्धात या नगरीला वाचवू शकलें नाही. श्रीमती स्कोलकोवाताई स्मॉलेंस्कची प्रदक्षिणा करतांना म्हणाल्या: " इतिहासात या शहराचा युद्धाशीं संबंध ऊन-सावली सारखा राहिला आहे. हें शहर शेंकडो वेळां युद्धात आक्रमिलें गेलें आहे आणि मागच्या महायुद्धात तर या शहराचा ९३ टक्के हिस्सा नष्ट होऊन मातीत मिसळून गेला होता. पण आम्ही आमच्या श्रमाने त्याला पुन्हा उभें करून सजविलें आहे. आम्ही मजूर आहोत आणि मजूर कधीहि श्रम करायला हार जात नाहीत. आम्ही आता पुन्हा कोणत्याहि युद्धाची कल्पना सुद्धा करू इच्छीत नाही. सर्वनाश झाला असतांनाहि आम्ही पुन्हा उभे राहिलो आहोत. कारण आम्ही एक सुखद व शांतिमय मानवजीवनाचा पाया दृढ करू इच्छतो." आम्ही नगर-दर्शनासाठी फिरत होतो तेव्हा थोडा थोडा बर्फ पडत होता. सामान्यपणे मार्चच्या तिसऱ्या आठवड्यानंतर बर्फ पडणें बंद होतें. परंतु या वर्षीं हिवाळ्याने आपलें भयंकर रूप दाखविलें. एप्रिलचा प्रारंभ झाला तरीहि हवामान शून्याच्या खाली होतें.

एके दिवशीं एका वृद्ध शेतकऱ्याच्या आग्रहावरून आम्ही सडके-पलीकडे दोन मैल आत जाऊन त्याच्या घरीं मुक्काम केला. त्या दिवशीं आमची २१ मैलांची चाल होऊन गेली होती. आणखी दोन मैल चालून त्या गांवात जाण्याचा उत्साह राहिला नव्हता. पण त्या वृद्ध ग्रामीण श्री. आब्रामोविच वसीलीने म्हटलें: "आज माझे अतिथि होऊन मला उपकृत करा. थकले आहात तर थोडा वेळ इथेच आराम करा. तुमचें सामान मी उचलून नेतो." त्यांच्या स्नेहपूर्ण हृदयांतून निघालेल्या आमंत्रणाचा आम्ही इन्कार करू शकलो नाहीं.

आम्ही श्री. वसीलींच्या मागे-मागे निघालों. त्यांच्या पायांत एक नवा जोश संचरला होता. " आमच्या गांवात तुम्हीच पहिले परदेशी

प्रवासी आला आहात." वसीली म्हणाले, "भारत आमचा मित्र देश आहे. आम्ही भारतावर अपार प्रेम करतो." ते भारताविषयी पुष्कळ चौकशी करीत होते. मधेच कोणाला हांक मारून ते म्हणाले: "अरे इवान, हें पहा, आज आमच्या घरीं दोन भारतीय पाहुणे आले आहेत. रात्रीं तुम्ही आमच्या घरी या." थोड्या वेळाने आणखी दुसऱ्या गृहस्थाला तशीच सूचना पुन्हा दिली. आमचें सामान घेऊन पुढे-पुढे वसीली जात होते आणि गांवभर सूचना देत होते. "हेंच आमचें गांव पेतकोविची. ही माझी झोंपडी." आपल्या पत्नीची व मुलीची भेट करून देतांना वसीली म्हणाले, "हा आहे माझा छोटासा परिवार." गांवातल्या शाळेंत एक मोठी सभा घेतली. रात्रीं आम्ही पाहिलें की श्री वसीलींनी पत्नी, मुलगी व स्वतःसाठी आपले बिस्तरे जमिनीवर टाकले व आम्हा दोघासाठी पलंगावर निजण्याची सोय केली. "आपण वृद्ध आहात. पलंगावर आपण झोंपावें, आम्ही खालीं निजू" असा आम्ही आग्रह केला. पण अतिथींनी खालीं झोपावें हें श्री. वसीली ऐकायला तयार नव्हतें.

अशाच प्रकारची जवळ जवळ प्रत्येक गांवची गोष्ट आहे. प्रत्येक पडाव आमच्यासाठी एक नवा अनुभव, एक गोड संस्मरण, आणि एक स्फूर्तिदायक प्रेरणा होती. श्वेत रशियाची राजधानी मिंस्क मधे आम्ही दोन दिवस राहिलो. आठ किलोमिटर लांब मिंस्क शहराचे सर्व प्रमुख राजमार्ग लेनिन-मार्गाची शोभा खरोखरच आकर्षक होती. मिंस्कला पोहोंचेतों ऋतुहि पुष्कळ बदलून गेला होता. बर्फ विरघळून पाणी झाले होते. नद्यांचा कलकल ध्वनि ऐकू येऊ लागला होता. थंडीची खुमारी उतरून गेली होती. यामुळे मिंस्क शहर पाहण्याचा पुरा आनंद आम्ही भोगू शकलो. यांकाकुपालासारख्या मोठ्या विचारकांना व साहित्यिकांना निर्माण करणाऱ्या श्वेत रशियाच्या भूमीचा आम्ही जेव्हा निरोप घेत होतो तेव्हा आकाशातील काळे ढग निघून गेले होते, आणि सूर्य आपल्या सोनेरी किरणांनी पृथ्वीला आलिंगन देत होता. झाडां-झुडपांना कोंवळीं कोंवळीं पालवी फुटून राहिली होती आणि जमिनीतून पिवळ्या व आसमानी रंगाचीं सुंदर पुष्पें डाहळ्या-डाहळ्यांना भरभरून निघू लागलीं होतीं.

"मिंस्क शहरहि स्मॉलेंस्कप्रमाणेंच रण-क्षेत्र झालें होतें. आणि आज जें दृष्टि पडतें आहे तें सर्व युद्धानंतर निर्माण झालेलें आहे. युद्ध-ग्रस्त मिंस्क सन १९४४ मध्ये एका खंडारासारखें दिसत होतें" आम्ही मिंस्क शहरात फिरत असतांना लुद्मीलाबाई सांगत होत्या. आम्ही विज्ञान-अकादमी, मिंस्क-विश्वविद्यालय, संस्कृति-भवन इत्यादींच्या शिवाय युद्ध-कालीन घटना, चित्रें, वस्तु इत्यादींचा संग्रहालय विशेष आवडीने पाहिला. मोठमोठ्या चिमण्यांतून निघणारे धूर पाहून हें सहज अनुमान निघू शकतें की हें एक औद्योगिक शहर आहे. येथे गिरण्या-कारखान्यांचें एक जाळेंच पसरलेलें आहे.


"आमच्या देशांत सर्व स्त्री-पुरुषांना ७ तास काम करणें अनिवार्य ठरविलें आहे. दुकानें, घरें, किंवा कारखाने या सर्वांवर समाजाचें स्वामित्व आहे. टॅक्सी असो की हजामतीचें दुकान असो, सर्व काही समाजाचें आहे. या समाजवादी व्यवस्थेत व्यक्ति समाजाची पोषक आहे. प्रत्येक वस्तूची किंमत ठरलेली आहे. कधी कोणत्याहि वस्तूसाठी वादाला अवकाश नाही. कारण प्रत्येक व्यक्ति समाजाच्या एका निश्चित क्रमानुसार आपलें कर्तव्य पूर्ण करण्यासाठी काम करीत असते. कोणाचें शोषण करणें किंवा धन कमावणें हें त्याचें उद्दिष्ट नसतें. म्हणून लहान-मोठे विवाद उठतच नाहीत. रुपया-पैसा तर केवळ विनिमयाचें साधन-मात्र आहे. ती काही संग्रहाची वस्तु नाही." आमच्या गप्पा-गोष्टींत लुद्मिलाबाई हें सर्व सांगून राहिल्या होत्या. आम्ही स्विसलोच नदीच्या कांठावर असलेल्या विजय-मैदानावरहि गेलो. जवळच एक गोल भवन आहे. हें होतें मिन्स्कचें सुप्रसिद्ध ऑपेरा थियेटर, भारताचें राष्ट्रीय नृत्य-मणिपुरी, कत्यकली किंवा भारत नाट्यम् पाहिल्यावर या देशाची राष्ट्रीय नृत्य-शैली 'बालेत' पाहण्याची आमची उत्सुकता स्वाभाविक होती. म्हणून आमच्या कार्यक्रमात आम्हाला 'बालेत' हि दाखविलें गेलें.

सोव्हियट देशात सिनेमापेक्षाहि नाट्य-थिएटरें अधिक आहेत. नाट्य-मंच कला-संपन्न आहे. आम्ही येरवान, त्बीलीसी, कुताईसी, मास्को सारख्या शहरांत ऑपेरा थिएटरें पाहिलीं, तेथील नाट्यागारें पाहिलीं, व

काही कलावंतांनाहि भेटलो. कुताईसीच्या नाट्य-मंच-निर्देशकाने आम्हाला सांगितलें की ते लौकरच 'अभिज्ञान शाकुन्तलम्' चें नाटक स्टेजवर करून दाखविणार आहेत. कुताईसीत आम्ही जें नाटक पाहिलें तें फार आकर्षक व कलेच्या दृष्टीने उच्च कोटींतील होतें. मोठ्या शहरांतच नाही, लहान-लहान शहरांतहि अशीं सुंदर थिएटरें आहेत तशीं कदाचित् आमच्याकडे, जयपूर, लखनौ, वाराणशी सारख्या शहरांतहि नसतील. यावरून येथील नाट्य कलेच्या प्रगतीचें सहज अनुमान करतां येतें. सिनेमाच्या कलेत विज्ञानामुळे मनुष्याची स्वाभाविक कला तितकीशी दृग्गोचर होत नाही. त्यांत कॅमेराचा चमत्कार अधिक असतो. परंतु नाट्यकलेमधे मनुष्य आपल्या भावव्यक्तिकरण कलेत अत्यंत प्राविण्य प्राप्त करू शकतो.

सोव्हियट संघांत धार्मिक संप्रदाय, धर्म व चर्च यांची काय स्थिति आहे याचेंहि मी खोल अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. कम्युनिस्ट-पार्टी जरी धर्म-विरोधी आहे व धर्माविरुद्ध प्रचारहि करते तरी सरकार-कडून धर्म-प्रेमी लोकांना हतोत्साहित केलें जात नाही. धर्म-प्रेमी लोक खुल्या रीतीने धार्मिक प्रचार करू शकत नाहीत, पण व्यक्तिगत रीतीने धर्माचरण करू शकतात. परंतु खड्ड्यात एकत्र जमलेलें पाणी सुकूं दिलें म्हणजे त्यांतील बेडूक न मारताहि मरून जातील त्याप्रमाणे विज्ञान आणि भौतिकवाद यांवर आधारित शिक्षण-प्रणालीनें पंथवाद व धर्मांधता आपो-आप निर्जीव होत आहेत. त्यासाठी काही विशेष प्रयत्नाची जरूर राहिली नाही. आम्ही जेव्हा खेड्यातील वस्तींत मुक्काम करीत होतो तेव्हा पहात होतो की तेथील शेतकरी आपआपल्या घरांत येशु ख्रिस्ताचीं चित्रें टांगून सकाळ संध्याकाळ त्याच्या समोर दिवेंहि जाळत असत. हां, शहरांत व शिक्षित तरुणांत धर्माबद्दल काहीहि आवड दिसत नसे. चर्च व पाद्री यांची संख्या प्राप्ति व प्रतिष्ठेच्या अभावामुळे सहजच कमी होत आहे. जर एकाच ठिकाणीं जवळ-जवळ अनेक चर्चें असलीं तर त्यांतील एखादें चर्च प्रार्थना करणाऱ्याच्यासाठी सोडून बाकीच्या चर्चांचा उपयोग क्लब, सिनेमाहॉल, संग्रहालय, विद्यालय वगैरेसाठी केला जातो. २२ कोटी लोक-संख्येच्या या देशात कम्युनिस्ट पार्टीचे सभासद केवळ एक कोटी आहेत.

पार्टीचा सदस्य तोच बनू शकतो जो खरोखर त्या लायक असतो. यामुळे जनतेच्या विकसित बौद्धिक स्तरांत व शिक्षणांत विज्ञान व भौतिकवाद यांच्या बाहुल्यामुळे धर्मसंप्रदाय प्रभावहीन झाले आहेत.




ता १ जानेवारी १९६३ चा अरुणोदय होता. त्या दिवशीं आम्ही सोव्हियट संघांत प्रवेश केला. नव्या वर्षाच्या उत्सवांत संपूर्ण सोव्हियट देश त्यावेळी मग्न होता. १ मे रोजीं जेव्हा आम्ही निरोप घेतला त्या दिवशीं मजूर-दिनाचा उत्सव साजरा करण्यांत सारा देश उत्साहानें लागला होता. या दोन मोठ्या पर्वाच्यामधे चार महिने निघून गेले. सोव्हियट देशाच्या ५ गणराज्यांत आम्ही प्रवास केला होता. हजारों लोकांना भेटलो. आमच्या मित्रांच्या यादींत रशियांतील शेंकडों नांवें जोडलीं गेलीं. असें वाटत होतें की जणू आम्ही या देशात फार काळापासून राहत होतो. या देशाचा निरोप घेण्याच्या वेळीं त्या शेंकडो मित्रांचे चेहेरे एकएक करून स्मरणात येत होते–ज्यांनीं रस्त्यांत बरोबर चालतांना, घरांत भोजन करतांना, सभातून भाषण करतांना, आपला पत्ता लिहून दिला, आमच्या कुडत्यांवर मैत्रीचा बॅज लावला, आमच्या गळ्यांत दोस्तीचा टाय बांधला, आम्हाला

पुन्हा येण्याचें निमंत्रण दिलें, कधी कधी पत्र लिहिण्याचा आग्रह केला, स्वत: खालीं निजून आम्हाला पलंगावर निजविलें, आमचे वडील बनून खाण्या-पिण्या व निजण्याची चिंता केली, शांतीचे शिपाई होऊन आमच्या बरोबर यात्रेत येण्याची तयारी दाखविली, चाकोलेट, सुके मेवें, व फळांनीं आमचे खिसे भरून आपल्या घरून आम्हाला रवाना केलें, आपल्या स्नेहाने व प्रेमाने आम्हाला उपकृत केलें, आमच्या आगमनाच्या प्रसंगीं नाना प्रकारचे उत्सव केले, स्वागत-भोजन-समारंभ केले, आणखी किती सांगायचें काय काय केलें ! प्रत्येक दिवस आम्हाला अविस्मरणीय घटना आहे. आम्ही १२० दिवसांच्या या सुखप्रद यात्रेंत अनुभवांचा, संस्मरणांचा, मित्रांचा, आणि लोकांच्या प्रेमाचा अनुपम खजिना प्राप्त केला.

दोन कोटी वीस लाख चौरस किलोमिटरांच्या या विशाल देशांत राहणाऱ्या २२ कोटी लोकांपर्यंत आमच्या शांतियात्रेची माहिती पोहोंचविण्या-साठी, वर्तमान पत्रें, रेडियो, टेलिव्हिजन इत्यादि साधनांनी सर्व ठिकाणीं आम्हाला मदत केली. या देशांची अनेक गांवांतून व शहरांतून पदयात्रा केल्यानंतर आमच्या मनावर प्रभाव पडला की संपूर्ण जगाच्या सहाव्या भागांत राहणाऱ्या या सोव्हियट देशाची जनता युद्ध-विरोधी आहे आणि ती वाटेल ती किंमत देऊन शांतीची उत्सुक आहे. पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत १० हजार किलोमिटर व उत्तर-दक्षिण ५ हजार किलोमिटर अशा या विस्तृत देशाला आम्ही जेव्हा एका किनाऱ्यावर उभे राहून पाहतो तेव्हा या देशाच्या त्या सर्वप्रिय कवितेचे सूर कानांत घोळूं लागतात :

> **" स्प्रासीत्य वी उचिझने !**
> **खात्यात् ली रूसकीये वाइने ?"**

ही कविता प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या तोंडून ऐकायला मिळाली : " काय रशियन जनता युद्ध इच्छिते ? " नॉर्वे, फिनलंड, पोलंड, झेकोस्लावाकिया, हंगेरी, रुमानिया, तुर्कस्तान, इराण, अफगाणिस्तान, मंगोलिया, चीन व कोरिया —या १२ देशांच्या सरहद्दींना स्पर्श करणाऱ्या १५ सोव्हियट गणराज्यांचा हा महान देश काय युद्ध इच्छितो ? ज्या देशांत युद्धाचें समर्थन करणें कायद्याने अपराध म्हणून घोषित केलें आहे, तो देश काय युद्ध

इच्छितो ? ज्या देशात विज्ञान व टेक्नॉलॉजीने (तंत्रविद्येने) आत्यंतिक मर्यादेपर्यंत प्रगति केली आहे, जेथे कोळसा, लोखंड, लाकूड, इत्यादि नैसर्गिक संपत्ति भरपूर प्रमाणात आहे, त्या देशाला काय युद्धाची जरूर आहे ? ज्या देशाला युद्धाच्या अनेक आघातांनी घायाळ केले आणि जेथे एकहि परिवार असा मुष्कीलीने मिळेल कीं ज्याचा कोणी-न-कोणी सदस्य युद्धात मारला गेला नाही किंवा घायाळ झाला नाही त्या देशाला काय पुन्हा युद्ध पाहण्याची आकांक्षा असू शकते ? ज्या देशाचे दोन कोटी मानव दुसऱ्या महायुद्धाचें भक्ष्य होऊन मृत्युमुखीं पडले तेथे काय पुन्हा युद्धाची हौस असू शकते ? या प्रश्नाचें फक्त एकच उत्तर आम्हाला मिळालें. "नाही, आणि कधीहि नाही," तर मग युद्धाच्या या तयाऱ्या कशासाठी चालू आहेत ? या प्रश्नाचें उत्तर काय ? का नाही हा देश निःशस्त्रीकरणाच्या दिशेने पुढे पाऊल टाकीत ?

हा प्रश्न आम्ही जनतेसमोरहि ठेवला आणि सरकार समोरहि ठेवला. आम्हाला याचें उत्तर जें मिळालें त्याचें सार हें आहे की आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उच्चतम पातळीवर वैज्ञानिक व भौतिक संघर्षात आपल्या मोठ्या प्रतिस्पर्धी देशांशी झुंज देणारा हा देश निःशस्त्रीकरणाच्या मार्गावर एकटा पुढे पाऊल टाकील तर तो संपूर्ण देश एका मोठ्या धोक्यात सांपडेल. पण त्या बरोबरच शांति व अहिंसा या क्षेत्रांत गांभीर्यपूर्वक विचार करणारे व समजणारे लोक आम्हाला म्हणाले की भारतासारखा अहिंसावादी व तुलनेनें अल्प साधनवाला देश, ज्याला कधी कोण्या महायुद्धाचा सामना करण्याचा प्रसंग पडला नाही, आणि जेथें बुद्ध व गांधी यांची मजबूत विचार-परंपराहि आहे, जर एकपक्षीय निःशस्त्रीकरणाचें धाडस करूं शकत नाही, तर सोव्हियट संघासारख्या देशाला असा धोका पत्करणें फारच कठीण आहे.

तर्कानें वर दिलेली गोष्ट जरी कदाचित् पटली तरी निःशस्त्रीकरणाच्या बाजूला न झुकण्याचें सर्वांत मुख्य कारण आहे जर्मनी व अमेरिकेवरचा अविश्वास आणि भीति. आम्हाला हा अविश्वास व भय प्रत्येक ठिकाणीं दिसलें. रशियन जर्मनांना भितात आणि जर्मन कम्युनिस्टांना भितात. जी

भीति भारत व पाकिस्तानात आहे तीच भीति रशियांत व अमेरिकेंत सुद्धा आहे. जेथे भीति आहे, अविश्वास आहे, तेथे निःशस्त्रीकरण कसें संभवू शकेल? सर्व जाणतात की या अणुयुगांत वाटेल तेवढा शक्तिशाली देश सुद्धा युद्धात विजय मिळवू शकत नाहीं. युद्ध झालें तर दोन्ही पक्ष मारले जातील, सारी मानवजात मारली जाईल. तरी भीतीमुळे निःशस्त्रीकरण करण्याचें धाडस कोणाला होत नाही. सोव्हियट देशाची यात्रा पूर्ण केल्यानंतर आम्ही या निर्णयावर येऊन पोहोंचलो.

# पोलंडच्या प्राणवान जनतेमधें

अगदी बरोबर ५२ दिवसांत १२०० किलोमिटरचा मास्को-वॉरसाचा लांबचा रस्ता पार करून सुद्धा आमचे पाय थकले नाहीत, खांद्यांना त्रास झाला नाही आणि डोक्यातलें तुफान थंड पडलें नाही; कारण युरोपचा सुंदर देश पोलंड, त्याची राजधानी वॉरसा व पोलंडच्या जनतेला भेटण्याची उत्सुकता, एकपक्षीय निःशस्त्रीकरणाची मागणी पुढे ठेवण्याचा आवेश इत्यादि गोष्टींनी, धनुष्यापासून सुटलेल्या तीराप्रमाणे, मोस्कोहून वॉरसापर्यंत आम्हाला पोहोचविलें.

वॉरसामधे विद्यार्थी, साहित्यिक आदींना भेटण्याचा कार्यक्रम चांगला झाला. पोलिश शांति-परिषदेत फार चांगली सभा झाली. त्या सभेत पार्लमेंटचे अनेक सभासद, कम्युनिस्ट पार्टीचे कार्यकर्ते व अनेक पत्रकार हजर होते. त्यानंतर भारतीय राजदूताच्या घरींहि काही तरुणांची एक उत्साही बैठक झाली.

७ मे रोजीं सायंकाळीं जेव्हा आम्ही वॉरसाला पोहोचलो तेव्हा क्षितिजावर लाल ढगांची एक लांब च लांब रेषा उमटली होती. असामान्य बर्फवर्षावानंतर व भयंकर हिवाळ्यानंतर या वर्षी सोनेरी ऊन व आकर्षक हिरवळ यांच्यामुळे वॉरसा फारच सुंदर दिसत होता. विशेषतः बिस्वा

नदीच्या किनाऱ्यावर वसल्यामुळे वॉरसाची शोभा निराळी आणि लोभस दिसत होती. गंगायमुनेप्रमाणे रुंद पात्राच्या विस्वा नदीच्या खोल पाण्यात तळपत असलेल्या विजेच्या प्रकाशाने प्रकाशित ही नगरी दुसऱ्या महायुद्धाच्या शापाने अगदी मातीत मिसळून गेली होती. पण आज तिचें पुनर्निर्मित मोहक रूप पाहून हें अनुमान करणेंहि कठिण होवून गेलें होतें की १९४५ नंतर इतकें तिचें पुनर्निर्माण झालें असेल.


पोलंड शांति-परिषदेचे मंत्री श्री. तादेउस स्त्रालकोव्स्की यांनी आमचें स्वागत करताना म्हटलें : "युद्धाच्या आघातामुळे आमचें अंग-अंग जखमांनी छिन्न-विच्छिन्न करून टाकलें आहे, आमचे रोम-रोम जाळून टाकलें आहेत. आमच्या जीवन-व्यवस्थेचा चेंदामेंदा करून टाकला आहे. तीन कोटी लोक संख्येच्या या छोट्याशा देशाला ६० लाख लोकांच्या मृत्यूचें दु:ख सहन करावें लागलें आहे. कसेंतरी करून या आघातातून आम्ही डोकें वर काढून राहिलो आहोत आणि आपल्या समाज-व्यवस्थेला ठीक रस्त्याला लावण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण आज ज्या शीत-युद्धाच्या अंधारात आम्ही चाचपडत आहोत तो अंधार नष्ट होणें फार जरूरीचें आहे. म्हणून तुमच्या या शांतियात्रेचें आम्ही मनापासून स्वागत करतो." श्री. स्त्रालकोव्स्की पोलंडच्या पार्लमेंटचे सदस्य आहेत आणि या देशाच्या शांति-आंदोलनाचे प्रमुख संघटक आहेत. वॉरसात आम्ही शांति-परिषदेचे अतिथि होतो म्हणून श्री. स्त्रालकोव्स्कीशी आमचा निकटचा परिचय झाला. ते म्हणत होते : "आमच्याकडे एक म्हण आहे — 'अतिथि देवो भव' (घरीं अतिथि आला त्याला भगवान माना) मग तुम्ही लोक तर नुसते अतिथि नाही, पण आमच्या भावनेला, आमच्या आकांक्षेला आणि आमच्या आंदोलनाला गावोगाव व देशोदेशी नेऊन पोहोचविणारे संदेश-वाहक आहात. तुम्ही आमचा हा संदेश सर्वांकडे पोहोचवा की पोलंडवासी जनतेला जर कशाचा जबरदस्त तिटकारा असेल तर तो युद्धाचा आहे, आणि जर कशाची अत्यंत आवड असेल तर ती शांतीची आहे." श्री. स्त्रालकोव्स्की उत्साहाने भरलेले तरुण आहेत. ते दोन वेळां भारतांत येऊन गेले. भारत म्हणजे काय हें त्यांनी बारकाईने

पाहिलें आहे, व त्याला जाणून घेतले आहे. भारतातील आपल्या प्रवासात त्यांनी निरनिराळ्या स्थानांचे १२०० वर फोटो घेतलेले आहेत आणि भारताच्या भिन्न-भिन्न सांस्कृतिक परंपरांचा परिचय करून देणारें एक चलचित्रहि त्यांनी बनविलें आहे.

## मैत्रीचा पूल

भारत-पोलंड मैत्री-संघात घालविलेली ९ मे ची संध्याकाळ आमच्या प्रवासांतील एक संस्मरणीय संध्याकाळ आहे. दोन्ही देशांतील मैत्रीला मजबूत आधार देण्यासाठी या संस्थेचें उल्लेखनीय महत्त्व आहे. ९ मे रोजीं विश्व-कवि रवींद्रनाथ ठाकुर यांच्या जन्म-दिवशीं अनेक भारतीय व पोलीश विद्वान् हजर होते. या संघाचे उपाध्यक्ष श्री स्तानीस्वाव याब्वोन्स्की म्हणाले : " स्थायी शांतीसाठी आणि युद्धाच्या शक्यतेचें जडमूळ उखडून टाकण्यासाठी भिन्न-भिन्न देशांच्यामधे एक पूल असला पाहिजे. तो पूल 'मैत्री' हा आहे. ही संस्था दोन देशांच्या मैत्रीचें घर आहे. आणि या घरातून जगभराच्या देशांसाठी 'मैत्री'चा प्रवाह वाहू लागेल असा आमचा प्रयत्न आहे. आम्ही फक्त एकाच ध्येयाचे उपासक आहोत — मैत्री. आणि मैत्रीचें लक्ष्य सिद्ध झालें तर दुसरीं सगळीं लक्ष्यें सहज सिद्ध होतील, श्री. याब्वोन्स्की गेल्या २० वर्षांपासून शाकाहारी आहेत, कारण अहिंसेच्या दिशेने पुढे जाण्यासाठी शाकाहार हें पहिलें पाऊल आहे असें ते मानतात. बापूंच्या आत्मकथेने त्यांच्या विचारांना अहिंसेच्या पुष्कळ जवळ आणलें आहे. आणि आतां ते फार सूक्ष्मतेने अहिंसेच्या विचारांचें अध्ययन करतात. गप्पा-गोष्टी करीत असता ते म्हणाले : " मी ६५ वर्षांचा म्हातारा आहे, पण मांसाहार करणाऱ्या माझ्या वयाच्या दुसऱ्या सोबत्यापेक्षा माझें स्वास्थ्य कितीतरी चांगलें आहे. शाकाहार केवळ अहिंसा व सात्त्विक चिंतनासाठी च सहायक नाही तर स्वास्थ्यासाठी सुद्धा अनुकूल आहे." श्री. याब्वोन्स्की यांच्या मनात बापूंच्याबद्दल जी अगाध श्रद्धा आहे त्याचें कारण सांगताना ते म्हणाले : " गांधींनी अहिंसेला व्यावहारिक रूप दिलें. हा गांधींच्या अहिंसेचा परिणाम आहे की आज

जग आर्थिक, सामाजिक, आणि राजनैतिक क्रांतीचा एक नवा मार्ग जाणतें. त्यांनी क्रांतीला मैत्री व शांतीबरोबर जोडून दिलें." श्री. व्वोन्स्कींनी बापूंच्या आत्म्याला व त्यांच्या विचारांना ठीक-ठीक ओळखलें आहे. पोलंडमधे 'बापूंची आत्म-कथा' अत्यंत लोकप्रिय पुस्तक आहे. वॉरसात 'महात्मा गांधी रोड' नांवाचा एक प्रमुख मार्गहि आहे.




## समाज-व्यवस्था

तीन कोटी लोकसंख्येच्या पोलंडमधे सामाजिक आणि राजनैतिक व्यवस्थेचा एक नवा प्रयोग चालू आहे. क्रिश्चन कॅथलिक संघाचे अध्यक्ष आणि पार्लमेंटचे सदस्य श्री. जॉन फ्रांकोव्स्को यांनी चर्चा करताना म्हटलें : "आमच्या पार्लमेंटमधे तीन राजनैतिक पार्ट्या आहेत, काही कॅथलिक सभासद आहेत, काही स्वतंत्र सभासद आहेत. सर्वात मोठी पार्टी मार्क्स-वादी पार्टी आहे. बाकीचे लोक मार्क्सवादी नाहीत. सर्वात मोठी पार्टी राज्यकारभार चालवीत नाही. पण सर्व पक्षांचें सम्मिलित सरकार कारभार चालवतें. पार्लमेंटमधे तेंच बिल मंजूर होतें ज्याला पार्लमेंटच्या सर्व सदस्यांची संमति मिळते. पार्लमेंटमधे आणण्यापूर्वी कोणतेंहि बिल सदस्यांच्या निरनिराळ्या पक्षांत चर्चेसाठी मांडलें जातें. त्यावेळीं एकाएका शब्दावर बारकाईने कडाक्याची चर्चा होते. त्या पक्षांच्या चर्चेनंतर त्या बिलाचें स्वरूप असें होऊन जातें की तें सर्व सदस्यांना मान्य होतें. याप्रमाणे आमच्या येथे बहुमताने नव्हे, सर्वसंमतीने कारभार चालतो. भिन्न-भिन्न

पक्षांमधें अनेक मतभेद असून सुद्धा आम्ही देशाच्या पुनर्निर्माणाचा आणि विकासाचा एक सर्व-संमत असा कार्यक्रम बनविला आहे आणि त्यानुरूप आम्ही चालत आहोत. भिन्न-भिन्न विरोधी पक्षांची शक्ति परस्पर निंदेत आणि सत्ता काबीज करण्याच्या प्रयत्नात नष्ट करण्यापेक्षा सर्वांनी मिळून एक सर्व-संमत कार्यक्रम बनवावा आणि समाजाच्या सर्व वर्गांचें व विचारांचें प्रतिनिधित्व शासनात असावें अशी आमची पद्धति आहे." आम्हाला श्री. फ्रांकोव्स्कींच्या या विचार-पद्धतीचें फार आकर्षण वाटलें. सर्व-संमत राष्ट्रीय कार्यक्रम व सर्व-पक्षीय राज्यकारभार हा जो विचार आहे त्याच्याशी पुष्कळशी जुळती अशी येथे पद्धति आहे. श्री. फ्रांकोव्स्कींनी सांगितलें की त्यांच्या मतदार-संघात १ लाख मतदार आहेत. ५ जागांसाठी ७ उमेदवार उभे आहेत. ज्यांना ५० टक्क्यापेक्षा जास्त मतें मिळतात ते विजयी होतात. जर कोणाला ५० टक्के मतें मिळालीं नाहीत तर तेथे पुन्हा नवा उमेदवार उभा केला जाईल आणि नवें इलेक्शन होईल.

वॉरसा-प्रवासात एक आठवडाभर रोजमरीबाई रोज आमच्या बरोबर येत. त्यांनी वॉरसातील प्रमुख व सुंदर स्थानें आम्हाला दाखवलीं. त्या आम्हाला पोलंडचे महान संगीताचार्य श्री. शॉपेग यांच्या जन्मस्थानींहि घेऊन गेल्या. पोलंडच्या आर्थिक व्यवस्थेचा परिचय करविताना त्यांनी आम्हाला सांगितले : "आमचा देश समाजवादी देश आहे. कम्युनिजम आमचा आदर्श आहे. त्या दिशेनें समाजाचें परिवर्तन करण्यासाठी आम्ही पूर्ण रीतीने जनतंत्रात्मक मार्ग स्वीकारला आहे. आमच्या येथे कोणत्याहि प्रकारें रक्त-रंजित-क्रांति झाली नाही. इथे जमिनीची व्यक्तिगत शेती होते. सामूहिक शेतीचा विचार जनतेला पसंत नाही. एक व्यक्ति जास्तीत जास्त ५० हेक्टर जमीन राखू शकते. पण सामान्यत: लोकांजवळ १५ ते ३० हेक्टरच्या दरम्यान जमीन आहे. दुकानें, इमारती व कारखाने सुद्धा व्यक्तिगत मालकीचे असू शकतात, व्यक्तिगत कारखान्यात ५० पेक्षा जास्त कामगार राखता येत नाहीत. त्यामुळे व्यक्तिगत उद्योग शोषणाचें किंवा पुष्कळ अर्थ-संग्रहाचें साधन बनू शकत नाही. जर ५० व्यक्तींपेक्षा जास्त कामगार एखाद्या दुकानात, हॉटेलात, कारखान्यात किंवा कंपनीत

असतील तर त्याला सहकारी सोसायटीचें रूप द्यावें लागेल अथवा सरकार ती स्वत: चालवील. आमच्या येथे बऱ्याच मोठमोठ्या सहकारी संस्था आहेत. त्यांच्यांत सरकारचा कोणत्याहि प्रकारें सरळ हस्तक्षेप नाही. व्यक्तीला विकेंद्रित रूपाने आणि स्वतंत्रतेने कामधंदा करण्याची संधि असते. मात्र त्याने समाजावर कुरघोडी करता कामा नये, स्वार्थ साधण्याचा किंवा शोषण करण्याचा प्रयत्न करता कामा नये."

रोजमरीबाईचीं चित्रकार मैत्रीण सोसान्नाच्या घरीं आम्ही चार तास घालवले. त्यांची मधुर स्मृति आमच्या मनात राहून गेली आहे. सोसान्नाबाईनी आम्हाला फक्त स्वादिष्ट शाकाहारी भोजनच दिलें नाही तर त्याच वेळीं आमचा एक मोठासा 'पोर्ट्रेट' बनवून आम्हाला कायमचें अंकित केलें. त्या म्हणाल्या : "तुम्ही आमच्या घरीं आलेत आणि निघून जाल, पण तुमचा हा 'पोर्ट्रेट' मला शांतियात्रेची गोष्ट सांगत राहील. मी कलेची उपासक आहे. तुम्हाला माहीत आहे की कलाकार करुणा व कोमलतेच्या भावनेत जगत असतो. तो सृष्टीचा आणि सौंदर्याचा पुजारी असतो. युद्ध तर करुणा व कोमलतेचा घात करूनच पुष्ट होत असतें. सृष्टीची व सौंदर्याची राखरांगोळी कोण करतें ? युद्ध ! म्हणून एक कलाकार या नात्याने मी तुमच्या यात्रेला आशीर्वाद देत आहे." कसा हृदयस्पर्शी आशीर्वाद आम्हाला सोसान्नाबाईकडून मिळाला !

हिरोशिमामधे (जपान) अणुबाँबमुळे लाखो व्यक्तींचा संहार झाला. आस्वीचमधे (पोलंड) हिटलरच्या हुकुमाने लाखो माणसें फुटाण्यासारखीं भाजून काढलीं गेलीं. युद्धाच्या राक्षसी कृत्यांचे जगावर हे दोन मोठे घाव आहेत. जपानचे ४ शांतिवादी हिरोशिमाहून आस्वीचच्या यात्रेसाठी निघाले. हे चारी शांतीचे तीर्थयात्री बनले. आपला प्रवास पूर्ण केल्यावर ते परत जपानला जात होते. वाटेत ते ट्रेन बदलण्यासाठी वॉरसा स्टेशनवर अर्धा तास थांबले होते. आम्ही दोन शांति-पदयात्री व हे चार शांति-तीर्थयात्री ! किती आनंद व प्रेरणा देणारी आमची ही भेट होती ! भदन्त सातोने आणि त्यांच्या सोबत्याने आम्हाला आलिंगन दिलें आणि आपल्या आशीर्वादाने आम्हाला उपकृत केलें.

वॉरसाहून वोविच, कुतनो, कोवो, कोनिन इत्यादि शहरें करून ३०० किलोमिटर चालून आम्हीं पोजनानला पोहोचलो. हें शहर पोलंडमधील प्रमुख शहरांपैकी एक आहे. सुमारें ५ लाखाची वस्ती आहे. दुसऱ्या महायुद्धात इतर युद्धग्रस्त शहराप्रमाणेच या शहरालाहि भरपूर नुकसान सोसावें लागलें. आता पुन्हा उठून उभें राहिलें आहे. मार्गाने जाता जाता आम्ही नाझी सैन्याने त्या काळीं मानव-संहारासाठी उभारलेलीं शिबिर-स्थानेंहि पाहिलीं. तेथे नाझी सैन्याने यहुदी लोकांचा आणि पोलिश, झेक इत्यादि जातींच्या लोकांचा मोठ्या प्रमाणात संहार केला होता. आम्ही पाहिलेल्या शिबिरांमधे ५ लाख लोकांचा संहार झाला होता.

## अध्यापकाने घालवून दिलें, विद्यार्थ्याने बोलावलें !

पोलंड देशाची राजधानी वॉरसा. तेथून २०० मैल पश्चिमेला पोजनान जवळ एक लहानसें गाव आहे स्वादजिमा. पोलंडच्या जनतेने आम्हाला सहजच पुष्कळ प्रभावित केलें होतें, पण त्या दिवशीं स्वाद्‌जिमाच्या घटनेने तर आम्हाला सद्‌गदित केलें. पांचव्या वर्गात शिकणाऱ्या त्या खेडवळ बालकाची बुद्धि, भावनाशीलता व आतिथ्यपरायणता विसरणें आम्हाला अगदी अशक्य आहे. आजहि त्या अबोध बालकाचा भोळा-भाबडा, गोड व गोरासा चेहरा माझ्या डोळ्यासमोर दिसत आहे.

तसा युरोपचा उन्हाळा म्हणजे काही खरा उन्हाळा नव्हे. तरीहि मे व जून महिन्यात कधी कधी अश्विन महिन्याप्रमाणे चटका लावण्या इतकें ऊन असतें. विशेषत: पाठीवर भारी सामान लादून दुपारच्या वेळीं पायीं चालण्यामुळे जास्तच गरमी वाटते. शरीरातून घामाच्या धारा चालतात. २८ मेचा दिवस. दुपारच्या उन्हात आम्ही चाललो होतो. अचानक आमची नजर एका विद्यालयावर पडली. आम्ही थोडा आराम घेऊ इच्छीत होतो. प्रभाकर म्हणाले : "आपण बाहेरच एखाद्या झाडा-खाली का बसू नये ?" पण रात्रीं पाऊस पडल्यामुळे जमीन ओली झाली होती. मी म्हणालो : "शाळेतच का जाऊ नये ? मुलांशी व शिक्षकांशी गोष्टीहि करता येतील.?" इराणमधे व रशियात आमचें शाळांतून फार

चांगलें स्वागत होत असे, व आम्हाला स्नेह व अनुभव मिळत असे. म्हणून प्रभाकरहि माझ्या म्हणण्यास कबूल झाले. मैदानात मुलें खेळत होतीं. आम्ही शाळेत आत पोहोचलो तेव्हा दिसलें की एका वर्गात दोनतीन शिक्षिका बसून गोष्टी करीत होत्या. आम्ही त्यांच्याजवळ गेलो. त्या रशियन भाषा समजत होत्या. म्हणून त्यांच्याशी आम्ही रशियन भाषेत बोलू लागलो. या अध्यापिका आपल्या स्वभावाने व व्यवहाराने पोलंडवासी जनतेचें खरें प्रतिनिधित्व करीत होत्या — अत्यंत मधुर, मिलनसार, सरळ, उत्सुक व सहानुभूतिशील. पाहता पाहता शेकडो प्रश्न विचारले त्यांनी. मी माझ्या पाठीवरील भारी थैला उतरवून टेबलावर ठेवला. प्रभाकरनी अजून तसें केलें नव्हतें. आम्ही उभ्याउभ्याच गोष्टी करीत होतो. दुपारच्या नास्त्याच्या सुट्टीचा हा वेळ होता.

इतक्यात विद्यालयाचे मुख्य अध्यापकसाहेब तेथे येऊन पोहोचले. माहीत नाही, त्यांचा ' मूड ' का खराब होता ! सामान्यपणे पोलिश लोक आमच्याशी जसा व्यवहार करीत होते त्याच्या बिलकुल उलटा व्यवहार त्यांनी केला. ठेंगण्या व स्थूल शरीराच्या या साहेबांनी पोलिश भाषेत रागारागाने काही म्हटलें. मी समजलो की बहुधा हे आम्हाला आपल्या खोलीत येऊन बसण्याचें निमंत्रण देत असतील. पण प्रभाकरनी सांगितलें की ते आपल्याला शाळेबाहेर निघून जायला सांगत आहेत. मी आश्चर्य करू लागलो. एका शाळेचे हेडमास्तर भारतासारख्या दूरच्या देशातून आलेल्या शांति-यात्रिकांना असें बाहेर निघून जायला का सांगतील ? " तुम्ही आपला थैला उचलून घ्या न ! " प्रभाकरने मला पुन्हा म्हटलें. " तुम्ही नीट समजला आहा ना ? " मी प्रभाकरना प्रश्न केला. इतक्यात स्वतः हेडमास्तरांनी तर्जनीने बाहेरचा रस्ता दाखवीत आपली आज्ञा पुन्हा सांगितली. पोलिश भाषेत व रशियन भाषेत तसा फारसा फरक नाही. हिंदी व गुजरातीप्रमाणेच पुष्कळसे शब्द समान आहेत. या वेळीं मात्र मी त्यांचा आशय समजलो आणि आम्ही शाळेबाहेर निघून आलो.

आमच्या मनात पश्चात्ताप होत होता. आमच्या हातून काही चूक झाली काय ? कदाचित् विद्यालयात प्रवेश करण्यापूर्वी आम्ही

हेडमास्तरांची परवानगी मागायला पाहिजे होती. असो. आता काय? झालें तें झालें. आम्ही शाळेबाहेर एका झाडाखालीं वर्तमानपत्र पसरून बसलो. शिक्षिका व विद्यार्थी फारच शर्मिंदा झाले होते. हेडमास्तर जेव्हा आपल्या खोलीत परत निघून गेले तेव्हा एक शिक्षिका आमच्या जवळ आली व म्हणाली : "आपल्याशी आमच्या विद्यालयात असा व्यवहार झाला याबद्दल मला फार दु:ख होतें. विशेषत: शांतीचा प्रचार करणाऱ्या परदेशवासी पाहुण्यांशी असें वर्तन व्हावें हें अत्यंत अपमानजनक आहे. मी आशा करते, आमचा नाइलाज होता असें समजून आपण आम्हाला क्षमा कराल." मी म्हणालो : "आम्हाला कोणत्याहि प्रकारचें दु:ख नाही. आपण चिंता करू नका." ही घटना कित्येक विद्यार्थ्यांनी पाहिली व ऐकली. पांचव्या वर्गातील एका विद्यार्थ्याला हें सहन झालें नाही. गळ्यांत पुस्तकांची झोळी, हातात फाउन्टन पेन व दौत, काळचा हाफ् पॅन्टवर सफेद खमीस आणि गळ्यात लाल टाय बांधलेला हा मुलगा हळूच शाळेबाहेर आला आणि म्हणाला : "काय आपण माझ्या घरीं याल?" अगदी भाबडा प्रश्न होता. त्याने मोठ्या धिटाईने व आत्मविश्वासाने हा प्रश्न विचारला होता.

"कुठे आहे तुमचें घर?" मी विचारलें.

"इथून अर्ध्या मैलावर, पूर्व दिशेला." बालक म्हणाला.

"पण आम्ही तर पूर्वेकडून आलो आणि पश्चिमेकडे जात आहोत." प्रभाकर म्हणाले.

"तुम्ही तर जगभरची यात्रा करायला निघाला आहात. एक मैलाचें चक्करच समजा झाले."

मुलाने गंभीरपणे उत्तर दिलें. जणू तो १२ वर्षांचा लहान मुलगा नव्हता, वयात आलेला तरुण होता!

"पण गड्या, तू कोण? आम्हाला आपल्या घरीं नेण्याची कशासाठी इच्छा करतोस?" मी विचारलें.

"मी कोण आहे हें तुम्हाला कसें समजेल?"

मुलगा आमच्या मनावर विजय मिळवीत होता.

"पण मी तुम्हाला आमचे अतिथि बनवू इच्छितो. माझी आई तुम्हाला आमच्या घरीं आलेले पाहून फार खुश होईल. तुम्ही तेथे आराम करा. थोडा नाश्ता घ्या. मला फार दुःख होत आहे की माझ्या शाळेत तुमच्याशी असा व्यवहार व्हावा." मुलगा रशियन भाषेत आपलें म्हणणें सांगत होता. गेल्या वर्षापासून त्याने रशियन भाषा शिकायला आरंभ केला होता. आम्ही तर याच वर्षी रशियन भाषा शिकलो होतो. मुलाच्या गोड गोष्टी मनाला पटत चालल्या होत्या.

"अच्छा, चलो सतीश! याच्या घरी जाऊ या." प्रभाकरने म्हटलें आणि आम्ही निघालो. मुलाने आपल्या घरची गोष्ट सांगितली. भाऊ, बहीण, वडील, आई, सर्वांची माहिती सांगितली. मग आमच्या प्रवासाची माहिती विचारू लागला. "भारतातील मुलें कशीं असतात?" "शाळा कशा असतात?" "तुम्ही ताजमहाल पाहिला आहे काय?" जेव्हा मी सांगितलें की मी ताजमहाल अनेक वेळां पाहिला आहे, तेव्हा तो म्हणाला: "ताजमहाल पाहण्यासाठी मी भारतात येऊ इच्छितो. तुमचा मला पत्ता द्या. मी तुम्हाला पत्र टाकीन." गोष्टी चालू असता आम्ही केव्हाच त्याच्या घरीं पोहोचलो. "आई, आई" तो मोठ्याने ओरडला. "पहा, कोण माझ्या बरोबर आले आहेत?" धावत जाऊन आईला त्याने मिठी मारली. "अतिथि! फार दूर देशाचे अतिथि! यांच्याच देशात ताजमहाल आहे! जल्दी चहा तयार कर. नाश्ता तयार कर." आम्ही मंत्र-मुग्ध होऊन बालकाकडे पाहत राहिलो. आईला फार आनंद झाला. मुलाने आमच्या पाठीवरील थैला उतरवायला आम्हाला मदत केली.

"आमच्या शाळेत तुमच्याशी जो उद्धटपणा झाला त्याबद्दल तुम्ही क्षमा कराल काय?" मुलाने टेबलावर चहाचा कप ठेवताना विचारलें. मी तर या चतुर मुलाच्या कौशल्यावर आणि त्याच्या अकृत्रिम प्रेमावर खुशखुश झालो होतो. माफ करण्याची गोष्टच काय? मी हीं दोन टोकें समजूच शकत नव्हतो! एका टोकाला शाळेचे हेडमास्तर आणि दुसऱ्या टोकाला हा निष्कपट बालक! इतक्यात मुलाचे काका दैनिक वृत्तपत्र

हातात घेऊन तेथे आले. खोलीत ते आले नि आम्हाला पाहिल्याबरोबर ते म्हणाले : "पोजनान एक्सप्रेसच्या पहिल्या पानावर आपला फोटो आहे. आपणच ते लोक आहात ना जे भारतातून पायीं शांति-यात्रेवर निघाले आहेत ?" आणि त्यांनी वर्तमानपत्र दाखविलें. मग काय विचारता ? मुलगा आनंदाने आपल्या काकाच्या खांद्यावर उडी मारून लोंबकळू लागला ! नंतर आपल्या शाळेतील हकीकत तो सांगू लागला.

आम्ही १०-१५ मिनिटासाठी आलो होतो, २-३ तास लागून गेले. चहा झाला, नाश्ता झाला, भोजन झालें, पुष्कळ गप्पा-गोष्टी झाल्या. मुलगा आम्हाला सोडू इच्छीत नव्हता. आमच्याहि मनात येईना, त्या मुलाला, त्याच्या आईला, व त्याच्या काकाला सोडून जाण्याचें व त्यांच्या आतिथ्याला टाळण्याचें. सर्वांची इच्छा होती की आम्ही रात्रीं तेथेच मुक्काम करावा. पण आमचा पुढे जाण्याचा कार्यक्रम निश्चित होता. कशी तरी सर्वांची क्षमा मागून आम्ही निरोप घेतला. पण मनातून त्या मुलाचें स्मरण विसरणें मला असंभव आहे !

## तें चुंबन

पोजनानमध्ये आम्ही ३ दिवस राहिलो. भारत-पोलंड मित्रता-संघाच्या अध्यक्षांनी एका कुटुंबात राहण्याची आमची व्यवस्था केली होती. माता, पिता व २१ वर्षांची मुलगी. एवढाच तो परिवार. कुटुंबाची एकुलती एक मुलगी कुमारी रेनाता. अत्यंत शांत, सुशील, आणि गंभीर स्वभावाची मुलगी होती. आमच्याबरोबर फिरून आम्हाला तिने पोजनान दाखविलें. पोजनानमध्ये एक मोठें सुंदर सरोवर आहे. या सरोवरावर आम्हाला रेनाता स्नानासाठी घेऊन गेली. युरोपमध्ये उन्हाळ्यात समुद्र तटावर किंवा सरोवरावर स्नानाचें दृश्य अत्यंत विचित्र असतें. भारताच्या वातावरणात वाढलेल्या माणसाला तें दृश्य बरेंच अश्लील, निर्लज्जतापूर्ण व दूषित चारित्र्याचें वाटेल. देश-देशांतराच्या सीमापलीकडे चारित्र्य व नैतिक मूल्यांच्या कल्पनेत कितीतरी फरक पडत असतो ! एक छोटीशी चड्डी व बॉडी घालून रेनाता निःसंकोचपणे आमच्याबरोबर पाण्यात खेळत होती, किंकाळ्या मार-मारून हसत होती व धावत-पळत होती.

रेनाता एकटी नव्हती. हजारो तरुणी याप्रमाणे अर्धनग्न होऊन आपल्या पतीबरोबर किंवा 'बॉय-फ्रेंड' बरोबर किंवा मैत्रिणी बरोबर फिरत होत्या, खेळत होत्या.

तीन दिवसांच्या परदेशाच्या पाहुण्यांना कुमारी रेनाताने व तिच्या आईने खूप खायला प्यायला घालून आतिथ्य केलें. रेनाता आमच्याशी खूप गप्पा मारायची. दोन दिवस तर रात्रीचे दोन-दोन वाजेपर्यंत आम्ही निरनिराळ्या विषयांवर गोष्टी करीत राहिलो. रेनाताचे आई-वडील आपापल्या खोल्यांत झोपून जात असत. आपली २१ वर्षांची तरुण व अविवाहित मुलगी दोन तरुणांबरोबर इतक्या मोकळेपणाने फिरतेबिरते आहे, रात्र-रात्र गप्पागोष्टी करते आहे याची थोडी सुद्धा चिंता त्यांना नव्हती. त्यांना आपल्या मुलीचा पूर्ण विश्वास होता. रेनाता स्वतः आपलें हित-अहित पाहील असा त्यांना विश्वास होता.

भारतात तर जर एखाद्या मुलीकडे जरा रोखून पाहिलें किंवा एखाद्या मुलीने आपल्या एखाद्या सोबत्याबरोबर एकटे काही तास घालविले तर घरात कोण कुभांड रचलें जाईल! जन्मभराची मैत्री का असेना पण जर एखाद्या तरुणाबरोबर थोडासा स्नेहपूर्ण संबंध दिसला की चारित्र्यावर लांछन लागलेंच. आईचा आपल्या मुलीवर विश्वास नाही. भावाचा आपल्या बहिणीवर विश्वास नाही. पतीचा आपल्या पत्नीवर विश्वास नाही. अशाप्रकारें केवळ अविश्वासावर आधारित चारित्र्याचा आणि नैतिकतेचा पाया शेवटीं किती भक्कम असणार?

शेवटी आम्ही पोजनानहून निरोप घेऊन निघालो. कुमारी रेनाता व भारत-पोलंड मित्रता-संघाचे अध्यक्ष श्री. हॉफमेन दोनतीन मैल पायीं चालत शहराच्या सीमेपर्यंत आम्हाला पोहोचवायला आले. आम्ही स्नेहपूर्ण शब्दांनी आमच्या दोन्ही मित्रांचा निरोप घेऊ लागलो. कुमारी रेनाताला व तिच्या माता-पित्यांना त्यांच्या हार्दिक आतिथ्याबद्दल धन्यवाद देऊ लागलो. आता आम्ही पुढे चालू लागणार तोच हॉफमेन म्हणाले : "असा कोरडा निरोप घेऊन कसें चालेल? तुम्हाला रेनाताचें चुंबन घ्यावें लागेल तेव्हा निरोप मिळेल." मला कापलें असतें तरी रक्त

निघालें नसतें अशी माझी दशा झाली. मी एक विवाहित व्यक्ति. २१ वर्षांची तरुण रेनाता! असें भर सडकेवर उभें राहून मी तिचें चुंबन घेऊ ? माझ्या संस्कारांच्या बिलकुल विपरीत ही गोष्ट होती. पण श्री. हॉफमेन यांच्या मुद्याचें उत्तरहि काय होऊ शकलें असतें ? रेनाताला चुंबन न देणें याचा अर्थ——तिचा अपमान ! त्या देशाची तीच परंपरा आहे. तर्ककुतर्क करायला व उत्तर शोधायला वेळ कुठे होता ? 'जेव्हा तुम्ही रोममधे असाल तेव्हा रोमन बनूनच चाललें पाहिजे' या म्हणीचें मी स्मरण केलें आणि रेनाताला बाहूंत पकडून मी तिला मैत्रीचें व कृतज्ञतेचें चुंबन देऊन टाकलें.

घरीं आल्यावर मी ही गोष्ट पत्नीला सांगितली तेव्हा तिची हसता हसता मुरकुंडी वळली.

## संस्कृति

युद्धामुळे आणि नाझींच्या पंजात सापडल्यामुळे पोलिश-संस्कृतीचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला होता. जर्मनीच्या हातीं पडल्यामुळे पोलंडच्या संस्कृतीला जसा घातक धक्का पोहोचला तसा आणखी कोणत्याहि देशाला पोहोचलेला नाही. लढाईच्या पांच वर्षांच्या काळात पोलंडमधे एक पुस्तकहि प्रकाशित होऊ शकलें नाही की एक फिल्म बनू शकली नाही. एक नाटकहि होऊ शकलें नाही की एखादी कला-प्रदर्शनी झाली नाही. युद्धामुळे संस्कृतीच्या क्षेत्रात इतका विनाश, इतकें नुकसान इतर कुठेहि पहायला मिळणार नाही. एकंदर राष्ट्रीय संपत्तीचा ४३ टक्के भाग नष्ट झाला असल्याचें अनुमान आहे. हजारो सृजनशील लेखक, कलाकार, आणि वैज्ञानिक नष्ट-भ्रष्ट झाले. भौतिक नुकसान एवढें झालें की संस्कृतीचा लगभग संपूर्ण तांत्रिक आधारच नष्ट होऊन गेला. प्रकाशन व मुद्रण, नाटक व सिनेमा-गृहें, अमूल्य पुस्तकांचा संग्रह आणि संग्रहालयें—— सर्व सर्व नष्ट केलें गेलें.

युद्ध संपुष्टात आल्यानंतर प्रत्येक क्षेत्रात शून्यापासून प्रारंभ करावा लागला. स्वातंत्र्य प्राप्तीच्या अगोदर थोडीं वर्षे, लोकांनी आपला सांस्कृतिक आधार पुन्हा उभा करण्याचा प्रयत्न केला, आणि पुन्हा त्याला

योग्य बनविण्याचा प्रयत्न सुरू झाला. तो मात्र समाजवादी देशाच्या नव्या आवश्यकतेला व उद्देश्याला पोषक असा होता. युद्धानंतर कला आणि साहित्याची देखरेख सरकारने आपल्या हातीं घेतली. त्याचा परिणाम म्हणजे कला आणि साहित्य यांचें व्यावसायिक दृष्टीने पतन होऊ शकले नाही. नाटकाच्या विकासासाठी, परराष्ट्रीय नाण्याने फिल्म खरीदण्या-साठी, जनसंस्कृतीच्या तांत्रिक आधाराच्या विकासासाठी, आणि धंदेवाईक नसलेल्या सामान्य कलाकारांना उत्तेजन देण्यासाठी, सरकारने २० कोटींचें वार्षिक अनुदान देणें सुरू केलें. त्याशिवाय अनेक प्रकारच्या आदर्श शाळा सुरू केल्या. या शाळांनी पोलंडमधे संस्कृतीला लोकप्रिय बनविण्यात फार महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अशा रीतीने आज पुन्हा पोलंड साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात धूमधडाक्याने प्रगति करीत आहे.

●

# दुभंगलेल्या जर्मनीत

आम्ही ४ जून रोजीं पोलंडमधून पूर्व जर्मनीत प्रवेश केला आणि २१ जूनपर्यंत या देशात राहिलो. या १८ दिवसांत आम्हाला सर्वत्र जनतेचें प्रेम, स्वागत आणि आतिथ्य मिळालें. १८३ मैलांची आमची ही यात्रा फार व्यवस्थित व सु-संयोजित रीतीने चालली. पूर्व जर्मनीची अत्यंत प्रसिद्ध संस्था 'नॅशनल फ्रंट' ने आमची यात्रा सफल करण्यात सर्व प्रकारची मदत केली. या संस्थेत सर्व राजनैतिक पार्टीचे लोक सामिल होते. या संस्थेचा विस्तार प्रत्येक गावात आहे. रोज सायंकाळीं आमच्या पडावावर सभा होत होत्या. त्या सभांत गावचे व शहरातील निवडक लोक भाग घेत असत. आम्ही त्यांना आमच्या शांतियात्रेचे अनुभव सांगत होतो, आणि त्याबरोबरच शांति-आंदोलनाच्या कामाचा विस्तारपूर्वक परिचय करून देत होतो.

पूर्व जर्मनी समाजवाद व कम्युनिझमच्या बाजूने प्रगति करीत असलेला देश आहे. जर्मनीचे दोन भागांत तुकडे पडल्यामुळे तो शीत-युद्ध व तंग वातावरणाचें केंद्र बनला आहे. तरी आम्हाला आढळून आलें की येथील लोकांच्या मनात युद्धाबद्दल तीव्र घृणा आहे. लोक हिटलरवादी फॅसिझमचा तिरस्कार करतात. शांततेची हार्दिक आकांक्षा लोकांच्या

मनात जागृत झाली आहे. शांति-परिषद इथे चांगली संघटित शक्ति आहे आणि शांति-आंदोलन खूप व्यापक रूपाने सर्वत्र फैलावत आहे. आम्ही जेव्हा कधी एखाद्या शहरात किंवा गावात पोहोचत होतो तेव्हा मुलें, विद्यार्थी, तरुण आणि सर्व प्रकारचे स्त्री-पुरुष आमच्या सभोवती गोळा होत आमचें स्वागत करीत आणि म्हणत : "तुम्ही शांततेचे दूत बनून पश्चिमेत जा. खास करून पश्चिम जर्मनीच्या जनतेला व सरकारला आमचा संदेश द्या की आम्ही सर्वस्वी शांति चाहत आहोत. आपण आपल्या सर्व समस्या शांतीपूर्वक सोडवू शकतो. जोपर्यंत जर्मन भूमीत सोव्हियट, ब्रिटिश, फ्रेंच आणि अमेरिकन सैन्यें हटणार नाहीत तोपर्यंत जर्मनीचें एकीकरण संभवनीय नाही. म्हणून सेना-वाद दूर करून आपल्याला आपल्या समस्या सोडविल्या पाहिजेत."

१ जानेवारी १९६३ ते २१ जून '६३ पर्यंत सुमारे ६ महिने आम्ही साम्यवादी क्षेत्रात (रशिया, पोलंड व पूर्व जर्मनी) राहिलो. जगाच्या शांति-आंदोलनात साम्यवादी लोकांचा फार मोठा प्रभाव व हात आहे. परंतु ते एक-पक्षीय नि:शस्त्रीकरणाच्या गोष्टीत विश्वास ठेवीत नाहीत. आम्ही एकपक्षीय नि:शस्त्रीकरणावर नेहमी जोर दिला. साम्यवादी देशातहि आम्हाला आमच्या तत्त्वाचा पूर्ण स्वतंत्रतेने प्रचार करण्याचा अवसर मिळाला. त्याबरोबरच जनता व सरकार दोघांकडूनहि आमचें स्वागत झालें.

मध्य युरोपमधे वसलेला जर्मनी देश केवळ आपल्या वैज्ञानिक व औद्योगिक विशेषतेमुळेच प्रसिद्ध नाही, तर कविता, साहित्य आणि विचाराच्या क्षेत्रात सुद्धा या देशाचें स्थान उच्च आहे.

साम्यवादाचे जनक आणि १८व्या शतकाचे उत्तम विचारक मार्क्स यांनी जर्मनीत जन्म घेतला होता. जगात पहिल्या प्रथम मार्क्सने ही घोषणा केली : "गरीबी पाप आहे. गरीबी ही श्रीमंतांनी निर्माण केलेली नकली समस्या आहे. गरीबी नाहीशी करण्यासाठी संघर्ष करणें आणि गरीब नांवाचा वर्ग नष्ट करण्यासाठी लढा देणें गरिबांचा अधिकार आहे." या घोषणेने साऱ्या जगात खळबळ उडवून दिली.

## मार्क्स आणि गटे यांची भूमि

५ मे १८१८ रोजीं एका यहुदी वकील कुटुंबात मार्क्सचा जन्म झाला. नंतर त्याच्या वडिलांनी क्रिश्चन धर्म स्वीकारला होता. मार्क्सचे शिक्षण वगैरे प्रथम बॉनला व नंतर बर्लिन विश्वविद्यालयात झालें. त्यांच्या क्रांतिकारी विचारांना व कार्यक्रमांना तत्कालीन सरकार सहन करू शकलें नाही, म्हणून त्यांना देशाच्या हद्दपार करण्यात आलें. अखेर ते १८४९ मधे लंडनमधे जाऊन राहिले. तेथे त्यांनी आपल्या जीवन-साधनेचें सार 'कॅपिटल' ( भांडवल ) पुस्तक प्रसिद्ध केलें. या जगप्रसिद्ध पुस्तकाचें जगातील सर्व प्रमुख भाषांमधे भाषांतर झालेलें आहे. सन १८८३ मधे लंडन येथे त्यांचा मृत्यु झाला.

महाकवि गटेंच्या जन्मभूमीत– जर्मनीत आम्ही प्रवेश केल्यापासून आम्हाला एका नव्या स्फूर्तीचा अनुभव येत होता. गटेचें व्यक्तित्व एका निराळ्या प्रकारचें होतें. मार्क्स क्रांतीची एक पद्धत निर्माण करणारे होते, गटे होते कलेचे उपासक. त्यांची कल्पनाशक्ति, त्यांच्या हृदयाची कोमलता आणि भावुक अनुभूति यांनी साहित्याच्या जगात त्यांना अमर केले आहे. ते चित्रकार होते, राजनीतिज्ञ होते, वैज्ञानिक होते, पण सर्वांत अधिक ते कवि होते. २८ आगस्ट १७४९ मधे फ्रँकफूर्ट येथे एका वकील कुटुंबात त्यांचा जन्म झाला. परंपरागत शिक्षण घेत ते वकील झाले. नंतर ते वैद्यकी शास्त्राकडे आकृष्ट झाले. या सर्वांशिवाय त्यांना नाटकें लिहिण्याची प्रेरणा झाली. त्यामुळे ते उत्तम नाटककार झाले. आणि शेंवटी जर्मनीचे असाधारणच नव्हे तर अत्यंत उच्च कोटीचे कवि म्हणून त्यांना प्रसिद्धि मिळाली. १७७५ मधे ते वेइमार (आता पूर्व जर्मनीत) च्या निमंत्रणावरून तेथे गेले आणि राज्याचे अर्थ-मंत्री व कृषि-मंत्री झाले.

गटे यांच्या ग्रंथ-रचनेत सर्वांत अधिक प्रसिद्ध व लोकप्रिय रचना आहे 'फाउस्ट' ची. ते ८२ वर्षे जगले. त्यांच्या ६० वर्षांच्या चिंतनाच्या निष्कर्षाचें दर्शन आपल्याला 'फाउस्ट' मधे घडतें. ते २० वर्षांचे असतांनाच त्यांनी फाउस्ट लिहायला सुरुवात केली होती. त्याचा पहिला भाग अत्यंत रोचक व मनोहर आहे. त्यांत कवीने

आपलें हृदय अगदी उघडें करून दाखविलें आहे. मनुष्याच्या मनात उद्‌भवणाऱ्या विचारांचें वर्णन आपल्याला त्यात वाचायला मिळतें.

जर्मन लोक गटेच्या कवितेत तन्मय होऊन जातात. आमच्या पदयात्रेत एक जर्मन भगिनी काही दिवस आमच्या बरोबर राहत होती. ती गटेच्या या ओळी नेहमी गुणगुणत असे :

" वास रेइटेट सो स्पैट ड्यूरर्स
नाख्त उण्ड विण्ड ?
दस इस्त डर फाटर,
मिट आइनस किण्ड ।"


म्हणजे — "गाढ अंधाऱ्या तुफानाच्या रात्रीत तो कोण मार्ग आक्रमीत आहे ? तो एक पिता आहे, जो आपल्या प्रिय अपत्याची सोबत करीत आहे." गटे, बालकाबद्दलच्या पितृ-प्रेमाचें कसें हृदयस्पर्शी वर्णन करीत आहे ? अशा हजारो ओळी आहेत ज्या त्यांच्या उत्कृष्ट कवित्व-शक्तीचें प्रदर्शन करतात.

## युद्ध-शापित

दुसऱ्या महायुद्धाचे जे काही शाप मानव-जातीला सहन करावे लागले आहेत त्यांतील एक म्हणजे जर्मनीचे दोन तुकडे झाले हा. तसे तर पश्चिम जर्मन-सरकारच्या दृष्टीने जर्मनीचे चार तुकडे पडले आहेत. एक तुकडा सोव्हियटच्या शासनात आहे, दुसरा पोलंडच्या, तिसरा कम्युनिस्टांच्या शासनात आणि चौथा सर्वात मोठा तुकडा आहे फेडरल जर्मनीचा. या चारपैकी आपण दोन तुकड्यांची गोष्ट सोडून देऊ जे आज सोव्हियट संघ व पोलंडच्या अंतर्गत आहेत. आज कम्युनिस्ट जर्मनी व फेडरल जर्मनी यांचाच प्रश्न मुख्य आहे. कारण या दोन्ही तुकड्यांची जनता जर्मनीचें एकीकरण इच्छिते. सैन्य, सशस्त्र-युद्ध व हिटलर-वाद यांनींच जर्मनीचे चार तुकडे केले आहेत तरीहि अजूनपर्यंत जर्मनीच्या नेत्यांचा विश्वास सेना-वाद, व शस्त्र-वाद यांच्यावरच आहे. जर्मनीचे शासक अजूनहि आपले देश शस्त्रसन्नद्ध करून राहिले आहेत. पूर्व जर्मनीचे शासक म्हणतात

की जर आम्ही सैनिकी तयारी ठेवली नाही तर भांडवलदारांची फॅसिस्ट सेना कोणत्याहि क्षणीं आमच्या समाजवादी समाज-व्यवस्थेची धूळधाण करून टाकील. त्याच प्रमाणे पश्चिम जर्मनीच्या शासकांना ही चिंता वाटते की जर ते परराष्ट्रीय सैन्यें जर्मनीच्या बाहेर जाऊ देतील किंवा नाटोचा सैनिकी-तह रद्द करतील तर रशियन सैन्यें आपलें स्वातंत्र्य हरण करतील आणि आपल्यावर राज्य करतील. याप्रमाणे एक दुसऱ्याविरुद्ध भयंकर भयाने आणि अविश्वासाने ग्रस्त आहेत.

हें म्हणणें बरोबर नाही की पूर्व जर्मनीत फक्त कम्युनिस्ट पार्टीचेंच शासन चालू आहे. येथे लोक-सभेत पांच पक्ष आहेत, आणि पांचहि पक्ष 'बहुपक्षीय-शासना'च्या सिद्धांताच्या आधारावर राज्य चालवीत आहेत. या पांच पक्षांत सर्वांत मोठा पक्ष 'समाजवादी-ऐक्य' पक्ष आहे जो सन



१९४६ मधे कम्युनिस्ट पक्ष व समाजवादी-लोकशाही पक्ष मिळून स्थापन झाला आहे. याशिवाय किसान पक्ष, ख्रिश्चन पक्ष इत्यादि दुसरे चार पक्ष आहेत, जे आपआपल्या वर्गाचें हित-संरक्षण करतात. ज्या ज्या प्रश्नावर या पांचहि पक्षांचें एकमत होतें व जो कार्यक्रम सर्व संमतीनें स्वीकारला जातो त्याच कार्यक्रमाची अंमल बजावणी होत असते. समाजवादी-एकता पक्षाला आपण कम्युनिस्ट पक्ष म्हणू शकू. हा पक्ष व्यक्तिगत उद्योग, चर्च इत्यादि गोष्टीत विश्वास ठेवीत नाही पण अन्य पक्षांची मान्यता मिळेपर्यंत व्यक्तिगत उद्योग, चर्च इत्यादिकांसाठीहि तेथे स्थान आहे. याप्रमाणेच शिक्षणाच्या संपूर्ण व्यवस्थेचा निर्णयहि हें बहुपक्षीय सरकारच करतें.

## साम्यवादी शिक्षण

आम्ही जितकीं विद्यालयें पाहिलीं त्यांत शिक्षणाबरोबर उद्योगासहि विशिष्ट स्थान असलेलें आम्हाला दिसलें. श्रम हेंच जीवनाचें खरें मूल्य आहे आणि श्रम केल्याशिवाय समाजावर भारभूत होऊन जगलें जाणारें जीवन सामाजिक अपराध आहे या प्रकारच्या भावनेचा विकास लहानपणा-पासून च तेथे होऊ लागतो. म्हणूनच फक्त पुस्तकांचा बोजा बुद्धीवर लादत राहण्याच्या शिक्षण-प्रणालीचें उच्चाटन करून प्रत्येक विद्यालयात-उद्योग-शाळा, प्रयोग-शाळा, आणि क्रियेच्या माध्यमातून शिक्षण या गोष्टींना विशेष महत्त्व दिलें जातें. उत्पादनाची रीत, यंत्रांचें संचालन, विज्ञानाचा उद्योगाशी संबंध इत्यादि प्रक्रियांचें शिक्षण, प्रत्येक विद्यालयाचें आवश्यक अंग आहे. अनेक विद्यालयांत आम्ही पाहिलें की कशा प्रकारें पांचव्या-सातव्या वर्गातील विद्यार्थी सुद्धा लहान-लहान यंत्रांचें संचालन मोठ्या चातुर्याने करीत होते. सातवी ते बाराव्या वर्गाचे विद्यार्थी आठवड्यातून एकदोन दिवस विद्यालयात जाऊन शिकण्याऐवजी, एखाद्या कारखान्यात किंवा शेतावर जाऊन व्यावहारिक आणि सक्रिय शिक्षण प्राप्त करीत होते. विद्यार्थी सुद्धा या दृष्टीने विचार करताना दिसले की पुढे आपण कोणत्या प्रकारचा व्यवसाय करणार आहोत. त्यांनी आपल्या आवडीनुसार जर एखाद्या कामाची निवड केली तर त्यांना त्या कामाचें विशेष

प्रशिक्षण दिलें जातें. उद्योगसंपन्न पूर्वजर्मनीत ६८ टक्के लोक उद्योग, व्यापार, आणि वाहतुक या कामात लागलेले आहेत आणि केवळ १८ टक्के लोक कृषि व वन-विभागात लागले आहेत.

## सहकारी शेती

जमिनीची वैयक्तिक शेती समाप्त करून सर्व देशाच्या शेतीला 'सहकारी-शेती'चें स्वरूप दिलें गेलें आहे. सहकारी शेतीचा हा प्रयोग उत्पादन-वृद्धीच्या दृष्टीनें सफल झाला आहे. सहकारी-शेतीत जमिनीवर कायदेशीर स्वामित्व व्यक्तीचें राहतें पण त्यात कामाची सोय व कृषि-साधनें वापरण्याची सोय चांगली जमते, उत्पादनात वृद्धि होतें. या दृष्टीने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेती करण्याचें ठरविलें आहे. सोव्हियट संघात जे सामूहिक फार्म आहेत त्यांत जमिनीवरील व्यक्तिगत स्वामित्व नष्ट करून फार्मच्या सर्व सदस्यांचें सामूहिक स्वामित्व कायम केलें आहे. तसेंच सोव्हियट संघात जे 'राज्य-फार्म' आहेत त्यात जमिनीवर राज्याचें स्वामित्व असतें आणि व्यक्ति केवळ मजूरच असतो. श्रमाच्या मोबदल्यात राज्य त्याला मजुरी किंवा वेतन देतें. उद्योग, व्यापार आणि कारखान्यावरहि याचप्रमाणे राज्याच्या स्वामित्वाचा सिद्धांत लागू केला आहे. पण पूर्व जर्मनीत अनेक व्यापार आणि उद्योग सुद्धा लोकांच्या आपल्या सामूहिक स्वामित्वाने चालतात. पोलंडमधेहि अनेक कारखाने आणि व्यापार सामूहिक स्वामित्वाने चालतात.

'व्यक्तिगत मालकी ऐवजी राज्याची मालकी कशाला ? त्याने राज्याश्रित किंवा केंद्रित भांडवलशाही-वाद पुष्ट होण्याचा धोका नाही काय ?' हा प्रश्न आम्ही अनेक ठिकाणीं अनेकांना विचारला. सोव्हियट संघ, पोलंड व पूर्व जर्मनी या तीन्ही देशात काही लोक आम्हाला असे भेटले ज्यांना राज्य-स्वामित्वाचा सिद्धांत पसंत नव्हता. राज्य-स्वामित्ववाल्या फार्मात किंवा कारखान्यात वैयक्तिक अभिक्रमाला (इनिशिएटिव्ह) धक्का पोहोचतो किंवा केंद्रीकरणामुळे व्यवस्थेत अडचणी निर्माण होतात, असें त्यांचें मानणें होतें. असा अनुभव आला आहे की वैयक्तिक स्वामित्वाचें सामूहिक स्वामित्वात बदल केल्यामुळे उत्पादन

वाढतें आणि केंद्रीकरणहि होत नाही. सोव्हियट संघाच्या आर्मेनिया व जॉर्जिया या लोकशाही राज्यात, जेथे सामूहिक फार्म अधिक आहेत, लोकांचे जीवन-स्तरहि अधिक उच्च आहे व त्यांचा मानसिक संतोषहि प्रबळ आहे. परंतु श्वेत रशियाच्या लोकशाही राज्यात (मास्कोच्या पश्चिमेस) जेथे राज्याचे फार्म अधिक आहेत, लोकांचा जीवन-स्तर अपेक्षेपेक्षा कमी आहे, आणि सहकारी कृषीवाल्या पूर्व जर्मनीच्या शेतकऱ्यांचा जीवन-स्तर आर्मेनियन व जार्जियन रिपब्लिकप्रमाणे उन्नत आहे.

'पण राज्याला आपल्या हातीं स्वामित्व घेण्याची आवश्यकता काय ?' काही अधिकारी व्यक्तींनी आम्हाला सांगितलें की आमच्या देशात राज्य व समाज दोन नाहीत. राज्याच्या स्वामित्वाचा अर्थ आहे—समाजाचें सामूहिक स्वामित्व. पण त्यांचें हें म्हणणें व्यावहारिक मानता येणार नाही. जोपर्यंत सशस्त्र-सेना आणि पोलिस यांचें बळ राज्याला आधारभूत आहे, कायदा-कचेरी-जेल यांचा दंडा राज्याच्या हातीं आहे तोपर्यंत राज्य व समाज एक मानता येणार नाहीत. येथे सामूहिक फार्मचा आकार व त्याची कार्यपद्धति आम्हाला तशीच दिसली जशी भारतात ग्रामदानी गांवात लागू करण्याच्या विचार केला जात आहे. गावातील लोकांनी मिळून आपल्या समस्या सोडवाव्या, एकत्र येऊन काम करावें आणि जें काही उत्पादन होईल तें वाटून खावें. जवळ जवळ हेंच दर्शन आम्हाला सामूहिक किंवा सहकारी शेतीच्या फार्ममधे झालें आणि इकडे राज्य-स्वामित्ववाल्या फार्मात या हार्दिकतेचा प्राय: अभाव दिसून आला.

बालकांच्या विकासाकडे समाज व राज्य ज्या तऱ्हेने विशेष ध्यान देतें तसेंच शिक्षकालाहि त्याचें विशिष्ट स्थान आणि सम्मान देतात. 'शिक्षकाच्या हातात साऱ्या देशाचें भवितव्य निर्मिण्याचें सामर्थ्य आहे' — हें तथ्य वस्तुत: येथे समजलें गेलें आहे. त्याच्या खांद्यावर जितकी जास्त जबाबदारी आहे तितका अधिक त्याचा आदरहि करतात. शिक्षकावर केवळ विद्यालयात वर्ग घेण्याचीच जबाबदारी नाही तर तो विद्यार्थ्यांच्या

घरींहि जातो, मातापित्यांशी विशेष रीतीने सल्ला मसलत करतो आणि या गोष्टीवर विशेष ध्यान देतो की बालकाच्या जीवनावर कोणत्याहि तऱ्हेचा मानसिक दबाव पडू नये आणि त्याच्या स्वाभाविक विकासात काहीहि बाधा येऊ नये.

प्राय: सर्व विद्यार्थी बाल-संघटन (पायोनियर) किंवा युवक-संघटनेचे सदस्य असतात. या संस्था विविध खेळ, व्यायाम व त्यांच्या स्पर्धांचे कार्यक्रम आखतात. उच्च शिक्षण प्राप्त करणाऱ्याना केवळ शिक्षणच फुकट नाही तर ९० टक्के विद्यार्थ्यांना छात्र-वृत्ति मिळत असते. आई-बाप मुलांच्या योग्य शिक्षणासाठी पूर्ण निश्चित असतात. १८ वर्षांपेक्षा कमी वयाचा मुलगा कोणत्याहि घरच्या किंवा सार्वजनिक, शेती किंवा कारखान्यात, वेतनावर किंवा मजुरीवर नोकरीस ठेवता येत नाही. वयात न आलेल्या मुलांना कामावर ठेवणें कायद्याने गुन्हा आहे. बालकाचें एकच काम – आपल्या शरीराचा व मनाचा योग्य विकास करणें. बाल-विकासाची ही व्यवस्था किती संगठित, संयोजित, व्यवस्थित आणि वैज्ञानिक आहे ? जन्मापासूनच मुलाकडे पूर्ण लक्ष दिलें जावें म्हणून पहिल्या मुलाच्या जन्माबरोबर राज्यातर्फे आईला ५०० जर्मन मार्क दिले जातात. आणि ५ व्या अपत्यापर्यंत ही रकम वाढत वाढत १००० मार्कापर्यंत वाढविली ज़ाते. बहुधा प्रत्येक लहान-लहान गावातहि किंडर गार्टन शाळांची व्यवस्था आहे. तिथे मुलांना खाणें, झोपणें, खेळणें इत्यादींची योग्य तितकी व्यवस्था असते. आम्ही अनेक अशा शाळा पाहिल्या. तेथील मुलांत गेल्याबरोबर चित्त प्रसन्नतेने फुलून जात होतें.

राजनैतिक परिस्थितीच्या विचित्रतेने पूर्व जर्मनीत अजब परिस्थिति निर्माण केली आहे. पश्चिम जर्मनीतर्फे पूर्व जर्मनीबद्दल भयंकर प्रचार चालतो. तो वास्तविक खरा नसतो तरी त्यात थोडाबहुत सत्यांश असतो. अनेक कुटुंबांचे सदस्य पश्चिम जर्मनीत आहेत, पण आपल्या कुटुंबापासून ते अलग पडले आहेत. त्यांच्यात ही भावना तीव्रतेने घर करीत आहे की आम्ही पाहिजे तेथे जायला स्वतंत्र नाही. पूर्व जर्मनीत शिक्षणाची व वैद्यकीय मदतीची उत्तम सोय आहे. कारखान्यातील मजुरांची स्थितिहि

संतोषकारक आहे. पण तेथील लोक म्हणतात की हें ठीक आहे की आम्ही एका साम्यवादी आदर्शाकडे प्रगति करीत आहोत, आमच्या समाजाची प्रगति एका सिद्धांताच्या व विचाराच्या आधारावर होत आहे. परंतु त्याचा परिणाम हा न होवो की आम्ही जेथे जाऊ इच्छितो तेथे जाऊ शकणार नाही, आपल्या कुटुंबियांना भेटू शकणार नाही आणि आपल्या वैचारिक भुकेची तृप्ति करून घेऊ शकणार नाही. पूर्व जर्मनीच्या राज्यकारभारात सामूहिक नेतृत्वाचा सिद्धांत स्वीकारला गेला आहे. सर्व देशाचा एक राष्ट्रपति करण्यापेक्षा २४ सदस्यांची एक सर्वोच्च राष्ट्रीय-परिषद निर्माण केली गेली आहे आणि सर्वोच्च वैधानिक अधिकार या परिषदेच्या हातीं आहेत. परंतु या परिषदेचे अध्यक्ष वॉल्टर उलब्रिस्ट यांच्या जबरदस्त व्यक्तित्वाची छाया संपूर्ण शासनावर पडली आहे. आणि त्यांच्या जोरदार आवाजासमोर कोणाचें काही चालत नाही. त्यांची कारभार चालविण्याची रीत फार कडक मानली जाते आणि म्हणून पूर्व जर्मनीच्या काही लोकांकडून आम्ही ऐकलें की "त्यांच्या अनावश्यक सक्तीपुढे लोक शरणागति पत्करतात. जर ही अनावश्यक सक्ती केली नाही तरीहि साम्यवादाच्या प्रगतीत कांही बाधा येणार नाही."

पूर्व जर्मनीच्या लोकसभेत ४६६ सभासद आहेत. त्यांच्यांतील कोणाचाहि राजकारणाचा धंदा नाही. ते कुठले तरी स्थायी कार्यकर्ते आहेत आणि लोकसभेच्या कार्यकालापुरते ते (आपल्या कामातून) सुट्टी घेतात. त्यांना आपल्या मतदारांपुढे आपल्या कामकाजाचा पूर्ण हिशोब द्यावा लागतो, आणि पुढील कार्यक्रमाची रूपरेखा द्यावी लागते. रोज काही तास त्यांना सार्वजनिक सल्ला मसलतीसाठी खर्च करावे लागतात. आपली जबाबदारी न्यायत: पूर्ण न केल्यास मतदाते त्यांना लोकसभेच्या सदस्यतेतून काढून टाकून दुसरा सदस्य निवडू शकतात. पूर्व जर्मनीच्या जनतेबरोबर आमचा जो संपर्क आला त्यावरून आम्हाला असा अनुभव आला की लोकांत सामाजिक जबाबदारीचें भान आश्चर्यकारक रीतीने विकसित होत आहे. आम्ही एखाद्या विद्यालयात किंवा कारखान्यात जात होतो, गावात किंवा शहरात जात होतो तेथे आम्हाला हेंच दिसत


होतें की लोकांत एका विशिष्ट सिद्धांताचा आणि आदर्शवादाचा विकास होत आहे. वैज्ञानिक शिक्षणाचा समाजावर हा अनिवार्य प्रभाव पडत आहे. न्यायाधिशांच्या निवडणुकीच्या परंपरेचें या दृष्टीने आणखीनच अधिक महत्त्व आहे. एकोणसाठपर्यंत न्यायखात्यातर्फे न्यायाधिशांना नियुक्त केलें जात होतें. पण त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाची निवड लोकसभा करते आणि देशभर बाकीच्या न्यायाधिशांची निवडणूक तीन वर्षांनी होत असते.

हें सर्व असूनहि विभाजित जर्मनी व विभाजित बर्लिन यांचा धोका तर डोक्यावर लटकता राहिला आहेच. चार मोठ्या शक्तींची जर्मनीच्या दोन्हीं भागांवर छाया पसरली आहेच. पश्चिम जर्मनीच्या एका शांति-कार्यकर्त्याने आम्हाला सांगितलें : " आमचा देश विज्ञान, टेक्निक व उद्योग यांत जगामध्ये उल्लेखनीय स्थान राखतो, तरीपण आम्ही आमचा आत्मविश्वास घालवून बसलो आहोत. युद्धाने आमचें जें नुकसान झालें तें आम्ही भरून काढलें आहे. पण युद्ध हारल्यावर आम्ही जो आत्मविश्वास गमावला तो काहीं परत मिळवू शकलो नाही. आम्हाला हा भरवसा राहिला नाही की आम्ही आपलें रक्षण स्वतः करू शकू. याच कारणामुळे आम्ही आमच्या भूमीवर परदेशी सैन्यें व परदेशी टँक्स राहू देणें सहन करू शकलो आहोत." जर्मनी दोन तुकड्यांत विभागला गेला आहेच. त्याशिवाय त्या दोन तुकड्यात निरनिराळ्या प्रकारच्या समाज-व्यवस्था आणि शासन-पद्धतिहि चालू झाल्या आहेत. त्यामुळे जर्मनीच्या एकते-साठी दोन्ही भागांच्या राजनैतिक नेत्यांना आपसातल्या व्यवहारात निंदा, आक्षेप व कुप्रचार यांच्या ऐवजी गोड व्यवहार आणि खरा समज यांची कास धरावी लागेल. जोपर्यंत दोन्ही बाजूंचे राजनैतिक पुढारी जवळ येणार नाहीत आणि चर्चा व वाटाघाटींनी समजूत करून घ्यायला तयार होणार नाहीत तोपर्यंत जगाची कितीहि इच्छा असली तरी एकता होण्याचा काही संभव नाही. सैन्य-वाद व युद्धोन्माद यावर विश्वास ठेवून जर्मन लोकांनीच जर्मनीचे तुकडे होण्याचा पाया घातला. आता जर्मन जनताच सैन्यवादाच्या ऐवजी विश्वास, प्रेम आणि आपापसातील

सौहार्द यांच्यावर विश्वास ठेवून जर्मन जनतेच्या ऐक्याचा पाया तयार करू शकतील. जर्मन जनतेशिवाय आणखी कोण दुसरा जर्मन समस्येची सोडवणूक करू शकण्यात सफल होऊ शकतो ? जर्मनीचा कोणता एक विभाग दुसऱ्या विभागाला आपल्यात मिळवून घेण्यासाठी किंवा आपली समाज-पद्धति दुसऱ्यावर लादण्यासाठी लष्करी प्रयत्न करील तर त्याचा परिणाम होईल तिसरें अणु-युद्ध आणि साऱ्या जगाची राखरांगोळी ! अशा भयानक टोकावर जर्मनी आज उभा आहे. जर्मन-भूमीने दोन महायुद्धें झेललीं आहेत. त्यांची पुनरावृत्ति रोकण्याचा एकच मार्ग आहे— निःशस्त्रीकरण. दोन्ही जर्मनी, इच्छा करतील तर, नाटो व वॉरसा सैनिकी-करारांपासून अलग होऊन, मध्य-युरोपाचें अणु-शस्त्र-मुक्त-क्षेत्र बनवून आणि चार बड्या राष्ट्रांच्या सैन्यांना जर्मन-भूमीवरून घालवून देऊन तिसऱ्या महायुद्धाची शक्यता आपल्या देशातून हटवू शकतील. एकाने दुसऱ्यावर दोषारोपण करीत स्वतःला निर्दोष मानून घेण्याचा मानवीय स्वभाव स्वाभाविक आहे. पूर्व जर्मनीच्या दृष्टीने पश्चिम जर्मनी दोषी आहे व पश्चिम जर्मनीच्या दृष्टीने पूर्व जर्मनी दोषी आहे. अशा रीतीने समस्येचा कधी अंत होऊ शकणार नाही आणि अशा परिस्थितीत जर्मनीचें एकीकरणहि असंभव आहे.

पूर्व जर्मनीत उद्योग, कृषि इत्यादि सर्व व्यवस्था समाजवादी प्रणालीवर आधारित आहे. शिक्षणाचा आधारहि समाजवादच आहे. शिक्षणाचा मुख्य उद्देश असा आहे की बालक व्यक्तिवादी किंवा भांडवलवादी न बनता समाजवादी दृष्टिकोण ठेवील असें शिक्षण त्याला मिळावें. शिक्षणात विज्ञानाचा आधार मुख्य आहे. पूर्व जर्मनीत आम्ही लहान बालकांच्या शाळेपासून उच्च विद्यालयांपर्यंतच्या शिक्षणाचें अवलोकन केलें. रस्त्याने चालत असताना आम्हाला एखादें विद्यालय लागलें तर तेथे आम्ही अवश्य जात होतो. विद्यालयात आमच्या सभाहि व्हावयाच्या. शिक्षकांशी चर्चाहि होत. आम्ही सोव्हियट संघ, पोलंड आणि पूर्व जर्मनी तीन्ही कम्युनिस्ट देशांच्या प्रवासात पाहिलें की मुलांच्या योग्य विकासाकडे आणि वैज्ञानिक शिक्षणाकडे समाज



PEACE MARCH
MOSCOW-WASINGTON
BAN
Peace News
HOW
लंदन




न्यूयार्क
U.N.




न्यूयार्कहून वाशिंग्टनपर्यंत पदयात्रेंत साथ देणारे दोन अमेरिकन तरुण : आर्ट मिल्लर व रॉड स्मिथ.



वाशिंग्टनचें राष्ट्रपति-भवन.

येथें राष्ट्रपतींच्या खास प्रतिनिधीनें शातियात्रींचें अभिनन्दन केलें.


PEACE MARCH
DELHI · MOSCOW




टोकियोहून हिरोशिमाकडे : अनेक जपानी शान्ति-सैनिक पदयात्रेंत सामिल झाले आहेत




हिरोशिमाला पोंहचले. डावीकडून दुसरी : अमेरिकन शान्तिवादी महिला, ज्यांनीं ७०० मैल पायीं प्रवास करून हिरोशिमाला भेट दिली.


विशेष ध्यान देत असतो. मुलें म्हणजे समाजाची आणि राष्ट्राची अमूल्य संपत्ति आहे असें मानलें जातें. आणि त्या दृष्टीने त्यांची जोपासनाहि केली जाते. त्यांच्या प्राथमिक शिक्षणापासून विश्वविद्यालयापर्यंतचें शिक्षण सक्तीचें व फुकट करण्याची व्यवस्था व जबाबदारी राज्याची आहे असें मानलें जातें.

## बर्लिनमध्ये एक आठवडा

स्प्रे नदी आणि अनेक भिन्न जलाशयांनी घेरलेलें बर्लिन मध्य युरोपाचें सर्वात मोठें आणि अत्यंत सुंदर नगर आहे. बाग-बगीचे आणि हिरव्यागार झाडांनी सजलेली ही पूर्वीची जर्मनीची राजधानी व्यापार, उद्योग, विज्ञान आणि शिक्षण यांचें प्रसिद्ध केंद्र झाली होती. हिटलरचा सैन्यवाद व शस्त्रवाद यांची सारी कथा या नगराच्या भूमीवर लिहिली गेली आहे, आणि आज हें मनोहर शहर दोन तुकड्यांत विभागलें जाऊन दिङ्मूढ स्थितीत उभें आहे. अमेरिकन, रशियन, फ्रेंच व ब्रिटिश सैन्यांचीं पथकें चोहीकडे फिरत असलेलीं दिसतात. हत्यारें आणि इतर युद्ध-साधनांनी सुसज्ज असे टँक युद्धाच्या तयारीने अगदी उभे आहेत. हिटलरच्या सैन्यवादाने व युद्ध-प्रेमाने बर्लिनच्या शांतिप्रेमी सर्वसामान्य नागरिकांच्या शिरावर हा एक असा बोजा लादला आहे जो उतरवू म्हटलें तरी उतरवता येणार नाही. येथील साऱ्या समस्येचें मूळ आहे--हिटलरचा सैन्यवाद. त्या सैन्यवादाने लाखो निरपराधी मनुष्यांचा संहार केला, जर्मनीचे तुकडे केले, बर्लिन शहर चार तुकड्यांत विभागलें गेलें, आणि बर्लिनच्या पश्चिमेकडील विभागाला भिंतीने व तारांच्या कुंपणाने घेरण्याची परिस्थिति निर्माण केली आहे. आज ४० लाख बर्लिनवासीयांना हा भयानक शाप नाइलाजाने भोगावा लागत आहे. पूर्व-बर्लिनचा कोणीहि माणूस पश्चिम-बर्लिनमधें जाऊ शकत नाही आणि पश्चिम बर्लिनचा पूर्व-बर्लिन-मधे जाऊ येऊं शकत नाही. कोणाचा भाऊ, कोणाची बहिण, कोणाचा बाप जर दुसऱ्या विभागांत राहून गेला असेल तर तो जवळ असूनहि परदेशी झाला आहे. युद्ध, सैन्य आणि हत्यारें यांच्यावरील विश्वासाच्या प्रत्यक्ष परिणामांचें दर्शन आम्हाला बर्लिनमधे झालें.

इतकें सर्व झालें असूनहि बर्लिनच्या नेत्यांचा व शासकांचा विश्वास युद्ध, सैन्य आणि हत्यारें यांच्यावरून उडून गेला आहे काय? ज्या सैन्यवादाच्या भयंकर पापांचा परिणाम त्यांनी स्वत: पाहिला आहे, अनुभवला आहे, त्या सैन्यवादापासून मागे फिरण्याची अजून तरी त्यांची तयारी आहे काय? आज पूर्व जर्मनी अलग आहे, पश्चिम जर्मनी अलग आहे, बर्लिन अलग आहे. या सर्वांचें एकीकरण होण्यामध्ये सर्वात मोठा अडथळा कोणता आहे? सैन्यवादावर विश्वास आणि आपसातील फूट या दोन सर्वात मोठ्या अडचणी आहेत, ज्यांच्यामुळे समस्येची गांठ दिवसेंदिवस पक्कीच होत आहे. संपूर्ण बर्लिन राजनैतिक स्पर्धेच्या डावावर उभा आहे. बर्लिनचे राजनीतिज्ञ चार मोठ्या शक्तींच्या हातांतील खेळणीं बनले आहेत.

७ जून रोजीं जेव्हा आम्हीं बर्लिनला पोहोचणार होतो त्याच दिवशीं सकाळीं कॉलेजच्या एका विद्यार्थ्याने बर्लिन-समस्येची पृष्ठभूमि



आम्हांला समजावून सांगितली. हा विद्यार्थी सुमारें ७-८ मैल आमच्या बरोबर चालत आला आणि त्याने बर्लिनच्या विभाजनाच्या कारणांचें सूक्ष्म विवेचन केलें. पूर्व बर्लिनच्या सीमेवर आम्ही जेव्हा पोहोचलो तेव्हा सोव्हियट सैनिकांनी व पूर्व बर्लिनच्या सैनिकांनी आमचें स्वागत केलें. आम्ही त्यांना म्हणालो : "तुम्ही लोक आमचें स्वागत करता पण आम्ही तर सैन्य व हत्यारें यांचे विरोधी आहोत. आमच्या यात्रेंत तुम्हाला एवढी गोडी का ?" सैनिकांनी मोठें मनपसंत उत्तर दिलें : "आमचें त्या हत्यारांवर मुळीच प्रेम नाही. आम्ही सुद्धा समस्यांचें शांतिपूर्ण निराकरण चाहतो. तुम्ही लोक पुढे पश्चिम बर्लिनमधे व पश्चिम जर्मनीत जात आहात. तेथील सैन्यप्रेमी शासकांना समजावून सांगा. आम्ही त्या दिवसाची वाट पाहत आहोत ज्या दिवशीं हत्यारें फेकून देऊन आम्हीहि तुमचे सोबती बनू शकू. आम्ही सैनिक तर आहोत, पण आक्रमणासाठी नाही, केवळ सुरक्षेसाठी—बचावासाठी." आज ज्या जगांत ५५ हजार कोटी रुपये सैन्य व हत्यारें यांवर खर्च केले जात आहेत, त्या जगात थोड्याशा शांतिवादी लोकांचा आवाज 'नगाऱ्यापुढे टिमकीचा आवाज' अशा सारखाच समजला जाईल. परंतु जर सैनिकांचें मन बदललें गेलें आणि ते एके दिवशीं हत्यारें फेकून देण्याचा विचार करूं लागले तर असें मानावें लागेल की युद्ध-ज्वराचे दिवस संपत आले.

बर्लिन नगरी आज विभाजित होऊन शीत-युद्धाचें केंद्र झाली आहे. श्री. ॲडनॉवरांच्या म्हणण्यानुसार "प्रश्न पूर्व व पश्चिम जर्मनीच्या एकीकरणाचा नाहीं तर पूर्व जर्मनीला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा आहे." पश्चिम जर्मनीचे संरक्षण मंत्री श्री. जोसेफ स्ट्राउस्स तर स्पष्ट च म्हणतात : "पूर्व व मध्य युरोपच्या सर्व देशांच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत." पश्चिम जर्मनीचे नेते कम्युनिझमला हरविण्यासाठी बर्लिनला सर्वांत महत्त्वाचा मोर्चा मानतात. समस्येचा खोल पाया हाच आहे. शेवटचें तात्पर्य म्हणजे बर्लिन व जर्मनीचें विभाजन ही मुख्य समस्या नसून समस्या आहे या दोन विचारांच्या संघर्षाची. विचारांच्या या संघर्षामधे आम जनतेचा किती हात आहे हें सांगणें कठिण आहे.

आम जनता बर्लिन व जर्मनीचें एकीकरण इच्छिते यात मुळीच संशय नाही. पूर्व जर्मनीच्या कितीतरी जबाबदार लोकांनी आम्हाला सांगितलें : "आमच्या विभागात समाजवाद खुशाल चालेना का आणि पश्चिम विभागांत भांडवलशाही-वाद चालेना का, परंतु केंद्रीय शासन एक असावें, फेड-रेशन एक बनावें अशी आमची इच्छा आहे." परंतु आम जनता राजनैतिक प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत पुढाऱ्यांवरच अवलंबून असते आणि त्यांनी आज जर्मनीचें एकीकरण असाध्य करून ठेवलें आहे. पश्चिम बर्लिनच्या आर्थिक अनुसंधान विद्यापीठाचे डॉ. आर्नडट म्हणाले: "पुष्कळशा लोकांच्या मनात या विचाराने घर केलें आहे की 'स्वस्थ राहा आणि काय होतें तें पहा !' अशा लोकांची मन:स्थिति फार अस्थिर आहे."

"विचारांचा संघर्ष समस्येचा आधार असावा आणि त्या आधारावर वैचारिक-विश्लेषण चालू असावें ही गोष्ट लक्षात येते; पण काय विचारां-च्या विजयाप्रीत्यर्थ लष्करी तयारीची जरूर असते ? पूर्व जर्मनीसाठी 'वॉरसा-करार' आणि पश्चिम जर्मनीसाठी 'नाटो करार' यांची आवश्यकता काय विचारांच्या संघर्षासाठी आहे ? शेतकरी आणि मजूर यांच्या डोक्यावर कोट्यावधि – अब्जावधि रुपयांच्या खर्चाचा बोजा लादून काय विचारांच्या हार-जीतच्या वहाण्याची गरज आहे ?" हे प्रश्न आम्ही पूर्व जर्मनीचे परराष्ट्र मंत्री डॉ. लोथर बौल्स यांना विचारले. ते म्हणाले: "आम्ही पूर्व जर्मनीच्या हद्दीतून हिटलरशाहीला मुळासकट उखडून टाकलें आहे. फॅसिस्ट कमांडरांचेंहि उन्मूलन केलें आहे. आम्ही कोणत्याहि गोष्टींची सोडवणूक करण्यासाठी कोणत्याहि प्रकारच्या हिंसेचा प्रयोग करू इच्छित नाही. समाजवादाच्या विजयासाठी कधीहि युद्धाची आणि सैन्याची आवश्यकता आम्ही मानीत नाही. पण आज आमच्या समोर अनिवार्य अशी विचित्र परिस्थिति आहे. आम्ही पश्चिम जर्मनीच्या सरकारसमोर अनेक ठराव ठेवले आहेत. आम्ही असेंहि सांगितलें आहे की आम्ही वॉरसा-करारापासून अलग होतो, तुम्हीहि नाटो-करारापासून अलग व्हा. पण आमच्या ठरावाचें काही उत्तरच देत नाहीत. अशा स्थितीत आम्ही काय करू शकतो ?"

डॉ. बौल्स यांनी सप्तसूत्री-शांतियोजनेविषयीं सांगताना म्हटलें की या योजनेत कोणत्याहि परिस्थितीत हिंसेचा आश्रय न घेणें, सर्व सैनिक करारातून जर्मनीला मोकळें करणें, युद्ध-प्रचारावर बंदी घालणें, मागच्या महायुद्धाच्या संचालकांना राज्यकारभारातून व सार्वजनिक क्षेत्रातून काढून लावणें इत्यादि गोष्टीहि सामिल आहेत. दुभंगलेल्या जर्मनी व बर्लिनच्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी सत्याग्रह व अहिंसात्मक लढ्याचा रस्ता कसा व कोठपर्यंत स्वीकारता येईल यावर सुद्धा आम्ही डॉ. बौल्सशी चर्चा केली.

पश्चिम बर्लिनमधे कोणाहि जबाबदार अधिकाऱ्यांशी आमची भेट होऊ शकली नाही. शहराचे मेयर श्री. बिलिब्रान्ट अमेरिकेला गेले होते. इतर अधिकारी तेथेच होते. आम्ही एका घरून दुसऱ्या घरीं भटकत फिरलो. पुरे तीन दिवस याप्रमाणे भटकण्यात व मार्ग-प्रतीक्षा करण्यात घालविले. काही सामान्य नागरिकांशी आमच्या गोष्टी झाल्या.

पूर्व बर्लिनमधे व पश्चिम बर्लिनमधे एक प्रत्यक्ष फरक तावडतोब दृष्टीस पडतो. पश्चिम बर्लिनमधे दुकानात दुनियाभरचा माल उपलब्ध आहे. माल पुष्कळ स्वस्तहि असतो. पश्चिम बर्लिनच्या लोकांसाठी विशेष सवलत देऊन आणि सरकारी अनुदानाच्या सहाय्याने तऱ्हेतऱ्हेची आकर्षक सामग्री उपलब्ध करून दिली आहे. सपाटून जाहिरातबाजीच्या तडाख्यात कोणाहि प्रवाशाचे डोळे दिपून जाणें कठिण नाही. पण जो मनुष्य जाणतो की हा सारा विजेचा चकचकाट आणि जाहिरातबाजी कोणाच्या आधारावर उभी आहे आणि याचें खरें मूल्य चुकविणारा मजूर व शेतकरी कोणत्या देशात आहे तो या झकपकीला फसणार नाही. कार व मोटारींची धावपळ इथे बरीच आहे. आम्ही ज्या खाणावळीत भोजन घेत होतो तेथे काही धंदेवाईक भिक्षेकरीहि पाहण्यात आले. भांडवलशाही-समाजरचनेचें हें दोषपूर्ण दुःचक्र आहे. एकीकडे अत्यंत भव्य विलासिता आणि दुसरीकडे दारिद्र्यात राहणाऱ्या मनुष्यांची दुर्दशा !!

**भिंत !**

पश्चिम बर्लिनचे लोक ' भिंती ' मुळें फार नाराज आहेत. ही ती भिंत आहे जिने साऱ्या पश्चिम बर्लिनला चांगल्या तऱ्हेने बांधून टाकलें आहे. "पश्चिम बर्लिन हा मोर्चा बनवून तिकडून वाटेल त्या प्रवृत्ति चालू शकू नयेत" यासाठी पूर्व जर्मन सरकारने या भिंतीच्या स्वरूपात कडक बंदोबस्त केला आहे. पश्चिम बर्लिनमध्ये आम्ही एका जर्मन कुटुंबात अतिथि होऊन तीन दिवस राहिलो. वास्तविकपणे पूर्व बर्लिनच्या किंवा पश्चिम बर्लिनच्या सामान्य नागरिकांच्या स्वभावात काही फरक नाही. या कुटुंबात आम्हांला तेंच प्रेम, तोच आपलेपणा व सौहार्द मिळालें जें इतर ठिकाणींहि मिळत होतें. सामान्य नागरिक जाणतात की या समस्येच्या निराकरणार्थ मोठी उदारता, विश्वास, गंभीरता, व खरेपणा यांची आवश्यकता आहे. एकाने दुसऱ्यावर चिखलफेक करण्याने, टीका-टिपणी करीत राहण्याने एकाने दुसऱ्याबद्दल भडकवणारी भाषा वापरल्याने जर्मनीचे एकीकरण कधीहि संभवणार नाही.

पूर्व जर्मनीमध्ये शांतिपरिषदेच्या नेत्यांशी आणि कार्यकर्त्यांशी आमची विस्तृत चर्चा झाली. अणु-युद्धाच्या धोक्यातून जगाला वाचविण्यासाठी जर्मनीशी शांति-तह होणें अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी दोन्ही जर्मनींच्या सरकारांनी आपसात प्रेमपूर्ण संबंध कायम करून अनुकूल परिस्थिति निर्माण केली पाहिजे, ही गोष्ट वारंवार म्हटली जात होती. शांतिपरिषदेच्या मित्रांनी म्हटलें की दोन्ही जर्मन सरकारांनी आपल्या सैन्यांची अधिकाधिक शस्त्र-संपन्नता वाढविता कामा नये, आणि त्यांना अण्वस्त्र शस्त्रांनी सुसज्जित करता कामा नये. त्याबरोबर त्यांची अशीहि मागणी होती की मध्य-युरोपात अण्वस्त्रें आणलीं जावू नयेत आणि तो भाग 'अण्वस्त्र-मुक्त-क्षेत्र' घोषित केला जावा. त्यांनी या गोष्टीवर जोर देऊन म्हटलें की वरील गोष्ट केल्याशिवाय शस्त्रास्त्रांची स्पर्धा कधीहि थांबणार नाही.

युद्ध समाप्त होऊन १६ वर्षे होऊन गेलींत पण अजून युद्धाच्या पापांचा भोग संपला नाही. ७ कोटी जर्मन जनतेच्या डोक्यावर अजूनहि असुरक्षिततेचें कृत्रिम भूत बसलें आहे. जगभरचे लोक ' जर्मन समस्या '

व 'बर्लिन समस्या' यांच्या गंभीरतेचा अनुभव चांगल्या प्रकारें करीत आहेत. "जर्मनी अजून सुद्धा का विभक्त आहे ?" "बर्लिनचा एक विभाग आजहि काटेरी कुंपणाने का घेरलेला आहे ?" "आज सुद्धा चोहोकडे टँकचा गडगडाट का चालू आहे ?" या प्रश्नांचीं योग्य उत्तरें लोकांच्या-जवळ नाहीत.

सन १९४५ मधे विजयी शक्तींनी पूर्ण देशाचे ४ तुकडे करून टाकले. १९४९ पर्यंत तीच स्थिति राहिली. मधून मधून या चार बड्या राष्ट्रांमधे अनेक तहनामे होत राहिले. १९४९ मधे 'जर्मन फेडरल रिपब्लिक' (पश्चिम जर्मनी) व जर्मन डेमोक्रॅटिक रिपब्लिक (पूर्वजर्मनी) अशीं दोन राज्यें बनविलीं गेलीं. ब्रिटिश, फ्रेंच व अमेरिकन सैन्यांच्या ज्या भागावर ताबा होता तेथे 'जर्मन फेडरल रिपब्लिक' बनले आणि त्या तीन्ही देशांत ज्या तऱ्हेची शासन-पद्धति चालते तिच्या तोंडवळ्याशी मिळती-जुळती शासन-पद्धति तेथे कायम झाली. सोव्हियट सेनेचा ज्या विभागावर ताबा होता तेथे 'जर्मन डेमोक्रॅटिक रिपब्लिक' बनलें आणि सोव्हियट संघात जशी शासन-पद्धति चालते तिला मिळती-जुळती शासनपद्धति तिथे कायम झाली. याप्रमाणे सव्वापांच कोटी जनता एका बाजूला आणि पाउणेदोन कोटी जनता दुसऱ्या बाजूला विभागली गेली. दोन्ही बाजूंना गरमा-गरम वातावरण आहे. कोणत्याहि क्षणीं भडका होऊन पेटू शकतें.

आम्ही दिल्लीहून निघालो होतो तेव्हा भारत-पाक समस्या व काश्मीर प्रश्नावर लोक चर्चा करीत होते. पाकिस्तानी बंधूमधेहि आमच्या यात्रेच्या दरम्यान या प्रश्नावर पुष्कळ गोष्टी होत होत्या. पुढे चालून गेल्यावर पाक-अफगाण संबंधाच्या बाबतीत काही वातावरण होतें, इराणमधेहि रशियाच्या संबंधाने काही चर्चा चालू होती. रशियात अमेरिकाविरोधी घोषणा ऐकू येत असत. पोलंडमधेहि जर्मनविरोधी कुजबुज कानापर्यंत येत होतीच. परंतु पूर्व जर्मनीत पोहोचल्यावर तर आम्हाला एकदम गरम वातावरण आढळलें. या वातावरणात एक असा स्फुलिंग दिसला आणि वाटलें की स्फोट कोणत्या क्षणीं होईल कोण जाणे !

हें ठीक आहे की पश्चिम जर्मनीवाले पूर्व जर्मनीच्या सरकारला मान्यता देत नाहीत. पण तेथील जनता जी आपल्याच देशात परदेशी बनून अलग-अलग पडली आहे, ती एकत्र येण्यासाठी अर्थात् दोन्ही जर्मनी एक करण्यासाठी पश्चिम जर्मनी एखादें वास्तविक पाऊल टाकण्याऐवजी कम्युनिस्टांच्या भयाने व्यर्थ त्रास भोगत आहे, अशा प्रकारच्या गोष्टी पूर्व जर्मनीत आम्हाला ऐकायला मिळाल्या. दोन्ही बाजूंनी एकदुसऱ्या विरुद्ध जबरदस्त प्रचार चालतो. प्रचारात अगणित पैसा पाण्यासारखा एकदुसऱ्याच्या विरुद्ध वाहवला जात आहे. पूर्व जर्मनीच्या बाजूचे लोक म्हणतात : "पश्चिम जर्मनीचे लोक निर्णय घ्यायला स्वतंत्र नाहीत. त्यांच्या उरावर अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स बसले आहेत." पश्चिम जर्मनीचे लोक म्हणतात: "पूर्व जर्मनीचे लोक सोव्हियट संघाबरोबर बांधले गेले आहेत. ते सोव्हियट संघाच्या तालावर नाचतात."

पश्चिम जर्मनीचे पुढारी 'स्वतंत्र निवडणुकी'च्या आधारानें समस्या सोडवू पाहतात. पण पूर्व जर्मनीच्या पुढाऱ्यांचें मागणें आहे की सर्व प्रथम सर्व सैनिकी-तहातून मुक्त होऊन जर्मनी एक तटस्थ राष्ट्र बनावें आणि चारी बड्या राष्ट्रांच्या सेना जर्मनीतून निघून गेल्यावर निवडणुकीच्या गोष्टीचा विचार व्हावा. पण 'चार बडे' जर्मनीच्या सुरक्षिततेचा ठेका घेऊन असा अडंगा मारून बसले आहेत की हा मामला कधी सुटूच नये. जर्मनीची व बर्लिनची समस्या ज्वालामुखीचें रूप धारण करून बसली आहे. अण्वस्त्रांच्या युद्धाच्या शक्यतेचे ढग नेहमी तेथे जमून गोंधळ करतात. भिंतीच्या दोन्ही बाजूंना शस्त्र-सज्ज सैन्यें टँकांवर आरूढ होऊन बसलीं आहेत.

अखेर ही 'भिंत' आहे काय ? कदाचित् हा एक असा प्रश्न आहे ज्याचें उत्तर शोधणें असंभव नाहीं तरी कठिण अवश्य आहे. कारण भिंत स्वत: काही 'रोग' नाही, रोगाचा एक परिणाम मात्र आहे. आम्ही जर शेजाऱ्याशी झगडे करीत राहू, त्याला आपला वैरी समजत राहू, त्याच्या-विरुद्ध प्रचार करीत राहू, तर साहजिकच शेजारीसुद्धा त्याच तऱ्हेने

प्रतिकार करीत राहील. म्हणून प्रश्न हा नाही की भिंत काय आहे ? पण प्रश्न हा आहे की 'भिंत कां आहे ?' तिच्या निर्माणामागे काय अनिवार्य कारणें आहेत ? जोपर्यंत भिंत बनण्याची पूर्व स्थिति साफ होत नाही, जोपर्यंत त्याचीं कारणें नष्ट होत नाहीत तोपर्यंत भिंती अशाच तऱ्हेने उभ्या होत राहतील. या काटयांच्या भिंती आणि सीमेंटच्या भिंती त्या भिंतीच्या प्रतीक आहेत जी भिंत दोन्हीकडच्या राजनैतिक पुरुषांच्या हृदयात उभी आहे. ही बाहेरची भिंत जितकी भयानक आहे तिच्या कितीतरी पट भयानक ही हृदयाची भिंत आहे.

हृदयाची ही भिंत तोडण्यासाठी हृदयाला सरळ, प्रेमळ आणि निष्कपट बनवावें लागेल. पश्चिम जर्मनीचे नेते जर 'नाटो'शी बांधले राहण्याचें इच्छितील तर ही हृदयाची भिंत कशी तुटेल ? पूर्व जर्मनीच्या नेत्यांना जर असें वाटत राहिलें की आमचा संबंध रशियन सेनेशी रहावा तर ही हृदयाची भिंत कशी तुटेल ? 'नाटो'च्या टँकामधून काही पुष्पांचा वर्षाव होणार नाही किंवा कम्युनिष्टांच्या बंदुकामधून पुष्पांचा वर्षाव होणार नाही. सैन्यवादाने टँक व बाँब यांनी जर्मनीचे तुकडे केले आहेत तरीहि आश्रय यांचाच घेतला तर जर्मनीचें एकीकरण कसें होईल ?

पूर्वबर्लिनच्या नॅशनल फ्रन्ट मधील एका गृहस्थाने विचारलें: "गांधी असते तर त्यांनी काय केलें असतें ?" मी सांगितलें: "गांधी असते तर जर्मन प्रश्नाबद्दल काय करतें हें मला सांगता येत नाही. पण त्यांनी ब्रिटिश सरकारला हेंच सांगितलें, "आम्ही भारतवासी जसे काही आहोत, अज्ञानी आहोत, अयोग्य आहोत, त्याची चिंता तुम्ही नका करू. आम्हाला काय करायचें, कसें राहायचें याबद्दलची चिंता आम्ही करू. तुम्ही आमच्या येथून प्रथम निघून जा कसे ?" पश्चिम जर्मनीतील एक तरुण असेंच म्हणाला: "आम्ही जर्मन लोक एक होऊन हे स्वतःच ठरवू की आम्हाला समाजवाद पाहिजे की कम्युनिझम पाहिजे की भांडवलशाही पाहिजे ! पहिल्या प्रथम हे 'चार बडे' आपआपला गाशा गुंडाळून आमच्या येथून निघून कां नाही जात ? अमेरिकेचे व रशियाचे परराष्ट्र-मंत्री आमच्या समस्यांवर चर्चा करीत बसतात. त्यांच्या चर्चेत आप-


आपल्या निहित स्वार्थाचा रंग असतो. म्हणून आता आम्हाला 'भारत छोडो' प्रमाणे 'जर्मनी छोडो' चा नारा लावला पाहिजे."

बर्लिनच्या सुंदर 'श्प्रे' नदीत पश्चिम जर्मनीच्या २०० मित्रांबरोबर नौका विहार करतांना आम्ही या विषयाची खूप चर्चा केली. कित्येक मित्र म्हणाले: "मागच्या युद्धात जर्मनी पराजित झाला. 'चार बड्यां' चा जर्मनीवर अधिकार झाला. पण काय अजूनहि हे 'चार बडे' कोणत्या ना कोणत्या रीतीने आमच्यावर कबजा ठेवू इच्छितात किंवा आम्हाला स्वतंत्रतापूर्वक जगू देवू इच्छितात हाच मुख्य प्रश्न आहे. प्रत्यक्ष रूपाने या चार बड्यांचें आज जर्मनीवर शासन नाही पण अप्रत्यक्ष रूपाने अजूनहि ते आमच्यावर अधिकार गाजवीत आहेत. बर्लिनवर तर चार बड्यांचें सरळ नियंत्रण आहे. समस्येचा निकाल तेव्हाच होईल जेव्हा सैनिक दृष्टया आम्ही पूर्णत: 'तटस्थ' बनू आणि स्वतंत्र निवडणुकीच्या आधाराने आमची शासन-व्यवस्था चालू करू."

## पश्चिम जर्मनी

२२ जून १९६३ रोजीं आम्ही पूर्व जर्मनीची सीमा ओलांडून पश्चिम जर्मनीत प्रवेश केला. पश्चिम जर्मनीला बर्लिनहून जोडणाऱ्या ओतोबान सडकेवर शेकडो मोटारी सीमा पार करण्यासाठी 'क्यू' मधे उभ्या होत्या. आम्ही इतक्या देशांच्या सीमा पार केल्या पण जेवढी शक्ति व सावधगिरी या सीमेवर ठेवली जाते तितकी कोठेहि पहायला मिळाली नाही. एकाच देशाच्या भूमीचे कसे दोन देश बनून गेले याचें विचित्र दृश्य आम्ही पाहिलें. पश्चिम जर्मनीत प्रवेश करताच आम्हाला अमेरिका, ब्रिटन आणि फ्रांस यांचे झेंडे फडकत असताना दिसले. पश्चिम जर्मनीच्या शांतिवादी मित्रांना आम्ही आमची तेथे पोहोचण्याची वेळ बरोबर कळवू शकलो नव्हतो.म्हणून आम्ही आमचें उतरण्या वगैरेचें ठिकाण शोधत शोधत चाललो होतो. 'यूथ होस्टेलां'ची व्यवस्था पश्चिम जर्मनीत आम्हाला असाधारण रूपाने विकसित झालेली आढळली. लहान-लहान शहरातहि फार स्वच्छ आणि सुंदर भुवनें 'यूथ होस्टेल' (युवक निवास)च्या रूपाने बनलेलीं आहेत. हजारो तरुण-तरुणी या यूथ हॉस्टेलमधे उतरतात. जर्मनीसारख्या

मेहींग देशात खाण्याची व उतरण्याची व्यवस्था इतक्या स्वस्तात हे लोक करू शकतात ही यांची मोठी विशेषता आहे. सामान्यपणे यूथ हॉस्टेलचे




सदस्य इथे उतरू शकतात. आम्ही परदेशाचे अतिथि असल्यामुळे आमची, कोणत्याहि भाड्याचा किंवा खाण्याचा खर्च न घेता उतरण्याची, व्यवस्था तेथे होत होती.

आम्हाला हँडबिलें वाटताना पाहून, आणि हातात युद्ध-विरोधी पोस्टर घेऊन जाताना पाहून, काही लोक कधी-कधी, दोन-चार जर्मन नाणीं 'दान' म्हणून देण्याचा प्रयत्न करीत, तेव्हा आम्हाला मोठे विचित्र वाटत असे. भांडवलशाही समाज-व्यवस्थेचें विकृत रूप आमच्या समोर येत होतें. आम्ही केव्हाहि अशा दानाचा स्वीकार केला नाही, पण अशा प्रसंगीं आमच्या मनात विचार येत की धर्मांधता व चर्च-परायणता यांनी मनुष्याला कसें बेजबाबदार बनविलें आहे आणि तो कोणालाहि दोन-चार नाण्यांचें दान देऊन समस्येकडे पाठ फिरवू इच्छितो. अत्यंत संपन्न जर्मनीत सुद्धां जेव्हा आम्ही भाकरीला महाग आणि आळसी लोकांची जमात पाहिली आणि भिकारी लोक याचना करीत मागे लागलेले पाहिले तेव्हा मनात वेदना होणें स्वाभाविक होतें.

पूर्वीं मला वाटत होतें की आमच्या भारतात 'भिक्षां देहि' चें कारण जीवन-स्तर उच्च नसणें हें आहे आणि तो स्तर उच्च झाला तर गरीबी व भिक्षांदेहीची समस्या आपोआप दूर होईल. पण जेव्हा पाश्चिमात्य देशात, जिथे उच्च जीवन-स्तर असूनहि गरीबी व भिक्षांदेहि कायम आहे असें पाहिलें तेव्हा मला आपला विचार बदलणें भाग पडलें. आम्ही कधी कधी अशा संस्थांतहि उतरत होतो जिथे सरकार अथवा चर्च यांच्या तर्फे अशा गरीबांना अन्नदान आणि झोपण्यासाठी आंथरुणें फुकट दिलीं जात होतीं. एक दिवस आम्ही अशाच एका भिकारखान्यात उतरलो होतो, जिथे आळशी, बेकार, व विक्षिप्त लोकांची गर्दी होती. त्या संस्थेचा एक अधिकारी आम्हाला 'तहखान्या'त घेऊन गेला. तेथे आमचे कपडे काढून पाहिलें गेलें की त्यात उवा-पिसवा तर झाल्या नाहीत ? आमच्या बगलां मधे टॉर्चचा झोत टाकून पाहिलें गेलें की तेथे उवा-पिसवा वगैरे किडेबिडे तर पडलेले नाहीत ? कसें विचित्र स्थान होतें तें ? पण नंतर आम्हाला वाटलें की झालें तें चांगलेंच झालें. त्या दुनियेचें दर्शन तर झालें आम्हाला ! भांडवलशाही समाज-व्यवस्थेचे नमूने तर पहायला मिळाले !!

पश्चिम जर्मनीची यात्रा करीत असताना आम्हाला सडकांवर, शहरांच्या घरांवर, कचेऱ्यांतून एक विशेष प्रकारचे पोस्टर व साइनबोर्ड

पहायला मिळत होते. त्यांत जर्मनीचे पांच तुकडे दाखविले होते आणि पुढे एक प्रश्न-चिह्न काढलें गेलें होतें ! हें पोस्टर पाहिल्याबरोबर कोणाहि जर्मन तरुणाचें रक्त उसळून येणें स्वाभाविक होतें. तथाकथित मातृभूमीचें प्रेम या पांच तुकडयांचें एकीकरण करण्यासाठी पडेल ती किंमत देण्याची प्रेरणा देईल. रशिया व पोलंडच्या विरुद्ध त्याच्या मनात आग पेटवील. असे भयंकर पोस्टर पाहून मला फार निराशा वाटत होती.

जर्मनीची युद्ध-विरोधी सभा (W. R. I) हिने आमच्या हँडबिलाचा जर्मन भाषेत अनुवाद करून त्याच्या हजारो प्रति आम्हाला दिल्या होत्या. त्या आम्ही सर्व ठिकाणीं वाटल्या. अनेक शांतिवादी संस्थांचा आम्हाला सहयोग मिळाला. शांतिवादी संस्थांत आपसात बरेच मतभेद चालू होते. युद्ध-विरोधी सभाहि एक आंतर-राष्ट्रीय संस्था आहे. तिच्यातहि दोन गट आहेत. दोन्ही गट आपआपल्या अलग संस्था चालवितात. सर्व शांतिवादी संस्था ईस्टर मार्च कमेटीच्या प्लॅटफार्मावर एकत्र येऊन काम करतात हे एक शुभ लक्षण आहे. ही ईस्टर मार्च कमिटी ईस्टरच्या सुट्टीत साऱ्या देशात युद्ध-विरोधी पदयात्रांचें आयोजन करीत असते. त्या यात्रेत ५०–६० हजारापर्यंत लोक भाग घेतात. ईस्टर यात्रेचे प्रसिद्ध तरुण नेते श्री. कौरनाट टेम्पल पक्के अहिंसावादी आहेत. ते भारतातहि प्रवास करून गेले आहेत. हंबुर्गमधे श्री. राल्फ लांग आणि त्यांचे सोबती, तसेंच स्टुटगार्टमधे श्री. थियोडोर आणि त्यांचे साथी एकत्र मिळून अहिंसक समाज रचनेच्या दृष्टीने शांति आंदोलनाचा पाया पक्का करीत आहेत. ईस्टर यात्रेत काम करणारे हे हजारो तरुण भविष्यात एका शांतिवादी जर्मनीची निर्मिति पुढाकार घेऊन करतील अशी आशा मला वाटली.

## पदयात्री सोबती

आम्ही बॉनमधे असताना डुसेलडॉर्फहून आम्हाला एक तार आला: 'काय मी तुमच्या पदयात्रेत सामिल होऊ शकते ?' हा एलके नावाच्या २० वर्षांच्या एका मुलीचा तार होता. आम्ही ताबडतोब 'हो' कारार्थी उत्तर दिलें. आणि कुमारी एलके आमच्या यात्रेत येऊन मिळाली. पहिल्याच

दिवशीं आम्ही चालत आमच्या पुढच्या पडावावर पोहोचलो तेव्हां आम्हाला दिसलें की एलकेताईचे कोमल पाय फोड येऊन सुजून गेले आहेत आणि तिला पदयात्रा भारी पडत आहे. आम्ही तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की पायी चालण्यासाठी अगोदर थोडा त्याचा अभ्यास केला पाहिजे; म्हणून तिने आत्ता आमच्याबरोबर पदयात्रेत येण्याचा विचार सोडून द्यावा. परंतु एलकेताईंनी आमची गोष्ट मुळीच ऐकली नाही. "कष्टांना भिऊन परत जाण्याचा सल्ला तुम्ही मला देता काय ?" बीयरचा प्याला ओठाला लावीत तिने आम्हाला आह्वान दिलें, आणि शेवटीं तिने बेलजमच्या हद्दीपर्यंत आमच्याबरोबर पदयात्रा केलीच.

हंबुर्गचा थॉमस नांवाचा एक तरुण होता. तो हंबुर्ग ते डॉर्टमंड या शेकडो मैल लांबीच्या सडकेवर उभा राहिला आणि येणाऱ्या जाणाऱ्या मोटरवाल्यांना थांबवून म्हणायचा: "मी आंतरराष्ट्रीय शांति पदयात्रेत सामिल होऊ इच्छितो. माझ्यापाशी रेल्वेचें तिकीट काढायला पैसे नाहीत. म्हणून कोणी मला आपल्या मोटारीतून घेऊन जाईल काय ?" कित्येक मोटरवाल्यांनी त्याचें म्हणणें मान्य केलें. कोणी २० मैल, कोणी ४० मैल, आणि कोणी १०० मैलपर्यंत त्याला आपल्या मोटारीतून नेलें आणि शेवटीं तो तरुण आमच्यापर्यंत येऊन पोहोचलाच. तो आमच्या पदयात्रेचा उत्तम मार्ग-दर्शक झाला. त्याला इंग्रजीहि अवगत होती, म्हणून एका चांगल्या दुभाष्याप्रमाणे आम्हाला त्याचा उपयोग झाला.

२८ मैलांची पदयात्रा करून आम्ही कोलोनला पोहोचलो. खूप पाऊस पडू लागला. थोडा आसरा पाहून आम्ही एका बाजूला उभे राहिलो. समोरच्या एका कॉफी हाऊस मधून एका भारतीय विद्यार्थ्याने आम्हाला पाहिलें. त्यांचें नांव होतें शिवकुमार सिंह. धावतच आमच्याजवळ आले. वर्तमानपत्रात त्यांनी आमचे फोटो पाहिले असल्यामुळे ओळख व्हायला वेळ लागला नाही. त्यांच्याशी गोष्टी झाल्या. ते आमच्याबरोबर पदयात्रेत सामिल झाले. आले होते थोड्या तासासाठी, पण थांबले दिवसभर. दुसऱ्या दिवशीं पदयात्रेतहि सामिल झाले. आले एक दिवस बरोबर राहण्यासाठी पण दोन दिवस झाले, चार दिवस झाले, परत फिरण्याचें त्यांच्या

मनातच येईना. शेवटीं १० दिवस ते आमच्याबरोबर राहिले. वेळजमची हद्द आली. आता कायद्याप्रमाणे त्यांना पुढे येणें शक्य नव्हतें. तिकडे कॉलेजचे दिवस बुडत होते. शेवटीं नाइलाजाने ते परत गेले. असे कितीतरी मित्र आमच्या यात्रेत सामिल होत असत. त्यांचे चेहरे आणि त्यांचा उत्साह विसरू म्हटलें तरी विसरणें शक्य नाही.

पश्चिम जर्मनीत शाकाहाराचें आंदोलन खूप जोर पकडीत आहे. इराणात व अफगाणिस्तानात आम्हाला कोरडी भाकर व काळा चहा याशिवाय बहुधा काही मिळत नव्हतें. तशी गोष्ट इथे नव्हती. इथे आम्हाला इतकीं शुद्ध शाकाहारी भोजनालयें व हॉटेलें पहायला मिळालीं की तीं पाहून आम्ही दंग होऊन गेलो. शाकाहारात पुढारलेल्या भारतात सुद्धा आम्हाला तशीं हॉटेलें कधी पाहायला मिळालीं नाहीत. स्वास्थ्याच्या दृष्टीने शाकाहार अधिक उपयोगी आणि लाभदायी आहे असा विचार येथे बराच जोर पकडत आहे. तसेंच योगासनांकडे लोकांची वाढती रुचि पाहूनहि मला आश्चर्य वाटलें. कित्येक शहरांत तर नियमित अशा शाळा चालतात जिथे योगासनें शिकविलीं जातात. कित्येक ठिकाणीं लोक आम्हाला योगासनें करून दाखवायला आग्रह करीत असत. आम्ही त्यांना जेव्हा शीर्षासन, सर्वांगासन, प्राणायाम वगैरे करून दाखवीत होतो तेव्हा ते फार प्रसन्न होत असत. भारताबद्दल पश्चिम जर्मनीला जी आवड व आकर्षण आहे त्याचें मुख्य कारण आमच्याकडील प्राचीन साहित्य आणि योगविद्या हीं आहेत. जगातील आपल्यापरी सर्वात भव्य औद्योगिक वसाहतीं---एसेन, ड्युसेल डॉर्फ, कोलोन--- हीं पाहून तर आम्हाला वाटलें की भारताला तेथपर्यंत पोहोचायला कोण जाणे किती दशकें लागतील !

## तो पादरी आणि तो शिपायी

चालता चालता संध्याकाळ होऊन गेली. जिकडे तिकडे अंधार पडू लागला. आम्ही पश्चिम जर्मनीच्या एका खास चांगल्या वस्तीत होतो. कुठे जायचें ? मेअरचें ऑफीस बंद होऊन गेलें होतें. यूथ हॉस्टेलचाहि ठिकाणा नव्हता. इतक्यात एक गगनचुंबी कॅथॉलिक चर्च दृष्टीस पडलें.

चर्चला लागूनच एक सेमिनरी (पादरी होण्याचें प्रशिक्षण विद्यालय) होती. विचार केला की आपण तेथेच जाऊ. आम्ही दरवाजा खटखटावला. जाडजूड अंगाच्या एका पादऱ्याने दरवाजा उघडला. घोटचापर्यंत घोळता अगदी काळयाशार रंगाचा झगा, गळचात क्रॉस, हातात बायबल, पुस्तकात बोट ठेवलेलें. लक्षात आलें की स्वारी बायबल वाचीत होती आणि आम्ही मधेच विघ्न आणलें. त्यांनी आम्हाला मोठ्या गंभीरतेनें निरखून पाहिलें— थकून गेलेले दोन प्रवासी, पाठीवर कपड्यांच्या बोजाचा थैला, भुरभुर उडणारे केस, हातात युद्ध-विरोधी पोस्टर !

"काय पाहिजे तुम्हाला ?" त्यांनी विचारलें. "आम्ही पदयात्री आहोत. रात्रीपुरतें मुक्काम करू इच्छितो.." आम्ही उत्तर दिलें. त्या बरोबरच आमच्या प्रवासाचा उद्देश व दिल्लीपासून आतापर्यंतची कथा संक्षेपाने सांगितली. आमच्या यात्रेसंबंधाने आम्ही ज्या जाहिराती सर्वांना वाटत होतो तें हँडबिलहि त्यांना दिलें. त्यांनी ध्यानपूर्वक आमचें हँडबिल वाचलें. मग संशयाच्या दृष्टीने आमच्याकडे नजर टाकीत ते म्हणाले: 'पण, आमच्यापाशी तुम्हाला उतरू देण्यासाठी जागा आहे कुठे ?"

मी म्हणालो : "तुमच्या घराच्या पडवीतच आम्ही उतरू. हंतरापांघरायला आमच्याजवळ कपडे आहेत."

"अंऽहं ! हें शक्य नाही." पादरी म्हणाले. "तर काय आम्ही चर्चमधे उतरू शकतो ?"

"अंऽहं. नाही. तेंहि होऊ शकणार नाही."

"तर मग काय आम्ही सेमिनरीत उतरू शकतो ?"

"नाही. माझ्याजवळ तुम्हा लोकांना उतरवण्यासाठी मुळीच जागा नाही." असें म्हणत त्यांनी घराचे दरवाजे बंद करून घेतले. आम्ही हिरमुसल्या चेहऱ्याने चिंताग्रस्त होऊन विचार करीत उभे होतो की आता कुठे जावें ! इतक्यात पादरी महाशयांनी पुन्हा दरवाजा उघडून म्हटलें: "तुम्ही इथून चालते का होत नाही ? माझ्याजवळ तुम्हाला उतरवून घेण्यासाठी मुळीच जागा नाही" पुन्हा त्यांनी दरवाजा बंद करून घेतला. आता तर तेथे उभे राहण्यातहि अर्थ नव्हता. भगवंताच्या प्रतिनिधीच्या

दारावरून आम्हाला असें हाकलून दिलें जाईल याची आम्ही मुळीच कल्पना केली नव्हती. पादरी साहेबांच्या हातात बायबल होतें ज्यात लिहिलें आहे की, 'वैऱ्याबरहि प्रेम करा.' पण किती विसंगत होतें त्यांचें आचरण ! आम्ही तेथून निघालो. निराश होऊन पुढे चालू लागलो. पुढे आम्हाला एक पोलिस स्टेशन लागलें. तेथील पोलिस अधिकाऱ्याने एका हॉस्पिटलमधे आमच्या उतरण्याची व्यवस्था केली.

आणखीन एके दिवशीं आम्हाला भेटला पोलिस ठाण्यातला एक शिपायी. त्याच्या पुस्तकात 'दंडा आणि जेल' लिहिलेलें आहे, प्रेम आणि अतिथि-सेवा नाही लिहिलेली. दुपारीं आम्ही एका पोलिस ठाण्याचा दरवाजा ठोठावला. अधिकारी ठाण्यात हजर नव्हते. ते समोरच्या 'बार' मधे बीयर पीत बसले होते. जर्मन लोकांना बीयर इतकी प्रिय असते जितकें केरळवासीयांना शहाळ्याचें पाणी. जर्मनीत क्वचितच एखादा मिळेल जो बीयर पीत नसेल. पण हे लोक नशेत पागल होऊन बेभान होत नाहीत. 'बार' मधूनच शिपायाने आम्हाला पाहिलें. दरवाजा ठोठावून, कोणी नाही असें पाहून, आम्ही आपण होऊनच निघून जाऊ असा विचार तो करू शकला असता. पण त्याने तसा विचार केला नाही. त्याने मित्राबरोबर करीत असलेल्या गप्पा सोडल्या आणि लगबगीनें आमच्या जवळ आला. "काय पाहिजे तुम्हाला ?" त्याच्या या प्रश्नाचें उत्तर आम्ही दिलें: "काही नको आहे आम्हाला. आम्हाला थोडा वेळ विश्रांति घ्यायची इच्छा आहे." आणि आमच्या पदयात्रेची गोष्ट थोडक्यात त्याला सांगितली. तो म्हणाला : "तर या की माझ्याबरोबर 'बार' मधे. माझे अतिथि व्हा."

आम्ही त्याच्याबरोबर बारमधे जाऊन बसलो. तो बियरची 'ऑर्डर' देत होता तोच आम्ही त्याला म्हटलें: "नाही. आम्ही बीयर पिणार नाही. आम्हाला फक्त पाणी द्या." पण तो कुठला ऐकायला ? त्याने केक मागवला. आईसक्रीम मागवला. आम्हाला तहान लागली होती म्हणून त्याने कोकाकोलाच्या दोनचार बाटल्या फोडून समोर ठेवल्या. आणि म्हणाला: "आता तुमच्या यात्रेच्या गोष्टी सांगा आम्हाला."

आम्ही विचार केला होता १०-१५ मिनिटें विश्रांति घेण्याचा, पण लागले २ तास. आम्ही जेव्हा निरोप घेऊ लागलो तेव्हा तो म्हणाला : "असें कसें होऊ शकेल ? माझ्या घरीं तुम्हाला यावें लागेल. माझ्या पत्नीला भेटावें लागेल आणि भोजनहि करावें लागेल." तावडतोब त्याने आपल्या पत्नीलाहि फोन केला. आम्ही 'नाही, नाही' म्हणत असताना तो आम्हाला आपल्या घरीं घेऊन गेलाच. भोजन करण्याचा आम्ही जेव्हा स्पष्ट नकार दिला तेव्हा त्याच्या पत्नीने आमच्यासाठी कॉफी बनविली व नास्ता दिला.

तसें तर जर्मन लोक टर्किश कॉफी जास्त पसंत करतात. ती कॉफी फार कडू असते. तसल्या कॉफीचा एक घोटहि मी पिऊ शकत नाही. हे लोक कॉफीत नाही दूध घालीत, नाही साखर घालीत ! चहातहि हे लोक दूध घालीत नाहीत. रशियन लोक चहात दुधाएवजीं लिंबू पिळतात. पण जर्मन लोक शुद्ध चहाचा स्वाद घेऊ इच्छितात. पण आमच्या यजमान शिपायीदादाने आमच्यासाठी खास दूध घातलेली कॉफी बनवून आम्हाला प्यायला दिली. नंतर तो म्हणाला : "खरें काम तर तुम्ही लोक करीत आहात– देशोदेशींचा प्रवास, युद्ध-विरोधी प्रचार. मी तर जीवनाच्या विचित्र फंदात गुरफटून गेलो आहे."

इतक्यात माझी नजर भिंतीवर टांगलेल्या तैलचित्रावर गेली. उत्तम प्रकारचीं तीं चित्रें होतीं. मला फार पसंत पडलीं. मी पिकासोचा उपासक आहे. नवीन व प्रतीकात्मक कला मला फार पसंत पडते. मी एकदम विचारलें: "चित्र कोणी काढलें ?" तीं चित्रें त्या शिपायानेच काढलेलीं आहेत हें ऐकून मी आश्चर्यात दंग झालो. तो भले शिपायी पेशात पडला असो पण हृदयाने तो एक कलाकार होता. मी त्याला मनापासून नमस्कार केला. तो एक खरा मानव होता. मला एकदम त्या पादरी बोवाचें स्मरण झालें. कोठे तो पादरी अन् कोठे हा शिपायी ! पादरी बोवा उभें राहू द्यायलाहि तयार नव्हते आणि हा शिपायीदादा आम्हाला पुढे जाऊ देत नव्हता ! शिपायी व त्याची पत्नी दोघेहि चांगलें इंग्रजीत बोलत होते. ते आम्हाला आपल्या घरींच राहण्याचा आग्रह करीत होते. म्हणत होते:

"आज रात्रीचा मुक्काम येथेच करा. उद्या सूर्योदयानंतर तुम्ही आपली पदयात्रा सुरु करा." पण आमचा पुढचा कार्यक्रम काही अशा प्रकारें ठरविला गेला होता की त्यात बदल करणें आम्हाला शक्य नव्हतें. म्हणून आम्हाला जावें लागलें. पण त्या शिपायाने नेहमीसाठी आमच्या हृदयात स्थान पटकावलें आहे. तो प्रथम मनुष्य होता नंतर शिपाई ! हीच होती त्याची विशेषता.

## श्री. अॅडनॉवर समोर प्रदर्शन

आम्ही ब्रांश्वीग, हॅनोवर, डॉर्टमंड, डयूसेल डॉर्फ, कोलोन इत्यादी शहरें घेत घेत १५ जुलै रोजीं पश्चिम जर्मनीची राजधानी बॉन येथे पोहोचलो. एक आठवडा अगोदरच आम्ही चॅन्सेलर श्री. अॅडनॉवरच्या मुलाखतीसाठी पत्र लिहिलें होतें आणि वेळ मागितला होता. जशी आम्ही पूर्व जर्मनीच्या परराष्ट्र मंत्र्याशी जर्मन समस्येवर चर्चा केली होती तशीच आम्ही पश्चिम जर्मनीच्या सरकारी नेत्याशीहि करू इच्छीत होतो. म्हणून चर्चा आम्ही सरळ 'मार्च' करीत चॅन्सेलरच्या ऑफीसमधे जाऊन पोहोचलो. पुष्कळ वेळ वाट पाहत राहिल्यानंतर उत्तर मिळालें : "उद्या या" दुसऱ्या दिवशी गेलो तो पुन्हा "उद्या या," सांगितले गेलें. तिसऱ्या दिवशीं उत्तर मिळालें : "काही 'राजनैतिक कारणामुळे' स्वतः चॅन्सेलर किंवा अन्य कोणी उच्च अधिकारी तुमची भेट घेऊ शकणार नाही." आम्ही ज्या ज्या देशात जात होतो त्या सर्व देशातील आम जनतेला व सरकारच्या सर्वोच्च व्यक्तींना अथवा सरकारने नियुक्त केलेल्या कोणा जबाबदार व्यक्तीला भेटून त्यांच्याजवळ आमची एकपक्षीय निःशस्त्रीकरणाची मागणी करीत होतो आणि त्यांचें उत्तर ऐकून घेत होतो. परंतु या देशाचें सरकार 'राजनैतिक कारणामुळे' आमची गोष्ट ऐकायलाहि तयार नव्हतें.

आम्ही सुमारें १०० मैलांची पायपिटी करीत सरकारी प्रतिनिधींना भेटण्यासाठी बॉनला गेलो होतो. पण कोणी सुद्धा आम्हाला भेटायला तयार होईना. म्हणून १९ जुलैला सकाळीं ९ ते सायंकाळीं ६ वाजेपर्यंत चॅन्सेलर अॅडनॉवरच्या ऑफीसपुढे आम्ही निदर्शन करण्याचा निश्चय केला. आम्ही बरोबर ९ वाजता तेथे पोहोचलो. सरकारला व पोलिसांना आम्ही या

बद्दलची सूचना पूर्वीच देऊन ठेवली होती. आम्ही तेथें पोहोचल्यावर थोड्या वेळानेच पोलीस तेथें येऊन पोहोचले. आम्ही जीं हँडबिलें वाटीत होतो तीं त्यांनी जबरदस्तीने खेचून घेतलीं. आमच्या हातातील 'प्लेकार्ड' सुद्धा त्यांनी जबरीने काढून नेला. काही शांति-साहित्यहि घेऊन गेले. नंतर त्यांनी आम्हाला 'निदर्शनें करू नका' म्हणून बजावलें. आम्ही जबाब दिला: "तुम्ही जें काही आमच्या जवळून जबरदस्तीने काढून न्याल तें खुशाल घेऊन जा. पण आम्ही आज ५ वाजेपर्यंत इथेच राहणार!" याप्रमाणे ५ वाजेपर्यंत आम्ही तेथे स्वस्थ बसून राहिलो. आम्ही विचार केला की जें सरकार रोज ५ कोटी जर्मन मार्क सैन्यावर खर्च करते त्याच्यासमोर आमची मागणी तर अवश्य पुढे ठेवू. जर ते आम्हाला भेटून आमची गोष्ट ऐकण्याची इच्छाच करीत नाही तर निदर्शनद्वारें त्यांना आमचें म्हणणें ऐकवू. या देशाच्या सरकारने आमच्या यात्रेविषयीं पूर्ण रीतीने उपेक्षा दाखविली. हँडबिलें वाटत असताना पहिल्या प्रथम याच देशाच्या पोलिसांनी आम्हाला रोकलें. एक वेळा आम्ही काही सैनिकांमधें जाऊन हँडबिलें वाटत होतो तर एका अधिकाऱ्याने आमच्या हँडबिलांचें बंडल आमच्या जवळून खेचून घेऊन तीं हँडबिलें फाडून टाकलीं. आम्ही जेव्हा हँडबिलें वाटत होतो तेव्हा आमच्या हातांतील 'प्लेकार्ड' पाहून कित्येक जण हँडबिल घ्यायला सुद्धा नकार देत होते.

●

# बेलजमच्या सुंदर अंकावर

२४ जुलै रोजीं जर्मनीची ६० दिवसांची यात्रा पुरी करून आम्ही बेलजममध्ये प्रवेश केला. ९० लाखांची जनसंख्या असलेला हा छोटाशा देश आहे. सारा युरोप अशा छोटच्या-छोटच्या देशांचें एक महाद्वीप आहे. हिंदुस्थानासारख्या मोठया देशाच्या रहिवाशांना युरोपचे देश म्हणजे जिल्हे किंवा प्रांतासारखे वाटतील. युरोपला एक देश बनवून नवें संघटन उभे करण्यासाठी काही लोकांचें आंदोलन सुरु झालें आहे. व्यापार वगैरेच्या दृष्टीने काही युरोपीयन देशांनी भागीदारीचा बाजार– कॉमन मार्केट– उभा केला आहे. तरीहि साऱ्या युरोपाचें एक संघटन अजून स्वप्नच आहे.

बेलजममधेहि भाषेचा झगडा एक तीव्र विवादाचा विषय झाला होता. फ्लेमिश भाषा बोलणारांची ही तक्रार आम्हाला वारंवार ऐकू येत असे की फ्रेंच भाषा बोलणारे लोक त्यांच्यावर अधिकार स्थापू पाहतात. म्हणून राज्यकारभारात दोन भाषांना समान स्थान मिळालें पाहिजे. फ्रेंच भाषी अल्पमतात आहेत, आणि फ्लेमिश भाषी बहुमतात आहेत, पण प्रत्येक फ्लेमिश भाषी फ्रेंच शिकतो. इकडे फ्रेंच भाषी फ्लेमिश भाषा शिकत तर नाहीच उलट ते फ्लेमिश भाषी लोकांना हलके समजतात.

आम्ही वेलजमची राजधानी ब्रुसेल्सला पोहोचलो. हें एक सुंदर व महागडें शहर आहे. आम्ही वाय्. एम्. सी. ए. च्या भवनात उतरलो होतो. ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे आणि ती ख्रिस्ती धर्म मानणाऱ्या तरुणांकडून चालविली जाते. जगभर जागजागीं या संस्थेने आपलीं भवनें उभीं केलीं आहेत, व प्रवासी लोकांची अल्प खर्चात त्या ठिकाणीं राहण्याची सोय होऊ शकते. वैचारिक सभा, संमेलनें, मनोरंजनाचें कार्यक्रम इत्यादींचे आयोजन या संस्थेतर्फे होत असतें. ब्रुसेल्समधील समाजवादी पार्टीचे अध्यक्ष श्री. लेयोकोलार्ड यांना आम्ही भेटलो. यांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयात काही वर्षांपूर्वी गोव्याच्या बावतीत भारतातर्फे वकीली केली होती. पण आम्हाला हें समजलें तेव्हा आश्चर्य वाटलें की यांना हेंहि माहित नव्हते की गोवा सैनिक कारवाईने भारताकडून स्वतंत्र केला गेला आहे. जो प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात विवाद्य विषय झाला त्याबावतीत बेलजमच्या दोनपैकी एका शासक पार्टीचे अध्यक्ष व राज्यमंत्री श्री. कोलार्ड यांना मुळीच पत्ता नव्हता.

ब्रुसेल्समधे मॉरिस कोसिन नांवाच्या गृहस्थाने आम्हाला पुष्कळ मदत केली. हे गृहस्थ वेलजमच्या तटस्थ शांति-आंदोलनाचें प्राण आहेत आणि विश्वनागरिक संस्थेचे प्रमुख संचालक आहेत. श्री. कोसिनचे साथी व अणु निःशस्त्रीकरण आंदोलनाचे (सी. एन्. डी.) अध्यक्ष श्री. रेन. डी, मोट यांनीहि आमचें उत्तम आतिथ्य केलें. श्री. डी. मोट दिसायला वृद्ध आहेत पण आहेत फार पक्के आणि कार्यरत. पठण-पाठण खूप करतात. लहान-मोठीं सर्व कामें स्वतःच करतात. त्यांचें आपलें स्वतःचें घर आहे. छोटासा बगीचाहि आहे. खेळतात. सूर्य-स्नान घेतात. आश्रम-जीवनच जगतात म्हणाना ! पियानो वाजवायचा त्यांना फार शोक आहे. काम करून थकवा आला की लगेच पियानोवर बोटें फिरवू लागतात. घरात एकटेच राहतात. पत्नीला पुष्कळ दिवसांपूर्वी सोडचिठ्ठी दिलेली असली तरी आजहि तिच्याशी त्यांचे चांगले संबंध आहेत. महिन्यातून एकदा तरी ते तिच्या घरीं जाऊन भोजनादि करून येतात.

घटस्फोट घेतल्यानंतरहि मित्राप्रमाणे चांगली वागणूक ठेवणाऱ्या पती-पत्नींचीं कित्येक उदाहरणें मला युरोपमधे व अमेरिकेत पहायला

मिळालीं. दांपत्य-जीवन सुखी होत नाही असें वाटलें तर लोक समजून-उमजून अलग होऊन जातात. घटस्फोटाचा अर्थ असा नाही की दोघे आपसात झगडतच राहतात.

न्यूयार्कमधे असताना आम्ही एकदा अशा महिलेकडे उतरलो होतो जिने आपल्या पतीशीं घटस्फोट घेतला होता. त्यानंतर सुद्धा ती आपल्या भूतपूर्व पतीबरोबर चांगल्या मित्रासारखा संबंध ठेवीत होती. दोघांचें परस्परांना मिळणें-भेटणें, खाणें-पिणें, फिरायला जाणें वगैरे त्यांचें चालू राहिलें होतें. मला वाटतें, युरोप-अमेरिकेत मोठ्या प्रमाणात घटस्फोट होतात हें खरें आहे, परंतु भारतापेक्षा तेथील लोकांचें वैवाहिक जीवन काही अधिक सुखी आहे. कारण त्यांच्यावर जबरदस्तीचें काही बंधन नाही. आमच्याकडे ज्या तऱ्हेने धुसफुसत दांपत्य-जीवनाची गाडी कित्येक वेळा खेचली जाते आणि नाइलाजाने प्रेम निभावलें जातें तसें तेथे नाही. विवाह केवळ बरोबर राहण्याचा करार नाही तर प्रेम व हृदयाचा संबंध आहे– याचा प्रत्यय आम्हाला कित्येक वेळा आला. नाइलाजाने प्रेमाची गाडी खेचावी लागणें हें प्रेम नव्हे, बंधनच आहे.

आम्ही ज्यावेळीं ब्रुसेल्समधे होतो त्यावेळीं कांगोचे तत्कालीन प्रधान मंत्रीहि तेथे होते. बेलजमने कांगोत जें साम्राज्यवादी नाटक केलें तें बेलजमच्या इतिहासात एक कलंकच आहे. आफ्रिकेत युरोपच्या देशांनी असें खेळ रचून आपल्या साम्राज्यवादी मनोवृत्तीचा जो परिचय दिला त्यामुळे आशिया आफ्रिकेच्या लोकांच्या मनात युरोपियन लोकांविषयीं एक प्रकारचा द्वेष आणि तिरस्कार निर्माण झाला आहे. ही स्थिति आजहि कायम आहे. आंगोलासारखा आफ्रिकी देश आजहि साम्राज्यवादी पंजाच्या नखांनी रक्तबंबाळ होत आहे. स्वत: बेलजमच्या अनेक लोकांनी या परिस्थितीबद्दल चिंता व नापसंती दर्शविली आणि आपल्या देशाच्या कांगोविषयीं धारणाबद्दल विरोध प्रगट केला.

बेलजमचा अखेरचा पडाव मॉन्समधे होता. तेथील एका सेमिनारमधे युद्ध व शांति या प्रश्नावर बोलत असताना आम्ही भारत-चीनच्या संघर्षावर चर्चा करीत होतो. भारताने सैनिकी दृष्टीने माघार घेण्याच्या

कृत्यावर एका शांतिवाद्याने टीका करताना म्हटलें: "अल्प भांडवल मालकालाहि खाऊन टाकतें. ज्याच्यापाशी थोडेसे पैसे असतात त्याला गरीब म्हणतात. पण एकहि पैसा ज्याच्याजवळ नसतो, ज्याने स्वेच्छेने द्रव्य-त्याग केलेला असतो अशी व्यक्ति मोठ्यात मोठ्या धनाढ्य माणसा-इतका मानसन्मान प्राप्त करू शकते. त्याप्रमाणे आजच्या अणु-युगात सैन्याचें विसर्जन करणारें राष्ट्र मोठ्यात मोठ्या सैन्य-वादी राष्ट्राइतका सुद्धा आदर मिळवू शकेल."




युरोपच्या शांतिवाद्यांसमोर शांतीचा प्रश्न ज्या तऱ्हेने उभा आहे त्या प्रकाराने भारतासमोर शांतीचा प्रश्न उभा नव्हता. कारण भारत कोणत्याहि सैनिकी करारात सामिल नव्हता. भारताच्या भूमीवर कोणतें मोठें युद्धहि लढलें गेलें नाही. अण्वस्त्र व राकेटहि भारताजवळ नाही. पण आता जेव्हापासून चीनशी भारताचा संघर्ष सुरू झाला आहे आणि चीन-जवळ अणुबॉंब तयार झाला आहे तेव्हापासून भारतीय शांतिवाद्यांसमोरहि तेच प्रश्न उभे राहिले आहेत जे युरोपीय शांतिवाद्यांसमोर आहेत. गांधींचा

देश भारत हे प्रश्न कसे सोडवतो याकडे युरोपचें लक्ष उत्सुकतेने लागलें आहे.

एकतरफी निःशस्त्रीकरण सैद्धांतिक दृष्टचा मोठा आदर्श म्हणता येईल. रोज रशिया व अमेरिकेला आवाहन करणारे ठराव पास करून त्यांना एकतर्फी निःशस्त्रीकरणाच्या दिशेने पुढे पाऊल टाकण्यासाठी निवेदन केलें जात आहे. पण ठराव करणाऱ्या अनेक शांतिवाद्यांना या गोष्टीची आशा नाही की रशिया किंवा अमेरिका त्यांच्या ठरावाकडे गंभीरतेने दृष्टिक्षेप करील. अशा परिस्थितीत एकतर्फी निःशस्त्रीकरणाच्या प्रश्नावर लोकांचा विश्वास बसत नाही. परंतु भारत आजहि एखादें असाधारण पाऊल पुढे टाकू शकेल असें स्वप्न जगभरचे शांतिवादी लोक पाहत असतात. परंतु आजच्या परिस्थितीत तर तें स्वप्नहि भंग पावत आहे. भारत-चीनच्या सीमा-वादानंतर परदेशी टीकाकारांच्या दृष्टीने भारतासाठी एक परीक्षेचा प्रसंग आला आहे. या परदेशी टीकाकारांचे तीन गट पडतात. अमेरिकन-गट, सोव्हियट-गट, आणि तटस्थ लोकांचा गट – ज्यात शांतिवादी टीकाकारहि अंतर्भूत आहेत. आम्हाला आमच्या परदेशांतील प्रवासात आढळून आलें की तिन्ही क्षेत्रांच्या वृत्तपत्रांत आणि मासिकें वगैरेत भारताची गृहनीति, परराष्ट्र-नीति व संरक्षणनीति यांच्या बाबतीत निरनिराळ्या दृष्टीकोणातून रोज विचार प्रगट केले जातात. अमेरिकन गटाला या बाबतीत चिंता आहे की भारत कुठे कम्युनिस्ट गटात तर जाणार नाही ना? सोव्हियट गटाला मनापासून वाटतें की भारत भांडवलशाही गटात जाऊन तर पडणार नाही ? तटस्थ आणि शांतिवादी टीकाकारांची दृष्टि या दोघांहून भिन्न आहे. ते मोठ्या उत्सुकतेने पाहून राहिले आहेत की अहिंसेचा जो पाया भारतात आहे आणि नेहरूंनी कालपर्यंत तटस्थता, शांति आणि अहिंसेचे प्रवचनकार बनून इतर देशांना जो सल्ला दिला आहे आणि उपदेश केला आहे त्याबाबतीत आज भारताचें सरकार, तेथील जनता आणि शांतिवादी हें तत्त्व कशा रीतीने व्यवहारात उतरविणार आहेत. जर भारताचें अहिंसा-वादी व शांतिवादी आंदोलन असफल झालें तर या शांतिवादी समालोचकां-

च्या मान्यतेप्रमाणे जागतिक आंतरराष्ट्रीय शांति आंदोलन कोलमडून पडेल.

भारताचा गरीबीचा राक्षस, सामाजिक आणि आर्थिक विषमता, पाकिस्तानशी बिघडलेले संबंध आणि चीनशी संघर्ष या सर्वांशी टक्कर देण्यासाठी भारताजवळ काय तयारी आहे? एका अमेरिकन दैनिक पत्राने प्रश्न विचारला होता की काय भारत चीनशी सैनिक शक्तीने मुकाबला करू शकतो? सुमारें २६ लाख सैन्याची स्थायी फौज असून शिवाय दोन कोटी साठ लाखाच्या जवळ पास सशस्त्र पोलिस दल चीनजवळ आहे. म्हणजे जगांतील कोणत्याहि देशापेक्षा चीनपाशी फार मोठी स्थल सेना आहे. त्या तुलनेत अमेरिकेजवळ सुद्धा १० लाखापेक्षा कमीच स्थायी फौज-शक्ति आहे. ३ हजार विमानें, त्यांत अधिकांश जेट विमानें आहेत, व १ लाख सैनिकांची वायुसेना चीनने तयार केली आहे. याप्रमाणे चीन एक परिपूर्ण सैन्यवादी देशाच्या रूपाने उभा राहिला आहे. त्याने अण्वस्त्रें निर्माण करायला सुरुवात केली आहे आणि तो येत्या १५ वर्षांत जगाची राख-रांगोळी करू शकण्या इतकीं अण्वस्त्रें निर्माणहि करील.

एक दुसरे अमेरिकन पत्रकार लॉरेन्स बारेट्ट यांच्या मतें ७० कोटी लोकसंख्येचा देश, ज्याची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे ज्याच्या चारी बाजूचे शेजारी दुर्बल देश आहे, जो जगातील अधिकांश राष्ट्रांकडून व संयुक्त राष्ट्र संघाकडून उपेक्षिला जाऊन एकाकी पडलेला आहे आणि जेथील पुढारी आपल्याच रंगात मस्त आहेत, जर जगाला एखाद्या अणु-युद्धाच्या धोक्यात टाकील तर ती गोष्ट असंभवनीय नाही. कोरियाचें युद्ध असो किंवा दक्षिण व्हियेटनामचें युद्ध असो, भारताशी संघर्ष असो किंवा आग्नेय आशियातील एखादा संघर्ष असो, मग तो परराष्ट्र प्रकरणामुळे असो किंवा घरगुती बाबतीत असो, चिनी सरकारने आपल्या देशातील मानव-जीवनाविषयीं नेहमी बेफिकीरी दाखविली आहे. आणि कितीहि चिनी मेले याबद्दल उपेक्षा केली आहे. म्हणून काय भारत सुद्धा चीनशी त्याच स्पर्धेत उतरू पाहत आहे? ती काय कल्याणकारी स्पर्धा आहे? त्या स्पर्धेचा कधी तरी अंत येणार आहे काय?

राष्ट्रपति केनेडी, ज्यांनी लाल चिनी सरकारला औपचारिक रीतीनेहि मान्यता दिली नाही. ते सुद्धा लाल चीनच्या हेतुविषयीं साशंक होते. ते म्हणाले होते की १९७० पर्यंत लाल चीन अमेरिकेला दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वात मोठी डोके-दुखी ठरेल.

पॅरिसमधील भारताच्या परराष्ट्र कचेरीतील एका कार्यकर्त्याने विचारलें की काय चीनच्या रूपाने नवा अंगुलीमाल प्रगट होत आहे, जो रशिया, अमेरिका व भारताच्या मैत्रीला लाथाडून पुढे जात आहे? मी हसत हसत म्हटलें की त्या अंगुलीमालाला सामान्य मनुष्यरूपात बदलण्यासाठी बुद्ध बनायला कोण तयार आहे? तेव्हा तो कार्यकर्ता म्हणाला: "बुद्ध निर्भय व निःशस्त्र होते. पण तो उपाय राजनीतीत व्यावहारिक होत नाही. आम्हाला अंगुलीमालाचें दमन शस्त्रांनीच करावें लागेल." तेव्हा मला आठवण झाली एका फ्रेंच लेखकाच्या गोष्टीची. त्याने म्हटलें होतें की नेहरूंच्या आदर्शाची चमक कमी कमी होत आहे. तटस्थता, शांति व अहिंसा यांचे सिद्धांत अमलात आणून कोणत्याहि अत्यंत जटिल समस्येची वाटाघाटींनी व शांतिपूर्ण तऱ्हेने मिटविण्याचा नेहरूजींचा सिद्धांत अमलात आणण्यासाठी त्यांच्या तंत्राची धार बोथट होऊ लागली आहे. भारताचे शासनकर्तेहि सामान्य राजनैतिक विचाराचे बनत आहेत. ते तसलींच पावलें टाकतील, जी सामान्य राजनेता टाकू शकेल. ही टीका-टिप्पणी एकाहून अधिक वेळा मला ऐकायला मिळाली.

याप्रमाणे आमच्या समोर भारत व चीनचा प्रश्न जोरदारपणे उपस्थित होत होता, कारण आम्ही स्वतः शांति व निःशस्त्रीकरणाची चर्चा करीत होतो आणि अशा लोकांशी आमचा संपर्क जास्त येत होता जे या प्रश्नावर खोल दृष्टीने विचार व चिंतन करीत असत. बेलजम-सारख्या लहानशा देशातहि गांधींच्या तत्त्वज्ञानाला समजणाऱ्या लोकांची मोठी संख्या आम्हाला आढळली आणि या प्रश्नावर आमची त्यांच्याशी चर्चा झाली.


४ ऑगष्टचा दिवस बेलजमच्या या छोटयाशा यात्रेचा शेवटचा दिवस होता. २४ जुलै ते ४ ऑगष्टपर्यंतच्या काळात बेलजमच्या या मनोहर भूमीत विहार करीत असताना आम्ही सतत एक विशिष्ट आनंद अनुभवला. या यात्रेचा शेवटचा दिवस आम्ही श्री. व्हाइनट दोर यांच्याकडे काढला. कलेच्या या महान भक्ताने आपलें घर जणू कला-संग्रहालय बनवून ठेवलें आहे. मातींच्या भांड्यावर हाताने केलेल्या कारागिरीचें इतकें सुंदर कला-कुसरीचें काम पाहून असें वाटलें की यंत्रें केव्हाहि मानवाच्या हस्तकलेची बरोबरी करू शकणार नाहीत.

●

# संगीत, सौंदर्य व शृंगार भूमि : फ्रान्स

५ ऑगष्ट १९६३. आम्ही कला व संगीत यांची आकर्षक भूमि – फ्रान्समधे प्रवेश केला. आमचा पहिला पडाव मोबोज शहरात होता. लोकांत आकर्षण व उत्सुकता होती. नगरपालिकेचे लोक, चर्चचे लोक, आणि समाजवादी लोक आमच्या आतिथ्याची व्यवस्था करीत होते. पहिल्याच दिवशीं स्थानिक दैनिक पत्रांनीं आमच्या यात्रेचें वर्णन शहराची एक प्रमुख घटना म्हणून प्रकाशित केलें. फ्रान्समधे भाषेच्या अडचणीने आम्हाला कठिण परिस्थितींत टाकलें. कधी कधी तर संपूर्ण दिवसभर एकहि मनुष्य असा मिळत नव्हता ज्याच्याशीं आम्ही बोलूं शकूं! एखाद्या गांवीं पोहोंचल्यावर आम्ही नगराध्यक्षाच्या कचेरीत जात होतो तर नगराध्यक्ष ताबडतोब आम्हाला ओळखत असत. वृत्तपत्रांच्यामुळे त्यांच्या-जवळ आमचे फोटो व समाचार-माहिती पोहोंचलेली असे. ते आम्हाला आरामशीर हॉटेलांत उतरवीत असत. राहण्याचा व खाण्याचा खर्चहि नगरपालिकेतर्फे होई. परंतु एक शब्द सुद्धा बोलल्याशिवाय आम्ही दुसऱ्या दिवशीं पुढे निघून जात असूं. कधी कधी आम्ही रोटरी क्लबांच्या सदस्याच्या घरीं उतरत होतो तेव्हा त्यांच्याबरोबर इंग्रजीत गोष्टी करणें संभवत होतें.

नैसर्गिक शोभेच्या दृष्टीने फ्रान्सची भूमि अनुपम आहे. फ्रान्सचें ग्रामीण जीवन अजूनहि पूर्णपणे नष्ट झालें नाही. म्हणून खेड्यांतील वातावरण फार स्वच्छ आणि सुंदर आहे. प्रतिष्ठित लोक गांवांत राहणें व शेती करणें पसंत करतात. खाद्य-सामग्री आणि कृपि-उत्पादनाची निर्यात करणाऱ्या देशांत फ्रान्सचें स्थान महत्त्वाचें आहे. फ्रान्सच्या लोकांना द्राक्षाचें मद्य पिण्याची मोठी आवड आहे. सकाळचा नास्ता असो कीं दुपारचें भोजन असो, रात्रीं असो कीं दिवसा असो, मद्याची बाटली भोजनाच्या टेबलावर अवश्य असणार च. रशियांत मदिरा-पानासाठी जसा खूप आग्रह आम्हा-ला केला जात असे तसा आग्रह फ्रेंच लोक आम्हाला करीत नसत. मद्य




पिण्यासाठी तें आमच्यावर जबरदस्ती करीत नव्हते. आम्हाला असेंहि दिसून आलें कीं फ्रेंच लोकांचें हृदय लवकर खुलत नाही. पण एकदां मिसळल्यावर तर ते आपली लंगोटीहि सोडून द्यायला तयार होतील. फ्रेंच लोक फारच स्वादिष्ट भोजन तयार करतात. दोन-दोन हात लांब फ्रेंच रोटी खायला मोठी स्वादिष्ट लागते. त्यांच्या भोजनांत पनीर तर असणारच. शेंकडों प्रकारचें पनीर आम्ही पाहिलें. सकाळचा नास्ता अगदी हलका असतो — कॉफीचा एक मोठा कप आणि क्वाँ साँ नावाची रोटी. आम्ही नास्त्यासाठी टेबलावर बसतांच म्हणत असूं : "क्वाँ साँ सिर उधले." संध्याकाळचें भोजन तर एक मेजवानीच असे.

## पॅरिस मधे

आम्ही पॅरिसला पोहोंचलो. पॅरिस हें जगांतील सुंदरतम-नगरांपैकी एक नगर आहे. फॅशन आणि विलास यांच्या सामानाची येथें लयलूट आहे. त्यांचा वापरहि भरभक्कम. रात्रीच्या विद्युत प्रकाशांत पॅरिसची सुंदरता आणखीनच उठून दिसतें. मैल-मैल लांबीच्या व अत्यंत रुंद सडका या महानगरीची एक विशेषता आहे. प्रत्येक दहा पावलांवर सुंदर आधुनिक फराळाचें दुकान. जागजागीं उंच-उंच गगनचुंबी महाल. सुंदर व कलापूर्ण द्वार. पॅरिसच्या मधोमध सेन नदी वाहत आहे जी शहराच्या सौंदर्यात अप्रतिम भर टाकते. आपल्या उत्कृष्ट प्रकारच्या चित्र-संग्रहालयाबद्दल तर पॅरिस प्रसिद्धच आहे. पॅरिस शहराचें प्रतीक – सुंदरतम स्थान आहे 'एफेल मनोरा'. मेघांशीं गप्पा मारणारा हा मनोरा फ्रान्सच्या औद्योगिक क्रांतीच्या परिचय करून देणारा आहे. तो सर्वच्या सर्व पोलादाचा बनविलेला आहे. पॅरिसला कोणी युरोपची राणी म्हटलें आहे आणि कोणी तिचें नांव इंद्रपुरी ठेवलें आहे. जगप्रसिद्ध साहित्यिक व्हिक्टर ह्यूगो यांनीं पॅरिसच्या नदीच्या कांठीं बसून मानवतेचा जो राग आळविला आणि रूसो व वॉल्टेअर यांनीं ज्या भूमीवर स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या सिद्धांताची रचना केली त्या सिद्धांतानीं आमच्या हृदयांतहि चैतन्य निर्माण केलें.

मुक्त प्रणयाचें पॅरिस जणूं केंद्रच आहे. बगीच्यांत, सडकांवर, बेंचावर, नदीच्या कांठीं जिथें पहाल तिथें तरुण युग्में एकदुसऱ्याच्या गळ्यांत गळा घालून चिकटलेले, चुंबन घेत दृष्टीस पडतील. रात्रीं क्लबांमधून चालणाऱ्या अंग प्रदर्शनाला तर कलेच्या अंतर्गत मान प्राप्त झाला आहे. यांत काही संशय नाही की पॅरिस त्या लोकांचें नगर आहे ज्यांचे खिसे तुडुंब भरलेले असतात.

स्वच्छता, सुंदरता आणि सुव्यवस्था याबद्दल ही नगरी फार प्रसिद्ध आहे. सडकांचीं नावें घरांचे नंबर इत्यादि मोठ्या कुशलतेने लिहिले आहेत. लोकांना भेटण्याबिटण्यासाठी आम्ही नगरच्या भिन्न-भिन्न भागांत एकटेच पायीं जात होतो, पण आम्हाला कधी काही अडचण पडली

नाही. आम्ही हातात नकाशा ठेवत होतो आणि त्याप्रमाणे सहज रीतीने जरूर त्या ठिकाणीं पोहोंचून जात होतो. प्रत्येक मेट्रोच्या (भूगर्भ-रेल्वे) स्टेशनावरहि मोठ-मोठे नकाशे टांगून ठेवलेले असत, एवढ्यासाठी की या वेळीं आपण कोठे आहोत हें समजून यावें. अशा सुंदर शहरातहि चोर बाजारात जेव्हा आम्ही पोहोंचलो तेव्हा तर आमचा श्वास रुंधण्याची वेळ आली. लोक आम्हाला सडकेवरून मोठमोठ्याने ओरडून बोलावत होते व सामान खरेदीसाठी आग्रह करीत होते. पॅरिसचा हा भाग त्या भागाहून अगदी निराळा होता जेथे श्रीमंत लोक भोग-विलासी जीवन जगत असतात. अशा विभागांतील लोक आपल्या जीवनांत थकले भागलेले आणि दु:खी कष्टीसे दिसत होते. 'बार' मधे, नृत्य-गृहांत किंवा थिएटरांत मनोरंजन शोधत ते फिरत असतात. जाहिरातबाजीचा दबाव, विजेची चमक आणि रात्री-क्लबांचें आकर्षण सुद्धा त्यांना शांति व समाधान देण्यास असफल होत होतें. पॅरिसच्या ज्या सौंदर्यावर लोक मोहित होतात ते सौंदर्य केवळ वरवरचें आहे. आंतरिक जीवनांत तेथेहि एक प्रकारचा भकासपणा असतो. पॅरिसचे लोक शनिवारीं रविवारीं कुठे नदी किनारीं, पहाडाच्या अंकावर, जंगलाच्या छायेंत किंवा खेड्यांतील शांततेंत आपला काळ घालविण्यासाठी पळून जात असतात.

साऱ्या युरोपभर वरून दिसणारी ही समृद्धि आशिया व आफ्रिका यांच्या शोषणावर तर टिकली आहे. फ्रान्सने आग्नेय आशिया व आफ्रिका येथील वसाहतीवर राज्य करून जो लाभ कमावला आणि अल्जीरिआ-सारख्या देशाशी जो व्यवहार केला त्या इतिहासाबरोबर इथल्या समृद्धीला जोडून पाहिलें म्हणजे याची सहज कल्पना येईल की या समृद्धीचें कौतुक करण्याचा अर्थ आहे शोषणावर आधारित अर्थ-रचनेचा पाठ पुरावा करणें. म्हणून या स्वर्गपुरीपुढे नेहमी 'परंतु' चें प्रश्न-चिह्न उभें आहे. हा 'परंतु' केवळ पॅरिसवरच नाहीं, लेनिनग्राड व लंडन, बर्लिन व वॉशिंगटन, टोकियो व दिल्ली सर्वांवर लागू आहे. एकेका शहराच्या खालीं हजार-हजार गावांची करुण कहाणी दबली आहे. म्हणून मला वाटत असतें की शहरापेक्षा खेडें जास्त सुंदर असतें. कृत्रिमतेपेक्षा निसर्ग जास्त लोभस असतो. महालापेक्षा झोंपड्या अधिक सुंदर असतात.

'युद्ध-विरोधी-सभा' द्वारें पॅरिसजवळ शारवोनियरमधें एक शांति शिबीर आयोजिलें होतें. त्यांत भाग घेण्यासाठी आम्हालाहि निमंत्रण होतें. त्या शिबिराला जाणे आमच्या पदयात्रेचें अंग नव्हतें. म्हणून 'हिच हाईक' पद्धतीनें जाण्याचें आम्हीं ठरविलें. युरोपांत 'हिच हाईक' करीत जाण्याचा प्रकार फार लोकप्रिय आहे. आम्हीहि पॅरिसबाहेर शारवोनियरकडे जाणाऱ्या सडकेवर उभे राहिलों. त्या सडकेवरून जाणाऱ्या कोणत्याहि कारला थांबण्यासाठी आम्ही हात पुढे करून थांबण्याचा इशारा करीत होतो. तीन तासपर्यंत कोणीहि आपली कार थांबविली नाही. जेव्हा आम्ही पायी चालत होतो तेव्हा स्वतः अनेक कारवाले आम्हाला कारमधे बसण्याचा आग्रह करीत होते, पण आम्ही जेव्हा कारमधून जाण्याची इच्छा करूं लागलो तेव्हा हे असे हाल! अखेर एका कारवाल्याने आम्हाला 'लिफ्ट' दिला आणि आम्ही शिबिराच्या ठिकाणीं जाऊन पोहोंचलो.

ज्या युद्ध-विरोधी-सभेने (डब्ल्यू. आर्. आय.) या शांति-शिबिराची योजना केली होती त्या सभेची स्थापना १९२१ मधे हॉलंडचे प्रसिद्ध शांतिवादी रुनहॅम ब्राउन यांनीं केली होती. डिसेंबर १९६० मधे या सभेचें त्रैवार्षिक अधिवेशन मदुराईमधें झालें होतें. हिचें मुख्य ऑफिस लंडनमधे आहे. या युद्ध-विरोधी-सभेचा सदस्य अशी घोषणा करतो : "युद्ध मानवतेच्या विरुद्ध एक अपराध आहे. म्हणून मी प्रतिज्ञा करतो की कोणत्याहि प्रकारच्या युद्धाला आणि युद्धाच्या तयारीला मी मदत करणार नाही, तसेंच युद्धाच्या सर्व कारणांना नाहीसें करण्याचा प्रयत्न करीन."

शारबोनियरच्या या शिबिरात आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथील १७ देशांचें ६५ शांतिवादी आले होते. नदीच्या काठीं सुंदर नैसर्गिक उपवनात बांधलेल्या एका प्राचीन राजवाड्यात आम्ही लोकांनी एक आठवडाभर सहजीवन व सहचिंतन यांचा अमोल आनंद उपभोगिला. अहिंसात्मक उपायांनी समाज-परिवर्तनाच्या संभवावर प्रामुख्याने विचार झाला. या शिबिरात भाग घेतल्यानंतर आम्ही पुन्हा पॅरिसला परत आलो.

## जेव्हा पिस्तूल गळून पडलें !

पॅरिस आम्हाला अविस्मरणीय आहे. यासाठी नाही की तेथे जग-प्रसिद्ध 'एफेल टॉवर' आहे. यासाठी नाही की तेथें कलेचा उत्तम नमूना मानोलिसाचें चित्र आहे. यासाठी सुद्धा नाही की तेथील रात्रीचे क्लब व मदिरालयें यांची शोभा अद्भुत आहे ! यासाठीहि नाही की दिल्लीहून १६ महिन्यांत ६ हजार मैलांची पदयात्रा करून आम्ही तेथे पोहोंचलो. पॅरिस यासाठी अविस्मरणीय आहे की तेथे प्रेमासमोर पिस्तूल गळून पडलें ! शांतीसमोर क्रोध निमाला ! भीति व अविश्वास यांचें परिवर्तन आतिथ्यात झालें !

ही घटना घडली १८ ऑगष्ट १९६३ रोजी. पॅरिसचा गर्दीचा राज-मार्ग—अॅव्हेन्यू डी क्वीन, मकान नंबर ३५ येथे. मी साथी श्री. प्रभाकर यांच्यासह गांधीवादी श्रीमती पेटिट यांना भेटण्यासाठी उक्त वाड्यावर जाऊन पोहोचलो. आम्ही जेव्हा वाड्यासमोर पोहोचलो तेव्हा दरवाजातून एक तरुणी बाहेर येत होती. त्या युवतीने आम्हाला पाहतांक्षणींच ती घाबरली, भ्याली आणि एकदम माघारी गेली. वाड्यात जाऊन तिनें वाड्याचा दरवाजा बंद करून घेतला. आम्ही काही समजू शकलो नाही की काय भानगड आहे ! आम्ही जवळचा पत्ता चांगल्या रीतीने पाहून घेतला. वाडा नंबर ३५. पत्ता बरोबर होता. पॅरिसमधे कोणत्याहि वाड्याचा प्रमुख दरवाजा उघडण्यासाठी 'स्वयंचलित-बटन' (आटोमेटिक बटन) असतें. आम्ही बटन दाबून दरवाजा उघडला. आम्ही जसे आत गेलो तसे त्या तरुणीची पांचावर धारण बसली. तिची पक्की खात्री झाली की बहुधा आम्ही तिच्या मागे छेडण्यासाठी लागलो आहोत. घाबऱ्या घाबऱ्या ती घाई घाईने जिना चढू लागली.

आम्ही दरबाजाजवळच उभे होतो. दोन मिनिटांनी एक मध्यम वयाचा धडधाकट पुरुष घाईघाईने जिना उतरून खाली आला. त्याच्या हातात भरलेलें पिस्तूल, आंगठा पिस्तुलाच्या घोड्यावर ठेवलेला. चेहरा लाल झालेला. कपाळावर घाम. क्रोध कमी पण भयभीत जास्त. ती तरुणी वरून वाकून-वाकून पहात होती, पण खाली येण्याचें धाडस करीत नव्हती.

पुरुष व तरुणी दोघे असा विचार करीत होती की आम्ही पिस्तूल पाहून भिऊन जावू आणि तावडतोब पळून जाऊ. पण तसें घडलें नाही. त्याने पिस्तूल माझ्या अगदी छातीशी भिडविलें. मी या साऱ्या घटनेने आश्चर्य-चकित झालो होतो आणि हंसतहि होतो. अखेर भानगड आहे तरी काय? आम्ही फ्रेंच भाषा जाणत नव्हतो. मग गोष्ट कशी करणार? आम्ही इंग्रजीत त्याला वारंवार सांगितलें की आम्ही इथे आमच्या मित्राला भेटण्यासाठी आलो आहोत, आणि त्याचा पत्ता शोधत आहोत. पण त्याला इंग्रजी समजत नव्हतें. फ्रेंच भाषेत तो आमच्यावर मोठ्याने ओरडला, आम्हाला दाट दिला. तो काय म्हणत होता तें आम्हाला समजू शकलें नाही. आम्ही पळूनहि गेलो नाही. तेव्हा त्याने पोलीसाला कित्येक वेळा हांका मारल्या. तरीहि आम्ही आपले उभेच. त्याने दुसऱ्या हाताने आम्हाला धक्के दिले. आमची 'शांति' तो सहन करू शकला नाही. त्याने आमची गचांडी पकडून आम्हाला घराबाहेर अर्धचंद्र दिला. तरी सुद्धा आम्ही त्याच्या भावडेपणाबद्दल हंसत होतो आणि प्रेमपूर्ण नजरेने त्याच्याकडे पाहत होतो. आम्ही घराबाहेरच उभे राहिलो

आम्हाला पुष्कळ वेळ होऊन गेला होता. आम्ही विचार केला की आम्ही असेच निघून गेलो तर त्या गृहस्थाच्या मनातला भ्रम कधीच जाणार नाही. त्याला आमच्याबद्दल खरोखर काही तरी भ्रांति झाली आहे. म्हणून आम्ही उभेच राहिलो. त्याने पुन्हा एकदा इशाऱ्याने आम्हाला दाटलें व म्हणाला : "चालते व्हा इथून." तो आम्हाला बदमाश समजला होता.

इतक्यात त्याच वाड्यातील एक दुसरी महिला, जी हे सर्व प्रकार पाहत होती, बाहेर आली. सुदैवाने या महिलेला इंग्रजी समजत होतें. तिच्या समोर आम्ही आपली अडचण मांडली. ती म्हणाली : "तुम्ही बरोबर आहात. श्रीमती पेटिट याच वाड्यात सहाव्या मजल्यावर राहतात. आता त्या घरीं नाहीत. बाहेर गेल्या आहेत." आणि नंतर तिने त्या पुरुषाला व तरुणीला आमची सर्व माहिती सांगितली. मग काय विचारता? तो बिचारा खूप पस्तावला. वारंवार क्षमा मागू लागला. ती

तरुणीहि फारच शरमली. आम्ही त्या इंग्रजी जाणणाऱ्या महिलेला दुभाषी बनवून त्या युवतीला विचारलें की ती आम्हाला पाहून भ्याली याचें कारण काय ? तेव्हा ती युवती म्हणाली : "तुम्ही लोकांनी जो वेष धारण केला आहे—चूडीदार पायजामा आणि लांब कुडता—तो मी माझ्या जीवनांत पहिल्यांदाच पाहिला. या अगदी अजब पोषाखाने मी फार घाबरून गेले. मला वाटलें, तुम्ही लोक कदाचित् मला त्रास देण्यासाठी या घरात घुसले आहात." हें ऐकून आम्ही सर्वजण खूप-खूप हंसलो. चूडीदार पायजामा व कुडता अशी करामत करील हें कधी माझ्या स्वप्नातहि आलें नव्हतें. नंतर तर आम्ही त्या वाड्यात श्रीमती पेटिट यांना भेटण्यासाठी अनेक वेळा गेलो होतो. प्रत्येक वेळीं ती तरुणी मोठ्या प्रेमानें आमचें स्वागत करीत असे, आतिथ्य करीत असे, आपला लाडका पुत्र आमच्या मांडीवर ठेवीत असे आणि आमच्या बरोबर मिळून मिसळून गोष्टी करीत असे. कशी अविस्मरणीय घटना आहे ही !

## राष्ट्रपति-भवनांत धरपकड

फ्रांसच्या शांतिवाद्यांच्या संमेलनांत भाग घेण्यासाठी आम्ही लियें येथे गेलो होतो आणि त्यानंतर फ्रांसचे गांधी, लांजा देल वास्तो यांच्या आश्रमात गेलो होतो.

लांजा देल वास्तो यांच्या आश्रमातून आम्ही परत पॅरिसला आलो. फ्रांसनें अण्वस्त्रांच्या प्रयोगांवर बंदी घालावी अशी विनंति आम्ही वारंवार फ्रेंच जनतेला व फ्रेंच सरकारला पत्रकांद्वारें केली. पण राष्ट्रपति द गाल यांचें म्हणणें होतें की रशिया-अमेरिकेजवळ जशा प्रकारचीं शक्तिशालीं अण्वस्त्रें आहेत तशीं फ्रांसजवळ आज नाहीत. रशिया-अमेरिका यांनी बाँबांनी आपलीं भांडारें भरून ठेवलीं आहेत आणि आता साऱ्या जगाला ते आपल्या दावाखाली ठेवू इच्छितात. कारण अण्वस्त्रवाला देशच स्वातंत्र्याच्या आपल्या सिद्धांताचें रक्षण कोणाच्या दबावाखाली न येता करू शकतो. म्हणून एक तर पूर्ण निःशस्त्रीकरण व्हावयाला पाहिजे नाहीतर फ्रांस स्वतंत्र रीतीने अणुशक्तीचा विकास करील.

हें म्हणणें योग्य आहे की अण्वस्त्र प्रयोगांवर फक्त प्रतिबंध घातल्याने युद्धाचा धोका टळू शकत नाही. परंतु सगळे देश जर हाच प्रयत्न करतील की आम्ही स्वतंत्रपणे आपली युद्धोपयोगी अणुशक्ति वाढवू तर शस्त्रास्त्र-स्पर्धा वाढेल आणि समस्या जास्तीत जास्त गुंतागुंतीची होईल. म्हणून आम्ही अण्वस्त्र-प्रयोगांवर बंदी घालण्याची मागणी करून राष्ट्रपति भुवनासमोर निदर्शन करण्याची घोषणा केली. एका प्रतिष्ठित शांतिवादी गृहस्थाने म्हटलें: "आमच्या राष्ट्रपतींना फ्रांसबद्दल अभिमान आहे. ते फरांसला युरोपचा नेता मानतात. म्हणून अँग्लो-अमेरिकन नीतीशीं त्याचें नातें जुळत नाही. परंतु त्यांचा अभिमान वास्तविकतेवर आधारलेला नाही." तसेंच दुसरे एक गृहस्थ म्हणाले : "फरांस जर अण्वस्त्रांचे प्रयोग करून वायुमंडळ दूषित करील तर सारें जग त्याची बदनामी करील. अण्वस्त्र निर्मितीच्या स्पर्धेत नेतृत्व मिळविण्याची इच्छा करण्याऐवजी निःशस्त्रीकरणाच्या स्पर्धेत आमचे राष्ट्रपति जर पुढाकार घेतील तर किती चांगलें होईल ? जगाचें वायुमंडळ दूषित करण्याचा अधिकार कोणाला देता कामा नये." आजपर्यंत बडीं राष्ट्रें आपल्या सामर्थ्याच्या घमेंडीत मानवजातीवर जो अन्याय करीत आलीं आहेत त्याची पुनरावृत्ति होता कामा नये. फ्रांस अण्वस्त्र-प्रयोग आपल्या भूमीत न करता आफ्रिकेंत जाऊन कां करतो बरे ? हा प्रश्न साऱ्या मानवजातीशी संबंधित आहे म्हणून प्रत्येक मानवाला, मग तो जगाच्या कोणत्याहि विभागांत राहत असो, या प्रश्नाचें उत्तर मागण्याचा अधिकार आहे.

जन्मात प्रथम जर पोलिसांनी आम्हाला गिरफ्तार केलें असेल तर तें पॅरिसमधे. आमच्या बाबतीत अविस्मरणीय आहे ही घटना. १६ महिन्यांत ६ हजार मैलांची पदयात्रा करून आम्ही पॅरिसला पोहोंचलो होतो. जोडयांचे पांच जोड आमचे त्या वेळेपर्यंत झिजून गेले होते. आणि शरीराचें वजनहि ३-४ किलोग्राम कमी झालें होतें. पण पॅरिसला पोहोंचता-पोहोंचता आम्ही ऐकलें की शांतिप्रिय जनतेच्या आवाजाला मान देऊन रशिया, अमेरिका व ब्रिटन यांनी वातारणांत अण्वस्त्र-प्रयोग बंद करण्याचें ठरविलें आहे तेव्हां आम्ही आमचा शारीरिक थकवाहि विसरलो. मनाचा जोश व

उत्साह कित्येक पटीनें वाढला. पण आम्ही पाहिलें की फ्रांस च असा एकटा अणुशक्ति संपन्न देश होता ज्याने मास्कोच्या प्रयोग-बंदी कराराला ठोकरलें आणि लाखों शांतिवादी लोकांची मागणी मंजूर केली नाही.

आम्ही अत्यंत विनयाने राष्ट्रपति द गाल यांना पत्र लिहिलें. पण आम्हाला काही जवाब मिळाला नाही. दुसरे पत्र लिहिलें, त्याचाहि काही जवाब नाही. तिसरें पत्र लिहिलें, पण त्याचेंहि काही उत्तर मिळालें नाही. शेंवटी आम्ही घोषणा केली की १६ सप्टेंबर रोजीं ४-३० वाजता आम्ही राष्ट्रपति भवनासमोर पूर्ण अहिंसात्मक रूपानें शांतिपूर्वक सत्याग्रहाला आरंभ करू. आमच्या या निर्णयाची सूचना विजेच्या वेगाने सर्वत्र पसरली. एक जर्मन तरुण वोल्फगांग आमच्या बरोबर सत्याग्रहात सामिल होण्यासाठी हजर झाला. डेन्मार्कचा एक तरुण ओल नांवाचा तोहि आमच्यांत सामिल झाला. आमच्या कार्यक्रमाची सूचना भारतीय वकील श्री. अलियावर जंग यांनाहि दिली. १५ सप्टेंबरच्या रात्रीं प्रभाकरने एक छानदार झेंडा तयार केला. १६ सप्टेंबरला आमच्या शांतिवादी मित्रांनी सत्याग्रहाला जाण्यापूर्वी सुंदर मेजवानी दिली. त्यानंतर 'क्वेकर हाऊस'मधे लहानसें पत्रकार संमेलन झालें. आमच्या मित्रांनी सुचविलें की आम्ही राष्ट्रपति भवनासमोर पायीं चालत जावू नये, कदाचित् पोलिस आम्हाला रस्त्यात च रोकून धरतील. म्हणून आम्ही चारी सत्याग्रही कार मधून निघालों.

राष्ट्रपति भवनाच्यासमोर कार उभी करून ठेवणें मना आहे, पण एका मित्राने तो धोका पत्करला. आम्ही पोहोंचण्यापूर्वीच अनेक पत्रकार, फोटोग्राफर, वगैरे तेथे पोहोंचलेले होते. प्रत्येक १० पावलांवर शिपायी उभे होते. साडेचार वाजता क्षणींच आमची कार निघाली आणि राष्ट्रपति भवनाच्या दरवाजाच्या बरोबर समोर, जेथे कार थांबवणें मना होतें, तेथे थांबविली गेली. पोलिस 'कार उभी करू नका' म्हणून सांगणार तोच आम्ही उड्या मारून कारच्या बाहेर पडलो. आम्ही आमचा झेंडा फडकावण्यास सुरुवात केली, इतक्यात शिपायांनी येऊन झेंडा पकडून धरला. आम्ही तो पूर्ण फडकवण्याआधीच त्यांनी तो हिसकावून घेतला. फोटोग्राफर फोटो घेऊन राहिले होते. इतक्यात आम्ही पाहिलें की भारतीय

वकीलातींतील सांस्कृतिक सचिवहि तेथे हजर राहिले होते. शेवटीं राष्ट्रपति भवनाचे संरक्षण अधिकारी स्वतः दरवाजावर आले आणि आम्हाला म्हणाले : "राष्ट्रपति भवनांत तुम्हा लोकांना आमंत्रण आहे. आत चला."

आमच्या लक्षांत प्रथम हें आलें नाहीं की हें आमंत्रण म्हणजे वस्तुतः गिरफ्तारीची सूचना आहे. आम्ही आत गेलो. मागून स्वतःला 'गांधींचा मित्र' म्हणवणाऱ्या दोन फ्रेंच महिलांनी आमच्या मिशनच्या बाबतीत आणि सत्याग्रहाच्या बाबतीत तयार केलेलीं पत्रकें वाटायला सुरुवात केली. त्यांना ताबडतोब गिरफ्तार केलें गेलें. नंतर त्यांच्याकडून ३०-३० रुपायांचा दंड घेऊन त्यांना सोडून दिलें.

आम्हाला संरक्षण अधिकाऱ्यासमोर एका आरामशीर सोफ्यावर बसायला सांगितलें. अधिकारी म्हणाले : "राष्ट्रपतींना तुमचीं सर्व पत्रें मिळालीं आहेत. व त्यांना हेंहि माहीत आहे की तुम्ही लोक आत्ता इथे आहात. पण त्यांची भेट घेणें तुम्हाला अशक्य आहे. आणि अण्वस्त्र प्रयोग-नीतींत काही बदल करणेहि शक्य नाही." हें ऐकून आम्ही म्हणालो : "असें आहे तर आम्हाला काहीच सांगायचें नाही. आम्ही अत्यंत शांतीने आणि नम्रतापूर्वक बाहेर उभे राहू."

"नाही, तशी तुम्हाला परवानगी दिली जाऊ शकत नाही" पोलिस अधिकारी म्हणाले. पुष्कळ चर्चा झाली. हे गृहस्थ जरा अधिक नम्र व विचार समजून घेणारे दिसले. म्हणाले : "मी तुमच्या साहसाची तारीफ करतो. मी सुद्धा मनुष्य आहे आणि त्या नात्याने माझेहि काही आपले विचार आहेत. ही निःशस्त्रीकरणाची गोष्ट मला फार पसंत आहे. परंतु मी एक पोलिस अधिकारी आहे. म्हणून कायद्याने माझ्यावर काही जबाबदारी टाकलेली आहे. तुम्ही येथून जर निमूटपणे निघून जाणार नाही तर मला कायद्याप्रमाणे वागावें लागेल." आम्ही चर्चा वाढवू इच्छित नव्हतो. आम्ही चौघेजण तिथून निघण्यासाठी उभे झालो.

"थांबा." पोलिस अधिकारी म्हणाला. "आम्ही आमच्या कारमधून तुम्हाला तुमच्या निवास-स्थानापर्यंत पोहोंचवून देतो."

"आम्ही दिल्लीपासून पॅरिसपर्यंत कारशिवायच पोहोंचलो आहोत. आम्ही परत निवासस्थानीं जाणार नाही.

"तर मग आम्ही तुम्हा चौघांना गिरफ्तार करतो." पोलिस अधिकाऱ्यानें अखेरची गोष्ट सांगितली आणि पोलिस कारमधे चालण्याचा हुकूम केला. पोलिसांच्या गाडींत आम्हा चौघांना बसविलें गेलें. काही शिपायी आमच्या बरोबर निघाले. आम्ही संगिनीच्या पहाऱ्यात होतो. अगदी मागच्या दरवाज्याने आम्हाला घेऊन गेले. प्रथम आम्ही एका पोलिस ठाण्यात पोहोंचलो. तेथे तास-दीड-तासपर्यंत काही कागदी लिखा-पढी चालू होती. रिपोर्ट तयार झाला. आम्हाला कोणत्या कारणासाठी गिरफ्तार केलें याचा तपशील तयार झाला. तेथून पुन्हा आम्हाला पोलिसांच्या मुख्य कचेरींत घेऊन गेले. तेथेंहि दोन तीन घंटे आम्हाला बसवून ठेवले. इथून आम्हाला जेलमधे पाठवून देण्याचा हुकूम दिला गेला. तिसऱ्या प्रहरीं साडेचार वाजता आम्ही राष्ट्रपति भवनात पोहोंचलो होतो तों रात्रीं अकरा वाजता आम्हाला जेलमधे दाखल केलें गेलें.

तेथे आम्ही पाहिलें की अनेक अपराध्यांना हातकड्या घालून आणलें जात होतें. या तुरुंगात एक विचित्र दुर्गंध येत होती. तुरुंग अतिशय घाणेरडा होता. तुरुंगाधिकाऱ्याने आम्हाला आमच्यापाशी कोठल्याहि प्रकारचें सामान ठेऊ दिलें नाही. थंडी कडाक्याची पडली होती. परंतु तुरुंगाधिकाऱ्याने आम्हाला ब्लँकेटहि दिलें नाही किंवा आमची स्लीपिंग बॅगहि घेऊ दिली नाही.

त्यानंतर सर्व कैद्यांना ओळीत उभे करून खायचा भत्ता देणें सुरू केलें गेलें. सर्वांना रोटीचा एक एक तुकडा दिला जात होता. पण आम्ही रोटीचा तुकडा घेण्यास नकार दिला. अशा तऱ्हेने अभद्रपणे व असम्मानपूर्वक दिलेली रोटी खाणें आम्हाला आवडलें नाही. न्यायालयाने आमच्या एखाद्या अपराधाची चौकशी करून आम्हाला सजा दिली नव्हती. म्हणून अशाप्रकारें जेलमधें आम्हाला बंद करणें ही पोलिसांची अरेरावीच होती. आम्ही चौघांनी निर्णय घेतला की या जेलमधे आपण काही अन्न ग्र करायचें नाहीच. सुदैवाने आम्हा चौघांत तिघेजण शाकाहारी

होतो. निर्णय केला की जर जेल अधिकारी माणुसकीचा व्यवहार करतील आणि उचित असें शाकाहारी अन्न भोजनास देतील तरच तें घ्यायचें, नाही तर पूर्ण उपवास करावयाचा. जेलच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला आमच्या कोठडीत घालून कुलपांत बंद केलें. प्रभाकरला व मला एका कोठडीत व आमच्या दुसऱ्या दोन सोबत्यांना दुसऱ्या कोठडीत. दुसऱ्या दिवशीं दुपारीं पोलिस अधिकाऱ्याने आम्हाला बोलावून म्हटलें. "तुम्ही लोकांनी राष्ट्रपति भवनासमोर निदर्शनें करू नयेत. आम्ही सोडून देऊ तुम्हाला."

## "आम्ही सोडून देऊ तुम्हाला"

"जर आम्हाला फ्रेंच सरकारकडून असें आश्वासन मिळेल की अ‍ॅटम शस्त्रांच्या प्रयोगावर आपण बंदी घातली आहे, तर आम्ही निदर्शनें करणार नाही आणि त्याविरोधी काही प्रचारहि करणार नाही. परंतु असें आश्वासन आम्हाला जोंपर्यंत मिळालें नाही तोपर्यंत आम्ही निदर्शनें बंद करणार नाही." आमचें हें उत्तर ऐकून पोलिस अधिकारी हंसला व म्हणाला : "तुम्ही लोक आपल्या विचारावर पक्के आहात." आम्हाला पुन्हा त्याच कोठडीत बंद केलें गेलें. रात्रीहि आम्ही काही खाल्लें नाही. आमच्या या उपवास प्रकरणामुळे पोलिस अधिकारी फार चिंतेत पडलें. आम्ही अन्न घेत नाही याची सूचना जेल अधिकारी पोलिस अधिकाऱ्याला बरोबर कळवीत राहिले होते. शहरातील अनेक शांतिवादी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पत्रकार, आणि भारताचे परराष्ट्र वकिलातीचे अधिकारी वारंवार टेलिफोन करून आमच्या बाबतींत चौकशी करीत होते.

१८ सप्टेंबरला आम्हाला जेव्हा पोलिस अधिकाऱ्यासमोर हजर केलें तेव्हा आम्ही भारतीय दूतावासातील दोन अधिकारीहि तेथे हजर असलेले पाहिले. पोलिस अधिकारी म्हणाले : "गृह-मंत्रालयाकडून तुमच्याबद्दल 'देश-निकाल'चा हुकूम आमच्याकडे आला आहे" असें सांगून त्यांनी 'देश-निकाला'चा लेखी हुकूम आमच्या हातांत ठेवला. २४ तासांच्या आत फ्रेंच सरहद्दी पलीकडे निघून जाण्याची ती नोटीस होती. पोलिस अधिकारी आणखी म्हणाले: "उद्या सकाळीं पॅरिसहून १०.३० वाजता 'एअर फ्रांस' चें विमान निघणार आहे त्यांत तुमच्यासाठी दोन जागा

राखून ठेवल्या जातील. तुम्हाला विमानात घालून दिल्लीला पाठवून दिलें जाईल." त्यावर भारतीय दूतावासांतील अधिकारी म्हणाले : "तुम्ही यांना दिल्लीस परत पाठवून काय करणार ? त्यामुळे आणखीनच गैरसमज निर्माण होईल. यांच्या यात्रेचा कार्यक्रम इंग्लंड व अमेरिकेला जाण्याचा आहे : म्हणून दिल्लीस पाठविण्याऐवजी तुम्ही यांना इंग्लंडमध्ये कां पाठवून देत नाही ? " याप्रमाणें पुष्कळ वेळपर्यंत चर्चा होत राहिली. आणि शेवटीं पोलिस अधिकारी म्हणाले : " मी या लोकांच्या यात्रेच्या उद्देश्यामुळे आणि यांच्या साहसामुळे फार प्रभावित झालो आहे. कायद्याच्या बंधनामुळे मला यांना पकडून जेलमधे घालावें लागलें आहे. पण माझीहि अशी इच्छा आहे की यांच्या पुढील यात्रेत भंग पडू नये. म्हणून तुमची सूचना मान्य करण्यासाठी मी गृह-मंत्रालयाला सांगेन." यानंतर दूतावासातील अधिकाऱ्यांनी उपवास सोडण्याचा आम्हाला आग्रह केला. आम्ही म्हणालो : "हा उपवास जेलच्या अमानुष व्यवहारामुळे करावा लागला आहे. जर आम्हाला उचित रीतीने शाकाहारी भोजन देण्याची व्यवस्था केली गेली तर उपवास सोडण्यास आमची काही हरकत नाही." तेव्हा पोलिस अधिकारी म्हणाले : "तुमच्याशी जेलच्या अधिकाऱ्यांनी जें वर्तन केलें त्याबद्दल मला फार खेद होत आहे. आज मी नवा हुकूम देऊन उचित व्यवस्था करण्याला त्यांना सांगत आहे."

आम्ही पोलिस अधिकाऱ्याच्या कचेरी बाहेर आलो नाही तोंच श्रीमति पेटिट ज्या १६ सप्टेंबर रोजीं आमच्या समर्थनार्थ पत्रकें वाटण्या-बद्दल काही तासासाठीं हवालतीत ठेवल्या गेल्या होत्या, — आम्हाला भेटायला येऊन पोहोचल्या. श्रीमति पेटिट यांच्या मातृवत् व्यवहाराला आम्ही कधीहि विसरू शकत नाही. त्या वारंवार सारख्या आमच्या विषयीं चौकशी करीत राहिल्या होत्या. आम्हाला भेटल्याबरोबर आमचा उपाशी चेहरा पाहून त्यांनी विचारलें : "तुम्ही असे अशक्त का दिसता ?" आणि त्यांना गेल्या दोन दिवसांपासून आम्ही खाल्लें नाही असें समजताच त्या एकदम चिंतामग्न झाल्या. त्यांनी पोलिस अधिकाऱ्याला आम्हाला थोडा वेळ रोकून ठेवायला सांगितलें व घाईघाईने बाजारात गेल्या आणि

तेथून बिस्किटें, कॉफी, बटाटे चिप्स, केळीं इत्यादि पुष्कळसें सामान घेऊन आल्या व म्हणाल्या: "तुमचा उपवास माझ्या हस्तें सुटो." आम्ही त्यांचा आग्रह टाळू शकलो नाही. आणि तेथेंच आम्ही आमचा अन्नत्याग समाप्त केला.

१९ सप्टेंबरला दुपारीं दोन वाजता आम्हाला पुन्हा पोलिस अधिकाऱ्याच्या कचेरीत आणलें गेलें. तेथे आम्हाला अचानक भारतीय राजदूत श्री. अलियावर जंग स्वत: येत आहेत असें समजलें. "फ्रेंच सरकारने गिरफतार केलेल्या व्यक्तींना जेलमधून काढून आमच्या देशात का ढकललें" अशी तक्रार करायला ब्रिटिश सरकारला संधि मिळू नये म्हणून आणि "पोलिस पाहाऱ्यात आम्हाला देशाबाहेर काढून लावलें" असा अमंगल विचार लोकांच्या मनांत येऊ नये म्हणून भारतीय मुख्य वकिलांनी मध्यस्थी करून आम्हाला रेल्वेने पॅरिसहून डोव्हरपर्यंत ( हें इंग्लंडच्या हद्दींतील पहिलें बंदर आहे ) पाठवून दिलें. याप्रमाणे पॅरिस जेल प्रकरणाची समाप्ति झाली !

# विचार स्वातंत्र्याची भूमि : ब्रिटन

फ्रांसमधून हद्दपार झाल्यावर इंग्लंडच्या भूमीवर जेव्हा आम्ही प्रथम पदार्पण केलें तेव्हा वाटलें की जशी काही दुनियाच बदलून गेली आहे. आमच्यासाठी सुलभ गोष्ट म्हणजे या प्रदेशांत भाषेची अडचण नव्हती. समुद्र किनारी वसलेल्या डोव्हर बंदरापासून आमची पदयात्रा सुरू झाली. पायीं चालत चालत २५ सप्टेंबर १९६३ रोजीं आम्ही लंडन शहरात प्रवेश केला.

हातांत युद्ध-विरोधी पोस्टर घेऊन जेव्हा आम्ही टेम्स नदीवरील लंडन-ब्रीज ओलांडित होतो तेव्हा एका शिपायानें येऊन आम्हाला रोकलें. विचारू लागला की अशा प्रकारें पोस्टर घेऊन जायची सरकारची परवानगी तुमच्या जवळ आहे की नाही? आम्ही सांगितलें: "आम्ही आत्ताच लंडनला आलो आहोत, आणि दिल्लीपासून येथपर्यंत याच तऱ्हेनें कोणत्याहि सरकारी परवानगीशिवाय आमची युद्ध-विरोधी पोस्टरें हातांत घेऊन चालत आलो आहोत आणि आमचा निश्चय आहे की वॉशिंगटनला पोहोंचेपर्यंत आम्ही अशाच प्रकारें करीत जाऊ." शिपयाने आम्हाला धमकी देत म्हटलें: बंद करा ही चर्चा आणि हें पोस्टर घडी करून कुठे तरी आत लपवून ठेवा." त्याच्या या धमकीला

आम्ही जुमानलें नाही व म्हणालो : "पोस्टर मिटून ठेवणें अशक्य आहे. आम्ही असेच चालत जाऊ." तो म्हणाला : "जर तुम्ही ऐकणार नाही तर मी तुम्हाला गिरफ्तार करीन." आम्ही म्हणालो : "गिरफ्तारीचें भय कोणाला दाखविता? गिरफ्तार करायचें असेल तर करा. आम्ही नुकतेंच पॅरिसच्या जेलमधून सुटून येत आहोत. चांगलेंच आहे, लंडनचा जेलहि पाहून घेऊ." आमचें हें निर्भयतेचें बोलणें ऐकून त्याला थोडें आश्चर्य वाटलें. त्याने विचारलें : "ही पॅरिसच्या जेलची काय भानगड आहे?" तेव्हा आम्ही त्याला ती सर्व कथा सांगितली. आमची ती सर्व हकीकत ऐकून व पदयात्रेचा वृत्तांत ऐकून तो घोटाळचांत पडला आणि म्हणू लागला : "अच्छा भाई, जेथे जायचें असेल तेथे जा, आपल्या मार्गाला लागा."

लंडनमधे आम्ही पुष्कळ दिवस राहिलो. लंडनचें एक प्रमुख दैनिक पत्र 'गार्डियन' याने आम्हा लोकांच्या बद्दल एक लांबलचक लेख लिहिला. त्यानंतर तर प्रचाराची चढाओढच लागली. आम्ही अनायासें 'टेलिव्हिजन-हीरो' बनलो. टेलिव्हिजनवाल्यांनी आम्हाला ६ मिनिटांचा वेळ दिला आणि त्याच्या मोबदल्याबद्दल सुमारें ६०० रुपयेहि दिले, अशाच प्रकारें बी. बी. सी. रेडिओवरहि आम्हाला ब्रॉडकास्ट करण्याची संधि मिळाली. त्याबद्दलहि आम्हाला ६०० रु. मिळाले. साधारणपणे आम्ही पैशाचा स्वीकार करीत नव्हतो. मास्कोमधे रेडिओवाल्यांनी आम्हाला पैसे देण्याची इच्छा दर्शविली तेव्हा आम्ही त्याचा स्वीकार केला नाही; व त्यांना म्हटलें की त्यांनी ती रकम मास्कोच्या शांति-परिषदेला द्यावी म्हणजे शांति-आंदोलनाच्या उत्तेजनार्थ तिचा उपयोग ते करू शकतील. परंतु लंडनमधे आम्ही या रकमेचा अशासाठी स्वीकार केला की इंग्लंडहून अमेरिकेपर्यंत आम्ही जहाजाने जाणार होतो आणि आमचा खर्च इंग्लंडच्या शांतिवादी संस्था करणार होत्या. शांतिवादी संस्थांची आर्थिक स्थिति तर सर्व ठिकाणीं कमजोर असते. म्हणून त्यांचा बोजा थोडा हलका व्हावा असा आम्ही विचार केला. कमी पडणारी रकम शांति-संस्थांनी दिली म्हणून विशेष अडचणीशिवाय जहाजाची तिकिटें खरेदी करू शकलो.

ज्या काळीं आम्ही लंडनमधे होतो तो काळ तेथील राजनैतिक जीवनात गडबडीचा होता. श्री. मॅकमिलन प्रधान मंत्रीपदांतून दूर होत होते. टोरी पार्टी नवा नेता निवडण्यात व्यग्र होती. तिकडे मजूर पार्टीचेंहि अधिवेशन चालू होतें व निवडणूकीच्या तयारीची व्यूह-रचना केली जात होती. हेरॉल्ड विल्सन यांचें व्यक्तिमत्त्व खूप चमकून राहिलें होतें. आम्हाला त्याच वेळीं वाटत होतें की पुढच्या निवडणुकीत मजूर-पक्ष जिंकेल. टोरी-पक्षाच्या धोरणाची फार बदनामी होत होती.

लंडन एक निराळेंच शहर आहे. कलकत्ता, मुंबई व दिल्लीत मी बराच काळ राहिलो आहे. लाहोर, काबूल व तेहरान येथील रस्त्यांशीहि मी परिचित झालों आहे. मास्कोतहि महिनाभर राहिलो. बर्लिन व ब्रुसेल्स येथील गगनचुंबी इमारतींच्या छायेतहि मी दिवस काढले. यद्यपि पॅरिस म्हणजे पॅरिस आहे, त्याची शोभा निराळीच आहे. परंतु लंडन सुद्धा लंडन च आहे. लंडनचा निराळेपणा एवढ्यामुळे नाही की तें खालीं पोकळ असून तेथे रेल्वेगाड्या धावतात. एवढ्यासाठीहि नाही की फॅशन, सौंदर्य, व आडंबरपूर्ण सामग्रीचें तें केंद्र आहे, यासाठीहि नाही की तेथे जग प्रसिद्ध म्यूझियम आहे, यासाठीहि नाही की लंडन दाट मनुष्य-वस्तीचें स्थान आहे, परंतु लंडनची विशेषता आहे तेथील वैचारिक जागृति आणि राजनैतिक चेतना. जर पॅरिसमधे कला, बुद्धिवाद आणि साहित्याचा आंतर-राष्ट्रीय संगम आहे तर लंडन सामाजिक, राजनैतिक आणि अन्य सार्व-जनिक चेतनेचें आंतरराष्ट्रीय केंद्र आहे. ९ कोटींच्या लोकसंख्येच्या ब्रिटनचे सुमारे एक कोटी लोक तर केवळ या टेम्स नदीच्या किनाऱ्यावर राहतात. मोठमोठी मैदानें, बगीचे आणि जलाशय यांच्यासाठी हें शहर फार प्रसिद्ध आहे. जागजागीं उत्तमोत्तम नमुन्यांच्या कलात्मक प्रस्तर-मूर्ति आहेत. दिल्लीत जसा चांदणीचौक आहे, लंडनमधे सुद्धा तसाच ऑक्सफर्ड राजमार्ग व रीजंट मार्ग आहेत. जगभरची विलास सामग्री येथे मिळू शकते.


एकीकडे आशियात व आफ्रिकेत असंख्य लोक अन्नाशिवाय मरून राहिले आहेत तर दुसरीकडे युरोप आणि अमेरिकेचे लोक फॅशनवर, मौज मजेवर, सैन्य व हत्यारांवर तसेंच अण्वस्त्रांवर पाण्यासारखा पैसा खर्च करीत

आहेत. धनवान लोक नेहमीच असा विचार करतात की आपल्या ऐष-आरामावर आपल्या शौकमजेवर तसेच आपल्या भोगविलासांवर उपाशी व दरिद्री लोकांची नजर लागू नये, त्यांनी आपल्या ऐषआरामाच्या साधनांवर हल्ला करू नये, म्हणून ते चोहोबाजूंनी बंदुकधारी पहारेकरी पहारा देण्यासाठी बसवून ठेवतात.

लंडनच्या हवेत आणि मातीत प्रत्येक प्रकारच्या विचारांना फळण्याला आणि फुलण्याला संधि मिळते. येथे हजारो प्रकारच्या संस्थांचें जाळें पसरलेलें आहे. कम्यूनिस्ट, समाजवादी, भांडवलवादी, शांतिवादी, अराजकतावादी, सैन्यवादी इत्यादि सर्व प्रकारचे लोक येथे आश्रय मिळवू शकतात. मार्क्सला सुद्धा आपला ग्रंथ कॅपिटल – भांडवल – लंडनमधेच लिहिण्याला जागा मिळाली होती. किती विविधता आहे लंडन शहरात ? एका बाजूला अशी स्थिति आहे की सडकेवर शेंकडो जागीं वृत्तपत्रांच्या पेटचा ठेवल्या आहेत, आपण स्वतः पैसे टाका, वृत्तपत्र उचलून घ्या; शेंकडो बाटल्या दुधानें भरलेल्या पडल्या आहेत, पैसे ठेवा, बाटली घेऊन जा; कधी कोठे गडबड होत नाही. दुसऱ्या बाजूला कोटी-कोटींचा डाका मारणारे लोकहि येथे आहेत. एकीकडे हजारो रुपये रोज भाडे देऊन हॉटेलमधे राहणारे लोक आहेत तर दुसरीकडे भीक मागून गुजारा करणारे आणि घाणेरडचा वस्त्यांत राहणारे लोकहि आहेत. परंतु लंडनमधेच कशाला, ही स्थिति तर बहुधा सर्व शहरांची आहे.

लंडनमधे एक पार्क आहे – हाइड पार्क. या पार्कमधे एक असा प्लॅटफार्म आहे जिथे कोणत्याहि रविवारीं, कोणीहि, कोणत्याहि विचाराचा मनुष्य येऊन आपले विचार सार्वजनिक रूपाने व्यक्त करू शकतो. अशा प्रकारचा सार्वजनिक प्लॅटफार्म आणखी दुसऱ्या कोणत्याच शहरात मी पाहिला नाही. कवि, साहित्यिक, आणि कलाकार यांचाहि हा एक अद्भुत् किल्ला आहे. दर शनिवारीं व रविवारीं लंडनमधे शेंकडो प्रकारच्या विचार-सभा, चित्र-प्रदर्शनें, साहित्य-सभा इत्यादि होत असतात. कितीतरी आंतरराष्ट्रीय संमेलनें सुद्धा होत असतात, आफ्रिकेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न असो किंवा रंगभेदाचा प्रश्न असो, अविकसित देशांना मदत देण्याचा प्रश्न

असो किंवा भूक-निवारण आंदोलन असो, सर्व प्रकारच्या प्रवृत्तींच्यासाठी लंडनमधे संस्था स्थापन झाल्या आहेत.




लंडनची राहणी बरीच महाग आहे. घरभाडेंहि महाग आहे. तशीच स्थिति प्रवास वगैरेचीहि हं, भोजन फार स्वस्त आहे. रोटी, दूध, लोणी या सारख्या वस्तूंवर सरकार काही खास सवलती (रिबेट) देते. कोणीहि मनुष्य थोड्या खर्चात आपलें काम निभावू शकतो. खाद्य-सामग्री अत्यंत शुद्ध आणि प्रामाणिक मिळते. भेसळीचा प्रश्नच नाही. हे तथाकथित भौतिकवादी लोक या लहान-सहान दैनिक व्यवहारामधे भारताच्या तथाकथित अध्यात्मवाद्यांपेक्षा कितीतरी जास्त इमानदार व सच्चे आहेत.

## पाश्चिमात्यांच्या शांति-आंदोलनाचें धोरण

पाश्चिमात्य देशांच्या वर्तमान शांति-आंदोलनाची सुरवात युद्ध-विरोधी आंदोलनाच्या रूपाने झाली. परंतु आतां आंदोलनाने अधिक व्यापक रूप धारण केलें आहे. अनेक संस्था शांतीचा अनेक दृष्टिकोणांतून विचार करून विस्तृत प्रमाणावर कार्य करीत आहेत. त्या सर्व कार्यांना एकत्र करून पाहिलें तर तें स्वरूप पूर्ण रीतीने अहिंसक-समाज रचनेचें स्वरूप होईल.

आज पाश्चिमात्य शांति-आंदोलनाच्या गाडीची धुरा ज्या लोकांच्या खांद्यावर आहे त्यांच्यांत अधिक लोक तरुण आहेत. या तरुणांची कार्य-तत्परता, निष्ठा व नेतृत्व-शक्ति पाहून आश्चर्य वाटते. विशेषत: इंग्लंडच्या 'शत-समिति' च्या लोकांनी तर तरुण नेतृत्वाचें अद्वितीय उदाहरण समोर ठेवलें आहे. ते कोणाहि नेत्याची गोष्ट डोळे मिटून मानायला-तयार नसतात. नेत्यांशी त्यांचा चांगलाच वादविवाद होत असतो. मी अशा काही सभा-संमेलनांतून भाग घेतला तेव्हा खरोखर मोठी मजा आली. आपल्यालाहि भारतीय शांतिवादी-आंदोलनात नि:संकोच आणि मनमोकळेपणाने वादविवाद करण्याची परंपरा सुरू केली पाहिजे.

वैचारिक स्तर व्यापक बनला आहे, पण व्यावहारिक आणि कार्य-क्रमाच्या स्तरावरची स्थिति अजूनहि तशीच आहे. पश्चिमेकडील शांति-आंदोलनाच्या बाबतीत मी जें अध्ययन केलें आहे त्यावरून मला वाटतें की येथील मित्र अजूनपर्यंत आपल्या कार्यक्रमांत युद्ध-विरोधी एकांगी दृष्टी-वरच जास्त जोर देतात. अजूनहि संपूर्ण रूपाने अहिंसक समाज-रचनेची गोष्ट तितक्या जोराने समाजासमोर प्रतिपादिली जात नाही. खास करून अण्वस्त्र विरोधी (C. N. D.) तर फक्त अणु-युद्धाच्या गोष्टीवरच जोर देते. या आंदोलनाचे कार्यकर्ते अणु-युद्धाची भयानक कल्पना पुढे करून जनतेच्या मनांत भीति निर्माण करतात. 'शत-समिति'चे लोक जरा जास्त कडक आहेत. ते फक्त अण्वस्त्रांचाच नाही तर सर्व शस्त्रांचा विरोध करतात. आपलें ध्येय प्राप्त करण्यासाठी सत्याग्रह, सविनय कायदेभंग, असहयोग इत्यादि मार्गांचा ते अवलंब करतात. यांच्याशिवाय

आणखी 'युद्ध-विरोधी आंतरराष्ट्रीय' व 'क्वेकर्स' लोक आहेत ते संपूर्णतया युद्धाला अपराधच मानतात. परंतु या सर्व संस्था फक्त युद्धाच्या दृष्टीवरच केंद्रितशा दिसतात.

इटलीचे शांतिवादी डेनलो डोलची एका बाजूला आणि अमेरिकेचे नीग्रो-नेता मार्टिन लूथर किंग दुसऱ्या बाजूला अहिंसात्मक उपायांनी आपआपल्या क्षेत्रांतील ज्वलंत समस्या हातीं घेऊन नवे-नवे प्रयोग करून राहिले आहेत. जेव्हा डेनलो डोलची मानव तिरस्कृत होतांना पाहतात तेव्हा सहजच त्यांच्या हृदयाची करुणा प्रगट होते. जेव्हा असहाय, हीन-दीन व बेकार इसमाची स्थिति पाहणें त्यांना असह्य होते तेव्हा ते उपवास-दिन सुरू करून सत्याग्रहाला प्रारंभ करतात.

पश्चिमेकडील शांति-आंदोलनाचें चित्र रेखाटतांना फ्रांसच्या दोन विभूतींचा उल्लेख करणें अनिवार्य आहे. एक आहेत आबे पिअर व दुसरे आहेत लांजा देल वास्तो. फ्रांसमधे या दोघांनी आपआपल्या परी शांति-कार्याला प्रारंभ केला आहे. आबे पियरांच्या कामाचें मुख्य स्वरूप दुःख-निवारण कार्यासारखें आहे. आसरा नसलेल्या व बेकार लोकांच्या विझणाऱ्या जीवन-दीपात तेल टाकून त्यांना पुन्हा प्रकाशित करण्याचें कार्य आबेपियर यांनी केलें आणि लांजा देल वास्तो यांनी अहिंसेच्या मूल्यांचा जीवनामधे प्रवेश करविण्याचा प्रयोग सुरू केला. लांजा यांनी 'फ्रेंडस् ऑफ् गांधी' नांवाची संस्था स्थापिली आहे. स्वतः एक आर्क आश्रम चालवतात. फ्रांसचें शांति-आंदोलन इंग्लंड व अमेरिकेच्या तुलनेत नवे आणि प्राथमिक अवस्थेत आहे. पण त्याचीं मुळें फार खोलवर आहेत. इटली व ग्रीस येथील स्थितिहि तशीच आहे. ग्रीसच्या तरुणांनी गेल्या काही काळापासून शांति-आंदोलनात नवी शक्ति भरली आहे. श्री. लाम्बार्कीच्या बलिदानाने ग्रीसच्या जनतेला जागृत केलें आहे.

कार्यकर्त्यांच्या संख्येच्या दृष्टीने जर्मनीचें शांति-आंदोलन बरेंच मोठें आहे. बहुधा प्रत्येक शहरात, जिथे जिथे आम्ही गेलो, कार्यकर्ते चांगल्या संघटितरूपाने काम करताना आम्हाला आढळले. कित्येक प्रकारच्या संस्था आहेत, कित्येक प्रकारचे कार्यक्रम आयोजित होत असतात, पण सर्वांचे लक्ष्य

एकच असतें. अलिकडेच एक नवा शांति-संघ बनला आहे, त्याला अल्बर्ट स्वाइत्झर यांचें पूर्ण समर्थन आहे आणि त्यांचा आशीर्वादहि त्यांना लाभला आहे. स्वाइत्झर यांनी मूक-साधना व सर्वांगीण जीवनकला यांत आश्चर्य-कारक सिद्धि प्राप्त केली आहे. आणि म्हणून ते आज शांतिवाद्यांचे प्रेरणा-स्रोत झाले आहेत. जर्मनीत कम्युनिस्ट पार्टीवर प्रतिबंध असल्यामुळे अनेक कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा शांति-आंदोलनात खोलवर प्रभाव आहे, कारण ते अनेक क्षेत्रांत मोठ्या तत्परतेने आणि मनापासून कार्य करीत आहेत. कम्युनिस्ट विरोधी शांतिवाद्यांना या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा प्रभाव तितकासा पसंत नाही. तसें म्हटलें तर कम्युनिस्ट प्रभावित शांति-आंदोलनाचा युरोपच्या सर्व देशांत काही ना काही हस्तक्षेप आहेच. या दखलीमुळे कित्येक ठिकाणीं फार बुद्धिभेदहि निर्माण झाला आहे. पण एकंदरीत पश्चिमेकडील शांति-आंदोलनाला यशस्वी वृद्धांचें नेतृत्व प्राप्त झालेंच आहे. तरुण नेतृत्वानेहि आपला जम बसविला आहे. इंग्लंडमधे आल्डर मास्टनपासून लंडनपर्यंतच्या मोर्च्यात भाग घेणारांची संख्या एक लाखाच्या जवळपास झाली होती.

इंग्लंडच्या शांति-आंदोलनात 'पीसन्यूज' या साप्ताहिकाचें महत्त्व कोणत्याहि पुढाऱ्यापेक्षा किंवा संस्थेपेक्षा कमी नाही. 'पीसन्यूज' ने आपलें स्वतंत्र स्थान निर्माण केलें आहे आणि तें शांति-कार्यकर्त्यांच्या वैचारिक चर्चेसाठी खुल्या व्यासपीठाची भूमिका बजावते. 'पीसन्यूज' मधे नेहमीं शांति-आंदोलनामधील दोषांची तपासणी केली जाते, त्यांची कडक टीकाहि होते. लॉर्ड रसेलसारख्या नेत्यांच्या दृष्टिकोणावरसुद्धा मोकळी टीका-टीपणी करण्याची संधि दिली जाते. 'पीसन्यूज' हें कोणा एका संस्थेचें पत्र नाही. तें सर्व कार्यकर्त्यांना व संस्थांना एकसूत्रात ओंवणारें विचार-पत्र आहे. 'पीसन्यूज'ने विशेषत: एकपक्षीय नि:शस्त्रीकरण, अण्वस्त्रांनी संरक्षण करण्याऐवजी अहिंसेने संरक्षण करणें, अहिंसक समाज-रचना, इत्यादि पैलूंना शांति-आंदोलनाशी जोडण्यात सफलता प्राप्त केली आहे.

वेल्स प्रांतात जाऊन आम्ही बर्ट्रांड रसेल यांचीहि भेट घेतली. ९२ वर्षांची अवस्था असूनहि ते फारच कार्यरत आहेत.

अशी सारी उज्वल परिस्थिति असूनहि आम्हाला सर्वत्र अनुभव आला की कार्यकर्ते कार्याच्या गतीबाबत संतुष्ट नाहीत आणि उद्दिष्टाच्या बाबतीतहि स्पष्ट नाहीत. संपूर्ण आंदोलनात गतिरोध झाल्यासारखें वाटतें. "अण्वस्त्रांच्या नि:शस्त्रीकरणाचें आंदोलन संपलें की काय ?"– हा प्रश्न स्वत: कार्यकर्ते आपल्या मनाला विचारीत आहेत. विशेषत: मास्कोमधे झालेल्या अणु-प्रयोग-निषेध-करारानंतर हा प्रश्न जास्तच तीव्र स्वरूपात पुढे आला आहे. ज्यांचें लक्ष केवळ अणु-नि:शस्त्रीकरणापर्यंतच मर्यादित होतें ते समजतात की आता आमचें काम संपलें. मास्को करारामुळे शस्त्रांवर केला जाणारा खर्च कोणत्याहि प्रकारें कमी झाला नाही. अशा परिस्थितींत C. N. D. आंदोलनासमोर आपल्या उद्देश्याचा पुन्हा विचार करण्याची जरूर निर्माण झाली आहे.

## अमेरिकेच्या व्हिसा-प्राप्तीसाठी २२ दिवस !

पासपोर्ट आणि व्हीसा मिळविणें फार सोपें काम नाही. अमेरिकेसाठी व्हीसा मिळवायला आम्हाला २२ दिवस धडपड करावी लागली. वास्तविक प्रत्येक नागरिकाचा हा सहजसिद्ध मानवीय अधिकार आहे की त्याने जगाच्या कोणत्याहि भागात राहणाऱ्या लोकांकडे जावें आणि त्यांना भेटून मैत्रीची स्थापना करावी. त्या बरोबरच सरकारांचें हें कर्तव्य आहे की एका देशातून दुसऱ्या देशात जाणाऱ्यांना तशा सोयी करून द्याव्यात. परंतु दुर्दैवाने आजचीं बहुतेक सरकारें अनेक प्रसंगीं आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी अडचणी निर्माण करतात. आदर्श समाज-व्यवस्था तर तेव्हा होईल जेव्हा साऱ्या जगातले लोक पासपोर्टाशिवाय व व्हिसाशिवाय मोकळेपणे एका देशातून दुसऱ्या देशात भावाभावाप्रमाणे येणेंजाणें करू शकतील आणि 'विश्व-नागरिक' मानले जातील.

भारतामधून आम्ही पाकिस्तान, अफगाणिस्तान, व इराण यांच्यासाठी व्हीसा प्राप्त करून घेतला होता. रशियासाठी इराणमधे, पोलंडसाठी

मास्कोमधे, जर्मनीसाठी वॉर्सात, फ्रांससाठी बॉनमधे, आणि इंग्लंडसाठी पॅरिसमधे संबंधित वकिलातीतून आम्हाला व्हीसा (प्रवेश-पत्र) मिळालें होतें. लंडनला पोहोंचल्यावर अमेरिकेसाठी व्हीसा मिळविण्याचा प्रयत्न आम्ही सुरू केला. लंडनच्या सुप्रसिद्ध हाइड-पार्कजवळ अमेरिकेच्या वकिलातीचा भव्य प्रासाद आहे. आम्ही वकिलातीच्या व्हीसा विभागात गेलो. एक लांबचलांब क्यू (लाईन) लागला होता. एका अधिकाऱ्याकडून अर्जाचा फॉर्म मिळाला. दुसऱ्या अधिकाऱ्याला आम्ही तो फॉर्म भरून दिला. तिसऱ्या अधिकाऱ्याने आमचा फॉर्म आत पाठविला. त्यानंतर आम्ही लाईनमधे सुमारे दोन तास वाट पाहत बसलो. आमचा नंबर आला तेव्हा चवथ्या अधिकाऱ्यासमोर गेलो. ही एक गोड स्वभावाची महिला होती. तिने मला बसायला खुर्ची दिली. फार नम्रतेने तिने काही औपचारिक प्रश्न विचारले आणि माझीं उत्तरें टाईप करीत गेली. या प्रश्नोत्तरानंतर तिने माझा पासपोर्ट स्वत: जवळ ठेवून घेतला आणि मला वाट पाहत बसायला सांगितलें.

" थोडा वेळ वाट पाहिल्यानंतर एका तरुण गृहस्थाने हलकेच पुकार केला – " सतीशकुमार. "

" जी. होय. " आणि मी आत गेलो.

" तुम्ही संयुक्त-राज्य-अमेरिकेत जाऊ इच्छिता ?" अधिकाऱ्याने विचारलें.

" जी. होय ! त्यासाठीच तर अर्ज घेऊन येथे आलो." मी रुक्षपणे उत्तर दिले. अगोदर चार अधिकाऱ्यांसमोर हजर होणें आणि दोन तास वाट पहात बसण्यामुळे मी काहीसा कंटाळून गेलो होतो.

" तुम्ही अमेरिकेला कशासाठी जाऊ इच्छिता ?" एक रुक्ष प्रश्न.

" कारण अमेरिकेत बऱ्याच प्रमाणात अणुबॉंब तयार केले आहेत. " पुन्हा एक रुक्ष उत्तर.

आमच्या शांति-यात्रेची सर्व कथा सांगून मी म्हणालो : " निःशस्त्रीकरणाची मागणी करीत, आम्ही न्यूयॉर्कहून वॉशिंगटनपर्यंत पदयात्रा

करू इच्छितो." आमची सर्व कथा ऐकल्यावर अधिकाऱ्याला थोडी गोडी निर्माण झाली. व्हिसाची गोष्ट सोडून देऊन या महाशयांनी रशियाच्या गोष्टी सुरू केल्या.

"तुम्ही लोक रशियात चार महिने राहिला आणि पदयात्रा केली ?"

"जी. होय."

"आणि त्यांनी तुम्हाला तसें करायला पूर्ण मोकळीक दिली ?"

"जी. होय."

"तुम्ही लोक रशियन भाषा जाणता ?"

"जी. होय."

"तुम्ही लोक रशियन लोकांना काय सांगत होता ?"

"हेंच की रशियन सरकारने एकतरफी निःशस्त्रीकरण करावें. अहिंसक नीतीचा स्वीकार करावा."

"आणि त्यांनी तुम्हाला अहिंसेचा प्रचार करण्यापासून रोकलें नाही ?" अधिकाऱ्याने आश्चर्याने विचारलें.

"जी. नाही."

"तुमच्या बरोबर कोणी सरकारी अधिकारी निगराणी करीत नव्हता काय ?"

"जी. नाही."

या गोष्टी झाल्यानंतर पुन्हा व्हिसाचा प्रश्न आला. अधिकारी गृहस्थाने अमेरिकी व्हिसा प्राप्त करण्याचे काही नियम दाखविले.

"तुम्ही अमेरिकेत राजनैतिक प्रचार करू शकणार नाही."

"आम्ही अमेरिकेकडून एकतरफी निःशस्त्रीकरणाची मागणी करू." मी उत्तर दिलें.

"जर तुम्ही कम्युनिस्ट असाल तर तुम्हाला व्हीसा मिळणार नाही."

"मी एक मनुष्य आहे. न कम्युनिस्ट आहे, न भांडवलवादी," मी चिडून उत्तर दिलें.

"तुम्ही कधी गिरफ्तार झाला आहा काय ?"

"जी. होय. पॅरिसमधे मी जेलची हवा खाल्ली आहे."

'हीच तर अडचण आहे !" अधिकारी म्हणाला.

आणखी विचारलें : "काय तुम्हाला कुठल्या तरी देशाच्या हद्दपार केलें आहे?"

"जी. होय ! फ्रांसमधून." मी सांगितलें.

असे-असे प्रश्न ! इतके-इतके प्रश्न ! यापूर्वी तर कोणत्याहि वकिलातीत इतके प्रश्न विचारले गेले नव्हते ! अजूनहि या प्रश्नांचा अंत आला नव्हता.

"पैशाची काय व्यवस्था आहे ?" काही आठवण करीत अधिकाऱ्याने विचारले.

"काहीच नाही." मी म्हणालो. "आम्ही दिल्लीहून अठरा महिन्यांपूर्वी एकहि पैसा खिशांत न ठेवता निघालो आणि जनता-जनार्दनाच्या आधारावर अकरा देशांची यात्रा करून लंडनला पोहोचलो. लंडनची जनता अमेरिकेपर्यंतच्या जहाजाचा खर्च देईल. अमेरिकेला पोहोचल्यानंतर अमेरिकत जनतेचे आम्ही अतिथि होऊ. आम्ही पैशाच्या रूपाने द्रव्याचा स्वीकार करीत नाही. भोजन व निजायला राहायला स्थान स्वीकारतो. या गोष्टी अमेरिकन जनतेकडून आम्हाला मिळतील अशी उमेद आहे."

आमच्या या साऱ्या गोष्टी चालू असतांना अर्ध्यातासापेक्षा जास्त वेळ होऊन गेला. बाहेर दुसरे लोकहि वाट पाहत उभे होते. म्हणून अधिकारी म्हणाले : "तुमच्या अर्जाबद्दल आम्हाला जरा विचार करावा लागेल. म्हणून तुम्ही पुन्हा कधी तरी या." शेवटी गोष्ट तेथल्या तेथे राहिली. मला शंका निर्माण झाली की आम्हाला व्हीसा मिळेल की नाही ? प्रभाकरशी मी याबद्दल पुष्कळ चर्चा केली. काही अन्य मित्रांशीहि सल्ला-मसलत केली. मित्रांचें म्हणणें पडलें की जर इथे व्हीसा मिळाला नाही तर तुम्ही जहाजाने कॅनडाला जावें आणि कॅनडाहून स्थलमार्गाने पायीं यात्रा करीत अमेरिकेत पोहोचावें. पण काही मित्रांचें हेंहि अनुमान होतें की व्हीसा मिळून जाईल. अकरा देशांची यात्रा केल्यानंतर, विशेषतः रशियाची यात्रा केल्यानंतर अमेरिकेत प्रवेश न मिळणें हें कसें संभवतें ?

दोन तीन दिवसानंतर आम्ही पुन्हा अमेरिकन वकिलातीत गेलो व त्या अधिकाऱ्यास भेटलो. तो म्हणाला : "आम्ही आमच्या जबाबदारीवर

तुम्हाला व्हीसा देऊ शकत नाही. जर नवी दिल्ली येथील आमच्या वकिलातीतून आम्हाला सूचना मिळाली तर आम्ही तुम्हाला व्हीसा देवू शकू. मध्यंतरी तुम्हाला एक काम करावें लागेल. अमेरिकेच्या एखाद्या शांतिवादी संस्थेकडून तुम्ही एक असें पत्र प्राप्त करून घ्या की जी संस्था तुमच्या अमेरिकेंतील यात्रेची सर्व जबाबदारी स्वत: स्वीकारील." या साऱ्या कारवाईचा स्पष्ट अर्थ होत होता की आम्हाला लंडनमधे कित्येक आठवडे आणखी थांबावें लागेल यद्यपि आमच्या शांतिवादी मित्रांनी आणि अनेक संस्थांनी लंडनमधे आमच्या आतिथ्याची चांगली व्यवस्था केली होती. तरी सुद्धा लांब मुदतीपर्यंत लंडनसारख्या शहरात पाहुणे म्हणून राहणें म्हणजे एक बोजारूप होणेंच होतें. मी जेव्हा ही अडचण पुढे केली तेव्हा तो गृहस्थ म्हणाला : "तुम्ही केबलचा (समुद्रमार्गे तार पाठविण्याचा) खर्च कराल तर आम्ही तार पाठवू शकू." आमच्यापाशी केबलसाठी खर्च करायला पैसा कुठला ? मी म्हणालो : "तुमची एवढी मोठी वकिलात आहे. अमेरिका जगात सर्वांत मोठा धनाढ्य देश आहे. तुम्ही काय वकिलातीमार्फत एका तारेसाठी खर्च करू शकत नाही ?" पण आमची ही दलील अधिकारी महाशयांना पटली नाही. आम्हाला वाट पहावीच लागणार होती.

"आपण एक पत्र चेस्टर बौल्स यांना का लिहू नये ? " प्रभाकरने मला विचारलें.

"चेस्टर बौल्स विनोबांना, भूदान-ग्रामदानाच्या विचारांना, अहिंसा-वादी सिद्धांतांशी चांगल्याप्रकारे परिचित आहेत. मी त्यांच्या पत्नीलाहि भेटलो होतो. "

"जरूर लिहावें." मी होकार दिला. "आणि तसेंच अमेरिकेची 'कमेटी फॉर नॉन व्हायोलंट ॲक्शन' व तिचे अध्यक्ष ए. जे. मस्ते यांनाहि आपण अशा सूचनेचें पत्र लिहावें कीं त्यांनी आमच्या अमेरिकेतील यात्रेची जबाबदारी घेतली आहे असें एक पत्र आम्हाला तावडतोब लिहावें." आम्ही दोन्ही ठिकाणीं तावडतोब पत्रें लिहिलीं. त्यानंतर मधून मधून आम्ही अमेरिकन वकिलातीत जाऊन पत्ता काढीत राहिलो. अखेर ए. जे.

मस्ते व चेस्टर वौल्स यांचीं पत्रें आम्हाला आलीं. तीं पत्रें घेऊन जेव्हा आम्ही अमेरिकन वकिलातीत गेलो तेव्हा त्या अधिकाऱ्याने आम्हाला व्हीसा दिला. आणि शेवटीं अखेरचा पहाड ओलांडला गेला-- बरोबर २२ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर !

## श्री बॉडर यांच्या कारखान्यात

श्री. अर्नेस्ट बॉडर हे एक अद्‌भुत प्रयोग करीत असल्याचें वर्णन मी ऐकत होतो. म्हणून 'स्कॉट बॉडर कॉमनवेल्थ' पाहण्याची उत्सुकता होती. या कारखान्यात पोहोचल्यावर आम्ही किती खुष झालो याचें कसें वर्णन करावें ? स्वत: अर्नेस्ट बॉडर यांना मी अजमीर मधे भेटलो होतो. त्यावेळीं त्यांनी, कधी तरी येऊन आपल्याकडे काही दिवस राहण्याचें निमंत्रण दिलें होतें. ते उद्योगधंद्यांत 'सामूहिक स्वामित्वा'चा प्रयोग करीत होते. निमंत्रण मिळालें त्यावेळीं कल्पनाहि नव्हती की त्यांचें निमंत्रण अशा तऱ्हेने सफल होईल. ४ नव्हेंबरला जेव्हा आम्ही बोल्लास्टन-ला पोहोंचलो तेव्हा त्यांचे चिरंजीव श्री. गेडरिक बॉडर यांनी आमचें स्वागत केलें. कारखान्याच्या लोकांसमोर आमच्या भाषणांचा कार्यक्रम ठेवला होता, पण आम्हाला तर कारखान्याची परिस्थिति समजून घेण्याची जास्त आवड होती. स्थान मस्त होतें. ग्रामीण वातावरण, चोहोंकडे हिरवळ, फारच कलापूर्ण व अद्यावत् इमारत. कारखान्याच्या संचालकाने आम्हाला कारखाना दाखविला. नंतर अर्नेस्ट बॉडर यांच्या ऑफीसमधे गेलो. तिथे विनोबांचें एक फार मोठें चित्र टांगलेलें होतें— सर्व हॉलमधे फक्त एकट्या विनोबांचेंच चित्र होतें. त्यावरून ही सहज कल्पना येईल की श्री. अर्नेस्ट यांना विनोबांबद्दल किती आदराची भावना आहे !

श्री. गेडरिक व त्यांची पत्नी यांच्याबरोबर जेव्हा आम्ही लाकडा-च्या तयार केलेल्या व ग्रामीण वस्तूंनी सजलेल्या घरात भोजनाला टेबलावर बसलो व गोष्टी करू लागलो तेव्हा गेडरिक बॉडर यांनी आम्हाला कारखान्याची परिस्थिति व अडचणी यांची माहिती करून दिली. " चारी बाजूला आग लागली असावी आणि मधे एक गवताची झोंपडी असावी,

तिचा बचाव करण्यास किती कठिण पडत असेल तशासारखी ही कठिण गोष्ट आहे. तरीहि आम्ही तिला बचावण्याची धडपड करीत आहोत. स्वत: कारखान्याचे मजूर 'कॉमन वेल्थ'ची गोष्ट पूर्णरीतीने समजू शकलेले नाहीत. आणि म्हणून आम्हाला पुष्कळशा अशा नियमांनी काम चालवावें लागतें, जे नियम आम्हालाच जरूरीचे वाटत नाहीत." त्यांनी आपली गोष्ट सरळ शब्दांत सांगितली : "आमचा हा सामूहिक स्वामित्वाचा प्रयोग आहे आणि आम्ही समजतो की या मार्गाने आम्ही केंद्रीकरणाच्या आजारापासून बचावू."

या कारखान्यात छपाई, प्लास्टिक व रंगाच्या कामीं येणारे कित्येक रासायनिक पदार्थ निर्माण होतात. २७७ मजूर या वेळीं कारखान्यात कामावर होते. या मजुरांसमोर केवळ प्रत्येक आठवड्याच्या शेवटी मजूरी प्राप्त करण्याचें उद्दिष्टच नाही— तर कारखान्याच्या कामाची अंतिम कसोटी आहे, 'मानवाच्या श्रमाची प्रतिष्ठा आणि समाज-सेवा'. या विषयीची घोषणा संस्थेच्या विधानात नमूद आहे.

या प्रयोगाचे सूत्रधार श्री. अर्नेस्ट बॉडर यांचा जन्म १८९० सालीं स्विट्झरलंडमधे झाला. १४ वर्षांचे असतांना एक क्लार्क म्हणून अत्यंत साधारण रीतीने जीवनाला प्रारंभ केला. त्यानंतर ६ वर्षांनी 'आपलें नशीब अजमावण्यासाठी' ते लंडनला गेले. लंडनमधे कुमारी स्कॉट यांच्या संपर्कात आले. कुमारी स्कॉटने तरुण अर्नेस्ट यांच्या जीवनात एक नवा अध्याय जोडला व शेवटी दोघे विवाहित होऊन कायमचे जीवन-साथी बनले. एवढेच नाही तर अर्नेस्ट इंग्लंडचेच रहिवासी झाले. प्रथम त्यांनी सेलोलाइडचा एक छोटासा व्यापार केला, नंतर त्याचें उत्पादन सुरू केलें आणि वाढत वाढत ते एका कारखान्याचे मालक झाले. तशा स्थितीत त्यांनी औद्योगिक कार्यात व उद्योगक्षेत्रांतील समस्या वगैरेमधे स्वत:ला अशा रीतीने खपविलें की शेवटी त्यांच्या डोक्यात एक क्रांतिकारक परिवर्तन झालें. त्यांना एका नव्या औद्योगिक व्यवस्थेचें दर्शन झालें. शेवटी ते या तत्वावर येऊन पोहोचले की 'कारखान्याचे खरे मालक तेच लोक आहेत, जे रात्रंदिवस श्रम करतात

व माल उत्पन्न करतात.' या विचाराने त्यांच्या मनात तुफान उभें केलें. आणि त्याचा असा परिणाम झाला की त्यांनी कारखान्याच्या मालकीची वाटणी करण्याचें ठरविलें. १९५१ मधे त्यांनी कारखान्याची समान वाटणी केली. १९५१ नंतर या कारखान्याचा कोणी एकटा मालक राहिला नाही. सर्व मालक झाले. किती विचित्र व क्रांतिकारक पाऊल होतें हें ? हा कारखाना त्या सर्व श्रमिकांचा व कारागिरांचा आहे जे तिथे काम करतात.

लंडनमधे आम्ही ५० दिवस राहिलो. दिल्ली सोडल्यानंतर लंडन मधेच आमचा सर्वात जास्त काळ गेला. असे वाटतें की कलकत्ता, मुंबई वगैरे भारतीय शहरांपेक्षा लंडनचाच मी जास्त परिचित झालो आहे.

५ नव्हेंबर १९६३ रोजीं 'क्वेकर्स हाऊस' मधे 'W. R. I.' 'कमेटी ऑफ् १००,' 'फ्रेन्डस् पीस कमिटी,' 'पीसन्यूज' आणि 'वर्ल्ड पीस ब्रिगेड,' यांच्याकडून आम्हा लोकांना निरोप मिळाला. शांतिवादी मित्रांनी आणि संस्थांनी आम्हा दोघासाठी जहाजाचें भाडें ( खर्च ) जमविलें आणि २२ नव्हेंबरच्या 'क्वीन मेरी' जहाजात आमच्यासाठी एक खास केबिन रिझर्व केली.

●

# यांत्रिक विद्येंत अत्यंत श्रेष्ठ अशा अमेरिकेंत

"तुम्ही लोक कम्युनिस्ट तर नाही ना ?" अमेरिकेच्या भूमीवर पाय ठेवताच सर्वांत पहिला प्रश्न सरकारी अधिकाऱ्यांनी आम्हाला विचारला. आम्ही सांगितलें : "आम्ही या देशांत 'कमिटी फॉर नॉन व्हायोलंट अॅक्शन' (C. N. B. A.) चे अतिथि आहोत आणि ही संस्था एक शांतिवादी संस्था आहे." सरकारी अधिकाऱ्याने विचारलें : "काय ही शांतिवादी संस्था कम्युनिस्टांकडून चालविली जाते ?"

आम्ही रशियाहून येत आहोत, शांतीच्या गोष्टी करीत आहोत. व या देशांत निःशस्त्रीकरणाची मागणी करीत पदयात्रा करणार आहोत या गोष्टी अधिकाऱ्यांना भ्रमांत टाकणाऱ्या होत्या. शेंवटी त्यांनी विचारलें : "तुम्ही लोक भारतात काय काम करता ?" आम्ही सांगितलें : "आम्ही सर्वोदयाचे कार्यकर्ते आहोत व या आंदोलनाची सुरवात म. गांधींनी केली आहे." बस. गांधीचे नांव घेताच त्यांच्या समोर चित्र साफ झालें. डोळे मिटून पासपोर्टावर शिक्का लावतांना अधिकारी म्हणाला : "तुमची यात्रा सफल होवो !"

"तुम्ही आपल्या यात्रेच्या उद्देशांवर प्रकाश टाकाल काय ?" आमची दुसरी मुलाखत रेडिओ, टेलिव्हिजन व वृत्तपत्रांचे बातमीदार

यांच्याशीं झाली. "किती हजार मैल चालतात? किती जोडे झिजले? सोव्हियट संघात काय अनुभव आले?" इत्यादि प्रश्नांचा मारा सुरू झाला. टेलिव्हिजनवाल्यांनी एक लांब फिल्म तयार केली. रात्री जेव्हा आम्ही यजमानाच्या घरीं टेलिव्हिजन पाहत होतो तेव्हा आम्ही स्वत:लाच स्वतः टेलिव्हिजनवर व्याख्यान देतांना पाहिलें. अनेक शांतिवादी अमेरिकन बंधु बंदरावर कित्येक तास आमची वाट पहात उभे होते. आम्ही त्यांना भेटतांच असें वाटलें, जणू काही आपण आपल्या अनेक वर्षांच्या जुन्या साथीदारांना भेटत आहोत. वास्तविक ते सर्वच्या सर्व चेहरे नवीन होते.

ती २७ नव्हेंबर १९६३ ची संध्याकाळ होती. संयुक्त राज्य अमेरिकेतील पहिली संध्याकाळ. विजेच्या प्रकाशांत चमकणारे गगनचुंबी प्रासाद असलेल्या न्यूयॉर्क शहरातील पहिली सायंकाळ! अगणित मोटारगाड्यांनी भरलेल्या लांबरुंद राजमार्गांवरील पहिली संध्याकाळ! न्यूयॉर्कचें प्रथम दर्शन मनाला दिपविणारे होते. मी न्यूयॉर्क शहराच्या बाबतीत जी कल्पना केली होती त्याहून निराळें चित्र मला दृष्टीस पडलें. एक मोठे भरभराटीचें व्यापारी शहर, जिथे एकीकडे वैभव व ऐश्वर्य आकाशाला जाऊन भिडलें आहे आणि दुसरीकडे एक गरीब भिकारी आमच्या कारची खिडकी साफ करून दोनचार नाण्यांची भीक मागतो आहे! मी स्वप्नातहि अशी कल्पना केली नव्हती की जगातील सर्वांत धनाढ्य नगर जें न्यूयॉर्क तेथे भिकारीहि असतील!

अटलांटिक महासागराच्या काठावर वसलेल्या न्यूयॉर्कच्या महानगरात आम्ही दहा दिवस राहिलो. या दहा दिवसांत आम्ही भगिनी बेवर्ली व तिचे बंधु यांचे अतिथि होतो. न्यूयॉर्क शहराच्या दक्षिणेकडील भागात ब्रुकालिनमधे त्यांचें घर आहे. या घराला कधी कुलुप लावलें जात नव्हतें हें पाहून मी चकित झालो. बहिणभाऊ दोघे कामावर निघून जात. घरात त्यांची लाडकी कुत्री एकटी राहत असे. २५ वर्षांच्या भगिनी बेवर्ली या एक शांतिवादी कार्यकर्त्या आहेत. गांधीजींच्याबाबतीत, भारताच्याबाबतीत, अन्य राजनैतिक प्रश्नांच्याबाबतीत, त्यांचें विस्तृत ज्ञान पाहून मला आश्चर्य वाटलें. आम्ही लोक रात्रीचे १२-१ वाजेपर्यंत

निरनिराळ्या विषयांवर चर्चा करीत असूं. युद्ध, शांति व निःशस्त्रीकरण यांपासून तों कुटुंब, विवाह, प्रेम आणि सामाजिक जीवनाविषयींच्या अनेक समस्यांवर बेवर्लीताईबरोबर आमची मनमोकळी चर्चा होत असे.

२८ नव्हेंबर रोजीं न्यूयॉर्कची नगर पदयात्रा करीत करीत आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाच्या भुवनापर्यंत जाऊन पोहोंचलो. आमच्या हातांत 'अण्वस्त्रांवर बंदी घाला' चा झेंडा घेऊन आम्ही चालत जात होतो. निःशस्त्रीकरणासंबंधी जाहिरातीहि आम्ही वाटत जात होतो. तशी तर आम्ही गेल्या दीड वर्षांपासून आमच्या पदयात्रेत हजारों पत्रकें वाटलीं आहेत, पण अमेरिकेंत तो पहिलाच दिवस होता. असें वाटलें की येथील लोक तऱ्हेतऱ्हेच्या जाहिराती व पत्रकें यांच्यामुळे इतके त्रस्त झाले असावेत की ते आमच्या हातांतल्या जाहिरातींचा स्वीकारच करीत नव्हते. काही लोक आमच्या झेंड्यावर लिहिलेलें वाचत होते आणि निःशस्त्रीकरणाच्या गोष्टीमुळे दचकून पत्रकें घेण्याचें टाळत असत. काही लोक निषेध करीत म्हणत : "आम्हाला शांतीचा पाठ शिकविण्याची जरूर नाही. रशियात जा आणि कम्युनिस्टांना शिकवा." परंतु पुष्कळ लोकांनी जाहिरातींचा स्वीकार केला, आम्हाला आशीर्वाद दिला, शुभ कामना प्रगट केली. मंद हास्य करीत 'गुड लक' म्हणणाऱ्यांची संख्या जास्त होती. २८ नव्हेंबरचा दिवस या देशात मोठा उत्सवाचा दिवस आहे. या दिवसाला 'थँक्स गिव्हिंग डे' (धन्यवाद दिवस) म्हणतात. न्यूयॉर्क शहराच्या अनेक शांतिवादी लोकांनी यूनोच्या भवनासमोर या उत्सव प्रसंगीं, ज्यांना पुरेसें अन्न-वस्त्र उपलब्ध होत नाही अशा करोडो लोकांच्या सहानुभूति प्रित्यर्थ, उपवास व मौन-प्रार्थनेचा कार्यक्रम ठेवला होता. आम्हीहि या प्रार्थनेत दोन तासपर्यंत सामिल झालो होतो. शेंकडो शांतिवादी एका ओळीत उभे होते. येणारे-जाणारे हजारो लोक थांबत होते, आम्हाला पहात होते, आमच्या कार्याला सफलता इच्छित पुढे निघून जात होते.

## संयुक्त राष्ट्रसंघ

वेद-उपनिषदांच्या युगापासून तों आजपर्यंत एक-जगाची कल्पना आपण लोक ऐकत-वाचत आलो आहोत व त्यावर विचार करीत आलो आहोत. पण आपण जर इतिहासाचें अवलोकन केलें तर आपल्याला दिसून येईल की त्यात युद्ध, कटुता, व आक्रमणांच्या कथांचाच भरणा पडलेला आहे. आमच्या जगत्-प्रदक्षिणेची सर्वांत महत्त्वपूर्ण फलश्रुति मला वाटते—मनुष्यमात्राच्या एकतेचें दर्शन. यात मुळीच संदेह नाही की मानव सर्वत्र मूलत: एकसारखाच आहे. मग तो मला अफगाणिस्तानच्या पहाडावर असो, किंवा इराणच्या वाळवंटात भेटला असो, किंवा रशियाच्या बर्फाच्छादित मैदानात भेटला असो किंवा अमेरिकेच्या धनाढ्य बाजारात भेटला असो.

एकतेच्या सत्याचें प्रत्यक्ष दर्शन मला यूनोमधे झालें. आम्ही पाहिलें की शंभरापेक्षा अधिक देशांचे झेंडे आपआपसांत अशा रीतीने मिळून मिसळून फडकून राहिले होते. जणूंकाय राष्ट्रीयता आंतरराष्ट्रीयतेच्या गळ्यात गळा घालून चालली आहे. आम्ही भवनामधे शिरलो तों आम्हाला काय दिसलें ? एका बाजूने रशियन प्रतिनिधि मंडळ येतांना दिसलें तर दुसऱ्या बाजूने अमेरिकन प्रतिनिधि मंडळ. अमेरिकन मंडळाने मुक्त हास्य करीत या कम्युनिस्टांशी 'शेकहँड' केला. इतक्यात आमचें लक्ष एका दुसऱ्या दलाकडे गेलें. ते जोरजोराने फ्रेंच भाषेत गोष्टी करीत होते. ते बहुधा कोणाला समजावीत होते की राष्ट्रपति द गालहि तितकेच शांतिप्रिय आहेत जितके दुसरे राजनेते आहेत, आणि हें सुद्धा की अण्वस्त्रप्रयोगांवर बंदी घालण्याच्या करारावर जरी त्यांनी सही केलेली नसली तरी त्याचा अर्थ हा मुळीच नाही की ते नि:शस्त्रीकरणाचे विरोधी आहेत. एक गोऱ्या चामडीचा तरुण एका काळ्या रंगाच्या निग्रो सुंदरीच्या हातांत हात घालून येतांना जेव्हा मला दिसला तेव्हा तर मी आश्चर्यचकित झालो. या तरुण जोडीने माझें लक्ष मुद्दाम खेचून घेतलें. कारण अमेरिकेत काळ्या-गोऱ्यांत तीव्र मतभेद चालत असतो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आवारात जेव्हा मी रंगभेदाच्या बेड्या तुटतांना पाहिल्या तेव्हा

निरनिराळ्या विषयांवर चर्चा करीत असूं. युद्ध, शांति व निःशस्त्रीकरण यांपासून तों कुटुंब, विवाह, प्रेम आणि सामाजिक जीवनाविषयींच्या अनेक समस्यांवर बेवर्लीताईबरोबर आमची मनमोकळी चर्चा होत असे.

२८ नव्हेंबर रोजीं न्यूयॉर्कची नगर पदयात्रा करीत करीत आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाच्या भुवनापर्यंत जाऊन पोहोंचलो. आमच्या हातांत 'अण्वस्त्रांवर बंदी घाला' चा झेंडा घेऊन आम्ही चालत जात होतो. निःशस्त्रीकरणासंबंधी जाहिरातीहि आम्ही वाटत जात होतो. तशी तर आम्ही गेल्या दीड वर्षापासून आमच्या पदयात्रेत हजारों पत्रकें वाटलीं आहेत, पण अमेरिकेंत तो पहिलाच दिवस होता. असें वाटलें की येथील लोक तऱ्हेतऱ्हेच्या जाहिराती व पत्रकें यांच्यामुळे इतके त्रस्त झाले असावेत की ते आमच्या हातांतल्या जाहिरातींचा स्वीकारच करीत नव्हते. काही लोक आमच्या झेंड्यावर लिहिलेलें वाचत होते आणि निःशस्त्रीकरणाच्या गोष्टीमुळे दचकून पत्रकें घेण्याचें टाळत असत. काही लोक निषेध करीत म्हणत : "आम्हाला शांतीचा पाठ शिकविण्याची जरूर नाही. रशियात जा आणि कम्युनिस्टांना शिकवा." परंतु पुष्कळ लोकांनी जाहिरातींचा स्वीकार केला, आम्हाला आशीर्वाद दिला, शुभ कामना प्रगट केली. मंद हास्य करीत 'गुड लक' म्हणणाऱ्यांची संख्या जास्त होती. २८ नव्हेंबरचा दिवस या देशात मोठा उत्सवाचा दिवस आहे. या दिवसाला 'थँक्स गिव्हिंग डे' (धन्यवाद दिवस) म्हणतात. न्यूयॉर्क शहराच्या अनेक शांतिवादी लोकांनी यूनोच्या भवनासमोर या उत्सव प्रसंगीं, ज्यांना पुरेसें अन्न-वस्त्र उपलब्ध होत नाही अशा करोडो लोकांच्या सहानुभूति प्रित्यर्थ, उपवास व मौन-प्रार्थनेचा कार्यक्रम ठेवला होता. आम्हीहि या प्रार्थनेत दोन तासपर्यंत सामिल झालो होतो. शेंकडो शांतिवादी एका ओळीत उभे होते. येणारे-जाणारे हजारो लोक थांबत होते, आम्हाला पहात होते, आमच्या कार्याला सफलता इच्छित पुढे निघून जात होते.

## संयुक्त राष्ट्रसंघ

वेद-उपनिषदांच्या युगापासून तों आजपर्यंत एक-जगाची कल्पना आपण लोक ऐकत-वाचत आलो आहोत व त्यावर विचार करीत आलो आहोत. पण आपण जर इतिहासाचें अवलोकन केलें तर आपल्याला दिसून येईल की त्यात युद्ध, कटुता, व आक्रमणांच्या कथांचाच भरणा पडलेला आहे. आमच्या जगत्-प्रदक्षिणेची सर्वांत महत्त्वपूर्ण फलश्रुति मला वाटते—मनुष्यमात्राच्या एकतेचें दर्शन. यात मुळीच संदेह नाही की मानव सर्वत्र मूलत: एकसारखाच आहे. मग तो मला अफगाणिस्तानच्या पहाडावर असो, किंवा इराणच्या वाळवंटात भेटला असो, किंवा रशियाच्या बर्फाच्छादित मैदानात भेटला असो किंवा अमेरिकेच्या धनाढ्य बाजारात भेटला असो.

एकतेच्या सत्याचें प्रत्यक्ष दर्शन मला यूनोमधे झालें. आम्ही पाहिलें की शंभरापेक्षा अधिक देशांचे झेंडे आपआपसांत अशा रीतीने मिळून मिसळून फडकून राहिले होते. जणूंकाय राष्ट्रीयता आंतरराष्ट्रीयतेच्या गळ्यात गळा घालून चालली आहे. आम्ही भवनामधे शिरलो तों आम्हाला काय दिसलें ? एका बाजूने रशियन प्रतिनिधि मंडळ येतांना दिसलें तर दुसऱ्या बाजूने अमेरिकन प्रतिनिधि मंडळ. अमेरिकन मंडळाने मुक्त हास्य करीत या कम्युनिस्टांशी 'शेकहँड' केला. इतक्यात आमचें लक्ष एका दुसऱ्या दलाकडे गेलें. ते जोरजोराने फ्रेंच भाषेत गोष्टी करीत होते. ते बहुधा कोणाला समजावीत होते की राष्ट्रपति द गालहि तितकेच शांतिप्रिय आहेत जितके दुसरे राजनेते आहेत, आणि हें सुद्धा की अण्वस्त्रप्रयोगांवर बंदी घालण्याच्या करारावर जरी त्यांनी सही केलेली नसली तरी त्याचा अर्थ हा मुळीच नाही की ते नि:शस्त्रीकरणाचे विरोधी आहेत. एक गोऱ्या चामडीचा तरुण एका काळ्या रंगाच्या निग्रो सुंदरीच्या हातांत हात घालून येतांना जेव्हा मला दिसला तेव्हा तर मी आश्चर्यचकित झालो. या तरुण जोडीने माझें लक्ष मुद्दाम खेचून घेतलें. कारण अमेरिकेत काळ्या-गोऱ्यांत तीव्र मतभेद चालत असतो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आवारात जेव्हा मी रंगभेदाच्या बेड्या तुटतांना पाहिल्या तेव्हा

माझें मन मानवमात्राच्या ऐक्याच्या या उदाहरणासमोर नतमस्तक झालें. मला वाटलें की अजूनहि जगांत एक असें स्थान आहे जेथे सारें जग एक-रूप होण्याचा पाया घातला जात आहे.

ज्याप्रमाणे भारतात आमच्या निरनिराळ्या प्रांतांनी संपूर्ण भारता-च्या एकतेसाठी आपल्या सत्तेचा काही अंश केंद्रीय सत्तेला सोपविला आहे त्याचप्रमाणे जोंपर्यंत जगातील सारीं राष्ट्रें आपआपल्या राष्ट्रीय सत्तेचा काही अंश, संपूर्ण जागतिक एकता व शांतीसाठी यूनोला सोपविणार नाहीत तोंपर्यंत एक-जगाची कल्पना साकार होणें असंभवच आहे. जगत्-शांति व राष्ट्रीय-प्रभुसत्तेचा अभिमान या दोन गोष्टी जोडीजोडीने चालू शकणार नाहीत. यूनोच्या अधिवेशन हॉलमधे आम्ही जेव्हा पोहोंचलो तेव्हा आम्हाला हाच भास झाला की प्रतिनिधि मंडळें आपआपल्या भाषणांत जगत्हिताला प्राधान्य देत नव्हते तर आपआपल्या राष्ट्रहिताला प्राधान्य देत होते. आम्ही अमेरिकन प्रतिनिधीचें भाषणहि ऐकलें आणि रशियन प्रतिनिधीचेंहि ऐकलें. दोघांच्याहि भाषणांत एकजण दुसऱ्याबद्दल अविश्वास व भीति बाळगीत असल्याचें दिसलें. आणि रशियावर अमेरिकेची अथवा अमेरिकेवर रशियाची श्रेष्ठता शाबित करण्याचा प्रयत्न होत होता. तरी पण मला या गोष्टीचा संतोष होता की यूनो हें एक असें व्यासपीठ होतें जिथे परस्पर विरोधी लोक आपआपले मुद्दे मांडून दीर्घ काळपर्यंत चर्चा करीत असतात.

आम्ही या अधिवेशनासाठी बसलो तेव्हा प्रतिनिधींचीं भाषणें ऐक-ण्यासाठी कानाला लावण्याचें एक यंत्रहि खुर्चीवर ठेवलेलें आम्हाला मिळालें. हें यंत्र कानावर लावावें आणि आपल्याला पाहिजे असलेल्या भाषेचें बटन दाबावें. त्याच भाषेंत वक्त्याचें भाषण ऐकू येऊ शकतें! विज्ञानाने कशा प्रकारें मनुष्याला मनुष्याजवळ आणून ठेवलें आहे आणि एकानें दुसऱ्याला समजणें किती सहज सोपें करून ठेवलें आहे हें पाहून आश्चर्य वाटतें! तरी सुद्धा मानवाने आपल्या मनाने राष्ट्रीयता, जातिवाद, धर्मांधता, रंगभेद इत्यादीचीं कृत्रिम बंधनें आपल्यावर घालून घेतलीं आहेत; कधी कधी लोक आम्हाला विचारीत की 'तुमचा धर्म कोणता ?'

'तुमची जात काय?' तर आम्ही सांगत होतो की 'आमचा कोणताहि धर्म नाही. आम्ही फक्त मानव धर्म मानत असतो; आमची कोणतीहि जात नाही, फक्त मनुष्य जात आहे. आम्ही विश्व-नागरिक आहोत. आम्हाला सर्व दुनियेकडून प्रेम, आतिथ्य, व सत्कार प्राप्त झाला. आम्ही केवळ मनुष्य बनून सर्व ठिकाणीं गेलो म्हणून आम्हाला सर्वत्र मानवतेचेंच दर्शन झालें.'

जर आम्ही हिंदु बनून गेलो असतो तर
आम्हाला मुसलमान भेटता
जर आम्ही हिंदुस्तानी बनून गेलो असतो
तर आम्हाला पाकिस्तानी भेटते
जर आम्ही कम्युनिस्ट बनून गेलो असतो
तर आम्हाला कॅपिटॅलिस्ट भेटता
पण आम्ही मनुष्य बनून गेलो
म्हणून सर्वत्र आम्हाला मनुष्य च भेटला.

संयुक्त राष्ट्रसंघात चीनच्या ७० कोटी जनतेचा प्रतिनिधि नसणें ही गोष्ट आमच्या मनाला अखडत होती. त्याशिवाय यूनो अपूर्णच राहील. जपानी किमोनो, भारतीय साडी, आणि अफ्रिकी चोगा परिधान करून जगाचें स्वरूप ज्या यूनोमधे साकार होऊन प्रगट होतें तेथे संपूर्ण जगताचें प्रतिनिधित्व असणें किती आवश्यक आहे हें सांगण्याची जरूर नाही.

अधिवेशनाची बैठक समाप्त झाल्यावर महामंत्री श्री. ऊ थांट यांना जेव्हा आम्ही भेटलो तेव्हा ते म्हणाले: "तुम्ही लोक जो 'जय जगत्' चा संदेश घेऊन पायीं फिरत घराघरांत व गांवागांवांत पोहोचवून राहिला आहात तोच संदेश कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. पण आमच्या मार्गात अडचणीचे पहाड पडले आहेत." तरी पण महामंत्र्यांच्या डोळ्यांत आशावादाचें तेज चमकत होतें.

यूनोच्या मार्फत शिक्षण, स्वास्थ्य इत्यादीसाठी ज्या योजना चालू आहेत त्यांची पुरेशी माहिती येथे मिळाली. त्यासंबंधी काही फिल्मा आम्ही पाहिल्या, फोटो पाहिले, साहित्य पाहिलें. आम्हाला वाटलें की जगाची ही

महान व एकुलती एक संस्था अत्यंत दूर असलेल्या अफ्रिकेच्या जंगलात राहणाऱ्या लोकांपर्यंत विज्ञान, शिक्षण, व स्वास्थ्याच्या प्रकाशाचीं किरणें पोहोचवून राहिली आहे आणि मानवी सेवेचें मूल्य प्रस्थापित करीत आहे.

यूनो सचिवालयाचे सर्वोच्च अधिकारी श्री. नरसिंहम् यांनी आम्हाला एक दीर्घ मुलाखत दिली. तीत ते म्हणाले: " जोंपर्यंत समाजात श्रीमंती व गरिबी यांच्यामधे जमीन-अस्मानाइतकें अंतर राहील तोंपर्यंत 'एक जगत्' ची किंवा जागतिक सरकारची स्थापना होणें संभवनीय नाही. म्हणून यूनो जगाच्या आर्थिक साच्यात मूलभूत परिवर्तन आणण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे."

टांगानिकाच्या एका प्रतिनिधीने यूनोच्या कार्यप्रणालीबद्दल असंतोष प्रगट करतांना म्हटलें : "आमच्या अधिकांश सत्ताधाऱ्यांनी या पवित्र संस्थेला राजनैतिक बुद्धिबळातील प्याद्यांचें व्यासपीठ बनविलें आहे म्हणून ही संस्था ज्या ध्येयाच्या सिद्धीची इच्छा करते ती सफल होत नाही." पण त्यांनी हें मान्य केलें की "जर जागतिक सरकारची इमारत उभारली जाईल तर हा यूनो त्याच्या पायाचा दगड बनेल."

यूनोमधे ५-७ वेळां गेलो. प्रत्येक वेळीं मला वाटलें की हें एक असाधारण स्थान आहे. असें स्थान, जेथे विश्वात्म्याचें दर्शन होतें. असें स्थान, जेथे राष्ट्रीय-सीमा वर डोकें काढायला संकोच करतात. असें स्थान, जेथे मानवा-मानवामधे भेद निर्माण करणारीं बंधनें शरमून आपलीं मस्तकें खालीं झुकवितात. असें स्थान, जेथे कृत्रिम वैमनस्य स्वाभाविक मानव्यासमोर विरघळूं लागतें.

माजी महामंत्री डाग हॅमरशोल्ड यांनी या व्यापक, विशाल व आधुनिक भवनाच्या आंत एक असें दालन बनविलें आहे ज्याला 'ध्यान-दालन' म्हणतात. लोक या भागात जातात. १०-२० मिनिटें बसत असतात. हें एखादें मंदिर नाही, इथे कोणतीहि मूर्ति नाही. चोहोंकडे अंधार आहे, वरून प्रकाश उतरत खालीं पसरत आहेसा प्रतीत होतो. विलक्षण कारागीर होता तो ज्याने हें स्थान तयार केलें. तेथे जाऊन मनुष्य बाहेरील धांवपळ, कटकट व चकचकाट विसरून काही काळपर्यंत

सरी शांत होतो. असा हा यूनो जगाचें खरेंखुरें विश्राम-स्थान बनलें तर किती छान !

दहा दिवसांच्या न्यूयॉर्कमधील प्रवासाच्या काळात आम्ही अनेक अमेरिकन परिवारांत गेलो. अशा अनेक लोकांना भेटलो ज्यांचा शांति-आंदोलनाशी काही संबंध नव्हता. सामान्यतः अमेरिकन लोक मोठे सहानुभूति दर्शविणारे आणि सहाय्य करणारे असतात. मनमिळाऊपणा व सरळपणा त्यांची विशेषता आहे. आम्ही ज्यांना ज्यांना भेटलो सगळ्यांशीं फार लौकर मिळून मिसळून गेलो. पण एक गोष्ट सतत आमच्या ध्यानात येत होती की सामान्य लोकांच्या मनातहि 'अमेरिकन मोठेपणा' बद्दल फार अभिमान होता. आम्हाला कितीतरी लोकांनी म्हटलें की "आमची अमेरिका जगात सर्वश्रेष्ठ आहे. 'आमची राज्य-व्यवस्था उत्कृष्ट आहे.' दुसऱ्या देशांनी अमेरिकन मोठेपणाचें अनुकरण करायला पाहिजे."

एकदा एका वृद्ध गृहस्थाशी गोष्टी चालल्या होत्या. ते म्हणाले: "तुम्ही भारतातून येऊन आम्हाला निःशस्त्रीकरणाचा उपदेश करीत आहात. आमच्या सरकारच्या अण्विक नीतीविरुद्ध प्रचार करीत आहात. असें तुम्ही करायला नको होते. जर आमच्या देशाने व सरकारने हिंदुस्तान-ला मदत केली नाही तर हिंदुस्तान उपाशी मरेल. हिंदुस्तान आपल्या सरहद्दीचें रक्षण करू शकणार नाही. आम्ही अन्न पाठवतो, औषधें पुरवितो. यंत्र सामग्री पाठवतो, तज्ञ कारागीर पाठवतो, हत्यारें पाठवतो, तुम्ही या देशाशीं कृतज्ञ असायला पाहिजे." धन, शस्त्र, सेना व अणुबॉंब यांच्या विपुलतेमुळे अमेरिका जगाची एक मोठी शक्ति मानली जाऊ शकते. पण काय भौतिक साधनांची विपुलताच मोठेपणाचें लक्षण आहे ?

न्यूयॉर्क अमेरिकेचें सर्वांत मोठें शहर आहे. व्यापार, उद्योग, राज-नीति, साहित्य, विद्या, कला इत्यादींचें सुद्धा बहुधा सर्वांत मोठें केंद्र आहे. १०८ मजलेवाली जगांतील सर्वांत मोठी इमारत 'एंपायर स्टेट बिल्डिंग' हि याच शहरात आहे. संयुक्तराज्य अमेरिकेचीं प्रमुख वृत्तपत्रें, पत्रिका व दैनिकेंहि येथूनच प्रकाशित होतात. देशभरात शांति-आंदोलनाचें संचालन

करणाऱ्या अनेक संस्थांच्या मुख्य कचेऱ्यासुद्धा येथेच आहेत. आम्ही निरनिराळ्या शांतिवादी संस्थांत अनेक कार्यकर्त्यांना व नेत्यांना भेटलो. विशेषत: ए. जे. मस्ते यांच्या मुलाखतीने आम्हाला अत्यंत प्रभावित केलें.

ए. जे. मस्ते ! उंच, सडसडीत, अशक्त व्यक्ति. ज्यांच्या डोक्यांत अहिंसक प्रतिकाराचे विचार ओतप्रोत भरलेले आहेत. ज्यांच्या हृदयांत अहिंसेबद्दल श्रद्धा आहे व ज्यांच्या कार्यप्रणालीत अहिंसक सत्याग्रहाची शक्ति भरलेली आहे. अशा वृद्ध नेत्याच्या हातांत या देशाच्या शांति-आंदोलनाचें भविष्य जरूर उज्ज्वल आहे. श्री. मस्ते यांना तुम्ही त्यांच्या आडंबर-रहित साध्या कार्यालयात पहा किंवा अण्वस्त्रांच्या भांडारासमोर सत्याग्रह करतांना पहा, त्यांची निष्ठा व कार्यतत्परता एकसारखीच दिसेल. ते केवळ संचालन, संयोजन व व्यवस्थापक प्रवृत्तींमधेच गुंतलेले नसतात तर अहिंसात्मक सरळ कार्यांत, प्रदर्शनात, प्रतिकारात, आणि असहयोगा-च्या कार्यक्रमात भाग घेण्यासाठीहि पहिल्या रांगेत उभे असतात. त्यांच्या खऱ्या जीवनाचा प्रकाश प्रगट व्हायला सन् १९१९ मधे त्या वेळेस सुरुवात झाली जेव्हा त्यांनी अहिंसात्मक प्रतिकारासाठी व सत्यासाठी संघर्षाचा मार्ग पत्करला आणि ज्यावेळीं कापडाच्या मिल-मजुरांचा संप पोलिसांनी अत्याचारांनी दाबून टाकला. त्यानंतर तर सरकारी युद्ध तयारीसाठी कर भरण्यास नकार दिला त्यावेळीं, किंवा अणु-बाँब विरोधी प्रदर्शन केलें त्यावेळीं, किंवा इतर सरकारी जुलमाच्या विरुद्ध सत्याग्रह केला त्यावेळीं ते अनेकदा गिरफ्तार होऊन जेलमधे बंद केले गेले. ए. जे. मस्ते यांच्या विषयीं श्री. नेट हेंटोफ यांनी 'पीस ॲजीटेटर' नांवाचें नुकतेंच एक पुस्तक प्रकाशित केलें आहे.

## अमेरिकेच्या भूमीवर

७ डिसेंबरची गारगार सकाळ. स्वच्छ आकाशात चमकणारीं सूर्याचीं सोनेरी किरणें. यूनो भवनाच्या समोरचा गर्दीचा चौक. असंख्य शांतिवादी आपआपल्या कामांतून सुट्टी घेऊन भारताच्या दोन तरुण शांति-यात्रिकांना यात्रेसाठी निरोप द्यायला जमले होते. त्यांच्या अनंत आशीर्वादाच्या

ओझ्याने आमचें मस्तक नमलेलें होतें. टेलिव्हिजनवाले आपला कॅमेरा लावून तयार होते. पत्रकार लोक प्रश्नावर प्रश्न विचारून राहिले होते. मित्रवर्ग आपल्या शुभ कामनांचा वर्षाव करून राहिला होता. दोन अमेरिकन तरुण राडस्मिथ व आर्थर मिलर पुढे आले, शेकहॅंड करून मोठ्या गंभीरपणे म्हणाले: "आम्हीहि तुमच्या बरोबर पदयात्रा करण्याची इच्छा करतो." "स्वागत करतो तुमच्या निर्णयाचें आम्ही"—आम्हीहि तितक्याच गंभीरतेने उत्तर दिलें.

आता आम्ही दोहोंचे चार झालो. हातांत निःशस्त्रीकरणाचा झेंडा व पाठीवर कपड्यांचें गाठोडें. कोण विचित्र लोक आहेत हे? लोक येताजाता थांबत, काही कुजबुज करीत, आणि आमच्या पदयात्रेच्या उद्देशावर प्रकाश टाकणारें साहित्य घेऊन पुढे निघून जात. आम्ही चौघे निघालो. चालू लागलो. शहराच्या सीमेपर्यंत पोहोचवण्यासाठी १५-२० लोक आमच्या बरोबर निघाले. लहानशी एक मिरवणूकच बनली होती. यूनो भवन मागे पडलें. १०८ मजल्यांची जगातील सर्वात उंच इमारतहि मागे राहिली. 'हारलम'—अस्वच्छ व दुःखी-कष्टी नीग्रो वस्तीहि मागे राहिली. जेथे कोटयावधींचा व्यापार काही तासांत होत असतो असा तो 'वॉल स्ट्रीट' मार्गहि मागे राहिला. गर्दीचा ऐसपैस राजमार्ग पार करून आम्ही वॉशिंगटनच्या पुलावर पोहोचलो. हा पुल शहराच्या सीमेवर आहे. आमचे सोबती परत गेले. "गुडलक! गुडबाय! अलविदा मित्रांनो!!"

आणि अशाप्रकारें आम्ही आमच्या दीर्घ यात्रेचा अंतिम चरण पुरा करण्यासाठी निघालो. गेले १८ महिने आम्ही मार्गावर होतो. चालणें आणि फक्त चालणें. आम्ही झोंपत होतो, खात होतो, लिहीत होतो ते सर्व चालण्यासाठी. आम्ही सर्व काही विसरून गेलो, फक्त चालण्याची आठवण राहिली. पण न्यूयॉर्कनंतर फक्त एक महिना आणखी चालायचें होतें आणि जेव्हा तो एक महिनाहि पूर्ण झाला तेव्हा असें वाटलें जणू काही आमच्या डोक्यावरील भार उतरला! ४८३ दिवसांपूर्वी जेव्हा आम्ही आठ हजार मैल दूर दिल्लीहून पायीं वॉशिंगटनला येण्यासाठी निघालो तेव्हा सारा रस्ता

किती लांब व कठिण वाटत होता! पण आम्ही सारखे चालत राहिलों आणि या सातत्याने आम्हाला आमच्या ध्येयापर्यंत नेऊनच पोहोचविलें.

अमेरिकेत आम्हाला सर्व वर्गांच्या लोकांना भेटण्याची संधि मिळाली. संध्याकाळच्या वेळीं सामान्यत: रोज सभांची योजना होत असे. त्याशिवाय शाळा, कॉलेजें, विश्वविद्यालयें यात विशेष कार्यक्रम होत असत. रेडियो, टेलिव्हिजन व वृत्तपत्रें यांच्या द्वाराहि आम्ही जनतेशी संपर्क साधीत होतो. या संपर्कानंतर असें वाटलें की अमेरिकन लोक युद्धाच्या भयंकरतेबद्दल इतके भयभीत नाहीत जितके युरोपचे व रशियाचे लोक भयभीत आहेत. कारण अमेरिकेच्या भूमीवर कोणतेंहि जागतिक युद्ध झालेलें नाही. म्हणून त्यांच्या लक्षांतच येत नाही की युद्ध किती भयानक व रानटी आहे. ते आपल्या व्यापार-धंद्यात इतके मग्न आहेत की युद्ध, शांति, व नि:शस्त्रीकरणासारख्या प्रश्नावर जास्त ध्यान देण्यासाठी त्यांना वेळच नाही. रशिया व कम्युनिस्ट देशांच्या विरुद्ध जबरदस्त विरोधी भावना आहे. हा विरोध ज्ञानपूर्वक व बुद्धिपूर्वक कमी आहे. भ्रमजन्य अधिक आहे. मी अनेक अमेरिकनांना विचारलें: "साम्यवाद म्हणजे काय? रशियाविषयी तुम्हाला काय माहिती आहे? मार्क्स किंवा लेनिन यांच्याविषयी तुम्ही काही वाचलें आहे काय?" सामान्य लोकांकडून मिळालेली अधिकांश उत्तरें नकारात्मक व भ्रामक होतीं. सरकारनें व भांडवलवादी वृत्तपत्रांनी कम्युनिस्ट देशांच्या बाबतींत भ्रम, अविश्वास, व तिटकारा यांचें वातावरण निर्माण केलें आहे. कम्युनिस्टाला सरकारी नोकरी अथवा दुसरा काही कामधंदा यांचे दरवाजे अगदी बंद झाले आहेत. कम्युनिस्टाला आपलें नाव सरकारी रजिष्टरमधे नोंदवावें लागतें. एका लोकशाहीवादी देशात कम्युनिझमच्या विरुद्ध असा आंधळा विरोध पाहून आश्चर्य वाटणें स्वाभाविक आहे. हाच विरोध जर ज्ञानपूर्वक असता तर त्याचा परिणाम मतभेदाच्या रूपांत प्रगट होता, तिटकाऱ्याच्या स्वरूपांत झाला नसता.

## अमेरिकन आतिथ्य


या एक महिन्याच्या यात्रेत आम्हाला अमेरिकन आतिथ्याचा छान अनुभव आला. या यात्रेच्या काळात आमच्या मनावर हा प्रभाव पडला की


सामान्यतः सर्व देशांचे लोक पाहुण्यांबद्दल मोठे उदार व स्नेहशील असतात. अमेरिकेचा माणूस सामान्यपणे कोणा अनोळखी माणसाला भेटण्याचें टाळतो. तो अतिथिपरायण नसतो म्हणून नव्हे पण यासाठी की त्याच्या मनात हा संशय येतो की कोण जाणें हा नवा मनुष्य कोण आहे ? एखादा धोका न होवो ! पण जेव्हा त्याला कळतें की हा नवा मनुष्य अतिथि आहे तेव्हा तो आतिथ्याचा वर्षावच करतो.

एके दिवशीं काही पत्रकार व फोटोग्राफर रस्त्यांत आम्हाला भेटले आणि त्यांनी आम्हाला एका कॉफी हाऊसमधे नेलें. कॉफी हाऊसच्या मॅनेजरला आमच्याबद्दल जेव्हा कळलें तेव्हा त्याने या पत्रकार बंधूंकडून आमच्या कॉफीचे पैसे घेण्यास नकार दिला. तो म्हणाला : "इतक्या दुरून आलेल्या पाहुण्याकडून कुठे पैसे घेतले जातात ? हे तुमचे पाहुणे आहेत तसेच माझेहि पाहुणे आहेत, साऱ्या देशाचे पाहुणे आहेत." नंतर तो आम्हाला म्हणाला : " तुम्हाला जें कांही खायचें प्यायचें असेल तें कृपा करून मागून घ्या. तुम्ही आमचे अतिथि आहात." अमेरिकेसारख्या व्यापारी वृत्तीच्या देशांत असें आतिथ्य म्हणजे आश्चर्याची गोष्ट !

अशा घटना आमच्या बाबतीत ४-५ वेळा घडल्या. म्हणून या घटना आकस्मिक घडल्या असें म्हणता येणार नाहीं. कित्येक वेळां लोक कार थांबवीत, 'लिफ्ट'साठी विचारीत. आम्ही कधी जेव्हा अचानक शाळेंत पोहोचत असू तेव्हा विद्यार्थी व अध्यापक आम्हाला घेरून घेत. भोजन घातल्याशिवाय कधी परत जाऊ देत नसत.

एके दिवशीं अचानक मागून एक कार येऊन थांबली. ड्रायव्हरने आम्हाला हाक मारली. ती कार म्हणजे एक फिरतें दुकान होतें. आम्ही ड्रायव्हर जवळ गेलो. थोड्या गोष्टी झाल्या. तो म्हणाला : "यात्रिकांनो ! तुम्ही पायीं चालत असता. तुम्हाला भूक लागेल. माझी ही लहानशी भेट स्वीकारा." आणि त्याने तीनचार डबे बिस्किटाचे आमच्यासमोर ठेवले. आमचें पोट भरलेलें होतें. अमेरिकन आतिथ्याचा किती स्वीकार करणार ? एक पोट, भेटी हजार ! आम्ही त्याला समजावून सांगितलें पण तो ऐकायला तयार नव्हता. अखेर एक लहानसा डबा आम्ही स्वीकारला.


सियाटल
पोर्टलैंड
सान फ्रांसिस्को
लोस एन्जलास
टूसान
आल्बुकर्की
डेनवर
अ मे रि का
संकेत
पदयात्रा
वाहन से


मेडिसन
शिकागो
कोलंबस
न्यू यार्क
अलबनी
वाशिंगटन
नोक्सविल
शारलोट
अटलांटा
आलबनी

असेच आम्ही एकदा यात्रेत पायीं चालत असतांना एक १५ वर्षांचा मुलगा धावत धावत आला आणि अगोदर काही गोष्टीबिष्टी न करता एकदम म्हणाला : "तुम्ही माझ्या घरीं भोजनासाठी याल?" आम्ही चकित होऊन विचार करू लागलो की आम्हाला भोजनास बोलावण्याची प्रेरणा या बालकाला कशी झाली? आम्ही विचारलें : "तुझें घर कोठें आहे?" "इथून अर्धा मैल." मुलगा म्हणाला. त्याचा आग्रह फार होता. तो व त्याची बहीण कार घेऊन आम्हाला बोलवायला आले होते. आम्ही त्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार केला. आम्ही जेव्हा घरीं पोहोचलो तेव्हा घरातील सर्व लोकांना फार आनंद झाला. मोठ्या टेबलावर पंगत झाली. भोजन झालें. खूप गप्पागोष्टी झाल्या. आमचेंहि चित्त प्रसन्न झालें असें आतिथ्य मिळाल्यामुळे. अशा किती तरी घटना घटत होत्या.

एके दिवशीं एक कार येऊन थांबली. एक गृहस्थ कार मधून उतरून धावत धावत आमच्याजवळ आले. "मी आपल्यास टेलिव्हिजन-वर पाहिलें होतें. आपणच भारतातून आलेले शांति-यात्री आहात ना? आज मी वृत्तपत्रात तुमच्याबद्दल आलेल्या लेख वाचला." ते बोलता बोलता भाव-विह्वल झाले. आमचें बोलणें ऐकायला त्यांना रिकामा वेळ नव्हता. "माझी ही भेट कृपा करून स्वीकारा"– १० डॉलर (सुमारें ४० रु.) चा नोट आमच्यापुढे करून म्हणाले : मी तुमच्या विचाराशी पूर्ण सहमत आहे. तुमच्या या कामात सर्व प्रकाराने मी मदत करू इच्छितो." आम्ही त्यांना कसें तरी समजावलें की आम्ही पैशाचा स्वीकार करीत नसतो. तेव्हा ते म्हणाले : "अच्छा मी ही रकम तुमच्या 'अहिंसक कारवाई समिति'कडे पाठवून देईन."

## गांधीजींच्या समाधीपासून केनेडींच्या समाधीपर्यंत

आमची पदयात्रा न्युजर्सी, पॅनसिल्व्हानिया, डॉलेव्हर, व मेरीलँड या चार राज्यांतून पसार झाली. जसे भारतात १५ प्रांत आहेत तसेच या देशात ५० राज्यें आहेत. वॉशिंगटन साऱ्या देशाची राजधानी आहे. १० मैल रुंद क्षेत्रात ही राजधानी पसरलेली आहे. हे क्षेत्र कोणत्याहि राज्याच्या सीमेत नाही. याला कोलंबिया जिल्हा म्हणतात. वॉशिंगटन फार सुंदर

शहर आहे, जशी आपली नवी दिल्ली. वॉशिंगटनमधे असतांना मला कित्येक वेळा भ्रम झाला की काय मी दिल्लीला येऊन पोहोचलो? आम्ही आमच्या पदयात्रेची समाप्ति ख्रिस्तवासी राष्ट्रपति केनेडी यांच्या समाधीवर केली. जेव्हा आम्ही केनेडींच्या समाधीजवळ ६ जानेवारी १९६४ च्या शांत संध्याकाळीं पोहोचलो तेव्हा आम्हाला १ जून १९६२ च्या संध्याकाळचें स्मरण झालें. त्यावेळीं आम्ही म. गांधींच्या समाधीपासून आमच्या या यात्रेला प्रारंभ केला होता. आम्ही निघालो होतो श्री. केनेडींना भेटण्यासाठी पण आम्हाला जावें लागलें त्यांच्या समाधीजवळ श्रद्धांजलि अर्पण करण्यासाठी !!

"संयुक्त राज्य अमेरिकेच्या राष्ट्रपतीकडून व्हाइट हाऊसमधे शांति-यात्रिकांचें स्वागत असो." राष्ट्रपति जॉन्सनचे परसनल ॲसिस्टन्ट ब्रुक हैंज यांनी व्हाइट हाऊसमधे आमचें स्वागत करतांना म्हटलें : "त्यांनी (राष्ट्रपति जॉन्सन यांनी) तुम्हा मंडळीचें स्वागत करण्यासाठी मला नेमलें आहे. आणि तुमच्या यात्रेच्या पूर्णाहुतीबद्दल तुमचें अभिनंदन केलें आहे." नंतर त्यांनी विस्तारपूर्वक राष्ट्रपतींच्या निःशस्त्रीकरणासंबंधीच्या विचारावर प्रकाश टाकला. याप्रमाणे दिल्लीहून मास्को व वॉशिंगटन-पर्यंतची आमची पदयात्रा पूर्ण झाली. आम्ही आमचें ध्येय गाठलें.

## अमेरिकेत अहिंसेची भूक

इंग्लंडहून अमेरिकेला येण्यासाठी २२ नव्हेंबर रोजीं जेव्हा आम्ही जहाजात बसलो तेव्हा सर्वप्रथम रेडिओने बातमी दिली— 'राष्ट्रपति जॉन केनेडींच्या हत्येची.' ज्या व्यक्तीला भेटण्यासाठी आम्ही १९ महिन्या-पूर्वी दिल्लीहून पायीं निघालो, त्याचें दर्शन आम्हाला घडणार नाही आणि यात्रेच्या शेवटच्या अध्यायात आमच्या योजनेवर असा गारांचा वर्षाव होईल अशी शंका स्वप्नात सुद्धा आली नव्हती.

'क्वीन मेरी' जहाज जगातील सर्वात मोठ्या दोनचार जहाजांपैकी एक आहे. या जहाजात चार हजार माणसें एकावेळी प्रवास करू शकतात. राष्ट्रपति केनेडींच्या मृत्यूचा समाचार जहाजावरील प्रवाशांनी ऐकला तेव्हा सर्वांचे चेहेरे सुन्न होऊन गेले. कित्येक तरुण तर ओक्साबोक्शी रडू

लागले. सिनेमा बंद, नाचगाणें बंद, खेळणें-पोहणें बंद, सर्व काही बंद. मी गंभीरतेने विचार करू लागलो की शेवटी केनेडींच्या हत्येवर इतकी जबरदस्त प्रतिक्रिया लोकांच्या मनात का झाली ? त्याचें कारण काय ?

त्यावेळी माझ्या लक्षांत सारी गोष्ट आली नव्हती. पण या देशात प्रवास करीत असतांना मला कळलें की केनेडींनी आपल्या शासनकालात अनेक सेनापतींच्या व प्रतिक्रियावाद्यांच्या दबावाला न जुमानता काही नवीन पावलें टाकण्यासाठी कमर कसली होती. अणु-प्रयोग-निषेध-करार हा त्याचा केवळ प्रारंभ होता. ते कम्युनिस्ट चीनला मान्यता देण्याचा विचार करीत होते; 'वॉरसा-करार' व 'नाटो-करार' करणाऱ्या देशांमध्ये शांति-सलोखा करण्याची योजना बनवीत होते. निग्रो जातीच्या लोकांना समानाधिकार देण्याचें 'बिल' पास करून घेण्याची इच्छा करीत होते. त्यांच्या या तारुण्य-सुलभ प्रगतिशील आकांक्षा बड्या-बड्या सेनापतींना व गोऱ्या रंगाचें श्रेष्ठत्व मानणाऱ्या ठेकेदारांना आवडल्या नाहीत.

दिल्लीत गांधीजींच्या समाधीपासून जेव्हा आम्ही पदयात्रेला प्रारंभ केला तेव्हा मनातहि आलें नव्हतें की या यात्रेची पूर्णाहुतिहि दुसऱ्या समाधीवरच होणार आहे. ६ जानेवारीला आम्ही जेव्हा केनेडींच्या शांति-समाधीजवळ पोहोचलो तेव्हा आमचीं हृदयें भरून आलीं.

खरें सांगायचें म्हणजे हिंसेचें बीज अमेरिकेत व्यापक स्वरूपात हजर आहे. इथे शंभरांत दहा माणसें निरनिराळ्या युद्धोपयोगी हत्यारें बनविणाऱ्या कारखान्यांत काम करतात. निःशस्त्रीकरणाचा करार झाला तर या देशांतील दोन कोटी लोक एकदम बेकार होऊन जातील. परदेशांशी या देशाचा सर्वांत मोठा व्यापार शस्त्रास्त्रांचा आहे. त्याच्या नफ्याचा लोभ सोडण्याची कोणाची तयारी नाही.

१२ जून १९६३ रोजीं राष्ट्रपति केनेडींनी जेव्हा अमेरिकन विश्वविद्यालयात भाषण केलें तेव्हा एखाद्या महान शांतिवाद्याप्रमाणे त्यांनी देशाला सावध केलें आणि हत्यारांच्या आंधळ्या स्पर्धेला लगाम घालण्याचें अपील केलें. त्यावेळी हत्यारांवर नफा मिळवणाऱ्या नफेखोरांचा

जीव भडकून उठला. ते संतापले आणि केनेडींना अमेरिकेच्या अर्थ-व्यवस्थेचे शत्रु समजू लागले.

अमेरिकेत प्रत्येक घरात बंदूक असणें आवश्यक गोष्ट समजली जाते. या पांच कोटी बंदुका व्यक्तिगत स्वरूपात घरांत आहेत. हा देश ख्रिस्ती धर्महि मानतो. म्हणून प्रत्येक घरात बायबल असणेंहि आवश्यक मानलें जातें. कसें मजेदार संतुलन आहे ? एका हातात 'शत्रूंवरहि प्रेम करा' असें शिक्षण देणारें पुस्तक— बायबल, दुसऱ्या हातात मानवांचा प्राण हरून घेणारी बंदूक !

आणखी मजा पहा ! अमेरिकेमधे बालकांना खेळण्यासाठी कशा प्रकारचीं खेळणीं अधिक लोकप्रिय आहेत ? येथील शेकडो मोठमोठे कारखाने केवळ युद्ध-संबंधी खेळणी बनवतात. तीं म्हणजे—पिस्तुलीं, बंदुका, रॉकेटें, मिसाइल, टँक, युद्धात कामीं पडणारीं जहाजें, बॉंब-वर्षक इत्यादि. जवळ-जवळ प्रत्येक घरीं हीं खेळणीं आम्हांला पहायला मिळालीं. हीं हिंसेचीं बीजें अप्रत्यक्ष रूपाने बालकांच्या डोक्यांत पेरलीं जात आहेत. असें त्यांना हिंसेचें सक्तीचें शिक्षण दिलें जात आहे. टेलिव्हिजन वर तासन् तास अशा प्रकारचे कार्यक्रम चालत असतात ज्यात अशा प्रकारच्या खेळण्यांचा उपयोग कसा करावा हें दाखविलें जातें. माणसाच्या आक्रमक-वृत्तीला उत्तेजित करण्याचा जिथे इतका संघटित प्रयत्न चालू आहे तिथे जर महान राष्ट्रपति केनेडींच्या हत्येची दुःखद घटना घडली तर आश्चर्य कसलें ?

एके दिवशीं पदयात्रेत आम्हाला किशोर वयाचे तीन मुलगे भेटले. तिघांच्या हातांत खेळण्यातल्या मोठ्या आकारच्या बंदुका ! आम्ही खट-खट-खट चा आवाज ऐकला तेव्हा त्यांना विचारलें : "काय रे मुलांनो ! काय कराल या बंदुकांचें ?"

"आमच्या दुश्मनांना मारू !" मुलांनी उत्तर दिलें.

"कोण आहे तुमचा दुश्मन ?"

मुलगे एकमेकांच्या तोंडाकडे पहात राहिले—काही उत्तर नाही.

"जाणता कां आपला दुश्मन कोण आहे तो ?"— पुन्हा विचारलें.

"नाही"— मुलानी म्हटलें.

खरें आहे, कोणाला माहीत नाही की त्याचा दुश्मन कोण आहे ? 'दुश्मन' हवेत उभा केला जातो. रशियात, चीनमधे, क्यूबामधे त्यांचा असा कोणी दुश्मन नाही ज्याला ते जाणतात—ओळखतात. कदाचित् सारे कम्युनिस्ट त्यांचे दुश्मन असतील ! वैराचें हें काल्पनिक भूत जोपर्यंत जाणार नाही तोपर्यंत हिंसेच्या या घटना चालत राहतील.

एक दिवस प्रिस्टन विद्यालयात विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या सभेत आम्ही बोलत होतो. एक प्राध्यापक महाशय गांधींच्या अहिंसेला अव्यावहारिक सिद्ध करण्यावर संपूर्ण जोर देत होते. त्यांच्या मान्यतेप्रमाणे व्हियटनाममधे राष्ट्रपति नोदिन जियेम यांची हत्या केली गेली नसती तर अत्याचारावर ताबा मिळवणें कठिण झालें असतें. जर क्यूबामधे डॉ. कॅस्ट्रोच्या दमन-नीतीला समाप्त करण्यासाठी अमेरिकन सेनेने हल्ला केला असता तरीहि त्याला या प्राध्यापकांची काही हरकत नव्हती. मी विचारलें: "तर मग राष्ट्रपति केनेडी यांची हत्या झाली ती चूक कीं बरोबर ?"

"एकदम चूक"— प्राध्यापकांनी मूठ आवळून उत्तर दिलें.

"पण का ? " मी हलक्या आवाजात विचारलें.

"कारण हें अमानुष आहे" — प्रोफेसर म्हणाले.

"हा प्रश्न तर आपण त्याला विचारा, ज्याने केनेडींची हत्या केली वा ज्याने या षडयंत्राची योजना बनविली. त्यांचें मानणें तर हेंच होतें की केनेडींचा खातमा करून आपण या देशाची सेवा केली आहे. जर आपण क्यूबात हिंसेचें समर्थन करता तर अमेरिकेत हिंसा चुकीची कशी मानता ?" मी विस्ताराने माझा पक्ष मांडला. प्राध्यापक महाशय गंभीर होऊन विचार करू लागले.

या देशात अहिंसेची गोष्ट ऐकण्याची जबरदस्त भूक आहे. आमच्या सभात शें-दीडशें आणि कधी कधी तर दोनशें लोकांपर्यंत उपस्थिति राहत असे. अमेरिकेत इतक्या लोकांची हजरी असाधारण मानली जाते. तिथे लोकांना रेडियो व टेलिव्हिजन यांची इतकी संवय झाली आहे की

ते सर्व काही टेलिव्हिजनवरच पाहणें-ऐकणें पसंत करतात. थंडीत, बर्फात, घराबाहेर पडणें पसंत करीत नाहीत. तेथे आमच्या सभा फार चांगल्या जमत होत्या. सात-आठ वाजता सभा सुरू होत त्या रात्रीं बारा-एक वाजे-पर्यंत चालत असत.

अमेरिकेत हिंसेच्या विकासाने चरम सीमा गाठली आहे. निमिषा-र्धात साऱ्या दुनियेचें भस्म करू शकेल इतक्या हिंसक शक्ति संगठित केल्या गेल्या आहेत. प्रत्येक घरांत कार आहे. जीवन यंत्रांच्या घेरात गुरफटलेलें आहे. समाजाचें नियंत्रण मनुष्याच्या हातात नाही, यंत्राच्या हातात आहे. कपडे धुणें, भांडी घासणें यापासून तों जीवनाचीं सर्व लहान-मोठीं कामें स्वयंचलित यंत्रें करतात. तुम्ही रेस्टॉरेंटमध्ये प्रवेश करता तेथे तुम्हाला दरवाजाहि उघडण्याची जरूर पडत नाही, दारावर जातां क्षणींच 'आटोमॅटिक' दार स्वतःच उघडतें. सर्व सामान वातानुकूलित 'रेफ्रिजेटर' मध्ये ठेवलेलें असतें. गरम किंवा थंड, खाद्य किंवा पेय, जें सामान तुम्हाला पाहिजे, बटन दाबा, पैसा टाका, ताबडतोब तुमच्यासमोर हजर. अशा अत्यंत विकसित स्थितीतहि साऱ्या समस्या जेथल्या तेथे आहेत. शेंकडा पांच माणसें बेकार आहेत. तीन कोटी अमेरिकन लोक गरीबीच्या हालात जीवन कंठीत आहेत. घाणेरड्या झोंपड-वस्त्या अजूनहि आ वासून उभ्या आहेत. काळे लोक आजहि वाईट प्रकाराने अपमानित आहेत.

इतकें अत्यंत यंत्रीकरण व औद्योगिकरण असूनहि समाजाच्या या असंतुलित परंपरेत सरळ हृदयी व बुद्धिमान अमेरिकन लोक गंभीरतेने विचार करू लागले आहेत. 'कम्युनिझम'ची लोक अत्यंत घृणा करतात. अशा लोकांत जर एखाद्या नव्या विचाराबद्दल आकर्षण होत असेल तर तो विचार आहे अहिंसात्मक क्रांतीचा, गांधींचा, मार्टिन लूथर किंगचा.

## आता भाषण-यात्रेवर

सन् १९६२ च्या पूर्वी माझ्या मनात अमेरिकेला जाण्याची इच्छा कधीहि प्रबलरूपाने जागृत झाली नव्हती. रशियाला जाण्याची व तेथील सामूहिक कृषीचे व साम्यवादी जीवनाचे प्रयोग अवलोकन करण्याची माझी इच्छा पहिल्यापासून होती. तसेच जपानची सुधारलेली शेतीची पद्धत व

तेथील लहान-लहान उद्योग-धंदे पाहण्याचीहि माझी इच्छा होती. रशिया, जपान, इस्राईल इत्यादि देशांकडून आपण काही शिकूं शकतो पण अमेरिकेसारख्या अत्यंत श्रीमान व मोठे उद्योगवाल्या देशाबद्दल जास्त आकर्षण नसण्याचें कारण हेंच होतें की भारताच्या ग्राम-प्रधान व कृषि-प्रधान समाजाला अमेरिकन पद्धति फारशी कामीं पडू शकणार नाही.

परंतु सन् १९६१ मधे अमेरिकेच्या 'अहिंसक कारवाई समिति' (C. N. V. A.) ने सुरू केलेल्या एका लांब पदयात्रेने मुद्दाम माझें लक्ष खेंचून घेतलें. ही पदयात्रा सानफ्रान्सीसको ते मास्कोपर्यंत होती. या पदयात्रेंत भाग घेणारे तरुण फक्त अणुबाँबबद्दलच नाही तर युद्धमात्राचे आणि सर्व प्रकारच्या संघटित व योजना-बद्ध हिंसेचे विरोधी होते. पश्चिमेकडील शांति-आंदोलनाचा अभ्यास करतांना मला वाटत होतें की हे लोक आंदोलनाच्या विचाराच्या खोलीत न जाता समस्येकडे वरवर पाहत आहेत. पण 'अहिंसक कारवाई समिती'च्या या पदयात्रेने माझ्या मनावर एक नवीन छाप टाकली आणि जादूसारखा असर केला. तेव्हापासून अमेरिकेला जाऊन या समितीचें कार्य पाहण्याची माझी उत्कंठा प्रबळ झाली.

याशिवाय अमेरिकेबद्दल मला दुसरें आकर्षण होतें–मार्टिन लूथर किंग आणि त्यांचें अहिंसावादी निग्रो आंदोलन. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनानंतर प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर अहिंसात्मक साधनाचा प्रयोग अमेरिकेत होत आहे. त्याबद्दल एक विशेष आपुलकी माझ्यासारख्या अहिंसेच्या विद्यार्थ्याच्या हृदयात असणें अगदी स्वाभाविकच आहे. मला वाटलें, शांतिसेनेच्या कामाच्या दृष्टीने अमेरिकेत पुष्कळ पाहायला-शिकायला मिळण्याची शक्यता आहे.

तशी तर आमची पदयात्रा दिल्लीहून मास्को व वॉशिंगटनपर्यंतच होती. ती पूर्ण झाली. त्यानंतर आम्हाला भारतात परत यायला पाहिजे होतें. पण 'कमिटी फॉर नॉनव्हायोलंट ॲक्शन'च्या (C. N. V. A.) कार्यकर्त्यांनी व श्री. ए. जे. मस्ते यांनी आग्रह केला की आम्ही सर्व अमेरिकेचा दौरा करावा आणि आपले विचार लोकांना सांगावें. आम्ही ती गोष्ट मान्य केली.

अमेरिकेच्या भूमीवर सुमारे सव्वा सहा महिने आम्ही राहिलो. 'अहिंसक कारवाई समिती'ने या यात्रेचे संयोजन मोठ्या कुशलतेने व चातुर्याने केलें होतें. या संपूर्ण काल खंडात आम्ही या संस्थेचे पाहुणे म्हणून राहिलो. हिचें मुख्य कार्यालय न्यूयॉर्कमध्ये आहे. सानफ्रान्सिस्को व वॉलेनटाऊनमध्ये तिच्या शाखा आहेत. आमच्या यात्रेची व्यवस्था मुख्य कार्यालयाने केली होती. श्री. नायल हावर्थ (मंत्री) व श्रीमति बार्बरा लेहमन यांनी मोठ्या तत्परतेने आमची यात्रा सुलभ व प्रभावी बनवली. श्रीमति बार्बराचे पति सानफ्रान्सिस्कोहून मास्कोच्या पदयात्रेत गेले होते. पति-पत्नी दोघेहि मोठे निष्ठावान व अध्ययनशील आहेत. बार्बराबाईंनी गांधींच्या सत्याग्रहाचा विचार मोठ्या खोल रीतीने अभ्यासिला आहे, व कृषि-प्रधान साधें जीवन जगण्याची त्यांची इच्छा आहे. आमच्या यात्रेची पूर्ण जबाबदारी बार्बराबाईवर सोपवून आम्ही निश्चित झालो. केव्हा कुठें बसने किंवा रेल्वेने किंवा विमानाने जायचें, कुठें उतरायचें, कोण बसवर घ्यायला येईल, जर घ्यायला न आले तर त्यांचा फोन नंबर काय इत्यादि बारीकसारीक गोष्टी बार्बराबाईंनी आम्हाला लिहून दिल्या.

न्यूयॉर्कहून वॉशिंगटनपर्यंतची पदयात्रा पूर्ण झाल्यावर आम्ही बस, रेल्वे, कार व विमान हीं साधनें वापरून एकंदर साडेसोळा हजार मैलांची यात्रा केली. संयुक्त राज्य अमेरिकेच्या ५० राज्यांपैकी २७ राज्यांत आम्ही गेलो. सुमारें १०० शहरांत २०० हून अधिक सभांत भाषणें दिलीं. आम्ही तर एक पैसाहि खर्च न करता अमेरिकेला पोहोचलो होतो. परंतु 'अहिंसक कारवाई समिती'ने ( C. N. V. A. ) आमच्या खर्चाची व्यवस्था अशा विकेंद्रित पद्धतीने केली होती की कोणालाहि त्याचा भार वाटला नाही. 'अहिंसक कारवाई समिती'ला नुसती आमच्या अमेरिकेत राहण्याच्या खर्चाचीच व्यवस्था करावयाची नव्हती तर जपानला जाण्यासाठी लागणाऱ्या प्रवास खर्चाचीहि व्यवस्था करावयाची होती. या संस्थेची आर्थिक स्थिति बेताबाताचीच आहे. पण तिने, आम्हाला व्याख्यानें देण्यासाठी आमंत्रणें देणाऱ्या लोकांना लिहिलें होतें : "या

प्रवाशांना तुमच्या शहरापासून पुढच्या शहरीं जाण्याचा भाडेंखर्च तुम्ही द्यावा आणि शिवाय १० डॉलरची मदत जपानला जाण्यासाठी द्यावी.'' *अशा रीतीने प्रत्येक शहरीं १० डॉलरच्या* हिशोबाने १०० शहरांतून एक हजार डॉलर सहज रीतीने जपानला जाण्यासाठी जमून गेले. आम्ही पॅन-अमेरिकन विमानामधून आरामाने पॅसिफिक महासागरावरून प्रवास केला. सव्वा सहा महिन्यांच्या आमच्या प्रवासात एक दिवससुद्धा आम्हाला हॉटेलमधे उतरायची गरज पडली नाही. रोज अमेरिकन कुटुंबांत आतिथ्य स्वीकारण्याचा आनंद आम्ही भरपूर लुटला.

केवळ अमेरिकन आतिथ्यच नव्हे तर अमेरिकन भूमीच्या नैसर्गिक सौंदर्याचा आनंदहि आम्ही मनमुराद उपभोगिला.

जगातल्या सात आश्चर्यांपैकी एक आश्चर्य मानला गेलेला असा जो सर्वांत मोठा नायगारा-धबधबा तो पाहून तर आमचा जीव अगदी आनंद-मग्न झाला. पाण्याचा हा विशाल धबधबा अमेरिकेच्या ईशान्य किनाऱ्यावर कॅनडाच्या सीमेला लागून आहे. आम्ही जेव्हा हा पहायला गेलो तेव्हा फेब्रुवारीचा कडाक्याच्या थंडीचा तो महिना होता. टेंपरेचर शून्याच्या सुद्धा १५ डिग्री खाली होते ! चोहोंकडे शुभ्र बर्फाचें साम्राज्य होतें. मला भारताच्या गरम हवेच्या झळीचा अनुभव होता पण कमर, मोडून टाकणारी ही थंडीची झळ गेल्या वर्षी रशियात व या वर्षीं नायगाऱ्याच्या धबधब्याच्या ठिकाणीं अनुभवाला आली. या थंडीत टिकाव धरणें अगदी कठिण होतें. पण इतक्या दूर येऊन या असीम सौंदर्याचें दर्शन न करण्याची मूर्खता करण्यास माझें मन तयार नव्हतें. गेल्या वर्षी रशियात भारी ओव्हर कोट व टोपीची जी भेट मिळाली होती, तिने या धबधब्याच्या स्थानीं पूर्ण मदत केली. वरमौन्ट राज्याच्या सुंदर पहाडाच्या अंतरवेदीमधे पोहोचल्यावर असें वाटलें जणूं काही मी काश्मीरच्या घाटीत जाऊन पोहोचलो आहे.

पश्चिम व्हर्जिनिया राज्याच्या गरीब वस्तीला पार करून आम्ही जेव्हा उत्तर कारोलिना राज्याच्या 'ग्रँड फादर' पर्वत श्रेणीमधे पोहोचलो तेव्हा वाटलें की आम्ही यंत्रारूढ कारखान्याच्या कलकलाटांनी

भरलेलें व गगनचुंबी महालांशी स्पर्धा करणारें शहरांतील ग्रस्त अमेरिकन जीवन सोडून कुठल्या तरी दुसऱ्या जगात येऊन पोहोचलो आहोत. अत्यंत सीधें-सावें व सुखी जीवन जगणारे हे शेतकरी यांत्रिक सभ्यतेच्या अनेक रोगटपणापासून मुक्त आहेत. यांत्रिक सभ्यतेचा राक्षस यांच्या जीवनाच्या मधुर आलापाचा केव्हा भंग करील हें सांगणें कठिण आहे. क्वीन्स कॉलेजचे दार्शनिक प्राध्यापक श्री. विल्यम यांनी आम्हाला निसर्गाच्या कुशीत आणून मुक्त विहार करायला सोडून दिलें. श्री. विल्यम यांनी हैद्राबादच्या उस्मानिया विश्वविद्यालयात शिक्षण घेतलें होतें. ते अमेरिकनपेक्षा भारतीय जास्त आहेत. ते रोज योगासनें करतात आणि मधूनमधून शहरी जीवन सोडून या पहाडात येऊन राहतात.

याशिवाय अमेरिका व कॅनडा यांच्या मध्यभागीं जगप्रसिद्ध 'पंच सरोवरें' हि आहेत. आम्ही रोचेस्टर शहरातून आँटोरिओ सरोवर पाहिलें. एरिएज सरोवराचा पूर्व किनारा बफेलो शहरातून व पश्चिम किनारा डेट्रॉइट शहरातून पाहण्याचा आनंद लुटला. मिशिगन सरोवराचा किनारा शिकागो व मिवाकी येथून पाहिला. सुपीरियर सरोवर व हरोन सरोवर यांच्या किनाऱ्यापर्यंत आम्ही जाऊं शकलो नाही. निसर्ग आपलें सौंदर्य सर्वत्र एकासारखेंच प्रकट करतें असें मानून तीन सरोवरांच्या दर्शनानेच आम्ही संतोष मानला. मोजूरी व मिसिसिपी नद्यांच्या कलरव करीत चाललेल्या प्रवाहांची शोभा कायमची माझ्या मनात घर करून राहील. न्यूमेक्सिको व अरिजोना पर्वत व वाळवंटी प्रदेशाच्या अलौकिकतेचें वर्णन करणें शब्दापलिकडचें आहे. वेल्लिंघामच्या समुद्र किनाऱ्यावर व पहाडा-वरील घनदाट जंगलात उभे राहून येणाऱ्या जाणाऱ्या नौका व जहाजांना पाहत बसण्याचा आनंदहि आपल्या परी निराळाच होता. हीं वनें-उपवनें व निसर्गाची ही मनोहर शोभा औद्योगिकरणाच्या धुमधडाक्यात लुप्त होण्याच्या मार्गाला लागली आहे. दर वर्षी चाळीस हजार मानवांचा अपघातांत ग्रास करणारी मोटर सडक– 'सुपर हाय वे'– तयार करून भूमीची शोभा नष्ट केली जात आहे. या अत्यंत विशाल राजमार्गावरून माणूस न्यूयार्कहून सानफ्रान्सिस्कोपर्यंतचा कित्येक हजार मैलांचा प्रवास

कारने करू शकतो, पण लोक-जीवनाचा स्पर्शहि त्याला होत नाही. ग्रामीण व शेतकरी जीवनाच्या सौंदर्याचा एक तुषारहि त्याच्या मनावर पडत नाही.

मला जर कोणी विचारलें की अमेरिकेतील कोणत्या नगराने तुम्हाला मोहित केलें तर मी म्हणेन : " न्यू मेक्सिको राज्याची मनोहर नगरी — आल्बुकर्कीने. " न्यूयॉर्कप्रमाणे आल्बुकर्कीत गगनचुंबी महाल नाहीत, शिकागोप्रमाणे वडे वडे कारखाने तेथे नाहीत, डेट्रॉइटप्रमाणे मोटरकार बनविणाऱ्या कंपन्या तेथे नाहीत, वॉशिंगटनप्रमाणे राजनैतिक डावपेचहि तेथे नाहीत असें मानलें तरीहि तेथील जीवनात एकप्रकारचें साधेंसुधें वातावरण आहे. मातीचीं बांधलेलीं सुंदर घरें आहेत, निसर्गाचें सांनिध्य आहे, अमेरिकेच्या इंडियन लोकांच्या हस्तकलेचें आकर्षक साहचर्य आहे, प्राचीन असलें तरी चित्ताकर्षक स्थापत्य-कलेचें आज हि दर्शन तेथे होत आहे. धन्यवाद आहे या लोकांना की नवीनतेच्या नांवावर या कलेचा व साधेपणाचा त्यांनी बहिष्कार केलेला नाही. मोठ्या नगरांविषयीं म्हणाल तर सानफ्रान्सिस्को मला अधिक आवडलें. विशेषतः सानफ्रान्सिस्कोच्या पूर्व टोकावर बर्कली नांवाच्या शहरामुळे येथील वातावरण मस्त आहे. बर्कली, विद्यालयाचें शहर आहे. तीस हजार विद्यार्थी व हजारों अध्यापक व वैज्ञानिक यांनी वसलेलें बर्कली विश्वविद्यालय ! येथे आपले हिंदीचे कादंबरी लेखक व कवि श्री. अज्ञेयजी यांची भेट झाली. अमेरिकेत गेल्यावर अज्ञेयजींची भेट होईल अशी कल्पनाहि केली नव्हती. कधी कधी अकल्पित भेटीचा आनंद सु-नियोजित भेटीच्या आनंदापेक्षा थोडा अधिक होत असतो.

नि:शस्त्रीकरणाच्या मुद्याला खुंटीला टांगून ठेऊन अण्वस्त्रविकासाचें समर्थन करणारे अमेरिकेचे सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. एडवर्ड टेलर यांना आम्ही भेटू इच्छित होतो. पण मी फोन केला तेव्हा कळलें की ते प्रवासाला निघण्याच्या तयारीत होते. म्हणून फक्त १०-१२ मिनिटें फोन वरच त्यांच्याशी बोलणें होऊ शकले. त्यांचा अभिप्राय असा होता की जोपर्यंत रशिया व चीन येथे लोकशाही पद्धतीचें राज्यतंत्र स्थापन होत

नाही व तेथे निवडणुकीचें स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत नि:शस्त्रीकरणाची गोष्ट करणें सुद्धा धोकादायक आहे.

आमच्यासाठी सभांचें संयोजन सर्वांगिण दृष्टीने केलें गेलें होतें. अनेक प्रसिद्ध विश्वविद्यालयांत बोलण्याची आम्हाला संधि मिळाली: नांवांची संख्या मोजली तर पन्नासच्या वर जाईल. पण बोस्टन शहराच्या हॉवर्ड-विश्वविद्यालयाच्या सभेत विद्यार्थ्यांबरोबर प्रश्नोत्तरीत जो आनंद लाभला त्याचें नेहमी स्मरण राहील. श्री. जयप्रकाशजींनी मेडिसिन शहराच्या ज्या विश्वविद्यालयात अध्ययन केलें होतें तेथेहि आम्ही लोक भाषण द्यायला पोहोचलो हा सुद्धा एक संस्मरणीय योग म्हणावा लागेल. स्वामी विवेकानंदांची ज्ञानधारा जेथे वाहिली होती त्या शिकागो विश्वविद्यालयाच्या सभेत भारतीय विद्यार्थ्यांकडून आमच्या अहिंसात्मक नीतीला जबरदस्त विरोध होईल अशी आशा नव्हती. लॉस एंजिलेसच्या कॅलिफोर्निया विश्वविद्यालयाची सभाहि कमी आनंददायी नव्हती. पण जर विद्यार्थ्यांच्या सभांपैकी कोणाला नंबर द्यायचा असला तर बाल्टीमोर शहराच्या गाल्चर महिला-महाविद्यालयाच्या सभेला पहिला नंबर द्यावा लागेल. ही सभा संध्याकाळीं ७ वाजता सुरू झाली आणि शेकडों विद्यार्थिनींनी रात्रीचे ११ वाजेपर्यंत हलायचें नांव हि घेतलें नाही. प्रश्नांवर प्रश्न! विद्यार्थिनी केवळ प्रश्नच विचारून थांबल्या नाहीत. सभेनंतर त्यांनी 'विद्यार्थिनी-शांतिसंघा'ची स्थापनाहि करून टाकली. अनेक वेळा आम्ही चर्चच्या व्यासपीठावरून, पाद्र्याच्या स्थानावरून, रविवारचे संदेश दिले. अशा सभांतून आम्ही स्पष्टपणे सांगत होतो की "आम्ही 'ख्रिस्तानुयायी' नाही आणि कोणत्याहि संघटित धर्मावर आमची श्रद्धा नाही."

## यंत्रांचा देश

सात हजार मैलांच्या शांति-पदयात्रेनंतर, तेहरान, मास्को, बर्लिन, पॅरिस, व लंडन यांच्या राजमार्गावर तीव्र गतीने धावणारे जन-जीवन पाहून घेतल्यावर आणि राज्यवादी, साम्यवादी, समाजवादी, सैन्यवादी व लोकशाहीवादी अशांच्या शासन-व्यवस्थेत राहणाऱ्या लोकांच्या बरोबर कित्येक महिने घालविल्यानंतर संयुक्तराज्य अमेरिकेच्या भूमीवर यात्रा

करीत असतांना माझ्या मनात काही खळबळ उत्पन्न झाली. आश्रमात राहणारा, चर्खा कातून खादीचा कपडा वापरणारा, हाताने जात्यावर दळून त्या पिठाची भाकरी खाणारा माझ्यासारखा भोळाभावडा सर्वोदयी माणूस या भडक दुनियेत कुठे बेपत्ता तर होणार नाही ? – अशी भीति खुद्द माझ्याच मनात निर्माण झाली.

मला सर्व काही अद्‌भुत वाटत होतें. एक तर असा आकर्षक देश मी कधी पाहिला नव्हता. मोठमोठ्या हजारों शेव्हरलेट, कॅडलक, व रोल्सराइस गाड्यांच्या रांगांच्या रांगा लागल्या होत्या, विजेचा चकचकाट तर इतका मोहक होता की रात्र आहे की दिवस याचा पत्ता लागत नव्हता. मोठमोठ्या गगनचुंबी प्रासादांत काम करणारे लोक रात्रंदिवस विजेच्या प्रकाशातच काम करतात. त्यांना सूर्याचा प्रकाश बहुधा अनावश्यकच झाला होता.

सुरवाती-सुरवातीस अमेरिकन जीवनाच्या झगझगाटाने डोळे चांगले-च दिपले. पण जसजसा काळ व्यतीत होऊ लागला तसतसे अमेरिकन लोकांचें वास्तविक जीवन पाहण्यात येऊ लागलें व पूर्वीची त्याबद्दलची छाप कमी कमी होऊ लागली. मला वाटू लागले हा सारा देश भारताच्या जुन्या व्यापारी शेठजीच्या घरासारखा आहे –– जेथे पैसा पाण्या-सारखा वाहत आहे पण जीवन-मूल्यें उपेक्षिलीं जात आहेत. संपत्ति आणि गुण एकत्र पहायला मिळणें सामान्यत: दुर्मिळ गोष्ट आहे. जेव्हा न्यूयॉर्कची घाण पाहिली तेव्हा वाटलें की जगातील सर्वोत्कृष्ट श्रीमान नगरसुद्धा या शापांतून मुक्त नाही ! येथे धन भलेहि पाण्यासारखें वाहत असो पण बावरी स्ट्रीटवर भकास जीवन घेऊन पै-पैसा मागणाऱ्यांची दया कोणाला येणार नाही ? भारतात असतांना मी कल्पनाहि करू शकलो नसतो की न्यूयॉर्क शहरात रात्रंदिवस धावणाऱ्या रेल्वे आपल्या डब्यातून भीक मागणाऱ्यांनाहि नेत असतील. काय किंमत आहे या अपार धन राशीची ? एकीकडे गगनचुंबी महाल, दुसरीकडे हारलमच्या घाणेरड्या वस्त्या ! झोपडपट्ट्या !

आम्ही एका रेस्टरांमधे नास्ता करीत बसलो होतो. माझ्यावरोबर होते लंडन येथील एक पत्रकार श्री. जॉन पॅवर्थ. थोड्या वेळाने ३०-३५

वर्षांचा एक सुंदरसा गोरा तरुण आमच्या टेबलाजवळच्या रिकाम्या खुर्चीवर येऊन वसला. थोड्या वेळाने त्याने आमच्या प्लेट (बशी) कडे बोट दाखवून विचारलें : "काय मी हें घेऊ शकतो ?" मी काही समजलो नाही. काय खरोखर तो खाण्यासाठी मागत होता ? "काय तुम्ही उपाशी आहात ?" अमेरिकेत सुद्धा असे उपाशी लोक असतील याची कल्पना मला नव्हती, म्हणून मी विचारले.

"होय, सकाळपासून मी काही खाल्ले नाही." तो म्हणाला.

"तुम्ही ही प्लेट जरूर घेऊ शकता."— मी म्हणालो.

"आणि ही प्लेट सुद्धा"— जॉनने आपली प्लेट देत म्हटलें.

"मी एक भटक्या आहे" — त्या तरुणाने आपली कहाणी सुरू केली.

"एक मूर्ख भटक्या. माझ्यासारखे हजारों आहेत इथे. माझ्याजवळ काही कामहि नाही."

मी त्याला म्हणालो : "मला तर तुम्ही एक चांगले मनुष्य दिसता. तुम्ही भटके बदमाष नाही. मूर्खहि नाही." कदाचित् त्याने पुष्कळ दिवसांनी ऐकलें असेल की तोहि एक भला माणूस आहे. त्याचा माझ्या म्हणण्यावर विश्वास बसत नव्हता. तो माझ्याकडे टक लावून पाहत होता.

"मला जीवन पाहिजे." — त्याने सद्गदीत स्वरात म्हटलें.

माझे मित्र जॉन म्हणाले : " जीवन तर तुमच्याजवळ आहेच. कदाचित् तुम्हाला कोणाचें तरी प्रेम पाहिजे."

प्रेम शब्द ऐकताच सदर महाशय चिडून म्हणाले :

"प्रेम, प्रेम ! जगातला सर्वात कठिण शब्द ! काय मला प्रेम पाहिजे ? काय कोणी मला प्रेम देऊ शकतो ? नाही. कोणी नाही देऊ शकत !"

आमच्या अशा इकडे गोष्टी चालू होत्या तों दाराजवळ आम्हाला दिसलें की रेस्टरांचे मॅनेजर कोणाला तरी दटावत होते. आमच्या टेबलावरच्या माणसाने खाऊन घेतल्यावर आमच्याजवळ पैसे मागितले. बीयर प्यायला त्याला पैसे पाहिजे होते. आम्ही रेस्टरांच्या बाहेर आलो तो सडके-

वरहि किती तरी लोकांनी मदिरा पिण्यासाठी आमच्याजवळ पैसे मागितले. मदिरा पिऊन ते लोक आपले दुःख विसरू इच्छित होते. चंद्रावर पोहोचण्याच्या शर्यतीत जो देश दोनशे कोटी (२० बिलियन) डॉलर खर्च करतो तेथे ५ कोटी लोक आजहि झोपडीपट्टीत राहत आहेत. काय ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट नाही ? वरवरचा भपका पाहून जर आम्ही आतल्या रोगी परिस्थितीकडे कानाडोळा केला तर तें योग्य होणार नाही. अत्यंत सुंदर वस्त्राआड झाकलेल्या रोगट शरीरावर शेवटी कोण किती वेळ आकर्षित राहील ?

अमेरिका हा अत्यंत असाधारण असा संपन्न देश आहे यांत काही संशय नाही. पण 'दिव्याखाली अंधार' म्हणतात त्याप्रमाणे या अत्यंत संपन्नतेच्याखाली एकचतुर्थांश लोकसंख्येचें जीवन ज्या दशेत आहे तें पाहून स्वतः राष्ट्रपति लिंडन जॉनसन यांचें हृदयहि कंपित झालें आहे. वैज्ञानिक शिक्षणाच्या क्षेत्रात अनिपुण, यांत्रिक संस्कृतीत अकुशल अशा एखाद्या सीध्या-साध्या मनुष्याला जगणें अमेरिकेसारख्या देशात मुष्किल झालें आहे. तांत्रिक विद्येत पारंगत लोकांच्या या देशात या अडाणी लोकांना मुळीच स्थान नाही. इतिहासात पहिल्या प्रथम मनुष्य व यंत्र यांच्यामधे अशी जबरदस्त स्पर्धा निर्माण झाली आहे. या अडाणी, दुर्बळ, गरीब अल्पमतवाल्यांची कोण दाद लावणार ? राष्ट्रपति जॉनसन यांनी गरीबीविरुद्ध युद्ध करण्याचा विडा उचलला आहे, पण त्यासाठीहि अमेरिकेच्या अनुदारपंथी कॉन्झरव्हेटिव लोकांच्या टीकेला राष्ट्रपतींना तोंड द्यावें लागत आहे. जॉनसन सरकार अणुयुद्धाच्या तयारीप्रीत्यर्थ ६०० कोटी डॉलर (६० बिलियन) दरवर्षी खर्च करतें. आणि इकडे देशाच्या गरीबीविरुद्ध लढण्यासाठी त्यांना फक्त १० कोटी (१ बिलियन) डॉलरचें बजेट मंजूर झालें आहे.

सव्वा सहा महिन्यांच्या प्रवासात आम्हा लोकांना वाटलें की या देशात यंत्रशक्तीपुढे मानव-शक्ति लाचार होऊन शरणागति पत्करीत आहे. वॉशिंगटनमधे असताना आम्हाला तेथील केनेटकी राज्यातून आलेल्या खाण मजूरांच्या प्रतिनिधि-मंडळाला भेटण्याची संधि मिळाली. केनेटकी राज्याचे

हे खाण-कामगारांचे प्रतिनिधि मंडळ राष्ट्रपतिसमोर आपली ही मागणी पुढे ठेवण्यासाठी आले होते की त्या राज्यांतील खाणीत स्व-संचालित यंत्रांचा उपयोग दररोज वाढून राहिला आहे आणि हजारों मजूर बेकारीच्या भयंकर भट्टीत भाजून निघत आहेत. अशा रीतीने यंत्रें जर मनुष्याची जागा घेत राहतील तर शेवटी मनुष्य एक निरुपयोगी प्राणी मात्र होऊन जाईल !

मी एकदा एका 'आटोमेट' नांवाच्या रेस्टरंटमधे गेलो होतो. तर त्यावेळी प्रथम एक प्रकारचें माझ्या मनात त्या नवीन पद्धतीबद्दल कुतुहल व आश्चर्य वाटलें. पण नंतर यंत्राच्या पंजात फसून जात असलेल्या मानवाबद्दल माझ्या मनात एक प्रकारचा दयाभावहि आला. या आटोमेट रेस्टरंटच्या जवळ जाताच त्याचा दरवाजा आपोआप उघडला. दरवाजा उघडण्यासाठी माझा पुढे झालेला हात निराश होऊन मागे आला. हें एक फार मोठें अत्यंत सुंदर रेस्टरां होतें. त्यात एकहि मनुष्य नव्हता. शेकडो प्रकारचा माल, गरम व थंड पेयें, निरनिराळ्या देशांचे निरनिराळे गरम व थंड पदार्थ यंत्रांत ठेवलेले होते. यंत्रात पैसा टाका, जी वस्तु पाहिजे त्या वस्तूसमोरचें बटन दाबा, इच्छित वस्तु बाहेर येऊन तुमच्यासमोर हजर. तुमच्याजवळ जर एक डॉलरचा नोट असेल आणि तुम्हाला मोड पाहिजे असेल तर त्यासाठीहि तुम्ही मशीनजवळ जा, बटन दाबा, मशीन तुम्हाला मोड देईल.

अशाच प्रकारे येथील सर्व-वस्तु भांडार — सुपर मार्केट — यांच्या स्व-संचालित व्यवस्थेनेहि मला आश्चर्यचकित केलें. हीं सर्व सुपर मार्केटें तीन-चार बड्या कंपन्यांच्या हातांत केंद्रित आहेत, आणि तेथे भाजीपाला, फळें, मांस व अन्य खाद्य सामग्री ताजी मिळते. शिवाय शीतोष्ण नियंत्रित यंत्रद्वारा प्राप्त होते. सर्व तऱ्हेचें कच्चें व शिजलेलें भोजन, फळभाजी, सूप, खीर, इत्यादि बंद डब्यात तयार मिळतें. स्वयंपाक तयार करण्यासाठी जास्त वेळ खर्च करण्याची जरूर नाही. हां ! एवढ्या साऱ्या वाचलेल्या वेळाचा उपयोग कसा व काय करावयाचा या प्रश्नाचें काही उत्तर नाही. ब्लीचिंग पावडरने साफ केलेल्या गव्हाच्या पिठाची बनलेली रुईसारखी

नरम व पांढरी शुभ्र डबल रोटी पहायला कितीहि आकर्षक वाटत असली तरी खायला मला तर कधी स्वादिष्ट लागली नाही. आश्चर्य तर या गोष्टीचें वाटलें की डबल रोटीसाठीहि जाहिरातबाजी चालते ! उद्या पाण्यासाठीहि जाहिरात द्यावी लागेल की काय न कळे ! भारतात टॉफी, कँडी, चॉकोलेट, इत्यादि पदार्थ प्राय: लहान मुलांसाठी तयार होतात. पण येथे तर या वस्तु तरुण व वृद्ध लोकहि लहान मुलांप्रमाणे खात असतात. काही अमेरिकन मित्रांनी सांगितलें की कँडी अधिक खाण्यामुळेच सफेद, मजबूत व सुंदर दांत पहायला मिळणें किठण झालें आहे. 'कोकाकोला' सारखी पेयें आणि गोड टॉफी यांचा सतत उपयोग दातांचे शत्रुच आहेत. येथील तरुण-तरुणी 'चुइंग गम' (एक असा पदार्थ जो तासतास सावकाश चघळता येतो) फार पसंत करतात. सिगरेट ओढणें तर सामान्य गोष्ट आहे. काहो लोकांनी तर आम्हाला सांगितलें की ते सिगारेट यासाठी ओढतात की हातांत सिगारेट धरल्याने आपण एखाद्या कामात आहोत असें त्यांना वाटत असतें. माणसांचें काम यंत्रांनी करावें आणि माणसाला गुंतवून ठेवण्यासाठी त्या यंत्रांनी 'चुइंग गम' व सिगारेट या वस्तु निर्माण कराव्यात, ही आहे या नव्या युगाची यांत्रिक सभ्यता !

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंकडयांनुसार प्रत्येक नऊ सेकंदाला एक मनुष्य नांवाचा प्राणी भुकेला बळी पडून मरतो. पण जर अमेरिकेसारख्या देशात होणाऱ्या अन्नाच्या नासाडीचा हिशोब केला तर तेवढ्या अन्नाने असंख्य लोकांचे प्राण बचावले जाऊ शकतील. कागदाच्या नासाडीचा तर काही पारच नाही. रद्दी, केरकचरा उचलून नेण्यासाठी एक परिपूर्ण तंत्रच उभे केलें आहे. एकटया 'न्यूयॉर्क टाइम्स' चा रविवारचा अंक छापण्या-साठी दहा एकर जमिनीवरचा बांबू कापून त्याचा जेवढा कागद तयार होईल तेवढा कागद त्याला लागतो. ८० टक्के जाहिरातींनी भरलेल्या या अगडबंब अंकाचें वजन दोन अडीच किलोग्रामपर्यंत असतें. ( १९६५च्या सप्टेंबरच्या अंकाचें वजन ४ किलोग्राम होतें ) आणि 'संस्कृती' च्या नांवावर या गोष्टीचा आम्ही डोळे मिटून स्वीकार करतो. हें मात्र खरें

की कोणाला कागदाचा एखादा तुकडा जरी फेकायचा असला तरी तो कुठे इकडे तिकडे सडकेवर फेकत नाही तर जेथे कचरा टाकण्याचा डबा ठेवला असेल तेथेच टाकील ही गोष्ट मला आवडली. जागजागीं असे डबे ठेवले आहेत, जर एखाद्याने कागदाचा छोटासाहि तुकडा इकडे तिकडे फेकला तर त्याला दहा डॉलर दंड द्यावा लागेल. म्हणून अमेरिकन शहरात एक विशेष प्रकारची स्वच्छता आम्हाला दिसली. पण ती स्वच्छता-हि न्यूयॉर्कच्या ' हारलम ' सारख्या वस्तीत कमी च आहे.

एक दिवस फिलाडेल्फियात आमची सभा आटोपल्यावर संयोजकाने श्रोत्यांच्यासाठी थोडी चहापाण्याची व्यवस्था केली होती. कागदाच्या लगद्याची बनवलेली सुंदर प्लेट व प्लॅस्टिकचा आकर्षक चमचा यांचा वापर केल्यानंतर त्या कचऱ्याच्या डब्यात फेकून दिल्या गेल्या. ते धुणार कोण आणि सांभाळणार कोण ? धुण्यासाठी नोकर ठेवला तर तो इतका महाग पडेल की तेवढ्या खर्चात किती तरी आणखी चमचे खरेदी केले जाऊ शकतील !

अमेरिकेत वस्तु स्वस्त आहेत, माणूस महाग आहे; तर भारतात माणूस स्वस्त आहे, वस्तु महाग आहेत. अमेरिकेत बहुधा प्रत्येक इसमा-जवळ मोटरकार असते पण ड्रायव्हर तर हजारात क्वचित् एखाद्याच्याच जवळ असेल. सर्व लोक आपली गाडी स्वत:च चालवितात. दोनचार हजारात मोटर मिळू शकते. पण ड्रायव्हर ठेवायचा असल्यास त्याला कमीत कमी हजार रुपये महिना पगार द्यावा लागेल. कोणी अमीर असामी घर कामासाठी नोकर ठेवतो तर तो नोकर आपल्या स्वत:च्या कारमधून येतो. तो सहासात तास घरात सफाई करील, स्वयंपाक करील, भांडी वगैरे साफ करील आणि हजार रुपये मासिक वेतन घेऊन आपला प्रपंच चालवील. तशी तर अमेरिकेत बहुतेक कामें यंत्रद्वारेच केलीं जातात. दाढी करायला विजेचें मशीन हजर आहे. दांत घासायचा ब्रश विजेने चालतो. स्त्रिया आपले ओले केस विजेने सुकवितात. विजेच्या ब्रशने आपले केस विंचरतात. जोड्याला पॉलिश करायलासुद्धा विजेचा ब्रश आहे. कपडे धुणें व वाळवणें हें तर विजेच्या मशिनांचें सामान्य कामच

आहे. विजेचे घोंगडे पांघरून निजा आणि रात्रभर ऊबदार रहा. वजनदार रजई पांघरण्याची काही जरूर नाही.

## अमेरिकन लोक व शांति-आंदोलन

अमेरिकेच्या ज्या वैशिष्टचाने मला सर्वात अधिक प्रभावित केलें तें म्हणजे तिच्या विविधतेतील एकतेने. शेकडो प्रकारचीं लहानमोठीं राजनैतिक दलें आणि धार्मिक पंथ पाहून मी तर दंग झालो. हिटलरला युगनेता मानून नाझी-पार्टी चालविणारेहि या देशात कायदेशीर रीत्या सुरक्षित आहेत आणि त्या नाझी पार्टीच्या क्रोधाला बळी पडणारे यहूदी लोकहि सुरक्षित आहेत. गोऱ्या वंशाच्या पवित्रतेत व सर्वश्रेष्ठतेत विश्वास ठेवणारे 'कू क्लुक्स क्लान' पार्टीचे लोकहि निग्रो-वंशाच्याविरुद्ध स्वातंत्र्यपूर्वक निग्रो-विरोधी आंदोलन चालवीत आहेत आणि तशाच स्वतंत्रतेने काळचा निग्रो-वंशाच्या पवित्रतेची व सर्वश्रेष्ठतेची वकिली करणारे लोक, गोऱ्या वंशाचा 'राक्षस-वंशी' म्हणून प्रचार करीत आहेत. फॅसिस्ट विचारांच्या उपासकांची 'जॉन वर्च सोसायटी'हि धडाक्याने आपला प्रचार चालवीत आहे. अहिंसा, समता व शांतीच्या गोष्टी करणारे पॅसिफिस्टहि 'नगाऱ्या पुढे टिमकीचा आवाज' याप्रमाणें आपला आवाज प्रगट करीत आहेत. अधिकांश वृत्तपत्रें व पत्र-पत्रिका, व्यापारी, भांडवलदार व जाहिरातदार यांच्या दडपणामुळे सत्य व वस्तुस्थिति प्रगट करू शकत नाहीत. तरीसुद्धा 'प्रोग्रेसिव्ह,' 'लिबरेशन,' 'दि मायनॉरिटी ऑफ वन,' 'नेशन' इत्यादि काही लहान-मोठीं प्रगतिशील-पत्रें प्रकाशित होतातच. भलेहि त्यांचा आवाज 'अरण्य-रुदन'वत् व्यर्थ जात असो. सामान्यपणे रेडियो व टेलिव्हिजन यांवर चालणाऱ्या कार्यक्रमांची पातळी अत्यंत व्यापारी दृष्टीची व कमी योग्यतेची असते तरीसुद्धा के. पी. एफ. ए. यासारखी काही रेडियो स्टेशनें आपला उच्च स्तर कायम ठेवण्यांतहि यशस्वी झाली आहेत, आणि नुकसानीत चालत असूनहि जिवंत आहेत. अशा प्रकारच्या विविधतेचा हा देश आहे.

अमेरिकेत आत्मपरीक्षणाची प्रवृत्तिहि वाढत आहे. मी अशीं अनेक पुस्तकें पाहिलीं जीं अमेरिकन जीवनाचें खोल परीक्षण सादर करतात.

'अग्ली अमेरिकन्स' 'अदर अमेरिका' अशा प्रकारच्या काही पुस्तकांनी माझें लक्ष वेधलें. या आत्मपरीक्षणाच्या प्रवृत्तिने अमेरिकेला आपला विकास करण्याची नवी दिशा दाखविली आहे. अमेरिकेचें स्वरूप आंतर-राष्ट्रीय मानलें जाऊ शकते. इंग्लंड, जर्मनी, पोलंड, रशिया, इटली इत्यादि देशांतून आलेल्या कोटयवधि लोकांचें संमिलित रूप म्हणजे अमेरिका. अमेरिकेचे मूळ रहिवासी तर अमेरिकन इंडियन लोक आहेत ज्यांची संख्या फारच कमी आहे. केवळ येथील रहिवासीच नाही तर येथील शहरांचीं नांवें सुद्धा जगातील विभिन्न देशांतून घेतलेलीं आहेत. एके दिवशी आम्ही आमच्या यजमानिणीबरोबर कुठे जात होतो तर ती म्हणाली : "हें मास्को आहे." "हें मास्को?" मी आश्चर्याने विचारलें. "होय, महाराज, हें मास्को आहे. पण मास्को, 'यू. एस्. एस. आर.' नाही; मास्को, 'यू. एस्. ए' आहे." अमेरिकेत केवळ मास्कोच नाही; पॅरिस, रोम, लंडन, र्बलिन, इत्यादि जगभरच्या शहरांच्या नांवांचीं बसलेलीं शहरें आहेत. फार काय, दिल्लीहि आहे आणि न्यू दिल्ली सुद्धा. किती मजेदार आहे हा देश !

अमेरिकन लोक सरळ मनाचे आणि मोकळ्या हृदयाचे आहेत, सामान्य अमेरिकन नागरिकाची वृत्ति अधिक पैसा मिळविण्याची व सुरक्षित राहण्याची, चिंता करण्याची जास्त असते. कोणत्याहि इतर देशा-प्रमाणे येथील लोकहि राजनैतिक बाबतीत जास्त लक्ष घालीत नाहीत. उलट इंग्लिश, जपानी व भारतीय विद्यार्थ्यांच्या तुलनेत अमेरिकेचे विद्यार्थी राजनैतिक व सामाजिक चळवळीत अपेक्षेपेक्षा कमी भाग घेतात. निग्रो-चळवळीने पहिल्या प्रथम तरुण वर्गात सामान्य आंदोलनाचें चैतन्य निर्माण केलें आणि हजारों विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने कार्यक्षेत्रात उतरण्याची संधि मिळाली. अमेरिकेतील शांति-आंदोलन तरुणात व विद्यार्थि-वर्गात निग्रो-आंदोलनाप्रमाणे चैतन्य निर्माण करू शकलें नाही. 'स्टुडंट्स पीस युनियन' नांवाच्या संस्थेने या दिशेने थोडा प्रयत्न केला आहे आणि 'कमिटी फॉर नॉन-व्हायोलंट ॲक्शन' नेहि काही क्षेत्रात संघटित जागृति निर्माण केली आहे.

शांति-आंदोलनाचें नेतृत्व करणाऱ्या संस्थांमधे 'सेन न्यूक्लियर पॉलिसी' व 'टर्न टोवर्डस् पीस' यांचीं नांवें विशेष रूपाने घेतलीं जातात. पहिली संस्था, जी सेनच्या नांवाने प्रसिद्ध आहे, आपल्या सैद्धांतिक शिथिलतेमुळे आणि आदर्शवादाच्या अभावामुळे अनेक प्रकारच्या मतभेदांत सापडली आहे. लोक असेंहि समजू लागले आहेत की अण्वस्त्रांच्या प्रयोगांवर बंधन घालणाऱ्या मास्को करारानंतर आता या प्रकारच्या अण्वस्त्र-विरोधी आंदोलनाची खास जरूर राहिली नाही. म्हणून सेनचें काम काहीसें शिथिल पडलें आहे. अमेरिकेतील हजारों महिलांनी शांति-आंदोलनात पाऊल टाकून साऱ्या देशाला एकावेळी हलवून सोडलें होतें. 'विमेन स्ट्राइक फॉर पीस' म्हणजे महिलांच्या शांति-आंदोलनांची सफलता. अमेरिकेतील महिला ज्याप्रकारे शांति-आंदोलनात सक्रिय झाल्या आहेत तशाच तऱ्हेने दुसऱ्या देशांतील महिलाहि पुढे आल्या तर फार मोठें काम होऊ शकते. पुरुषांना आपल्या व्यापारधंद्यातून व कारखानदारीतून फुरसत मिळत नाही. महिला-वर्ग आर्थिक जबाबदारीतून पुष्कळसा मुक्त असल्यामुळे अधिक वेळ देऊ शकतो. अमेरिकन शांति-आंदोलनावर एक विशिष्ट जबाबदारी आहे आणि जगाचे लोक त्यांच्याकडून काही विशिष्ट अपेक्षाहि ठेवतात. अमेरिकेच्या शांतिवादी संस्था जागतिक शांति-आंदोलनाचें नेतृत्व करण्याची भूमिका पत्करणार नाहीत आणि केवळ कम्युनिस्ट विरोधी मोर्चा बनून राहतील तर त्यांच्याकडून जागतिक शांतिवाद्यांच्या अपेक्षा कशा पुऱ्या होऊ शकतील? हिंसात्मक शस्त्रांच्या अत्युच्च शिखरांवर पोहोचलेल्या अमेरिकेत अहिंसेच्या श्रेष्ठ आदर्शाची तहानहि जागृत झाली आहे. अमेरिकेचे सुप्रसिद्ध कवि, पत्रकार, आणि साहित्यिक श्री. केनेथ रेक्सरोथ यांनी एका मुलाखतीत मला म्हटलें: "स्वत: शांतिवाद्यांचा आपल्या आदर्शाच्या सफलतेवर विश्वास नाही. आणि हीच अमेरिकन शांति-आंदोलनाची सर्वांत मोठी कमजोरी आहे." श्री. केनेथी आणखी म्हणाले: "काही लोक आपल्या श्रेष्ठ सिद्धांताचा प्रचार करायला एवढ्यांसाठी घाबरतात की कुठे त्यांचीं आदर्शवादी मतें ऐकून बहुसंख्य सामान्य जनतेचा त्यांना असलेला पाठिंबा कमी होईल." श्री. केनेथींच्या या टीकेत मला सार दिसले.

प्रसिद्ध अहिंसावादी निग्रोनेता श्री. बायर्ड रस्टिन यांच्याशी दोन वेळा आमची मुलाखत झाली. ते युद्ध-विरोधी आंतरराष्ट्रीय सभेचे ( W. R. I. ) मंत्री असून त्या दृष्टीने अमेरिकेच्या शांति-आंदोलनाचे प्रमुख नेते आहेत. श्री. रस्टिन 'वॉशिंगटन मार्च' चे संयोजक व न्यूयॉर्क मधील 'शाळांवर बहिष्कार टाकण्याच्या आंदोलना' चे संघटक असून त्यात त्यांना पूर्ण सफलता प्राप्त झाली आहे. निग्रो आंदोलनाला गांधी-विचाराच्या मार्गावर अहिंसक आंदोलनाच्या रूपात विकसित करण्याचा आणि सत्याग्रह व असहयोग यांच्या विचारांना प्रत्यक्ष रूप देण्याचें श्रेय डॉ. मार्टिन लूथर किंग यांच्यानंतर श्री. रस्टिन यांनाच आहे. परिस्थितीच्या दडपणामुळे राजनैतिक स्तराहून वर उठणें कधी कधी कठिण होत असले तरी राजनैतिक चर्चेपेक्षा शांतीचें काम अधिक मानवहितवादी आहे असें त्यांनी म्हटलें आहे. आज अणु-युगाच्या आव्हानाच्या रूपाने शांतीची आवश्यकता उत्पन्न झाली आहे व म्हणून एका सामान्य नागरिकापासून तों उच्च सैनिक कमांडरापर्यंतच्या तोंडून शांतीच्या गोष्टी ऐकायला मिळतात. भलेहि कोणी कम्युनिस्ट असो किंवा भांडवलवादी असो. शांतीची गोष्ट करण्यांत काही हानि नाही, फक्त त्यामागे राजनैतिक डावपेंच नसावा. आम्हाला सुद्धा याची स्पष्ट जाणीव असायला पाहिजे की ज्या अहिंसेच्या भूमिकेला आम्ही स्पष्ट करू इच्छितो ती केवळ 'शांति' शब्दाने प्रगट होऊ शकणार नाही. प्रत्यक्ष आचरणात प्रगट झाली पाहिजे.

## अमेरिकेतील शिक्षण

अमेरिकेला गेलेल्या माझ्यासारख्या प्रवाशाला शिक्षण-संस्था पाहणें एक खास आवडीचा विषय होता. रशिया, जर्मनी, फ्रान्स व इंग्लंड येथील शिक्षण-संस्था पाहिल्यानंतर अमेरिकन शिक्षण-पद्धति समजून घेण्याची उत्सुकता स्वाभाविकच होती. माझा पहिला आवडीचा विषय म्हणजे शांति आणि दुसरा शिक्षण. म्हणून जेथे कुठेहि शिक्षण व्यवस्था समजून घेण्याची संधि मिळाली तिचा मी फायदा घेतला. माझ्या मनात नेहमी हें खटकत आहे की स्वातंत्र्योत्तर भारतांत जर कशाची जास्त उपेक्षा झाली असेल तर ती शिक्षणाबद्दल.

प्रसिद्ध वैज्ञानिक अलबर्ट आइन्स्टीन यांच्या साधनेने पवित्र झालेल्या प्रिंटन विश्वविद्यालयापासून हॉवर्ड व कोलंबिया विश्वविद्यालयापर्यंत जाऊन, शेवटी अत्यंत आधुनिक व वैज्ञानिक साधनांनीं संपन्न अशा या विश्वविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचें जीवन कसें आहे, तसेंच त्यांच्या विचारांची परिपक्वता किती उच्च आहे आणि ३०-४० हजार संख्येने असलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या येथे स्थान देऊन या विद्या-केंद्रांनी मानवी संबंधाच्या क्षेत्रात कोठपर्यंत पुढे पावले टाकलीं आहेत हें समजून घेण्याचा मी प्रयत्न केला.

अमेरिकेच्या शिक्षण-संस्था एकसारख्या नाहीत. प्रत्येक कॉलेजाची व विश्वविद्यालयाची आपली पद्धति व आपलें स्वतंत्र स्वरूप असतें. वेरमाँट राज्याच्या दोन कॉलेजांत आमच्या भाषणाचा कार्यक्रम होता. या दोन्ही शिक्षण-संस्थांत काही आकर्षक पद्धत आम्हाला आढळली. सुमारे दीडशे विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रत्येक कॉलेजमधे होतीं. त्यांचें अध्ययन व निवास दोन्ही तेथेच होती. इतक्या थोड्या विद्यार्थ्यांच्यासाठी ३०-४० प्राध्यापक होते. तेथे आम्हाला मानवी-स्पर्शाचें दर्शन झालें, आणि शिक्षणाची पातळी अपेक्षेपेक्षा वरची आढळली. अमेरिकेच्या सामाजिक जीवनाच्या व कौटुंबिक जीवनाच्या परंपरेत कॉलेजांत शिकणारे विद्यार्थी घरात राहण्या-ऐवजी छात्रालयात राहतात. मुलें व मुली एकत्र राहून जीवन घालवितात. ज्या मुलाला ' मुलगी-मित्र ' नसेल व ज्या मुलीला ' मुलगा-मित्र ' नसेल तीं स्वत:ला काही कमी प्रतीची मानतात. भिन्न भिन्न राज्यांत शिक्षणाचे प्रकारहि भिन्न भिन्न आहेत. काही शाळा व कॉलेजें सरकारीहि आहेत. अधिकांश शिक्षण-संस्था सामान्य लोकांच्या देणग्यावर स्वत:च्या पद्धतीने चालतात. गैरसरकारी शिक्षण-संस्था फार महागड्या आहेत. दर वर्षी ३-४ हजार डॉलर (सुमारे १६ हजार रुपये) चा खर्च येतो. इतकें महाग शिक्षण मनाला घाबरवून टाकणारें आहे. तरुण विद्यार्थ्याला दरवर्षी आपल्या पालकाकडून इतका पैसा घेणें पसंत पडत नाही. तो स्वावलंबन करू इच्छितो. एवढ्या मोठ्या खर्चाच्या कारणामुळे अनेक विद्यार्थी स्वत:ला पसंत अशा विश्वविद्यालयांत जाऊ शकत नाहीत. सरकारी विश्वविद्यालयांत

शिक्षण कमी खर्चाचें असतें. पण गैरसरकारी विश्वविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत सरकारी विश्वविद्यालयांतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी लेखलें जातें.

श्रीमान घराण्यांतील विद्यार्थीहि कोणतेंहि काम करून आपल्या शिक्षणाचा खर्च स्वत: भागवतात. कसलेंहि काम करण्यात अप्रतिष्ठा होते असें ते मानत नाहीत. हॉटेलमधे भांडी विसळण्याचें काम असो किंवा सफाईचें काम करायचें असो हे विद्यार्थी सर्व काही सहजतेने करतात. श्रमाची अशी प्रतिष्ठा व असें मूल्य भारतात केव्हा प्रस्थापित होईल ? प्रिंस्टन विश्वविद्यालयाच्या एका विद्यार्थ्याने आम्हाला सांगितलें की शिक्षणाचा खर्च पुरा पाडण्यासाठी तो हॉटेलमधे काम करतो आणि सबंध दिवसात एकदाच खाऊन आपलें काम निभावून घेतो.

अशा तऱ्हेचें अति आधुनिक व उच्च शिक्षण मिळत असूनहि गुन्ह्यांची संख्या इतकी का वाढत आहे ? केंद्र सरकारने नेमलेल्या तपास समितीने १९६२ सालच्या गुन्ह्यांचें परीक्षण करतांना म्हटलें आहे की गंभीर गुन्ह्यांच्या २० लाख घटना त्या वर्षी घडल्या. राष्ट्रपति केनेडीं-च्या हत्येने साऱ्या जगाला चकित केलें. पण खून-हत्या या देशाला काही नवी गोष्ट नाही. १९६२मधे रोज २४ खून झाले आहेत. याचा अर्थ प्रत्येक तासाला एक मानव मृत्युमुखात गेला. जर अशा हिंसेला व घृणेला आळा घातला गेला नाही तर शिक्षण पद्धतीतच कुठे तरी दोष आहे असें मानावें लागेल. १९६२ सालीं बलात्कारांच्या सर्व घटनांची सरासरी रोज ५० पडली. बलात्कारांच्या सर्व घटना पोलिसांपर्यंत पोहोचत नाहीत हें तर निश्चित आहे. दर चार मिनिटाला एक झगडा पोलिसांच्याकडे येतो. पोलिसांकडे न आलेले किती झगडे व बलात्कार घडले यांचा काही हिशोब नाही. प्रत्येक रविवारीं चर्चमधे धार्मिक शिक्षण दिलें जातें. म्हणून असें म्हणता येणार नाही की धार्मिक शिक्षणाच्या अभावी गुन्हे वाढले आहेत. प्रत्येक मोहोल्यात व प्रत्येक सडकेवर दोनचार चर्चेस मिळतीलच. कम्युनिस्ट देशात ज्याप्रकारे धर्माला मुद्दाम बहिष्कृत केलेलें आहे त्या-ऐवजी येथे चर्च व धर्म यांना अधिक प्रतिष्ठा दिली गेली आहे. तरीसुद्धा गुन्ह्यांची संख्या इतकी मोठी आहे.

अमेरिकेतील शिक्षण-संस्थावर राज्याचें नियंत्रण तर कमी आहे, परंतु देणगी देणाऱ्या दात्यांचा प्रभाव त्यांच्यावर अधिकच आहे. कुठे कुठे तर इच्छा नसतांनाहि विद्यार्थ्याला कॉलेजच्या चर्चमधे अनिवार्य रूपाने एवढयासाठी जावें लागतें की त्या कॉलेजचा खर्च अमुक चर्चकडून केला जातो.

अमेरिकन शिक्षण-पद्धतीत सर्वांत अधिक आकर्षणाची बाब म्हणजे विद्यार्थ्यांची संपूर्ण जबाबदारी प्राध्यापकाच्या शिरावर असते. विश्वविद्यालयाकडून शिक्षकांची व विषयांची लांब यादी विद्यार्थ्यांना दिली जाते. आपले विषय व शिक्षक निवडण्यासाठी विद्यार्थी स्वतंत्र असतो. विद्यार्थी जेव्हा आपल्या शिक्षकांची व विषयांची निवड करतात तेव्हां शिक्षक विद्यार्थ्यांच्यासाठी पुस्तके सुचवितात. हे शिक्षकच परीक्षा घेतात.

भारतांतील विश्वविद्यालयात तर विश्वविद्यालयाकडून त्यांनी पसंत केलेला शिक्षणक्रम शिक्षक व विद्यार्थी यांच्यावर लादला जातो. पण अमेरिकेत विश्वविद्यालयात या केंद्रित निर्णय-पद्धतीला दूर सारून प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यावर सर्व काही सोडून दिलें जातें. भारतात शिक्षक शिकवितो काही निराळे, परीक्षक प्रश्न-पत्रिकेत काही निराळेंच विचारतो. उत्तर-पत्रिकांची तपासणी कुठे तिसऱ्या ठिकाणींच होते. जेव्हा विद्यार्थी प्रश्नांची उत्तरें देऊ शकत नाही तेव्हा तो एक तर कॉपी करतो किंवा चोरी करतो आणि पकडला गेला तर तपासणीसाठी नेमलेल्या प्राध्यापकावर हल्ला करून बसतो याचें हेंच कारण आहे. पण अमेरिकेत असें काही होत नाही. तेथे जो प्राध्यापक पुस्तकांची निवड करतो तोच तीं शिकवतो, तोच प्रश्न-पत्रिका काढतो, तोच परीक्षा घेतो, तोच प्रश्नोत्तरांची तपासणी करतो व तोच मार्क देतो. तोच विद्यार्थ्याला पास किंवा नापास करतो. प्राध्यापकाचा प्रत्येक निर्णय शेवटचा असतो. विश्वविद्यालयाच्या कोणाहि अधिकाऱ्याला विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामधे हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

अशा पद्धतीत विद्यार्थी व शिक्षक यांच्यात आपलेपणा निर्माण होतो. दोघे परस्परांना जबाबदार राहतात. दोघांमधे अेकमेकाबद्दल आदर-

भाव वसतो. बेशिस्तीचे प्रकार आपोआप कमी घडतात. जेव्हा मी काही जणांना विचारलें की येथील विद्यार्थी कधी हरताळ करतात काय ? तर ते लोक माझा प्रश्नच समजू शकले नाहीत. विद्यार्थी आणि हरताळ ? आणि इकडे भारतात तर हरताळ केलेल्या विद्यार्थ्यांवर गोळ्यासुद्धा चालविल्या जातात ! भारतांतील विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यांत नाही अशा प्रकारचा आदरभाव; अन् नाही कशा प्रकारचें गाढ नातें !

## हे अमेरिकन इंडियन

अमेरिकेतील बहुसंख्य लोक युरोपच्या भिन्न भिन्न देशांतून आलेले आहेत. देशाचा राजनैतिक, सामाजिक, व सांस्कृतिक इतिहास दोनशे वर्षांपेक्षा जुना नाही. पहिल्या प्रथम जेव्हा कोलंबसाने या भूमीचा शोध लावला तेव्हा त्याला वाटलें की आपण 'इंडिया' ला—– हिंदुस्तानला पोहोचलो. म्हणून त्याने या भूमीवर राहणाऱ्या लोकांना 'इंडियन्स' म्हणून म्हटलें. एके काळी हें सारें खंड याच लोकांच्या अधिकारात होतें. परंतु युरोपांतून आलेल्यांनी त्यांच्यावर विजय मिळविला आणि त्यांच्या अधिकांश भूमीवर कबजा केला. नंतर जेव्हा युरोपियन लोक या महाखंडात नेहमीसाठी स्थायी झाले आणि त्यांनी आपआपलीं सरकारें स्थापन केलीं तेव्हा या 'इंडियन' लोकांशी काही करार केले आणि त्यांच्यासाठी काही जमीन कायद्याने सुरक्षित करून दिली.

आता या इंडियन लोकांची फारच थोडी संख्या शिल्लक आहे —– साडे पांच लाखांच्या जवळपास. या जातीचे लोक अधिक पश्चिमेकडील राज्यात आढळतात आणि हे लोक पुष्कळच उपेक्षित स्थितीत आहेत. प्रारंभी यांना आश्वासन दिलें गेलें होतें की त्यांना सुद्धा अन्य अमेरिकन लोकांप्रमाणेच शिक्षणादिकाची सोय करून दिली जाईल परंतु प्रत्यक्ष युरोपियन जातीच्या लोकांच्या तुलनेत त्यांची फारच कमी सोय केलेली आहे. त्यांची आर्थिक पातळीहि अन्य अमेरिकन नागरिकांच्या तुलनेत फारच खालची आहे. सरकारी आंकड्यांनुसार त्यांची वार्षिक प्राप्ति अन्य अमेरिकन लोकांच्या तुलनेने निम्म्यापेक्षा कमी आहे. त्यांच्यासाठी औषधोपचाराची सोयहि ठीक नाही. या जातीच्या कुटुंबात बाल-मृत्यूंची संख्या

सामान्य बाल-मृत्यूपेक्षा दुप्पट आहे. त्यांचें सरासरी जीवनमान ४१ वर्षांचें आहे, तर संपूर्ण देशाचें प्रमाण ६२ वर्षे आहे.

मी अलबुकर्की नांवाच्या शहरात असताना एका इंडियनाने मला सांगितलें: "आमची सारी जमात अत्यंत उपेक्षित स्थितीत आहे. ज्याप्रमाणे नीग्रो आपल्या अधिकारांची मागणी करीत आहेत त्याप्रमाणेच आम्हालाहि समानतेचे अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी आंदोलनाला प्रारंभ करावा लागेल."

न्यू मेक्सिको राज्यात इंडियनांच्या एका छोटयाशा गावात मी गेलो होतो. मला वाटलें 'मी अमेरिका सोडून कोठल्या तरी दुसऱ्या देशात येऊन पोहोचला आहे. गांवाचें वातावरण, राहणी वगैरे सर्व काही निराळें होतें. लहान लहान मातीच्या घरांत राहणारीं कुटुंबें शहरी जीवनाच्या सर्व सुख-सोयींनी वंचित होतीं. मी एका कुटुंबात गेलो. हें कुटुंब पूर्वीचें 'ग्रामपति' कुटुंबापैकी होतें. पण कुटुंबातील महिला देश-दुनियेबद्दल अगदी अजाण होत्या. गांवाची शासन-व्यवस्था विकेंद्रित रूपाने चाललेली पाहून मला आनंद झाला. भारतात आम्ही ज्या पंचायत-राज्याची कल्पना करतो तसलेंच पंचायती-राज्य मी येथे पाहिलें.

हे इंडियन लोक हस्तव्यवसाय व कुटीर-उद्योगांत फार प्रवीण आहेत. अमेरिकेसारख्या औद्योगिक देशांत या लोकांनीं हस्तकलेला जिवंत ठेवलें आहे. हातविणाईचें सुंदर काम पाहून तर मी आश्चर्यचकित झालो. मातीचीं भांडीं, लाकडांचीं खेळणीं, गवताच्या टोपल्या व चांदीचे अलंकार बनविण्यांतहि हे लोक प्रवीण आहेत. पण यंत्राच्या स्पर्धेत हे उद्योग मृत्युपंथाला लागले आहेत.

या इंडियन लोकांच्या कल्याणासाठी अेक आंदोलनहि चालू झालें आहे. त्या लोकांचे प्रमुख पुढारी प्रो. थियोडोर हेजल यांनी मला सांगितलें. "यांत्रिक-संस्कृति या लोकांवर न लादता यांचें शैक्षणिक, आर्थिक व भौतिक स्तर वाढविण्यासाठी आम्ही सरकार व जनता यांचें ध्यान आकृष्ट करू इच्छितो. इंडियनांची संस्कृति, कला व परंपरा आपलें विशेष महत्त्व राखते. ती जिवंत राहिली पाहिजे."

## थोरो यांच्या कुटींत

" सविनय कायदेभंगाचें शस्त्र अत्यंत प्रभावशाली आहे. तुम्हाला हें शस्त्र कोठून प्राप्त झालें ?" प्रसिद्ध अमेरिकन पत्रकार लुई फिशर यांनी म. गांधींना विचारलें.

" अमेरिकेमधून " बापूंनी हंसत उत्तर दिलें.

" अमेरिकेमधून ?" लुई फिशरने आश्चर्यानें विचारलें. बिचारा पत्रकार घोटाळ्यात पडला.

" होय लुई. यात आश्चर्य करण्यासारखी गोष्ट नाही. अमेरिकेचे महान चिंतक हेनरी डेव्हिड थोरोच माझे गुरु आहेत. त्यांच्याकडूनच मी सविनय कायदेभंगाचा धडा शिकलों. "— बापूंनी आपलें म्हणणें स्पष्ट केलें.

मी जेव्हा हें विवरण वाचलें त्या दिवसापासून माझ्या मनात तऱ्हेतऱ्हेच्या जिज्ञासा उत्पन्न होऊ लागल्या. मी थोरोंचें नांव प्रथम वाचलें होतें. 'कोण आहे हा महान चिंतक जो म. गांधींना प्रेरणा देऊ शकतो ? ' हा प्रश्न वारंवार माझ्या मनात घोळू लागला. मी पुस्तकालय धुंडाळलें, पण दुर्दैवाने पुस्तक काही मिळालें नाही. माझी जिज्ञासा वाढत गेली. एक दिवस कोणत्या तरी मासिकाचीं पानें चाळत होतो. संपादकाने एका लेखाच्या खाली रिकाम्या राहिलेल्या जागीं एक छोटासा संवाद छापला होता. हा संवाद होता थोरो आणि त्याचे मित्र महान विचारक श्री. इमर्सन यांच्या मधला. सरकारला व्यक्ति-कर देण्यास इन्कार केल्याबद्दल थोरोंना कैद करून जेलमध्ये बंद केलें होतें. मेक्सिकोशी चाललेल्या युद्धात, सरकार, लोकांकडून कर रूपाने मिळणाऱ्या पैशाचा उपयोग, युद्धाच्या खर्चासाठी करीत होतें म्हणून त्यांनी हा कर देण्यास विरोध केला होता. थोरोंना भेटण्यासाठी कवि इमर्सन जेलच्या कोठडीजवळ पोहोचले आणि विनोदाने म्हणाले : "बोला हेनरी, जेलच्या कोठडीत बसून काय करीत आहात ? " हेनरीने उत्तर दिलें : "मित्रवर्य इमर्सन, तुम्ही जेलच्या कोठडीबाहेर उभे राहून काय करीत आहात ?" या प्रश्नांत उत्तरहि होतें आणि एक जबरदस्त आव्हानहि. जेल कोठडीच्या बाहेर

उभे राहून अन्याय सहन करण्यापेक्षां अन्यायाचा प्रतिकार करीत असतांना जेलच्या कोठडीत बंद राहून होणारें दुःख निश्चित कमीच असतें.

वरील संवादानें माझें मन आणखी त्यांच्याकडे ओढलें गेलें. पुष्कळ तपासानंतर मला थोरोंचा एक निबंध – सविनय कायदेभंग – (सिव्हिल डीस-ओबिडिअन्स) वाचायला मिळाला. या निबंधाने मला एक नवा प्रकाश मिळाला. जगातला कोणताहि कायदा व्यक्तीच्या सदसद्विवेक बुद्धीपेक्षा वरचढ नाही असे त्यांत थोरोंने प्रतिपादिलें होतें. सदसद्विवेक बुद्धीवर आघात होत असेल तर त्या कायद्याला आव्हान देणें किंवा तो कायदा न मानणें हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे. गांधींना याच विचाराने प्रेरणा मिळाली आणि त्यांनी, इंग्रजांनी हिंदुस्तानवर लादलेल्या मिठाच्या कायद्याविरुद्ध असहकार पुकारला. मार्टिन लूथर किंगला सुद्धा थोरोकडून प्रेरणा मिळाली आणि त्यांनी वंशभेद (रंगभेद) कायदा मानण्यास विरोध केला. बर्ट्रेण्ड रसेल यांनाहि थोरोकडून प्रेरणा मिळाली आणि त्यांनी अण्वस्त्रांविरुद्ध निदर्शन करण्याबद्दलचा प्रतिबंध मोडून जेलमधे जाणें पसंत केलें.

आम्ही आमच्या शांतियात्रेच्या प्रवासात असतांना अमेरिकेत जेव्हा फिरत होतो तेव्हा आमच्या मनात थोरोंच्या कुटीवर जाऊन आपली श्रद्धांजलि त्यांना अर्पण करावी अशी प्रबल इच्छा होती. अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर बसलेल्या बोस्टन शहरापासून सुमारे ४० मैल दूर वॉल्डेन पाँडच्या वनमार्गात थोरोंनी स्वहस्तें एक छोटीशी कुटी तयार केली होती. कोणाहि मजुराची मदत न घेता संपूर्ण कुटी त्यांनी स्वतः तयार केली होती. स्वावलंबी व श्रमिक जीवनाचा आदर्श त्यांना फार आवडत असे. पैशांचा व्यवहार कमीत कमी करण्याची त्यांची इच्छा असे. मानव जीवनातील नैसर्गिक सरलता व साधेपणा यांना संपत्ति व सत्ता हीं बाधक आहेत असें ते मानीत. जेलमधून सुटका झाल्यावर त्यांनी याच टेकडीवर आपल्या मित्रांना मेजवानी दिली होती. आपल्या मित्रपरिवारात उत्कट स्वातंत्र्य अनुभवित असतांना ते म्हणाले: " राज्य कुठेच तर दिसत नाही ! " या एकाच वाक्याने थोरोंच्या शासन-मुक्तीचे विचार समजले जाऊ शकतात.

जेव्हा आम्ही वॉल्डेन पाँडला पोहोचलो तेव्हा सूर्यास्ताचा समय होता. क्षितिजाच्या लाल पृष्ठभूमीवर वॉल्डन पाँडचे उंचउंच वृक्ष सुंदर दिसत होते. वर्फाच्छादित शुभ्र भूमीवर अंधाराची कृष्ण छाया पसरत होती. या सुंदर जंगलात सडकेवर आम्ही आमची मोटर उभी केली. आमचे दोन अमेरिकन मित्र अंधाऱ्या पाऊल वाटेवर पुढे चालून मार्ग दाखवीत होते व आम्ही त्यांच्या मागे जात होतो. फेब्रुवारीचा थंडीचा महिना. जोराची हवा. कधी कधी अशी तुफान हवा मला फार बरी वाटते. ओव्हरकोट, फरची गरम टोपी व हात मोज्यामुळे या झोंबणाऱ्या थंडीचा आम्हाला जास्त त्रास होत नव्हता. दोनतीन दऱ्या ओलांडून आम्ही मुक्कामावर पोहोचलो. सध्या कुटीवर काही नाही. पडकें खंडार मात्र आहे. सरकारने एक शिलालेख पुरून ठेवला आहे. ज्यावरून लक्षात येते की येथे थोरो राहत होते. हें स्थान संपूर्णरीतीने उपेक्षित आहे. तरी चोहीकडील नैसर्गिक वातावरण अत्यंत रम्य आहे. जर या स्थानाकडे थोडे जरी ध्यान दिलें गेलें तरी प्रवासी लोकांचें हें एक उत्तम आकर्षण-केंद्र बनू शकेल. एक एक दगड व एक एक लाकूड निवडून निवडून थोरोंनी जेव्हा ही कुटी निर्माण केली असेल तेव्हा त्यांच्या डोक्यात किती श्रेष्ठ आदर्श राहिला असेल! साधेपणाच्या जीवनाचा आदर्श! थोरोंचा हा छोटासा संसार किती मोहक दिसत असेल! ते निसर्गाच्या अंकावर राहत होते. निसर्गाचे पुजारी होते. निसर्गाच्या प्रेमाने त्यांना येथे खेंचून आणलें होतें. आम्ही थोरोंना आपली श्रद्धांजलि अर्पण केली. किती पावन होतें हें तीर्थ!!

अमेरिका व क्यूबा यांच्यात जो कटु संबंध निर्माण झाला आहे तो सुधरावा म्हणून काही अहिंसावादी लोकांचें एक दल क्यूबेक, कॅनडा, ग्वाटानामो (क्यूबातील अमेरिकन सैनिक तळ) यांच्या दीर्घ पदयात्रेवर होतें. आम्ही या पदयात्रिकांना 'अमेरिकस' नगरात भेटलो. पदयात्री रंग-भेद मानत नव्हते म्हणून काही नीग्रोहि या पदयात्रेत सामिल होते. अमेरिकेतील दक्षिण भागाचीं राज्यें म्हणजे रंगभेदाच्या रानटी नीतीचे किल्ले आहेत. जॉर्जियाहि त्यापैकी आहे. जॉर्जिया राज्याच्या काही नगरां-

च्या प्रमुख बाजारांतून पदयात्रा करीत जात असतांना पोलिसांनी आक्षेप घेतला. विचार-प्रचार व निदर्शनाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठी पदयात्रिकांनी पोलिसांचें म्हणणें मानलें नाही तेव्हा पोलिसांचा जंगलीपणा आणखीनच वाढला. काही पोलिसांनी अहिंसावादी शांतियात्रिकांवर विजेचे फटके मारले. त्यांना कैद करून जेलमधे बंद केलें. अशी ५१ वेळा कैद झाली. अनेक पदयात्रिकांनी जेलमधे दीर्घ मुदतीचे उपवास केले. पोलिसांच्या निष्ठुर जंगलीपणातून स्त्रियाहि सुटल्या नाहीत. त्या सुकुमार भगीनींचें दुःख पाहून मला तर रडू आलें. या १८, २० वर्षांच्या तरुण भगिनींनी तीन तीन आठवड्यांचे उपवास केले. या पदयात्रिकांच्या बरोबर कॅनडाचे तीन शांतिवादी व लंडनचे एक पत्रकारहि गिरफ्तार केले गेले. अमेरिकेसारख्या देशात असा जंगलीपणा पाहून आश्चर्य वाटलें. दीर्घ उपवास व दीर्घ जेलयातना भोगूनहि पदयात्रिकांचा उत्साह, जोश व निष्ठा दुप्पट वाढली होती.

सरकारी कायद्यानुसार कोणीहि अमेरिकन नागरिक क्यूबात जाऊ शकत नव्हता. अमेरिका व क्यूबामधे कोणत्याहि तऱ्हेचा सरकारी, राजकीय किंवा आर्थिक संबंध राहिलेला नाही. सर्व प्रकारचा व्यापार व व्यवहार बंद आहे. क्यूबात उसाची पैदास खूप होते. क्यूबा दुसऱ्या देशांना साखर पाठवितो. त्याच्या बदल्यात धान्य, कपडा, औषधें इत्यादि मागवतो. काही वर्षांपूर्वींपर्यंत अमेरिकेबरोबर सर्वांत जास्त व्यापार त्याचा चालत होता. पण कम्युनिस्ट क्रांतीनंतर अमेरिकन सरकारने धान्य, औषधें, कपडा इत्यादि पाठविणें बंद केलें आहे आणि साखर घेणेंहि बंद केलें आहे. अशा परिस्थितीत क्यूबाच्या जनतेने एकतर केवळ साखर खाऊन मरून जावें किंवा दुसऱ्या देशांबरोबर व्यापार करावा. त्या शांतियात्रिकांचें म्हणणें होतें की राजनैतिक मतभेदामुळे आर्थिक नाकेबंदी करून क्यूबाच्या तटस्थ जनतेला सतावणें भयंकर हिंसा आहे. राजनैतिक मतभेद असले तरी आपल्याला शांतीने व मैत्रीच्या नात्याने वागलें पाहिजे.

## काळी चामडी, पिस्तुलाचें लक्ष्य

गोऱ्या चामडीचा अभिमानहि कसा भयंकर अभिमान आहे! मी ऐकत होतो की दक्षिण अफ्रिकेतील व अमेरिकेतील गोऱ्या कातडीचे लोक

स्वत:ला काळ्या कातडीवाल्या लोकांपेक्षा उच्च समजतात आणि काळ्या चामडीवाल्यांचा तिरस्कार करतात. पण त्यावेळी मी समजत होतो की पूर्वी असेल तसें, पण आता तें हलकें हलकें नष्ट झालें असेल. परंतु अमेरिकेतील प्रवासात मी जेव्हा दक्षिण भागातील राज्यांत गेलो तेव्हा तेथील नीग्रो लोकांची दशा पाहून मी चकितच झालो. या विसाव्या शतकात सुद्धा केवळ काळी चामडी असल्यामुळे असा व्यवहार होईल ही अगदी कल्पनेबाहेरची गोष्ट आहे. काळ्या चामडीचे नीग्रो लोक दुय्यम दर्जाचे नागरिक मानले जातात. काळी चामडी असणें हा एक भयंकर शाप आहे. एवढेंच नव्हे की काळे चामडीवाले नीग्रो, हबशी गोऱ्या चामडीवाल्यांच्या हॉटेलें, सिनेमा इत्यादि सार्वजनिक स्थानी जाऊ शकत नाहीत, तर असेंहि आहे की गोऱ्या चामडीच्या उत्कृष्टतेचे ठेकेदार नीग्रो लोकांना भयंकर प्रकाराने सतावतात. त्यांना वेळी अवेळी मारतात-पिटतात. त्यांचीं घरें जाळून टाकतात. जॉर्जिया, अलबामा, मिसिसिपी इत्यादि दक्षिणेकडील राज्यांत नीग्रो-समाजाची जी दुर्दशा आहे, तसेंच त्यांच्यावर जो अन्याय होत आहे त्यावर विश्वास ठेवणेंहि कठिण आहे. हबशी लोकांचें आक्रंदन ऐकून ऐकून कान बहिरे होऊन जातात. हे लोक घाणेरड्या वस्त्यांत राहतात. फाटकेतुटके कपडे वापरतात. गरीबीचें जीवन जगतात. यांना सरकारी कचेरीत किंवा खाजगी व्यापार-संस्थात सहजासहजी काम मिळत नाही. बेकारीचा प्रश्न त्यांच्या जीवनाची प्रमुख समस्या आहे.

नीग्रो लोकांच्या वस्त्यांना 'हारलम' म्हटलें जातें. तसें तर न्यूयॉर्कमधेहि 'हारलम' आहेत, परंतु षारलोट, अटलांटा, आलबनी इत्यादि शहरांतील हारलमांच्या तुलनेत न्यूयॉर्कचा हारलम कितीतरी बरा म्हणता येईल. पुष्कळ ठिकाणीं नीग्रो लोकांचें बहुमत आहे, पण ते मतदाते म्हणून रजिष्टरमधे नोंदले गेलेले नाहीत. डॉनविल नांवाच्या एका नगरात फक्त सात टक्के नीग्रो मतदाते म्हणून रजिष्टरात नोंदलेले आहेत. ९३ टक्के नीग्रो आहेत अमेरिकन, परंतु त्यांना मतदानाचा अधिकार नाही. हे नीग्रो गोऱ्या चामडीवाल्या विद्यार्थ्यांबरोबर शिकू शकत नाहीत. त्यांना सार्वजनिक रेस्टरांमधे चहाचा प्याला घेण्याचाहि अधिकार नाही. त्यांना

प्रतिष्ठेचें काम मिळू शकत नाही. त्यांचीं विद्यालयेंहि अत्यंत उपेक्षित स्थितीत मी पाहिलीं.

'हारलम' नांवाच्या या वस्त्यांच्या सडकांची सफाई होत नाही. जर एखादा नीग्रो आजारी पडला तर त्याला औषधपाण्याची व सेवेची काही व्यवस्था नाही. गोऱ्या चामडीवाल्यांच्या दवाखान्यांचीं द्वारें त्यांना बंद आहेत. नीग्रो दवाखान्यांची स्थिति अत्यंत वाईट आहे. जर एखाद्या जागृत नीग्रो तरुणाने आपल्या हक्काची मागणी केली व तो कितीहि शांतिपूर्ण व अहिंसेने वागत असला तरी त्याला रानटी गोऱ्या पोलिसाचा निष्ठुर मार सहन करावा लागतो. डॉनविलच्या एका अहिंसक निदर्शनात गिरफ्तार केलेल्या एका नीग्रोला पोलिसाने इतक्या वाईट रीतीने मारलें की त्याला आपला एक डोळाच गमवावा लागला. इतकें होऊनहि वेळेवर त्याच्या डोळ्यावर इलाज करण्याची काही व्यवस्था झाली नाही !

आम्ही अमेरिकेच्या जॉर्जिया राज्याची राजधानी अटलांटा येथे डॉ. मार्टिन लूथर किंग यांना भेटायला गेलो होतो. तेथून नंतर अल्बनी नांवाच्या एका छोट्या शहरात काही मित्रांना भेटण्यासाठी थोडे तास तेथे गेलो होतो. अल्बनीला रंगभेदाचा बालेकिल्ला मानतात. मी होतो भारतांतून आलेला एक नवखा प्रवासी. लंडनचे एक पत्रकार जॉन यांच्याबरोबर मी एका रेस्टरांमधे जाऊन बसलो. रेस्टरांचें नांव होतें— 'ब्रॉड स्ट्रीट कॅफे.' बहुतेक लोकांनी माझ्याकडे टक लावून पाहिलें. कारण माझा रंग तसा गोरा नव्हता जसा गोरा रंग पाहण्याची त्या रेस्टरंटच्या लोकांच्या डोळ्यांना संवय होती. जेव्हा आम्ही एक रिकामें टेबल बसण्यासाठी निवडलें व आरामाने विराजमान झालो तेव्हा एक वाढपी बाई आली आणि तिने पाण्याचे ग्लास ठेवत असतांना माझ्याकडे काही आश्चर्यचकित मुद्रेने पाहिलें. माझे सोबती जॉन यांच्याबद्दल तिची काही तक्रार नव्हती. परंतु 'मी जॉनबरोबर इथे कसा पोहोंचलो' हा प्रश्न तिच्या डोळ्यांत उमटला होता; तरी पण ती काही बोलली नाही. मी काही तळलेले बटाटे, टोस्ट व कॉफीची ऑर्डर दिली. जॉननेहि कॉफी मागवली. वाढपी बाई परत गेली. तिने रेस्टरंटच्या मॅनेजरला सारी

गोष्ट सांगितली आणि विचारलें की या काळ्या चामडीवाल्याला खाना वाढू की नको? आम्ही टेबलावर बसून वाट पाहत होतो. ८-१० मिनिटेंपर्यंत काही आले नाही. त्यानंतर रेस्टरंटचा मालक येऊन म्हणाला: "आमच्यापाशी काहीहि नाही. आपण कृपाकरून रेस्टरंटच्या बाहेर निघून जावे." असें सांगून तो परत निघून गेला.

वाढपीबाई पुन्हा आली. तिने ताबडतोब ग्लास उचलून नेले. रुमालाने टेबल पुसलें आणि म्हणाली: "बस, लौकरात लौकर आपण रेस्टरंटच्या बाहेर निघून जावे."

ही काय भानगड आहे हें माझ्या लक्षात येईना. मी टेबलावरूनच जरा मोठ्या आवाजाने रेस्टरंटच्या मालकाला विचारले: "काय माझ्या-बद्दल आपल्या मनात काही शंका आली आहे? गोष्ट काय आहे, कृपा करून मला समजवाल तर खरे!"

पण रेस्टरंटच्या मालकाचा राग वाढतच चालला. माझ्यासारख्या काळ्या माणसाबरोबर वाद घालणें कदाचित् त्याच्या प्रतिष्ठेच्या कल्पने-विरुद्ध असावें!

"रेस्टरंटच्या बाहेर जाता की नाही?" या आव्हानाशिवाय त्याच्या-पाशीं काहीच नव्हतें.

मी टेबलावरून उठून रेस्टरंटच्या मालकापाशी गेलो आणि म्हणालो: "मी या शहरात प्रथमच आलो आहे. येथील नियमांची मला काहीच माहिती नाही. आपण नाखुश असाल तर मला या रेस्टरंटमधे काही खाण्यापिण्याची इच्छा नाही. पण मी समजून घेऊ इच्छितो की भानगड काय आहे? आपल्याला कारण सांगावें लागेल."

मी असें कितीतरी वेळा म्हणालो. पण माझ्याबद्दल त्याला शंका असण्याचा प्रश्नच कुठे होता? माझी चामडी रेस्टरंटच्या मालकाच्या चामडीहून भिन्न होती हें स्पष्ट होतें. जेव्हा या चर्चेत ५-७ मिनिटें निघून गेलीं तेव्हा मालकाचा धीर सुटला. रेस्टरांमधे बसलेल्या सर्व लोकांचें लक्ष माझ्याकडे लागलें होतें.

रेस्टरांच्या मालकाचें शरीर कांपत होतें. त्याने ओरडून म्हटले: "रेस्टरंटच्या बाहेर जाता की काही धडा शिकवू?" आणि त्याने टेबला-

च्या खणातून एक मोठीशी चामडयाची थैली काढली. थैली उघडताच एक अत्यंत आधुनिक प्रकारचें पिस्तूल त्यातून बाहेर निघालें. बहुधा त्याला वाटलें असावें की पिस्तूल पाहून मी पळून जाईन. पण मी हंसत म्हणालो: "माझ्या मित्रा, पिस्तूल दाखविण्याची काही गरज नाही. मला तुमच्या पिस्तुलाची भीतिहि वाटत नाही. त्यातून मी इथे झगडा करण्यासाठी आलो नाही. मी स्वतःच निघून जातो. परंतु, मला येथे 'खाना' का नाही मिळणार हें जोपर्यंत समजावून सांगत नाही तोपर्यंत मी जाणार नाही."

माझें हंसणें आणि भिऊन पळून न जाता तेथेच उभे राहणें त्याच्या क्रोधाग्नीत तुपाचें काम करीत होतें. त्याने पिस्तूल उचलून हातांत घेतलें, आंगठा घोडयावर ठेवला आणि दुसऱ्या हाताने रेस्टरांच्या दरवाजाकडे इशारा करीत म्हणाला: "काहीहि न बोलता बाहेर निघून जा."

तेवढयांत आमच्याजवळ उभ्या असलेल्या वाढपीबाईला दया आली. तिने विचार केला की काही दुर्घटना न घडो; म्हणून तिने मागून एक जोराचा धक्का दिला व मला रेस्टरंटच्या बाहेर घालवून झटपट दरवाजा बंद करून घेतला. मी पाहिलें की रेस्टरंटचा मालक काहीहि ऐकायला – समजून घ्यायला– तयार नव्हता. म्हणून गोष्ट वाढविण्यात अर्थ नव्हता. माझे सोवती जॉनहि म्हणाले की आता गोष्ट वाढविणें ठीक होणार नाही. म्हणून आम्ही परत फिरलो.

या घटनेवरून स्पष्ट होत आहे की रंगभेदाचा कैफ किती विषारी असतो. जर असाच काही प्रसंग आला, काही त्रासदायक गोष्ट घडली किंवा मतभेद झाला तर पोलिसाला बोलवता आलें असतें. परंतु एवढयाशा क्षुल्लक गोष्टीसाठी पिस्तूल हातांत घेण्याची वृत्ति तर अजबच वाटते. नंतर अन्य अमेरिकन मित्रांनी सांगितलें की जर रेस्टरांच्या वाढपीबाईने धक्का देऊन बाहेर घालवून दिलें नसतें तर एखादी दुर्घटना होणेंहि अशक्य नव्हतें.

## नीग्रो आंदोलन

नीग्रो लोकांनी 'समानता' प्राप्तीसाठी गेल्या कित्येक वर्षांपासून एक जबरदस्त आंदोलन सुरू केलें आहे. या आंदोलनांत भाग घेणारे आणि

त्याचें नेतृत्व करणारे अधिकतर हबशी तरुण आहेत. या आंदोलनाचें स्वरूप जवळजवळ भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या आंदोलनासारखेंच आहे. जेव्हा जेव्हा आम्ही नीग्रो वस्त्यांतून प्रवास करीत होतो तेव्हा आम्हाला 'फ्रीडम' 'फ्रीडम' चा घोष ऐकू येत असे. भारतांत आम्ही केवळ गांधींची पूजाच करतो. या उलट अमेरिकेतील हबशी तरुण तर गांधींच्या विचारांप्रमाणें वागतात. हजारों युवकांनी ज्या तत्परतेने व निष्ठेने या आंदोलनात भाग घेतला तो विलक्षण आहे. हे तरुण कित्येक आठवडे उपवास करतात, जेलच्या यातना भोगतात. रॉबिन्सन नांवाच्या एका नीग्रो तरुणाने माझ्याशीं तासभर गोष्टी केल्या. तो म्हणाला : "मी नीग्रो जातीच्या स्वातंत्र्यासाठी लढा देत आहे, गोऱ्या चामडीवाल्या माझ्या बंधूंच्याविरुद्ध मी लढत नाही आहे. मी अन्यायाचा तिटकारा करतो पण अन्याय करणाऱ्याबद्दल माझ्या मनात द्वेषभाव नाही. हा धडा मी गांधींच्या आत्मकथेतून शिकलो आहे." एक दुसरा नीग्रो युवक कार्ल अर्नोल्ड याला मी विचारलें : "जेव्हा गोरे लोक तुमच्या शरीरावर विजेचे फटके मारतात किंवा तुमच्यावर कुत्रीं सोडतात तेव्हा सुद्धा हिंसेचा आश्रय घेण्याची इच्छा तुम्हाला होत नाही काय ?" श्री अर्नोल्ड म्हणाला: "हिंसेचें शमन हिंसेने होऊ शकत नाही. आगीने आग विझत नाही. आमच्या आंदोलनात हिंसा अनैतिकच नाही, तर अव्यावहारिकसुद्धा आहे."

आम्ही भारताहून निघतांना जेव्हा निरोप घेत होतो तेव्हा काही मित्र आम्हाला म्हणाले की तुम्ही परदेशात भारताच्या उच्च संस्कृतीचा संदेश पसरवा आणि जगाला अहिंसा व शांतीचा धडा शिकवा. पण आम्ही जेव्हा अमेरिकेत डॉ० मार्टिन लूथर किंग यांच्या नेतृत्वाखालीं चाललेलें अहिंसात्मक नीग्रो आंदोलन पाहिलें तेव्हा आम्हाला वाटलें की कदाचित् भारतालाच अहिंसेचा धडा तेथून घ्यावा लागेल. शांतिमय आंदोलनाने समानतेच्या अधिकाराच्या प्राप्तीचें सक्रिय शिक्षण त्यांच्याकडूनच घ्यावें लागेल. अलिकडेच डॉ. किंग यांना जगाचें सर्वात मोठें बक्षिस, नोबेल प्राईझ, देऊन त्यांच्या अहिंसेसंबंधी विचारांचा सन्मान केला गेला आहे. डॉ. किंग यांच्याच आवाहनावर हजारों नीग्रो जेलमधे गेले होते. अमेरिकन

जनतेने नीग्रो लोकांना समानतेचे अधिकार देण्याचे स्वीकारलें आहे. अमेरिकन सरकारने काळा-गोरा भेद समाप्त करणारा कायदा पास केला आहे. नीग्रो लोकांनी स्वातंत्र्याचा लढा देतांना हिंसा, रक्तपात व वैर या ऐवजीं प्रेमपूर्ण प्रतिकार, असहयोग, सविनय कायदेभंग व सत्याग्रहाचा मार्ग निवडला.

अमेरिकेचें नीग्रो आंदोलन काय आहे तें नीट समजून घेतले पाहिजे. न्यूयॉर्कच्या 'विश्व-प्रदर्शना'च्या वेळीं अमेरिकेच्या काही नीग्रो-नेत्यांनी जें अद्‌भुत निदर्शन करण्याचा निश्चय केला होता त्याचा न्यूयॉर्कच्या चतुर पोलिसांनी शेकडों निदर्शकांना गिरफ्तार करून मोठ्या तत्परतेने व कुशलतेने मोड केला तरीहि नीग्रो आंदोलन पुन्हा जोर पकडत आहे. प्रत्येक ठिकाणीं नीग्रोंची अधिकाराची मागणी उच्च स्वराने ऐकायला मिळते. शेकडों वर्षांपासून दाबून टाकलेलें नीग्रो हृदयाचें दुःख शेवटीं कोठपर्यंत लपवून ठेवलें जाऊ शकतें ?

अब्राहम लिंकननंतर प्रथमच राष्ट्रपति जॉन केनेडी यांनी एका दडपलेल्या जातीचे अश्रु पुसण्याचा विडा उचलला. काळ्या व गोऱ्या चामडीच्या नांवावर मनुष्या-मनुष्यामधे दुर्भाव, घृणा व भेद निर्माण करणाऱ्यांना त्यांनी जीवनाचीं नवीं मूल्यें स्वीकारण्याचें अपील केलें व देशापुढे नागरिक अधिकार कायदा संमतीसाठी आणला. परंतु हा कायदा साकार होण्यापूर्वीच केनेडींच्या छातीवर बंदुकीच्या तीन गोळ्या डागल्या गेल्या. त्यांचें स्वप्न त्यांच्या हयातीत सक्रिय रूप घेऊ शकलें नाही. त्यांचे उत्तराधिकारी राष्ट्रपति जॉनसन म्हणाले की स्व० जॉन केनेडींना खरी श्रद्धांजलि अर्पण करण्याचें श्रेष्ठ साधन आहे– नागरिक अधिकार कायदा जसा आहे तसा स्वीकृत करणें. परंतु गोऱ्या चामडीला श्रेष्ठतेचें प्रतीक मानणारे काही विरोधी लोक हें अपील मानायला राजी होत नव्हते.

काळ्या-गोऱ्या चामडीचा प्रश्न साऱ्या अमेरिकेत रोजच्या रोज तीव्रतर होत आहे. कोणत्याहि क्षणीं हिंसा उफाळून येण्याचा धोका डोक्यावर लटकता आहे. विरोधी नेते मालकम एक्स यांनी स्पष्ट शब्दांत

सांगितलें होतें की गोरेपणाच्या अभिमानात चूर असलेल्या लोकांना अहिंसेची भाषा कधीच कळणार नाही. म्हणून आम्हाला आमच्या बचावासाठी बंदूक चालवावयाचें शिक्षण घेतलें पाहिजे. आणि गोऱ्यांचे अन्याय संपुष्टात आणण्यासाठी 'विटेचा जबाब दगडाने' दिला पाहिजे. जर या तरुण नीग्रो नेत्याच्या शिकवणुकीचा अमल केला गेला तर निःसंशय अमेरिकेत गोरे व काळे यांच्यामधे तसाच भयंकर रक्तपात होण्याचा धोका आहे, जसा १९४७ मधे भारतात झाला होता. काही ठिकाणीं होणाऱ्या हिंसात्मक दंग्यांतून हें सिद्ध होतें की हिंसक शक्ति स्वस्थ बसू शकत नाही.

आज अमेरिकेचा नीग्रो एका जोड रस्त्यावर उभा आहे. एका बाजूला मालकम एक्सचा बंदुकीचा रस्ता आहे, दुसऱ्या बाजूला डॉ० किंग सद्भावना व अहिंसा यांचा दीप घेऊन उभे आहेत. आजचा नवा नीग्रो 'नागरिक अधिकार कायद्या' मुळे थोडा आश्वासित झाला आहे. जर हा कायदा पास झाला नसता तर निराशा, असंतोष व प्रतिक्रिया यांच्या झपाटघांत सापडलेला नीग्रो कोणता मार्ग स्वीकारता हें सांगणें कठिण आहे. आम्ही जेव्हा अमेरिकेत होतो तेव्हा हा कायदा काँग्रेसने तर स्वीकारला होता पण सिनेटमधे जाऊन अडकून पडला होता. एका डेमोक्रॅटिक राष्ट्रपतीने पुढे आणलेलें हें बिल डेमोक्रॅटिक सदस्यांच्या विरोधाच्या भोंवऱ्यांत गिरक्या खात होतें. गोऱ्या चामडीच्या श्रेष्ठतेचे पोषक असे काही सदस्य या बिलांत अनेक संशोधने आणून त्याला प्रभावहीन बनवू पहात होते. या साऱ्या संशोधनांनी मूळ कायद्यांचें नुसतें स्वरूपच बदललें नसतें तर तो संपूर्णरीत्या टाकाऊ झाला असता. डॉ. किंगना तर असें वाटत होतें की अशा संशोधित बिलाचा स्वीकार करण्याऐवजीं मुळीच बिल नसणें जास्त चांगलें. नंतर सिनेटने बहुमताने हें बिल स्वीकारलें. अमेरिकेकडे जगाचे डोळे लागले आहेत. लोकशाही, व्यक्ति-स्वातंत्र्य व समानता यांच्या आदर्शासाठी अमेरिका नेहमी वकिली करीत असते. जर अमेरिकेतच या सिद्धांतांचा अमल झाला नसता तर जगात किती निराशा पसरली असती! म्हणून नीग्रो-समानतेचें महत्त्व राजनैतिक दृष्टीने सुद्धा कमी नाही.

नीग्रो आंदोलनावर अहिंसेचा जो प्रभाव आहे त्याचें असाधारण महत्त्व आहे. आज अहिंसा व गांधी लोकांमधे विशेष चर्चेचे व अध्ययनाचे विषय बनले आहेत. रीचर्ड ग्रेग म्हणाले होते 'अमेरिकेचे नीग्रो विद्यार्थी अगदी तीच भाषा बोलतात की जी गांधीजी बोलत असत.' यावरून हें स्पष्ट होतें की अमेरिकेचे नीग्रो आपलें आंदोलन धीराने, हिमतीने व गंभीरतेने चालवीत आहेत. पण एखाद वेळेस शंका येते ती ही की त्यांच्या धीराचा बांध प्रतिपक्षाच्या दुराग्रहामुळे फुटेल की काय ! हें खरें की वरील बिलाच्या केवळ पास होण्याने नीग्रो लोक घाणेरड्या वस्त्या सोडून सुंदर महालांत जाऊन पोहोचणार नाहीत; शाळा, सिनेमा व हॉटेलांत सध्या चालू असणारा भेदभावहि एकाच दिवसात समाप्त होणार नाही; शिक्षणाचा स्तरसुद्धा ताबडतोब आकाशात चढणार नाही; बेकार नीग्रो कामावर लागून जाणार नाहीत; त्यांची आर्थिक प्राप्ति क्षणात दुप्पट होणार नाही ; नीग्रो मुलांना सुंदर कपडे प्राप्त होणार नाहीत; शाळांतून पुरेसे शिक्षकहि मिळणार नाहीत; आजारी नीग्रोंना ताबडतोब औषधोपचारहि प्राप्त होणार नाही; या गोष्टींना वेळ लागेल. केवळ कायदा झाला म्हणून हें परिवर्तन होणार नाही. हें परिवर्तन तेव्हा होईल जेव्हा अमेरिकन जनतेचें हृदय-परिवर्तन होईल—— जेव्हा गोऱ्याच्या मनांत नीग्रोबद्दल सद्‌भाव पैदा होईल. कायदा बनल्यामुळे आजच्या चालू हीनतेच्या परिस्थितीवर घणाचा घाव अवश्य बसेल. त्यामुळे नीग्रो लोक हीनभाव व दुय्यम नागरिक पातळींवरून वर उठण्याला तयार होऊ शकतील. गोऱ्या लोकांच्या हृदय-परिवर्तनासाठी तसेंच अहिंसात्मक आंदोलन चालविण्यासाठी व्यवस्थित व वैज्ञानिक पद्धतीने जीं प्रशिक्षण केंद्रें चालविलीं जात आहेत तीं भावी समाजाचा उत्तम पाया घालतील.

## स्वप्न साकार झालें

अमेरिकेचा निरोप घेण्याची वेळ आली. असें वाटत होतें की जसें काही आम्ही स्वप्न पाहिलें आहे. जेव्हा आम्ही भारताहून निघालो आणि खैबर खिंड पार करीत होतो तेव्हा आम्हाला चार अमेरिकन सद्‌गृहस्थ भेटले. त्यांनी आपली कार थांबविली आणि विचारलें : "तुम्ही आमच्या

बरोबर (मोटारीत) येता काय ? तुम्हाला जिथे जायचें असेल तिथे उतरून देऊ. "

आम्ही म्हणालो: "नाही. आम्ही मोटारीत येणार नाही." तेव्हा त्यांनी विचारलें: "कुठे जात आहात ?"

आम्ही म्हणालो: "आम्ही अमेरिकेला जात आहोत."

ते चारी अमेरिकन गृहस्थ पोट धरून हसू लागले. आम्ही विनोद करीत आहोत असे त्यांना वाटलें. म्हणू लागले: "ठाऊक आहे, कुठे आहे अमेरिका ?"

आम्ही म्हणालो: "आम्ही कधी तेथे गेलो तर नाही. पण नकाशांत पाहिली आहे. फार दूर आहे. तरी आम्ही ( तेथे जाण्यासाठी ) निघालो तर आहोत. 'चालता प्रवासीच मुक्काम गाठू शकतो.' केव्हा तरी आम्ही पोहोचून जाऊच."

त्यांचा विश्वास तर बसला नाही. पण त्यांच्यापैकी एक गृहस्थ डॉ. स्कार्फ यांनी आपल्या घराचा पत्ता व टेलिफोन नंबर देऊन म्हटलें: "जर तुम्ही दैववशात् अमेरिकेत पोहोचलातच तर कृपा करून मला टेलिफोन करा."

आम्ही त्यांचा नंबर आमच्या डायरीत लिहून घेतला. जाता जाता आम्ही शेवटी जेव्हा अमेरिकेला पोहोचलो आणि फिलाडेलफिया शहरावरून जात होतो तेव्हा आम्हाला डॉ. स्कार्फ व त्यांचे सोबती यांचें स्मरण झालें. रात्रीं १२ वाजता आम्ही त्यांना टेलिफोन केला: "डॉक्टर साहेब, तुम्हाला आठवण आहे काय की खैबर खिंडीत दोन पदयात्री आपल्याला भेटले होते ते ?"

डॉक्टर म्हणाले: "हो, हो. मला स्मरण आहे. कोठे आहेत ते ?"

आम्ही म्हणालो: "आम्ही तुमच्या शहरांत येऊन पोहोचलो आहोत. आम्हीच टेलिफोनवर बोलत आहोत."

त्यांचा आपल्या कानावर विश्वास बसेना. ते म्हणाले: "काय खरोखर तुम्ही येऊन पोहोचलात ?"

आम्ही जेव्हा सांगितलें की 'उद्या सकाळीं आम्ही तुम्हाला भेटू' तेव्हा डॉ. स्कार्फ म्हणाले: "सकाळ फार दूर आहे. मी तोंपर्यंत थांबू शकत नाही."

रात्रीच्या कडाक्याच्या थंडीत १२ वाजता येऊन ते आम्हाला भेटले. ते म्हणाले: "खरोखर, स्वप्न साकार झालें!"

याप्रमाणेच एका दुसऱ्या अमेरिकन तरुणाने 'न्यूयॉर्क टाईम्स' मधे आमच्या पदयात्रेचा प्रारंभ होत असल्याचा समाचार वाचून पंतप्रधान नेहरूंना लिहिलें: "मला माहीत नाही हे दोन पदयात्री कोठे आहेत. पण ते जेथे कोठे असतील तेथे त्यांना माझा हा संदेश कृपा करून कळवा की ते जेव्हा कधीहि अमेरिकेत पोहोचतील तेव्हा त्यांनी माझ्या घरीं अतिथि म्हणून यावें." आम्ही काबुलला पोहोचलो तेव्हा नेहरूजींच्या कार्यालयाचें एक पत्र आम्हाला तेथील राजदूताकडून मिळालें. इतक्या अगोदरपासूनचें आतिथ्याचें आमंत्रण पावून आम्हाला फार आनंद झाला, पण त्यावेळीं आम्हाला माहीत नव्हते की कशाप्रकारे त्या आमंत्रणाचा अमल होईल. पण शेवटी त्या आमंत्रणाप्रमाणे आम्ही त्या तरुणाला भेटलो. त्याच्या विद्यालयात जाऊन आम्ही आमच्या प्रवासाचे अनुभवहि त्यांना सांगितले. तो वेस्टपोर्टचा तरुण म्हणत होता: "मी जेव्हा नेहरूजींना पत्र लिहिलें होतें तेव्हा मला विश्वास वाटत नव्हता की तुम्ही कधी अमेरिकेला येऊन पोहोचू शकाल. पण आता तुम्ही प्रत्यक्ष पोहोचला आहातच तर वाटतें की 'स्वप्न साकार झालें.'"

अमेरिकेत आमचा शेवटचा मुक्काम होनोलुलु, हवाई बेटांत होता. खरोखर हें लहानसें बेट म्हणजे पृथ्वीवरील स्वर्गाचा तुकडाच आहे. आम्ही या साध्या भोळ्या हवाइयण लोकांबरोबर चार दिवस राहिलो. ते दिवस अगदी अविस्मरणीय आहेत.

पॅसिफिक महासागराच्या दक्षिणेकडील भागात एक 'ओ आहु' नांवाचें बेट आहे. तेथें वसलेलें होनोलुलु हें एक अत्यंत सुंदर नगर आहे होनोलुलूमध्येच पर्ल हार्बरहि आहे जेथे जपानने बाॅंब हल्ला केला होता होनोलुलूला पोहोचताच तेथील 'हुला' मुलींनी आमच्या गळ्यांत 'लेई

माळा घातल्या व 'अलोहा' म्हणून आम्हाला बाहूंत कवटाळलें. अतिथींच्या स्वागताचा हा निराळाच प्रकार आहे. कमरेभोंवतीं गवताचा स्कर्ट, स्तनांवर एक चोळीसारखें वस्त्र, एक फूलमाळा गळ्यात – ही होती त्या 'हुला' कुमारिकांची वेषभूषा. येथील स्त्रिया जी वेषभूषा सामान्यपणे करतात तिला 'मुमु' म्हटलें जातें.

प्रवाशांची होनोलुलूमध्यें फार गर्दी असते. आम्ही 'वाइकिकि समुद्र-काठी या प्रवाशांची मोठी संख्या पाहिली. ३–४ लाख प्रवासी इथे प्रतिवर्षीं येतात व हवाइयण लोकांना १०–१५ कोटी डॉलरांची प्राप्ति दर वर्षीं होते. फळें व फुलें इतकी विपुल होतात की जगांत डब्यांतून भरलेला ७५ टक्के अननस हवाई बेटांच्या समूहांत तयार होतो.

१८९८ पर्यंत हवाई बेटांचें प्रशासन स्थानिक राजाकडून होत होतें. त्यानंतर हीं बेटें अमेरिकेच्या (U. S. A.) ताब्यांत गेलीं. १९५९ पासून या बेटांना अमेरिकेचें पन्नासावें राज्य घोषित करण्यांत आलें.

होनोलुलूत आम्ही लोक क्वेकर भुवनांत उतरलो होतो. रेडिओवर आमचा कार्यक्रम झाला होता व काही सभाहि आयोजित केल्या गेल्या होत्या. होनोलुलूमध्ये एक विशिष्ट स्थान आहे – 'ईस्ट वेस्ट सेंटर.' या केंद्रात दक्षिण-पूर्व (अग्नेय) आशियातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अमेरिकेचें सरकार विशेष-रूपाने सहाय्य करतें. भवन फार सुंदर आहे. अन्य व्यवस्थाहि बरीच चांगली आहे. होनोलुलूहून आम्ही जपानकडे रवाना झालो.

# पूर्व व पश्चिम यांची समन्वय भूमि जपानमधे

तसें पाहिलें तर अमेरिकेनंतर आमची पदयात्रा समाप्त झाली होती, पण अण्वस्त्र विरोधांत केली जाणारी यात्रा जपानमधून गेली नाही तर तिची पूर्तता झाली असें मानता येणार नाही; कारण जपानच असा एकमात्र देश आहे जेथील लोकांनी अण्वस्त्राच्या संहाराचीं कडू फळें भोगलीं आहेत. म्हणून हवाई बेटांनंतर आम्ही लोकांनी जपानला जाण्याचा निश्चय केला.

जपानबद्दल प्रारंभापासूनच मला आकर्षण राहिले आहे. जपानची शेती, जपानचे छोटे उद्योग, जपानची प्राचीन संस्कृति इत्यादि कारणाने जपानने माझ्या मनात विशेष स्थान प्राप्त करून घेतलें होतें. म्हणून अमेरिकेहून भारतात परततांना आम्ही जपानमार्गे जावे या विचाराने आमचा कार्यक्रम ठरविला आणि आम्हाला जेव्हा युद्धविरोधी आंतरराष्ट्रीय (W. R. I.) जपानी शाखेकडून तेथे येण्याचें निमंत्रण मिळालें तेव्हा तर आमच्या आनंदाला पार राहिला नाही. त्या संस्थेच्या पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी आम्हाला जपानला येण्याचें फक्त आमंत्रणच दिलें नाही तर जपानचें शांति आंदोलन पाहण्याचें, तें समजून घेण्याचें आणि त्याला मदत करण्याची गोष्टहि त्यांनी आमच्यासमोर ठेवली व त्यासाठी

जपानमधे ३-४ महिने राहण्याची आणि टोकियोहून हिरोशिमाची पदयात्रा करण्याची व्यवस्थाहि करीत असल्याचें कळविले. म्हणून आमच्या शांतिवादी मित्रांचें निमंत्रण आम्ही स्वीकारले आणि जपानला जाण्याचा निश्चय केला.

जपानच्या मार्गावर असताना मी जपानच्या मेहनती व नम्र जनतेचीं स्वप्नें पाहू लागलो. आमच्या विमानातील परिचारिकांमधे एक जपानी भगिनीहि होती. तिची नम्रता, सेवा, तत्परता व हास्य इतर सगळ्या परिचारिकांपेक्षा तिला भिन्न करीत होतें. असें मनांतल्या मनांत जपानचें चित्र रेखाटीत आम्ही टोकियोच्या आंतरराष्ट्रीय विमान तळावर येऊन पोहोचलो. विमानातून उतरताच रेडियो व टेलिव्हिजनवाल्यांनी व पत्र-पत्रिकांच्या बातमीदारांनी आम्हाला गराडा घातला. त्यांच्याकडून सुटका झाल्यावर आम्ही जेव्हा विमान तळावाहेर आलो तेव्हा जपान-बौद्धसंघ, 'फेलोशिप ऑफ रिकन्सिलिएशन', अनार्किस्ट सोसायटी व 'W. R. I.' इत्यादि मित्रांनी आमचें स्वागत केलें.

जगाच्या या सर्वात मोठ्या शहरांत पोहोचल्यावरोबर एक विशेष परिवर्तन दृष्टीस पडलें. पूर्व व पश्चिमेत जें अंतर आहे तें अंतर स्पष्ट नजरेंत भरलें. एकदा तर असें वाटलें, जणू आम्ही परत कलकत्त्यास पोहोचलो आहोत. टोकियोची भयंकर गर्दी पाहून तर कोणीहि चकित झाल्याशिवाय राहणार नाही. टोकियोच्या मानवरूपी जंगलात राहण्यानें मानवीय स्पर्श कसा जिवंत राहील? शहराच्या रेल्वेमधे सकाळ-संध्याकाळ प्रवास करण्याची जरूर पडती तर 'सँडविच' प्रमाणे आमचा भुकाच झाला असता.

टोकियोतील शांतिवादी लोकांची एक सभा झाली. त्या सभेने 'शांतियात्रा सहायक समिति'ची स्थापना केली. W. R. I. व तिचे प्रमुख पुढारी श्री. सिराई शिपे यांनी पूर्ण जबाबदारीसह ही समिति चालविण्याचा भार उचलला. एक आठवडा टोकियोत राहून आम्ही आमच्या पदयात्रेला सुरुवात केली. अनेक शांतिवादी लोक मिरवणुक काढून आमच्याबरोबर सर्व शहरभर फिरले. जपानच हा एक असा देश आहे की जेथील लोकांनी


अणुबाँबच्या भयानकतेचें फळ भोगलें आहे. हिरोशिमा व नागासाकी येथून निघालेली भयानक ज्वाला अजूनहि जपानचे लोक विसरले नाहीत. म्हणून आमच्या यात्रेला असाधारण समर्थन प्राप्त होणें हें जपानी लोकांच्या भावनेला अनुकूलच होतें.

दुसऱ्या महायुद्धाचे सैनिक श्री. रिओबुइचिरो यांनी टोकियो ते हिरोशिमा ही ७०० मैलांची पदयात्रा पुरी होईपर्यंत आमच्याबरोबर साथ देण्याचें ठरविलें. हिंसक सेनेचा एक शिपाई शांतिसेनेचा एक सैनिक बनून जावा व पदयात्रेत सामिल व्हावा या घटनेचें एक विशेष महत्त्व होतें. तसेंच अमेरिकेची श्रीमति मेरी हार्वीहि मुद्दाम अमेरिकेहून आमच्या यात्रेत पुरा वेळ बरोबर राहण्यासाठी जपानला येऊन पोहोचली. १९४५ मध्ये अमेरिकेचा एक विमान चालक अणुबाँब टाकण्यासाठी जपानला आला व लाखों लोकांना हिंसेच्या आगींत जाळून पोळून निघून गेला. त्याच देशाच्या एका सुकुमार भगिनीने स्वत:च्या पायांना फोड आले तरी त्याची पर्वा न करता ७०० मैल पायी चालून त्या पापाचें प्रायश्चित केलें. सांगायला आम्हाला फार आनंद वाटतो की न्यूयॉर्क ते वॉशिंगटनच्या पद-यात्रेत जे दोन तरुण आमच्याबरोबर आले होते ते आता वॉशिंगटनहून नव्या दिल्लीच्या शांति-यात्रेवर निघाले आहेत. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या शांति-आंदोलनाच्या एका प्रतिनिधि भगिनीचें पदयात्रेसाठी जपानांत येणें विशेष महत्त्वाची गोष्ट होती.

आमच्या पदयात्रेने जपानी लोकांत आकर्षण निर्माण केलें. विश्व-विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनीहि आमच्याबरोबर आल्या होत्या. कुमारी सुएकोच्या पायांना चालता चालता फोड आले. कडक उन्हाचा तिच्या कोमल शरीरावर असा परिणाम झाला की ओठाची व हाताची चामडी उलून गेली व फोड आले. या विद्यार्थिनींची तपस्या पाहून माझें मस्तक त्यांच्यापुढे नम्र झालें. पाठीवर सामान लादून घेऊन सकाळीं ९ वाजल्या-पासून संध्याकाळीं ५ वाजेपर्यंत १२ ते १५ मैल रोज चालणें व पुन्हा रात्रीं रोज सभेत भाग घेणें, भाषण देणें, चर्चा करणें आणि भाषणाच्या अनुवादाचे काम करणें हें सर्व काही सोपें काम नव्हतें. प्रत्येक शहरांत तर

सभेसाठी कोणी न कोणी चांगला दुभाष्या मिळत होता, परंतु इतर चर्चेच्या वेळी या भगिनीच दुभाष्याचें काम करीत होत्या.

प्रत्येक शहरांत नगरपालिकेचे अध्यक्ष आमचें स्वागत करीत होते. नगरपालिकेच्या अन्य सदस्यांची भेट होत होती. नगरपिते आम्हाला उत्तम उत्तम वस्तु भेटीत देत असत. अनेक स्थानीं 'लेबर युनियन 'च्या लोकांबरोबरहि मुलाखती होत होत्या. जपानची सुप्रसिद्ध मजूर युनियन 'सोह्यो' ही संस्था अण्वस्त्र विरोधी आंदोलनात नेहमीच फार अग्रेसर असते. म्हणून या युनियनचे लोक आमच्या कार्यात खास रुचि दाखवीत.




जपानचें शांति-आंदोलन फक्त अण्वस्त्र विरोधी आहे. त्यांचे तीन गट आहेत. एकाची शेंडी पेकिंगला बांधली गेली आहे. दुसरा गट मास्को व पेकिंग यांच्याशी संबंधित नसला तरीहि अहिंसा व संपूर्ण युद्धाच्या निषेधाच्या भूमिकेवर विश्वास ठेवीत नाही. तिसरा गट मुख्यत्वे विद्यार्थ्यांचा आहे, त्याचा प्रभाव मर्यादित आहे. याप्रमाणे जपानचें आंदोलन हें राजकीय पक्षांच्या नियंत्रणेत आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाही. जिथे जिथे आम्ही जात होतो तेथे रोज आम्हाला या फुटीबद्दल विचारलें जात असे. आमचा दृष्टिकोण हाच होता की राजनैतिक गटबंदीच्या वर उठून

सैद्धांतिक भूमिका स्वीकारून स्वतंत्र शांति-आंदोलनाची रचना करायला पाहिजे . W. R. I. सारख्या संस्था छोटचा आहेत व प्रभावशालीहि नाहीत. या संस्थांना प्रभावशाली बनविण्याची जरूर आहे.

जपानचा प्रवास करतांना ज्या गोष्टीने मला अत्यंत प्रभावित केलें ती गोष्ट म्हणजे या देशाची प्रगतिशीलता. जीवनात, सामाजिक संबंधात, रूढि रीति-रिवाजात एक जबरदस्त परिवर्तन येथे होत आहे. धार्मिक कट्टरतेचीं बंधनें तुटून पडत आहेत आणि स्त्री-पुरुष संबंधात नवा दृष्टि-कोण पल्लवित होत आहे. आत्म संभावितपणाचा खोटा अभिमान जपानमधे फार होता; परंतु तो झपाटचाने बदलत आहे. लहान लहान शेतात जीवापाड मेहनतीने काम करण्याऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनांतून आम्हाला पुष्कळ शिकण्यासारखे आहे. जपानचें प्रत्येक घर एक कारखाना आहे असें म्हणणें योग्यच होईल. लहान प्रमाणातल्या या उद्योगांद्वारे जपानी लोकांनी आशियातील सर्वांत अधिक समृद्धिशाली असा आपला देश बनविला आहे. आम्ही भारतीय जोंपर्यंत आमच्या मूर्ख संस्कारांना बदलणार नाही, नवें दर्शन व नवीं मूल्यें प्रस्थापित करणार नाही तोंपर्यंत आमच्या समाजाचें परिवर्तन होणें संभवनीय नाही. समाज बदलण्यासाठी मनुष्यच बदलण्याची जरूर आहे

## विलक्षण देश

इतर लोकांप्रमाणेच माझीहि धारणा होती की जपान भूकंपाचा देश आहे ! जपानात जाण्याची गोष्ट निघताच मनात ही शंका येत होती की ज्या छोटचाशा बेटात प्रत्येक वर्ष १५०० वेळा भूकंपाचे धक्के बसत असतात तेथे प्रवास करणें किती विचित्र होईल ? तेथील लोक कसे असतील ? तेथील घरें कशी असतील ? पण जेव्हा ३० हजार फूट ऊंची-वरून आमचें 'पानआम' विमान जपानी भूमीवर उतरलें तेव्हा मनावर प्रथमचा प्रभाव हा पडला की हा देश भूकंपाचाच नाही तर अनुपम सौंदर्याचाहि देश आहे. नैसर्गिक सौंदर्याचा आणि मानवी सौंदर्याचा हा देश 'सूर्योदयाचा देश' म्हणवला जातो. फुजी पर्वताच्या नैसर्गिक वैभवापुढे मी नतमस्तक झालो. जपानचा सर्वांत मोठा ज्वालामुखी पर्वत जो 'आसो'

तेथे पोहोचल्यावर तेथील भयानकतेने मी स्तंभित होऊन गेलो. एकीकडे सागर, दुसरीकडे पर्वत यांच्याशिवाय जपानचें कोणी चित्रच काढीत नाही.

आमचा प्रवास म्हणजे फक्त प्रवासच नाही झाला. त्यांत अध्ययन व अध्यापनहि झालें. या प्रवासामुळे मला एक मुक्त दृष्टिकोण मिळाला. या प्रवासात बदलत जाणाऱ्या जपानचें मला जवळून दर्शन झालें. आशियाचा हा छोटासा देश अॅटमबाँब सोडून जगातील बाकी बहुधा प्रत्येक प्रकारची वस्तु निर्माण करीत आहे. नवे नवे प्रकार, नव्या नव्या पद्धति आत्मसात् करूनच जपानने ही प्रगति केली आहे. जपानी लोकांनी आपलें स्वत्वहि सुरक्षित ठेवलें आणि जगातील कोन्या कोपऱ्यातून शिकण्यालायक गोष्टी शिकून घेतल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर येथील सामाजिक दृष्टिकोणात मूलभूत परिवर्तन झालें आहे.

## हजामत व स्नान

जपानच्या स्त्रियां अत्यंत सुंदर रंगी-बेरंगी 'किमानो' परिधान करून नटून थटून केवळ घरात बसून राहत नाहीत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्या पुरुषांच्या बरोबरीने पावलें टाकीत आहेत. हॉटेलें व रेस्टरां यांच्यावर त्या एकाधिकारच गाजवतात. त्याशिवाय दुकानांवर सामान विकण्यापासून 'बस' चालविण्यापर्यंतच्या कामांत स्त्रियांचेंच राज्य आहे. हजामत करणाऱ्याहि स्त्रियांच मिळतील. जपानमधे तुम्ही केस कापण्यासाठी दुकानांत जा. सुंदर तरुणी हंसत मुखाने तुमचें स्वागत करील. नंतर उत्तम आरामशीर खुर्चीं बसायला देईल व तुमची हजामत करील. एक तासपर्यंत तुमचे केस कापले जातील, शेंपूने डोकें धुतलें जाईल, मालिश-चंपी होईल. याप्रमाणे तुमची सारी थकावट दूर होऊन जाईल. हजामतीनंतर जर तुम्ही सार्वजनिक स्नानगृहामधे स्नान करण्याचाहि आनंद प्राप्त करू शकला तर बोलाययाच नको !

सार्वजनिक स्नान-गृहात एका मोठ्या हॉलमधे गरम पाण्याचा मोठासा हौद असतो. त्या हौदात ५-५० लोक एकसाथ नग्न होऊन स्नान करतात. ५०-६० वर्षांपूर्वींपर्यंत तर स्त्रियां व पुरुष एकत्रच या हौदात नग्न-

स्नान करीत असत. आजहि होक्कायदो प्रांतात कुठे कुठे अशीं स्नानगृहें आहेत. पण साधारणपणे स्त्रियां व पुरुष अलग अलग स्नान करतात. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या स्नानगृहांमधे एक पातळशी भिंत असते. पैसे घेण्यासाठी एक महिला खिडकीजवळ बसलेली असते. तेथूनच दोन्हीकडच्या स्नानगृहांवर तिची नजर असते. स्नान करणारे पुरुष नग्नच या महिले-समोर येतात जातात. व केव्हा केव्हा तर ती त्यांना टॉवेल अथवा साबु देण्यासाठी स्नानगृहात जाते येते.

प्रथम प्रथम अशा सार्वजनिक स्थानांत सर्वांच्या समोर नग्न होऊन स्नान करायला मोठा संकोच वाटतो. पण हलके हलके त्याचा अभ्यास होऊन जातो. सामान्य जपानी लोकांना तर बाळपणापासूनच ही संवय असते. म्हणून त्यांच्या मनांत या बाबतीत काही विकार निर्माण होत नाही. हीं स्नानघरें फार स्वच्छ, सुंदर आणि फुलांनी सजविलेलीं असतात. फुलांची सजावट जपानी जीवनाचें विशेष अंग आहे. येथील पायखान्यांतहि कुंड्या ठेवलेल्या असतात. जपानी जनतेचें निसर्ग-प्रेम व पुष्प-प्रेम जग-प्रसिद्ध आहे.

बारिक डोळे, दबलेलें नाक, वर आलेले गाल, रुंद कपाळ व ठेंगणा बांधा अशा जपानी लोकांत नम्रता, सरळपणा व मनमिळाऊपणा ठासून भरलेला असतो. तसा तर मानव-स्वभाव सर्व देशांत समानरूपाने उत्तम आहे. परंतु सामान्य जपानी नागरिकाच्या स्वभावात जी नम्रता असते तिने आपला विशिष्ट प्रभाव माझ्यावर पाडला. दोन्ही गुडघे टेकून, डोकें जमिनीवर टेकून प्रणाम करण्याची व वाकून वाकून निरोप घेण्याची प्रथा आपलें विशिष्ट वैभव दर्शविते. तुम्ही थोडीशी जरी कोणाला मदत केली तर धन्यवादांनी तुमची झोळी भरली जाईल. सामान्यपणे मेहनती व इमानदार जपानी लोक शेतींत व उद्योगांत युरोपीयन देशांनाहि मागे सारून पुढे सरत आहेत. आपण जर जपानला आशियाचा सर्वांत अधिक समृद्ध देश म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाही. जरी जपानला प्रत्येक प्रकारचा कच्चा माल बाहेरून मागवावाच लागतो, तरी त्याचें प्रत्येक घर उद्योगाची क्रीडाभूमि बनलेलें आहे. आकर्षक व स्वस्त माल तयार करण्यात

जपानची बरोबरी कोणी करू शकत नाही. खिशात ठेवण्याचा घड्याळा-एवढे छोटे रेडियो, टेप रेकॉर्डर व कॅमेरे जपानची अद्‌भुत विशेषता आहे. घरांची गोष्ट कशाला, 'कार'मधे व टॅक्सीमधे टेलिव्हिजन लागलेले आहेत. युद्धानंतर जपानच्या आम जनतेच्या जीवनाचा स्तर धडाक्याने वर उठला आहे. त्याचीं अनेक कारणें आहेत, पण सर्वांत मोठें कारण आहे शेतीला व गृह-उद्योगांना दिलें गेलेलें महत्त्व. जपानच्या उन्नतीचा पाया शेतीवर उभा आहे आणि हा पाया चांगला मजबूत आहे. आमच्या भारतवर्षांत मोठमोठ्या उद्योगांचा महाल अविकसित शेतीच्या कमजोर पायावर उभा केला गेला आहे. हा महाल दिसायला कितीहि सुंदर दिसत असो पण मजबूत पायाच्या अभावामुळे तो केव्हाहि कोसळून पडण्याचा धोका आहे. शेती, उद्योग, व्यापार व शिक्षण यांची पुष्कळशी जबाबदारी स्थानिक नगरपालिकांवर आहे. जपानच्या नगरपालिकांचें काम केवळ पाणी, वीज, व सफाईपर्यंतच सीमित नाही, त्यांच्यावर साऱ्या नगराचा सर्वांगिण विकास करण्याची जबाबदारी असते, येथपर्यंत की पोलिस विभाग सुद्धा नगरपालिकेच्या अंतर्‌गत आहे. जपानी भाषेत नगरपालिकेला 'शिया कुशो' म्हणतात, ज्याचा अर्थ आहे – 'नगराचें सरकार'. शेती व उद्योगांच्या विकासाची पायाभूत जबाबदारी नगराच्या सरकारावर आहे.

साऱ्या जगांत शहरांच्या विस्ताराची जी लाट उसळली आहे त्यांतून जपान सुटला आहे असें नाही. खेड्यांतील लोक धडाक्याने शहरांकडे धाव घेत आहेत. आज परिस्थिति अशी आहे की ७० टक्के लोक शहरांत जाऊन पोहोचले आहेत आणि फक्त ३० टक्के लोक खेड्यांत राहिले आहेत. याचा परिणाम म्हणजे शहरांवर लोकसंख्येचा दाब भारी झाला आहे. तो संभाळणें कठिण होत आहे. ज्या दिवसांत आम्ही टोकियोत होतो त्या वेळीं टोकियोतील लोकांना भयंकर जलसंकटाचा सामना करावा लागला होता. जपानी रेल्वे आपल्या कौशल्याबद्दल व फार वेगाबद्दल विख्यात आहे. या छोट्याशा बेटात सडका व रेल्वे वाढविण्यासाठी अधिक जागा नाही. रेल्वेवर सडका, सडकांवर रेल्वे याप्रमाणें कित्येक मजले बनवून जागेची उणीव भरून काढावी लागत आहे. एकतर लोकसंख्येच्या प्रमाणात

हें बेटच लहान आहे आणखीन जें आहे तेंहि डोंगराळ आहे. चतुर व परिश्रमी जपानी शेतकऱ्यांनी डोंगरांनाहि शेतीयोग्य भूमीत परिवर्तित करून घेतलें आहे. तरीहि नागरीकरण ही एक समस्या बनून राहिली आहे. या शहरांत भारी उद्योग आहेत म्हणून तेथे नाही खुली हवा नाही शेतें, नाही जंगलें ! चोहींकडे घाण, गर्दी व गोंगाट. ट्रक व मोटार-गाड्यांच्या खडखडाटामुळे नगरांची दशा तशीच आहे जशी आपल्याकडील कलकत्ता इत्यादि शहरांची आहे.

आमच्या जपानच्या प्रवासाच्या वेळीं टोकियो, ओसाका आदि मोठीं शहरें 'ऑलिंपिक' च्या तयारीसाठी शृंगारली जात होती. टोकियो शहराच्या खालीं भूगर्भ-रेल्वे टाकली जात होती. टोकियो शहरापासून विमानतळापर्यंत एक प्रकारची खास अद्वितीय 'मोनोरेल' केली आहे. तशीच त्याप्रकारचीच ओसाका ते टोकियोपर्यंत सुमारे चारशे मैलांची नवी रेल्वे-लाईन टाकली आहे जी तासाला १२५ मैल गतीने धावते. ही एक रेल्वे जगांतील सर्वांत तीव्र गतीची रेल्वे आहे. याप्रमाणे नव्या नव्या हॉटेलांचीहि निर्मिती झाली आहे. जपानी पद्धतीच्या ह्या हॉटेलमधे पलंग, तक्के, सोफा, खुर्च्या, टेबलें इत्यादि नसतात. अत्यंत सुंदर चटयावर गाद्या पसरून बसतात व निजतात. 'हाशी' लाकडाच्या 'च्यापस्टिक' ने ——कांटचा चमच्याने नाही —— भोजन करणेंहि विशेष आनंदाचें असतें. जपानी भोजन अत्यंत स्वादिष्ट असतें. जपानी भोजनांत माशांचें प्राधान्य फार. म्हणून आमच्या सारख्या शाकाहारी माणसांची थोडी अडचण होणें स्वाभाविक होतें, परंतु त्यांना समजावून सांगितलें तर अनेक प्रकारच्या भाज्या घालून तयार केलेलें 'टेम्पूरा' (पुरी-पकोडी ) सूप, आणि अन्य कित्येक शाकाहारी पदार्थ सहज मिळून जात असत.

जपानमधे सर्वसामान्य लोक हिरवा चहा पितात. सुरवातीस हा चहा काही विचित्रसा लागतो. पण लौकरच त्याचा स्वाद चांगला लागायला लागतो. जपानच्या हॉटेलांत काम करणाऱ्या स्त्रियां अत्यंत प्रेमपूर्वक सेवा करतात. असें वाटतें जणू काही आपण आपल्या घरींच आहोत. हॉटेल मधून आपण निरोप घेतो त्यावेळी तर या भगिनी अशा तऱ्हेने निरोप

देतात जणू काही आपण आपल्या आप्त-स्वकीयांकडून निरोप घेत आहोत.

जपानचे लोक भारतीयांकडे फार प्रेम दृष्टीने पाहतात. टोकियो ते हिरोशिमापर्यंतच्या पदयात्रेत मला वारंवार या गोष्टीचा अनुभव आला. जागजागीं आमचें असाधारण रीतीने स्वागत-सत्कार केले गेले. आम्ही एका ठिकाणीं विश्रांति घेण्यासाठी बसलो होतो तों जवळच्याच शेतकऱ्याने चहासाठीं आम्हाला स्वतःच्या घरीं आमंत्रण दिलें. एकदा आम्ही रस्त्याने जात होतो, तर एका अनोळखी शेतकऱ्याने आम्हाला आमंत्रण देऊन एका रेस्टरांमधे नेले. एका शहरांत आमच्या यजमानाने आम्हाला एका रेस्टरांमधे नेले. खाणें पिणें झाल्यावर रेस्टरंटच्या मालकाने आमच्या यजमानाकडून आमच्याबद्दलचे पैसे घेण्यास इन्कार केला. एका ठिकाणीं आम्ही पाणी विचारायला गेलो पण काही खाल्ल्या प्यायल्याशिवाय त्यांनी आम्हाला जाऊ दिलें नाही. आम्ही लोक अहिंसा, शांति व निःशस्त्रीकरणाच्या गोष्टी करीत होतो म्हणून हें स्वाभाविक होतें की जपानची जनता आमचें विशेष स्वागत करीत असे. सामान्य जनतेच्या मनांत युद्धाविरुद्ध फार तीव्र भावना आहे. हिरोशिमा व नागासाकीमधे अणुबांबने घायाळ झालेल्या अनेक लोकांना आम्ही भेटलो. अणुबांबमुळे आतापर्यंत दोन लाख चाळीस हजार लोकांचे मृत्यु झाले आहेत. जखमी लोक आम्हाला त्या वेळच्या कहाण्या सांगत होते. त्यावेळेस हिरोशिमा व नागासाकी भयंकर हिंसेच्या ज्वालामधे भस्म झाले होते. तसेंच हिरोशिमाच्या सात नद्यांत हजारों प्रेतें वाहत जात होतीं. ट्रकांमधून हजारों प्रेतें भरभरून हिरोशिमा मोठ्या मुष्किलीने स्वच्छ केलें गेलें.

जपानचें राष्ट्रीय संविधान अप्रतिम आहे. ती ‘शांति-घटना’ या नांवाने प्रसिद्ध आहे.

जपानच्या कित्येक विश्वविद्यालयांनी हिंदी शिक्षणाकडे विशेषरूपाने ध्यान पुरविलें आहे. भारतांत एखाद दुसऱ्याच विश्वविद्यालयांत जपानी भाषेच्या अभ्यासाची सोय केली आहे. पण टोकियो विश्वविद्यालय व ओसाका विश्वविद्यालय यांत दर वर्षी शेकडो विद्यार्थी हिंदीच्या परीक्षेत

उत्तीर्ण होत आहेत. हिंदी भाषेकडे जपानमधे इतके ध्यान दिले जातें याची आम्हाला कल्पनाहि नव्हती. आम्ही भारतात इंग्रजीवर इतका जास्त जोर देत असतो की अन्य विदेशी भाषांची आणि खास करून आशियांतील भाषांची प्राय: उपेक्षा होत आहे. म्हणून आज आशियांतील देशांशी भारताचा संबंध वाढविण्याकडे जास्त ध्यान देण्याची जरूर आहे. मी ७०० मैलांची पदयात्रा करून व कित्येक हजार मैलांचा रेल्वे प्रवास करून जपानला पुष्कळ पाहिला व समजून घेतला. ७५ दिवसांचा काळ काही जास्त होत नाही, पण माझ्यासारख्या पृथ्वी पर्यटकाला एवढा काळ फार कमीहि म्हणता येणार नाही.

## हिरोशिमा दिवस

६ ऑगष्ट व ९ ऑगष्ट १९४५ हें ऐतिहासिक दुष्ट जंगलीपणाचे दिवस आहेत. थोड्या क्षणात हिरोशिमाच्या व नागासाकीच्या हजारों मनुष्यांचें भयंकर आणविक ज्वालात भस्म करून टाकलें गेलें. निरपराधि कोंवळीं मुलें-लेंकरें आणि स्त्री-पुरुष युद्ध-पिपासु कमांडरांच्या निर्दय हिंसेच्या अग्नीत ढकलून दिले गेले. दु:ख या गोष्टीचें आहे की ही करूणाहीन घटना घडूनहि युद्धाची निष्फलता अजून मानवाला पटली नाही.

२० वर्षांपूर्वी जी घटना घडली तिच्याहून काही वरचढच आज युद्धाची ज्वाला उफाळून येऊ शकते. कारण आजहि विश्वाच्या शक्ति अण्वस्त्र निर्मितीच्या स्पर्धेत उत्सुकतापूर्वक भाग घेत आहेत. हिरोशिमांत व नागासाकींत ज्या बाँबचा उपयोग केला गेला त्यापेक्षा हजारों पट अधिक ताकतवालीं हत्यारें आज सेनाधिकाऱ्यांच्या हातांत आम्ही देऊन ठेवलीं आहेत.

हिरोशिमाच्या व नागासाकीच्या १९ व्या वर्ष दिनीं आम्ही तेथे हजर राहू शकलो हा आमच्या जीवनातील एक अविस्मरणीय क्षण होता. त्या दिवशीं हजारों स्त्री-पुरुष गंभीरतेने व तत्परतेने शांति-प्रतिज्ञा घेत होते. ६ ऑगष्टला सकाळीं ६ वाजल्यापासूनच जनता हिरोशिमाच्या प्रसिद्ध 'हेवा कोएन' (शांति-उपवन) मधे एकत्र जमू लागली. मी पाहिलें की रात्रीं १० वाजेपर्यंत यात्रीलोक सारखे येत होते. जपानी लोकांच्या अंत:करणांत

युद्ध व अणुबाँब यांच्या विरुद्ध किती तीव्र भावना आहे ही प्रत्यक्षरूपाने आम्हाला पहायला मिळाली. या तीव्र भावनेचा लाभ घेण्याच्या प्रयत्नांत येथील राजनैतिक पक्षांनी 'शांती'च्या घोषणांचा दुरुपयोग केला आहे आणि या नांवावर आपला राजकीय स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला आहे.

या प्रसंगीं राजकीय पक्षांतर्गत काही शांतिवाद्यांची शांति-संमेलनेंहि झालीं. त्यासाठी हजारों लोकांना मोटारींत भरभरून आणलें गेलें. हें सारें दृश्य सुखद नव्हते. सामान्य जनता त्याने प्रसन्न नव्हती. आम्ही अशा प्रकारच्या कोणत्याहि सभेत भाग न घेता हेवा कोएनमधील (शांति-उपवन) नागरिकांच्या सभेत भाग घेतला. ही सभा अत्यंत प्रभावशाली झाली. जनतेच्या भावनांच्या सागराला भरती आली होती. अणुबाँबमुळें आतापर्यंत मेलेल्या दोन लाख पंचवीस हजार मनुष्यांच्या समाधीजवळ उभारलेल्या भव्य व्यास-पीठावरून हिरोशिमाच्या नगरपित्यांनी घोषणा केली –" आमच्या शहराची चार लाख जनता आज पुन्हा ही प्रतिज्ञा घेते की आम्ही या जगात पुन्हा कोणत्याहि नगराचा 'हिरोशिमा' करू देणार नाही." या समाधीच्या पाठीमागे दिसणारा अणुबाँबमुळे झालेला खंडार या प्रतिज्ञेवर शिक्का मारीत होता. या खंडाराला जशाचा तसा राखून ठेवला आहे. बाकीच्या हिरोशिमा नगराचें नव्या प्रकाराने निर्माण झालें आहे आणि आज हिरोशिमा जपानच्या आधुनिक नगरांपैकी एक गणलें जातें.

आमची सहयात्री अमेरिकन भगिनी मेरी हार्वी अश्रूंनी न्हाऊन निघाली होती. कोणी अमेरिकन शांतिवादी अशा समयीं भावनाकुल बनणें स्वाभाविक होतें. आपण सहज कल्पना करू शकतो की अशा स्थितीत श्रीमती मेरीताईची मनोदशा कशी होऊ शकते ! तिच्या अश्रूंच्या धारा पाहून व टोकियो ते हिरोशिमापर्यंतच्या तिच्या पदयात्रेचा इतिहास ऐकून तर पत्रकार व टॅलिव्हिजनचे कॅमेरे तत्परतेने श्रीमती मेरीच्या बाजूला वळले. नागरिकांच्या या सभेनंतर १५ मिनिटेंपर्यंत टॅलिव्हिजनवर आमचा कार्यक्रम ठेवला गेला आणि हा कार्यक्रम 'हिरोशिमा-दिवस' म्हणून विशिष्ट कार्यक्रमाच्या रूपात साऱ्या जपानभर प्रसारित केला गेला.

गेल्या वर्षी येथील अणु-विरोधी संस्था 'गेनसुइ क्यो'मधे जे दोन तट पडले होते त्यांतील एका गटाला कम्युनिस्टांचा पाठिंबा आहे आणि दुसऱ्या गटाला समाजवादी पक्षाचा. जपानची कम्युनिस्ट पार्टी पेकिंग ब्रँड कम्युनिझमची समर्थक आहे आणि रशिया-अमेरिका शांति-प्रयत्नांत विश्वास ठेवीत नाही. कम्युनिस्ट समर्थित 'गेनसुइ क्यो'चें वार्षिक संमेलन या वेळीं हिरोशिमांत न होता टोकियो किंवा क्योतो शहरांत झालें. संमेलनात अनेक प्रकारचे विवाद निर्माण झाले. म्हणून रशिया, भारत आदींच्या कित्येक प्रतिनिधि मंडळींनी या संमेलनावर बहिष्कार टाकला आणि समाजवादी समर्थक 'गेनसुकीन' पक्षाच्या संमेलनांत भाग घेतला. हें संमेलन हिरोशिमांत आयोजित झालें होतें.

जपानमधे स्वतंत्र व निष्पक्ष शांति-आंदोलनाची अत्यंत आवश्यकता आहे. हिरोशिमाच्या काही निष्पक्ष लोकांनी 'शांति-अध्ययन संघा'ची स्थापना केली आहे. येथील लोकांना या संघाकडून काही घडेल अशी उमेद आहे. या संघाचें एक प्रतिनिधि मंडळ या वर्षी अमेरिका, यूरोप व रशिया येथून यात्रा करून आलें आहे. या प्रतिनिधि मंडळात बहुसंख्य अणुबाँब पीडित, ज्यांना जपानी भाषेत 'हिबाकुशा' म्हणतात, बंधु-भगिनी आहेत. हा संघ आंतरराष्ट्रीय शांति-आंदोलनाशी संबंध वाढविण्याच्या प्रयत्नांतहि आहे. हिरोशिमांत 'W. R. I.'चे काही सदस्यहि निष्पक्ष व कळकळीचे आहेत. जर 'शांति-अध्ययन संघ' व 'W. R. I'चे लोक एकत्र मिळून शांति-आंदोलनाचें नेतृत्व करतील तर साऱ्या जगाच्या शांति-आंदोलनाला समर्थ नेतृत्व प्राप्त होईल. सध्या शांति-संस्था स्वत:ला लहान व कमजोर मानत असल्या कारणाने प्रगति करू शकत नाहींत असें वाटतें.

जपानी बौद्ध-संघाकडूनहि काही शांति-प्रवृत्त्या चालत असतात. पण जपान-बौद्ध-संघ हा एक धार्मिक संप्रदाय आहे म्हणून स्व-संप्रदाया-बाहेर त्याचा प्रभाव नसल्यासारखाच आहे. काही शांति-संस्थांच्या लोकांनाहि जपान-बौद्ध-संघाबरोबर निकट संपर्क जोडायला संकोच वाटतो.

त्यांना भीति वाटते की जर आपण या बौद्ध संघाच्या भिक्षूंबरोबर अधिक संपर्क ठेवला तर आपल्यावर सुद्धा धर्माचा शिक्का बसेल.

जपान-बौद्ध-संघाचे प्रमुख फुजीई गुरुजींबरोबर आम्ही लोक तीन दिवस राहिलो. एका शांति-स्तूपाच्या उद्‌घाटन समारंभातहि आम्ही भाग घेतला. फुजीई गुरुजींच्याशिवाय श्री. मारियामाजी व श्री. इमाईजी यांच्या शुद्ध हृदयांतून निघालेल्या गोष्टींनी आम्हाला फार प्रभावित केलें.

## भारताकडे

याप्रमाणे जपानच्या प्रवासाबरोबर आमची जगत् यात्रा पूर्ण झाली. एका फ्रेंच जहाजाने—- व्हियेटनामने —- आम्ही लोक भारताकडे रवाना झालो. हाँगकाँगमधे आमचें जहाज दोन दिवस थांबलें. हाँगकाँग दोन भागांत विभागलें गेलें आहे. एक विभाग चीनच्या मुख्य भूमीला जोडलेला आहे आणि दुसरा विभाग समुद्रामधे एका छोटयाशा बेटाच्या रूपात आहे. हें एक कर-मुक्त बंदर असल्यामुळे येथे प्रत्येक प्रकारची वस्तु पुष्कळ स्वस्त किमतीत मिळते. अजूनहि हाँगकाँग ब्रिटिश वसाहत आहे. चीनच्या भूमीवर एका छोटयाशा वसाहतीचें असणें म्हणजे आजच्या राजकीय डावपेचाचा एक नमूना म्हणता येईल. या वसाहतीमुळे चीनला फार मोठा व्यापारी लाभ होत आहे. चीनच्या कारखान्यांत तयार झालेल्या मालावर ‘ मेड इन् हाँगकाँग ’ चें लेबल लावून करोडो रुपयांच्या मालाची खरेदी-विक्री होत असते.

हाँगकाँगनंतर आम्ही सायगांव, दक्षिण व्हियेटनाममधे पोहोचलो. अमेरिकेच्या सैन्यांनी गनिमांचा सफाया (नाश) करण्यासाठी ठिकठिकाणीं सैन्यांचीं जाळीं पसरून ठेवलीं होतीं. सर्व शहरांत सेना गस्त घालीत होती. चोहीकडे एक अत्यंत तंग वातावरण होतें. राजकीय अस्थिरतेमुळे लोक त्रासलेले व कंटाळलेले होते. दोन दिवसांत जितकें जास्तीत जास्त सायगांव पाहणें शक्य होतें तितकें पाहण्याचा आम्ही प्रयत्न केला.

सिंगापूर आम्ही पाहू शकलो नाही. इंडोनेशिया व मलेशिया यांच्या-तील बेबनावामुळे सिंगापुरात फारच तंग वातावरण होतें आणि वर्ग-द्वेष सर्वत्र पसरल्यामुळे कर्फ्यूचा अमल तेथे चालू झाला होता. सर्वच्या सर्व

आग्नेय आशिया आज याप्रमाणे राजकीय तंग वातावरणामुळे व्याकुळ आहे व जनता त्रस्त आहे.

कोलंबोमधे घालविलेला एक दिवस खरोखर लक्षात राहील. श्रीलंका, समुद्रात मोत्याप्रमाणे चमकणारी भूमि आहे. लोक गरीब आहेत पण सीधेसाधे असून प्रगति-पथावर आहेत. श्रीमती भंडारनायके सबंध जगांतील देशांत एकमात्र महिला मुख्यमंत्री होती. हें खरें की त्यांचा पक्ष लोकप्रिय राहिला नव्हता, पण ती फार चतुर समजली जात होती. महाबोधी सोसायटीचे एक बुद्ध भिक्षु भदंत सुमंगल यांची भेट झाली आणि त्यांनी बरोबर येऊन कोलंबो व आसपासचें क्षेत्र आम्हाला दाखविलें.

आम्ही ११ सप्टेंबरच्या दिवशीं परत भारतात पोहोचलो. आमची ही पृथ्वी-प्रदक्षिणा समाप्त झाली. मुंबईहून आम्ही दिल्लीस गेलो आणि २ आक्टोबरला महात्मा गांधींच्या समाधीला प्रणाम केला.

• • •

# विशेषनाम-सूचि


अगली अमेरिकन्स २५३
अटलांटा २६५, २६६
अॅडनॉवर १६३, १७९
अणुप्रयोग-निषेध-करार २३६
अदर अमेरिका २५३
अंगुलीमाल–नवा १८७
अनार्किस्ट सोसायटी २७७
अंबाला २४
अब्बास खियानी १९, ६२, ६३
अमृतलाल १७
अमृतसर २४, २५
अर्नोल्ड–कार्ल २६९
अरारोट ११५
अरिजोना २४३
अलबुकर्की २४४, २६०.
अलियावर जंग १९८, २०३,
अलेक्झांडर इवानोविच पलादिन १८, ८८
अहिंसक कारवाई समिति (कमिटी फॉर नॉनव्हायोलंट अॅक्शन) २१६, २२०, २४०, २४१, २५३
अज्ञेयजी २४४
आइन्स्टीन–आलबर्ट २५६
आटोमेट २४९
आदमपूर २४
आंटोरियो २४३
आर्नडट-डॉ. १६४
आरत्योमकी १२०, १२१
आल्डर मास्टन २११
आलबनी २६५, २६६
आस्वीच १४०
आस्वे २८०
इक्रा ९२
इझबेस्तिया १०४
इंडिया २५९
इंडोनेशिया २८९
इमर्सन २६१
इमाईजी २८९
इवान १२८
इस्ट वेस्ट सेंटर २७५
इस्पिहान ७८
उमर खैय्याम ७२, १०८
उलब्रिस्ट–वॉल्टर १५८
ऊ थांट २२५
एंजल्स ८०
एंपायर स्टेट बिल्डिंग २२७
एफेल मनोरा १९१
एरास ८०
एरिएज २४३
एलके १७३

एसेन १७५
ऐक्स- मालकम २७०, २७१
ओ आहु २७४
ओतोबान १७०
ओबेह ४०
ओल १९८
ओसाका ५, २८४, २८५
कतांची ६१
कंदाहार ३७, ४०, ४८, ४९
कॅपिटल १५१, २०७
कपिलभाई २०
कमालाबाद ६५
कराची ४९
कलकत्ता ७, ८, ११, २२, ८३, २०६, २१९, २७७
कॅलिफोर्निया २४५
कॅस्ट्रो-डॉ. २३८.
काकार-डॉ. ४३
कॉकेशस ११५
काबूल १७, १९, ३२, ३५, ३७, ३८, ३९, ४०, ४६ ४८, ४९, ५१, ६२, ७४, ७९, २०६, २७४
काश्मीर १६७, २४२
कासी ४०
किंग-मार्टिन लूथर २१०, २३९, २४०, २५५, २६२, २६६, २६९, २७१
कुतनो १४१
कुताईसी १२९, १३०
कू क्लुक्स क्लान २५२
कूरा ८३
केनेडी १, २, ८७, १८७, २३४, २३५, २३६, २३७, २३८, २५७, २७०
के. पी. एफ्. ए. २५२
क्रेमलिन ९१, ९२, ९५, ९६, १०३
कोनिन १४१
कोलखोज १२५
कोलंबस २५९
कोलंबिया २५६
कोलंबो २९०
कोर्लीन १७४, १७५, १७९
कोवो १४१
कोसिन-मॉरिस १८२
कोहिबाबा ४८, ४९
क्यूबेक २६३
क्रूप्सकाया ९२
क्वीन मेरी २१९, २३५
क्वेकर-हाऊस १९८, २१९
क्वेकर्स २१०
खान अबदुल गफार खान ३३, ४७ (सरहद्‌गांधी)
खुरमाबाद ५६
खैबरखिंड ३१, ५०, २७२
ख्रुश्चेव ८४, १०४

ख्वाजा–ए–चेस्ता ४०
गझनी ४०, ४८
गटे १५१, १५२
गंगा १३६
गागरा ८६
गाजविन ६८,७०
गार्डियन २०५
गालचर २४५
गांधी–फ्रान्सचे १९६
गांधी–महात्मा १, ३६, ३७, ४७, ५९, ६६, ६९, ७७, ८१, ९१, १०७, १३३, १३७, १३८, १६९, १८४, १८७, २२०, २२१, २३४, २३५, २३६, २३८, २३९, २६१, २६२, २६९, २७१, २९०
गांधी सरहद्द ३३,४७
गुजराणवाला २८
गुदाउता ८६
गुप्त–मैथिलीशरण ११०
गरग्यान–मामीकोनियान ११४, ११५, ११६
गुल्फा २०
गुलामयसीन १७, २७
गेन सुइक्यो २८८
गोंबद–ए–काबुस ५८
गोर्की ८०
गोरगान ६१
गोरी १८, १२५
गोरेश्वर ११
गोहत्ती ११
ग्रँडफादर २४२
ग्रेग–रिचर्ड २७२
ग्वाटानामो २६३
चंद्रभान ७५
चार्लस–डिकन्स ९८
चीन २८९
चेखव ८०
जगन्नाथ धर्मजा ३८, ७४
जपान-बौद्ध-संघ २७७, २८८, २८९
जमरूद ३१, ३२, ३४
जयपूर १३०
जयप्रकाशजी २४५
जलालाबाद १७, ३६, ३७, ४९
जॉन २६६, २६८
जॉन बर्च सोसायटी २५२
जॉनसन (राष्ट्रपति) २३५, २४८, २७०
जारजेता–अइरापेथान ११७, ११८
जालंदर २४
जियेम–नोदिन २३८
जुल्फा २०, ८०, ८२
झेलम २८
टर्न टोवर्डस पीस २५४

टॅब्रिज २०
टांगानिका २२६
टॉलस्टॉय ६६, ८०, ९६, ९७, ९८, ९९, ११३
टीखोनोह १०४
टेंपल–कौरनाट १७३
टेम्स २०४
टेलर–डॉ. एडवर्ड २४४
टोकियो ५, ७३, १९२, २७७, २७८, २८३, २८४, २८५, २८७, २८८
ठाकुर–रवींद्रनाथ १३७
डॉनविल २६५, २६६
डॉर्ट मंड १७४
डुसेल डार्फ १७३, १७५, १७९
डेट्राईट २४३, २४४
डोलची–डेनलो २१०
डोव्हर २०३, २०४
तरियाबाद ५६
तक्षशीला ३७
तायाबात ५४
ताशकंद ११, ७४, ८६
तेहेरान १७, १८, १९, ६३, ६४, ६५, ७१, ७४, ७५, ७९, १०३, १०४, १०५, १०६, २०६, २४५
तोरखाम ३२, ३४, ४१
त्बीलीसी ८३, ८६
थॉमस १७४
थोरो हेन्री डेव्हिड २६०, २६१, २६२, २६३
द गॉल ८७, १९६, १९८, २२३
दि मायनॉरिटी ऑफ वन २५२
दिलीजान ११६
दिल्ली १, ३, ७, ९, १०, ११, १६, १७, १८, २२, २४, ३१, ३६, ३८, ३९, ४५, ४६, ४९, ६१, ६२, ७१, ७३, ७६, ७७, ७९, ९३, १०८, १६७, १९२, १९४, २००, २०२, २०४, २०६, २१५, २१६, २१९, २२९, २३५, २३६, २४०, २५३, २७८, २९०
देमाबंद ६२
देसाई–मोरारजी ७
दोर–व्हाइनट १८८
दोस्तोवस्की ८०
द्वारकोजी ९६
नटराजन्– डॉ. २०
नरगिस १ ९
नरसिहम् २२६
नॅशनल फ्रंट १४९, १६९
नागासाकी २७८, २८५, २८६
नाझीपार्टी २५२
नाटो १६०, १६९
नाटो–करार १६४, २३६
नानक–गुरु ६५
नायगारा २४२

निग्रहार–(दैनिक) १७
नीपर १२७
नेपोलियन ७५, १२७
नेशन २५२
नेहरू–पं. ६, ७६, १८७, २७४
नैशावूर ७८
न्यूयॉर्क ७३, १८३, २१३, २२१, २२२, २२७, २२९, २४१, २४४, २४६, २५१, २६५, २६९, २७८
न्यूयार्क टाइम्स २५०, २७४
पंच सरोवरें २४३
पंजाब (अफगाणिस्थानांतील एक शहर) ४०
पर्ल हर्बर २७४
पॅरिस, १, ३, ५, ७३, १८७, १९१, १९२, १९३, १९४, १९६, १९७, २००, २०१, २०३, २०५, २०६, २१३, २४५, २५३
पॅवर्थ–जॉन २४६, २४७
पाकीजा ६३
पानआम २८०
पानीपत २४
पिकासो १७८
पियर–अॅबे २१०
पीस–एजिटेटर २२८
पीसन्यूज २११, २१९
पुष्कीन ८०
पेकिंग २७९
पेटिट–श्रीमती १९४, १९५, १९६, २०२
पेतकोविची १२८
पेशावर २८, २९, ३१, ५०
पोजनान १४१, १४५, १४६
पोजनान एक्सप्रेस १४५
प्रभाकर ३, ४, ८, ९, ७१, ७५, १११, १२५, १२६, १४१, १४२, १४३, १४४, १९४, १९८, २०१, २१५
प्रावदा ९२, १०४
प्रिटन २५६
प्रिन्स्टन २३८, २५७
प्रोग्रेसिव्ह २५२
फरिदुन किरमानी ५७
फाउस्ट १५१
फिरदोसी ७२, ७८
फिलाडेलफिया २५१
फिशर–लुइ २६१
फुजीई २८९
फुंजी २८०
फेलोशिप ऑफ रिकन्सिलिएशन २७७
फ्रांकोव्स्को– जॉन १३८, १३९
फ्रेंड्स ऑफ गांधी २१०
फ्रेंड्स पीस कमिटी २१९
बंगलोर ३, ७, १०, ११, २०
बफेलो २४३
बर्कली २४४

बर्लिन ७३, १५१, १५९, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६७, १६८, १७०, १९२, २०६, २४५, २५३
बॉडर-अर्नेस्ट २१७, २१८
बॉडर-गेडरिक २१७
बॉन १५१, १७३, १७९, २१३
बापूजी १, १६, ९६, ९७, १३७, १३८, २६१
बाद्रियान ३७
बारेट्ट-लॉरेन्स १८६
बाल्टीमोर २४५
बावरी स्ट्रीट २४६
बिलिब्रांट १६५
बिस्वा १३५
बुद्ध १३३, १८७
बेइमार १५१
बेल्लिघाम २४३
बेवर्ली २२१, २२२
बेह १९, ६२
बोजनूर्द ५७, ५८
बोरोनेज ८८, ८९
बोल्लास्टन २१७
बोस्टन २४५, २६२
बौल्स-चेस्टर २१६, २१७
बौल्स-डॉ. लोथर १६४, १६५
ब्रइमान १७
ब्राऊन-रुनहॅम १९३
ब्रांस्ट्राट कॅफे २६६
ब्रुकहँज २३५
ब्रुकालिन २२१
ब्रुसेल्स १८२, १८३, २०६
भदंत सातो १४०
भदंत सुमंगल २९०
भंडार नाइके- श्रीमती २९०
भाईजी ६३, ६४, ६५
मॅकमिलन ८७, २०६
मख्खनसिंहजी १९, ६३
मद्रास ११, २२, ८३
मदिना दारान ८२
मदुराई १९३
मलेशिया २८९
मस्ते- ए.जे. २१९, २२८, २४०
महनाज ६९
महाबोधी-सोसायटी २९०
मानुचेर ५९
मानोलिस १९४
मान्स १८३
मार्क्स ८०, १५०, १५१, २३०, २६०
मारबीरोश आंद्रोनिक ८१
मारियामाजी २८९
माशा १२५
मशॅद ७८
मांगीलाल जैन २२
मास्को १, २, ३, ९, ११, २०, २९, ४१, ४३, ४४, ६८, ७३, ७४, ७६, ७९, ८४, ८६, ८८, ८९,

९०, ९१, ९३, ९४, ९५, ९६, १०३, १०४, १०५, १०६, १०७, १२९, १३५, १९८, २०५, २०६, २०९, २१२, २१३, २३५, २४०, २४१, २४५, २५३
मास्को–करार २१२, २५४
मिन्स्क १०८, १२८, १२९
मिलर–आर्थर २२९
मिवाकी २४३
मिशिगन २४३
मिसिसिपी २४३
मीराबाई ५
मुरगेसन १७
मुंबई २०६, २१९, २९०
मेडिसिन २४५
मेसरोप मास्टोलिय ८२
मैकोवीत्स्की ९९
मैत्री आश्रम ११
मोजूरी २४३
मोट–एन्.डी. १८२
मोबोज १८९
यमुना १६, १३६
यांकाकुपाल १२८
याब्वोन्स्की–स्तानीस्वाव १३७, १३८
यास्नायापोलाना ९६
युद्धविरोधी आंतर्राष्ट्रीय संस्था (वॉर रेझिस्टर्स इंटरनॅशनल) २७६, २८०, २८८
यूनो २२२, २२३, २२४, २२५, २२६, २२७, २२८, २२९
येरवान ८२, १२२
येशु ख्रिस्त १३०
रजा–श्री. ६५, ६६, ६७
रजा–श्रीमती ६७
रस्टिन–बायर्ड २५५
रसेल बर्ट्रांड २, ६, ७, २११, २१२, २६२
रहिमी रजावी–श्री. ६८, ६९, ७०
रहिमी रजावी–श्रीमती ६९, ७०
राजकपूर १०९
राजपुरा २०, २४
राडस्मिथ २२९
राधाकृष्णन्–राष्ट्रपति ७, २३, ७६
राधाकृष्ण बजाज २०
रॉबिनसन २६९
रामलाल आनंद १७, १९, ५१
राल्फलांग १७३
रावलपिंडी २८,
रिओबुइचिरो २७८
रूस्तावेली ८३
रूसो १९१
रेक्सरोथ–केनेथ २५४
रेनाता १४५, १४६, १४७
रोचेस्टर २४३
रोजमरीबाई १३९, १४०
रोम २५३
लखनौ २०, १३०

लंडन १, ३, ७३, १५१, १९२, १९३, २०४, २०५, २०६, २०७, २०८, २११, २१३, २१५, २१६, २१८, २१९, २४५, २४६, २५३, २६४, २६६
लंडीकोटल २८, ३४
लता ९, १०, ११
लांबार्की २१०
लाल ४०
लॉस एंजिल्स २४५
लाहोर २८, २०६
लिंकन–अब्राहम २७०
लिबरेशन २५२
लिए १९६
लुदमीला ५, ९४, १२९
लुधियाना २६
लुमुंबा ९०
लेनिन ७८, ८०, ९१, ९२, ९३, १०३, २३०
लेनिनग्राड ७६, ८६, १९२
लेयोकोलार्ड १८२
लेहमन– श्रीमती बार्बरा २४१
ल्योषा १२२, १२३
वखतांगी १२३
वर्ल्ड पीस ब्रिगेड २१९
वसीलोव–अब्रामोविच १२८
वसीलोव–फ्रिमोनोब १२१, १२२
वाइकिकि २७५
वॉरसा २०, १०२, १०५, १०६ १३५, १३६, १४१, १६०, २१३
वॉरसा–करार १६४, २३६
वाराणसी ३, १७, १३०
वॉलस्ट्रीट २२९
वालेन टाऊन २४१
वॉल्टेअर १९१
वाल्डेन पॉड २६२, २६३
वॉशिंग्टन, १, २, ३, ९, २०, २९, ४१, ६८, ९३, १०८, १९२, २०४, २१३, २२९, २३४, २३५, २४०, २४१, २४४, २४८, २७८
वॉशिंग्टन मार्च २५५
वास्तो–लांजा देल (फ्रांसचे गांधी) १९६, २१०
व्हाइट हाऊस १, १०३, २३५
विद्यार्थिनी–शांतिसंघ २४५
विनोबा ११, १२, १३, १४, १५, १६, ७३, २१७
विल्यम २४३
विल्सन–हॅरोल्ड २०६
विवेकानंद–स्वामी २४५
विश्वनीडम आश्रम ३
व्हिएटनाम २८९
वुइमेन स्ट्राइक फॉर पीस २५४
वेस्टपोर्ट २७४
वोल्फगांग १९८
वोविच १४१

शहनाज ६९
शांति अध्ययन संघ २८८
शांति-घटना २८५
शांति यात्रा सहायक समिति २७७
शॉंपेग १३९
शारबोनियर १९३
शाहपसंद ५९
शिकागो २४३, २४४, २४५
शिराज ७८
शीला ६७
शेखसादी ७२
शोता रुस्तावेली ८३
शोभानी ११९
श्रीलंका २९०
षारलोट २६५
ब्वीलीसी १२९
सईद ६७
सतीश कुमार ९, १४४, २१३
संयुक्त राष्ट्रसंघ २२२, २२३, २२५, २२७, २५०
साधना ६३
सानफ्रान्सिस्को २, २४०, २४१ २४४
सायगांव २८९
सिद्धराजजी १७
सिंगापूर २८९
सिराईशिपे २७७
सिसाब ५७
सिंह-शिवकुमार १७४
सीमा ६७
सुखूमी १८, ८६
सुएको-कुमारी २७८
सुपीरिअर २४६
सुशील कुमार २०
सेन १९१
सेन न्यूक्लिअर पॉलिसी २५४
सेमोनियान १२२
सोची ८६, ८८, ८९
सोमाभाई १९
सोसान्ना १४०
सोह्यो २७९
स्कॉट-कुमारी २१८
स्कॉट बॉडर कॉमनवेल्थ २१७, २१८
स्कार्फ-डॉ. २७३, २७४
स्टॅलिन १८, ८३, १२५
स्ट्रॉउस-जोसेफ १६३
स्मालेंस्क १२७, १२९
स्यालसाहेब ३६
स्त्रालकोवस्की-तादेउस १३६
स्लाबा ८९, ९०
स्लावादा १०८
स्वाइत्झर-अल्बर्ट २११
स्वादजिमा १४१
स्पिद्दवार किरमान ५२
स्पिरिदोनोवशी ९६
स्पिरिदोनोव्ह १०४
स्विसलोच १२९
स्टुटगार्ट १७३

स्टुडंट्स पीस युनियन २५३
स्प्रे १७०
स्कोलकोवाताई १२७
हॅनोवर १७९
हँम्बुर्ग १७३, १७४
हॅमरशोल्ड–डाग २२६
हमीद ६३
हरिरामजी चोपडा १९
हरोन २४३
हवाई २७४, २७५, २७६
हाँगकाँग २८९
हॉफमेन १४६
हारलम २२९, २४६, २५१, २६५, २६६
हार्वी–श्रीमती मेरी २७८, २८७
हॉवर्ड २५६
हॉवर्थ–नायल २४१
हिटलर ७५, १००, १०२, १४९, १५२, १६१, २५२
हिंदुकुश ७४
हिबाकुश २८८
हिरात ३७, ३९, ४०, ४१
हिरोशिमा १४०, २७७, २७८, २८५, २८६, २८७, २८८
हुनरवर १७, ५८
हेजल–प्रो. थियोडोर २६०
हेंटोफ–नेट २२८
हेन्री जॉन ९८
हेमिंग्वे ६६
हेवा–कोएन २८६, २८७
होनोलुलु २७४, २७५
ह्यूगो–व्हिक्टर १९१

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | शेवटीं | हदीचें | हिंदीचें |
| ६ | पोटमथळा | मित्राची | मित्रांची |
| १३ | ३ | आरामाची जरूर | आरामाची अत्यंत जरूर |
| १५ | १ | समाधान कारक | समाधानकारक |
| १५ | २२ | औषध पाण्याची | औषधपाण्याची |
| १६ | २ | वाजवतो | वाजवतो |
| १७ | ७ | भाव विव्हल | भावविह्वल |
| २६ | २१ | एक | एका |
| ३१ | ५ | उत्सुता | उत्सुकता |
| ३२ | २५ | वीर पुरुष | वीरपुरुष |
| ३३ | ११ | कारण्यात | करण्यात |
| ३६ | ५ | विकट | बिकट |
| | १० | ११६२ | १९६२ |
| ४६ | ११ | खांदावर | खांद्यावर |
| ५१ | २६ | तें. | होतें. |
| ५२ | १२ | नव्हना. | नव्हता. |
| ५९ | १९ | परिस्थितीमुळे | परिस्थितीमुळे |
| ६२ | २ | आही | आम्ही |
| ७० | अंतीं | मानवाची | मानव्याची |
| ७१ | अंतीं | येण्याचे | येण्यास |
| ७४ | २४ | सोपी होती | सोपी गोष्ट होती, |
| ७६ | २१ | रक्कम जमा | रक्कम आधी जमा |
| ८३ | अंतीं | मंतीदगचा | मंदगतीचा |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १०५ | १७ | जेथील | तेथील |
| १०७ | ३ | गठरी | गठडी |
| १२१ | २३ | बचारले | विचारले |
| १२९ | २ | दृष्टि | दृष्टीस |
| १३३ | २७ | ऋत्येक | प्रत्येक |
| १५० | ८ | भूमीत | भूमीतून |
| १५७ | १ | सल्ला मसलत | सल्लामसलत |
| १६६ | २ | बलनचे | बर्लिनचे |
| १६७ | ४ | गडगडात | गडगडाट |
| | ११ | सैन्यांच्या | सैन्यांचा |
| | अंतीं | स्फुलिंग | स्फुल्लिंग |
| १७९ | १४ | चर्चा आम्ही | आम्ही |
| १९१ | १२ | क्रांतीच्या | क्रांतीचा |
| २०० | अंतीं | ग्र | ग्रहण |
| २०३ | १२ | ड्रोन्हर | डोव्हर |
| २०८ | ४ | वगैरेचीहि हूं | वगैरेचीहि. हं |
| २१५ | १३ | अर्मेरिकत | अमेरिकन |
| २२३ | ९ | असो, | भेटला असो, |
| २३७ | ११ | पिस्तुलीं | पिस्तुलें |
| २५९ | ९ | राजन तिक | राजनैतिक |

● ● ●

परंधाम प्रकाशनाचें

## प्रवास-वर्णनात्मक साहित्य

| | रु. पैसे |
|---|---|
| चंबळच्या खोऱ्यांत (आ. ३ री) | २–०० |
| विनोबांच्या सहवासांत (आ. २ री) | १–०० |
| विनोबांची पूर्वपाकिस्तान यात्रा | १–५० |
| क्रांतीच्या दिशेने | १–०० |
| क्रांतीच्या वाटेवर | १–०० |
| जेथें चिनी सैन्याने कबजा केला होता | २–५० |
| हिमालयाची हांक | [illegible]–०० |

शिवाय--

गीताई चिंतनिका, स्थितप्रज्ञ दर्शन, गीताप्रवचनें, ज्ञानदेव चिंतनिका, दीक्षा आदि विनोबांचे ग्रंथ तुम्हाला आध्यात्मिक क्षेत्रातील प्रवासात उपयोगी पडतील. खुलासेवार माहितीसाठी सविस्तर सूचिपत्र मागवा.

**परंधाम प्रकाशन,**
पो. पवनार, जि० वर्धा
**(महाराष्ट्र)**